सुवर्ण महोत्सव

वार्षिकांक
२०१७-१८

# प्रेरणा




**नूतन महाविद्यालय,**
सेलू. जि. परभणी



## सुवर्णमहोत्सवी वर्षाचा दिमाखदार उद्‌घाटन सोहळा

कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे, प्रमुख अतिथी : मा. प्रा. डॉ. भालचंद्र मुणगेकर मा.डॉ. पंडित विद्यासागर विशेष उपस्थिती : मा. द.रा. कुलकर्णी, मा. श्री विनोद बोराडे, मा.श्री हेमंत आडळकर, मा. श्री एस.एम.लोया, मा. ॲड. वसंतराव खारकर, मा. श्री. डी.के. देशपांडे, मा. श्री जयप्रकाशजी बिहाणी



पश्चिम विभागीय खो–खो स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी ध्वजारोहण करतांना मा. आमदार विजयराव भांबळे, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, संस्था अध्यक्ष एस.एम. लोया, नगराध्यक्ष मा. विनोद बोराडे व इतर मान्यवर



महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील उच्च शिक्षण : एक तौलनिक अभ्यास या राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्‌घाटन करतांना मा. कुलगुरु पंडित विद्यासागर, मा. प्राचार्य डॉ. पी.व्ही. जब्दे, प्रा. चंद्रकांत जोशी सनपूरकर व इतर मान्यवर



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

**नूतन महाविद्यालय, सेलू जि.परभणी**

वर्ष ५० वे अंक ५०

प्रेरणा



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

कार्यकारी संपादक

**प्रा. यादव गायकवाड** (समन्वयक)

**डॉ. महेंद्र शिंदे**

**प्रा. अर्चना पत्की**

प्रकाशक

**प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी**

नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

दूरभाष : (०२४५१) २२२००४, २२३०८०

email - principalnutan@rediffmail.com

website : www.nutanmahavidyalaya.com

**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाविद्यालय प्रशासन सहमत असेलच असे नाही.

संपादक मंडळ

मराठी विभाग

**राजश्री बोराडे**

**शिवानी केवारे**

**प्रतिक्षा पवार**

हिंदी विभाग

**संतोष कांगने**

**मो. शाहेदुल्ला अन्सारी**

इंग्रजी विभाग

**मेघना जोशी**

**अंकिता कंटुले**

अक्षर जुळवणी

**अब्दुल अतिख**

**मुखपृष्ठ**

**नयन बाराहाते**

**मुद्रक**

**सतीश कुलकर्णी**

मयूर प्रिंटर्स, कैलासनगर, नांदेड

mayur.ned@gmail.com

मराठवाड्यातील उच्चशिक्षणाचा पाया रचणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर
व आमचे प्रेरणास्थान स्वामी रामानंद तीर्थ
आणि
नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे शिल्पकार कै. दलितमित्र श्रीरामजी भांगडिया
यांचे सह विश्वस्त, नूतन महाविद्यालयाच्या वाटचालीत समर्पित भावनेने
योगदान देणारे प्राचार्य, शिक्षक आणि सहयोगी शिक्षकेतर सन्मित्र यांचे प्रती
कृतज्ञतापूर्वक .....



# शुभेच्छा संदेश

Ch. Vidyasagar Rao
GOVERNOR OF MAHARASHTRA

RAJ BHAVAN
Malabar Hill
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 266
Fax.: 022-2368 050



१५ जून २०१८

## शुभेच्छा

नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू संचलित नूतन महाविद्यालय, सेलू, जिल्हा परभणी आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करणार असल्याचे समजून आनंद वाटला.

आपल्या अर्धशतकी वाटचालीत संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तसेच व्यवसायाभिमुख शिक्षणाची दालने उघडी केली. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली व पार पाडत आहेत, ही निश्चीतच अभिमानाची गोष्ट आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी संस्थेचे हार्दिक अभिनंदन करतो तसेच भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

(चे. विद्यासागर राव)
राज्यपाल, महाराष्ट्र



# शुभेच्छा संदेश


**विनोद तावडे**

**मंत्री**

**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**

महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक : १३.०६.२०१८

## शुभसंदेश

नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू संचालित नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात आपल्या सर्वांचे अभिनंदन!

शिक्षणक्षेत्रामध्ये होणाऱ्या नवनवीन बदलांना आपलेसे करीत आपण विद्यार्थ्यांना ज्ञानादान करीत आहात, हे ऐकून आनंद झाला. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पारंपरिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्या साठी पुरेसे नाही. पुस्तकी ज्ञानासोबत कौशल्यावर आधारित शिक्षणावर आपण भर देणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाच्या 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा ज्ञानरचनावादी झाल्या आहेत. राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या प्रज्ञेचा पुरेपूर उपयोग त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व्हावा म्हणून आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. आपण साजरे करीत असलेले उपक्रम विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास बाळगतो.

नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू या आपल्या संस्थेचे विद्यार्थी-पालक-शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सभासद या आपल्या महापरिवाराच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

आपला,

(विनोद तावडे)



# शुभेच्छा संदेश


प्रा. डॉ. पंडित विद्यासागर
एम.एस्सी. पीएच.डी. (भौतिकशास्त्र)
कुलगुरू

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**
नॅक पुनर्मूल्यांकन 'अ' दर्जा
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड-४३१ ६०६ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२४६२) (का.) २२९२८२, (नि.) २२९३०१, फॅक्स : २२९२४५
E-mails: prof_pbv@yahoo.com, vcoffice.srtmun@gmail.com,
website: www.srtmun.ac.in


जा. क्र. कुलगुरू/संदेश/२०१८–१९/२४ दिनांक १७ मे, २०१८

## संदेश



नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू संचलित नूतन महाविद्यालय आपल्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे, ही अभिमानाची आणि आनंदायी घटना आहे. अनेक महत्त्वाच्या टप्प्यांवर या संस्थेने शैक्षणिक क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाची दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून ती वाढविणे हे निश्चितच अवघड कार्य आहे. मात्र अनेक अडवणींना तोंड देत या महाविद्यालयाने आपल्या शैक्षणिक कार्याचा स्तर उंचावत नेला आहे. त्याचबरोबर या परिसरातील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी कार्यही केले आहे. या महाविद्यालयात ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यामुळेच त्यांना आपले जीवन संपन्न करण्यास मदत झाली. या कालावधीत या महाविद्यालयाने अनेक शैक्षणिक उपक्रम राबविले, त्यामध्ये चर्चासत्र, व्याख्याने, शोध निबंधाचे वाचन, कार्यशाळा यांचा समावेश आहे. त्याचबरोबर मुलभूत सुविधा निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही या महाविद्यालयाने केले आहे.

या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, डॉ. द. रा. कुलकर्णी त्याचप्रमाणे या संस्थेच्या व्यवस्थापनातील अनेक मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा उपयोग महाविद्यालयाच्या विकासासाठी झाला आहे. या महाविद्यालयातील शिक्षकांनी शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले असुन त्यांचीही दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. या महाविद्यालयाची पुढील वाटचाल अशाच प्रकारे सूरू राहिल आणि हे महाविद्यालय या परिसरातील शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपाला येईल अशी खात्री बाळगण्यास हरकत नाही. या महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**प्रा.डॉ. पंडित विद्यासागर**



## शुभेच्छा संदेश

# नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू.

ता. सेलू जि.परभणी.

---



नूतन विद्यालय शिक्षण संस्थेने आपल्या स्थापनेचा अमृत महोत्सव २०१४ मध्ये साजरा केला. आणि आता नूतन महाविद्यालय आपल्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे. अशा या ऐतिहासिक प्रसंगी संस्थाध्यक्ष म्हणून विचार करताना मला असे वाटते की, महाविद्यालयाच्या अर्धशताच्या प्रवासात सन्मान–गौरवाचे व समाधानाचे अनेकप्रसंग अनुभवले आहेत. विद्यार्थी – पालकांनी संस्थेचे विश्वस्थ – पदाधिकारी म्हणून ज्या अपेक्षा बाळगल्या त्या आम्ही पूर्ण करु शकलो. याचे कारण महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व सहयोगी शिक्षकेत्तर कर्मचारी सन्मित्र समर्पित भावनेने कार्यरत आहेत. त्यांच्या योगदानाची, कार्यकर्तृत्त्वाची केवळ नोंद घ्यावी, असे पुरेसे नाही. त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करावे. त्यांना स्वीकृत कार्यासाठी प्रेरीत करावे ही आमची जबाबदारी आहे. म्हणून महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी सर्वांचे अभिनंदन व भविष्यातील शतकाच्या प्रवासासाठी माझ्यासह सर्व विश्वस्थ पदाधिकारी यांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. एस.एम. लोया**



## शुभेच्छा संदेश


**नगर परिषद, सेलू**

जि. परभणी. (महा.) ४३१५०३

फो नं. : ०२४५१-२२२००५, २२३२२०

Email : comcsailu@gmail.com

**विनोद हरिभाऊकाका बोराडे**

नगराध्यक्ष

मो. 9422995555, 7744000005




नूतन विद्यालय शिक्षण संस्था माझ्या दृष्टीने शैक्षणिक मातृतिर्थ आहे. संस्थेचे विश्वस्थ, पदाधिकारी, प्राचार्य आणि शिक्षकांचे शैक्षणिकऋण घेऊनच स्वत:ला घडवू शकलो. म्हणूनच संस्थेशी संबंधीत प्रत्येक घटना-प्रसंगी आत्मियतेने जबाबदारी स्वीकारता, शहराचा प्रथम नागरिक म्हणून महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील प्रत्येक उपक्रमात - कार्यक्रमात सहभागी होताना अनुभवलेला आनंद शब्दात कसा सांगता येईल ?

अर्धशतकाच्या वाटचालीचा एक साक्षीदार म्हणून सांगावे वाटते, सामान्य माणसांच्या असामान्य कर्तृत्त्वाने संस्थेनी अपूर्व यश संपादन केले आहे. हे यश आणि लौकिक -कीर्ती निरंतर असावी. यासाठी माझ्यासह सर्व नगर परिषद सदस्य, पदाधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

विनोद बोराडे
नगराध्यक्ष

# प्राचार्यांचे मनोगत

नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'प्रेरणा' वार्षिकांकाच्या वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा ! उच्चशिक्षणाबाबतची वर्तमान स्थिती आणि भविष्याचा वेध घेत केलेले चिंतन हे या अंकाचे मुख्य सूत्र आहे. हा केवळ विशेषांक न ठरता संदर्भमूल्य असलेला ग्रंथ ठरावा असेच या अंकाचे स्वरुप आहे. चिंतनाचा प्रदेश या विभागातील विचारवंतांचे लेखन मौलिक विचार धन आहे. हा मौलिक ठेवा अतिशय परिश्रमपूर्वक आपणापुढे सादर केल्याबद्दल 'प्रेरणा' अंकाच्या संपादक मंडळाचे अभिनंदन.

महाविद्यालयाची अर्धशतकी वाटचाल हा महत्वाचा टप्पा आहे. हे मार्गक्रमण करीत असतांना महाविद्यालयाच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी लक्षात घेणे अगत्याचे ठरते. हैद्राबाद मुक्ति संग्रामाचे प्रणेते पू. स्वामी रामानंद तीर्थ आणि दलितमित्र श्री श्रीरामजी भांगडियाजी यांची समर्पित प्रेरणा हीच महाविद्यालय स्थापनेसाठी आधारभूत सिद्ध झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून शैक्षणिक केंद्र म्हणून गणल्या गेलेल्या सेलू शहरात उच्चशिक्षणाची सोय नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अन्यत्र धाव घेणे अनेक अर्थाने त्रासदायक होते. शालेय शिक्षणाची दर्जेदार परंपरा निर्माण करणाऱ्या 'नूतन' संस्थेने महाविद्यालयीन शिक्षणाचीही सोय येथेच उपलब्ध करावी यासाठी श्रीरामजी भांगडिया यांनी पुढाकार घेतला आणि नूतन महाविद्यालयाची स्थापना १९६८ साली करण्यात आली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून त्यागी, ध्येयनिष्ठ आणि नि:स्वार्थी कार्यकारी मंडळाच्या पाठिंब्यामुळे प्राचार्यांना स्वतंत्रपणे काम करण्यास प्रोत्साहन मिळाले. संस्थेचे अध्यक्ष श्री सुरजमलजी बिनायके, श्री इंदरचंदजी बिनायके, श्री बद्रीनारायणजी बिहाणी, श्री बन्सीलालजी गिल्डा, विद्यमान अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया, माजी उपाध्यक्ष कै. देविदासराव दिग्रसकर, विद्यमान उपाध्यक्ष ॲड. वसंतराव खारकर, चिटणीस श्रीरामजी भांगडिया, माजी प्राचार्य व चिटणीस द.रा. कुलकर्णी, सोनाजी कुलकर्णी, श्री गोविंदराव देशमुख, श्री शं.दे. मंडलिक, विद्यमान चिटणीस श्री डी.के. देशपांडे, विद्यमान सहचिटणीस डॉ. वि.खं. कोठेकर, श्री जयप्रकाशजी बिहाणी यांच्यासह संस्थेच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांनी वेळोवेळी घेतलेले परिश्रम महाविद्यालयाच्या वाटचालीमध्ये खूप मोलाचे ठरले आहेत.

लोकशाही मूल्यांवरील निष्ठा आणि धर्मनिरपेक्षतेचा आदर ही तत्वे कायम दृष्टीसमोर ठेऊन महाविद्यालयाने आपली वाटचाल सुरु ठेवल्याने समाजातील सर्व घटकांचा विश्वास संपादन करणे सुकर झाले. त्यामुळेच महाविद्यालयाचा प्रत्येक उपक्रम हा केवळ 'नूतन' परिवाराचा न राहता तो समस्त सेलूकरांचा 'उत्सव' ठरला. सेलू शहराला मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी हा अलिखित दर्जा प्राप्त होण्यासाठी सेलूतील लोकचळवळीमध्ये महाविद्यालयाचे योगदान लक्षणीय आहे. युवक महोत्सव, अविष्कार महोत्सव आंतरविद्यापीठीय खो – खो स्पर्धा, विविध विषयांवरच्या राज्य पातळीवरील परिषदा या सर्व उपक्रमांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसोबतच शहरातील नागरिक, महिला यांचा

लक्षणीय सहभाग ही याचीच साक्ष आहे.

महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांनी महाविद्यालयाची सूत्रे हाती घेतांना दर्जेदार शिक्षण, शैक्षणिक मूल्यांचा उत्कर्ष आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम ही त्रिसूत्री निश्चित केली होती. महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवीवर्षापर्यंत या त्रिसूत्रीचा यशस्वीपणे अवलंब करीत महाविद्यालयाला उत्कृष्टतेचे मानांकन प्राप्त करुन देण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले. डॉ. आर.एम. खरवडकर, डॉ. बी.टी. भोसकर आणि डॉ. व्ही.के. कोठेकर या प्राचार्यांच्या काळात महाविद्यालयाचा पुढील प्रवास त्यांनी आखलेल्या पाऊलवाटेनेच पुढे सरकत राहिला. या पुढील काळात ही वाट अधिक प्रशस्त करण्याचा प्रयत्न जरुर असेल परंतु मूळ पाऊलवाट मात्र कायम तीच असेल.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या वतीने महाविद्यालयाच्या 'प्रेरणा' वार्षिकांकास आतापर्यंत १५ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. हे अंक नियमित व दर्जेदार काढण्याचा पाया प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांनी रचला व तो आजपर्यंत कायम आहे. ज्येष्ठ कवी पं. या. तरफदार तसेच साहित्यिक व चित्रकार प्रा. प्रकाश कामतीकर यांच्या कुशल कार्यकर्तृत्त्वाने या अंकाला आशयघन देखणेपणाची परंपरा निर्माण झाली.

गुणवत्ता आणि मूल्यशिक्षणाची परंपरा अबाधित राखणाऱ्या नूतन महाविद्यालयाचे प्राचार्यपद मला मिळाले हे भाग्यच. माझ्या व्यावसायिक जीवनाची सुरूवात प्राथमिक शिक्षकापासून झाली आणि ज्या महाविद्यालयात मी शिकलो, घडलो तेथेच महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची संधी मिळाली ही खूप आनंददायी गोष्ट आहे. एक तप मला महाविद्यालयाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. विशेषत: महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामधील प्राचार्यपद हा माझ्या जीवनातील अत्युच्च समाधानाचा क्षण आहे.

उच्च शिक्षण हे सतत परिवर्तनशील असले पाहिजे यावर सर्वच घटकांचे एकमत आहे. परंतु या बदलासाठी अपेक्षित गती मात्र खूप संथ आहे. विद्यापीठ अनुदान आयोगामुळे ११व्या योजनेपर्यंत महाविद्यालयाचा भौतिक विकास भरपूर झाला परंतु १२व्या योजनेत मात्र निधीसाठी हात आखडता घेतला गेला आहे. महाराष्ट्र शासनाचे शिष्यवृत्ती धोरण, वेतनेतर अनुदान याबाबतची भूमिका महाविद्यालयांना त्रासदायक ठरत आहे. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावरील बंदी ही शैक्षणिक दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. शैक्षणिक पार्श्वभूमी नसणाऱ्या, वंचित घटकाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना समजून घेणे गरजेचे आहे. वार्षिक पॅटर्नऐवजी सेमिस्टर पॅटर्नच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आग्रहामुळे प्रत्यक्ष शिकविण्यासाठी कमी तासिका मिळत आहेत. या सर्व अडचणींचा सामना करीत महाविद्यालयाची दमदार वाटचाल अविरत चालू आहे. महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविला आहे. यासाठी पूर्वीपासून कार्यरत असणारे व विद्यमान शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पालक तसेच हितचिंतकांचा मोलाचा वाटा आहे. पुढील काळातही या सर्व घटकांचे सहकार्य अव्याहतपणे लाभेल हा सुवर्णविश्वास आहे....

**डॉ. शरद कुलकर्णी**
प्राचार्य

# संपादकीय

'भव्य हिमालय तुमचा आमुचा परि प्रिय माझा सह्यकडा' असे कवी वसंत बापटानी म्हटले. त्याची आज आठवण व्हावी असा एक प्रसंग आम्ही अनुभवतो आहोत. जागतिकस्तरावर आमच्या नालंदा, तक्षशीला विद्यापीठाचे अस्तित्त्व लोपले. ऑक्सफर्ड – केंब्रिजचा बोलबाला झाला. जागतिकस्तरावरील सर्वोत्कृष्ट विद्यापीठाच्या सूचीत आमच्या देशातील विद्यापीठाचे नाव नाही. पण मॅक्झीम गॉर्की किंवा नारायण सुर्वेनी सुप्रतिष्ठीत केलेल्या 'माझे विद्यापीठ' प्रमाणे काही गाव परिसरात सुप्रतिष्ठीत झालेल्या काही महाविद्यालयांनी स्वत:ची एक नाममुद्रा निर्माण केली आहे. पूर्वेकडील ऑक्सफर्ड अशी ओळख देणारे पुण्याचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठवाड्यातील पुणे समजले जाणारे परभणी जिल्ह्यातील सेलू. आणि सेलूतील शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे परिसरातील जनमानसात स्वत:ची ओळख निर्माण करणारे नूतन महाविद्यालय, तसेच या महाविद्यालयातील अर्धशतकाची संस्मरणीय वाटचाल सर्वांच्याच कौतुकाचा विषय आहे. हे कौतुक प्रासंगिक कार्यक्रमातील लोकसहभाग व भावाभिव्यक्तीतून अनुभवता आले आहे.

या परिसरात नूतन विद्यालय शिक्षण संस्था व महाविद्यालयाची जी ओळख आहे. विशेषत: या संस्थेशी संबंधित विश्वस्त, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांचे बद्दल समाजात आदराची भावना आहे, हे सर्व खरे असले तरी, संस्थेचा सुमारे आठ दशकांचा व महाविद्यालयाचा पाच दशकांचा प्रवास सुखा – समाधानाचा नक्कीच नसणार. पण दुरुन डोंगर साजरे दिसतात. वाटतात. तसे भूतकाळातील रम्य ते क्षण आम्ही स्मृतिरंजनासाठी निवडतो. ते क्षणही इंद्रधनुष्या प्रमाणे एक आभासी वास्तवही असू शकते. पण इंद्रधनुष्य दिसते विलक्षण अनुपम यात काहीच शंका नाही. या इंद्रधनुष्यातील एका प्रकाश रेषे सारखाच प्रवास आहे, आमच्या महाविद्यालयाच्या 'प्रेरणा' वार्षिकांकाचा. या वार्षिकांकाचा यावर्षीचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. आमच्या आनंदात संस्थेचे विश्वस्त, कर्मचारी आणि विद्यार्थी तसेच वाचकही

सहभागी होतील, त्या सर्वांसाठी या अंकाचे स्वरुप आणि विशेषा बद्दल काही नोंदवावे वाटते.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ हे महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचा संस्था स्तरावरुन निर्णय घेण्यात आला. तेव्हा सुवर्ण महोत्सव संयोजन समिती समन्वयकपदाची जबाबदारी माझ्यावर आली. त्याचे एक कारण महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदाची असलेली जबाबदारी हे आहे. त्याशिवाय सेवाज्येष्ठता हा देखील निकष असू शकतो. त्याच अनुषंगाने प्रेरणाच्या संपादक मंडळाचा प्रमुख ही देखील जबाबदारी आली. या पार्श्वभूमीवर प्रेरणा वार्षिकांकाची सिद्धता करणे तसे एक आव्हानच आहे याची मलाही जाणीव होती.

'प्रेरणा' वार्षिकांकाची सिद्धता मला आव्हानात्मक वाटते तसे काही वास्तव नसेल असाही कुणाचा समज होऊ शकतो. पण महाविद्यालयाचा वार्षिकांक हा आमच्या महाविद्यालयातील केवळ एक उपक्रम कधीच नव्हता. या विषयावर संपादक मंडळाने नेहमीच गांभिर्याने विचार केला पाहिजे. अशीच येथील धारणा व परंपरा राहिली. त्याचे एक कारण मराठी विभागातील विभाग प्रमुख कै. पं. या तरफदार व प्रा.प्रकाश कामतीवर जे चित्रकार कवी, लेखक होते. अंकातील लेखन साहित्य व अंकाची मांडणी वगैरे विषय ते अतिशय विचारपूर्वक हाताळत. म्हणून आमचा वार्षिकांक आशय, विषय-मांडणी वगैरे अंगाने सर्वोत्कृष्टतेचाच आविष्कार सिद्ध होत असे. त्यांच्या नंतर देखील विभाग प्रमुख पदाची जबाबदारी मी स्वीकारली. तेव्हा देखील या संदर्भातील विचारधारणेस वेगळे वळण देण्याचा प्रयास केला. लेखनासाठी कार्यशाळा व संवाद, परिसंवाद चर्चेला शब्दरुप देणे आणि विशेषांकाची सिद्धता करणे असे घडत होते. माझ्या सह कवी व ललित लेखक प्रा. विश्वास वसेकर यांनी अंकासाठी घेतलेले परिश्रम संस्मरणीय नक्कीच राहिलेत. मराठी विभाग हा आशय व आकाराच्या दृष्टीने व्यापक व महत्त्वाचा राहिला हे खरे आहे. पण अंकातील हिंदी व इंग्रजी विभागाची देखील काही वेगळी वैशिष्टये आहेत. त्यात भर घालणारे सहयोगी शिक्षक, संपादक आणि विद्यार्थी यांचे योगदान अपूर्व असे राहिले. काही वेळा तर विशेषांकासाठी त्या-त्या विषयाच्या तज्ञ शिक्षकांनी संपादनाचे कार्य उत्तम प्रकारे केले. त्यामुळे प्रेरणास अनेक सन्मान, पुरस्कार मिळाले. ही नोंद महत्वाची आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रेरणाचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक सिद्ध करायचा म्हणजे, वेगळे ते काय करायचे? या प्रश्नाचा विचार करीत असताना जमिनीतून एखादा कोंब अंकूरत वर यावा आणि त्यावर सूर्यप्रकाशाची पिवळीधम्म किरणं पडावीत. तेव्हा खाली कसदार पण रखरखीत काळी माती- नवसृजनाचं हिरवं बाळसेदाररुप आणि सोनेरी प्रकाश किरणाची आभा या सर्व पार्श्वभूमीवर कल्पनेचं बिंब प्रतिबिंब प्रकटावे. तसाच विशेषांकाचा विषय पुढे आला.

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे उद्घाटन व समारोप असे दोन्ही कार्यक्रम संस्मरणीय कसे ठरतील? या प्रश्नाचा विचार करताना या पूर्वीच्या शिक्षण संस्थानी असे कार्यक्रम आयोजित केले. त्या बाबत आपण प्रथम अभ्यास करावा. त्यांच्या कार्यक्रमाची नक्कल नाही. परंतु त्यातील वैशिष्ट्यपूर्ण नाविण्याचा मूलाधार असलाच पाहिजे. असा विचार करुन कार्यक्रमाला भव्यदिव्यते बरोबरच कायम संस्मरणीय ठरावा म्हणून आपण आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील लौकिकप्राप्त महनीय व्यक्तीला निमंत्रित करावे. पण ही व्यक्ती केवळ नामवंत असावी किंवा राजकीय सत्तेतील प्रभावी व्यक्ती असावी असे

नाही. ती व्यक्ती शिक्षण क्षेत्रातील विद्वान शिक्षणतज्ज्ञ असावी. या मुद्द्यावर आम्ही ठाम राहिलो. अशा व्यक्तीपैकी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु, नियोजन आयोगाचे व राज्यसभेचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना निमंत्रित करावेच. हा एक निर्णय घेण्यात आला. त्यांना निमंत्रित करण्याचे माध्यम म्हणून मी व डॉ. कोठेकर स्वा.रा.ती.म. वि. नांदेडचे पहिले कुलगुरु व माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांचेशी संपर्क केला. त्या दोघांसह विद्यमान स्वा.रा.ती.म. वि. कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर असा एक शैक्षणिक विचारचिंतनाचा सुवर्ण त्रिकोण जूळून आला. त्यांच्या संपर्क संवादातूनच उच्चशिक्षण हा आमच्या वर्षभराच्या सृजन-चिंतनाचा, कृतीशीलतेचा मूलाधार सुनिश्चित झाला. त्यांचेच अक्षर लेख असलेला हा प्रेरणाचा उच्च शिक्षण विशेषांक आहे.

आमच्या 'प्रेरणा' वार्षिकांकाचा मुख्य विषय उच्चशिक्षण असा आम्ही नक्की केला खरा - पण या विषयावर पुरेशा गांभिर्याने विचार व चिंतन करणारे तसे संख्येने कमीच आहेत. म्हणून आम्ही अंकास द्विस्तरीयरुप देण्याचा विचार केला. त्याचा पहिला स्तर हा प्रतितयश लेखक विचारवंताचे लेख असेल. दुसऱ्या स्तरावर महाविद्यालयीन विद्यार्थी लेखकांचे लेखन असावे.

पहिल्या स्तरावरील लेखनासाठी आम्ही अनेक मान्यवरांना लेखनाचे निंमंत्रण दिले. ती यादी तशी मोठीच आहे. परंतु ज्यानी आम्हास प्रतिसाद दिला तो अपूर्व उत्साह वाढवणारा आहे.

त्यांपैकी एक आठवण सांगण्या सारखी आहे. पुण्यातील अनेक मान्यवर लेखकांशी मी लेखनासाठी संपर्क करीत होतो. केवळ आश्वासन मिळत होती. विद्यापीठात आमचे मित्र प्रा. मनोहर जाधव यांना लेखनाचे निमंत्रणपत्र दिले. तेव्हा तिथे श्री संदेश भंडारी होते. त्यांचे तमाशा एक रांगडी गंमत पुस्तक वाचलेले. छायाचित्र व त्याला दिलेले अभ्यासपूर्ण निवेदनपर लेखनाने ते देखणं पुस्तक वाचनीय व संस्मरणीय राहिले. त्यांच्याशी बोलताना डॉ. गणेश देवींचा उल्लेख आला. त्यांनी पुण्यात एक भाषा विषयक कार्यक्रम आयोजनाची तयारी सुरु केली. म्हणून कुतूहलाने मी त्यांच्या भाषा संशोधन व सर्व्हेचा विषय काढला. चर्चेत त्यांना मला लेख मिळाला तर उत्तम म्हटले. आणि कल्पवृक्षाखाली कल्पनाच सजीव साकार व्हावी तसे घडले. केवळ एका फोनवर क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी मला ई मेल द्वारा. लेख पाठवून दिला.

डॉ. गणेश देवी यांच्या लेखाची प्रत मी आमचे इंग्रजी भाषा विभागाचे संपादक डॉ. महेंद्र शिंदे यांच्या हातात दिली. त्यावर आम्ही विचार चर्चा करत आहोत. तर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांचा फोन आला. यादवराव तुमचा ई मेल कळवा. त्यांना ई मेलचा एस.एम.एस. केला आणि दोन दिवसात त्यांचा शिक्षण आणि साहित्य व्यवहार हा लेख ई मेल वर हस्तलिखित स्वरुपात आला. उत्साह आणि चिंता वाटावी असा एक काळ आला असे काही क्षण वाटले. त्याचे कारण केवळ दोन लेखामुळे अपेक्षित असा अंक सिद्ध होणार नव्हता. असेही मला वाटत होते.

डॉ. नागोराव कुंभार सर विचारशलाका अंक प्रकाशित करतात. ते स्वत: एक चिंतक, लेखक आहेत. अंकासाठी ते वेगवेगळ्या लेखकांना लेखनाचे निमंत्रण देतात. म्हणून मी त्यांचेशी संपर्क केला. तेव्हा त्यांनी स्वत: व डॉ. जनार्दन वाघमारे यांचे लेख मिळतील अशी व्यवस्था करण्याचे अभिवचन दिले. असाच प्रतिसाद प्रा. डॉ. दिलिप चव्हाण यांनी दिला. कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर व प्राचार्य

डॉ.शरद अदवंत, डॉ. संजीव देशमुख व प्रा. डॉ. डी.एन. मोरे इ. लेखकांनी प्रतिसाद दिल्यामुळे अंकाचा पहिला भाग तरी विशेष लक्षणीय राहिला आहे.

या अंकाच्या पहिल्या भागातील लेखांचे केवळ शीर्षक जरी आपण नजरे खालून घातली तरी त्यांच्या विचार चिंतनाचे, शैक्षणिक दृष्टी आणि दृष्टीकोणाचे स्वरुप स्पष्ट होईल असे वाटते.

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'शिक्षणाची वैश्वीक उद्दिष्टे' या लेखात शिक्षण कशासाठी व कुणासाठी हा प्रश्न आपल्या विचार प्रतिपादनाचे बीजसूत्र ठेवले. व्यक्ती, समाज किंवा राष्ट्र आणि संपूर्ण जगासाठी शिक्षणाचा परिसस्पर्श हवाचा आहे. म्हणून शिक्षणाची जी वैश्वीक उद्दिष्टे असतात ते आपण सर्वांनीच समजून घेतली पाहिजेत. युनेस्कोने शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित करण्यासाठी फ्रान्स जॅक्स डेलार्सच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या आयोगाने दिलेल्या अहवालात दिलेल्या चार उद्दिष्टांचीच चर्चा त्यांनी केली आहे.

'शिक्षण आणि साहित्य व्यवहार' हा डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा लेख. या लेखात त्यांनी महात्मा फुले यांच्या 'विद्येविना मती गेली' या विचार सूत्रात दर्शविलेल्या अन्वेषण पद्धतीचा आधार घेत शिक्षण आणि साहित्य व्यवहाराचा अतिशय साक्षेपाने परामर्श घेतला आहे.

कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांनी आपल्या लेखात शैक्षणिक स्वायत्ततेचा विचार प्रभावीपणे मांडला आहे. शैक्षणिक संस्थाच्या स्वायत्तेची अनिवार्यता पटण्यासारखी असली तरी, त्याचे व्यक्ती समाज जीवनावर होणारे परिणाम दुर्लक्ष करावेत असे नक्कीच नाहीत. संपूर्ण सरकारीकरण ही बाब तशी असून अडचण नसून खोळंबा या सदरातील म्हणावे लागेल. तर खासगीकरण तथा बंधमुक्त उदारीकरणाने काही वेगळे चांगले चित्र दिसावे. परंतु शैक्षणिक व्यापाराने दमन शोषण व अराजकाला निमंत्रण मिळण्याची शक्यता वाटावी असे चित्र आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी आपल्या लेखात शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करुन व्यक्ती समाजावर राष्ट्राच्या दृष्टीने शैक्षणिक कृतीकार्यक्रम काय असावा. या संदर्भाने आपले अनुभव सिद्ध विचार चिंतन मांडले आहे. भारतीय व पाश्चिमात्य विचार चिंतन परंपरेतील शिक्षणाच्या संकल्पनेचा आशय उलगडून सांगत त्यांनी आधुनिक व्यक्ती समाजासाठी शिक्षण ही मूलभूत गरज आहे ही बाब नोंदविली. आमच्या महाविद्यालयातील अध्ययन अध्यापन, अभ्यासपुरक, अभ्यासेत्तर उपक्रम तसेच विस्तार कार्याबाबत त्यांनी केलेली चर्चा अर्थपूर्ण आहे.

'आजचे तंत्र शिक्षण : व्यवसाय उद्योगाची आव्हाने' हा श्री रविंद्र वैद्य यांचा लेख म्हणजे भारतातील बेरोजगारी संदर्भाने विद्यापीठीय पारंपरिक पुस्तकी अभ्यासक्रमाची देणगी आहे. यातील तथ्य कुणी नाकारणार नाही. पण व्यवसाय उद्योगासाठी आवश्यक कुशल मनष्यबळ तयार करणाऱ्या तंत्रशिक्षणाचे आजचे चित्र कसे आहे. उद्योग व्यवसायला आवश्यक अशा तंत्राशिक्षण घेणाऱ्या पदवीधरांना रोजगार नाही. तसेच उद्योगव्यवसायाला आवश्यक असे ज्ञान कौशल्य या पदवीधारकाकडे नाही. ही परिस्थिती सर्वच शिक्षण तज्ज्ञांना कोड्यात टाकणारी आहे. या परिस्थितीवरील समर्पक भाष्य या दृष्टीने श्री रविंद्र वैद्य यांना लेख विचारात घेता येईल.

डॉ. डी.एन. मोरे यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक २०१६ संदर्भाने आपली काही निरिक्षणे नोंदविली आहे. या नव्या विधेयकाची अनिवार्यता ही बदलत्या परिस्थितीत अशी एक नवी

संरचनात्मक व्यवस्था निर्माण करणे आहे. ज्यामध्ये शैक्षणिक गुणवत्तेचा प्राधान्याने विचार असेल. त्यासाठी विद्यापीठीय स्तरावरील विविध प्राधिकरणांची संरचना, प्रतिनिधीत्व, अधिकार वगैरे जसे काही कार्पोरेट रुप असावे असा हा प्रयास आहे. त्याच बरोबर गुणवत्तेशी तडजोड न करता काही करण्याचा हा प्रयत्न थोडा अधिक उणाच आहे हा त्यांचा निष्कर्ष महत्त्वाचा आहे.

प्राचार्य डॉ. शरद अदवंत यांचा 'उच्चशिक्षणातील गुणवत्ता' या लेखात एकूणच राष्ट्राच्या लोकशाही शासन व जीवपद्धती संदर्भाने आमच्या शिक्षणक्षेत्राकडून असलेल्या अपेक्षाची पूर्तता होताना दिसत नाही. परिणाम शून्य अशा गुणवत्तेचा कुणी विचार चिंतनाचा आधार मानू शकणार नाही. शिक्षणाचे बाजारीकरण व या क्षेत्रातील भ्रष्टाचार हेच अनर्थाचे मूळ आहे. तो एक गुणवत्तेच्या संदर्भातील अडथळा असल्याचे त्यांचे निरिक्षण अर्थपूर्ण आहे.

'स्त्रिया आणि अभ्यासक्रम' हा डॉ. दिलीप चव्हाण यांचा एक वेगळा लेख आहे. आपल्या समाजातील सामाजिक विषमता आणि वर्ण जाती भेदाचा प्रभाव आमच्या प्रत्येक कृती – उक्तीतून प्रकटत असतो. तसाच तो स्त्री–पुरुष लिंगभेद संवेदनांतून व्यक्त होतो. आमचे शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करताना देखील या विषम –विषुवृत्ताच्या रेषा स्पष्टपणे दिसतात. शिक्षणाविषयीची चर्चा तशी मूलतः पुरुषकेंद्रीच असते. स्त्रीयांच्या शिक्षणाचा विषय प्रामुख्याने शिक्षणातील स्त्रीयांचा सहभाग. प्रमाण कमी – जास्त किंवा कौटुंबिक सुधारणा – सामाजिक सुधारणांच्या अंगाने विचारात घ्यावयाचे मुद्दे या स्वरुपातच असतो. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेख अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे आहे.

विशेष अशा वैचारिक चिंतनपर अशा मान्यवर लेखकांच्या बरोबरीनं नाही पण त्यांचे बोट धरून आमच्या महाविद्यालयातील तरुण विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखनाचा प्रपंच देखील इथे मांडला आहे. संपादक मंडळानी इथे मात्र बोटाला धरुन त्यांचे कडून बाराखडी गिरवून घ्यावी तसे लेखन करवून घेतले आहे. त्यांच्या लेखनातील विचारांवर भाषेवर संपादकीय परिष्करणाचा संस्कार दिसत असला तरी त्यांना चिंतनाच्या क्षेत्रात थोडेफार वैचारिक कवायती शिकवल्या. त्यातून त्यांच्यातील सुप्त अशी विचार करण्याची क्षमता वाचकांच्या प्रत्ययास येईल असा एक विश्वास वाटतो.

या अंकाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे आजी माजी विद्यार्थी, शिक्षकांच्या काही प्रतिक्रिया आहेत. त्यात महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य श्री द.रा. कुलकर्णी यांनी मागे वळून पाहतांना आणखी थोडी पूर्वानुभवाची शिदोरी या शीर्षकाचा लेख विशेष आहे. तो विशेष असा की, अध्ययन – अध्यापन – प्रशासन या दृष्टीने त्यांचा अनुभव प्रदीर्घ आहे. शिवाय स्वातंत्र्योत्तर काळी एक विशिष्ठ ध्येयाने प्रेरीत, मूल्यनिष्ठ जीवन जाणिवासह उच्च शिक्षण क्षेत्रात सक्रिय झालेल्या पहिल्या पिढीचे ते प्रतिनिधी. यामुळे त्यांच्या अनुभवाला, अनुभवसिद्ध अशा विचार – भूमिकेला अभिव्यक्त करणारी त्यांची शब्दकला आगळी – वेगळीच. त्यांची भावभाषा व विचार चिंतन ही त्यांनी भावी पिढीला दिलेली शिदोरीच आहे. त्यात स्मृतिरंजन फारसे नाही आहे ती वास्तवाचे भान देणारी तळमळ.

प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांच्या लेखा प्रमाणेच निखळ भावसंवाद साधणारा प्रा. विश्वास वसेकर यांचा सुखद आठवणी एक शैलीदार ललितलेख आहे. लेखातील आठवणी व आठवणीला दिलेला शब्दसाज महाविद्यालायाशी परिचित मंडळासाठी

एक वेगळी गमंत दाखवतो. पण जे महाविद्यालयाशी अपरिचित आहेत त्यांनाही या आठवणी वाचनाचे सुख सौख्य व समाधान देणाऱ्या वाटतील.

श्री सतीश कुलकर्णी व प्रा. विठ्ठल डख आमच्या महाविद्यालयातील जुने विद्यार्थी . प्रा. डख तत्कालीन विद्यापीठाच्या वतीने घेतलेल्या पी.यू.सी. परीक्षेत विद्यापीठात प्रथम आलेले गुणवंत. त्यांनी आपल्या संस्थेशी असलेल्या ऋणानुबंधाचा शोध घेतला. तर रुढ भाषेत ज्यांचे नाव गुणवंताच्या यादीत नसते. पण तो एखाद्या क्षेत्रातील कार्यकर्तृत्त्वाचा मानदंड व प्रभावी व्यक्तिमत्व म्हणून ओळखला जातो. अशा मंडळीचे ते प्रतिनिधीत्व करतात. आणि सहजपणे सांगून जातात की, विद्यार्थी जीवनात सर्व साधारण सामान्य म्हणून वावरणारे व पदवी संपादन करुन सरळमार्गी जीवन जगणारे देखील गुणवंतच असतात. स्वयंप्रज्ञ व स्वयंसिद्ध अशाचे कर्तृत्वाचे विलंबाने लोकांसमोर येते. ते चमकत नाहीत पण त्यांचे जगणे उजळ असते.

या विभागात प्रतिभा बोरकर, मारोती कसाब, संतोष धुमाळ, गोविंद मंत्री,... अशा अनेक गुणीजनांच्या महाविद्यालयाप्रतीच्या सद्‌भावनांचा समावेश आहे. ही आठवणीची क्षणचित्रे जमवतानाच महाविद्यालयात दि. ०१ जुलै, २०१८ रोजी माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात 'माझ्या जडणघणीत महाविद्यालयाचे योगदान आणि महाविद्यालया कडून माझ्या अपेक्षा' असा एक परिसंवाद संपन्न झाला. त्यात भावोत्कट प्रतिक्रिया देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शब्द भावाचे एक संकलन ताजाकलम सदरात केले आहे.

'देखणे ते सुवर्णाचे लेणे' या सदरात महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचा वृत्तांत अहवाल सादर केला आहे. तसेच महाविद्यालयाच्या अर्धशतकाच्या वाटचालीतील ठळक व लक्षणीय असे उपक्रम कार्यक्रमाचा अहवाल आहे. या शिवाय शैक्षणिक वर्ष २०१७ –१८ चा विविध विभागाचा अहवाल आहे.

प्रेरणाचा हा सुवर्ण महोत्सवी उच्चशिक्षण विशेषांक सिद्ध करताना मान्यवरांनी केलेले लेखन प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी प्रतिनिधी व संपादक मंडळानी केलेले सहकार्य ही जमेची बाजू आहे. त्यांचे शब्दातीत ऋण माझी अर्जित संपती झाली. पण सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या व्यस्ततेत अंकात काही दोष असतील तर ती माझी जबाबदारी आहे ती नाकारता येत नाही. सहकार्याबद्दल आभार व उणिवा दोषाबद्दल दिलगीरी व्यक्त करतो.

**प्रा. यादव गायकवाड**
संपादक



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७–१८

## चिंतनाचा प्रदेश

आपण एक संस्कृती घडवीत आहोत. एखादा कारखाना नव्हे. संस्कृतीचे मूल्य व श्रेष्ठत्त्व हे भौतिक समृद्धी व शासकीय यंत्रणेवर अवलंबून नसते. माणसांच्या चारित्र्यावर अवलंबून असते. म्हणून शिक्षणाचे प्रमुख कार्य चारित्र्य निर्मिती आहे.

– डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन



अनुक्रम


- शिक्षणाची वैश्विक उद्दिष्टे – डॉ. जनार्दन वाघमारे
- शिक्षण आणि साहित्य व्यवहार – डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
- स्वायत्तता आली दारी : स्वायत्ततेचा अन्वयार्थ – डॉ. पंडित विद्यासागर
- शिक्षणाची संकल्पना व कृती कार्यक्रम – प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
- आजचे तंत्रशिक्षण : व्यवसाय व उद्योगांची आव्हाने – रविंद्र वैद्य
- स्त्रिया आणि अभ्यासक्रम – डॉ. दिलीप चव्हाण
- नवा विद्यापीठ कायदा : काही अधिक काही उणे – डॉ. डी. एन. मोरे
- उच्च शिक्षण आणि गुणवत्ता – प्राचार्य डॉ. शरद अदवंत
- Affirmative Action in Three Dream Institutions - Ganesh Devy
- Some Issues in Technical Education System- Dr S G Deshmukh
- “Changing Scenario of Higher Education” - Prof. Khushbu Purswani Jetho

# शिक्षणाची वैश्विक उद्दिष्टे

**डॉ. जनार्दन वाघमारे**

*लेखक स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे पहिले कुलगुरु व माजी खासदार असून, शिक्षणतज्ज्ञ विचारवंत आहेत. सार्वजनिक जीवनात तत्त्वनिष्ठ व नैतिक राजकारणात सक्रिय आहेत. निग्रो वाङ्मय, संस्कृतीचे अभ्यासक आणि मराठी साहित्यातील परिवर्तनावादी विचार चळवळीचे प्रेरक-मार्गदर्शक आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी वैश्विक स्तरावरील उद्दिष्टांची चर्चा केली आहे.*

शिक्षण कशासाठी व कुणासाठी? शिक्षण सर्वांसाठी व सर्वांच्या उन्नतीसाठी हे या प्रश्नाचे सरळ उत्तर. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हा सर्व रोगावरचा रामबाण उपाय आहे. पण एवढेच म्हणून चालत नाही. शिक्षणाची उद्दिष्टे ठरवून शिक्षण दिले पाहिजे. आणि ती उद्दिष्टे समोर ठेवूनच त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. शिकवणारा शिक्षक कसा आहे यावरच शिकणारा विद्यार्थी कसा होईल हे ठरविता येते. आणि म्हणून शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी आहे.

शिक्षणाची अनेक उद्दिष्टे असू शकतात. कालांतराने ती बदलतात देखील. विद्यार्थी हे कुठल्याही देशातले वा संस्कृतीतले असोत. त्यांना दिले जाणाऱ्या शिक्षणाची वैश्विक उद्दिष्टे असतात का? जग आता फार जवळ आले आहे. त्याला वैश्विक खेडयाचे स्वरूप प्राप्त झाले आहे आणि म्हणून अशा वैश्विक खेडयातील शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची उदिष्टे देखील वैश्विकच असली पाहिजेत. काही 'मूलभूत' उद्दिष्टे साध्य करण्यासाठीच ते दिले पाहिजे. लेखन, वाचन व गणना या तीन गोष्टी साध्य झाल्यानंतरच शिक्षणाला खरी सुरुवात होते. त्याची मूलभूत उद्दिष्टे 'युनेस्को' या जागतिक संघटनेने विसाव्या शतकाच्या शेवटी सर्व जगासाठी ठरवलेली आहेत. ती ठरवली आहेत एकविसाव्या शतकातील नव्हे, तिसऱ्या सहस्त्रकातील शिक्षणासाठी.

एकविसाव्या शतकातल्या शिक्षणाची उद्दिष्टे ठरविण्यासाठी युनोस्कोने एका आंतरराष्ट्रीय आयोगाचे गठण केले होते. त्या आयोगावर निरनिराळया देशातील तज्ञ व्यक्तींना सदस्य म्हणून घेतले गेले होते. त्या आयोगाचे अध्यक्ष होते फ्रान्स जॅकस डेलॉर्स, १९९६ मध्ये आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. या अहवालात शिक्षणाची चार मूलभूत उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. ती शिक्षणाच्या सर्व स्तरावरील, सर्व संस्कृतीच्या व धर्मांच्या लोकांना अर्थात सगळ्या मानवजातीलाच लागू होतात. शिक्षणाचे आणि पर्यायाने जीवनाचे 'सारतत्व' त्यात आहे. त्यात ज्ञान-विज्ञान-तत्वज्ञान आहे. त्या उद्दिष्टांचा 'शिकण्यावर' भर आहे. शिकण्यासाठीच शिकवावे

लागते हे उघड आहे. शिकणाऱ्या साठी शिकविणारा लागतो. म्हणून शिक्षणाचा केंद्रबिंदू हा 'शिकणारा' मानला गेला आहे. युनोस्कोने जगासमोर ठेवलेली शिक्षणाची उद्दिष्टे अशी आहेत.

१) 'लर्निंग टू-बी' - अर्थात आपल्या जीवनाच्या असण्याचा अर्थात अस्तित्वाचा उद्देश काय ?थोडक्यात मी कोण आहे ? या प्रश्नाचे उत्तर शोधायला शिकणे हे शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट आहे. मनुष्य कोणत्याही धर्माचा, जातीचा, वंशाचा, रंगाचा व संस्कृतीचा असो, तो कोणत्याही लिंग व भाषेचा असो, त्याला 'मनुष्य' म्हणूनच जगायचे आहे. 'माणूस' हीच त्याची पहिली व शेवटची ओळख. त्याला आपल्यातील सूप्त शक्तीचा विकास करता आला पाहिजे. त्याला आपल्या आयुष्यात काही तरी व कोणीतरी व्हायचे आहे. या उद्दिष्टांमध्ये त्याच्या भौतिक, नैतिक व आध्यात्मिक जीवनाचा समावेश होतो. माणसाचा जन्म काहीतरी व कोणी तरी बनवण्यासाठी व होण्यासाठीच (टू-बी) झालेला असतो. त्याला काय व्हायचे आहे हे 'शिकणे' हेच शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट असले पाहिजे. हा विचार लहान मुलांच्या मनावर बिंबवला पाहिजे. त्यांच्या मनात प्रेरणा पेरण्याचे काम शिक्षणाच्या माध्यमातून केले पाहिजे. आपल्या आयुष्यात काही तरी करून दाखविण्याचा ध्यास लहानपणापासूनच मुलांच्या मनास लागला पाहिजे. मुलांना दिशा देण्याचे व त्यादिशेत चालण्याचे बळ देण्याचे काम शिक्षण करू शकते. आपल्या या जगात असण्याचा अर्थात अस्तित्त्वाचा उद्देश मुलामुलींना आपल्या आयुष्यात हळूहळू कळला पाहिजे.

२) 'लर्निंग टू-डू' अर्थात काही तरी करण्यासाठी शिकणे. हे शिक्षणाचे दुसरे उद्दिष्ट आहे. शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट 'काहीतरी होण्यासाठी' आहे तर दुसरे उद्दिष्ट 'काही तरी करण्यासाठी' आहे. अर्थात माणसाला जगण्यासाठी कुठले तरी कौशल्य शिकण्याची आवश्यकता आहे. त्याला कुठला तरी व्यवसाय केला पाहिजे. नव्हे, तो करता आला पाहिजे. आपल्याशी व आपल्या कुटूंबाच्या उपजीविकेसाठी कुठले तरी काम करण्यामध्ये माणूस निष्णात झाला पाहिजे. कुठले तरी कसब तथा कौशल्य त्याला हस्तगत करावे लागेल. शिक्षणातून नुसते पांडित्य मिळविण्यात व मिरवण्यात काही हशील नाही. माणसाचे जीवन अनुत्पादक असून चालणार नाही. माणूस हा सर्जनशील असला पाहिजे. माणूस हा कर्ता असल्यामुळे त्याला कर्म करणे भाग आहे. जगात अनेक व्यवसाय आहेत व ते करण्यासाठी कौशल्ये आहेत. त्यापैकी किमान एक तरी कौशल्य त्याला आले पाहिजे. माणसाच्या डोक्यात विचार व हातात कौशल्य हवे. त्याशिवाय माणूस स्वावलंबी बनू शकत नाही. माणसाचे डोके 'रिकामे' व हात 'निकामे' असून चालत नाही. त्याच्या ज्ञानाला कर्माचे हात व कर्माला ज्ञानाचे डोळे लागले पाहिजेत.

माणसाला कौशल्य प्राप्त झाले तर तो मातीतून सोनं पिकवू शकतो. आज जगात माहिती तंत्रज्ञानाची क्रांती होत आहे. आपल्या हातात मोबाईल व टेबलावर लॅपटॉप आल्यामुळे जगातील कुठलीही माहिती क्षणार्धात आपण मिळवू शकतो. तंत्रज्ञानाचा संचार सगळ्यात क्षेत्रात व व्यवसायात आज होत असल्यामुळे त्याचा उपयोग आपल्याला करता आला पाहिजे. मजूर देखील अकुशल असून चालणार नाही. प्रत्येक माणसाला आता 'ज्ञानकर्मी' व्हावे लागेल. शिक्षण हे जीवनासाठी तर आहेच आहे; पण ते जगण्यासाठी देखील असले पाहिजे. लर्निंग टू-बी व लर्निंग टू-डू चा हाच अर्थ आहे. जगता आले तरच जीवनाला अर्थ आहे; आणि जीवनाचा अर्थ कळला तरच जगणे

सार्थक आहे. प्राचीन भारतात चौसष्ट कला होत्या, असे आपण वाचतो. चौसष्ट कला म्हणजे चौसष्ट कौशल्य किवा कामे. पण त्यात आज फार मोठी भर पडली आहे.

स्वावलंबी होण्यासाठी कौशल्य शिकण्याची गरज आहे. कौशल्यांच्या आधारावरच भौतिक संपत्तीमध्ये वाढ करता येते. काम छोटे असेल अथवा मोठे. ते करण्याची 'स्किल' अर्थात 'कसब' शिकले पाहिजे. ज्ञान प्राप्त करण्यासाठी डोक्याचा उपयोग करावा लागतो. पण काम करण्यासाठी हाताचा उपयोग करणे भाग आहे. जे शिक्षण डोक्याचा, हाताचा व ऱ्हदयाचा उपयोग कसा करावा हे शिकविले तेच खरे शिक्षण होय.

३) 'लर्निंग हाऊ टू लर्न' अर्थात शिकावे कसे हे शिकणे हे शिक्षणाचे तिसरे उद्दिष्ट आहे. व्यापक अर्थाने शिक्षणाचा विचार केला तर त्याची सुरुवात जन्मल्यापासून होते व मृत्यू होताक्षणीच ते संपते. आजन्म शिक्षणाची संकल्पना या उद्दिष्टात आहे. माणसाने आयुष्यभर शिकत राहावे असाच याचा अर्थ आहे. औपचारिक शिक्षण आपण आयुष्य भर घेऊ शकत नाही. विद्यापीठीय शिक्षण हा शिकण्याचा शेवटचा टप्पा आहे. त्यानंतर आपण व्यवहारात पडतो. औपचारिक शिक्षणात आपल्याला शिक्षक शिकवतात. औपचारिक शिक्षण संपताच अनौपचारिक शिक्षण सुरू होते. पण त्यात आपणच शिक्षक असतो. शिकण्याची कला अवगत केल्या शिवाय औपचारिक शिक्षण आपल्याला घेता येणार नाही. ज्ञान हे सातत्याने वाढतच जाते. ते प्राप्त केल्या शिवाय आपल्याला आपला व्यवसाय उत्कृष्टपणे करता येत नाही. शालेय किंवा कॉलेज जीवनात मिळालेली शिदोरी आयुष्यभर पुरत नाही.

आजीवन शिक्षणासाठी आपण वाचनाची सवय लावून घ्यायला हवी. शिक्षकांची जागा पुस्तके घेऊ शकतात. पुस्तके हेच आपले शिक्षक व ज्ञानदाते. आपले शिकणे संपले की आपल्या जीवनाचा प्रवाह थांबतो. त्याला डबक्याचे स्वरूप प्राप्त होते. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना आयुष्यभर 'शिकावे कसे ?' हेच शिकविले पाहिजे. विद्यार्थ्यांनी आयुष्यभर शिकत राहावे हे शिकविणारा शिक्षकच खरा शिक्षक असतो. अशा शिक्षकाचा संस्कार व प्रभाव आयुष्यभर टिकतो.

आजीवन शिक्षण व ज्ञानाधिष्ठित समाज या दोन संकल्पनांची आज जगभरात चर्चा चालू आहे. मानवी संसाधनातून ज्ञानसंपदा निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आयुष्यभर शिकलेच पाहिजे. प्रत्येक माणूस आयुष्यभर शिकत राहिला तर सगळा समाजच शिकणारा ठरतो. शिकलेला व शिकणारा माणूसच ज्ञानाचे संवर्धन व संक्रमण करु शकतो. एका पिढीने ज्ञानसंचित ही दुसऱ्या पिढीची ज्ञानसंपदा असते. ज्ञान हा मानवजातीचाच वारसा असतो. माणूस हाच ज्ञानावाहक व ज्ञाननिर्मिक असतो. म्हणून शिक्षणाचे हे तिसरे उद्दिष्ट अतिशय महत्त्वाचे आहे.

४) 'लर्निंग हाऊ टू लिव्ह टुगेदर' –अर्थात इतरांच्या बरोबर राहावे कसे 'हे' शिकणे हे शिक्षणाचे चौथे उद्दिष्ट आहे. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. पाण्यात राहावयाचे असेल तर इतर मासे आपले मित्रच असले पाहिजेत. त्यांच्याशी वैर बाळगून कसे चालेल ? पण वैर तर वाढतच चालले आहे. अनेक जाती, अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक भाषा, अनेक संस्कृती आणि अनेक विचारसरणी यामध्ये मानवी समाज विभागला गेला आहे. या विविधतेत आपल्याला एकतेचे सूत्र शोधता आले तरच सामाजिक एकता व एकात्मता प्रस्थापित होऊ शकेल. पण आज माणूसच माणसाचा वैरी झाला आहे. माणूस माणसाचा मित्रच असला पाहिजे.

इतरांच्या बरोबर मित्रत्वाचा, बंधुत्वाच्या भावनेने आपल्याला राहता आले पाहिजे. याचा अर्थ असा की आपल्या जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, लिंग जाणिवेच्या पुढे आपल्याला जाता आले पाहिजे. माणूस हा कोणत्याही धर्माचा, जातीचा, वंशाचा, लिंग व भाषेचा असो तो आपला भाऊ आहे, मित्र सहकारी आहे असे मनापासून मानले पाहिजे. 'जगा आणि जगू द्या' या तत्वानुसार आपले आचरण असले पाहिजे.

आज जगात दहशतवादाने थैमान घातले आहे. धर्माच्या नावावर हिंसेचा प्रचंड उद्रेक झाला आहे. स्त्रियांवर राजरोसपणे बलात्कार होत आहेत. आपल्या देशात जातीय दंगे तर सतत होत असतात. सत्य, अहिंसा, बंधुता म्हणजेच मानवता. अशी उदात्त मूल्ये आत्मसात केल्याशिवाय इतरांच्या बरोबर बंधुत्वाच्या नात्याने आपल्याला जगताच येणार नाही.

हया चौथ्या उद्दिष्टामध्ये शिक्षणाचे 'सारसर्वस्व' साठवलेले आहे. त्यालाच जगण्याचे कसब व जीवनाची कला म्हणावे लागेल. धर्म, जात, वंश, लिंग व भाषा यांच्या पलीकडे जाऊन माणसाने माणसांशी माणसासारखेच वागावे कसे हे शिकणे व शिकवणे आवश्यक आहे. आपल्या मनात बंधुत्वाचे बीज खोलवर रुजले पाहिजे. सर्वधर्मसमभाव यालाच म्हणतात. मानवधर्म यालाच म्हणतात. पाठशाळा असो की स्कूल, स्कूल असो की मदरसा. त्यात इतरांबरोबर राहावे कसे, वागावे कसे,बोलावे कसे, चालावे कसे व जगावे कसे हेच शिकण्याची आणि शिकवण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

शिक्षणाची ही चार उद्दिष्टे शाश्वत व सार्वजनिक आहेत. ती मूलभूत व वैश्विक आहेत. असे शिक्षण प्रत्येकाला प्राप्त व्हावे असे मला वाटते.

# शिक्षण आणि साहित्य व्यवहार

**नागनाथ कोत्तापल्ले**

*लेखक डॉ. बा. आं. म.वि. औरंगाबादचे माजी कुलगुरु आहेत. डाव्या आणि परिवर्तनवादी विचार चळवळीतील त्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे. दलित, ग्रामीण व आदिवासी साहित्य चळवळीचे प्रवर्तक, मार्गदर्शक आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी साहित्य आणि शिक्षणाचा सहसंबंध विस्ताराने चर्चिला आहे.*

साधारणतः साहित्याचा विचार करताना लेखक, त्याची कलाकृती आणि फार फार झाले तर वाचक या घटकांचा विचार केला जातो. क्वचित समीक्षा लेखन महत्वाचे आहे, असे म्हटले जाते. परंतु या पलीकडे साहित्याचा विचार केला जात नाही. वस्तुतः साहित्यातील निर्मिती असो की, वाचन प्रक्रिया असो, त्याचा संबंध समाजातील अनेक घटकांशी असतो. परंतु या साऱ्या घटकांचा विचार कधी होत नाही. शिक्षणाचा आणि साहित्याचा अत्यंत निकटचा संबंध असूनही तो आवर्जून केला जात नाही. खरे म्हणजे भारतामध्ये शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढत गेले, तसतसे साहित्य व्यवहाराचे स्वरूपही बदलत गेले. परंतु या दृष्टीने कधी विचार होत नाही.

कुठल्याही समाजात शिक्षण नावाची गोष्ट असतेच. भारतातही प्राचीन काळापासून शिक्षण होते. शिक्षणाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. या स्वरूपाप्रमाणे समाजाची जडणघडण होत असते. आर्थिक व्यवहारही शिक्षणाशीच निगडीत असतात. मुख्यतः जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून चालू आहे. हा अर्थ लावताना शिक्षण, शिक्षणातील आशय, शिक्षणाच्या परंपरा यास अतिशय महत्त्वाचे स्थान असते. म्हणजे जगण्याला अनेक प्रकारे आधार मिळावा, असा प्रयत्न शिक्षणातून तर होत असतोच, पण जीवन समजून घेण्यासाठीही शिक्षण मदत करीत असते. अर्थात जीवन समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष घडणारे सामाजिक व्यवहार, आर्थिक दबाव, सांस्कृतिक घडामोडी आणि निसर्गातील विविध घटिते यांचा उपयोग होतो. तरीही शिक्षण महत्त्वाचे असतेच.

शिक्षण आणि शिक्षण प्रक्रिया महत्त्वाची असेल, माणसाला माणूस म्हणून उभी करणारी असेल तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर तिचा परिणाम होणारच. म्हणजे साहित्यावर आणि एकूण साहित्य व्यवहारांवर

शिक्षणाचा प्रभाव पडणार, हे उघड आहे. जसे इंग्रजाच्या आगमनापूर्वी आपल्या देशात फार मर्यादित लोकांना शिक्षणाचा अधिकार होता. गुरुकुलांमध्ये, अग्रहारांमध्ये जे शिक्षण दिले जाई ते अर्थातच मर्यादित लोकांना, विशेषत: ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनाच शिक्षण दिले जात असे. धर्म, धर्मचर्चा, नीति–विचार, राज्य कारभार–विचार आणि युध्द–कौशल्ये येथे शिकविली जात.ते मर्यादित लोकांपुरतेच शिक्षण होते, हे शंबुक आणि एकलव्याच्या कथांवरून स्पष्ट होते. इतर लोकांना त्यांच्या त्यांच्या व्यवसायाचे शिक्षण त्यांच्या त्यांच्या कुटूंबात मिळत होते. ही शिक्षण प्रणाली अनेक शतके टिकून होती. परिणामी समाजाचे ना स्वरूप बदलले, ना व्यवसायांमध्ये काही नव्या सुधारणा आल्या.

आता या शिक्षण प्रणालीचा एकूण साहित्य निर्मितीवर काय परिणाम झाला ? असा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तरही स्पष्ट आहे.ज्यांना शिक्षणाचा अधिकार होता, ते धर्मपर ग्रंथ लिहीत असत. वैद्यक विषयक ग्रंथ लिहित, इतर शास्त्रांसंबंधीचे ग्रंथ लिहीत. साहित्य निर्माण करणारेही होते. ते दरबारी काव्य लिहीत. म्हणजे एका विशिष्ट वर्गासाठी काव्य लिहीत. हा विशिष्ट वर्ग म्हणजे अभिजन वर्ग होय. या वर्गासाठी अभिजात साहित्याचा (Classical Gterative) प्रारंभ असा झाला. अभिजात साहित्याचे निर्माते जसे उच्चवर्णीय होते, तसेच त्यातील संकेतही उच्चवर्णियांपुरते मर्यादित होते.म्हणजे काव्य लिहावे ते परमेश्वरावरती किंवा राजावरती, पराक्रमी लोकांवरती इ.

निर्मिती करणे ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. तेव्हा बहुजनही निर्मिती करीतच होते. त्याला लोकसाहित्य म्हणता येईल. अभिजनांचे साहित्य आणि लोकसाहित्य असे दोन ठळक प्रकार आपणास प्रारंभापासून दिसतात, त्याचे कारण शिक्षण मिळणे आणि न मिळणे हेच आहे.

मध्ययुगातही पंडिती काव्य किंवा महाकाव्य म्हणून ओळखले जाणारे काव्य प्रामुख्याने उच्चवर्णियांकडून निर्माण होताना दिसते. वामन पंडित असोत की महानुभाव कवी नरेंद्र असो, हे अभिजन वर्गापैकी आणि महाकाव्यांच्या संकेताप्रमाणे लेखन करणारे. या उलट बहुजन वर्गातून आलेले वारकरी संत भावकविता लिहीत आहेत. अभंग, ओवी यांच्यासारखे काव्यपदबंध स्वीकारताहेत असे दिसेल. संत ज्ञानेश्वर आणि संत एकनाथ मात्र वारकरी चळवळीत असल्यामुळे भावकाव्यही निर्माण करीत आहेत असे दिसेल. अनेक संतांचे लेखनीक होते, असा एक अभंग उपलब्ध आहे. म्हणजे त्यांना लिहिता वाचता येत होते की नाही, हा प्रश्नच आहे. संत तुकारामांसारखा एखादा अपवादरूप कवी दिसतो, ज्यांना लिहिता वाचता येत होते. पुढे शाहिरी वाङ्मय निर्माण करणारे बहुसंख्य कवीही बहुजन समाजातून आलेले आहेत, असे दिसते. राम जोशी, पठ्ठे बापुराव यांच्या सारखे काही अपवाद आहेतच.

म्हणजे शिक्षण असणे नसणे याचा परिणाम जसा निर्मितीवर झालेला दिसतो, त्याप्रमाणे रसिकांवरही झालेला दिसतो. समाजातील बहुसंख्य लोक 'श्रोते' होते. म्हणजे ते लोकसाहित्याचे जे सादरीकरण होई, ते ऐकत असत. तसेच अगदीच थोडे लोक ज्यांना मंदिरात प्रवेश होता (किंवा ज्यांना वेळ होता) ते लोक तेथे जाऊन पोथ्या, पुराणे ऐकत असत. म्हणजे बहुसंख्य लोक श्रोते होते. वाचक होते, त्यांची संख्या नगण्य होती, हे उघड आहे.

ही सारीच परिस्थिती इंग्रजांच्या आगमनानंतर बदलली. इंग्रज हे या देशाचे उध्दारकर्ते म्हणून आलेले नव्हते, तर राज्यकर्ते म्हणून आलेले होते हे उघड

आहे. त्यांनी आर्थिक शोषणही केले, हेही नोंदविले पाहिजे. तरीही त्यांच्या काळात एक आमुलाग्र बदल सुरू झाला. औद्योगिकरण आणि आधुनिकीकरणाचा प्रारंभ त्यांच्या काळातच झाला. उत्पादनाची साधने बदलली आणि समाजाचे रंग बदलू लागले. न्याय व्यवस्था, शेती व्यवस्थेसह अनेक नव्या व्यवस्था आल्या. त्यातच शिक्षणाची एक नवी व्यवस्था आली. शिक्षणाच्या या नव्या व्यवस्थेने मात्र सर्व क्षेत्रावरती परिणाम केला. एक प्रकारची ही क्रांतीच होती.

इंग्रजांनी शिक्षणाचे जे धोरण आखले ते जाती-धर्माच्या पल्याड जाणारे होते. सार्वत्रिक शिक्षण आणि सर्वांना सारखे शिक्षण हे ते धोरण होते. त्या काळाच्या तुलनेत हा प्रागतिक दृष्टिकोन होता. त्यांनी अभ्यासक्रम निश्चित केले. ज्यामध्ये विज्ञान, गणितासह भाषा विषयही होते. साधारणतः १८२२ पासून हे नवे शिक्षण सुरु झाले. पुढे थोड्याच दिवसात म.फुले यांच्यासारख्या कर्त्या सुधारकांनी या शिक्षण प्रक्रियेत मोलाचे योगदान देण्यास प्रारंभ केला. त्यांनी समाजाच्या अगदीच खालच्या स्तरातील मुलामुलींसाठी शाळा सुरु केल्या.

येथून पुढे साहित्यामध्ये काही नव्या गोष्टी दिसू लागल्या. म.फुले यांच्यासारखा शूद्रातिशूद्रांमधून आलेला लेखक पोटतिडिकेने लिहिताना दिसतो. हे लेखन परमेश्वर प्राप्तीसाठी अगर आध्यात्मिक उन्नतीसाठी नव्हते, तर लौकिक जीवन अधिक मुक्तपणे आणि चांगले जगता यावे असे होते. सर्व प्रकारच्या धार्मिक शोषणाविरूध्द होते. संपूर्ण परंपरेच्या पार्श्वभूमीवर हे एकदम वेगळे लेखन होते. कारण म.फुले यांच्यासारख्यांना शिक्षणाचा अधिकार मिळालेला होता. वाचनाचा अधिकार मिळालेला होता. म.फुले यांनी त्याचा उपयोग करुन घेतला. वेदांपासून (जे वाचण्यास पूर्वी शूद्रांना बंदी होती.) जागतिक इतिहासापर्यंतच्या अनेक गोष्टी त्यांनी वाचून काढल्या. थॉमस पेनची पारायणे केली. तत्कालीन निग्रो वाङ्मय त्यांनी पाहिले आणि 'विद्या' नावाची गोष्ट व्यक्तीमध्येच नाही तर समाजामध्ये परिवर्तन घडवू शकते याचे प्रात्यक्षिकच दिले. हे प्रात्यक्षिक इतके प्रभावी होते की पुढे एक परंपराच निर्माण झाली. कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, ताराबाई शिंदे यांच्या पासून एक परंपरा सुरु झाली. पुढे ती मुकुंदराव पाटील यांच्यापर्यंत समृध्द होत गेली. विपुल वाङ्मय निर्माण झाले. मराठी साहित्याने म.फुले यांच्यासह संपूर्ण सत्यशोधकी साहित्याची अक्षम्य उपेक्षा केली. पण चळवळ चालतच राहिली.

शिक्षण प्राप्त होणे किती महत्त्वाचे असते, याचे महाराष्ट्रातील हे पहिले उदाहरण होते. साहित्याचे रूप बदलते. बाबा पदमनजीसारखा लेखक 'यमुना पर्यटन' सारखी कादंबरी लिहितो. येथील प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात लिहितो. एकूण स्त्रीसंबंधीचा कळवळा व्यक्त करतो, ही फार फार महत्त्वाची गोष्ट होती. या उलट हरिभाऊ आपटे यांच्याकडे गेलो की, त्यांची कादंबरी, त्यातील स्त्री चित्रण आणि स्त्री सुधारणा या केवळ उच्चवर्णियांपुरत्या आहेत. म.फुले, सर्व सत्यशोधक आणि बाबा पदमनजी यांच्यासारखे लेखक केवळ कुठल्या एका समाजाचा विचार करीत नाहीत. शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांसंबंधी त्यांना अधिक कळवळा असेल, परंतु त्यांच्यासमोर एकूण समाज होता हे महत्त्वाचे आहे.

अर्थात या काळात शिक्षणाला नुकताच प्रारंभ झालेला होता. त्यामुळे वाचक अत्यंत कमी असणार हे उघड आहे. त्यातल्या त्यात म.फुले आणि सत्यशोधक ज्यांच्यासाठी लिहीत होते, त्या शूद्रातिशूद्र आणि स्त्रीवर्गातील वाचक तर नगण्यच असणार. वाचकांअभावी 'दीनबंधू' सारखे नियतकालिक पुन्हा

पुन्हा बंद करण्याची वेळ चालकांवर येत असे. तरीही म.फुले आणि सर्व सत्यशोधकी लेखक सर्व उपेक्षेला तोंड देत आणि अडचणींवर मात करीत लिहीत राहिले ही केवळ अद्भुत गोष्ट होती, आणि ती त्यांना शिक्षणातूनच प्राप्त झालेली होती, हे उघड आहे.

शिक्षण असणे आणि नसणे, यामुळे काय फरक पडू शकतो याचा एक अत्यंत धावता आढावा येथे घेतला. परंतु पुढे पुढे शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले आणि ते अधिकाधिक शिस्तबध्द होऊ लागले, तसतसे हे परिणाम अधिकाधिक व विविध स्वरूपाचे दिसायला लागले. शिक्षणाचा परिणाम लेखकांवर जसा होतो तसा तो वाचकांवरही होत असतो. एकूण समाजाच्या अभिरूचीवरही होत असतो.

वाचकांवर कसा होतो किंवा वाचक नसल्यावर काय होते, याचे एक उदाहरण 'दीनबंधू'च्या निमित्ताने दिले आहे. एकोणिसाव्या शतकात वाचकच मुळात कमी होते, जे होते, ते म.फुले आणि सत्यशोधकी लेखकांना समजून घेणारे नव्हते. पण पुढे शिक्षणाचे प्रमाण वाढत चालले. विशेषत: १९२० नंतर म्हणजे रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या विविध भागातील समाज धुरिणांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले व येथून पुढे शिक्षण ही पायवाट न राहता हमरस्ता व्हायला प्रारंभ झाला. विस्ताराबरोबर एक सुसंघटित व नियंत्रित रूप शिक्षणाला येऊ लागलेले दिसते. त्यामध्ये शिक्षण व्यवस्थेचे नियंत्रण करणारा, अभ्यासक्रम ठरविणारा,त्यासाठी क्रमिक पुस्तके लिहिणारा, व्यवस्थापन पाहणारा, व शिकविणारा वर्ग उच्चभ्रू असाच होता. शिकणाऱ्यामध्येही मोठया प्रमाणात उच्चभ्रूचे होते. एखादा दुसरा शेतकरी, दलित व इतर शोषित वर्गातला असायचा. म्हणजे एकूण शिक्षणावर उच्चवर्णियांचाच वरचष्मा होता. एकूण साहित्याचा आणि विशेषत: वाचनाचा विचार करताना विद्यार्थ्यांना काय शिकविले जाते, ते फार महत्त्वाचे असते. तसेच ते कसे शिकविले जाते हेही महत्त्वाचे असते. त्यातून उद्याच्या वाचकांची जडण घडण होण्याची शक्यता असते. (अर्थात शिक्षण घेणारे सगळेच वाचतात असे नाही.) म्हणजे दलित साहित्याच्या उदयापूर्वी शंबुकाची कथा किंवा एकलव्याची कथा धर्माच्या आणि गुरुऋणाच्या दृष्टिकोनातूनच शिकविली जात होती. परंतु दलित साहित्याने या कथांना वेगळे आयाम दिले. यापूर्वी भा.वि.वरेरकर, कुसुमाग्रजांसारख्यांनी काही प्रयत्न केले होते. परंतु १९७० नंतर सगळ्याच वाङ्मयाकडे अधिक चिकित्सकपणे पाहिले जावू लागले. म्हणजे कोणता अभ्यासक्रम नेमलेला आहे, हे महत्त्वाचे असते. शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्यांच्या अभ्यासक्रमात कोणती पुस्तके होती, तसेच एकूण अभ्यासक्रम काय होता, हे महत्त्वाचे ठरते. पुष्कळदा दुय्यम साहित्यकृती अभ्यासक्रमात लावल्या जातात व त्याच कशा श्रेष्ठ आहेत, म्हणून शिकविल्या जातात, तेव्हा त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर म्हणजे उद्याच्या वाचकांवर होत असतो. त्यामुळे चाकोरी बाहेरचे पण चांगले साहित्य त्याच्या अभिरूचीस रूचेल असे नाही. याचे प्रतिबिंब १९२० नंतरच्या मराठी साहित्यात दिसू लागले. म्हणजे ग्रामीण आणि दलित जीवनाचे चित्रण थोडे थोडे साहित्यातून प्रकट होऊ लागले. ग.ल. ठोकळ, र.वा.दिघे आणि इतर ग्रामीण लेखक लिहू लागलेले दिसतात. परंतु ग्रामीण जीवनाचे या काळात झालेले चित्रण वास्तववादी होते, असे मात्र म्हणता येत नाही. ते रंजनप्रधान होते. विशेषत: ना.सी.फडके यांचा प्रभाव या लेखनावर दिसतो. येथे स्वतंत्रपणे ग्रामीण वास्तव का प्रकटले नसावे ? याचे कारण उघड आहे. अजूनही ग्रामीण वेदना समजून घेणारा वाचक वर्ग निर्माण झालेला नाही.

एकूण अभिरूचीवर रंजनाचाच प्रभाव आहे. या रंजनाचे कारण तत्कालीन सामाजिक, राजकीय जीवनात जसे शोधता येईल, तसेच ते तत्कालीन अभ्यासक्रमात सुध्दा शोधता येईल.

१९२०नंतर म.भा.भोसले, श्री. कृ.कोल्हटकर, वि.स.खांडेकर अशा काही लेखकांनी आपल्या साहित्यातून दलित जीवन व्यक्त केलेले दिसते. परंतु तेही तत्कालीन तंत्रशरणतेमुळे फारसे परिणामकारक झालेले दिसत नाही. याला श्री म.माटे यांच्या काही कथा अपवाद आहेत.

१९७० नंतर हळूहळू परिस्थिती बदलू लागली. विविध साहित्य चळवळीचे आगमन होऊ लागले. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, स्वातंत्र्य प्राप्ती, राज्यघटनेचा स्वीकार आणि शिक्षणाचा वाढता प्रसार यामुळे शिक्षणासंबंधी आणि साहित्यासंबंधीही विचार करु शकणारा, प्रश्न विचारणारा एक वाचक वर्ग निर्माण होऊ लागला. वाचकांमध्ये आणि शिक्षकांमध्येही विविध जाती जमातीचे लोक सामील होऊ लागले. आता पर्यंत श्रेष्ठ म्हणून ज्यांना मान्यता मिळालेली होती, त्या साहित्यकृती का व कशामुळे श्रेष्ठ आहेत, असे प्रश्न नवा वाचक विचारू लागलेला होता.

याच काळात शिक्षणासंबंधी महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले. उदा. १९७०-७५ च्या दरम्यान डॉ. बाबा आढाव यांनी प्रश्न उपस्थित केला की शाळांमध्ये 'ग' गणपतीचा व 'भ' भटजीचा असे का शिकविले जाते ? शिक्षण हे संस्काराचे माध्यम असते, व अशा प्रकारचे शिकविणे विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण करणारे ठरू शकते. पुढे शिक्षण खात्याने हे मान्य केले व 'ग' गवताचा आणि 'भ' भारताचा झाला! ही गोष्ट आज किरकोळ वाटते, पण त्या काळाचा विचार करता ती खूपच मोठी होती. एका दिशेची सूचक होती.

याच काळात हळूहळू अभ्यासक्रमांचे स्वरूपही बदलू लागले. शालेय पातळीवर शासनाच्या वतीने क्रमिक पुस्तके येऊ लागली तर विद्यापीठीय पातळीवरही अभ्यासक्रमांचे स्वरूप बदलू लागले. विद्यापीठीय अभ्यासक्रमात लोकसाहित्य, वैचारिक साहित्य, सांस्कृतिक पार्श्वभूमी असे अभ्यासक्रम येऊ लागले. पुढे दलित, ग्रामीण आणि स्त्रीवादी साहित्याचा समावेश अभ्यासक्रमांमधून होऊ लागला. क्रमिक म्हणून लागणारी पुस्तके आणि उतारेही बदलू लागले.विद्यार्थ्यांवर वेगळ्या वाङ्मयाचे संस्कार थोड्या प्रमाणावर का होईना होऊ लागले. त्यामुळे वाचकांच्या वाचनातील पुस्तके बदलू लागली. वाङ्मयासंबंधी प्रश्नही उपस्थित केले जाऊ लागले.

वाङ्मयाचा इतिहास ही साहित्याभ्यासाच्या क्षेत्रात महत्त्वाची गोष्ट असते. कारण तो एकदा लिहिला की पुढे कित्येक वर्षे त्याचा परिणाम होत असतो. उच्च शिक्षणामध्ये वाङ्मयेतिहास अभ्यासक्रमाचा भाग असतो. शिक्षक त्या आधारे शिकवितात व विद्यार्थी त्या आधारेच अभ्यास करीत असतात. त्यामुळे वाङ्मयेतिहासाचा परिणाम पुढे कित्येक दशके होत राहतो. याच काळात वाङ्मयेतिहासासंबंधीचे काही तात्त्विक प्रश्न उपस्थित होत राहिले. उपलब्ध असलेल्या वाङ्मयेतिहासासंबंधी त्रुटीची, पूर्वग्रहदूषिततेची चर्चा होऊ लागली. त्यातून दुर्लक्षित वाङ्मयाचे पुनर्मूल्यांकन होऊ लागले.

असे सगळे वातावरण बदलून गेले, त्याचे कारण म्हणजे शिक्षणाचा विस्तार होऊन, त्यात समाजातील अनेकविध घटक सामील होऊ लागले होते, हेच आहे. परिणामी हितसंबंधी गटांनी महत्वाच्या लेखकांची उपेक्षा केली, याचे भान जागविले जावू लागले. म.फुले आणि डॉ.आंबेडकर हे महत्त्वाचे

लेखक आणि विचारवंत होत, हे प्रस्थापित होऊ लागले. शंकरराव खरात आणि अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्याच्या सदाशिवपेठी कक्षा रुंदाविल्या, मराठी कथेला समाज वास्तवाचे भान दिले याचीही जाणीव होऊ लागली. वस्तुत: हे दोन्ही लेखक नवकथेच्या काळातच लिहीत होत, परंतु नवकथेची चर्चा फक्त चार कथांकाराभोवी फिरत राहिल्यामुळे या दोन्ही लेखकांकडे दुर्लक्ष झालेले होते. त्यांची नव्याने प्रस्थापना करण्याचे प्रयत्न सुरु झाले.

शिक्षणामध्ये समाजाचे अनेकविध घटक सामील होऊ लागले, तशी अभ्यासमंडळे ही संमिश्र होऊ लागली. पूर्वी ती शक्यतोवर एक जातीय असायची. त्यामुळे शालेय अभ्यासक्रम असो की विद्यापीठीय अभ्यासक्रम असो, बदलू लागला. अर्थात ही प्रक्रिया घडताना ताणतणावही निर्माण होऊ लागले. शासनाच्या वतीने प्रकाशित होणारी शालेय क्रमिक पुस्तके दर्जाविहीन आहेत. संपादक मंडळ आपल्या जवळच्या लेखकांचे उतारे निवडतात, प्रादेशिक समतोल साधण्याच्या प्रयत्नात एकूण पुस्तकच दुय्यम दर्जाचे झाले आहे. अशा प्रकारचे आरोप होऊ लागले. वस्तुत: असे आरोप यापूर्वीच्या क्रमिक पुस्तकांवरही करता येऊ शकतात. ती प्रामुख्याने मध्यमवर्गीय जाणिवा व्यक्त करणारी होती, असे म्हणता येऊ शकते.

खरे ताण विद्यापीठीय अभ्यासक्रमाच्या संदर्भात व्यक्त होऊ लागले. स्वायत्ततावादी मंडळी बाजूला झाल्यामुळे 'ढद्‌ढाशास्त्री परान्ने' 'फकिरा' सारखी पुस्तके येऊ लागली. तेव्हा स्वाभाविकच ही पुस्तके महत्त्वाची नाहीत असे म्हटले जाऊ लागले. पण अभ्यासक्रमात बदल होत राहिले.

अर्थात विचारसरणीच्या बदलाच्या काळात काही गफलतीही होऊ शकतात. अशा गफलती सर्वच काळात होतात, एवढे लक्षात ठेवले पाहिजे.

शालेय असो की विद्यापीठीय अभ्यासक्रम असोत – हा अतिशय गंभीर चिंतनाचा विषय आहे. कोणत्या वयोगटाच्या विद्यार्थ्यांना नेमके कोणता अभ्यासक्रम असावा, त्या मागील हेतू काय असावेत, मूल्ये कोणती असावीत असा व्यापक विचार व्हावयास हवा. झालेले बदल मान्य करुनही असे म्हणावे लागते की, सध्या इतका व्यापक विचार किती केला जातो, याबद्दल शंकाच आहे. पुस्तके कोणती लावायची हाच महत्त्वाचा मुद्दा सध्या होऊन गेला आहे. संपूर्ण यंत्रणेमध्ये काही अपवाद आहेत, पण 'निवडून' येण्याच्या प्रक्रियेत दिलेली आश्वासने पाळताना अभ्यासक्र फुगत आहे, हे सदस्यांच्याही लक्षात येत नाही. परिणामी सध्या सर्व विद्यापीठांमधून एकापेक्षा एक सुमार पुस्तके क्रमिक पुस्तके म्हणून नेमली जाताना दिसतात. जवळचे, दूरचे असा प्रकारही दिसतो. प्रकाशक आणि अभ्यासमंडळ सदस्य असे साटेलोटेही दिसते. परिणामी त्या त्या प्रवाहातील किंवा एकूण वाङ्‌मयातील महत्त्वाच्या पुस्तकांकडे दुर्लक्षही होऊ शकते. अर्थात ज्या काळात 'एका तासात ज्ञानेश्वरी अध्याय १२''अर्ध्या तासात पाचोळा '' अशी पुस्तके वाचून विद्यार्थी डिस्टिंक्शशन मध्ये येत असेल तर एकूण व्यवस्थेबद्दलच प्रश्न निर्माण होऊ शकतो. परंतु असा प्रश्न उपस्थित करण्यासाठी कोणाचीच इच्छा नाही. असो असे सगळे असले तरी शिक्षण, त्यासंबंधित अभ्यासक्रम यांचा परिणाम एकूण अभिरूचीवर होत असतो. एवढेच नाही तर साहित्याच्या मूल्यमापनावरही शिक्षण व्यवस्था परिणाम करीत असते. शिक्षण व्यवस्थेचा भाग म्हणून पुनर्मूल्यांकनपर लेखन, संशोधनपर लेखनही घडत जाते. सगळ्यांचे परिणाम साहित्य जगतावर होऊ

शकतात. ग्रंथ व्यवहारावरही याचे परिणाम होतात. अशा सगळ्या प्रक्रियेत काही गोष्टी डावलल्या जाणे किंवा त्यांची उपेक्षा होणे असे प्रकारही घडू शकतात. उदा. एकेकाळी अभ्यासक्रमांमधून मध्ययुगीन साहित्य मोठया प्रमाणात समाविष्ट केले जात असे. आज हे प्रमाण खूपच कमी झाले आहे. विशेषत: मध्ययुगीन साहित्याचा आज फारसा अभ्यास होत नाही. पूर्वी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमधून मध्ययुगीन साहित्यावर मोठ्या प्रमाणात संशोधन होत असे. डॉ.वि.भि.कोलते, शं.गो.तुळपुळे, यू.म.पठाण यांच्यापासून र.बा. मंचरकरांपर्यंत अनेक अभ्यासक मध्ययुगीन साहित्यावर संशोधन करीत. ग्रंथ लेखन करीत. आज मध्ययुगीन साहित्यावर वर्षभरात एखादा दुसरा ग्रंथ प्रकाशित होताना दिसतो. मराठी साहित्याच्या सर्वांगिण अभ्यासाच्या दृष्टीने हे चांगले की वाईट यावर चर्चा होऊ शकते. परंतु शिक्षणामध्ये विविध स्वरूपात बदल होत असल्यामुळे हे घडत आहे, असेच म्हणावे लागेल.

शिक्षणाचा विस्तार साहित्यावर कोणकोणते परिणाम करतो याचा विचार करताना आणखी एक गोष्ट नोंदवावीशी वाटते. शिक्षण क्षेत्र हे लेखकांसाठी एक अनुभव क्षेत्र झाले आहे. लेखकही पुन्हा शिक्षण क्षेत्रात वावरणारेच प्रामुख्याने आहेत. त्यामुळे पूर्वी वि.स.खांडेकर, आणि आज भालचंद्र नेमाडे, रमेश इंगळे उत्रादकर इ. लेखक मंडळी शिक्षण क्षेत्रावर लिहिताना दिसतात. ही सर्व मंडळी शिक्षण क्षेत्रातच आहेत. त्यामुळे या साऱ्या लेखकांच्या लेखनाला सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिप्रेक्ष प्राप्त होताना दिसत नाही. परिणामी या लेखकांचे लेखन म्हणावे तसे व्यापक जीवनपट कवेत घेऊ शकत नाही. पेशाने शिक्षक, प्राध्यापक असलेल्या लेखकांच्या लेखनाला अनुभवाच्या मर्यादा पडतात असेही जाता जाता नोंदवावेसे वाटते.

असे सगळे असले तरी आज शिक्षणामुळेच जीवनाच्या विविध क्षेत्रातील, विविध जातीजमातीतील लेखक मोठया प्रमाणात लेखन करतांना दिसतात. स्त्रियाही मोठया प्रमाणावर लेखन करीत आहेत. यांच्या लेखनाचा पोतही पुष्कळ प्रमाणात बदलतो आहे. एखाद् दुसरे नाटक लिहिणाऱ्या स्त्रियाही दिसू लागल्या आहेत. ज्यांच्यापर्यंत शिक्षणच पोचले नव्हते,आदिवासी शिक्षण प्रक्रियेत सामील होत आहेत. परिणामी त्यांची स्वतंत्र अशी निर्मिती रसिकांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रकाशक, संपादकांमध्येही विविध जाती जमातीचे लोक सामील होत आहेत. दलित, ग्रामीण लेखक तर १९७० पासूनच आपला केवळ सूर घेऊन साहित्य निर्मिती करीत होते.

त्यामुळे लेखकांचा साहित्य निर्मितीचा, वाचनाचा, वाचन प्रक्रियेचा, अभिरूचीचा म्हणजेच एकूण साहित्य व्यवहाराचा विचार करताना शिक्षणाचा, शिक्षण प्रक्रियेचा, त्या अंतर्गत होणाऱ्या बदलांचा विचार करणे आवश्यकच असते. किंबहूना असा विचार केला नाही तर साहित्य विचार अपूर्ण राहण्याची शक्यता असते.

# स्वायत्तता आली दारी : स्वायत्ततेचा अन्वयार्थ

**डॉ. पंडित विद्यासागर**

*लेखक स्वा.रा.ती.म.वि.चे विद्यमान कुलगुरु – विज्ञान साहित्य लेखनातील एक महत्त्वाचे शैलीदार लेखक – विज्ञान व कर्मनिष्ठ शिक्षण चिंतक आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी शैक्षणिक संस्थांच्या स्वायत्ततेचा तपशीलाने विचार विमर्श केलेला आहे.*

---

विद्यापीठावरील महाविद्यालयांचा भार कमी करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयाच्या स्वायत्ततेची कल्पना गेल्या दोन दशकाहून अधिक काळ राबवित आहे. मात्र स्वायत्ततेच्या या कल्पनेला म्हणावा असा प्रतिसाद लाभलेला नाही. स्वायत्तता मान्यतेची क्लिष्ट आणि वेळखाऊ प्रक्रिया, स्वायत्ततेबाबत व्यवस्थापन आणि शिक्षक यांच्या मनातील गैरसमज ही काही कारणे असली, तरी विद्यापीठ अनुदान आयोगाने सूचवलेली मार्गदर्शक तत्वे पूर्णपणाने न स्वीकारण्याची विद्यापीठांची भूमिकाही त्यास कारणीभूत आहे. त्यामुळेच स्वायत्ततेतून मिळणारे फायदे हे हक्काच्या रूपाने न मिळता मेहरबानीच्या रूपाने मिळतात ही वस्तूस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने बासष्ट संस्थांना घोषित केलेली स्वायत्तता ही निश्चितच स्वागतार्ह आहे. यात पाच केंद्रीय विद्यापीठे, एकवीस राज्य विद्यापीठे, चोवीस अभिमत आणि दोन खाजगी विद्यापीठांचा समावेश आहे. याशिवाय दहा संस्था आणि महाविद्यालये यांनाही स्वायत्तता देण्यात आली. यामुळे या शैक्षणिक संस्थांना नवीन विषय सुरु करण्याचे, इतरत्र आपल्या शाखा उघडण्याचे, परदेशी शिक्षक निवडण्याचे, शिक्षकांना प्रोत्साहनपर फायदे देण्याचे, शैक्षणिक करार करण्याचे, कौशल्य विकासाचे अभ्यासक्रम तयार करण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे. यामधील एक दोन बाबी वगळता इतर बाबींचे स्वातंत्र्य विद्यापीठांना होतेच. विशेष म्हणजे अभिमत विद्यापीठांना तर सर्वच बाबतीत काही निकषांच्या आधारावर मुभा होती. त्यामुळे या स्वायत्ततेमुळे राज्य विद्यापीठांना इतरत्र शाखा उघडणे आणि परदेशी शिक्षकांची नेमणूक करणे अशा काही प्रकियांमध्ये अधिक स्वातंत्र्य मिळाले आहे. महाविद्यालयांना मात्र अधिकच्या सवलती मिळाल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यानुसार अभिमत विद्यापीठे स्थापन झाल्यामुळे या विद्यापीठांनी मध्यपूर्वेत आपल्या शाखा उघडून अनेक वर्षे चालवल्या आहेत. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या कुलगुरू पदाच्या कार्यकाळात पुणे विद्यापीठाने मध्यपूर्वेत शाखा उघडली. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ कायद्यानुसार यास परवानगी दिली होती. मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यावर शंका उपस्थित केली. विद्यापीठ अनुदान आयोगाला विद्यापीठ अनुदान

मंडळाच्या कायद्यात राज्य विद्यापीठाने परदेशात शाखा उघडू नये असे कुठेही नमूद केलेले नाही. हे पटवून दिल्यावर त्यास सशर्त परवानगी मिळाली. ही शर्तही गमतीची होती. विद्यापीठाने आपली शैक्षणिक गुणवत्ता राखून हे करावे असे त्यात म्हटले होते. अंमलबजावणीत येणाऱ्या अडथळ्याचे हे एक उदाहरण आहे.

स्वायत्ततेची ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी राज्य पातळीवरही त्याला पूरक धोरण असणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास गुणवत्ता वाढीचा आग्रह धरला जात असतानाच पदभरती आणि पदरचना याबाबतीत राज्य पातळीवर उदासिनता आहे. गेल्या पाच वर्षात काही अपवाद वगळता पदभरती झालेली नाही. पदभरतीसाठी राज्य सरकारची परवानगी लागते. मंजूर झालेल्या शासकीय पदांची गरजेनुसार पुनर्रचना करण्याचा विद्यापीठांना अधिकार नाही. त्यामुळे कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या विभागात शिक्षकांची अधिकची पदे आणि नव्याने सुरू झालेल्या विभागात शिक्षकांची वानवा अशी परिस्थिती आहे. स्वायत्तता मिळाल्यानंतर यात बदल होणार का ? हा खरा प्रश्न आहे. वेतन अनुदान देवून पदभरती आणि पदरचनेचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यापीठांना मिळाल्यास स्वायत्ततेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या होऊ शकेल. भारतातील इतर राज्यातही थोड्याबहुत फरकाने हीच परिस्थिती आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे परिनियमात रूपांतर करणे ही महत्त्वाची आणि आव्हानात्मक प्रक्रिया आहे. स्वायत्त महाविद्यालयांबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांचा स्वीकार पूर्णत्वाने केला गेला नाही. त्यामुळे अनेक बाबतीत संदिग्धता आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी भरावयाच्या संलग्न शुल्काचा प्रश्न अधांतरीच आहे. विद्यापीठ पदवी देत असल्याने महाविद्यालयाने संलग्न शुल्क दिले पाहिजे असे विद्यापीठाने धोरण आहे. तर आम्ही स्वायत्त असल्याने संलग्न शुल्क भरावयाची आवश्यकता नाही, अशी महाविद्यालयाची भूमिका आहे. असे अनेक वादाचे मुद्दे यातून निर्माण होतात. परिनियम बनविणे ही वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यामुळेच या बाबतीत विद्यापीठाने त्वरीत पाऊले उचलून त्यावर निर्णय घ्यायला हवा. त्यासाठी व्यवस्थापन परिषद, अधिसभा आणि इतर प्राधिकारणांच्या धोरणात एकवाक्यता हवी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ हा २०१७ पासून कार्यान्वित झाला आहे. या कायद्यानुसार बनविण्यात येणाऱ्या एकत्रित परिनियमाचे काम अंतिम टप्यात आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या स्वायत्ततेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश या एकत्रित परिनियमात करता येवू शकतो. असे झाल्यास हे परिनियम सर्वच विद्यापीठांसाठी ग्राह्य ठरतील. त्यामुळे परिनियम करण्यासाठी लागणारा विलंब टळेल. शिवाय भविष्यकाळातील दुसऱ्या विद्यापीठांची निवड झाल्यास परिनियम करण्याची पुनरावृत्ती टाळता येईल. अर्थात अंमलबजावणी पुढील अडचणी इथेच संपत नाहीत. विद्यार्थी प्रवेश, आरक्षण धोरण, सर्वसमावेशकता, विद्यापीठावर पडणारा प्रशासकीय भार याविषयीचे सुस्पष्ट धोरण आखणे जरूरीचे आहे. या सर्वांचा गुणवत्तावाढ आणि प्रादेशिक दायित्व यांचेशी संबंध आहे. सद्यस्थितीत विद्यार्थी प्रवेशात विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्राधान्याने विचार केला जातो. हे प्रमाण सत्तर टक्क्यांपर्यंत असते. राहिलेल्या तीस टक्क्यांमध्ये राज्यातील आणि इतर राज्यातील विद्यापीठांचा विचार केला जातो. स्वायत्तता मिळाल्यानंतर यात बदल

अपेक्षित आहे.

स्वायत्ततेमध्ये नविन विषय सुरु करण्याचे स्वातंत्र्य विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे. मात्र अशा प्रकारचे अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्वावर चालवावेत असेच राज्य शासनाने धोरण आहे. यामध्ये अडचण अशी आहे की, एमबीए सारखे काही विषय वगळता इतर विषयाच्या बाबतीत शुल्कामधून मिळणारे उत्पन्न त्या विषयासाठी पुरेसे शिक्षक नेमण्यास अपुरे पडते. अशा परिस्थितीत हे विषय तुटपुंज्या शिक्षकांच्या आधारे चालविले जातात. त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे राहतात. स्वायत्तता मिळालेले विद्यापीठ आणि महाविद्यालयांसाठी राज्य सरकारने स्वतंत्र धोरण आखूण त्यासाठी पद निर्मिती केल्यास गुणवत्ता वाढीस ती उपयोगी पडू शकते.

एकूणच स्वायत्ततेच्या या धोरणाचा विचार केल्यास यामध्ये असणारे लाभार्थी हे वेगवेगळया स्तरावर कार्यरत आहेत. केंद्रीय विद्यापीठांना या धोरणाचा चांगला फायदा होवू शकतो. कारण त्यांच्याकडे पुरेसे मनुष्यबळ, चांगल्या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि एकूण प्रवेशित असणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या, शिवाय संलग्नित महाविद्यालयांच्या प्रशासकीय कारभारातून मुक्तता या गोष्टी त्यांना अनुकूल आहेत. अभिमत विद्यापीठांच्या बाबतीत प्रशासकीय स्वातंत्र्य, एकहाती कारभार आणि एकूणच संलग्नित महाविद्यालयांची नसणारी जबाबदारी त्यांच्यासाठी निश्चितच अनुकूल ठरणार आहे. शिवाय स्थापनेपासूनच अशा विद्यापीठांनी या सर्व सुविधा उपभोगल्या असल्यामुळे त्यांच्याकडे याविषयीची यंत्रणाही सज्ज आहे. राज्य विद्यापीठांच्या बाबतीत त्यांना अनेक प्रशासकिय अडचणींना सामोरे जाण्यासाठी एकूणच मानसिकता पूर्णपणे बदलण्याची गरज आहे. प्रशासनामध्ये अनेक प्राधिकरणांचा सहभाग असल्यामुळे सर्वांची एकवाक्यता होण्यासाठी वेळ लागतो आणि अनेक बाबतीत ती होत नाही. या आणि अशा अनेक अडचणींना तोंड देवून स्वायत्ततेचा लाभ उठविणे हे राज्य विद्यापीठांपुढे फार मोठे आव्हान ठरणार आहे. महाविद्यालयांच्या बाबतीत या अडचणी आणखीनच वाढतात. कारण त्यांना विद्यापीठांच्या नियमाचे पालन करावे लागते. या धोरणांमुळे निवडलेल्या महाराष्ट्रातील संस्था अपवाद वगळता पुणे, मुंबईशी निगडीत दिसतात. महाविद्यालयांच्या बाबतीत तरी इतर गुणवत्ताधारक महाविद्यालयांचा विचार व्हायला हवा होता. तो पुढील टप्प्यात होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. एकूणच अंमलबजावणीतील त्रूटी दूर न केल्यास धोरणात जिंकलो आणि अंमलबजावणीत हरलो अशी स्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय या अगोदर संधी मिळालेल्या महाविद्यालयांना या सवलती दिल्या जातील का या विषयी स्पष्टता नाही.

*सौजन्य : दै.सकाळ*

# शिक्षणाची संकल्पना व कृती कार्यक्रम

**प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**

*लेखक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व माजी प्राचार्य आहेत. 'विचार शलाका' या त्रैमासिकाच्या माध्यमातून वाङ्‌मयीन– सांस्कृतिक व वैचारिक प्रबोधनात त्यांचे बहुमोल स्वरुपाचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. प्रस्तुत लेखात त्यांनी शिक्षणाची संकल्पना तसेच तत्त्वनिष्ठ शिक्षणाचा कृतीप्रकल्प या अनुषंगाने सुबोध भाषेत विचार मांडले आहेत.*

---

शिक्षण ही व्यक्ती व राष्ट्राच्या जीवनातील एक मौलिक व मुलभूत प्रक्रिया आहे. जीवन व्यवस्थित जगण्यासाठी, ते सुखी व यशस्वी करण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणामुळे व्यक्ती व समाज बाह्य आणि आंतरिक अंगाने बदलतात. शिक्षण व्यक्तीच्या भावना आणि सहजप्रवृत्ती संस्कारीत करते, व्यक्तींना सुसंस्कृत, संवेदनशील आणि विवेकशील बनविते. तिच्यामध्ये स्वतंत्र, चिकित्सक व सर्जनशील विचार करण्याची कुवत निर्माण करते. शिक्षणामुळे व्यक्तीला तिच्या अवतीभोवती कोणत्या घटना घडत आहेत, त्यामागची कोणती कारणे असावीत आणि त्यासंदर्भात स्वत:ला काय करणे शक्य आहे ? यान भान येते. शिक्षण व्यक्तीमध्ये अन्याय, शोषण, गुलामगिरी व शोषण या विरूध्द संघर्ष करण्याची चेतना निर्माण करते. शिक्षण व्यक्तीमध्ये नवीन विचार आणि मूल्यांचे स्फुलिंगे टाकते. व्यक्तींना भोळ्या समजुती आणि अंधश्रध्दातून मुक्त करते. व्यक्तीला शिक्षणातून विधायक दृष्टी प्राप्त होते. यामुळे शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ. राधाकृष्णन् म्हणतात, शिक्षण म्हणजे व्यक्तीचा पुर्नजन्म असतो. डॉ.आंबेडकरांच्या मते, 'शिक्षण हेच सर्व सामाजिक समस्या आणि रोगावरील जालीम औषध आहे.'

या उलट न शिकलेल्या व्यक्तिचे असते. ती डोळे असूनही आंधळी असते. ती इतरावर अवलंबून राहते. तिला कोणाचे तरी हात धरून जीवनाची वाटचाल करावी लागते. सोबती नेतील तिकडे तिला फरफटत जावे लागते. तिच्या या परावलंबनामुळे तिचे जीवन पंगू बनते. म्हणून सुप्रसिध्द ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो म्हणतात, 'शिक्षण न  घेण्यापेक्षा व्यक्तीने जन्मास न येणे बरे !'

शिक्षण केवळ व्यक्तिलाच नव्हे तर राष्ट्रासाठी देखिल उपकारक असते. शिक्षणाच्या संदर्भाने असेही म्हणतात, 'मानवात वसत असलेल्या दैवी परिपूर्णतेची

अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण' म.गांधीजींच्या मते 'शिक्षण म्हणजे शरीर, मन आणि ऱ्हदय या त्रयीचा विकास होय.' रविंद्रनाथ टागोरांच्या मते, 'उच्च प्रतिचे शिक्षण म्हणजे ते की, जे केवळ माहिती देत नाही तर सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालून देते.' सुप्रसिध्द तत्त्वज्ञ डॉ.राधाकृष्णन् म्हणतात, 'लोकशाहीनिष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे किंवा त्यांना एखाद्या व्यवसायात तरबेज करणे नव्हे तर त्यापेक्षा कांही अधिक आहे. ते म्हणजे मनाचे औदार्य, मानवाविषयी आदर व एकसंघ राहण्याचे कौशल्य म्हणजे शिक्षण होय.'

भारतीय विचारवंताप्रमाणेच पाश्चिमात्य विचारवंतानी देखील शिक्षणाचे वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत. ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटीस यांच्या मते 'शिक्षण म्हणजे भ्रमनिरास व सत्यशोधन होय.' प्लेटोच्या मते, सत्यं, शिवं, व सुन्दरम् ही जीवनाची अंतिम मूल्ये समजण्याची व अनुभवण्याची पात्रता व्यक्तीत आणून देणे म्हणजे शिक्षण होय.'ॲरिस्टॉटल म्हणतात,' सन्मार्गाने सुख प्राप्त करण्याचे साधन म्हणजे शिक्षण', जर्मन तत्त्वज्ञ हर्बर्ट लिहितात, 'शिक्षण म्हणजे शील संवर्धन होय' रूसोच्या मते, 'शिक्षण म्हणजे व्यक्तिच्या अंतर्गत शक्तिचा विकास होय. बाह्यत: लादलेली वृध्दी नव्हे' हर्बर्ट स्पेन्सरच्या मते, सर्वांग सुंदर जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण होय.' जॉन ड्यूई म्हणतात, 'शिक्षण म्हणजे भोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता व सामाजिक कार्य करण्याची क्षमता व्यक्तीत निर्माण करणे होय.'

शिक्षणाच्या या विविध अर्थाचे विश्लेषण केल्यास यात समाविष्ट असलेल्या विविध घटकांची कल्पना येते.

**जीवनाची तयारी**

विद्यार्थ्यांच्या जीवनाची तयारी करुन घेणे हा शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. वैयक्तिक (Individual), सामाजिक (Social) आणि मूल्यात्मक (Value oriented) जीवनाचे असे तीन स्तर असतात. शिक्षणाने विद्यार्थ्याला या तिन्ही स्तरावरील जीवन जगण्यासाठी सक्षम व तयार केले पाहिजे.

वैयक्तिक जीवनाची तयारी म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनाची ध्येय निश्चित करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे, ते ध्येय संपादनासाठी आवश्यक व पुरेशी माहिती, कौशल्ये आणि ज्ञान देणे, अचूक व परिणामकारक संवाद व संप्रेषणासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी आदी भाषिक कौशल्यामध्ये सक्षम बनविणे होय. त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणा देणे व योग्य मार्गदर्शन करणे, आवश्यक आहे.

त्यांच्या सामाजिक जीवनाच्या तयारीसाठी त्यांना ते ज्या समाजामध्ये राहतात त्या समाजाची रचना व कार्य,समाजाच्या रूढी परंपरा, धर्म, साहित्य, कला, तत्त्वज्ञान आणि मूल्यव्यवस्थेसंबंधी माहिती करून देणे, समाजाच्या मूलभूत व ज्वलंत सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्या व आव्हानांची तोंड ओळख करून देणे अभिप्रेत आहे. त्यांच्यामध्ये सामाजिक कल्याणासाठी वैयक्तिक स्वार्थ व हित बाजूला ठेवण्याची वृत्ती विकसीत केली पाहिजे, मी समाजाचे कांहीतरी देणे लागतो, ही सामाजिक बांधिलकीची भावना त्यांच्यामध्ये निर्माण केली पाहिजे. सामाजिक व्यवहारामध्ये नियम आणि कायदे यांचा आदर ठेवून त्यानुसार वर्तन करण्याची मानसिकता घडविली पाहिजे. प्रांतीय, भाषिक, जातीय व धार्मिक आदि संकुचित विचारांचे विसर्जन करून त्यांना व्यापक राष्ट्रीय वृत्तीने विचार-आचार करावयाला शिकविले पाहिजे. संकुचित विचारांमुळे समाजामध्ये असहिष्णुता

वाढते,जी समाज विघटनाला व अधोगतीला कारणीभूत ठरू शकते. यामुळे शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुवृत्ती वाढविली पाहिजे. त्यांच्यामध्ये शिक्षणातून सामाजिक व सांस्कृतिक वारसा वापरण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. या प्रयत्नाद्वारे त्याच्या सामाजिक जीवनाची तयारी होवू शकते.

शिक्षणातून विद्यार्थ्यांना मूल्यांची ओळख झाली पाहिजे. आनंदी, सुखी, समाधानी व प्रगतीशील जीवन जगण्यासाठी मूल्यांची गरज असते. मूल्याधिष्ठीत जीवन जगणे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच व्यक्तिला माणूसपण प्राप्त होते. समाजाच्या धारणेत मूल्यांची मदत होते. यामुळे शिक्षणातून विद्यार्थ्यांना समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व,न्याय, सहकार्य, सहिष्णुता, सुरक्षितता, शांतता, विनय, शिस्त, व्यक्तिप्रतिष्ठा आदि मूल्यांचा अर्थ समजून सांगितला पाहिजे. त्यांची या मूल्यासंबंधीची समज वाढविली पाहिजे. त्याच्या मनात या मूल्यासंबंधी आदरभाव निर्माण करुन या मूल्यानुकूल जीवन जगण्यासाठी प्रशिक्षित केले पाहिजे. त्यांच्यामध्ये सामाजिक व नैतिक मूल्यांची चिकित्सा करण्याची सवय व शक्ती वाढविली पाहिजे. मानवी जीवन गतीमान राहण्यासाठी व ते टिकवण्यासाठी मूल्यचिकित्सा आवश्यक असते. यामुळे विद्यार्थ्यांत जीर्ण, निस्तेज आणि कालबाह्य ठरलेली मूल्यव्यवस्था फेकून देण्याची व त्या ठिकाणी नवीन मूल्यव्यवस्था निर्माण करण्याची वृत्ती व क्षमता निर्माण केली पाहिजे.

## गुणांचा विकास

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध गुण असतात तसेच या गुणाचा विकास करण्याच्या क्षमता असतात. त्यांना त्यांच्यातील गुणांचा विकास करण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे. त्यासाठी अनुकूल शैक्षणिक, सांस्कृतिक, बौध्दिक वातावरण निर्माण केले पाहिजे. त्यांच्यामध्ये उपक्रमशीलता व प्रयोगशीलता व्यक्त करण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य पाहिजे. गुणांच्या विकासाला पूरक अशा विविध उपक्रम, कार्यक्रम आणि धोरणाची आखणी केली पाहिजे. गुणांच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्यास शिक्षणातून समाजाला व राष्ट्राला त्याचा गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण होणार नाही.

## मानसिक शक्तींचा विकास

शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या विचार (Thinking) आकलन (Understanding) आणि अभिव्यक्ती (Expression) या मानसिक शक्तींचा विकास झाला पाहिजे. शिक्षणाचा हेतू विद्यार्थ्यांना स्वतंत्र, चिकित्सक व सर्जनशील विचार करावयाला शिकविणे हा असतो. यासाठी त्यांना स्वतंत्र व पूर्वग्रहरहित असा बुध्दीचा वापर करणे, विविध प्रश्नासंबंधी स्वत:ची मते तयार करणे,उचित प्रश्न विचारावयाची सवय लावणे, दोन घटनातील कार्यकारण संबंध शोधणे, सामान्यीकरण करणे यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यांच्यामध्ये माहितीचे रूपांतर ज्ञानामध्ये व ज्ञानाचे रूपांतर शहाणपणामध्ये करण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. त्यांना मत (Opinon) आणि ज्ञान (knowldge) यात भेद करता आला पाहिजे. ज्ञान वस्तूनिष्ठ असते. ज्ञानाचा संबंध हा वास्तवाचे आकलन व निर्णयन यांच्याशी असतो. ज्ञानामुळे वास्तवाचे अचूक मूल्यमापन करता येते व जगाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन प्राप्त होतो. मताला विवेकाचे अधिष्ठान प्राप्त झाले तर ते वस्तूनिष्ठ बनते. विद्यार्थ्यांना ज्ञान आणि शहाणपण (Wisdom) यात देखील भेद करता आला पाहिजे. ज्ञानाचा वापर मानव कल्याणासाठी करणे म्हणजे शहाणपण होय. कोणत्याही प्रकारचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रथमत: त्या प्रश्नांचे व्यवस्थित आकलन झाले पाहिजे. ही आकलन क्षमता शिक्षणातून

विकसित झाली पाहिजे. त्यासाठी त्यांच्यामध्ये विश्लेषण, संश्लेषण आणि अर्थग्रहण क्षमता विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांना स्वत:चे विचार व्यवस्थित आकारामध्ये आणि योग्य भाषेमध्ये मांडता आला पाहिजे. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये अचूक अभिव्यक्ती क्षमता कशी विकसित होईल, याकडे लक्ष दिले पाहिजे.

**आर्थिक स्वावलंबन**

शिक्षणातून विद्यार्थी आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाले पाहिजेत. मनुष्य हा केवळ भाकरीवर जगत नाही हे खरे आहे. पण त्याहून हे अधिक खरे आहे की, तो भाकरीशिवाय जगू शकत नाही. यासाठी विद्यार्थ्यांना स्वत:ची उपजीविका भागविता येईल अशा प्रकारची कृषी व लघुउद्योग अधिष्ठीत अभ्यासक्रम शिकविणे, त्यांच्यामध्ये उत्पादनक्षमता वाढविणे, त्यांच्यातील पांढरपेशा श्रमसंस्कृती नोकरीची ओढ महत्त्व कमी करणे आणि श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व समजून सांगणे आवश्यक आहे. उद्योगातून शिक्षण ही महात्मा गांधीजीची कल्पना राबविल्यास विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होवू शकतील.

**चारित्र्याची जडणघडण**

चांगला समाज निर्माण करण्यासाठी चांगला माणूस (Good Man) घडविणे आवश्यक असते. चारित्र्यसंपन्न माणूस हा चांगला माणूस असतो. आज चांगल्या माणसाची जडणघडण करणे गरजेचे आहे. शिक्षणाने हे कार्य केले पाहिजे. यासाठी शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता (Sensibility) व विवेकशीलता (Rationality) विकसित केली पाहिजे. इतराच्या सुख दु:खात सहभागी होणारी व कर्तव्याची जाणीव ठेवणारी व्यक्ती संवेदशील असते. शुभ आणि अशुभ यात फरक करून शुभाचे समर्थन आणि अशुभाचा विरोध करण्याची मानसिक शक्ती म्हणजे विवेकशीलता. अशा प्रकारची संवेदनशील व विवेकशील व्यक्ती चारित्र्यसंपन्न असते. अशा प्रकारची चारित्र्यसंपन्न तरूण पिढी घडविणे हे शिक्षणाचे कार्य असते. या संदर्भात डॉ.राधाकृष्णन् म्हणतात, 'आपण एक संस्कृती घडवित आहोत. एखादा कारखाना नव्हे, संस्कृतीचे मूल्य व श्रेष्ठत्व हे भौतिक समृध्दी व शासकीय यंत्रणेवर अवलंबून नसते. माणसाच्या चारित्र्यावर अवलंबून असते. म्हणून शिक्षणाचे प्रमुख कार्य चारित्र्यनिर्मिती आहे.'

**उपयोजन क्षमता**

शिक्षणातून विद्यार्थ्यांना त्या त्या विषयांचे समग्र व अद्ययावत ज्ञान देणे महत्वाचे आहे. पण त्याही पेक्षा महत्त्वाचे त्यांनी संपादन केलेले ज्ञान समस्या सोडविण्यासाठी वापरण्याचे कौशल्ये शिकविणे हे आहे. त्यांच्यामध्ये वैयक्तिक व सामाजिक समस्या सोडविण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. ज्ञानाचा वापर करण्याचे प्रशिक्षण दिल्याशिवाय ही क्षमता निर्माण होवू शकत नाही. ज्ञान आणि प्रत्यक्ष जीवन यांच्यात समन्वय साधला गेला पाहिजे. शिक्षण जीवनोपयोगी होण्यासाठी ज्ञानाच्या उपयोजन पैलूकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या संदर्भात व्हाईटहेड म्हणतात, 'ज्ञानाचा उपयोग करुन घेण्याचे कौशल्य संपादन करणे म्हणजे शिक्षण.'

**वैज्ञानिक दृष्टिकोन**

त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनही विकसीत केला पाहिजे. विज्ञान म्हणजे सत्याचा शोध असतो. वैज्ञानिक दृष्टिकोनाशिवाय सत्याचा शोध घेता येत नाही. अंधश्रध्दा, दैववाद आणि अबौध्दिकता व भय यावर मात करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन उपयोगी पडतो. यासाठी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक पध्दतीचे स्वरूप समजावून सांगितले पाहिजे. चिकित्सा व पडताळणी केल्याशिवाय कोणताही व कोणाचाही विचार स्वीकारावयाचा नाही, अशी त्यांना सवय लावली

पाहिजे. बुध्दी आणि अनुभव यांच्या निकषावर जे टिकते ते सत्य (True) व यावर जे टिकणार नाही ते असत्य (False) म्हणून स्वीकारावे अशी भूमिका त्यांच्यात रुजविली पाहिजे. पारंपरिक समाजाला आधुनिक बनविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन साह्यभूत ठरतो.

**समायोजन क्षमता**

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी समायोजन क्षमता आवश्यक आहे. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेणे म्हणजे समायोजन. प्रतिकूल परिस्थितीच्या विरूध्द संघर्ष करुन पुढे जाणे आणि अनुकूल परिस्थितीचा लाभ उठविणे हे समायोजनामुळे शक्य होते. समायोजनामुळे व्यक्तिला स्वत:च्या मर्यादा व सामर्थ्यस्थाने ओळखता येतात. अवास्तव आशा आकांक्षा आणि स्वप्नांना मुरड घालता येते. वास्तवाची जाणीव होते. व्यक्ती वैफल्य, निराशा व चिंता यावर मात करु शकते. ती कोणत्याही परिस्थितीत स्वत: मानसिक तोल ढळू देत नाही. व्यक्तीने शांत, स्थिर, संयमी आणि अविचल वृत्तीने जीवन जगावयास शिकले पाहिजे. तिला सुख आणि दु:ख या दोन्ही स्थितीत प्रसन्न वृत्तीने जगता आले पाहिजे. या सर्व वृत्ती शिक्षणातून विद्यार्थ्यांत विकसित केल्या पाहिजेत.

**फावल्या वेळेचा उपयोग**

मानवी जीवनामध्ये फावल्या वेळेला महत्त्वाचे स्थान आहे. दैनंदिन काम केल्यानंतर मिळणाऱ्या वेळेला फावला वेळ म्हणतात. या वेळेचा सद्उपयोग केल्यास तिला स्वत:च्या आवडीचे छंद जोपासता येतात. व्यक्तिमत्त्व विकासाला अनुकूल अशा अनेक क्रिया करता येतात. आणि सततच्या कामामुळे आलेला मानसिक व शारीरिक थकवा घालविता येतो. फावल्या वेळेतील क्रियामुळे व्यक्तीला तिच्या जीवनातील दु:ख, व्यथा व चिंता यांचा विसर पडतो. म्हणून विद्यार्थ्यांना शिक्षणातून फावल्या वेळेचा दुरूपयोग न करणे व सद्उपयोगासाठी कोणत्या क्रिया कराव्यात या संबंधी योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

आपल्या देशामध्ये गेल्या १००-१५० वर्षापासून शिक्षणासंबंधी सतत चर्चा व चिंतन चालू आहे. परंतु दुर्देवाने शिक्षणाची गुणवत्ता वाढीच्या व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दिशेने आपण अपेक्षित यश संपादन करू शकलो नाही. उलट दिवसेंदिवस शिक्षण प्रक्रिया बोथट होताना दिसत आहे. यामुळे आज शिक्षणात चिंतना सोबत प्रत्यक्ष कृतीची अधिक गरज आहे. शिक्षणाचा अर्थ आणि विविध घटक मूर्तरूपात आणण्यासाठी शासन, संस्था संचालक, कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालकांनी अंतर्मुख होवून निष्ठेने कार्य करण्याची गरज आहे. प्रत्येक महाविद्यालयानी महाविद्यालयामध्ये खालील किमान समान कार्यक्रम राबविल्यास शिक्षणाचा अर्थ आणि आशय मूर्त रूपात येण्यास साह्य होईल असे आम्हाला वाटते.

**गुणवत्ताधारक कर्मचारी**

महाविद्यालयामध्ये धर्म, वर्ण,जात,भाषा,प्रांत, लिंग असा संकुचित विचार न करता गुणवत्ता धारक प्राध्यापक आणि कर्मचारी यांची निवड केली पाहिजे. ज्ञानी व सद्गुणी अध्यापक व कर्मचारी वर्ग हा संस्थेचा आत्मा असतो. त्यांच्या कार्य व कर्तृत्वावर शैक्षणिक विकास अवलंबून असतो.

महाविद्यालयानी केवळ टोलेजंग इमारती उभारणे व त्यांची रंगरंगोटी करणे याकडे लक्ष देता कामा नये. महाविद्यालयातील ग्रंथालय व प्रयोग शाळा समृध्द व सर्व आधुनिक सुविधानी युक्त कशा होतील त्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. विविध शैक्षणिक साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत.

ग्रंथालयामध्ये सर्व विषयांची दर्जेदार क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, ज्ञानकोश, विविध विषयाच्या संशोधन पत्रिका उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. प्रयोगशाळेत आवश्यक पुरेशी उपकरणे व साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. त्या शिवाय अध्यापन व अध्ययन अर्थपूर्ण होवू शकणार नाही. विद्यापीठामध्ये 'ग्रंथालय व प्रयोगशाळा विकास कक्ष' निर्माण करावा. या कक्षाद्वारे सर्व संलग्न महाविद्यालयीन ग्रंथालय व प्रयोगशाळा यांची तपासणी करावी. जो निधी आहे तो याकामासाठी वापरला आहे की नाही ते पहावे. महाविद्यालयांना ग्रंथालय व प्रयोगशाळा विकासासाठी संधी द्यावी. त्यांनी संधी देवूनही यात सुधारणा नाही केल्यास त्यांचे संलग्नीकरण सुधारणा करेपर्यंत रोखून धरावे.

आज बहुसंख्य महाविद्यालयामध्ये अध्यापन कार्य प्रभावी व परिणामकारक पध्दतीने होत नाही. विद्यापीठाने अध्यापन व्यवस्थित होण्यासाठी त्याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. यासाठी विद्यापीठाने प्रत्येक जिल्ह्यातील 'अध्यापन निरीक्षण पथक' निर्माण करावे. या पथकांनी महाविद्यालयांना अचानक भेटी देवून या कार्यासंबंधीचा सत्य अहवाल विद्यापीठास पाठवावा. अध्यापन व्यवस्थित करण्यासाठी समविचारी व समव्यवसायी मित्रांशी सतत संवाद साधावा. प्राध्यापक संघटनांशी चर्चा करुन या कामी सहकार्य घ्यावे. प्रत्येक वर्षाच्या प्रारंभी अध्यापन कार्य उत्तम रितीने कसे होईल याची चर्चा करण्यासाठी संस्था संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, संघटनेचे पदाधिकारी, निवडक विद्यार्थी व पालक यांची जिल्हास्तरीय बैठका घ्याव्यात.

महाविद्यालयांनी वर्षारंभीच पालक आणि विद्यार्थी यांची बैठक आयोजित करावी. या बैठकीत त्यांना अभ्यासक्रम, वार्षिक परीक्षेतील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अभ्यास कसा करावा, त्यांच्या अडचणी, शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी व पालक यांची भूमिका आदी विषयावर मार्गदर्शन करावे. महाविद्यालयानी विद्यार्थी व पालकाशी सतत संवाद व संपर्क साधला पाहिजे. प्रत्येक प्राध्यापकांना विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्यासाठी १०-१५ विद्यार्थ्यांचे पालकत्व त्यांच्याकडे द्यावे. पालकांना त्यांच्या पाल्यांच्या परीक्षेतील प्रगतीचा व त्यांच्या व्यक्तिमत्वातील गुणदोषांचा व प्रगतीचा अहवाल पाठवावा. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद ठेवण्यासाठी प्रगती नोंद रजिस्टर ठेवावे. त्यात विद्यार्थ्यांच्या आवडी निवडीसह सर्व बायोडाटा असावा.

महाविद्यालयानी वर्षारंभी सर्व प्राध्यापकांची बैठक घ्यावी. त्यात अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन, विविध उपक्रम त्यांच्या अंमलबजावणीची दिशा या संबंधी चर्चा करावी. महाविद्यालयाने प्राध्यापकांना अभ्यासक्रम व विविध उपक्रमात प्रयोग करण्यासाठी स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांना त्यांच्या आवडी प्रमाणे कामे द्यावीत. त्यांचे अध्यापन कौशल्ये विकसित करण्याकडे लक्ष घ्यावे. जे अध्यापनात कमी पडतात त्यांना तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन उपलब्ध करुन द्यावे. त्यांना परस्परांच्या पाठांचे निरीक्षण करण्याची संधी द्यावी. सेवातंर्गत प्रशिक्षणाची सोय करावी. विषयानुसार तज्ज्ञ अभ्यासकांची त्या त्या विषयातील अभ्यासक्रमावर आधारित व्याख्याने आयोजित करावीत. यामुळे प्राध्यापकांच्या अध्यापनाचा गुणात्मकस्तर उंचावला जावू शकतो.

महाविद्यालयानी सर्व वर्गातील विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे हुशार, मध्यम आणि कनिष्ठ गट अशा तीन गटात विभागणी करावी. कमी गुणांच्या कनिष्ठ गटातील मुलांना अभ्यासासाठी प्रेरित व प्रोत्साहित

करावे व हुशार मुलांना सखोल व मुलभूत स्वरूपाचे मार्गदर्शन करावे. त्यामुळे सर्व गटातील मुलांची चांगल्या प्रकारे तयारी करवून घेता येईल. वार्षिक परीक्षेत अधिक यश मिळवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून त्याच्या विषयांच्या किमान ४-५ वार्षिक परीक्षेच्या प्रश्न पत्रिका सोडवून घ्याव्यात. विद्यार्थ्यांकडून विविध प्रश्न पत्रिका सतत सोडवून घेणे अधिक गुण संपादनासाठी उपयुक्त ठरते.

महाविद्यालयामध्ये विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी बौध्दिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण केले पाहिजे. त्यासाठी महाविद्यालयात विचारवंत व साहित्यिक यांची ये - जा वाढली पाहिजे. यासाठी महाविद्यालयामध्ये वर्षातून किमान कोणत्यातरी एका विषयाची राज्यस्तरीय परिषद, समाजाच्या ज्वलंत अशा एखाद्या प्रश्नावर विभागीय वा राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करावे. महाविद्यालयाने प्रतिवर्षी नियमितपणे महाविद्यालयामध्ये सलग ३-४ दिवसाची व्याख्यानमाला आयोजित करावी. त्यामुळे विद्यार्थी, प्राध्यापक आणि त्या परिसरातील नागरिकांना विविध प्रश्नाचं स्वरुप समजून घेण्यास मदत होईल. ते त्या प्रश्नासंबंधी विचार करण्यास प्रवृत्त होतील. त्या परिसरामध्ये लोकशिक्षण व समाज प्रबोधनाची प्रक्रिया गतीशील होईल.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी 'व्यक्तिमत्त्व विकास केंद्राची' स्थापन करावी. या केंद्रामार्फत व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ? व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणीचे घटक व मार्ग, आंतरिक व बाहय व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा करावा. समायोजन म्हणजे काय ? आदी विषयावर तज्ज्ञांनी व्याख्याने आयोजित करावीत. महाविद्यालयाने प्रत्येक वर्षी १०० विद्यार्थ्यांचे नेतृत्व, लेखन व उद्योजकता आदि शिबीरांचे आयोजन करावे. यात मान्यवर विविध पक्षाचे नेते साहित्यिक आणि उद्योगपती व व्यापारी यांना निमंत्रित करून नेतृत्व म्हणजे काय ? नेत्याचे गुण व कार्य, नेत्यांची भूमिका, ललित व वैचारिक लेखन प्रक्रियेचे स्वरूप, लेखक होण्यासाठी कोणते गुण व कौशल्ये आवश्यक असतात, उद्योग व व्यापारासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते, यातील अडचणी त्यावर मात कशी करावी, रोजगाराच्या विविध संधी व मुलाखत कशी द्यावी, आदि विषयांवर व्याख्याने आयोजित करावीत.

महाविद्यालयामध्ये 'कलागुण विकास केंद्राची' स्थापन करावी.महाविद्यालयानी वर्षारंभीच विद्यार्थ्यांना कोणत्या कलांमध्ये अभिरूची आहे, त्याची एका फॉर्म मध्ये माहिती भरुन घ्यावी. त्या माहितीच्या आधारे साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, क्रीडा या आधारे विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत व त्या त्या गटातील विद्यार्थ्यांना त्या त्या कलांच्या क्षेत्रातील तज्ज्ञ व कलावंतांना निमंत्रित करुन तीन-चार दिवसांचे प्रशिक्षण द्यावे. महाविद्यालयामध्ये प्रत्येक विषयांची अभ्यास मंडळे स्थापन करावीत. त्याव्दारे व्याख्याने, चर्चासत्रे, विद्यार्थ्याचा सहभाग असलेले सेमिनार यांचे आयोजन करावे. महाविद्यालयात वक्तृत्व क्लब ची स्थापना करुन वक्त्यांचे गुण, वक्तृत्व विकासासाठी प्रयत्नांची दिशा आदीवर ख्यातनाम वक्त्यांची भाषणे आयोजित करावीत.

महाविद्यालयामध्ये 'वाचन मंडळाची' स्थापना करावी. या मंडळाव्दारे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, कोणती पुस्तके वाचावीत व ती कशी वाचावीत या संबंधी मार्गदर्शन करावे. वर्षारंभीची प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील किमान १०-१५ अभिजात ग्रंथाची नावे लिहून द्यावीत. अभिजात ग्रंथ वाचनाचा उपक्रम राबवावा. प्रसिध्द साहित्यिक व

विचारवंत यांना निमंत्रित करून त्यांच्या ग्रंथनिर्मितीच्या प्रक्रियेसंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. ग्रंथ परीक्षण स्पर्धा आयोजित करावी. या विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथवाचनाची सवय विकसित होईल. ग्रंथवाचन ही सर्वात चांगली व अत्यंत उपयुक्त सवय आहे, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले पाहिजे.

महाविद्यालयामध्ये 'साने गुरुजी संस्कार केंद्र' सुरु करावे. या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना नैतिक व सामाजिक मूल्ये आणि भारतीय घटनेच्या उद्देश पत्रिकेतील मूल्ये आणि तत्त्वे यांची माहिती द्यावी त्यांना चारित्र्य संपन्न व्यक्तीचा परिचय करून द्यावा.

**महाविद्यालय तेथे वसतिगृह**

महाविद्यालय तेथे वसतिगृह ही कल्पना राबविली पाहिजे. प्रत्येक महाविद्यालयांनी किमान ५० ते ६० गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क निवास व भोजनाची सोय असलेले वसतिगृह चालवावे. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि परिसरातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या मदतीने 'महात्मा फुले दत्तक योजना' राबवावी. त्यांना १० ते १५ गरिब विद्यार्थ्यांचे पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी दत्तक घेण्यासंबंधी विनंती करावी. परिसरातील उद्योगपती, व्यापारी आणि श्रीमंत व्यक्ती यांची मदत घेवून किमान १० लाख रू. निधी जमवावा. संकलित निधी बँकेत कायम ठेव स्वरूपात ठेवावा. त्याच्या व्याजातून येणाऱ्या पैशाद्वारे 'कमवा व शिका' ही योजना राबवावी. या उपक्रमामुळे दारिद्रयामुळे न शिकणाऱ्या मुलांना शिक्षणाची संधी मिळेल. हा प्रयत्न म्हणजे सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेले कृतीशील पाऊल ठरेल.

प्रत्येक महाविद्यालयानी हा किमान कार्यक्रम राबविल्यास उच्च शिक्षणाचे ध्येय साध्य होण्यास मदत होऊ शकेल. यामुळे शिक्षणाचे ध्येय व प्रत्यक्ष शिक्षण व्यवहार यात वाढलेले अंतर कांही प्रमाणात कमी होईल, असे आम्हास वाटते.

# आजचे तंत्रशिक्षण : व्यवसाय व उद्योगांची आव्हाने

**रविंद्र वैद्य**

*लेखक एक यशस्वी नामवंत उद्योजक आहेत. आमच्या संस्थेचे ते गुणवंत माजी विद्यार्थी असून चांगले लेखक-संपादक आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ते औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभ्यासमंडळाचे सदस्य आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी समकालीन तंत्रशिक्षणातील दोष-त्रुटी संदर्भाने साधार चर्चा करतांना बेरोजगारीला कारक असलेल्या उद्योगक्षेत्र व अकादमीतील विसंवादाची केलेली नोंद अर्थपूर्ण आहे.*

---

आजमित्तीला भारतात मिळणारे तंत्रशिक्षण हे साधारणतः तीन स्तरावर विभागले गेले आहे.

१) ITI किंवा Vocational education देणाऱ्या संस्था

२) Diploma Engineering (तंत्रनिकेतन संस्था)

३) पदवी व पदव्युत्तर अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्था.

हया प्रत्येक स्तरांवर काम करणाऱ्या संस्था सुध्दा वेगवेगळ्या प्रकारात वर्गीकृत करता येतात. उदा. खाजगी / सरकारी, स्वायत्त व विद्यापीठाशी संलग्न, राष्ट्रीय स्तरांवरील संस्था, केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच खाजगी उद्योगांनी पुरस्कृत केलेल्या संस्था. तंत्रशिक्षण देणारी संस्था, ती कोणत्याही स्तरावर काम करणारी असो किंवा कुठल्याही वर्गीकृत प्रकारात बसणारी असो तिचे ध्येय आपल्या स्तरांवरील कुशल तंत्रज्ञ घडविणे हेच असते, असले पाहिजे. काही राष्ट्रीयस्तरावरील संस्था IIT, NIT व फारच थोड्या सरकारी व खाजगी संस्था वगळता बाकी संस्था या तंत्र शिक्षणाची उद्दिष्ट पूर्ण करतात का ? ध्येय पूर्ण करतात का हाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

दरवर्षी भारतात साधारणपणे बारा ते पंधरा लाख विद्यार्थी अभियांत्रिकी (डिग्री व डिप्लोमा) शिक्षण घेऊन व्यावसायिक जगात म्हणजे प्रोफेशन करियरला सुरुवात करतात.

श्री सुब्रतो बागची (एक यशस्वी उद्योजक व motivational speaker / writer) यांनी प्रोफेशनल शब्दाची सुरेख व्याख्या त्यांच्या The Professional हया पुस्तकात दिली आहे. There are three qualities that make someone a true professional. These are the ability to work unsupervised, ability to certify the completion of job or task and finally the ability to behave with integrity at all times.

दरवर्षी पदवी / पदविका घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणेच आपले प्रोफेशनल करियर व्यतित करणाऱ्या किंवा स्वतःला प्रोफेशनली qualified समजणाऱ्या पैकी किती जण श्री. बागची यांनी केलेल्या व्याख्येच्या परिघाजवळपास तरी येतात का ? हा संशोधनाचा विषय आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस जास्त ठळकपणे जाणवत असल्याने समाजात सर्व स्तरावर शिक्षण पध्दतीच्या उपयुक्ततेविषयी चर्चा

होताना आढळते.

विविध औद्योगिक संघटना (CII, FICCI, ASSOCHEM) काही समाजसेवी संस्था NGO विचारवंत एवढेच नव्हे तर खुद्द मनुष्यबळ विकास मंत्रालय व त्या अंतर्गत येणारी विविध खातीसुध्दा प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धता आणि उद्योग व्यवसायाच्या संदर्भात त्याची उपयुक्तता याविषयी चिंतीत आहेत.

Aspiring minds नावाच्या NGO संस्थेने केलेल्या पाहणीनुसार अभियांत्रिकी महाविद्यालयातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी सात टक्के एवढेच अभियंते नोकरी मिळविण्यास पात्र आहेत असे निदर्शनास आले आहे. तोच निष्कर्ष साधारणपणे ASSOCHEM या संघटनेच्या पाहणी अहवालात आहे. ह्याच अहवालात असे ही नमूद करण्यात आले आहे की, Tier I शहरातून पास झालेल्या अभियंत्याची Employability ही Tier II व Tier III शहरातून पास झालेल्या अभियंत्यापेक्षा थोडी बरी किवा चांगली आहे. तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रातील शिक्षणसंस्थावर देखरेख करणारी व ह्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे बनविणारी सर्वोच्च शिखर संस्था म्हणजे AICTE (All India Council for technical education) सुध्दा ह्याविषयी जागरूक असून Employability वाढविण्यासाठी काही नवीन उपक्रम व उपाययोजना करीत आहे. त्याचा उहापोह लेखाच्या उत्तरार्धात येईलच.

व्यावसायिक शिक्षण म्हणून अभियांत्रिकी शिक्षण घ्यायचे आणि शिक्षण पूर्ण केल्यानंतर (नोकरी मिळविण्यास पात्र नाही) Employability नाही म्हणून नोकरी नाही असे विरोधाभासी चित्र उभे राहते. म्हणजेच आजचे शिक्षण किंवा शिक्षणपध्दतीमुळे नोकरीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत असे म्हणावेसे वाटते.

कुठलीही समस्या असली की ती का निर्माण झाली हे बघितले की त्यावर उपाय शोधता येतो. आजच्या नोकरीच्या समस्येला केवळ शिक्षण / शिक्षणपध्दती जबाबदार आहे. असे नमूद केले जाते परंतु इतर घटक ही समस्या निर्माण होण्यास कारणीभूत आहेत. जसे की समाजातील मानसिकता. आता ही अशी मानसिकता समाजाची कशी तयार झाली ? त्याकरिता आपल्याला थोडे इतिहासात डोकावून बघावे लागेल.

आपली शिक्षणपध्दती ही ब्रिटिशांची देण आहे. मॅकॉलेच्या पॉलिसीनुसार कारकून किंवा नोंदी ठेवण्याकरिता स्थानिक भारतीयांचा वापर करता यावा ह्या हेतूने तयार केलेली आहे. थोड्याफार बदलानंतर आपण आजही तीच पध्दती अवलंबीत आहोत. स्वातंत्र्यानंतरही एखादी व्यक्ती मॅट्रीक झाली की त्यास पट्कन सरकारी नोकरी मिळत असे व त्याच्या कुटूंबियाला स्थैर्य प्राप्त होत असे. त्यामुळे समाजातील प्रत्येक जण ह्या पध्दतीत शिक्षण घेऊन सरकारी नोकरीच्या मागे धावत असे. एवढेच नाही तर आजही तीच परिस्थिती आहे. फक्त मॅट्रीक ऐवजी डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट तसेच पीएच.डी. हे qualification सरकारी नोकरी मिळविण्यासाठी कमावले जातात.

एवढी सगळी सुशिक्षितांची फौज जर सरकारी, निमसरकारी नोकऱ्यांच्या मागे धावत राहिली तर सरकार तरी एवढ्या सगळ्यांना कुठे नोकऱ्या देऊ शकणार ? मग सरकारी नाही तर मोठ्या आस्थापनामध्ये नोकरीसाठी जीवापाड प्रयत्न करणे ही जगण्याची कसोटी झाली. हल्ली समाजाची मानसिकता झाली आहे की आपण किंवा आपले पाल्य ह्यांनी फक्त White collored job च करावा.

आणि ह्या सगळ्या प्रवासात आपण आपल्या

इतिहासात असलेली भारतीय समाजातील उद्योजकताच विसरून बसलोय. ब्रिटीश किंवा ईस्ट इंडिया कंपनी येण्यापूर्वी भारताचा जागतिक बाजारात जवळपास २६% एवढा वाटा होता तो केवळ त्यावेळेस समाजात असलेल्या उद्योजकतेच्या जोरावर. तोच वाटा आज फक्त २ ते ३% आहे.

एवढेच नव्हे तर आपण भारतीयांच्या अंधानुकरण करण्याच्या वृत्तीमुळे श्रमाला प्रतिष्ठा देणारे व्यवसाय Artisonship किंवा समाजाच्या गरजा भागविणारे व्यवसाय स्वीकारायला नकार देत राहिलो. आज परिस्थिती अशी आहे की, एकीकडे white collored job साठी सुशिक्षित बेकारांची फौज धावाधाव करतेय आणि दुसरीकडे उत्पादक कामाला Support Service Sector मध्ये शेतीमध्ये कामाला हात मिळत नाहीत. आजकालचे इंजिनियर्ससुध्दा shop floor वरील काम करण्यास नाखूष असतात.

ब्रिटीश राजवटीत समाजाच्या मानसिकतेत झालेल्या बदलाबरोबरच सद्य परिस्थितीत शिक्षणाचे झालेल्या बाजारीकरणामुळे बेकारीच्या समस्येने रौद्ररूप धारण केले आहे. शिक्षणाच्या बाजारीकरणाचे मुळ शिक्षणाचे खाजगीकरण करावे ह्या पॉलिसीत नसून तिची अंमलबजावणी करतांना झाले.

१९८३ पासून विशेषत: खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांना परवानगी देण्याचे ठरले. कारण सरकारची प्राथमिकता ही प्राथमिक शिक्षणाला होती व आहे. उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण हा विषय सरकारच्या यादीत कमी प्राधान्याचा असल्याने म्हणावा तसा निधी ह्या क्षेत्रासाठी उपलब्ध होऊ शकला नाही. पण अर्थव्यवस्थेची मागणी पाहता उच्चशिक्षीत व अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या मनुष्यबळाची कमतरता जाणवत होती. म्हणून यासाठी खाजगीकरणाचा मार्ग पत्करला गेला.

काही सन्माननीय अपवाद वगळता ह्या मार्गाचा दुरूपयोग होऊन शिक्षणाचा बाजार मांडला गेला. अर्थव्यवस्थेची प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी लक्षात न घेता, ते केवळ आपल्या हितसंबंधितांना एक नवीन व्यवसाय किंवा पैसा कमवायचे साधन उपलब्ध करुन देण्याकरिता नवी व्यवस्था वापरत होते. तसेच राजकीय समीकरणाचे गणित जमविण्याकरिता भरमसाठ महाविद्यालयांना परवानग्या देण्यात आल्या. हे किती मोठ्या प्रमाणात  झाले असेल ह्याचा अंदाज घेण्यासाठी आपण आपली तुलना USA च्या अर्थव्यवस्थेबरोबर करु. USA ची अर्थव्यवस्था म्हणजे GDA च्या भाषेत 20 trillion USD आहे आणि ह्या तुलनेत अभियांत्रिकी पदवीधर होणाऱ्याची संख्या दरवर्षी दोन लाख चौतीस हजार आहे. भारताचा GDP 2.8 trillion USD आणि इंजिनियर्सची संख्या १२ ते १३ लाख प्रतिवर्षी आहे. ह्याचा अर्थ आपल्यापेक्षा सातपट मोठी असलेली अर्थव्यवस्था आपल्या तुलनेत २३% इतकेच इंजिनिअर्स सामावून घेऊ शकते. ह्यावरून आपल्याकडे किती गोंधळ आहे याची कल्पना न केलेली बरी.

ज्यांना ज्यांना कॉलेज उघडण्याची परवानगी मिळाली त्यांनी तर परवानगीपासून ते Building, infrastructure, Laboratories, workshop मध्ये पैसा गुंतवला. नवीन महाविद्यालय म्हणजे Industry टाकणे असे समजून व्यवसाय केला गेला. त्यामुळे स्वाभाविकपणे Return Investment झालीच पाहिजे. ह्याकरिता येनकेन प्रकरणे कमविणे कमविलेल्या पैसा बँकेचे कर्ज फेडण्याकरिता किंवा स्वत:चे टाकलेले पैसे काढून घेणे हयाच उद्देशाकरिता वापरल्या गेला.

याचा परिणाम म्हणून खाजगी संस्थांच्या प्रयोगशाळामध्ये अद्ययावत यंत्रे उपकरणे आलीच

नाहीत. उलटपक्षी विविध अशा आवश्यक खर्चातही काटकसर करणे उदा. Faculty चे पगार असतील. Faculty training असेल infrastructure वर येणारा खर्च असेल हाच उद्योग चालू राहिला.

त्यात भर म्हणजे Regulatory व monitoring अधिकार असलेल्या संस्थांनी व सरकारी खात्यांनी ह्याकडे कानाडोळा केला. अशा परिस्थितीत असल्या संस्थामधून बाहेर पडणाऱ्या तंत्रज्ञानाबद्दल अथवा त्यांच्या Employability बद्दल काय बोलणार.

साधारणत: हीच परिस्थिती व्यवस्थापन शास्त्रातील पदवी व पदविकाधारकांची आहे. तसेच Pharmacy courses केलेल्या तंत्रज्ञाची आहे. म्हणजेच तांत्रिक मनुष्यबळाची मागणी व पुरवठयाच्या गणिताचा ताळमेळ चुकल्याने व समाजाची मानसिकता ही पांढरपेशी नोकरी करण्याची असल्याने बेकारीची समस्या भीषण बनते आहे.

महत्त्वाचे म्हणजे उद्योगाला लागणारी कुशलता (skills) शिक्षण पध्दतीत शिकवली जात नाही. तसेच अभ्यासक्रमात शिकवले जाणारे तंत्रज्ञान व उद्योगात लागणारे तंत्रज्ञान ह्यात मोठी तफावत आहे. प्रात्यक्षिकांचा अभाव हे ही एक महत्वाचे कारण Employability वर परिणाम करणारे ठरते.

शिक्षण व रोजगार ह्यातील गॅप कमी करण्यासाठी उपाय योजना

१) सर्व प्रथम सद्यपरिस्थितीत उद्योगाच्या गरजा समजून घेऊन त्याचा अभ्यासक्रमामध्ये अंतर्भाव करायला पाहिजे. हे स्वायत्त संस्थांना सहज शक्य आहे. जी महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत त्यांनी co-curricular activities मधून उद्योगाला लागणारे उपक्रम राबविले पाहिजे.

२) विद्यार्थ्यांना Industrial exposure मिळवून देण्याकरिता वेगवेगळ्या Industries बरोबर M.O.U. करुन दुसऱ्या वर्षापासूनच Industrial visit घडवून आणायला पाहिजेत.

३) विविध विषयांतील तज्ज्ञ व औद्योगिक अस्थापना ह्यांच्या सहकार्याने वेगवेगळ्या विषयावरील finishing schools चे आयोजन केले पाहिजे. शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद व पुणे ह्यांनी Mercedes Berg. बरोबर केलेल्या finishing school चा आवर्जुन उल्लेख करावा वाटतो. Automobile Maintainance & Servicing हया विषयात मर्सिडिजने एक परिपूर्ण लॅब उभी करुन दिली व आपल्या दोन गाड्या दोन्ही तंत्रनिकेतनला दिल्या. दरवर्षी प्रत्येक ठिकाणी २० विद्यार्थी ह्या कोर्सचा फायदा घेतात. गेल्या तीन वर्षापासून तयार झालेले ६० (औरंगाबाद) व ६० (पुणे) असे १२० तंत्रज्ञ प्रशिक्षीत झाले व सर्वांना आज चांगल्या पगाराची नोकरी आहे तर तीन जन परदेशात गेले आहेत.

४) विद्यार्थ्यांना soft skill चे (team work, communication skill, presentation skill, problem solving attitude) चे महत्त्व पटवून ती develop करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. ह्या अनुषंगाने एक उदाहरण समजावून घेणे आवश्यक ठरते. एका Multinational company campus interview घेऊन साधारणत: १० जण शॉर्टलिस्ट केले. निवड समितीत मी ही होतो. त्यापैकी तीन जनाची नावे तीन जागां करिता कंपनीच्या M.D. कडे पाठविली. त्यापैकी एक उमेदवार अपात्र ठरला. नंतर कळाले की त्याच्या Biodata मध्ये त्याने hobbies मध्ये Book reading, viewing movies आणि Games you play मध्ये Table tennis व Chess असे लिहिले होत. त्याच्यात Team working Leader qualities चा अभाव असल्याने नोकरीस मुकावे लागले. Soft Skills विकसित करण्यासाठी

Co-curricular व extracurricular activities चा समावेश करावा. शक्य असल्यास काही मार्कस् अथवा ग्रेड दिल्यास त्याचा प्रोत्साहनपर उपयोग होईल.

५) जशी डॉक्टरांना Internship करणे सक्तीचे असते, तसेच आता इंजिनियरला सुध्दा सहा महिन्याची internship एखादया factory मध्ये करणे सक्तीचे केले आहे. हा बद्दल Polytechinque साठी June २०१९ पासून व Engineer साठी June २०२० पासून अंमलात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना factory working culture चा अनुभव येईलच. पण त्याच बरोबर Advance Polytechinque ज्या अभ्यासक्रमात असतात पण कॉलेजमध्ये बघावयास मिळत नाहीत अशा यंत्रांची माहिती, त्यांची working ह्यासंबंधीची कल्पना येऊन जो गॅप academic व Industry factory मध्ये असल्याचे बोलले जाते तो कमी करण्यास मदत होईल. Factory व्यवस्थापनातील काही महत्त्वाचे पैलू ज्याचा अभ्यासक्रमात केवळ उल्लेख असतो उदा १५-१५, Kaizely TPM, 72C tools असे पैलू प्रत्यक्ष वापरात असलेले अनुभवता येईल. ह्याच काळात Project पूर्ण करून Hands on चा अनुभव मिळवता येईल.

६) प्राध्यापकांनाही Industrial exposure सक्तीचे करावे. म्हणजे संबंधित विषय शिकवताना त्या विषयावरील trends त्या संबंधी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेल.

७) उद्योजकता व उद्योजकता विकास ह्या विषयाचा अभ्यासक्रम सक्तीचा असावा.

८) Value Education किंवा Ethical values अशा आशयाचाही विषय अभ्यासक्रमात असावा.

९) अकरावी बारावीपर्यंत ज्या पध्दतीने अभ्यास केला तशाच पध्दतीने प्रोफेशनल कॉलेजमध्ये अभ्यास केल्यास Basics किंवा Fundamental concepts clear होत नाहीत व चांगले गुण मिळूनही पुढील Career मध्ये म्हणावे तसे यश मिळत नाही. ह्याकरिता How to study and attain soft skill for Personality development असा विषय पहिल्याच वर्षी अभ्यासक्रमात असावा. Ph.D. ला प्रवेश घेतल्यावर संशोधन सुरु करण्यापूर्वी Research methodology ह्याविषयाची परीक्षा देऊन पास व्हावे लागते त्याच धर्तीवर ही सूचना करावी वाटते.

भारत सध्या सर्वात तरूणांचा देश आहे. भारतात सध्या आणि येणाऱ्या काळातील आव्हाने सोडवणाऱ्या हातांची अधिक गरज आहे. पाण्याची वाढती गरज, स्त्रोतांची घटणारी संख्या, पर्यावरणविषयक समस्या, वाढते शहरीकरण, ऊर्जा समस्या अशा सर्व समस्यांची जाणीव करुन घेण्याबरोबर त्यावर उपाययोजना करण्यासाठी अभिनव व कल्पक मार्गांचा अवलंब करण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी. त्याचबरोबर हे उपाय अत्यंत अल्प खर्चाचे असून येणाऱ्या काळातील सुविधा सुलभ बनवतील असे असावे त्यासाठी लागणारे कुतुहूल, उत्साह व योग्य ती क्षमता देण्याची व्यवस्था शिक्षण पध्दतीत यावी. तरच भारत तंत्रज्ञानाच्या जोरावर जगात आपला ठसा उमटवेल.

# स्त्रिया आणि अभ्यासक्रम

**डॉ. दिलीप चव्हाण**

*लेखक स्वा.रा.ती.म.वि. नांदेड येथे भाषा संकुलातील इंग्रजी भाषा व वाङ्मय विभागात प्राध्यापक आहेत. डाव्या व पुरोगामी चळवळीत ते विद्यार्थीदशेपासूनच सक्रिय आहेत. सूक्ष्म निरीक्षण, चिकित्सापूर्ण विश्लेषण व अभ्यासपूर्ण मांडणी इ. त्यांच्या लेखनाचे विशेष आहे. 'स्त्रिया आणि अभ्यासक्रम' या लेखात त्यांनी आधुनिक शिक्षणाद्वारे देखील विषमतेला अनुकूल अशा लिंगभाव संबंधाचे पुनरुत्पादन कसे होते याचा परामर्श घेतला आहे.*

---

एकोणिसाव्या शतकातील युरोपमधील शिक्षणविषयक चर्चा ही प्राय: शिक्षणाच्या प्रसाराविषयी अधिक झाली. सार्वत्रिक शिक्षणाद्वारे आधुनिक शिक्षणाचा प्रसार ही उगवत्या भांडवलदारी समाजाची अत्यावश्यक गरज होती. परंतु, औद्योगिक क्रांतीनंतरही दीर्घकाळ शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या भूमिकेसाठी भांडवलदार वर्ग तयार नव्हता. शिक्षणातून कामगार वर्गात विद्रोही मानसिकता तयार होईल आणि हा वर्ग बंड करेल ही भीती वारंवार व्यक्त केली गेली होती. असे धोरण हे भांडवलशाहीच्या विकासास अनुकूल नसले तरी भांडवलशाहीला कोणताही धोका राहू नये, या बचावात्मक भूमिकेतून हे धोरण स्वीकारले गेले होते. आधुनिक शिक्षणातील या सुप्तशक्तीचे योग्य असे व्यवस्थापन केल्यानंतरच (१८७० च्या आसपास) शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची भूमिका घेतली गेली. त्यासाठी विविध प्रकारच्या व्यूहनीतींद्वारे शिक्षणव्यवस्थेचे व्यवस्थापन केले गेले. या व्यवस्थापनाचा भाग म्हणून शिक्षणव्यवस्थेला अर्थपुरवठा करण्याचे धोरण पत्करून या व्यवस्थेला तिच्या रचना, आशय व स्वरूपासह संपूर्णपणे स्वत:च्या नियंत्रणात राज्यसंस्थेने आणले.

या काळात भांडवलशाहीच्या आर्थिक पैलूंचे सर्वात प्रगत असे आकलन डाव्या चळवळीतील अभ्यासकांनी सादर केले. परंतु याच काळातील डाव्या चळवळीचे शिक्षणविषयक आकलन हे दीर्घकाळ काहीसे भाबडेच राहिले, असा आरोप नव-मार्क्सवादी शिक्षणतज्ज्ञांनी केला आहे. भांडवलदार वर्ग कामगार वर्गाला शिक्षणापासून वंचित ठेवतो, अशी तक्रार डावे शिक्षणतज्ज्ञ साधारणपणे १९७० पर्यंत करीत राहिले; तर नंतरच्या मार्क्सवाद्यांनी भांडवलदार वर्गाने कामगार वर्गाला विशिष्ट असे शिक्षण दिल्यामुळे भांडवलदार वर्गावर हल्ला केला! शिक्षणविषयक विसाव्या शतकातील डाव्या (नव-मार्क्सवादी) शिक्षणतज्ज्ञांनी घडवून आणलेली चर्चा गुणात्मकदृष्ट्या भिन्न राहिली. सुरूवातीला डाव्या शिक्षणतज्ज्ञांनी भांडवलदार वर्ग कामगार वर्गाला शिक्षित करीत नाही असा सूर आळवला; तर भांडवली शिक्षणाचे प्रतिगामी रूप लक्षात आल्यानंतर आधुनिक भांडवलदारी शिक्षणाकडे कामगार वर्गावरील विचारप्रणालीत्मक हल्ला" म्हणून पाहिले गेले.
वर्ग संबंधांच्या पुनरुत्पादनात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते, असे १९७० च्या दशकात काही ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञांनी मांडायला सुरूवात केली.

इंग्लंडमधील आधुनिक शिक्षणाच्या इतिहासावर पुनर्दृष्टिक्षेप टाकून त्यांने असे मांडले की, १८७० नंतर जे शिक्षण कामगार वर्गाला दिले जात होते त्याद्वारे कामगार वर्गाचे शरणागतीकरण / गृहिणीकरण साधले गेले. आधुनिक शिक्षणाच्या प्रतिक्रांतिकारी स्वरूपाला योग्यपणे ताडून या शिक्षणतज्ज्ञांनी असे मांडले की, शिक्षणाचे प्रयोजन हे प्राय: उत्पादन व्यवस्थेच्या पूर्वअटींचे पुनरुत्पादन करणे हे राहिलेले आहे. यांमध्ये इतर अनेक अभ्यासकांव्यतिरिक्त अंतोनिओ ग्राम्शी, (इटली), पिअरीबॉर्डिऊ व लुई अल्थुझर (फ्रांस), मायकेल यंग, ज्यॉफ व्हिटी व पॉल विलीस (इंग्लंड), कॅलोस व लुंडग्रेन (इंग्लंड), सॅम्युअल बोवेल्स, हर्बट गिंटीस व मायकेल ॲपल (अमेरिका), पाऊलो फ्रेअरी (ब्राझील) आणि अ. रा. कामत व कृष्ण कुमार (भारत) यांचा समावेश होतो.

नव–मार्क्सवादी शिक्षणतज्ज्ञांप्रमाणेच स्त्रीवादी शिक्षणतज्ज्ञांनीदेखील आधुनिक शिक्षणाद्वारे विषम अशा लिंगभावात्मक संबंधांचे पुनरुत्पादन कसे होते हे मांडायला सुरूवात केली. या स्त्रीवाद्यांमधील मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी विशेषत: याविषयीची मांडणी अधिक प्रभावीपणे केली. वर्गाधिष्ठित अ लिंगभावप्रभावित व्यक्तित्वाची रचना शिक्षणाद्वारे कशी केली जाते हे त्यांनी मांडावयास सुरूवात केली. लिंगभावात्मक भेद हे समाजातील वस्तुनिष्ठ भेदरचना किंवा संरचनात्मक आकृतीबंध यांकडे दुर्लक्ष करून मुख्यत: व्यक्तिगत स्वभाववैशिष्ट्यांशी जोडणाऱ्या उदारमतवादी स्त्रीवाद्यांपेक्षा किंवा सत्तेचे प्रकटीकरण हे प्रामुख्याने भाषिक व्यवहारात आकाराला येते. या उत्तरसंरचनावादी मांडणीपेक्षा मूळार्थाने भिन्न अशा स्वरूपाची मांडणी करून मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी आधुनिक शिक्षण हे प्राय: भांडवलशाहीच्या आणि त्यासोबतच पितृसत्तेच्या उत्पादनाच्यादेखील पूर्वअटीचे पुनरुत्पादन करीत असते, असे मांडले.

पिअरि बॉर्डियु यांच्या सामाजिक व्यवस्थेच्या सातत्याची (constancy of structure) हमी कशी मिळवली जाते, या विश्लेषणाशी जुळवून घेवून भांडवलशाहीच्या आणि पितृसत्तेच्या अस्तित्वाबाबतचे ठोकळेबाज विश्लेषण देण्याऐवजी आणि या व्यवस्थांना थेट परिणामस्वरूप न पहाता त्यांमधील प्रक्रियांचा अभ्यास करणे व त्यांची उकल करणे मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी पसंत केले.

सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी उदारमतवादी शिक्षणाची उपलब्धता आणि अनुरूप शिक्षण प्रकल्प व आदर्श प्रारुपे हे पुरेसे आहेत, अशा काही स्त्री अभ्यासकांच्या जुजबी धारणांपासून फारकत घेवून मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी शिक्षणाचा अभ्यास सामाजिक संरचनेच्या संदर्भात करण्याची भूमिका घेतली. ही भूमिका अधिक मूलगामी स्वरूपाची आहे. शिक्षणक्षेत्र हे स्वायत्त न मानता या क्षेत्राकडे व्यापक सामाजिक सत्तेच्या आणि सांस्कृतिक क्षेत्राच्या अनुरोधाने बघणे आणि त्याचप्रमाणे शिक्षणाला लिंगभाव, वंश, वर्ग यांच्या पुनरुत्पादनाचा अविभाज्य भाग त्यांनी मानले.

या दोन्ही प्रवाहांनी शिक्षणाची चर्चा ही उपलब्धता व विस्तार इथपर्यंत सीमित न करता अभ्यासक्रमविषयक चर्चेला प्रारंभ केला आणि ही चर्चा प्रभुत्वशाली विचारप्रणाली आणि विषम सत्तासंबंधांच्या संदर्भात केली. जनमानसाच्या व्यवस्थापनाचा भाग म्हणून आधुनिक भांडवलदारी वर्गाने अभ्यासक्रमाच्या आशयाच्या व्यवस्थापनाची भूमिका घेतली. विशेषत: पाठ्यपुस्तक निर्मितीच्या प्रक्रियेवर नियंत्रण प्रस्थापित करून व तिच्याप्रती जनमानसात व्यापक अशी अधिमान्यता व स्वीकृतीची भावना निर्माण करून पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम

हे स्वीकारार्ह बनविले गेले. अभ्यासक्रमात व्यक्त केली गेलेली धेय-उद्दिष्टे आणि पाठ्यपुस्तकांद्वारे संक्रमित होत असलेली विचारप्रणाली ही आपल्या हिताची आहे, अशी धारणा आधुनिक काळात पालकही बाळगायला लागले.

पाठ्यपुस्तक निर्मितीची प्रक्रिया सापेक्षत: स्वायत्त परंतु राज्यसंस्थेच्या अधीन ठेवून त्याद्वारे भांडवलदारी उत्पादन व्यवस्था आणि मूल्यरचना यांना अनुकूल अशा विचारांच्या प्रसाराच्या हमीचे असे अमोघ साधन पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून आधुनिक राज्यसंस्थेच्या हाती आले. अभ्यासक्रम व या अभ्यासक्रमाचे प्रकटीकरण ज्या पाठ्यपुस्तकांद्वारे होते त्या दोघांपैकी कोणतेही माध्यम हे मूल्यनिरपेक्ष किंवा पक्षपातविहीन नसते. ते प्राय: रचलित सामाजिक आकृतिबंध आणि वर्चस्व व दुय्यमपणा यांना अधिमान्यता बहाल करण्याचे कार्य करतात. अभ्यासक्रम किंवा पाठ्यपुस्तकांमधील ज्ञान हे विशिष्ट अशी निवड व संघटन यांतून रचले जाते. स्त्रीवादी अभ्यासकांनी पाठ्यपुस्तके ही प्राय: स्त्री व पुरुष यांच्या साचेबद्ध प्रतिमा कशा ठसवतात याचे विश्लेषण सादर केले आहे. जगभरातले गणितापासून इतिहासापर्यंतची पाठ्यपुस्तके विशिष्ट असे पुरुषी वर्चस्व आणि लिंगभाव दर्शविणारे राहिलेले आहेत.

एखादा समाज ज्या ज्ञानाला सार्वजनिक स्वरूप द्यायचे आहे त्या ज्ञानाची निवड, वर्गवारी, वितरण, संक्रमण, मूल्यमापन कसे करतो हा प्रश्न थेटपणे सत्तेशी जोडलेला असतो. शालेय अभ्यासक्रम हा ज्ञानाच्या विशिष्ट अशा निवडीचे फलित असल्यामुळे पाठ्यपुस्तकांतील ज्ञान हे सत्तेचे वाटप आणि सामाजिक नियंत्रणाची तत्त्वे प्रतिबिंबित करते, हे बासील बर्नस्टाईन यांचे आकलन महत्त्वाचे आहे. शालेय अभ्यासक्रम हे जाणीवपूर्वक घडवून आणलेल्या निवडीचा परिपाक असल्यामुळे पाठ्यपुस्तकातील ज्ञान हे सांस्कृतिक ज्ञान बनते आणि म्हणूनच शैक्षणिक संशोधनात अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांचे मूल्यमापन एकंदरच सत्तेची वीण समजून घेण्यासाठी आवश्यक बनते. मायकेल ॲपल यांनी असे दाखवून दिले आहे की, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील वर्चस्वशाली गट हे अधिमान्यता पावलेल्या शालेय ज्ञानावरदेखील आपल्या हितसंबंधांखातर वर्चस्व प्रस्थापित करतात. अर्थातच, समाजातील विविध दडपलेले वर्ग, वंश, जाती, स्त्रिया ह्यांच्याकडूनच्या अधिमान्यतेपोटी त्यांच्या आकांक्षा व जीवनानुभवांचादेखील सीमांती अंतर्भाव करून प्रभुत्वशाली गटांच्या छताखाली अशा आकांक्षा व जीवनानुभवांना सामावून घेतले जाते. उदाहरणार्थ, भाषेच्या पाठ्यपुस्तकातील एखादा शेवटचा धडा किंवा कविता ही दलित, शेतकरी, स्त्री लेखकाची असते ते यासाठीच.

शिक्षणविषयक चर्चा ही प्रामुख्याने पुरुष आणि मुलगे यांच्या शिक्षणाविषयी असते आणि अशा चर्चांमध्ये लिंगभाव आणि पौरुषत्वाबाबतचे मुद्दे यांच्याशी स्पष्टपणे टाळले जाते, अशी तक्रार स्त्रीवादी अभ्यासकांनी केली आहे. स्त्रियांच्या शिक्षणविषयक जी चर्चा सरकारकडून किंवा इतर पारंपरिक अभ्यासकांकडून होते तेव्हा ती प्रामुख्याने संख्यात्मक परिभाषेमध्ये होत असते. मुख्यत: शिक्षणाच्या कक्षेत अधिकाधिक स्त्रिया कशा येत आहेत, या दृष्टीने स्त्री शिक्षणविषयक बाजू मांडली जाते. तिसऱ्या देशांमध्ये अजूनही ही चर्चा ही स्त्री शिक्षणामध्ये कोणते अडथळे येतात इथपर्यंतच सीमित आहे.

साधारणपणे शैक्षणिक वर्तुळात जेव्हा स्त्रीप्रश्नाची चर्चा केली जाते तेव्हा ती प्रामुख्याने

साक्षरता / शिक्षण यांमधील भेदाच्या अंगाने अधिक केली जाते. शाळा ही संस्था म्हणून तिच्या आशय–रचनेसह लिंगभावनिरपेक्ष असते आणि शाळेमध्ये स्त्री–पुरुष असा भेद केला जात नाही, अशीही धारणा असते. म्हणून स्त्री शिक्षणाचा प्रश्न हाताळताना स्त्री शिक्षकांची नेमणूक करणे, भौतिक सुविधांमध्ये वाढ करणे अशा मुद्द्यांपर्यंत ही चर्चा मर्यादित केली जाते.

अमर्त्य सेन आणि जॉँ ड्रेज या उदारमतवादी अभ्यासकांनी भारतातील स्त्री शिक्षणाचा प्रश्न हा केवळ प्रसार आणि उपलब्धता या मुद्यांपर्यंत सीमित अशा रितीने हाताळला. स्त्रीवादी चळवळीनेदेखील ज्ञानाच्या अकादमीक आणि प्रत्यक्ष चळवळीच्या प्रांतात राजकारणाची चिकित्सा करताना शिक्षणाला आणि विशेषत: शालेय शिक्षणाला वगळले आहे, अशीदेखील तक्रार ही स्त्रीवादी अभ्यासकांनी केली आहे. त्यातही जेव्हा स्त्री शिक्षणाचा विचार स्त्रीवाद्यांनी केला तेव्हादेखील ज्ञानाच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा स्वरूपाच्या रचनेकडे दुर्लक्षच करण्यात आले. नंदिनी मांजरेकर यांनी अशी तक्रार नोंदविली आहे की, पश्चिमेतील स्त्रीवादी अभ्यासकांनी आधुनिक शिक्षणाद्वारे भांडवली समाजातील लिंगभावी संबंधांचे पुनरुत्पादन कसे केले जाते, याचे ज्याप्रमाणे विश्लेषण सादर केले आहे. त्याप्रमाणे भारतीय स्त्रीवाद्यांनी शिक्षण हे जात, वर्ग, लिंगभाव यांच्या पुनरुत्पादनाचे क्षेत्र कसे बनते याची चर्चा पुरेश्या व्यासंगाने केली नाही. उदाहरणार्थ, भारतात उच्चशिक्षित दलित, आदिवासी, शेतकरी स्त्रियांना शिक्षणाद्वारे ब्राह्मणी–पितृसत्ताक–भांडवली भान कसे दिले जाते, याविषयीचे फारसे चांगले अभ्यास उपलब्ध नाहीत.

आधुनिक शिक्षणाद्वारे वर्गव्यवस्थेव्यतिरिक्त पितृसत्ता आणि वंशाच्या पुनरुत्पादनाचे कार्य कसे साधले जाते याविषयीचा अभ्यास काळ्या स्त्रीवाद्यांनी सादर केला आहे. अभ्यासक्रमांविषयीचे आकलन त्यांनी अत्यंत सुस्पष्ट शब्दांत मांडले आहे. २५ काळ्या स्त्री पुढाऱ्यांच्या एका अभ्यासात असे आढळून आले की, त्यांनी शिक्षणाच्या मर्यादित अर्थाला विरोध दर्शविला. त्यांच्या स्वत:च्या शैक्षणिक अनुभवाच्या आधारे त्यांनी असे सांगितले की, उच्च शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना कोर्या मध्यमवर्गीय जीवनदृष्टी बहाल केली गेली. त्यांच्या मते, गोऱ्यांनी नियंत्रित केलेल्या शिक्षणाद्वारे निर्बलीकरण आणि तुष्टीकरण साधले जाते आणि त्यांना लढण्यापासून नाउमेद केले जाते.

शिक्षण हे नेहमीच प्रभुत्वशाली विचारसरणीच्या अधीन राहिलेले आहे. समाजातील विषम असे सत्तासंबंधांचे दृढीकरण व स्थायीकरणास अनुकूल असे विशिष्ट समाजमानस घडविण्यासाठी शिक्षणाचा विनियोग विशेषत: आधुनिक काळात अधिक प्रभावीपणे केला गेलेला आहे. भांडवलदारांनी कामगार वर्गावर विशिष्ट असे शिक्षण लादले. (अशा प्रकारची मांडणी ही अतिरंजीत व प्रचारकी स्वरूपाची वाटत असली तरी यांसंबंधीची विपूल आणि नीट चर्चा नव–मार्क्सवादी शिक्षणतज्ज्ञांनी केली आहे.) यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे नव–मार्क्सवाद्यांनी याला विचारप्रणालीत्मक हल्ला असे संबोधले आहे. उदाहरणार्थ, ई. पी. थॉम्पसन यांनी असे मांडले की, औद्योगिक क्रांतीनंतरच्या लगतच्या काळात जे सांस्कृतिक ऐक्य कामगारांमध्ये निर्माण झालेले होते ते नष्ट करण्यासाठी उगवत्या भांडवलदार वर्गाने शिक्षण व्यवस्थेला जुंपले. लुई अल्थुझर व मिशेल फुको यांसारख्या विचारवंतांनी शिक्षणव्यवस्थेचे हे कार्य लक्षात घेवून आधुनिक शिक्षणाव्यवस्थेची तुलना ही मध्ययुगातील चर्च या संस्थेशी केली. ज्याप्रमाणे आधुनिक शिक्षणाला आकार देण्यात व ते नियंत्रित

करण्यात भांडवलदार वर्गाचे हितसंबंध गुंतलेले होते त्याचप्रमाणे वसाहतींमधील जनतेला विशिष्ट असे शिक्षण देण्यात वसाहतवाद्यांचे हितसंबंध गुंतलेले होते.

स्त्री शिक्षणाबाबतही असेच घडले. विशिष्ट असे स्त्रीत्व घडविणे हे आधुनिक शिक्षणाचे प्रयोजन मानले गेले. अशा प्रकारच्या स्त्रीत्वाची जडणघडण करण्यासाठी शिक्षणव्यवस्थेला जुंपण्याचा प्रयत्न इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या काळापासून विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सुरू होता. इंग्लंड्मधील शिक्षणविचारांवर प्रभावी असलेल्या या पितृसत्ताक धारणांचा प्रभाव हा वासाहतिक व तसेच वसाहतोत्तर भारतीय शिक्षणविचारांवरदेखील झाला. युरोपमधील अशा पितृसत्ताक धारणांचा उपयोग भारतातील पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवाद्यांना झाला. युरोपमधील आणि अमेरिकेतील स्त्री शिक्षणविषयक अशा पारंपरिक विचारांचा पुरस्कार भारतामध्ये बाळ गंगाधर टिळकांपासून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णनांपर्यंत अनेकांनी केला. युरोपमधील उदारमतवादाचे वारे प्यालेल्या सुधारणावाद्यांना युरोपमधीलच उदाहरणे देऊन त्यांचे नामोहरण करण्याचा हा प्रयत्न होता.

भारतात वसाहतीकरणाच्या सुरुवातीच्या काळात वसाहतवाद्यांनी स्थानिक सत्तारचनेला धक्का न देण्याची भूमिका घेवून उच्च जातींचा अनुनय करण्याची भूमिका घेतली. शिक्षणाच्या व्यापक विस्ताराला ज्याप्रमाणे ब्रिटिश सत्ताधीश अनुत्सुक होते त्याचप्रमाणे एतद्देशीय उच्चजातीय अभिजनदेखील ! त्यामुळे व्यापक शिक्षणप्रसारातून होणाऱ्या ज्ञानाच्या विस्फोटाची व त्यातून होणाऱ्या बंडाची फारशी भीती ब्रिटिश सत्ताधीशांनी बाळगण्याचे फारसे कारण नव्हते. समाजातील जो छोटा जनविभागच शिक्षण घेत होता; परंतु या शिक्षितांच्या नव–अभिजन वर्गाची कोणत्याही स्वरूपाची विद्रोही मानसिकता बनू नये. यासाठी वासाहतिक सत्ताधीश हे काळजीपूर्वक लक्ष देत असत. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकात एका पाठ्यपुस्तकातील सॉक्रेटिसवरील धडा हा अशा भीतीमुळे मागाहून वगळण्यात आला होता.

वासाहतिक काळातील भारतीय सत्तेच्या पोषाचे स्वरूप द्वैती होते. या परदेशी ब्रिटिश साम्राज्यवाद आणि एतद्देशीय जातिव्यवस्था यांच्या संयुक्तिक युतीतून सत्तेचा पोष बनला होता. तत्कालीन भारतातील शिक्षण, भाषा, स्त्रीविषयक धोरण यांची रचना या संयुक्त सत्तेच्या प्रभावात आकाराला येत होते. आधुनिक शिक्षणावर या संयुक्त सत्तेने अंकूश ठेवला असला तरी जातिव्यवस्थाक व पितृसत्ताक समाजात आंतर्विरोध निर्माण करण्याची सुप्तशक्ती या शिक्षणात अल्पांशाने होतीच. म्हणून आधुनिक शिक्षणाद्वारे जातिव्यवस्थेला व पितृसत्तेला होणारा धोका होता होईल तेवढा कमी करणे आवश्यक होते. या काळात ब्रिटिश प्रशासनातील परंपरावादी प्रशासक आणि एतद्देशीय उच्चजातीय अभिजन यांनी जबाबदारीचे भान दाखवून धोरणे आखली. या अभिजनांनी आधुनिक शिक्षणाला दिलेल्या प्रतिक्रियेत भिन्नता होती; परंतु जाती–पितृसत्तेला धोका न पोहचू देण्याबाबत साधारणपणे त्यांच्यात मतैक्य होते. पुनरूज्जीवनवाद्यांनी सुरूवातीला स्त्री शिक्षणाच्या संकल्पनेलाच विरोध केला; परंतु स्त्री शिक्षण हे अनेक कारणांमुळे जेव्हा अपरिहार्य होत गेले तेव्हा आधुनिक शिक्षणाद्वारे जात–पितृसत्तेला कमीतकमी धोका पोहचावा या हेतूने स्त्री शिक्षणाच्या आशयाबाबत तडजोडी करण्यास धोरणकर्त्यांना बाध्य करण्यात उच्चजातीय अभिजनांना यश आले.

आधुनिक शिक्षणाचे एक महत्त्वपूर्ण प्रयोजन हे जुन्या सामंती व्यवस्थांच्या विरोधात आणि नव्या

भांडवलदारी व्यवस्थेच्या स्वीकृतीची नवशिक्षितांची मनोभूमिका तयार करणे, हे राहिले आहे. या शिक्षणाद्वारे अर्थातच सामंतशाहीचा एकात्म भाग असलेल्या पितृसत्तेमध्येदेखील अंतर्विरोध निर्माण होणे अपरिहार्य होते. त्यामुळे या आधुनिक शिक्षणाच्या ठायी असलेल्या जुन्या सामंती पितृसत्तेला धोका पोहचविण्याच्या सुप्तशक्तिला वेसण घालण्याच्या हेतूने स्त्रियांसाठी भिन्न अभ्यासक्रमांची आखणी करण्याचे धोरण स्वीकारले गेले.

उच्चजातीय अभिजनांनी त्यांच्या बायकांना शिक्षित करण्याचे धोरण स्वीकारले; परंतु त्यामागील प्रेरणा ही स्त्रियांनी आधुनिक बनावे अशी नव्हती. तर, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बायकांच्या भारदस्त, रुबाबदार व आधुनिक व्यक्तिमत्वापुढे भारतीय अभिजनांच्या बायका या अभिजनांना खुज्या वाटत. यातून भारतीय अभिजनांचे मागासलेपण आपोआपच सिद्ध होत असे. ही खंत बाळशास्त्री जांभेकरासारख्यांनी स्पष्ट शब्दांत व्यक्त केली होती. अर्थातच, गृहिणी म्हणूनची जबाबदारी या स्त्रियांनी सोडून द्यावी, अशी या अभिजनांची इच्छा बिलकूल नव्हती. गृहकृत्यदक्षता, अध्यात्मिकता आणि विनयशीलता यांनी युक्त अशी स्त्री निर्माण करण्यात हा वर्ग उत्सुक होता. परंपरेची साथ न सोडता आधुनिकतेचा जुजबी स्वीकार करण्याची भूमिका घेण्यात आली होती. परंपरेच्या अंतरंगावर आधुनिकतेचे बाह्यावरण चढविण्यासारखे हे होते. या शिक्षणाद्वारे स्त्रियांनी काही विशेष गुण आत्मसात करणे अपेक्षित होते. विशेषत:, नीटनेटकेपणा, व्यावहारिक कुशलता व शहाणपणा, जबाबदारीचे भान राखण्याचे वृत्ती आणि स्वच्छता अशी गुणवैशिष्टे शिक्षित स्त्रीने आत्मसात करणे अपेक्षित होते. बाहेरील जगतातील बदलेलेली परिस्थिती नीटपणे ओळखून काटकसरीने संसार करणे आणि कौशल्यपूर्ण जगण्याची रीत स्वत:मध्ये बाणवून नवशिक्षित स्त्रीने अपेक्षित होते, हे पार्थ चटर्जींचे आकलन महत्त्वाचे आहे. नवशिक्षित स्त्रियांना नव्या पद्धतीने अंकित करण्याची जी शिताफी वासाहतिक काळातील अभिजनांच्या पहिल्या पीढीने दाखविली त्याचा परिणाम दूरगामी स्वरूपात भारतीय शिक्षणावर राहिला.

भारतीय जातिव्यवस्था आणि पितृसत्ता यांमधील एकत्व लक्षात घेता आधुनिक शिक्षणाचा पितृसत्तेला असलेला धोका हा परत्वे जातिव्यवस्थेलादेखील होता, याची जाण या अभिजन वर्गाला होती. आधुनिक शिक्षणाने प्रसविलेली प्रागतिकता आणि या अभिजन वर्गाची पारंपरिक दृष्टी या कात्रीत हा वर्ग सापडला. १८९१ मध्ये एका मुलींच्या शाळेच्या उद्‌घाटनाच्या प्रसंगी रा. गो. भांडारकरांनी केलेल्या भाषणात या अभिजन वर्गाचे दुभंगलेपण सुस्पष्ट शब्दांत व्यक्त झाले. भांडारकर म्हणाले, ‘या संस्थेतून मुलींनी विद्वान होऊन केवळ पुस्तकेच वाचावित आणि घरगुती जबाबदारीकडे दुर्लक्ष करावे, असे आम्हाला वाटत नाही. आम्हाला असे वाटते की, त्यांनी शिकून त्यांची गृहव्यवस्थापनाची जबाबदारी अधिक चोखपणे पार पाडावी आणि तुरुंगरूपी समाजातून त्यांनी एका खिडकीतून आधुनिक जगाकडे बघावे. भांडारकरांसारख्या सुधारणावाद्याने स्त्री शिक्षणविषयक भूमिका घेताना परंपरेचीच कास धरली. मातृत्व ही जरी प्राचीनतम संकल्पना असली तरी सुमातृत्व ही आधुनिक संकल्पना आहे. आधुनिक शिक्षण प्राप्त केलेल्या स्त्रीने पितृसत्ताक बंधनांपासून स्वत:ला मुक्त करणे तर दूर; उलट तिने सुगृहिणी बनून घराची देखभाल अधिक काळजीपूर्वक करावी, ही अपेक्षा बाळगली गेली. शिवणकाम व पाककला

ह्या स्त्रियांकडे जन्मजात असतात, ही धारणा एकोणिसाव्या शतकात फारशी बदलली नाही. *नेटिव्ह ओपिनियन* या आंग्ल-मराठी साप्ताहिकाने स्त्री शिक्षणविरोधी भूमिका घेतली.

बाळ गंगाधर टिळकांची भूमिका देखील स्त्री शिक्षणाला विरोध करण्याचीच होती. मुलींच्या शाळेला विरोध करून टिळक थांबले नाहीत तर मुले आणि मुलींच्या समान अभ्यासक्रमालाही त्यांनी विरोध केला. दादाभाई नौरोजी ते भगिनी निवेदिता पासून तर सर सय्यद अहमद खान ते मो. क. गांधींपर्यंत सर्वांनीच कमीअधिक प्रमाणात स्त्री शिक्षणाच्या आशयाबाबत पारंपरिक भूमिका घेतली. परंपरावाद्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे गो. कृ. गोखले ते विनोबा भाव्यांसारख्यांना देखील स्त्री शिक्षणाच्या आशयाबाबत अशाच भूमिका घ्याव्या लागल्या.

उच्चजातीय अभिजनांसाठी स्त्री शिक्षण हे स्वत:च साध्य नव्हते; तर वेदांती तत्त्वज्ञानावर आधारलेल्या राष्ट्रवादाच्या प्रचार-प्रसाराचा आणि अशा राष्ट्रवादाच्या निर्मिती आणि पुनर्निर्मितीचा एक आधार शिक्षित स्त्री व्हावयाची होती. नवरोजी जेव्हा स्त्री शिक्षणाची बाजू घेतात तेव्हा राष्ट्रासाठी 'सुप्रजा' निपजविण्याची जबाबदारी या स्त्रियांवर टाकण्यास ते विसरत नाहीत. सुदृढ राष्ट्रासाठी सुदृढ अशी प्रजा निर्मिती, हे स्त्री शिक्षणाचे प्रयोजन होते. स्त्री सुधारणेचा कैवार घेणारे मलबारी हे स्पष्टपणे सांगतात, की स्त्री शिक्षणातूनच आदर्श राष्ट्र आकाराला येईल. एका शिक्षित स्त्रीकडे राष्ट्राला पुरक घटक म्हणून पाहिले गेले.

अशिक्षित स्त्री ते शिक्षित स्त्री हा प्रवास नवशिक्षित मध्यमवर्गाला गृहिणी ते सुगृहिणी आणि माता ते सुमाता असा हवा होता. नवशिक्षित स्त्रीनेदेखील जात-पितृसत्तेच्या पुनरुत्पादनात आपली भूमिका वठवावी हे अपेक्षित होते. त्यासाठी तिच्या आवश्यक अशा गृहिणीकरणाची जबाबदारी आधुनिक शिक्षणावर टाकण्यात आली. आधुनिक शिक्षित स्त्रीने आधुनिक मूल्यांचा स्वीकार करावा आणि कुटुंबाचीदेखील आधुनिक पद्धतीने देखभाल करावी. अशी दुहेरी जबाबदारी तिच्यावर टाकण्यात आली. दक्षिणेतील सुसुप्रसिद्ध लेखक वेदनायगम पिलायी यांनी १८६९ मध्ये यासंबंधी जे लिहिले ते उच्चजातीय आंग्लशिक्षित पांढरपेशा समाजाला आधुनिक स्त्रीकडून जे अपेक्षित होते त्याचा सार होते. ते असे म्हणाले की, भारतीय शिक्षित महिलेने नवऱ्याला सचिवाप्रमाणे साथ द्यावी; घरातील हिशोबठिशोब आणि इतर व्यवस्था पहावी; घराची राखण करावी; तिला डॉक्टरांप्रमाणे औषधांची माहिती असावी; संगीत, चतुर संभाषण आणि पाककला यात ती निपुण असावी. तिच्यामध्ये इंग्रजी 'हिबानू' आणि भारतीय सुगृहिणी या दोन्हींचे गुण एकवटलेले असावेत, असे अपेक्षित होते. सनातनी पुरुषांनी स्त्री शिक्षणविषयक जो परंपरावाद जोपासला त्याचा परिणाम हा उच्च शिक्षित स्त्रियांच्या धारणादेखील तशाच घडण्यात झाला. याचा एकंदरच परिणाम हा वासाहतिक काळात स्त्रियांना शिक्षण खुले होऊनही अभिजनांसाठी आधुनिक स्त्रीची जडणघडण ही पितृसत्ताक व्यवस्थेला अनुरूप अशाच पध्द्तीने होण्यात झाला.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीविषयक सुधारणावादाविषयी जो उदारमतवादी अवकाश निर्माण झाला होता त्यावरदेखील परंपरावादाचा प्रभाव होताच. नेहरू युगात समाजवादाची घोषणा जरी केली गेली तरी एक बलाढ्य असे औद्योगिक राष्ट्र प्रत्याक्षात आकाराला येत होते. त्या राष्ट्राला व राष्ट्रवादाला अनुरुप असाच स्त्री शिक्षणविषयक विचार विविध अशा शासकीय आयोग आणि समित्यांच्या

अहवालांमध्ये दिसून येत होता. वासाहतिक काळातील राष्ट्रीय चळवळीने विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मागे ढकलले होतेच. या प्रकारच्या प्रतिगामित्वाचा परिणाम स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री शिक्षणविषयक चर्चेवर होणे अपरिहार्य होते. बळकट अशा भांडवली विकासाच्या गरजेला जागून जेव्हा पहिला शिक्षण आयोग प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाऐवजी विद्यापीठ शिक्षणासाठी स्थापन केला गेला तेव्हा समाजवादी नेहरूंनी स्त्रीविषयक अत्यंत प्रतिगामी धारणा बाळगणाऱ्या जातवर्चस्वावादी व वेदांती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना या पहिल्या विद्यापीठ शिक्षण आयोगाचे अध्यक्षस्थान बहाल केले. या आयोगाने स्त्री शिक्षणविषयक अत्यंत प्रतिगामी मत व्यक्त करून स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री शिक्षणविषयक विकासाच्या वाटा अरुंद करण्याची शासकीय रीत आखून दिली. याचा परिणाम असा राहिला की, एनसीईआरटीपासून तर विविध राज्यांच्या पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळांनी निर्माण केलेल्या पाठ्यपुस्तकांमधील स्त्रियांचे चित्रण हे पितृसत्ताक समाजात स्त्रीची जी साचेबद्ध प्रतिमा निर्माण करण्यात आलेली असते त्या प्रतिमेला अनुरूप असेच राहिले. स्त्रियांनी आधुनिक शिक्षण घ्यावे; परंतु कुटुंब संवर्धकाच्या भूमिकेला तिलांजली देवू नये, हीच अपेक्षा साधारणपणे यातून व्यक्त होत राहिली.

आधुनिक भांडवलदारी राज्यसंस्था ही लोकांना निरक्षर किंवा अज्ञानी ठेवून राज्य करीत नाही; समूहांना निरक्षर ठेवणे हे तंत्र सामंतशाहीशी सुसंगत आहे. आधुनिक भांडवलदारी राज्यसंस्था जनमानसात सार्वत्रिक शिक्षणाद्वारे प्रभुत्वशाली विचारसरणीची व्यापक पेरणी करून त्याद्वारे जनसमूहाची मनोभूमिका नवी भांडवलदारी व्यवस्था वंश, वर्ण, जात, पितृसत्ता यांसह स्वीकारण्याच्या दृष्टीने तयार करते. परंतु, आधुनिक भारतीय राज्यसंस्था जातिपितृसत्तेच्या दृढीकरणाच्या हेतूने भांडवलशाहीच्या विकासाच्या विपरीत वर्तन करते. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासारख्या भांडवलशाहीच्या विकासास अपरिहार्य पूर्वअटींपासून आधुनिक भांडवलदारी पलायन करते आणि कोट्यवधी कनिष्ठ जातीय स्त्रियांना निरक्षर ठेवण्याचे निरंकुश सरंजामी तंत्र अवलंबते. आधुनिक भांडवलदारी विचारप्रणालीद्वारे प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या विकसित देशांमधील तंत्राऐवजी आधुनिक भारतीय भांडवलदार जे सामंती तंत्र अनुसरतो त्यामुळे भारतातील शोषित स्त्रीवर्गासाठी प्राधान्याची मागणी अजूनही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचीच बनते.

अर्थात केवळ शिक्षणाच्याभांडवलशाहीच्या सार्वत्रिकीकरणाची चळवळ उभी करणे म्हणजे पितृसत्ताक भांडवलशाहीला अनुरूप व अनुकूल व्यक्तित्व घडविणे मात्र होईल. शाळा हे विशिष्ट असे व्यक्तित्व घडविणारे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. प्रचलीत उत्पादन पद्धतीला अनुरूप अशी कौशल्ये व नीतीमूल्ये रुजविणे हे राजकीय कार्य शाळेद्वारे साधले जाते. परंतु, शाळांची ही रचना ही स्वायत्तपणे कार्यरत नसते. तसेच, शाळा ह्या प्रतीप्रभुत्वाचे भान देण्यास बांधील नसल्यामुळे शाळा बदलण्याची कास न सोडता प्रतीप्रभुत्वाच्या निर्मितीचे कार्य हे शाळेबाहेरही पूर्णत्वास न्यावे लागेल. सावित्रीबाई व जोतीरावांनी एकाच वेळी मुक्ता साळवेसारख्या मुली घडविण्यासाठी शाळेचे स्वरूप बदलले आणि शाळेमध्ये आंतरिक बदलांची भूमिका न सोडता व्यापक समाजपरिवर्तनाची कासही सोडली नाही. हा वारसा आपल्या पाठीशी आहेच. आवश्यकता आहे तो जागविण्याची!

# नवा विद्यापीठ कायदा : काही अधिक काही उणे

**डॉ. डी.एन. मोरे**

*लेखक पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे प्राध्यापक असून, इंग्रजी भाषा व वाङ्मयाचे जाणते अभ्यासक आहेत. महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षकांच्या संघटनेतील ते सक्रिय पदाधिकारी आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ संदर्भाने सूक्ष्म निरिक्षणावर आधारलेले काही निष्कर्ष नोंदविले आहेत.*

---

राज्यातील उच्च शिक्षणाच्या गुणात्मक वाढीसाठी मांडण्यात आलेले 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक २०१६' विधीमंडळात एकमताने मंजूर झाले. नव्या कायदयात सामाजिक आरक्षणाच्या टक्केवारीत वाढ, विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, अधिष्ठात्यांची पूर्णवेळ पदावर नियुक्ती, विद्यापीठ व कुलगुरूंना अधिक स्वायत्तता, महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याची सुलभ प्रक्रिया, समूह महाविद्यालय व विद्यापीठ संकल्पना, तक्रार निवारण समिती व एक सदस्यीय पीठासन अधिकारी असलेले न्यायाधिकारी, विविध प्राधिकरणे, समित्या व मंडळांच्या संख्येत लक्षणीय वाढ आणि त्यामध्ये निवड, निवडणूक व नामनिर्देशनाच्या माध्यमातून प्रतिनिधीत्व, कुलगुरूंना नामनिर्देशनाचे जादा अधिकार, निर्णय प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग, संशोधन वाढीसाठी स्वातंत्र्य इ.महत्त्वपूर्ण तरतूदींचा समावेश करण्यात आला आहे.

नव्या विद्यापीठ कायदयात सर्व सामाजिक घटकांना समान प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद स्वागतार्ह आहे. अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद,विद्यार्थी परिषद व महाविद्यालय विकास मंडळ या महत्त्वाच्या प्राधिकरणावर SC,ST,NT,OBC व महिलांना समान प्रतिनिधीत्व दिले आहे. वित्त व लेखाधिकारी पदासाठी कलम १८ अन्वये सनदी लेखापाल (Chartered Accountant) किंवा परिव्यय लेखापाल (Cost Accountant) किंवा उपकलम (३) अन्वये उपसंचालकाच्या दर्जाहून कमी नसलेले पद धारण करणाऱ्या राज्य वित्त व लेखा सेवेतील शासकीय अधिकारी असण्याची तरतूद करून विद्यापीठातील आर्थिक व्यवहार सुलभ व पारदर्शक करण्याचा प्रयत्न केला आहे.

वेगवेगळी प्राधिकरणे, अभ्यासमंडळे, महाविद्यालय विकास समिती इ. वर विद्यार्थ्यांना प्रतिनिधीत्व देऊन हा कायदा विद्यार्थी केंद्रीत

करण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे. अभ्यासमंडळात २ विद्यार्थ्यांना, अधिसभेत व व्यवस्थापन परिषदेत अनुक्रमे १० व २ पदवीधरांना प्रतिनिधीत्व दिले आहे. त्यांच्या मताचा व सक्रिय सहभागाचा विकासात्मक धोरण ठरविण्यासाठी निश्चितच फायदा होईल. कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समितीत व्यवस्थापन,शिक्षक, विद्यार्थी व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (IQAC) समन्वयकास प्रतिनिधीत्व दिल्याने महाविद्यालयाच्या विकासात्मक योजना व गुणवत्ता वाढीसाठी चालना मिळेल.

नव्या कायद्यात विद्यापीठात अधिकारी, प्राधिकरणे, मंडळ व समित्या यांच्या संख्येत लक्षणीय वाढ केली आहे. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ, ज्ञानस्त्रोत केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा व शारीरिक शिक्षण इत्यादी मंडळाचा समावेश असून या मंडळात पूर्णवेळ संचालक नेमण्याची व्यवस्था केली आहे. कायद्यातील 'पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दतीमुळे ' (CBCS)विद्यार्थ्यांना त्यांची रुची असलेला विषय निवडण्याची मुभा मिळणार आहे.

विविध राजकीय पक्षांचा महाविद्यालयीन विद्यार्थी संसदेच्या निवडणूकीत होत असलेला हस्तक्षेप व त्यामुळे होणाऱ्या गैरप्रकारामुळे विद्यार्थी संसदेच्या लोकशाहीमार्गाने होणाऱ्या निवडणुकीवर १९९४ पासून बंदी घालण्यात आली होती. लिंगडोह समितीच्या शिफारशीचा आधार घेत विद्यार्थ्यात नेतृत्वगुण विकसीत करण्याच्या हेतूने विद्यार्थी संसदेच्या निवडणूकीची विधेयकात कलम ९९ अन्वये तरतूद करण्यात आली आहे.जेएनयू, हैद्राबाद, इ. विद्यापीठात निवडणूकीवेळी उद्भवलेली तणावाची परिस्थिती आणि त्यातून होतकरू व अभ्यासू विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होत असलेला आघात पाहता या तरतूदींमुळे महाविद्यालय व विद्यापीठीय आवारात शैक्षणिक वातावरण निकोप राखण्यासाठी कडक नियमांची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक जिल्हाप्रशासनाच्या नियंत्रणाखाली होणे व विद्यार्थ्यांच्या संघटनांना बळ देणाऱ्या राजकीय पक्षाचा हस्तक्षेप यात होणार नाही. यासाठी परिनियमात कठोर नियमांची तरतूद करणे गरजेचे आहे.

कलम ८४ अन्वये विद्यापीठ व महाविद्यालय न्यायधिकरणाने निकाली काढलेल्या कोणत्याही अपिलावरील निर्णय अंतिम असेल आणि तो कर्मचारी व विद्यापीठ किंवा व्यवस्थापन यावर बंधनकारक असेल व त्याविरूध्द कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा, अपील किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नसण्याची तरतूद घटनात्मक अधिकारासछेद देणारी आहे. कोणत्याही निर्णयाविरूध्द उच्च व सर्वोच्च न्यायालयात व शेवटी राष्ट्रपतीकडे दाद मागण्याचा अधिकार घटनेतील कलम ३२ अ (२) (ड) अन्वये असल्याने ही तरतूद घटनाबाह्य व लोकशाही विरोधी आहे. तेंव्हा कलम ८४ मध्ये दुरुस्ती करुन संबधित कर्मचारी अथवा व्यवस्थापन यांना निर्णयाविरूध्द दाद मागण्याचा त्यांचा घटनादत्त अधिकार अबाधित ठेवावा. असे या क्षेत्रातील विचारी मंडळीना वाटते.

कलम १०८(१०) अन्वये संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था यांच्या प्राचार्याची व अध्यापकाची नियुक्तीची प्रक्रिया राज्य शासन राजपत्रात विहित करील त्याप्रमाणे असेल. अशी तरतूद करण्यात आली आहे. खरे तर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी गुणवान शिक्षकांची नियुक्ती करणे अतिशय महत्त्वाचे आहे. परंतु सध्या वशिलेबाजी, डोनेशन व आप्तस्वकीय परिवारवाद हे नियुक्तीचे

मुख्य निकष बनले आहेत. तेंव्हा केंद्रिय भरती मंडळाच्या मार्फत (Central Recruitment Board)MPSC च्या धरतीवर परीक्षा घेणे व गुणवत्तेवर निवड करणे आवश्यक आहे.

नव्या कायद्यात अभ्यास मंडळ, अधिसभा, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेतील काही जागा कुलगुरूकडून नामनिर्देशनाव्दारे भरण्याची तरतूद केली आहे. त्या त्या क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ व्यक्तींना नामनिर्देशनाव्दारे विविध प्राधिकरणावर प्रतिनिधीत्व देताना कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडण्याचे मोठे आव्हान कुलगुरुंपुढे असणार आहे. नव्या कायद्यातील कलम ३४ अन्वये ४ विद्याशाखा व त्या विद्याशाखेचे ४ अधिष्ठाते असणार आहेत. परंतु या कायद्यात अनेक विषय एका विद्याशाखेत समाविष्ट करुन विद्याशाखांची व अधिष्ठात्यांची संख्या मर्यादित केल्याने अधिक गुंतागुत वाढणार आहे. कलम २८ (P) अन्वये अधिसभेत संस्थाचालकाच्या (०६) प्रतिनिधीच्या तुलनेत पदवीधरांचे (१०), अध्यापकांचे महाविद्यालय व विद्यापीठ मिळून (१३) प्रतिनिधी त्यांच्या एकूण संख्येच्या प्रमाणात कमी आहेत. अध्यापकांना विद्याशाखानिहाय प्रतिनिधीत्व व निवडणूक लढविण्यास अध्यापनाचा अनुभव किती वर्षाचा असावा याचीही स्पष्ट तरतूद गरजेचे होते. कलम (३०) अन्वये परिषदेत संस्थाचालक २, विद्यार्थी २ आणि अध्यापक २ असे प्रतिनिधीत्व संतुलित नाही.

एकूणच नव्या कायद्यात उच्च शिक्षणातील गुणवत्ता वृध्दीसाठी आमूलाग्र बदल सूचविले आहेत. प्रत्यक्षात कायद्यातील सकारात्मक बाबीची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते त्यावरच याचे यशापयश अवलंबून आहे. तसेच कायद्यातील उणिवा दुरूस्त केल्या जाणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तरच नवा विद्यापीठ कायदा उच्च शिक्षण क्षेत्रातील एका चांगल्या बदलाची नांदी ठरेल.

# उच्च शिक्षण आणि गुणवत्ता

**प्राचार्य डॉ. शरद अदवंत**

*लेखक औरंगाबाद येथील सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयात प्रदीर्घकाळ प्राचार्य होते. स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेचे ते सक्रिय विश्वस्त आहेत. अध्ययन – अध्यापन व प्रशासन इ. स्तरावरुन ते उच्चशिक्षणांच्या संदर्भात निरंतर चर्चेत असलेल्या गुणवत्तेबाबत जो साक्षिभूत अनुभव घेतला आहे त्या आधारे प्रस्तुत लेखात उच्चशिक्षण आणि गुणवत्ता यातील संवाद–विसंवादाचे स्वरुप विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.*

उच्च शिक्षणाबद्दल आणि या व्यवस्थेसंबंधी कांही प्रश्न सतत उपस्थित केले जात असतात. त्यापैकी कांही व्यावहारीक आणि नेहमीचे प्रश्न १. महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान मिळणार काय ? २. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांवर नेमणूका करण्याची परवानगी मिळणार काय ? ३. केंद्र सरकार आणि राज्याच्या अर्थसंकल्पात शिक्षणावरील खर्चाची तरतूद सकल उत्पन्नाच्या सहा टक्क्यापर्यंत कधी वाढवणार ? सर्वच राजकीय पक्षांनी या तीनही प्रश्नाबाबात सकारात्मक, होकारात्मक उत्तर दिले. मात्र जेंव्हा सत्तेत आले त्यावेळी प्रत्येकाने निर्णय घेण्याचे टाळले. जाहिर सभा, अधिवेशनात मागणी आणि अनेकदा आंदोलन तसेच शैक्षणिक बंद करुन हा प्रश्न सुटलेला नाही. कारण वरील तीनही प्रश्न हे आर्थिक व्यवस्थेशी निगडीत आहेत. यापूर्वी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाची ही अंमलबजावणी आहे.

भारताचे पूर्व पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि त्यावेळेचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांची खूल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. तेंव्हापासून चित्र बदलण्यास सुरुवात झाली. त्याचा एक भाग म्हणून केंद्र सरकारने अनेक क्षेत्रातील सबसिडी कमी करण्याचे ठरवले. उच्च शिक्षण अग्रक्रम नसलेल्या यादीत टाकण्यात आले. तेंव्हा पासून उच्च शिक्षणावरील सबसीडी कमी होत आहे. समाजाच्या सर्व स्थरात जेव्हा उच्च शिक्षणाचा प्रसार होत आहे, त्याचवेळी सबसिडी कमी केल्यामुळे शिक्षण महाग होत आहे. हा प्रश्न आता भारतापुरता सिमीत राहिला नसून जगभरातील मागास देशात हा एक गंभीर प्रश्न झाला आहे. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागातीकीकरणातून निर्माण झालेले हे प्रश्न आहेत.

उत्कृष्टतेचे सर्वोच्च मानांकन मिळावे हे प्रत्येक संस्थेचे उद्दिष्ट असते मात्र उत्कृष्टता साध्य करण्याचा मार्ग आव्हानात्मक असतो. उत्कृष्टता ही सापेक्ष, अमूर्त कल्पना आहे. उत्कृष्टतेकडे वाटचाल ही चिरंतर चालू असते. क्षितिजाप्रमाणे उत्कृष्टता भासमान असते. आपण क्षितिजाजवळ जाण्याचा कितीही प्रयत्न केला तरी क्षितिज नेहमीच दूर अंतरावर असते.

महाविद्यालयाच्या गुणवत्तेबाबतही वेगवेगळया परिमाणाच्या संदर्भात विद्यापीठ, राज्य , देश आणि जागतीक संदर्भात जोपर्यंत विचार केला जाणार नाही, तोपर्यंत गुणवत्तेच्या चर्चा निष्फळ ठरतात. उच्च

शिक्षणामध्ये तीन बाबी महत्वाच्या आहेत. १. विस्तार, २. समावेश, ३. उत्कृष्टता सर्वासाठी शिक्षण हे प्रत्येक शिक्षण संस्थेचे घोषवाक्य असलेच पाहिजे. शिक्षण हे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. आर्थिक विकास आणि उच्च शिक्षण यांच्या परस्परसंबंधातील कोणते दुवे आहेत ते प्रत्येक महाविद्यालयाने शोधले पाहिजेत. गुणवत्तेचा प्रवास या दुव्यांच्या सबलीकरणावर अवलंबून असतो.

जगभरातील अर्थव्यवस्थेत ज्ञान हा आता महत्वाचा घटक झाला आहे. उच्च शिक्षणामध्ये अध्ययन आणि विव्दत्ता, ज्ञान मिळवण्याचे सर्व मार्ग, अमर्याद ज्ञानाकडे नेणारे संशोधन आधुनिक तंत्रज्ञान तसेच समस्या सोडविण्यासाठी विविध पर्याय आणि नविन कल्पनांचा मागोवा, उद्योगातील संधी आणि समृध्द, श्रीमंत समाज निर्माण करणारी उद्योजकता अशा विविध पैलुंचा समावेश असला पाहिजे, अशी शिफारस काकोडकर समितीने केली आहे.

कांही वर्षापूर्वी समाजाभिमूख शिक्षणाची संकल्पना मांडण्यात आली. मात्र शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांच्या मताप्रमाणे शिक्षण जेंव्हा विद्यार्थ्यांभिमुख होईल, त्याच वेळी प्रचंड मोठे प्रशिक्षित मनुष्य बळ निर्माण होईल. शिक्षण आणि परीक्षा या दोन्हीही टप्प्यांवर खूप मोठी गुंतागूंत निर्माण झाली आहे. खोटी-पटनोंदणी, त्या आधारे शासन आणि शासनसंस्थाकडून घेतले जाणारे अनुदान, पदभरतीच्या वेळी लाखो रुपयांची वसूली येथून सुरु होणारी भ्रष्टाचाराची मालिका परीक्षेतील गैरप्रकारापर्यंत पोहचते.

मागासलेला प्रदेश असूनही शिक्षणाचे बाजारीकरण आणि शैक्षणिक भ्रष्टाचारामध्ये मराठवाडा अग्रेसर राहिला आहे. मराठवाड्याध्ये शाळा, महाविद्यालय स्थापन करणारी राजकीय नेत्यामधील चढाओढ ईतकी वाढली होती की, गावागावात महाविद्यालये स्थापन झाली. या शिक्षण संस्थांच्या गर्दीचा पूढचा भाग दूर्देवी ठरला. मराठवाड्यातील बी. एड., डी. एड. आणि माहिती तंत्रज्ञानाची बहुसंख्य महाविद्यालये बंद पडली आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालये विद्यार्थ्यांअभावी ओस पडत आहे. अभियांत्रिकी आणि ईतर व्यावसायीक अभ्याक्रमाच्या महाविद्यालयांनी बँकाकडून कर्ज घेतले होते. या महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांनी भरपूर कमाई केली. मात्र शिक्षण संस्था स्थापन करण्याच्या स्पर्धेत गुणवत्ता पार लयाला गेली. म्हणूनच मराठवाड्यात गुणवत्तावाढीसाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. मराठवाडा आणि महाराष्ट्रातही राजकीय नेत्यांची स्वत:ची म्हणजे कौटूंबिक मालकीची शैक्षणिक संकुल आहेत. के. जी. टू पी. जी. असे हे शिक्षण संस्थाचे मालक सांगत आहेत. शैक्षणिक व्यापारांच्या या जोखडातून मुक्ती शिवाय शैक्षणिक विकास नाही. शैक्षणिक विकासाशिवाय प्रगती नाही. नफखोरी केलेले हे संस्था चालक गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देण्यास तयार आहेत काय ?

आपल्या शिक्षण व्यवस्थेवर पारंपरिकतेचा जबरदस्त पगडा आहे. म्हणूनच संलग्न महाविद्यालयामध्ये ठराविक विषयच शिकवले जातात. वर्गांमधून जे शिक्षण दिले जाते त्याचा दैनंदिन व्यवहार अथवा उपयोजीततेसाठी उपयोग होत नाही. पारंपरिक अभ्यासक्रमाची जोपासना आणि संरक्षण देण्याचे कार्य महाविद्यालयीन शिक्षक करीत असतात. वर्गात जाण्यापूर्वी पूर्ण तयारी न करता, आणि वर्षानुवर्षे तोच तो साचेबंद अभ्यासक्रम नोटस् देण्यावर या प्राध्यापकांचा भर असतो. सुमारे ३०-३२ वर्षापूर्वी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, औरंगाबादच्या वतीने पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ

यांनी उच्च शिक्षणावर चर्चासत्र आयोजित केले होते. त्यावेळी प्रा. डॉ. सुधाताई काळदाते यांनी धक्कादायाक माहिती दिली. माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर संयुक्त कुटूंबाचा पाठ, प्रकरण शिकवले जाते. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे एम. ए. सोशियॉलॉजीच्या वार्षिक परीक्षेतील संयुक्त कुटूंब या प्रश्नाच्या उत्तराचा दर्जा आठव्या ईयत्तेच्या समकक्ष होता. असा मराठवाड्यातील शिक्षणाचा दर्जा होता. त्यात ३५ वर्षानंतर खुप प्रगती झाली असे म्हणणे धाडसाचे होईल.

आजच्या व्यवस्थेत शिक्षण हे शिक्षकाभिमूख आहे नौकरीत संरक्षण, आयोगानुसार वेतनश्रेणी अशा अटी शासनाने १९७७ पासून मान्य केल्या. तरीही १९८० ते १९९० या कालखंडात महाविद्यालयीन शिक्षक म्हणजे प्राध्यापक, प्रोफेसर, विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेत पर्यवेक्षणाचे काम स्पष्टपणे नाकारत, कारण काय ? विद्यापीठ परीक्षचे काम प्राध्यापकांच्या कर्तव्य जबाबदा-याचा भाग नव्हता.

राज्यात आणि देशातही शैक्षणिक अर्थशास्त्र फारसे प्रगत झालेले नाही. प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांवर दरडोई किती खर्च केला जातो, यावर संशोधन होणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या गरजा, विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि महाविद्यालयाच्या आर्थिक क्षमतांचा अभ्यास केल्यास आमची मजल कुठपर्यंत पोहचली आहे, याची माहिती गुणवत्ता वाढीच्या व्यूहरचनेसाठी ऊपयोगी ठरेल.

दक्षिणपूर्व महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग गुणवत्तेच्या चळवळीत मागे पडले आहेत. तरिही उच्चशिक्षणामध्ये आपल्या संस्थांचा प्रभाव वाढला पाहिजे अशी ऊर्मी या विभागातील उच्च शिक्षण संस्थामध्ये आहे, असे काकोडकर समितीने अहवालात नमूद केले आहे.

गुणवत्ता वाढीचे मोठे आव्हान मराठवाड्यासमोर उभे आहे. नोंदणीकृत कंपनीला महाविद्यालय, विद्यापीठ स्थापन करण्याची परवानगी मिळाली आहे. परदेशी विद्यापीठांना त्यांच्या संलग्न संस्था अथवा परिसर स्थापन करण्याची परवानगी दिल्यास मागास प्रदेशातील पारंपरिक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयासमोर मोठे आव्हान उभे राहू शकते. नॅक या संस्थेकडून 'अ' दर्जा मिळवणारी अभिमत विद्यापीठे, खाजगी संस्था या मुख्यत: शहरी भागात आहेत. ग्रामपंचायत आणि नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयांना साधारण ते मध्यम दर्जा मिळालेला आहे, म्हणूनच उच्च शिक्षण हे विद्यार्थ्याभिमूख, समाजाभिमूख कसे होईल यासाठी सर्वकष प्रयत्नांची गरज आहे.

# Affirmative Action in Three Dream Institutions

**Ganesh Devy**

*Dr. Ganesh Devy is probably the most respected name in the field of survey and research of Indian languages. Dr. Ganesh Devy has been active in academics as well as social movements in contemporary India. In the present research paper he has closely examined three academic institutes of national importance. His brilliant analysis and interpretations of the subject lends us very valuable perspectives to look at the present academic scenario in India.*

I propose to examine the understanding of affirmative action displayed by three institutions are, respectively, the Gujarat Vidyapith in Ahemedabad founded by Mahatma Gandhi as an expression of the educational philosophy; the Rayat Shikshan Sanstha, created by 'Karmaveer' Bhaurao Patil specifically for serving the deprived classes in Maharashtra, now the largest single educational organization in India, and the Adivasi Academy at Tejgadh in Gujarat dedicated to the empowerment of Adivasis and the denotified communities. *These institutions were created specifically for a greater social inclusion in the discourse of knowledge, two of them with a history of nine decades and one created only a decade ago.

I have chosen these institutions for study as each of them is profoundly linked with one of the three major 'debates' that the company has witnessed over the last century in relation to affirmative action. The first of these is the debate between Gandhi and Ambedkar. Within its specific historical context, it pertained to reservation electoral rights; but the arguments on both sides reflect profoundly on the question of affirmative action in education as well. The second debate, not concentrated in a give historical moment, has been in currency in numerous in our public discourse. It revolves round the question of affirmative action on the basis of caste as against action on the basis of economic disadvantage. The third debate, though so far nor perceived in that form, is the one that Naxalism has brought to the centre in relation to the state obligations. In the 'debate' the adversaries are the state that is prepared to provide affirmative action in terms of legislative reform but not in substantive and radical measure corresponding to the extent of denial and those who reject state's ability and legitimacy in eliminating denial. In away, these three major debates sum up the history of affirmative action in India in relation to education over the last hundred years.

I propose to examine the contemporary relevance of the three institutions to the communities for whom they were founded in the light of the stated missions of these institutions. This requires articulation of their understanding of 'affirmative action' and a detailing of the shifts in their respective political imagination. This study does not depend on diachronic or synchronic statistical data in order to critique the institutions, though data is taken it account where it is relevant to the argument. I have based my analysis on a critique generated out of the genealogies of the there institutions visited for scrutiny. The ideological foundations of the three institutions differ markedly. Gujrat Vidyapith was established in 1920 with the idea of 'freedom' at its heart. Karmavir's Rayat was created in the previous year with the purpose of educational and social 'equality'. The Adivasi Academy started functioning at the turn of the twentieth century in pursuit of 'justice' However, read together, the interpretations of 'affirmative action' reflected in these institutions may show that the notion of affirmative action cannot be easily fitted into a single normative framework. It makes sense only when seen as unique narrative in every single instance even when it draws upon an implicit universal ideal of cultural pluralism and social equality. All three institutions have distinguished themselves as institutions that cater to marginalized classes of Indian society; and they can hardly be faulted on the question of inclusion. In this sense the analysis attempted here cannot be seen as being analogues with the case study of a mainstream college or a

university where denial is structurally implicit in all aspects of educational processed and where the composition of students and faculty drawn from the 'excluded' as well as the elite classes contributes to creating stereotypes and unfavorable biases towards the excluded. Unlike in the mainstream institutions, as affirmative approach to the classes lacking access to higher education has been the very basis premise on which these three institutions have existed, Hence, I have consciously avoided getting into the exercise of 'proving' by 'statistical evidence' their high record on the question of inclusion, Similarly, I have resisted the temptations of commenting on 'quality' or 'excellence' in these institutions, for the discourse on higher education in India has yet to evolve sufficient conceptual clarity about these concepts.

**Quality and Equality :**

The terms 'quality' and 'excellence' may have relatively satisfactory definitions in a glossary of higher education, but they have remained remarkably elusive within the present Indian context requiring the Chairperson of the University Commission (UGC) to admit that the indicators developed by the UCC to assess quality (under the clauses 2(1) for temporarily affiliated colleges and 12 (b) for colleges with permanent affiliation) provide "the initial and presumably the minimum framework of quality."

60 per cent of colleges (equivalent to 8411 of about 14000 colleges) in the country are not assessed even with the minimum criterion of the 2(f) and 12(b). The NAAC (National Assessment and Accreditation Council) used an expanded criterion of quality measurement In 2006, of the colleges which come under 2(f) and 12(b), about 2780 have been assessed and accredited by the NAAC. The accredited colleges the account for about 57 percent of the colleges covered under the 2(f) and 12(b). But accredited colleges account for only 18 percent of the total colleges (i.e.14000) which fall under the purview of UGC. Thus we do not much idea 82 percent of the 14000 colleges in the country…

An the percent juncture of the higher education discourse in India the measurement of 'quality' – the term applied strictly for the collegiate education – has remained entirely at the quantitative level, and the assessment of 'excellence'- the term used to facilitate the bureaucratic procedure of grant making to university 'centers' – has not fixed criteria.

Despite achievements of half a century of affirmative action in higher education that is enshrined in the Indian Constitution – a considerable length of the and, one would imagine, enough to bring the policy of reconciliation to its fruition – legacies of discrimination, marginalization and denial are still enmeshed in India social composition. Equality as a fundamental right is guaranteed in India's Constitution. Accordingly, successive governments have tried to cope with educational and social inequalities. All of the approximately 350 state-funded universities and 14,000 colleges have been trying to provide higher education at a relatively low cost, not entirely unaffordable to students from the poorer chasses. In several states, education to all female students is made almost cost-free. Yet, it cannot be said that the state has a yet succeeded in providing wider access in higher education to the marginalized in India. The scale of the problem is huge, and the states' resources inadequate. The reasons for the denial of access to quality education, however, cannot be ascribed merely to the enormous size of India's population of lack of adequate resources. The deprivation caused by these factors is compounded by the long history of caste hatred and the socially divisible legacy of colonialism. The nuances often go unnoticed when a simple matrix of class and caste is employed to describe Indian society fragmented in over two thousand castes, six hundred tribes and more than a thousand mother tongues. In India, higher education has managed to lose touch with languages spoken by Indian communities and, therefore, is not able to fully access the idiom through which life is perceived outside our campuses. The loss of language and the loss of cultural memory are probably subtler factors in the denial of access to higher learning. The two easily noticeable factors relate to the social structures and the discriminations embedded in them. The first of these is the caste system which has a dymanic that is radically different from agents of marginalization and inequality in other societies. The second is the enormous backlog resulting from at least 2,000

years of social discrimination. Internal displacement due to man-made disasters, the uprooting of habitat caused by natural disasters and inconsistencies in patterns of livelihood and food security, all render the map of disadvantage in India infinitely complex. Feudal attitudes and repressive moral codes that result in gender discrimination cut across urban and rural areas, as well as across linguistic, religious, caste and tribal boundaries Moreover, the social categories such as the disadvantaged castes (about 1200), almost all of the Adivasi communities (about 650), the 'Denitrified' and Nomadic groups (about 190), whose numbers and populations are by no count small, and whose relations with one another do not fit into the definition of a homogenous 'class' add considerably to the perplexing complexity involved in mapping denial in our country. Add to this infinitely complicated social wave, the religious minority groups. Organizing a reasonably defined hierarchy of disadvantage or creating a code for measuring lack of access, is thus a daunting task, in a country saddled with legacies of fractured histories, a divided society, incomparable linguistic, religious, ethnic and regional diversity, and an ever bursting population that has crossed the mark of a billion. According to the 2001 Census, Muslims constitute 16.4% of the population or a total of 174 million, but their representation in various professions is dismal. In 2001. In public sector industries and public institutions there were only 4.9% Muslims, in Central Administrative Services 3.2% and in the teaching profession only 6.5% .These statistics belie the claim of a democratic state that provides equal access to social goods and services. The corresponding figures for Adivasis are much worse, and those for the Denitrified and Nomadic communities are so pathetic that any self-respecting Indian should hang one's head in shame. Cutting across lines of caste, tribe, religion or gender, a person born in an Indian village is likely to be deprived of any reasonably decent education- this includes nearly fifty percent of India's population, living in 650,000 villages. The modern Indian education system has its roots in colonial history, and in colonial production systems in which Indian villages have been low-priority economic entities. Leaving aside some Agricultural Universities, fewer than 10 of India's (approximately) 350 universities are in rural locations. The dramatically adverse ratio between India's rural population and the locations of institutions of higher education relegates the entire rural population to the category of educationally disadvantaged.

**Gujarat Vidyapeeth :**

The discourse of 'access' revolved round the question of un touch ability during the early years of Gandhian activism in India. Gandhi was one of the most prominent champions of a society without caste discrimination. The two great institutions created by Gandhi in Ahmedabad, the Sabarmati Ashram and Gujarat Vidyapith, were more expressly 'laboratories of thought and action' working towards freedom. It was after nearly three decades of its existences that Gujarat Vidyapith was accepted to be an 'educational institution' in the conventional senses. Gandhi's reflections on the nature of this institution ah he conceptualized it show that he perhaps never would have in become just another 'educational' institution. He had a remarkable clarity from the moment of its inception about the purpose of his venture. In his speech on the inaugural day of the Vidyapith, he stated :

I have done very many activities in my life. Some of them make me mightily proud, some make are regret for having undertaken them. Some of those placed great responsibilities one me. But at this moment I would like to say without the slightest exaggeration that so far I have not done any such work which can compare with what we are set out to do today. I find this work filled with risks, not because it will cause any harm to the people. I feel concerned to think of my inadequacy for the great mission. I am not making this statement as a reasoned statement. I merely place before you what my inner voice has been saying to me. Had I known that what we are setting out to do is to be done in accordance with the true meaning of the term 'education' I would not have to add this apology. The aim behind establishing this college is not merely to 'give' education (Translation mine)

Gandhi concluded the speech with these words:

In conclusion I would like to pray, and I hope you will all join me in the prayer. Do join me with

earnest hearts. 'Ishwar, make this university such one as well bring about the kind of freedom for which we have been longing day and night; and let that freedom bring the entire world, in which Hindustan is only one location, a sense of fulfillment.(Translation mine)

Thus Gujarat Vidyapith was ideologically located within Gandhi's profound understand of how 'knowledge' is created and how intricately freedom and knowledge are interdependent. His insistence on freedom as the primary condition of knowledge and also his reading of the two terms as close synonyms were at the heart of his desire to establish Gujarat Vidyapith as a twin of the Sabarmati Ashram. Not surprisingly, the motto chosen for the Vidyapith was *"sa vidya ya vimukta ye."* It translates, "one who has knowledge alone can be free."

**Rayat Shikshan Sanstha**

g) Innovation, intellectual competition and entrepreneurship are are not considered integral part of the curriculum and training of young graduates and post graduates in teir-2/3 institutes/colleges. Innovation demands intellectual challenge. Even conversion of a research result to a useful product needs specialized skills that require not only nurturing and fostering but also training and repeated exposures to learn from failures. Institutional mechanisms need to be developed to convert innovative ideas generated by outgoing students into useful products. This will also help in shifting the focus of student community from employment /package-based approach to more mature entrepreneurial approach.

**2.3 Faculty Shortage**

The issue of faculty shortage is very acute one. On an average there is shortage of about 20-25 % of faculty in IITs/IIScs/IIITs etc. Unfortunately, TES is not geared for rapid expansion. Old IITS are finding it difficult to fill faculty vacancies. New IITs are struggling to get the threshold faculty strength. This has increased the faculty teaching load tremendously. Because of large numbers, the quality of instruction has suffered. A definite faculty succession plan does not seem to be in place. Significant efforts are needed to plug the gap between demand and supply of quality faculty.

Many teachers are under qualified in tier-3 institutes. Existing teachers both in government and institutes are not exposed to modern pedagogy. Similarly, there is no regular exposure to advances in their field of specialization for these teachers.

Failure to attract and retain good quality faculty due to archaic recruitment and promotion procedures, absence of incentives for quality performance and non-existent staff development policies are very common in most institutes at tier-2/tier-3 levels. Unless, there is a qualified set of teachers, the quality of curriculum delivery is not going to improve.

**2.4 Mechanisms to address faculty shortage**

We must live with acute problem of faculty shortage. Instead of lamenting over this, there are innovative and novel mechanism to address this issue:

a) Massive Open Online Courses(MOOC)- Thanks to IT, now there is a plethora of online courses available. These courses have democratised the education, more so in technical domain. NPTEL, Swayam are the platforms by which these courses are available anytime, anywhere! The education TV channel Swyamprabha has made it possible to have good content available. These are transmitted all over the country.

b) We must also train our students to act as teachers. Teaching associates (like M Tech students) can perform a role of future teacher. We must be able to nurture and develop this vital human resource.

Good institutes must produce more number of Phds to meet the shortfall of faculty, especially

in areas such as computer science, energy, environment and other thrust areas. These institutes can collaborate with each other in that area to make this feasible. There is a need to build demand for Phds . Industry and R&D centres (such as CSIR, DRDO etc.) can come forward in this exercise. Suitable methodologies for attracting industry in joint Ph D programme need to be evolved. The institute can enter into some medium-term contracts with industry within the region for this purpose. Sufficient faculty time for R&D and Ph D guidance need to be committed by the participating institutes who have matured. Cross-departmental collaboration in Tier-1/Tier-2 institutes need to be promoted.

**2.5 Lackof Proper Research focus**

There seems to be lack of focus in pursuing thrust research areas across TUs. The research efforts in theTES seem to be in a fragmented manner. There does not seem a coordinated set of efforts to align the research in line with the mission and long-term vision of the country.

There is a need for enhancing interaction with industry for working on research protects of mutual benefits. This will help in focusing on research projects of relevancy.

**2.6 Mechanisms to address lack of research focus**

a) There is a need to invest in research by industry. The coordinated efforts by industry and institutes in joint research projects will make these institutes aligned with the industry needs.

b) The TES faculty and student must engage in nationally relevant themes such as Swachata Abhiyan, Smart Cities, Make-in-India, Digital India etc. The recent internship on SwachataAabhiyan is directly monitored by Prime Minister's Office. Such a thrust will make our institutes/colleges closer to applied and relevant research.

c) Align R&D with economic needs (power, water management, IT-KPO, environment management, heavy manufacturing, agriculture technology/bio technology etc). Certain incentive schemes for promoting R&D can be evolved in these institutes. An interface body needs to be developed which will act as a bridge between end users (such as DRDO, ISRO, BHEL, Railways etc.) and the technology developers. Institutes, Industry/Industry associations and Government must be jointly involved in developing such an interface body. This interface body will comprise of experts /executives from user industry, government departments /ministry, and faculty members from Tier-1 institutes. This body will actively interact with tier-1 institutes to understand their capabilities based on faculty competence, infrastructure and equipment / machines/software available with these institutes.

d) Informal or non-formal sector occupies major share in our economy. We must also engage a part of their research efforts on addressing the issues of this important sector. These issues may include: quality enhancement. standardization of production/delivery systems. The development of technical manpower for such sector can be delegated to Tier-2 /Tier-3 institutes. For example, the technical institutes can even collaborate with agricultural university and get the requirements of farmers and engage the research efforts in improving the quality of life for farmers and trying to double the agricultural income by 2022 as envisaged in New India programme by Government of India.

**3.0 Summary**

Technical Education system is facing several issues. These issues need to be addressed by joint efforts of all the stakeholders involved in the process. TES can play a significant role in addressing the issues of quality, faculty shortage and research focus. Various mechanisms are suggested to address these issues.

# Changing Scenario of Higher Education

**Prof. Khushbu Purswani Jetho**

*Prof. Khushbu is an Assistant Professor in Department of Commerce, S. S.T. College of Arts and Commerce, Ulhasnagar, Thane, Maharashtra. In this paper she brilliantly surveys the Indian academic system with her rare insights.*

Education in ancient India was highly advanced as evident from the centers of learning that existed in the Buddhist monasteries of the 7th century BC up to the 3rd century AD Nalanda (Perkin, 2006). In these centres, gathering of scholars—*gurukula—used* to be engaged in intellectual debates— *parishads*— in residential campuses. A few of these centers were large and had several faculties. Historians speculate that these centersg had a remarkable resemblance to the European medieval universities that came up much later. The ancient education system in India slowly got extinguished following invasions and disorder in the country. Till the eighteenth century, India had three distinct traditions of advanced scholarship in the Hindu *gurukulas,* the Buddhist *viharas,* and the Quranic *madarasas,* before the British set up a network of schools to impart western education in English medium (Perldn, 2006) The first such college to impart western education was founded in 1818 at Serarnpore near Calcutta. Over the next forty years, many such colleges were established in different parts of the country at Agra, Bombay, Madras, Nagpur, Patna, Calcutta, and Nagapattinam. In 1857, three federal examining universities on the pattern of London University were set up at Calcutta, Bombay and Madras. The existing 27 colleges were affiliated to these three universities. Later, more universities were established. At the time of independence in 1947, there were 19 universities and several hundred affiliated colleges (CABE, 2005a).

The higher education system in India grew rapidly after independence. India's higher education system is the third largest in the world, next to the United States and China. The main governing body at the tertiary level is the University Grants Commission, which enforces its standards, advises the government, and helps coordinate between the centre and the state. Accreditation for higher learning is overseen by 15 autonomous institutions established by the University Grants Commission (UGC) As per the latest 2011 Census, about 8.15% (68 millions) of Indians are graduates, with Union Territories of Chandigarh and Delhi topping the list with 24.65% and 22.56% of their population being graduates respectively. Indian higher education system has expanded at a fast pace by adding nearly 20,000 colleges and more than 8 million students in a decade from 2000-01 to 2010-11. As of 2016. India has 799 universities, with a break up of 44 central universities, 540 state universities, 122

deemed universities, 90 private universities, 5 institutions established and functioning under the State Act, and 75 Institutes of National Importance which include AIIMS, IIT's and NIT's among others. Other institutions include 39,071 colleges as Government Degree Colleges and Private Degree Colleges, including 1800 exclusive women's colleges, functioning under these universities and institutions as reported by the UGC in 2016. Colleges may be Autonomous, i.e. empowered to examine their own degrees, up to PhD level in some cases, or non-autonomous, in which case their examinations are under the supervision of the university to which they are affiliated; in either case, however, degrees are awarded in the name of the university rather than the college.

**CHANGING TRENDS HIGHER EDUCATION**

Over the last two decades, India has remarkably transformed its higher education landscape. It has created widespread access to low-cost high-quality university education for students of all levels. With well-planned expansion and a student-centric learning-driven model of education, India has not only bettered its enrolment numbers but has dramatically enhanced its learning outcomes. A differentiated three-tiered university system - where each tier has a distinct strategic objective - has enabled universities to build on their strengths and cater across different categories of educational needs. Further, with the effective use of technology, India has been able to resolve the longstanding tension between excellence and equity. India has also undertaken large-scale reforms to better faculty-student ratios by making teaching an attractive career path, expanding capacity for doctoral students at research universities and delinking educational qualifications from teaching eligibility. As a result, today, India's 70 million student population is a force to reckon with. Among them are potential thought leaders - researchers and academics - positioned at the helm of knowledge creation. Among them are entrepreneurs and executives of the future, industry-ready and highly sought after. From among them emerges India's massive workforce, the engine of its US$13 trillion economy. Our universities today don't face a shortage of academics ready to be recruited as faculty, just as our industries find adequate talent that can be inducted with minimal on-boarding. Despite these strides of progress, India's higher education institutions are not yet the best in the world - India has fewer than 25 universities in the top 200. Yet, India's post-secondary education system is increasingly recognised as being the best for the world. The promise of excellence and equity has made the Indian higher education system worthy of emulating, certainly in the developing world that faces the same challenges as India did in the decades prior to its higher education reforms, but less obviously in pockets of the developed world which is under tremendous pressure to provide higher education in cost-effective ways. However, India has emerged as a regional hub of education and attracts global learners from all over the world. Students, faculty and employers now flock to India to learn, teach and recruit as India dons the mantle of a higher education leader and emerges the role model for delivering high-quality education to vast numbers at low cost.

**GOVERNANCE IN HIGHER EDUCATION**

Today, higher education institutions face intense competitive pressures. They have to meet increased expectations of different stakeholders. They are required to do more with less (be more efficient) and do it better (be effective). They have to be transparent in their functioning. The Right to Information Act, 2005 imposes new requirements of transparency on the higher education institutions. Transparency in functioning helps them to build confidence of the various stakeholders. Transparency brings the institutional governance and administration into focus. Whereas governance refers to decision-making, administration is more

about execution of those decisions. There have been changes in the organisation and structure of both the governance and administration of higher education institutions in recent years. These changes are reflected in three distinct approaches in use. These are - new public management, entrepreneurialism, and academic capitalism. New public management is an extension of the experiences with the public sector in general to academic institutions for making them more efficient and effective. Entrepreneurialism is driven by making different units of the university more autonomous in the quest for diversified sources of funding. Finally, the academic capitalism is the shift of higher education from a social institution to an industry. One can see a combination of all the new approaches being adopted by some higher education institutions that are adapting themselves to the changing circumstances in India.

**CHANGING PATTERNS OF GOVERNANCE**

The imperative of the previous decade towards 'good governance' in all realms - business, administration and politics - has resulted in dramatic changes in the governance framework for higher education in areas both internal to institutions (their management and leadership structures) as well as areas external to institutions (the regulatory framework). While much has been done towards ensuring quality, instituting accountability, enabling private participation, promoting internationalization and so on, following are the changes in governance reforms since 2013

**PRIVATE AND FOREIGN PARTICIPATION**

About ten years ago, the distinction between 'private' and 'public' among universities had effectually started to blur, with recommendations from the Narayana Murthy Committee Report being a first step in this direction. Thanks to lower barriers to entry and the evolution of a mandatory accreditation system, quality benchmarks have become the sole basis of differentiation among universities within a certain tier. Today, foreign education providers are also treated on par with Indian institutions, they too being subjected to the same accreditation norms.

**FINANCIAL AUTONOMY**

With provision of block grants, appointment of members on the respective Boards, hiring of faculty with pay beyond minimum prescribed by the Governments, mechanisms of revenue generation and retaining revenue in the Institution over and above usual block grant from the Government. Of late, some of these issues are being raised in the meetings of IIT and IIM Boards/ Councils chaired by the Union Minister, there is a great deal of mutual understanding on some of the issues. Issue concerning horizontal mobility of students for a semester or partial tenure from one Institution/university to another across the States with full transfer of credits is being giving the autonomy . Provision of flexible Academic Calendar and joining of the programmes to encourage in-service population for improving the education content and skill as and when individually possible, similar to “drop-out “and “drop- in”.

**ROLE OF GOVERNMENT IN GOVERNANCE**

Over the years, the government has gradually withdrawn from direct management of public institutions, devolving governance to boards compromising academics, alumni and external members. Instead, it exerts indirect forms of control based largely on mechanisms such as performance-linked funding and quality recognition. The erstwhile regulatory regime of multiple bodies with conflicting and overlapping mandates has given way to a single independent regulator that is largely hands-off, with the regulatory focus shifting from 'high barriers to entry' to 'high standards for accreditation'. Self-regulation and self-critique has now become the norm. The government's role as a provider of funding has also seen some shifts. Over the 13th and 14th plan periods, the funding

model has moved from funding for institutions to funding for individuals (including faculty, students and researchers). As a result, institutions can no longer rely -solely on government monies for operations and expansion, but are increasingly taking greater responsibility for sourcing funding, further increasing their autonomy to plan their own futures.

**MORE EMPHASIS ON THE RESEARCH**

The Union Ministry of Science and Technology and RIKEN, Japan's largest research organization, have signed a Memorandum of Understanding (MoU) to launch joint research programs in the fields of biology, life sciences and material sciences, and genome-related research including systems biology and computational science. Phase 2 of UK-India research programs has been launched. This includes establishment of the new Chemical Biology and Therapeutics Institute in the country, major collaborations on neuroscience and research partnerships in the fields of energy, medicine, business and manufacturing. Kishore Vaigyanik Protsahan Yojana (KVPY).National Program of Fellowships in Basic Sciences, initiated and funded by the Department of Science and Technology, Government of India, Innovation in Science Pursuit for Inspired Research (INSPIRE), Flagship scheme of the Department of Science and Technology, Government of India, to promote careers in scientific research among students .Supports more than 800,000 awards (for age group of 10-15 years), ~ 150,000 internships (for age group of 16-17 years), 28,000 scholarships for undergraduate studies in the sciences (for age group of 17-22 years), 2,150 research fellowships for doctoral research and 270 faculty awards for post doctoral researchers. World class R&D facilities are being set up for several industries in India, including chemicals, automobiles, life sciences, electronics, and technology Between 2011 and 2013, more than 100 companies including Panasonic, Airbus Innovation, BASF, Pfizer, Facebook and LinkedIn, have opened their R&D centres in the country. Top Indian companies have reported the largest growth in R&D investment in FY12 (with a 35% y-o-y growth); this compares with China's 28.8%, the EU's 8.9% and the US' 9% R&D spending in India has the potential to increase from US$32.7 billion in 2010 to US$140 billion in 2030, if its expenditure on R&D as a share of its GDP were to reach 2.5% (similar to the current share of countries such as the UK, France, and Australia)

**MORE FOCUS ON OUTCOME**

Traditionally, regulatory bodies in Indian higher education have been focused on monitoring inputs. Universities were assessed on the size of built-up land, number of books in their library, funds spent on computers and so on instead of on student learning outcomes, their employment readiness or performance in standardized tests. A conscious effort to reverse this anomaly has been made over the years by linking public funding with performance variables. Attempt has also been made to shift the thrust from consumption of allocated funds to outcomes from utilized funds, effecting, at the same time, greater autonomy in the use of allocated funds as well as greater institutional responsibility towards their effective utilization.

**INSTITUTIONAL ACCREDITATION**

The move towards regulating outcomes has been accompanied by the introduction of a more sophisticated quality assurance system based on the establishment of a national accreditation agency for higher education and also several other agencies with a specialized focus. As a result, claims to quality can no longer be based on internal judgment by institutions themselves but have to be justified by an external process of peer review and assessment by quality rating agencies. While the model has been in practice for many years before India adopted it, what is rather distinctive about the Indian accreditation system is that each tier of

universities has a different rating scale, allowing stakeholders to make comparisons across like variables. Periodic assessment and review allows institutions to move up or down the hierarchy of grades within their tier, or even move across tiers. Further, in order to prevent an oligopolistic scenario from building inadvertently, the accreditation system allows fledgling institutions to grow and find a foothold before subjecting them to extensive scrutiny.

**GLOBAL COMPETITIVENESS**

Lastly, much of the 20 years of reform - including in aspects of governance was underpinned by the desire and commitment to emerge as a globally competitive education system. Intel-nationalization has been a powerful driving theme, enabling the Indian higher education sector to both be in consonance with global standards as also emerge a leader in higher education globally. India's higher education institutions are today global in all senses of the word, not least of which is leadership. Today, institutional leaders are selected in an open and competitive process, and as many as 100 of our universities are led by international academics and administrators, a trend that could perhaps be traced back to the appointment of Dr. Ashish Nanda of Harvard Law School as Director of Indian Institute of Management, Ahmedabad - a first of its kind appointment in its day.

India seems to have indeed entered a golden age for higher education. Many progressive steps taken in 12th, 13th and 14th Five Year Plans have come to fruition. The country has emerged to be a global magnet for aspiring learners, and a role model for high-quality affordable educational systems. Today India is the *single largest provider* of global talent, with one in four graduates in the world being a product of the Indian system. India is among *top* 5 *countries globally* in cited research output, its research capabilities boosted by annual R&D spends totaling over US$140 billion. To sum up, the three tiers of Indian universities produce among the best-in-class knowledge creators, problem solvers and process managers, who also display deep social, cultural and ecological sensitivity, are collaborative leaders and responsible citizens. In effect, the Indian graduate of today is not only an excellent human resource but also an admirable human being. Even as India deserves to fully revel in its resounding success of the last two decades, it must remember that to maintain its position of leadership in higher education, the next twenty years call for just as much leadership, vision and commitment as did the last twenty, and a golden vision 2050 should be India's next aspiration!



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७–१८

## मराठी विभाग

*शिक्षण म्हणजे मनाचा विकास होय. स्वत:चा स्वत: वर विश्वास असणं ही आत्मविकासाची पहिली पायरी आहे. ज्ञान हे व्यक्तिच्या मनात अंतर्भूत असते, मनातूनच निर्माण होते. म्हणून प्रत्येक व्यक्तिचा मानसिक विकास शिक्षणातून झाला पाहिजे.*

– स्वामी विवेकानंद



# विद्यार्थ्यांचे लेख

अनुक्रम


- **उच्चशिक्षण** – बालाजी हरकळ
- **भारतातील उच्च शिक्षण** – अर्चना काळे
- **जागतिक सर्वोत्कृष्ट विद्यापीठ सूची आणि भारतातील विद्यापीठे** – सतीश धोत्रे
- **महाराष्ट्रातील विद्यापीठे** – पुनम खंदारे
- **भारतातील उच्च शिक्षणाचे चित्र** – करण बेंद्रे
- **उच्चशिक्षण : सत्र पद्धती व परिणाम** – पंकज मखमले
- **कौशल्य विकास अभ्यासक्रम (SEC)** – सुनिल गिरी
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राध्यापका विषयीचे मत**– पुजा ढगे
- **समकालीन पालकांची उच्च शिक्षणाच्या संदर्भातील मानसिकता** – शिवकन्या मिंड
- **उच्चशिक्षण: एक दिवास्वप्न ?** – अभय शिनगारे
- **भविष्यातील तीव्र स्पर्धात्मक वास्तवाची जाणिव देणारे उच्चशिक्षण** – कुष्णकांत रकटे
- **उच्चशिक्षण व रोजगार संधीचे वास्तव** – दिपाली अंभोरे
- **गुणवत्तेचा 'मार्क'स वाद** – अल्का मोगल

# उच्चशिक्षण

**बालाजी हरकळ**

कला द्वितीय वर्ष

'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या फणीवर तरलेली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे' असे अण्णाभाऊ साठे यांनी एक विधान केले. त्यातून त्यांना श्रमिकांच्या कष्टानेच मानवी जीवन सुखी व समृध्द झाले, त्या कष्टकरी वर्गाची उपेक्षा व शोषण म्हणजे कृतघ्नता ठरते असेही त्यांना वाटते. त्यातील सत्यांश नाकारता येणार नाही. पण श्रमिकांच्या परिश्रमाला आशयपूर्ण आकार देणारे सर्जनशील विचार चिंतन, जे मूलत: ज्ञानव्यवहाराशी संबंधीत असते. या ज्ञानव्यवहारा प्रक्रिया उद्योगाचे उगमस्थान आहे. या राजर्षी शाहू महाराजाच्या विधानातील यथार्थता विचारात घेता एकूणच शिक्षणाचे महत्त्व निरपवाद आहेच. हे खरे असेल तरी शालेय शिक्षणापेक्षा उच्च शिक्षणातूनच सामाजिक शक्तीचे ऐहिक समृध्दीचे व सत्तेचे उगमस्थान कसे असू शकते, याची साक्ष पटावी. म्हणूनच तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या अनुयायांना उच्चशिक्षणाचे महत्त्व समजून सांगताना म्हणतात. ''... बहिष्कृत लोकांनी प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. एक मूलगा बी.ए. झाल्याने आपल्या समाजास जो फायदा होईल तसा एक हजार मुले चौथी शिकली तर होणार नाही.'' सारांश व्यक्ती समाज किंवा राष्ट्राच्या संदर्भाने केवळ साक्षर होणे, असणे पुरेसे नाही तर उच्चशिक्षित असणे फार महत्त्वाचे आहे.

उच्चशिक्षणाचा विषय जेव्हा आम्ही चर्चा किंवा चिकित्सेसाठी घेतो तेव्हा आम्ही समकालीन परिप्रेक्ष्यात व्यक्ती, समाज किंवा राष्ट्राची स्थितीगती नेमकी कशी आहे ? या प्रश्नाची चर्चा- चिकित्सा अटळच असते. अलीकडेच महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील एका उपक्रमातंर्गत करणे 'महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील उच्चशिक्षणाचा तौलाणिक अभ्यास: एक परिचर्चा' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले. चर्चेचे आयोजन करताना जागतिकस्तरावरील सर्वोत्कृष्ट विद्यापीठाची एस सूची प्रसिध्द झाली होती. त्यात भारतातील ८५० विद्यापीठापैकी एकाही विद्यापीठाचा समावेश नव्हता. अलीकडेच अशीच एक मन:स्वी चिड यावी अशी माहिती विद्यापीठ अनुदान मंडळाच्या संकेत स्थळावरून प्रसिध्द झाली आहे. ती म्हणजे २४ विद्यापीठे ही बोगस किंवा अनाधिकृत आहेत. हे कटुसत्य पचवणे कठीणच आहे. सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यापीठाच्या सूचित जसे देशातील एकाही विद्यापीठाचा समावेश नसावा याची जशी चिड आली. तशीच चिड राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या सूचितील महाराष्ट्रातील विद्यापीठाचे स्थान या संदर्भाने देखील आली. देशात इंग्रजानी स्थापन केलेल्या पहिल्या तीन विद्यापीठापैकी एक मुंबई विद्यापीठ आहे. पूर्वेकडील ऑक्सफर्ड म्हणून आम्ही पुणे विद्यापीठाचा गौरव करतो. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ व सामाजिक सुधारणात अग्रेसर असलेला महाराष्ट्र, सहकार व शिक्षणक्षेत्रातील मोठे जाळे बघून व येथील उद्योग-व्यापार वगैरे विचारात घेता किंवा अलीकडील सिलिकॉन व्हॅली व नासातील कुशल मनुष्यबळ पुरविणाऱ्या महाराष्ट्राचे उच्च शिक्षण विषयक चरित्र व चित्र आता संशयास्पद वाटावे. असे का वास्तव तयार झाले ? याची जशी काळजी वाटते.तशीच काळजी महाराष्ट्रातील विविध विभागाचा प्रादेशिक असंतुलीत विकास संदर्भानेही वाटते. म्हणून मराठवाड्यातील शिक्षण हा आमच्या आस्थेचा चिंतेचा व चिंतनाचा विषय राहिला. आजचा मराठवाडा विभाग म्हणजे पूर्वीच्या हैद्राबाद स्टेटचा काही भाग आहे. या भागावरील निजामी राजवटीचे भले कमी वाईटच

परिणाम भोगणारा हा प्रदेश आहे. उच्च शिक्षणाच्या संदर्भात याची साक्ष 'मराठवाड्यातील शिक्षण : एक विवेचक अभ्यास' या ग्रंथातील पुढील विवेचनावरून पटावी.

''उस्मानिया विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी संबंध संस्थानात एकच महाविद्यालय होते. हे निजाम महाविद्यालय मद्रास विद्यापीठाशी संलग्न करण्यात आले होते. १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर औरंगाबाद, वरंगल आणि गुलबर्गा येथे इंटरपर्यंत शिक्षण देणारी महाविद्यालये सुरु करण्यात आली. या महाविद्यालयातील माध्यम उर्दु हेच होते. पदवी पर्यंतची शिक्षण देणारी चार महाविद्यालये हैद्राबाद शहरातच काढण्यात आली. इतर विषयाच्या शिक्षण संस्था आणि पदव्युत्तर पातळी वरील उच्च शिक्षण ही हैद्राबादमध्येच केंद्रित करण्यात आले होते. त्यामुळे इतर जिल्ह्यामधील लोकांना विशेषत: उर्दु व्यतिरिक्त अन्य भाषा बोलणाऱ्या ना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होत नसे. १९४८ मधील पोलीस कार्यवाई पर्यंत ही परिस्थिती होती.''

१९५० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय आणि त्यांच्या समकाळातील स्वामीजीच्या प्रेरणेने नांदेड येथे पीपल्स महाविद्यालयाची स्थापना करेपर्यंत मराठवाड्यात उच्चशिक्षणाची सोयच नाही. पुढे १९५४ मध्ये परभणी येथे कृषी महाविद्यालयाची व १९५६ मध्ये औरंगाबाद येथे वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. तर १९५८ मध्ये औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. मराठवाड्यात केवळ अकरा महाविद्यालये अस्तित्वात होती. पुढील दहा वर्षात ही संख्या ३४ झाली आणि त्यानंतरच्या दशकात ही संख्या ७० झाली तर १९६६ ते १९७६ या दशकात त्यात ४६ ची वाढ झाली. हा वाढीचा वेग १९८३ नंतर वाढला.यावेळी शासनाने विनाअनुदानातील महाविद्यालये सुरु करण्यासाठी धोरणात्मक पुढाकार घेतला. त्याची पार्श्वभूमी अतिशय महत्त्वाची आहे.

१९७०-१९८० या दशकात परदेशात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मुख्य अधिकारी म्हणून भारतीय तरूणांचा समावेश वाढता राहिला. हे वास्तव विचारात घेत शासनकर्त्या वर्गाने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीचा कानोसा घेत धोरणात्मक पातळीवर काही मूलभूत बदल स्वीकारले. विशेषत: राजीव गांधी पंतप्रधान झाल्यावर एकाविसाव्या शतकाची भाषा सुरु झाली. हे शतक माहिती तंत्रज्ञानाचे संगणक युग असल्याचे वारंवार सांगितले गेले. परिणामी अभियांत्रिकी वैद्यकीय विज्ञान आणि व्यवस्थापन शास्त्रातील भर राहिला. या क्षेत्रातील शिक्षण संस्था या स्वयं अर्थसहाय्यीत, विना अनुदान तत्त्वावरच सुरु केल्या. त्याचीच पुन:रावृत्ती पारंपरिक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या स्थापनातून होत राहिली. लक्षणीय बाब अशी की, आमच्या मराठवाड्यात पारंपारिक महाविद्यालये मोठ्या संख्येने सुरु झाली. त्या तुलनेत अभियांत्रिकी व वैद्यकीय - व्यवस्थापन शास्त्र शिक्षण संस्थांचे प्रमाण तसे कमीच राहिले. असे असले तरी महाविद्यालयांची संस्था वाढली. एका विद्यापीठाचे विभाजन करुन अजून एक विद्यापीठ निर्माण झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील सात दशकात मराठवाड्यात उच्च शिक्षण क्षेत्राचा विविधांगाने विकास झाला. त्यातील लक्षणीय बाब म्हणजे संख्यात्मक वाढ नजरेत भरते. फक्त काळजी वाटावी असे चित्र आहे ते या परिसरातील शिक्षण संस्था मधील शैक्षणिक व्यवहाराची गुणात्मकता निरूपयोगी आणि संशयास्पद वाटावी याचे. नावडतीचे मीठ आळणी म्हणतात तसे उर्वरित महाराष्ट्रातील लोकांच्या दृष्टीने आम्ही मागास व गुणवतेचा अभाव असल्याचे बोलणे वाईटच. पण आम्ही जेव्हा अंतर्मुख होऊन न विचार करतो तेव्हा येथील शैक्षणिक व्यवहार, जसे आमचे अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन, संशोधन येथील शिक्षकांची निवड प्रक्रिया, परीक्षा व मूल्यांकन इ.बाबी संदर्भाने आमच्यातील संवेदनशील माणसे अस्वस्थ, असमाधानी व निराशपणे बोलतात. त्याची मात्र तीव्र सल आहे. हे वास्तव नाकारता येत नाही पण बदलता येते. त्या बदलाच्या प्रेरणा, स्वरूप आणि कार्यप्रणाली संदर्भाने विचार व कृती संयुक्तपणे झालीच पाहिजे.

# भारतातील उच्च शिक्षण

**अर्चना काळे**
कला तृतीय वर्ष

भारतात इंग्रजी राजवटीपूर्वी आमच्या उच्च शिक्षणाची पाटी कोरी होती. असे म्हणण्यासारखी परिस्थिती नक्कीच नाही. इ.स.पू. ज्ञानाच्या शोधात आलेले चिनी प्रवासी फायान व इत्सींग भारतात आले होते. त्यांनी नालंदा, तक्षशीला विद्यापीठात बौध्द दर्शनाचा अभ्यास केला. याच विद्यापीठातील अनेक ग्रंथ त्यांनी आपल्या सोबत नेले. त्याच्या नोंदी तथा ऐतिहासिक तपशील अभ्यासताना आम्हाला देखील उच्चशिक्षणाची पूर्व परंपरा असून तो वारसा आम्ही अभिमानाने सांगू शकतो.

वरील ऐतिहासिक वास्तव्यसत्य कुणीच नाकारणार नाही. पण आज उच्चशिक्षणाला आधुनिक ज्ञान– विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा जो परिसस्पर्श लाभलेला आहे. त्या प्रकारचे आधुनिक उच्च शिक्षण म्हणावे असे काही प्राचीन काळात होते. अशी परिस्थिती नक्कीच नाही. म्हणूनच आधुनिक उच्चशिक्षणाची पायाभरणी इंग्रजानी केली. असे नि:संदेह म्हणतांना, ज्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे. अन्यथा आपण अप्रामाणिक व दांभिक असल्याचे वास्तव्य इतरांनी आमच्या लक्षात आणून देणे काही चांगले नाही.

आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना म्हणून १८५७ चे सैनिकांचे बंड किंवा ऐतदेशीयांचा उठाव अथवा स्वातंत्र्ययुद्ध अशा विविध संबोधनातून निर्देशित केली जाते. या घटनेमुळे इंग्रजाची मानसिकता बदलली. तसे त्यांच्या विचार – दृष्टिकोनातही बदल झाले. म्हणूनच वूड साहेबांना भारतातील शिक्षणाबद्दल काही सुधारणा सूचवावे वाटले असावे. भारतात देखील आधुनिक, सभ्य आणि सुसंस्कृत असा समाज निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी उच्चशिक्षणाच्या सोयी देण्याची आवश्यकता आहे. असा वर्ग तयार करतानाच ब्रिटीशांच्या साम्राज्यसत्तेला मुलकी व प्रशासकीय सहकार्य करणारा कारकुन देखील सहजच मिळाला पाहिजे. इंग्लंडवरून अधिकारी व त्याचे हाताखाली बटलर, कारकुन ऐतदेशीय असण्याची एक गरजच होती. जेणे करून ऐतदेशीयांसोबत सेवादास, उपयुक्त असे एक माध्यमही भारतातील शिक्षित लोक असतील. याच विचार जाणिवेने त्यांनी भारतात कोलकत्ता, मुंबई आणि चेन्नई येथे एकदमच तीन विद्यापीठांचे निर्माण केले. यामुळेच इंग्रजानी भारतातील उच्चशिक्षणाचा पाया घातला हे मत रास्त वाटते.

इंग्रजानी कारकुन तयार करणारे कारकुनी शिक्षण दिले असे आम्ही म्हणतो. पण त्या कारकुनी शिक्षणातून पुढील काळातील जो उच्चशिक्षित वर्ग निर्माण झाला, त्यापैकी अनेकजन पुढे प्रशासकीय सेवेत महत्त्वाच्या हुद्यावर गेले. तसे उच्चशिक्षितापैकीच काही वकील, बॅरिस्टर तथा लेखक विचारवंत स्वातंत्र्य चळवळीचे नेते म्हणून सार्वजनिक क्षेत्रात वावरले. राजकीय व सामाजिक सुधारणांचे नेतृत्व देखील याच वर्गाने केले. म्हणूनच देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर याच वर्गातून शासनकर्तावर्ग उदयास आला. हा शिक्षितवर्ग ब्रिटीशाच्याच शैक्षणिक मूशीतून आला, या कारणाने त्याचा भर हा पारंपरिक चौकटीतच आचार – विचार करण्यावर होता. त्यामुळे आमच्या उच्च शिक्षणाचे स्वरूप विशुध्दज्ञानवादी असावे की, उपयोजित विज्ञान आणि तंत्रज्ञानाभिमुख असावे ? या प्रश्नाची योग्य सोडवणूक करता आलेली नाही. परिणामी वेगवेगळ्या अधिकारी तथा विद्वान व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक आयोग नेमले. त्यांनी तसा सखोल अभ्यास केला. अभ्यासपूर्ण काही शिफारशीही केल्या. पण कोणत्याही नव्या सुधारणा करताना विद्यमान शैक्षणिक संरचना व सेवेतील सक्रिय मनुष्यबळाचे नेमके काय करावे ? हा प्रश्नच होता. मग टाकावूतून टिकावू, अभिनव–प्रयोगक्षम असे काही करण्यात आमचा कितीतरी काळ वेळ गेला आहे. आणि पिढ्यानपिढ्या आमच्या शिक्षणाचे मागील पानावरून पुढे वहीखाते आपले चालूच आहे. देशाला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा देशाची लोकसंख्या चाळीस कोटीच्या आसपास होती. उच्चशिक्षणाच्या पायाभूत सोयी नाहीत. देशातील जनता मागास. साक्षरतेचे प्रमाणच अत्यल्प, म्हणजे उच्च शिक्षण घेणारे जवळपास दुर्मिळ प्रजातीचे जीव प्राणी होते. पण आताचे चित्र वेगळे आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या १२१०००००० अशी आहे. त्यात आता लोकसंख्येतील वाढ लक्षात घेता ती १,३०,०००००० अशी असावी. म्हणूनच १८–२३ या वयोगटातील लोकसंख्या तशी अफाटच. यामुळेच जगात तरूणांचा देश भारत असे म्हटले जाते. या तरूण मनुष्यशक्तीचे योग्य संवर्धन व त्यांच्या कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. त्यांचेसमोर चांगल्या स्वप्नांची पेरणी करता येईल. पण स्वप्नपूर्ती साठी, त्यांच्या महत्त्वाकांक्षा अन् सर्जनशक्तीला वाव देणारे उच्चशिक्षण तर हवे आहेच. त्यासाठी मोठे भांडवल तर गुंतवावे लागेलच. त्या बरोबर प्रगत ज्ञान–विज्ञान तंत्रज्ञानातील गती बरोबर जुन्या संरचना व गतिशून्य मनुष्यबळासह असलेल्या व्यवस्थामध्ये मोठे बदल हवेत. असे बदल करणे म्हणजे एक प्रकारचे सर्जिकल स्ट्राईकच असेल. त्याची तयारी देशातील सरकार करणार नाही आणि त्यासाठी बुध्दिजीवी अभिजनपुढे येणार नाहीत. राष्ट्राच्या विकास प्रक्रियेत उच्चशिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आज जे राष्ट्र प्रगत किंवा विकसीत आहेत. त्या देशातील लोकसंख्येच्या प्रमाणात तेथील उच्चशिक्षण संस्थांचे जाळे लक्षणीय दिसते. स्थूलमानाने खालील माहितीचा गोषवारा तसा जूनाच आहे. पण शितावरून भाताची परीक्षा म्हणतात. त्याप्रमाणे वास्तवाचे होण्यासाठी ती साक्ष म्हणून महत्त्वाची वाटते.

| देश | लोकसंख्या | विद्यापीठांची संख्या |
|---|---|---|
| जपान | १२.७ कोटी | ६८४ |
| अमेरिका | २७.६ कोटी | २३६४ |
| यू.के. | ०५.८ कोटी | १०४ |
| भारत | १०५. कोटी | ३०० |

स्थूलमानाने आज भारताची लोकसंख्या२०१०–११ च्या जनगणनेप्रमाणे

१,२०१९३४२२० अशी आहे. तर महाराष्ट्राची लोकसंख्या ११२३७२९७२ अशी आहे. या पार्श्वभूमीवर १२.०४.२०१८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेत स्थळावरील माहितीनुसार देशात ८५० विद्यापीठे आहेत. महाराष्ट्राचाच जर विचार केला तर महाराष्ट्रात केवळ ५५ विद्यापीठे आहेत. त्यापैकी पारंपरिक विद्यापीठांची संख्या तशी कमीच असून, काही महाविद्यालयास अधिकच स्वायत्तता आणि अभिमत विद्यापीठांचा दर्जा दिला. अशा विद्यापीठांचीच संख्या अधिक आहे. त्यात विशेषत:त्वाने अभियांत्रिकी, वैद्यकीय, वाणिज्य व्यवस्थापन तसेच व्यवस्थापनशास्त्र किंवा संशोधन केंद्रास विद्यापीठाचा दर्जा दिला आहे.

अखिल भारतीय उच्चशिक्षण पाहणी अहवालातील माहिती देखील अभ्यासनीय आहे. या अभ्यास पाहणी अहवालास प्रतिसाद देणाऱ्या विद्यापीठांची संख्या ६४२ अशी असून त्यात महाराष्ट्राच्या ४४ विद्यापीठांचा समावेश आहे. यातून देशातील विद्यापीठात व महाविद्यालयात कोणकोणत्या ज्ञान शाखांचे अध्ययन अध्यापन व संशोधन चालते याचेही चित्र पुढे येते.

| विद्यापीठाचा प्रकार | राष्ट्रीय स्तर संख्या | महाराष्ट्र स्तर संख्या |
|---|---|---|
| पारंपरिक–सामान्य | ३०१ | २० |
| कृषी विज्ञान | ३३ | ०४ |
| ललित कला | ०१ | – |
| मत्स्यविज्ञान | ०२ | ०१ |
| वृत्तविद्या | ०१ | – |
| भाषा | ०४ | ०१ |
| विधी | १७ | – |
| वैद्यकीय | २४ | ०५ |
| पौर्वात्य विद्या | ०१ | – |
| ग्रामीण विकास | ०१ | – |
| संस्कृत | १० | ०१ |
| क्रीडा | ०१ | – |
| तंत्रशिक्षण | ८३ | ०३ |
| पशूवैद्यकशास्त्र | १० | – |
| इतर | ११२ | – |

महाराष्ट्रासारख्या अतिशय प्रगत व उच्च शिक्षणाची चांगली पूर्व परंपरा असलेल्या राज्यातील शासनकर्त्या वर्गाने अनेक ज्ञानशाखांसाठी स्वतंत्र विद्यपीठ असते व ते आपल्याही राज्यात असावे असा काही विचार केलेला दिसत नाही. आणि कृषीप्रधान देश व महाराष्ट्रातील प्रगत होती, शेतकरी चळवळ आणि सहकारक्षेत्रातील मोठा दबदबा लक्षात घेता येथील कृषी विद्यापीठाची संख्या केवळ चारच असावी. ही बाब देखील गंभीरच म्हणावी अशी आहे. विज्ञान व तंत्रशिक्षण घेऊन विदेशातील तंत्रक्रांतीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या भारतीयांची संख्या नजरेत भरावी अशी आहे. परंतु अशा प्रकारचे शिक्षण देणाऱ्या व अभ्यास संशोधनाचे नेतृत्व करणाऱ्या विद्यापीठांची संख्या किती ? अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालासाठी विद्यापीठाप्रमाणेच महाविद्यालयाकडूनही अशीच माहिती संकलीत केली. त्यास देशातील २११५८ महाविद्यालयाने प्रतिसाद दिला. तर महाराष्ट्रातील २२९३ महाविद्यालयांनी त्यात प्रतिसाद सहभाग नोंदविला – त्यातूनचही काही अभ्यासनीय व विचाराला चालना देणारी माहिती पुढे येते. या माहितीचा गोषवारा असा आहे.

| ज्ञानशाखा प्रकार | राष्ट्रीय संख्या | महाराष्ट्रातील संख्या |
|---|---|---|
| पारंपरिक (सामान्य) | १३९६८ | १४७९ |
| कृषीविज्ञान | ९८ | २८ |
| वास्तूशास्त्र–शिल्पशास्त्र | ४६ | १२ |

| | | |
|---|---|---|
| कला | १५९ | २४ |
| वाणिज्य | ७७ | २२ |
| संगणक उपयोजन शास्त्र | ९५ | ०६ |
| शिक्षणशास्त्र | ६६९ | ७४ |
| अभियांत्रिकी | १९४७ | १६६ |
| ललितकला | ५३ | ०७ |
| मत्स्यविज्ञान | ०८ | ०२ |
| हॉटेल व्यवस्थापन | १८ | ०४ |
| वृत्तविद्या | ०५ | – |
| विधी | २८२ | ४२ |
| व्यवस्थापनशास्त्र | ४१० | ८० |
| आरोग्य विज्ञान | ४६ | ०७ |
| आयुर्वेद | ४४ | ०५ |
| दंतविज्ञान | ६० | ०३ |
| होमियोपॅथी | ३४ | ०४ |
| इतर | ४३ | ०६ |
| परिचारिका प्रशिक्षण | ४६९ | २४ |
| पौर्वात्य भाषा | २३ | – |
| पॅरामेडिकल | ४१ | ०२ |
| औषध निर्माण | ३२९ | ५३ |
| फिजियोथेरपी | ७५ | ११ |
| संस्कृत | १३७ | ०१ |
| विज्ञान | ४२ | ०८ |
| क्रीडा | २९ | ०४ |
| इतर | १९३१ | २१९ |

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संकेत स्थळावरील नोंदी प्रमाणे आजमित्तीला विद्यापीठांची संख्या ८५० तथा त्याहीपुढे ९०० पर्यंत असेल, असे आलेखातील विवेचनावरून समजते. तसेच महाविद्यालयांची संख्याही ४०,००० पर्यंत असावी. त्यात विद्यापीठापैकी बहुसंख्य विद्यापीठानी अभ्यास पाहणीस प्रतिसाद दिला–तसा व तेवढा प्रतिसाद महाविद्यालयानी दिलेला दिसत नाही. असा प्रतिसाद दिल्याने काही फायदा किंवा न दिल्याने काही नुकसान होते असे नाही. परंतु माहिती सादर करताना काही सोयीचे व काही गैरसोयीचे मुद्दे पुढे येतात हे खरे आहे. पण अशी सोय–गैरसोय या पेक्षा वास्तवचित्र नेमके कसे आहे ही बाब पुरेशी स्पष्टच होत नाही. परिणामी विद्यापीठ अनुदान आयोगाला बेकायदा विद्यापीठाच्या मार्फत जो शैक्षणिक उद्योग व्यवहार चालतो. तो टाळण्यासाठी अशा विद्यापीठाची सूची जाहीर करावी लागली. कारण अशाच विद्यापीठातून पदव्यांचे अलंकार मिरवणारे काही महाभाग असतात. त्यातील एक नाव हे भारत सरकारच्या एका मंत्र्याचे होते. ही चर्चा लोक विसरतील पण शिक्षणतज्ज्ञाना असे कलंक ठळकपणे दिसले जाणे दुःखदच वाटते. जी गोष्ट विद्यापीठांची तशीच परिस्थिती महाविद्यालयांची आहे. म्हणून उच्च शिक्षण व्यवहार चालवणाऱ्या शैक्षणिक पेढ्यांची माहिती तर अशा प्रकारच्या माहितीतून पुढे येते.

# जागतिक सर्वोत्कृष्ट विद्यापीठ सूची आणि भारतातील विद्यापीठे

**सतीश धोत्रे**
कला तृतीय वर्ष

१९९१ मध्ये भारताने जागतिक व्यापार संघटनेसोबत करार केला. तेव्हा पासून मुक्त व्यापार व मुक्त अर्थव्यवस्था असा आम्ही भारताच्या लोकांनी जागतिकीकरणाला सकारात्मकपणे प्रतिसाद दिला. त्या काळात जागतिक सौंदर्यस्पर्धा मध्ये भारतीय तरुणीची नावे दिसू लागली. याचे भारतातील सर्व माध्यमांनी खूपच कौतुक केले. ते गैर होते असे म्हणता येणार नाही. पण ऑलीम्पीक सारख्या जागतिक क्रीडा स्पर्धामध्ये आमची कामगिरी समाधानकारक नसायची. अभिमान वाटावा असेही काही नाही. मग अचानक जागतिक सौंदर्य स्पर्धामधील भारतीय तरुणीना मिळत असलेले यश अभिमानाने मिरवावे असे वाटले तर गैर म्हणता कसे येईल ?

जागतिक सौंदर्यस्पधामधील भारतीय तरुणीच्या यशाचा अर्थ व अन्वयार्थ असा की, मुक्त व्यापारासाठी मोठ्या लोकसंख्येची मोठी बाजारपेठ आता खुली झाली. या बाजारपेठेत ग्राहकांना वस्तु खरेदीसाठी उत्तेजित करायचे तर वस्तूच्या जाहिराती कराव्या लागतील. या जाहिरातीत ज्या स्त्री सौंदर्याचं दर्शन घडवायचं ती स्त्री सुंदर असणं व भारतीय असणं ही बाजाराचीच गरज होती. म्हणून जागतिक मंचावरुन भारतीय स्त्रीला प्रथम सुंदर असल्याचे जाहीर करायचे. त्या स्त्रीला जाहिरातीसाठी मॉडेल म्हणून रोजगार किंवा मानधन द्यावयाचे मग ती स्त्री वस्तूच्या जाहिरातीच्या निमित्ताने त्या कंपनीची पेड सर्व्हंट म्हणून वापरायची. त्या स्त्री मार्फत विक्रीची उद्दिष्ट गाठायची असा हा सौंदर्य स्पर्धा आयोजनाचा मूळ हेतू होता. त्यास अनुकूल सौंदर्याच्या निकषाचे निर्धारण करण्यात येत असे.

हा सर्व तपशील आठवण्याचे एक महत्त्वाचे कारण असे आहे की, जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट विद्यापीठांची सूची जाहीर केली जाते. त्या सूचीत भारतातील एक ही विद्यापीठ दिसत नाही. ते बघून उच्च शिक्षण क्षेत्रातील अनेक विद्वान शिक्षणतज्ज्ञ चिंता करतात. सर्वोत्कृष्ट विद्यापीठाच्या सूचीत भारतातील एकही विद्यापीठ नाही याचा अर्थ असा की, जागतिक दर्जाचे एकही विद्यापीठ भारतात नाही हे वास्तव स्वीकारले तर आमच्या देशातील विद्यापीठे अतिशय सूमार दर्जाचीच असतील. अशा सूमार दर्जाच्या विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा ही सुमारच असेल. येथील शिक्षकही सुमारच असतील अभ्यासक्रमही सुमारच असतील. या विद्यापीठातून शिकलेले पदवीधरही सूमारच म्हणजे आम्ही सगळे अकूशल बेकार व टूकारच असू तेव्हा जागतिक स्पर्धेत आम्ही कसे टिकावे ?

हे सर्व वास्तव अन् कटू सत्य स्वीकारताना मनाला यातना ही होतात. पण मनात सळसळणारा प्रश्न उपस्थित करावा वाटतो. एकविसाव्या शतकातील संगणक क्रांती, माहिती तंत्रज्ञानाचा जो बोलबाला झाला. तेव्हा सिलिकॉन व्हॅलीत कर्तृत्त्व गाजवणारे

भारतीय तरुण आयटी इंजिनिअरनी कोणत्या विद्यापीठातून पदवी घेतली होती ? त्यांना 'इटलेक्चुल कुली' म्हणून हिणवलं असलं तरी त्यांची बौद्धिक संपदा नजर अंदाज कशी करावी ? हे देखील वास्तव आहे की, विदेशात कर्तृत्त्व गाजवणाऱ्या तरुण बुद्धिमान पदवीधरांचा येथे शिक्षण झाले म्हणून अभिमान बाळगताना देशातील सुशिक्षित बेरोजगारांची मोठी फौज आहे ते पाप – पुणे विद्यापीठाच्याच खात्यावर नोंदवावे लागते. असे असले तरी आमची विद्यापीठे जागतिक सर्वोत्कृष्ट विद्यापीठाच्या यादीत नसणारच कारण विकसीत देशाना उच्च शिक्षणाची भांडवली बाजारपेठा असलेल्या विद्यापीठावरील श्रेष्ठत्त्वाची मोहर आपल्याच ताब्यात असावी असे वाटते. म्हणून आमच्या सावळ्या तरुणीना ते जागतिक स्तरावर सुंदर म्हणून मान्यता देतात. कारण त्यांना भारतातील व्यापारासाठी जाहिरात करणारे कंपनीचे प्रचार दूत हवे असतात. तेव्हा आमच्या विद्यापीठास ते सर्वोत्कष्ट म्हणतील तर विकासशील व मागास देशातील बुद्धीमान तरुण उच्चशिक्षण घेण्यासाठी विदेशी मुद्रा घेऊन भारतात येतील. कारण विकसीत पाश्चात्यदेशापेक्षा भारतातील उच्चशिक्षण त्यांना स्वत: मस्त व उपयुक्त वाटण्याची शक्यता आहे. शैक्षणिक व्यापारात भारताची भागीदारी मर्यादित करण्यासाठी ते सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचे निकषही स्वत:ची सोय – गैरसोय विचारात घेऊन करत नसतील कशावरुन ?

असा विचार करून अश्वेतानी जसे, 'ब्लॅक इज ब्युटी' चा उद्‌घोष करीत श्वेतवर्णीयांचे सौंदर्याची परिमाणंच नाकारली होती. त्या प्रमाणे आम्ही देखील विकसीत राष्ट्रानी सर्वोत्कृष्टतेची जी परिमाणं नक्की केली तीच नाकारण्याची गरज आहे. कारण जे चकाकतं ते सोनंच असतं असं नाही.

कुणी म्हणतील म्हातारीनं कोंबडा झाकला म्हणून कोंबडयाने बांग दिली नाही. म्हणून सूर्य उगवतच नाही. असे नाही. सूर्याचा तो प्रकाश एक वास्तव सत्य आहे. तसेच सर्वोत्कृष्टतेचे आहे. त्यांचे निकष नाकारले तरी सर्वोत्कृष्टतेची आपले निकष तरी काय असू शकतात ? या संदर्भाने एकच सांगता येईल की, प्रतिकूल परिस्थितीत स्वत:ला सिद्ध करताना कठोर परिश्रमाने काठावर पास होणारा विद्यार्थी देखील विशेष प्राविण्यासह उत्तिर्ण झालेल्या मुलाच्या स्पर्धेत पुढे जातो. कारण त्याला वास्तवाची, स्पर्धेची यशाची अशी एक जाणिव असते की, यश सोप नसतं. ते पुस्तकातील अक्षरज्ञानाच्या सहाय्याने जसे मिळत. त्याच प्रमाणे अनुभव – निरिक्षण व शारीरिक परिश्रमानेही मिळते. आमच्या बुद्धिजीवी अभिजनाने, शासनकर्त्या वर्गाने व या प्रक्रियेत सहभागी अशा शिक्षक व सहयोगी शिक्षणकर्मींनी ठरवावे की, मी माझ्या सर्व क्षमता माझ्यासाठीच नाही तर बहुजनांच्या हितासाठी सुखासाठी व मंगलमय समाधानासाठीच सर्जक कृतीप्रवण करणार आहे. मग केवळ विद्यापीठच नाही तर आमच्या देशातील प्राथमिक – माध्यमिक शाळा देखील जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट म्हणून स्वीकारली जावी या साठी माझ्या सर्वच क्षमता मी वापरणार आहे. आम्ही आता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ग्राहक म्हणून नाही तर वस्तूचे निर्माते, भांडवलदार व्यापारी जे शोषक नसतील तर महात्मा गांधीजीच्या भाषेत सामाजिक दायित्त्वाची भावना घेत. 'जोडोनीया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी' असे विश्वस्थ असतील.

# महाराष्ट्रातील विद्यापीठे

**पुनम खंदारे**
कला तृतीय वर्ष

सर चार्लस वूड यांनी भारतातील शिक्षण विषयक धोरण काय असावे ? येथे शैक्षणिक सेवेचा विकास व विस्तार कसा करावा. या अनुषंगाने ब्रिटीश सरकारच्या धोरणा संदर्भाने काही निर्देश केले. तो वूडचा खलिता म्हणजे भारतातील उच्च शिक्षणाचा एक पथदर्शी कार्यक्रम आहे. त्याचाच परिणाम म्हणून भारतात स्थापन झालेल्या तीन विद्यापीठ, एक विद्यापीठ तत्कालीन मुंबई प्रान्तात स्थापन झाले. तेच विद्यापीठ आज मुंबई विद्यापीठ नावाने सुप्रतिष्ठीत आहे. १८ जुलै, १८५७ रोजी या विद्यापीठाची स्थापना झाली. स्वातंत्र्य पूर्व काळात ते 'बॉम्बे युनिव्हर्सिटी' या नावाने प्रसिध्द होते. सप्टेंबर १९९६ पासून मुंबई विद्यापीठ, मुंबई असे या विद्यापीठाचे नामांतर झाले. तसेच पुढे महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रयत्नाने १९०७ मध्ये महिला साठी एक स्वतंत्रपणे महिला महाविद्यालयाची स्थापना झाली. त्यानंतर १९१६ मध्ये खास महिलांसाठीच स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाच्या निर्मितीसाठी येणारा जो खर्च आहे त्याचा भार तत्कालीन दानशूर व शिक्षणप्रेमी विठ्ठलदास ठाकरसी यांनी उचलला. त्यांच्याच प्रयत्नाने हे महिला विद्यापीठ उभे राहिले. म्हणून या विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' अर्थात एस.एन.डी.टी. विद्यापीठ म्हणूनच ओळखले जाते.

वरील दोन्ही विद्यापीठांचे अस्तित्व मुंबई शहरातील असले तरी कार्यक्षेत्र तसे व्यापकच होते. पण त्या काळात महाराष्ट्रातील आजचा मराठवाडा विभाग व विदर्भ हा प्रदेश मुंबई प्रान्तास संलग्न नव्हता. विदर्भ, मध्यप्रान्त आणि विदर्भ या नावाने ओळखला जात असे. तर मराठवाडा हैद्राबाद संस्थानाचा भाग होता. आजचा महाराष्ट्र निर्माणच झालेला नाही. पूर्वीच्या मध्यप्रान्तातील नागपूर येथे ०४ ऑगस्ट,१९२३ साली इंग्रजानीच नागपूर विद्यापीठाची स्थापना केली. जबलपूर, अमरावती व नागपूर या परिसरातील महाविद्यालये यासाठी कार्यरत असलेले हे विद्यापीठ. मराठवाड्यात तर तेव्हा उच्च शिक्षणाची सोयच नाही. १९१८ मध्ये हैद्राबाद येथे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर संपूर्ण संस्थानात हैद्राबाद वजा जाता केवळ दोनच शहरात महाविद्यालय निर्माण करण्यात आले. त्यापैकी एक औरंगाबादचे शासकीय महाविद्यालय एक आहे. हे महाविद्यालय देखील इंटर पर्यंतचे म्हणजे आजच्या

भाषेत केवळ बारावी पर्यंत होते.

याचाच अर्थ असा की, स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबई आणि नागपूर जे वर्तमान काळात महाराष्ट्र राज्याच्या राजधानी व उपराजधानीची शहरे आहेत. अशा केवळ दोनच शहरात उच्च शिक्षणाची केंद्र होती. म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हाची ही परिस्थिती आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नजिकच्या काळात १० फेब्रुवारी १९४९ मध्ये पुणे विद्यापीठाची स्थापना झाली. हे खरे असले तरी पुणे उच्चशिक्षणाचे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळातच सुप्रतिष्ठित झालेले होते. त्याचे कारण असे की, देशातील सर्वात जुन्या शैक्षणिक संस्थाच्या मध्ये तिसऱ्या क्रमांकावर असलेले 'द हिंदू कॉलेज' ची स्थापना ०६ ऑक्टोंबर १८२१ मध्ये झालेली होती. म्हणजे मुंबई विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी ३६ वर्षे अगोदर पुण्यात हे महाविद्यालय स्थापन झालेले आहे. ०७ जानेवारी १८५१ पासून 'द हिंदू कॉलेज' चे नामांतर 'द पुना कॉलेज' असे झाले आणि १५ नोंव्हेबर १८६४ मध्ये त्याचे नाव 'डेक्कन कॉलेज' असे झाले. हे महाविद्यालय काही काळ विश्रामबागवाड्यात सुरु होते. नंतर वानवडी परिसरात व तेथून येरवडा येथे स्थलांतरीत झाले. हा उल्लेख अतिशय महत्त्वाचा आहे. कारण तत्कालीन पुणे शहराच्या बाहेर हे महाविद्यालय गेले. परिणामी विद्यार्थी संख्या कमी झाली. या कारणाने १९३४ मध्ये इंग्रजानी हे महाविद्यालय बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पण स्थानिक नागरिक तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी यांच्या प्रयत्नाने हे महाविद्यालय पुन्हा १७ ऑगस्ट, १९३९ पासून सुरु करण्यात यश संपादन केले. म्हणून आज राज्यातील सरकारी आणि केंद्रिय विद्यापीठाच्या बरोबरीने सक्रिय असलेल्या अभिमत विद्यापीठामध्ये सुप्रतिष्ठीत असलेले 'डेक्कन कॉलेज' पदव्युत्तर आणि संशोधन संस्थांच्या समावेश ०५ मार्च १९९० पासून करण्यात आला. तरी प्रत्यक्षात ०१ जून, १९९४ पासून हे विद्यापीठ स्वतंत्रपणे कार्यरत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील उच्चशिक्षण केंद्रापैकी जसे 'डेक्कन कॉलेज' एक महत्त्वाचे आहे. तेवढयाच तोलामोलाची संस्था म्हणून पुण्यातील 'गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स ऍन्ड इकॉनॉमिक्स' या संस्थेचा उल्लेख करावा लागेल. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे नावाने असलेल्या या संस्थेची स्थापना भारत सेवक समाज व्दारा १९३० मध्ये झाली. अर्थशास्त्र या विषयात सखोल संशोधन करणारी देशातील सर्वात जुनी संस्था असाही या संस्थेचा लौकिक आहे. सुरुवातीच्या काळात केवळ एम.ए. एम.फिल. पीएच.डी. चे अभ्यासक्रम येथे सुरु होते. तेव्हा प्रारंभी मुंबई विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या संस्थेला १९९३ साली स्वतंत्र अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला. ही परिस्थिती विचारात घेतली तर आजच्या महाराष्ट्राचा विचार केल्यास स्वातंत्र्यपूर्व काळात केवळ तीनच विद्यापीठे होती. चौथे विद्यापीठ पुणे आहे. त्या नंतर औरंगाबाद, कोल्हापूरचे विद्यापीठ निर्माण झाले. तेव्हापासून राज्यशासनाच्या वतीने विद्यापीठास व्यक्तीनाम देण्याची प्रथा पडली. तत्पूर्वी अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाचे नामांतर हा असा एक विषय आहे. ज्यामुळे विद्यापीठ परिसर काही काळ अस्वस्थ व धगधगता राहतो. आजही नवे विद्यापीठ निर्माण झाले की, त्याचे नाव काय असावे हा एक वाद विषय असतो. पण त्या विद्यापीठाच्या निर्मिती मागील प्रेरणा, त्या विद्यापीठाचे स्वरूप त्यासाठीच्या भौतिक सुविधा, तेथील कर्मचारी, शिक्षक, अभ्यासक्रमाचे स्वरूप या विषयावर कधी कुणी जाहीरपणे बोलत नाहीत.

असो. महाराष्ट्राचा जो प्राकृतिक भूगोल आहे त्याप्रमाणे पाच विभागात महाराष्ट्र विभागला आहे. १) मराठवाडा २) विदर्भ ३) कोकण ४) पश्चिम महाराष्ट्र ५) खानदेश या पाच विभागातील एकूण विद्यापीठाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**१) मराठवाडा :**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
२. महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, औरंगाबाद.
३. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी.
४. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**२) विदर्भ :**

१. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक नागपूर.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर.
३. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नागपूर.
४. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.
५. दत्ता मेघे इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स, वर्धा.
६. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा.
७. संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती.
८. महाराष्ट्र पशूवैद्यक व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर.
९. गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली.

**३) खानदेश :**

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**४) मुंबईसह कोकण :**

१. मुंबई विद्यापीठ, मुंबई.
२. सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ फिशरी एज्युकेशन, वर्सोवा – अंधेरी (प.) मुंबई.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविज्ञान विद्यापीठ, लोणेरे जि. रायगड.
४. होमीभाभा नॅशनल इन्स्टिटयूट, मुंबई
५. इंदिरा गांधी इन्स्टिटयुट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च सेंटर, मुंबई.
६. इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलाजी, माटुँगा, मुंबई.
७. इंटर नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ पापुलेशन सायन्स, देवनार, मुंबई.
८. टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई.
९. टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई.
१०. पद्मश्री डी.वाय.पाटील विद्यापीठ, नेरूळ, नवी मुंबई.
११. नरसी मोंनजी इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, विलेपार्ले (प.) मुंबई.
१२. एम.जी.एम.इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स, नवी मुंबई.
१३. महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, देवनार मुंबई.
१४. कोकण कृषी विद्यापीठ दापोली जि.रत्नागिरी.
१५. ऑमिटी युनिव्हर्सिटी, भातन–पनवेल मुंबई.

**५) पुणे शहर :**

१. अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ, चऱ्होली (बु.) पुणे.
२. भारती विद्यापीठ, पुणे.
३. डेक्कन कॉलेज ऑफ पोष्ट ग्रज्युएट ऍन्ड रिसर्च सेंटर, पुणे
४. डी.वाय.पाटील संत तुकाराम नगर पिंपरी चिंचवड.
५. डॉ. विश्वनाथ कराड एम.आय.टी. वर्ल्ड पिस युनिव्हर्सिटी कोथरूड पुणे.
६. फ्लेम युनिव्हर्सिटी, ता.मुळशी जि.पुणे.
७. गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स ऍन्ड इकॉनॉमिक्स, डेक्कन पुणे.

८. इन्स्टिटयुट ऑफ ऑर्ममेंट टेक्नालॉजी, पुणे.
९. एम.आय.टी. डिझाईन ऍन्ड टेक्नालॉजी युनिर्व्हसिटी लोणी काळभोर पुणे.
१०. स्पायर (Spicer) ऍडव्हेनस्टीट युनिर्व्हसिटी, पुणे.
११. सिम्बॉयशीस इंटरनॅशनल, ता.मुळशी पुणे.
१२. सिम्बॉयशीस स्कीलस् ऍन्ड ओपन युनिर्व्हसिटी, पुणे.
१३. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
१४. विश्वकर्मा युनिर्व्हसिटी, पुणे.

**उर्वरित पश्चिम महाराष्ट्र**

१. डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर.
२. कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स, कराड जि.सातारा.
३. संजय धोडोपंत युनिर्व्हसिटी, हातकणंगले जि.कोल्हापूर.
४. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
५. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
६. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
७. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.नगर.
८. प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स, राहता जि.नगर.
९. संदिप युनिर्व्हसिटी, महीरवाणी, नाशिक.

वरील सूचीचे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास एक अतिशय महत्त्वाची बाब पुढे येते ती अशी की, पुणे शहरातच पारंपरिक आणि व्यावसायिक शिक्षण देणारी विद्यापीठे एकूण १४ आहेत. तसेच मुंबई शहरात १३ आहेत. याचाच अर्थ असा की, या दोन शहरातच महाराष्ट्रातील एकूण विद्यापीठापैकी अर्ध्यापेक्षा जास्तीचे विद्यापीठे आहेत. मुंबई–नाशिक–अहमदनगर व पुणे असा एकत्रित विचार केल्यास हा उच्च शिक्षणाचा असाच एक सुवर्ण त्रिकोण आहे. मुंबईसह कोकणाचा विचार केल्यास एक रत्नागिरीचा अपवाद वजा सर्वच विद्यापीठे मुंबई व शहराच्या लगत आहेत. अशीच स्थिती पश्चिम महाराष्ट्राची इथे सोलापूरला दक्षिण महाराष्ट्रासाठी एक, उत्तर महाराष्ट्रासाठी एक अशी विद्यापीठे आहेत. विदर्भात नागपूरचा अपवाद वजा मेडिकल सायन्स व तंत्रशिक्षणाच्या सुविधा कमीच आहेत.

मराठवाड्यात पारंपारिक दोन विद्यापीठे आहेत. एक कृषी आणि एक विधी विद्यापीठही आहेत. पण तंत्रशिक्षण व व्यवस्थापनशास्त्र तथा अन्य उपयोजित ज्ञान शाखातील शिक्षणाच्या संदर्भात निराशा वाटावी अशीच परिस्थिती आहे.

सारांश रूपाने सांगायचे तर महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाची परिस्थिती देखील अन्य क्षेत्रातील विकासाबाबत ही प्रादेशिक असमतोल आहे. त्यास उच्चशिक्षणही अपवाद नाही.

महाराष्ट्रातील उच्चशिक्षण : संख्यात्मक गोषवारा

| | | |
|---|---|---|
| केंद्रिय विद्यापीठे | : | ०१ |
| राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या संस्था | : | ०३ |
| राज्य विद्यापीठे | : | १८ |
| राज्य मुक्त विद्यापीठ | : | ०१ |
| शासकीय अभिमत विद्यापीठे | : | ०७ |
| खासगी अभिमत विद्यापीठे | : | १४ |
| एकूण | | ४४ |
| पारंपरिक सामान्य विद्यापीठे | : | २० |
| कृषी | : | ०४ |
| मत्स्यविज्ञान | : | ०१ |
| भाषा | : | ०१ |
| वैद्यकीय | : | ०५ |
| संस्कृत | : | ०१ |
| तांत्रिक विद्यापीठे | : | ०३ |
| इतर | : | ०९ |
| एकूण महाविद्यालयाची संख्या | : | ४६०३ |
| १००००० लोकसंख्येशी प्रमाण | : | ३४ |
| प्रत्येक महाविद्यालयाची प्रवेशीत | | |

| | | |
|---|---|---|
| सरासरी विद्यार्थी संख्या | : | ६८५ |

महाविद्यालयाचे विद्याशाखानिहाय संख्या.

| | | |
|---|---|---|
| पारंपारिक साधारण | : | १४७९ |
| कृषी | : | २८ |
| वास्तूकला शास्त्र | : | १२ |
| कला | : | २४ |
| वाणिज्य | : | २२ |
| संगणक उपयोजन | : | ०६ |
| शिक्षणशास्त्र | : | ७४ |
| अभियांत्रिक व तंत्राशिक्षण | : | १६६ |
| ललितकला | : | ०७ |
| मत्स्यविज्ञान | : | ०२ |
| हॉटेल व पर्यटन व्यवस्थापन | : | ०४ |
| विधी | : | ४२ |
| व्यवस्थापन शास्त्र | : | ८० |
| वैद्यकीय | : | २५ |
| आरोग्य विज्ञान | : | ०७ |
| आयुर्वेद | : | ०५ |
| दंतवैद्यकशास्त्र | : | ०३ |
| होमियोपॅथी | : | ०४ |
| इतर | : | ०६ |
| नर्सिंग | : | २४ |
| वैद्यकीय सेवा सहाय्य अभ्यासक्र | : | ०२ |
| औषध निर्माण | : | ५३ |
| फिजियोथेरपी | : | ११ |
| संस्कृत | : | ०१ |
| विज्ञान | : | ०८ |
| क्रीडा व योग शिक्षण | : | ०४ |
| इतर | : | २१९ |

महाराष्ट्रातील संलग्न विद्यापीठे व त्यांचेशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या.

| | | |
|---|---|---|
| मुंबई विद्यापीठ, मुंबई | : | ७५० |
| एस.एन. डी.टी. मुंबई | : | १२८ |
| सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. | : | ६४१ |
| शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर | : | २८३ |
| सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | : | ९३ |
| आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | : | ३४२ |
| डॉ. बा. आं.म. वि. औरंगाबाद | : | ४०५ |
| स्वा. रा.ती.म. वि. नांदेड | : | २७८ |
| संतगाडगे महाराज विद्यापीठ, अरावती | : | ३३७ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर | : | ५०१ |
| गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली | : | १६९ |
| उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | : | |

पदवी स्तरावरील २०१६-१७ चे प्रवेशीत विद्यार्थी

| | | |
|---|---|---|
| बी.ए. | : | ९५२७०६० |
| बी.एस.सी. | : | ४९७८५६४ |
| बी.कॉम. | : | ३४८४३०१ |
| बी.ई. / बी.टेक. | : | ४०८५५२१ |
| बी.एड. | : | ८१०९१४ |
| बी.सी.ए. | : | ४१५००७ |
| बी.बी.ए. | : | ३८३८२७ |
| एल.एल.बी. | : | २०५४०२ |
| बी.फार्म | : | ३१३७७६ |
| बी.एस.सी. नर्सिंग | : | २१८८८२ |
| एम.बी.बी.एस. | : | २११३६६ |

# भारतातील उच्च शिक्षणाचे चित्र

**करण बेंद्रे**
वाणिज्य द्वितीय वर्ष

भारतामध्ये उच्च शिक्षणाची परंपरा फार - प्राचिन काळापासून आहे. नालंदा आणि तक्षशीला या प्राचीन विद्यापिठांच्या अनुरोधाने उच्च शिक्षणाचा वारसा भारतामध्ये आहे. भारतामध्ये उच्च शिक्षणाची सुरूवात खऱ्या अर्थाने वसाहतवादाच्या काळापासून झालेली दिसते. देशात नवीन समाजव्यवस्था , राष्ट्रीय स्वातंत्र्य, नवीन तंत्रज्ञान आणि राष्ट्रिय नेतृत्त्व निर्माण करण्या साठी लोकमान्य टिळकांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेकांनी उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांची निर्मिती केली.

भारतामध्ये तंत्रज्ञान व कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, भारताला तंत्रज्ञाना बाबतीत स्वावलंबी बनवने, आणि जात, धर्म, लिंग, भाषा यासारख्या विषमतेवर मात करुन समताधिष्ठित समाजाची निर्मिती करण्यासाठी सामाजिक नेतृत्व तयार करणे, अशी उद्‌दीष्टे स्वातंत्र्य चळवळीतील सामाजिक आणि राजकीय नेतृत्वांनी बाळगली. जी की, सध्याच्या समाजामध्ये उच्च शिक्षणाच्या माध्यमातून साध्य होताना दिसत आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतात उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने खालील समित्या स्थापित केल्या.

१) डॉ. राधाकृष्णन आयोग (१९४८)

२) डी. एस. कोठारी आयोग (१९६४)

३) राष्ट्रिय शिक्षण धोरण (१९८६-१९९२)

४) मुकेश अंबानी - कुमारमंगलम बिर्ला कार्यगट (२००२)

५) राष्ट्रिय ज्ञान आयोग (२००७)

६) प्रा. यशपाल समिती (२००८)

भारतामध्ये उच्च शिक्षणाची पायाभरणी करण्यासाठी, विद्यमान उच्चशिक्षण परिस्थितीमध्ये विकास घडविण्यासाठी व नवीन उच्चशिक्षण देणाऱ्या विद्यापीठांची निर्मिती करण्यासाठी केंद्र सरकारने वरील समित्या स्थापन केल्या होत्या.

परंतु असे असले तरीही, उच्चशिक्षणाच्या बाबतीत देशामध्ये विद्यार्थ्यांचा कल फार कमी आढळतो. २०१२-१३ च्या सर्व्र्क्षणानुसार भारतामध्ये उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात सकल नोंदणीचे प्रमाण केवळ १७ टक्के होते, नंतर हेच प्रमाण २०१६-१७ च्या सर्वेक्षणानुसार २५.२ टक्के इतके होते. एकंदरीत उच्चशिक्षण घेणाऱ्याची संख्या ही असमाधानकारक आहे.

सध्या भारतामध्ये उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या ८६४ आहे. ज्यामध्ये केंद्रीय विद्यापीठ, आयआयटी, एन.आयटी समाविष्ट आहेत. आणि महाविद्यालयांची संख्या ५१ हजार सातशे आहे.

वरील महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठांच्या

आकडेवारीचा विचार केलातर लक्षात येते की भारतातील उच्चशिक्षणाचे भांडवली बाजार क्षेत्र किती भक्कम आहे. परंतु वास्तविक पाहता, आजच्या उच्चशिक्षणाची गरज भागविण्यासाठी ही आकडेवारी अपुरी पडते.

उच्चशिक्षणाचे उद्दिष्टे

लोकमान्य टिळकांच्या दृष्टीकोनातून पाहिले तर उच्चशिक्षणामुळे समाजात खालील प्रमाने आमूलाग्र बदल घडून येतात.

१) उच्च शिक्षणामुळे ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानाचा प्रसार होतो.

२) उच्च शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तिगत विकासाचे साधन आहे तसेच बौद्धिक क्षित्तिजाचा विस्तार करते आणि व्यक्तीचे सक्षमीकरण करते.

३) उच्चशिक्षण हे मानवाचे मानवी संसाधनामध्ये (Human Resources) रुपांतर करते, आणि ते उत्पादन आणि आर्थिक वृद्धीचे साधन आहे.

थोडक्यात सांगायचे तर, 'व्यक्तिमत्त्व विकास', 'राष्ट्रीय विकास' आणि 'ज्ञानाधिष्ठीत समाजाची निर्मिती' ही तीन प्रमुख उद्‌दीष्टे उच्च शिक्षणाच्या माध्यमातून साध्य होतात. दर, पाच वर्षानंतर सरकार बदलत आणि बदलत्या सरकारसोबत विकासाकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलतो. म्हणजे साहजिकच प्रत्येक सरकार विकासासाठी वेगवेगळ्या योजना तयार करत आणि राबवत. तसेच सद्य स्थितीतील सरकारही उच्चशिक्षणाच्या विकासासाठी एका प्रस्तावावर विचार करत आहे, तो म्हणजे असा की, युनिव्हर्सिटी ग्रांट कमिशन (UGC) आणि ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (AICTE), या दोन्ही संस्था कालबाह्य करुन त्या ऐवजी हायर एज्युकेशन एम्पावरमेंट रेग्युलेशन एजन्सी, (HEERA) ही नविन संस्था लवकरच स्थापन करण्यात येईल.

या निर्णयाचा उद्देश असा राहील की, सामान्य उच्च शिक्षण आणि तांत्रिक उच्च शिक्षण एकाच छताखाली आणले जाईल. ही योजना मनुष्यबळ विकासमंत्रालय आणि निती आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आखली आहे.

या सोबतच शासन विद्यार्थांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी विविध सवलती व सुविधा प्रदान करते. यामध्ये विविध १४ प्रकारच्या राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्या विद्यार्थांना शिक्षणासाठी देते. परंतु शासन अशा सेवा, सुविधा विद्यार्थ्यांना जरी पुरवत असले तरी वास्तवात मात्र भारतातील उच्च शिक्षण क्षेत्राला विविध अडथळ्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याची उदाहरणे खालील प्रमाणे.

१) जागतिकीकरणाचे आव्हान :

जागतिकीरणाचा उच्च शिक्षणावर पुढीलप्रमाणे परीणाम होतो.

१) जागतिकीकरणामुळे उच्च शिक्षण हे व्यवसायाभिमुख होत चालले आहे.

२) जागतीकीरणामुळे शिक्षणाचे खाजगीकरण फार वेगाने होत आहे.

३) उच्च शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण होत आहे आणि त्यामुळे नफेखोरीला वाव मिळत आहे.

४) उच्च शिक्षणावर अधिक खर्च करण्याबाबत शासनाच्या क्षमतेवर मर्यादा आल्या आहेत.

२) खाजगीकरणाचे आव्हान

खाजगीकरणामुळे उच्च शिक्षण फार खर्चिक झाले आहे, त्यामुळे समाजाच्या विविध आर्थिक पार्श्वभूमीतून येणारी व्यक्ती उच्च शिक्षण घेण्याचे नाकारतात. परिणामी मनुष्यबळ अपुरे पडते आणि अप्रत्यक्षरित्या राष्ट्राच्या प्रगतीमध्ये तूट निर्माण होते.

३) धोरणात्मक निर्णयाचा अभाव –

उच्च शिक्षण हे प्रत्यक्षपणे विद्यार्थांच्या रोजगारक्षमतेवर परीणाम करते, त्यामुळे उच्च शिक्षणाचे खाजगीकरण हा विषय सार्वजनिक विवादाचा ठरतो. परिणामी या बद्दल धोरणात्मक निर्णयाचा अभाव आढळून येतो.

४) स्त्रियांच्या सहभागाचे आव्हान –

स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर काळात व आजही काही ठिकाणी स्त्रियांना पुरुषांनंतर दुय्यम स्थान देण्यात येते. जे की, बदलत्याकाळानुसार चुकीचे सिद्ध होते.स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुविधांपासून जाणिवपूर्वक वंचित ठेवले जाते. सध्या शहरी भागांमध्ये स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळालाही आहे, परंतु ग्रामीण भागात फारसा बदल आढळून येत नाही, फार तर त्यांना १०वी, १२वी म्हणजेच उच्च माध्यमिक पर्यंतच शिक्षण दिले जाते, म्हणजेच उच्च शिक्षणाचा स्त्रियांना हक्क वंचित ठेवले जाते.

५) सार्वजनिक निधीची उभारणी –

भारतामध्ये उच्च शिक्षणाचे म्हणजेच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत आहे, परिणामी वाढत्यासंख्येप्रमाणे उच्च शिक्षणाचे सार्वजनिक अंदाजपत्रक आंकुचन पावत आहे. परिणामी प्रत्येक विद्यार्थ्यांमागील उच्च शिक्षणाचा खर्च कमी होत आहे. उच्च शिक्षणासाठी शासनाच्या एकूण खर्चामध्ये कपात होत आहे, तसेच प्रत्येक विद्यार्थ्यामागे सार्वजनिक खर्चात कपात होत आहे.

६) प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या पायाभरणी चे आव्हान –

एकदमच उच्च शिक्षणावर लक्ष केंद्रीत करणे चुकीचे आहे, कारण उच्च शिक्षण हा शिक्षणाचा तृतीयस्तर ठरतो, त्यामुळे पहिल्या दोन स्तरावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात कोठारी आयोगाने असे नमूद केले होते की, १९६५ ते १९७५ या दशकामध्ये शालेय स्तरावर मोठ्या प्रमाणावर खर्च करावा आणि त्यानंतर १९७५ ते १९८५ या दशकामध्ये सार्वत्रिक प्राथमिक व माध्यमिक स्तराचे व्यावसायीकरण करण्यावर भर द्यावा आणि १९८५ सालानंतर उच्च शिक्षणावर आणि संशोधनाच्या विकासावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात यावा.

७) अन्य आव्हाने –

उच्च शिक्षणाच्या विकासावर परिणाम करणारे अन्य घटक म्हणजे उच्च शिक्षणासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करणे आवश्यक असते.

वरील सर्व अडचणींचा प्रभाव उच्च शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर होतो, परंतु शासन यामध्ये विविध उपक्रम राबवते, विविध सवलती देते, परंतु यासर्व सवलती अपुऱ्या पडतात. कारण साधनं कमी आणि उपभोग घेणारे जास्त अशी स्थिती निर्माण होते. अण्वस्त्रांच्या बाबतीत, क्षेपणस्त्रांच्या बाबतीत आणि संरक्षणावरील खर्च वाढवण्याच्या बाबतीत भारत सातत्याने प्रयत्नशील असतो. परंतु तेच प्रयत्न उच्चशिक्षणाच्या बाबतीत पुरेसे होताना दिसत नाहीत. भारताचे महासत्ता बनन्याचे स्वप्न अण्वस्त्रांची संख्या वाढवून किंवा दोन अंकी विकासदर साधून पूर्ण होणार नाही, तर हे स्वप्न केवळ ज्ञानाधिष्ठित समाजाच्या निर्मितीतूनच शक्य होऊ शकेल, आणि ज्ञानाधिष्ठीत समाजाची निर्मिती केवळ उच्च शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकेल हे लक्षात घेतले पाहिजे.

# उच्चशिक्षण : सत्र पद्धती व परिणाम

**पंकज मखमले**
कला तृतीय वर्ष

शैक्षणिक सुधारणा या दृष्टीने प्रमाणपत्र परीक्षेच्या नंतर 'अधिक दोन' हा आकृतबंध राष्ट्रीयस्तरावर स्वीकारण्यात आला. ही घटना देशपातळीवरील समान शैक्षणिक आकृतीबंध म्हणून अतिशय मूलगामी व प्रगतीच्या दिशेने पहिले पाउल म्हणावे अशीच होती. या नंतर मात्र पदवी स्तरावर सत्र पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. शैक्षणिक वर्षाची दोनसत्रं व प्रत्येक सत्रात स्वतंत्र परीक्षा आणि अंतर्गत मूल्यांकन हे या सत्र पद्धतीचे विशेष. प्रत्येक अभ्यासपत्रिकेसाठी स्वतंत्र घटक. एका अभ्यास पत्रिकेसाठी दोन स्वतंत्र घटक. या सूत्राने किमान सोळा ते वीस घटक असायचे. एका सत्रात तो अभ्यासघटक पूर्ण झाला की, त्याचे अंतर्गतमूल्यांकन व विद्यापीठीय परीक्षा त्याच सत्रात होऊन त्याचे ओझे दुसऱ्या सत्रात वाहण्याची आवश्यकताच राहिली नाही. म्हणजे अभ्यासाचे ओझे कमी व झटपट परीक्षा अन् पटकन निकाल.

या सत्रपद्धतीत अंतर्गत मूल्यांकनासाठी घटक चाचणी, स्वाध्याय लेखन व सेमिनार्स किंवा तोंडी परीक्षा असायची. या मूल्यांकन प्रक्रियेत विद्यार्थी व शिक्षकातील संवाद – विसंवादाचे काही विपरीत परिणाम दिसून येत असत. काही विद्यार्थ्यांस अंतर्गत मूल्यांकनाचे गुण जास्त देणे किंवा काहीना जाणिवपूर्वक कमी गुणदान होत आसे. ही बाब विचारात घेऊन विद्यापीठ परीक्षेतील गुणाशी त्याचे तौलनिक प्रमाण कमी असेल तर त्यात बदल होत नसे. पण हे प्रमाण जास्तीच असेल तर कमी केले जात असत. ही स्केल डाऊनची पद्धतही त्यावरील एक उपाय असला तरी ज्याला अंतर्गत मूल्यांकनात कमी गुणदान झाले त्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असे.

या सत्र पद्धतीचा एक विशेष असा ही होता की, विद्यार्थी आणि शिक्षक निरंतर अध्ययन – अध्यापन – परीक्षा व मूल्यांकन या प्रक्रियेत गुंतले जात असायचे. ही बाब शैक्षणिक दृष्ट्या वाईट होती असे नाही. परंतु कठीण चढ चढून गेल्यावर होणारी दमछाक कमी करण्यासाठी विश्रांतीची गरज असते. ती मिळाली नाही आणि समोर पुढील परीक्षेची टेकडी चढायची . ही अवस्था म्हणजे अल्कोहलीक ॲडिक्शन सारखी वर्कहोलिक ऑडिक्शनसारखी. कालांतराने शरीर मनावर विपरीत परिणाम करणारी पद्धती असल्याचे एक चित्र तयार होत गेले.

या सत्रपद्धतीचा अजून एक वेगळाच परिणाम पुढे आला. तो असा की, आमची जी शैक्षणिक कार्यसंस्कृती रुढ आहे. त्यामध्ये रविवार, सार्वजनिक सण – उत्सवाच्या सुट्ट्या, प्रासंगिक कारणाने महाविद्यालयात पाळले जाणारे बंद, दीपावली, उन्हाळी सुट्ट्या तसेच शिक्षकांनी घेतलेल्या रजा असा सर्व तपशील विचारात घेता प्रत्येक सत्रात मिळाणारे कार्यदिन किती शिल्लक असतात ? त्यात अध्ययन – अध्यापन व परीक्षा मूल्यांकनासाठी किती अन कसे दिवसाचे विभाजन करावे ? इथे तर रात्र थोडी सोंगे फार असे चालते. त्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, युवक महोत्सव, स्नेहसंमेलन

अशा उपक्रमातून प्रत्यक्ष अध्ययन – अध्यापन कसे चालते. अभ्यासक्रम कसे पूर्ण होतात. ज्ञानाची संपादनूक किती ? हा सर्व तपशील संवेदनशील शिक्षण क्षेत्रातील घुसमट वाढवणारा आहे.

या सत्रपद्धतीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मूल्यांकनाचे काही नवे नवे प्रयोग केलेले. त्यातील एका प्रयोगाने तर अध्ययन – अध्यापन आणि मुल्यांकन पद्धतीत वेगळेच प्रदुषण वाढले होते. ते असे की, अलीकडे व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी सामाईक स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. विविध रोजगार संधीसाठी देखील स्वतंत्र स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षेस वस्तूनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात. म्हणून पदवीस्तरावर देखील मूल्यांकनासाठी बहुपर्यायी वस्तूनिष्ठ प्रश्नाच्या प्रश्नपत्रिकाच्या आधारे परीक्षा घेण्यात येऊ लागल्या. वर्णनात्मक दीर्घ उत्तरासाठीचा लेखनसराव नाही. सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे केवळ वर्तुळ काळे करणे या पद्धतीने भाषा विषयाचे अध्यापन, आकलन व अभिव्यक्ती संदर्भाने कसे करावे ?

या पद्धतीत अध्यापन पद्धतीपैकी व्याख्यान पद्धती योग्य राहील किंवा कसे ? याचाही विचार केला नाही.तसेच. कोणत्याही नव्या अभिनव कल्पनेचे सार्वत्रिक उपयोजन करताना परिस्थितीच्या मर्यादांचा प्रथम विचार करावा लागतो. अलीकडे जशी व्याख्यान पद्धती कालबाह्य वाटू शकते. त्याच प्रमाणे माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे अध्यापन प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करताना आपल्या येथील भौतिक संसाधनाच्या मर्यादा व टेक्नोसेव्ही शिक्षकांची कमतरता दुर्लक्षून कसे चालेल ? नोटसची वही किंवा पुस्तक घेऊन व्याख्यान देणे तथा समोर लॅपटॉप ठेवून व्याख्यान देणे यात फार तर तंत्रज्ञानाचा वापर दिसेल. पण ज्ञान माहिती, तपशील व ज्ञानावर व्यक्तीद्वाराची सर्जक प्रक्रिया शिकुवणीत अभिप्रेत असते त्यास अनुकूल सर्जक अध्यापक नसेल तर असे प्रयोगही यांत्रिक ठरण्याचीच शक्यता असते. हल्ली इंटरनेटवरील माहितीसाठीचे सर्च इंजिनच शिक्षकाची भूमिका स्वीकारताना दिसते.

मूल्यांकन प्रणालीतील अलीकडील काळातील काही बदलही इथे उल्लेखनीय आहेत. Cumnlative Grade Point Averse अर्थात पूर्वी शंभर गुणांच्या अभ्यास पत्रिकेत विद्यार्थ्यांनी शंभर पैकी किती गुण संपादन केले ते अंकच गुणपत्रिकेवर येत असत. त्या ऐवजी त्याची एकत्रित गुणसंपादणूक दर्शविण्यासाठी सरासरी गुणांक दिला गेला व त्याच्या आधारे श्रेणी अधोरेखित करण्यात आली. इथे पूर्वी ज्या ढोबळ असत प्रथम, द्वितीय, तृतीय तथा पास इ. च्या ऐवजी आता O, A, B, C, D स जोडून + चिन्हाने दर्शविले जाते. हा केवळ गुणमापन पद्धतीतील बदल असून गुणवत्तेची श्रेणी अधोरेखित करण्याची पद्धती आहे.

मूल्यांकनातील हा बदल फार काळ टिकला नाही. त्यानंतर एक नवी बदल करण्यात आला. तो म्हणजे Choice Based credit system अर्थात निवडीवर आधारीत श्रेयांक पद्धती. या पद्धतीचा विशेष असा की, विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम निवडी संदर्भातील मूलभूत स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आता एखाद्या विद्याशाखेत प्रवेश घेतलेल्या नंतर अनिवार्यपणे त्यात विद्याशाखेतील मुख्य विषयाचा पर्याय असायचा. तिथे मला एखाद्या विषयाला पर्याय असायचा पण विद्यापीठाने दिलेलाच स्वीकारावे लागे. अन्यविद्याशाखेतील एखादा आवडता अभ्यासक्रम मला स्वीकारता येत नसे. आता या नव्या CBCS सूत्राने मला ते स्वातंत्र्य बहाल केले. म्हणजे कलाशाखेचा विज्ञान – वाणिज्य शाखेतील

एक अल्पसाभाग – अभ्यासक्रम निवडून पूर्ण करु शकतो. याचाच अर्थ विद्यार्थ्याची रुची, कल, आवड विचारात घेत त्यास दिलेले हे निर्णय स्वातंत्र्य आणि आवडीच्या विषयातील अभ्यासक्रमपूर्ण करण्याची संधी प्राप्त झाली. उदा. विज्ञानशाखेतील एखादा विद्यार्थी कलाशाखेतली सामाजिक शास्त्रातील एखाद्या विषयाचा काही घटक आवड म्हणून अभ्यास करु शकेल. एवढेच नाही तर त्या विषयाची गुणसंपादणूक त्याच्या गुणपत्रिकेवर देखील येईल. अशा प्रकारे निवडलेल्या मुख्य विद्याशाखा व विषयासह अन्य विद्याशाखेतील काही विषय तथा काही अभ्यास गटाचा तो स्वतंत्रपणे अभ्यासही करील. असेच एखादा कलाशाखेतील विद्यार्थी विज्ञान – वाणिज्य तथा माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र शाखेतील काही अभ्यासघटकाचा अभ्यास करील . अशा प्रकारचे हे विषय व काही अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अपूर्व संधी या आकृतीबंधाने दिली.

या पद्धतीत पारंपरिक गुणदान ऐवजी श्रेयांक दिले जातात. यातील तांत्रिक बाजू देखील विचारात घेता येईल.

वार्षिक परीक्षा शंभर गुणांची होती. सत्र पद्धतीत ती पन्नास गुणाची झाली. म्हणजे गुणात बदल नाही झाला. पण गुणसत्र निहाय झाले. इथे आता अभ्यासपत्रिका ऐवजी कोर्स तथा अभ्यासक्रम असा बदल झाला. त्यामध्ये शंभर गुणाचे चार कोर्स झाले मग पन्नास गुणांचे दोन झाले. तसे पंच्चाहत्तर गुणाचे तीन झाले. या पन्नास गुणात अजून पंचवीस गुणाची भर घालून तीन श्रेयांकाचा अभ्यासक्रम नक्की करताना प्रत्येक सत्रात आठवड्यातील चार तासाप्रमाणे एकुण पन्नास तास झाले पाहिजे. तेथील उपस्थितीती ७५% उपस्थिती असावी. नियमित तासिकासह अंतर्गत मूल्यांकन जे की, निरंतर चालते त्यासही योग्य प्रतिसाद दिलाच पाहिजे. तरच तो अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे श्रेयांक मिळू शकतात. पदवीच्या तीन वर्षाच्या काळात विद्यार्थ्यांने अधिकाधिक श्रेयांकाची संपादणूक करावी. म्हणजे त्याची शैक्षणिक कारकीर्द उजळ होईल. पदवी स्तरावर जास्तीत जास्त श्रेयांक मिळाले पाहिजेत. पुढे त्याला ज्या विषयात पद्व्यत्तर पदवीसाठी प्रवेश हवा आहे त्या विषयात त्याने जास्तीत जास्त श्रेयांक मिळविणे गरजेचे आहे किमान चोवीस श्रेयांक संपादन करणे अनिवार्य आहे.

पारंपरिक पदवी शिक्षणातील उपरोक्त बदलाचे कसे परिणाम होतील ते आताच सांगता येणार नाही पण त्याची अंमल बजावणी करताना गुणपत्रकावरील नोंदी तांत्रिकदृष्ट्या अचूकच होतील यात शंका नाही. परंतु शैक्षणिक आकृतिबंघात असे बदल करण्याच्या पाठीमागे ज्या प्रेरणा आहेत व बदलाचे प्रयोजन किंवा फलनिष्चती संदर्भाने आज कुणी चर्चा करीत नाहीत. भविष्यात अशी चर्चा तर होणारच. तेव्हा आम्ही चर्चा करणार, दोष दुरुस्तीचा विचार करणार. पण मधल्या काळात पुलाखालूत पाणी वाहून जावे तसे दीर्घकाळ शैक्षणिक संक्रमण अन् संभ्रमाचे वातावरण राहील. त्याचे परिणाम मात्र काही पिढ्यावर होतील. शेवटी मग कुणबी शेंड्यावर शहाणा म्हणतात. त्या कुणब्या पेक्षाही आम्ही अजूनही अडाणीच. आम्हाला पाणी शेंडीवरुन गेल्यावरही शहाणपण सूचतच नाही. कारण अधिक दोन स्तर सुरु करुन आता चार दशके लोटली. पण आमच्या शैक्षणिक आकृती बंधातील साचेबद्धता आम्हाला दूर करता येत नाही.

# कौशल्य विकास अभ्यासक्रम (SEC)

**सुनिल गिरी**
कला तृतीय वर्ष

कल्पक व्यक्तीस अनेक कल्पना सूचतात. त्यापैकी अनेक कल्पना त्यास खूपच अभिनव-आकर्षक वाटतात. कल्पनास मूर्तरूप देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. अशा प्रयत्नास आपण प्रयोगही म्हणतो. प्रयोग यशस्वी झाला तर त्याचे श्रेय स्वीकारताना आनंद होतो. प्रयोग फसला तर मात्र पदरी निराशा येते. अशा प्रसंगी नाउमेद न होता जिद्दीने प्रयोग करावेच लागतात. प्रयोगाचा संबंध एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादीत असेल तर प्रयोग फसला म्हणजे त्याचे ते एक अपयश असते. अशा अपयशाशी तो 'बचेंगे तो और भी लढेंगे' म्हणत पुन्हा पुन्हा भिडण्याचा प्रयत्न करतो. प्रयोग का फसला याची कारणे शोधतो. दोष दूर करण्याचा प्रयत्न करतो. पण जेंव्हा प्रयोगात अनेक व्यक्तींची सक्रियता असते. तेव्हा प्रयोगाचे यश समूहाच्या निष्ठापूर्वक केलेल्या प्रयत्नाशी निगडीत असते. समूहाच्या कल्पना नाहीत. म्हणून त्यांची प्रयोगातील गुंतवणूक संपूर्णपणे कर्मकांडात्मक कृतीप्रवण असते. तिथे यशाची शाश्वती जवळपास नसतेच .ते केवळ उपचार म्हणून कार्य करताना दिसतात.

वरीलप्रमाणे दीर्घप्रस्तावना करण्याचे प्रयोजन असे की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास असेच कल्पक असणारे अनेक कुलगुरुंचे नेतृत्व लाभले. त्यानी काही प्रयोग केले. त्यांच्या प्रयोगात यशाचे प्रमाण अपेक्षाप्रमाणे नसले, तरी त्यांच्या प्रयोगाची ऐतिहासिक नोंद घेण्याची आवश्यकता आहे. अशा ऐतिहासिक व सुवर्णाक्षराने नोंद व्हावी असा प्रयोग म्हणजे विद्यमान कुलगुरूनी केलेले दोन प्रयोग आहेत. एक म्हणजे one teacher one skill आणि दुसरा Skill Ennancement course अर्थात कौशल्य विकास अभ्यासक्रमाचा निर्देश करता येईल.

या दोन्ही प्रयोगाची प्रेरणा मूलतः भारताने पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या धोरणात्मक विचारांची आहे. पंतप्रधान विदेशात खूप फिरतात. तेथील व्यापार-उद्योगाचे निरिक्षण करतात. तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की, तिथे यंत्र संस्कृतीचा मोठा प्रभाव आहे. आपल्याकडे यंत्र-तंत्रापेक्षा 'मंत्र संस्कृती' मोठी प्रभावी आहे. या देशातील लोकांना कार्यप्रवण करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी कुशल मनुष्यबळ निर्मितीची प्रेरणा विद्यापीठांना दिली. त्यांचा 'कुशल भारताचा मंत्र' आमच्या विद्यापीठाच्याच कुलगुरुंना समजला. त्यांच्या प्रदीर्घ काळातील अध्ययन - अध्यापन - संशोधन व विस्तारकार्यानुभवाने त्यांना असेही ज्ञान प्राप्त झाले की, प्रत्येक माणसाजवळ काही ना काही कसब कौशल्य असतेच. अशा कौशल्याचाच विकास झाला म्हणजे पंतप्रधानाच्या स्वप्नातील कुशल मनुष्यबळाची निर्मिती होईल. त्यासाठी आपण आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना कौशल्य विकासाचा कार्यक्रम दिला, म्हणजे ते आपल्याकडील सर्व कौशल्य (उदा.वाङ्मय चौर्य करुन पीएच.डी. चे प्रबंधन लेखनाचे कौशल्य) विद्यार्थ्यांना देतील. त्यामुळे देशात एकदम क्रांती घडेल. म्हणून पंतप्रधानानी जसा कौशल्य विकासाचा मंत्र दिला तसे आमच्या कुलगुरुंनी देखील कौशल्य विकासाचा मूलमंत्र दिला. त्यासाठी त्यांनी कार्यशाळा आयोजित केल्या. शिक्षकांना प्रशिक्षणही दिले. त्यांची प्रेरक भाषणे ऐकुन शिक्षकही फार प्रभावीत झाले. पण या

शिक्षकांनी मात्र कुलगुरुना अभिप्रेत असलेली कृतीशीलता दाखवलीच नाही. पाण्यात राहून मगरीशी वैर नको म्हणतात. तसे व्यावहारिक शहाणपणा दाखवत सर्वांनी मौन स्वीकारले. त्यांच्या मौनात one teacher one skill हा प्रयोग मात्र निरर्थक वाटला असावा. मौनातील ज्ञानप्राप्ती हेच या प्रयोगाचे वैशिष्टये म्हणावे.

आमच्या विद्यापीठाच्या कुलगुरुंनी केलेला असाच एक दुसरा प्रयोग म्हणजे कौशल्य विकास अभ्यासक्रम हा आहे. त्यांचा पहिला प्रयोग हा खरे तर शिक्षकांना स्वयंस्फूर्त-स्वेच्छेने सहभाग घेण्यासाठी प्रेरणा देणारा होता. तो शिक्षकांना ऐकायला बरा वाटायला. कुलगुरुंचे भाषण ऐकून श्रोते शिक्षक तृप्त होत असत. तसे या शिक्षकांपैकी अनेक गोडबोले विद्वान प्राध्यापक उत्कट प्रतिसाद देत. या प्रयोगाची प्रशंसा करीत. कुलगुरुंना भावणारा प्रतिसाद देत. त्यांच्या प्रतिसादाने व स्तूतीपूर्ण संभाषणाने कुलगुरुंचेही कान तृप्त होत. म्हणून बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात खावून सर्वांनीच तृप्तीची ढेकरं दिली. तसे मात्र कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे होत नव्हते. इथे त्यांनी या प्रयोगाला शैक्षणिक आकृतीबंधात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. सर्व विद्याशाखांसह प्रत्येक विषयाच्या अभ्यास मंडळांना योग्य निर्देश दिले. त्यांचे अभ्यासक्रम तयार केले. त्यांचा कार्यभार नक्की केला. त्यासाठी आवश्यक कार्यशाळा घेतल्या. शिक्षकांचे उद्‌बोधनही केले. एकूण त्यांच्याकडून भक्कम पूर्वतयारी करण्यात आली. कौशल्य विकास अभ्यासक्रम तयार करताना संबंधीत विद्याशाखेतील व विषयाच्या उपयोजित अभ्यासक्रमाचा जो मुख्यप्रवाह अस्तित्वात आहे. अशा उपयोजित अभ्यासक्रमाशी संलग्न जोड अभ्यासक्रमासारखे या अभ्यासक्रमाचे स्वरूप ठेवण्यात आले नाही. त्यात एक प्रकारची स्थूलता राहिली. त्याचे एक कारण संबंधित विद्याशाखा व विषय शिक्षक हे मानसिकदृष्टया पारंपारिक क्रमिक पुस्तकाशी एकरूप झालेले. त्यांचा त्या क्षेत्रातील प्रगत ज्ञानाचा संपर्क, व्यावहारिक क्षेत्रातील त्यांचा बदलत्या कौशल्य विषयक संदर्भाचा विशेष अभ्यास नाही. परिणामी एस.टी. च्या बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी असावी, असेच या कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे स्वरूप तयार झाले.

तसे तर अशा प्रकारच्या वेगळ्या अभ्यासक्रमाचा जो कार्यभार निर्माण होतो. त्यासाठी अतिरिक्त शिक्षकांचीच गरज असते. मग या शिक्षकांचे वेतन किंवा मानधन हा विषय विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नाही. त्यास प्रशासकीय व अर्थ विभागाची मान्यता हवी असते. या संदर्भाने सगळाच संभ्रम-सरकार कार्यभार मान्य करणार नसेल तर मग केवळ कुलगुरू सांगतात म्हणून शिक्षक तो स्वीकारतील का? या प्रश्नामुळे एक वेगळीच परिस्थिती निर्माण झाली.

या परिस्थितीतून मार्ग काढताना गोडबोल्या विद्वानांनी आधी परिस्थितीवर भला विचार केला. तो असा की, आपणच विषयांचे अध्यापन करणार - त्याचे पेपर्स काढणार - म्हणजे परीक्षा घेणार पेपर्स तपासणार, अंतर्गत मूल्यांकनही आपणच करणार - त्यात करायचे ते कसे आपणच ठरवू. हे कुलगुरु तर पुढील वर्षी निवृत्तच होणार - प्रश्न एकच वर्षाचा तर आहे. असा विचार करीत कौशल्य विकास अभ्यासक्रम ए.टी.के.टी. साठी ठेवून दिला.हे वास्तव्य बरेच बोलके आहे. तुम्ही कल्पना कितीही करा - शैक्षणिक प्रयोग कोणतेही सांगा - आमची सामुहिक कृती आमच्याच पध्दतीने होईल. या आमच्या कार्य संस्कृतीत अशी बरेच कौशल्य आहेत. त्याचा शोध मात्र कोणत्याही कुलगुरुंना घेता येत नाही. त्यांनी आपली 'मन की बात' जाहीर करताना शतदा विचार करावा. ही देखील एक वस्तूस्थितीच आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राध्यापका विषयीचे मत

**पुजा ढगे**
कला तृतीय वर्ष

मुंबई येथील सेंट झेवियर्स महाविद्यालयातील पुराणवस्तूत संशोधन व इतिहास विषयाचे तत्कालीन एक विद्वान प्रोफेसर असा लौकिक प्रोफेसर रेव्हरंड फादर हेरास यांचा होता.त्यांनी मोहंजोदारो येथे सापडलेल्या विटा, नाणीचे वाचन कसे करावे ? या विषयावर विद्वतापूर्ण भाषण दिले. त्या कार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. त्यांच्या भाषणावर प्रतिक्रिया देताना त्यांनी प्रो. हेरास यांची विद्वता ही व्यासंगातून कशी सिद्ध झाली ही बाब श्रोत्यांना सांगितली. याच प्रसंगी त्यांनी ऐतदेशीय प्राध्यापक मंडळी बद्दल एक टिप्पणी केली. ती मोठी मार्मिक आहे. त्यावर उपस्थित मंडळीनी डॉ. आंबेडकरांच्या अभिप्रायाचा प्रतिवाद करताना व स्व पक्षाच्या मर्यादा का निर्माण झाल्या या संदर्भाने बचाव पक्ष मांडला. तेव्हाच्या या संवादातून एकविसाव्या शतकातील आमच्या कोणत्याही महाविद्यालयात जाणवणाऱ्या दिसणाऱ्या वास्तवाची साक्ष देतेय असे वाटते.

... फादर हेरास यांनी एकध्येय वृत्तीने या अत्यंत महत्त्वाच्या विषयात स्वत:ला वाहून घेतले व अत्यंत प्रचंड असे संशोधन केले तसेच आमच्या हिंदी प्रोफेसरांनी का केले नाही असा एक माझ्या पुढे प्रश्न उभा राहतो, की आमच्या हिंदी प्रोफेसरांनी तशी आवडच नाही ? किंवा त्यांच्या जवळ पुरेशी विद्वता नाही किंवा त्यांच्या पाशी पुरेशी सामग्री नाही ? या गोष्टींची कारणे काय असली पाहिजेत याचा आपण बारकाईने विचार करु.

इतक्यात एक प्रोफेसर म्हणाले, ‘आम्ही प्रोफेसर मंडळी हल्लीच्या युनिव्हर्सिटीमध्ये मिळणाऱ्या शिक्षण पद्धती पासूनच निर्माण झालेलो आहोत. यासाठी आपल्या प्रोफेसरांना दोष न देता तो युनिव्हर्सिटीच्या शिक्षण पद्धतीलाच द्यावा लागेल.’

वरील प्रसंगातील वास्तव असे की, पाश्चात्य मंडळी जशी ध्येयनिष्ट, कठोर परिश्रम घेणारे, त्यागी तयार झाली. त्यामुळे आधुनिक ज्ञान विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांचे विचार चिंतन, सर्जनशीलता आणि संपादीत ज्ञानाचे उपयोजन करु शकलो. तसे आम्हा भारतीय प्रोफेसर मंडळीकडून काल पुरेसे प्रयत्न झाले नाहीत. तसे तर आजही होताना दिसत नाहीत. आम्ही फक्त दैवाला परिस्थितीला व व्यवस्थेला दोष देतो. पण ते बदलण्यासाठी स्वत: प्रयत्न करीत नाही. देव – दैव आणि नियतीच्या विरुद्ध आम्ही अजून युद्धच पुकारले नाही. असे तेव्हाच शक्य आहे की, आम्ही बुद्धि प्रामाणव्यवादी वैज्ञानिक दृष्टीकोण घेऊन जगणे पसंद करु. त्यासाठी उच्चशिक्षण क्षेत्राचा भौतिक संख्यात्मक नाही तर गुणात्मक विकास व दर्जा उंचावण्याचा ध्यास हवा.

# समकालीन पालकांची उच्च शिक्षणाच्या संदर्भातील मानसिकता

**शिवकन्या मिंड**
कला तृतीय वर्ष

विद्यार्थ्यांचे पालक, माता - पिता किंवा गणगोत असा जो एक समुदाय समाजात वावरताना दिसतो. या वर्ग गटाचा उच्च शिक्षण विषयक जो दृष्टीकोन आहे, त्या संदर्भाने कुणी फार गांभिर्याने विचार करतो असे नाही. त्याचे एक कारण असे की, प्राथमिक, माध्यमिक किंवा जास्तीत जास्त उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भाने पालक नावाचा वर्ग, गट, समुदाय तसा सजग व संवेदनशील असतो. त्याला आपल्या पाल्याने उत्तम अभ्यास करावा. चांगले गुण संपादन करावे. समाजात प्रतिष्ठा असलेल्या व्यवसाय उद्योग तथा नोकरीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करावी असे वाटते. पदवी व त्या पदवीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या सत्ता संपत्तीचा तो स्वामी म्हणून जगावा. वृद्ध माता पित्यांचा नाव लौकिक त्यांने वाढवावा. संपादन केलेले ज्ञान प्रतिष्ठा व अर्जित संपत्तीचा आपल्या मुलांना वारसा द्यावा. अगदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना बजावले होते. 'अथक परिश्रमाने मी चळवळीचा गाडा येथ पर्यंत आणला. तुमच्याने शक्य असेल तर पुढे घेऊन जा. शक्य नसले तर आहे तिथेच ठेवा. पण कोणत्याही परीस्थितीत तो मागे जाणार नाही. याची काळजी घ्या.' याच शब्दात हे पालक आपल्या पाल्यांना बजावतात. तुम्ही आम्ही निर्माण केलेल्या स्थावर संपत्तीत भर घाला. जर तशी भर घालता आली नाही तर ती स्थिर ठेवा. पण कोणत्याही परीस्थिती दोनचे अधिक दोन करा उने दोन होऊ देवू नका. आहे ती अर्जित संपत्ती टिकवणे हे संपत्ती मिळवण्याबाबतच्या प्रयत्ना पेक्षाही महत्त्वाचे प्रयत्न ठरतात.

आपल्या पाल्याच्या हाताला धरुन त्यास शाळेत सोडणारे पालक मुलाचे लहानपण विचारात घेत त्याला सर्व प्रकारच्या अडचणी पासून सुरक्षित ठेवतात. अभ्यास व अभ्यासपूरक उपक्रमातील पाल्याचा सहभाग वाढता राहील या बाबत सतर्क राहतात. तो ज्या सुविधांची मागणी करील त्या स्वत:चा जीव गहाण टाकून पूर्ण करतील. असे हे पालक मुलगा दहावी-बारावी परीक्षा उत्तीर्ण झाला व पदवीसाठी त्याने प्रवेश घेतला की, ते आपल्या पाल्याच्या निर्णयात

हस्तक्षेप न करता त्यास निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देतात. हे खरे असले तरी, आपल्या पाल्याने घेतलेल्या निर्णयाबाबत ते काहीसे सावध, बहुतेकवेळा संशयी-अस्वस्थ असतात. त्याचे एक कारण ही मुले आता सज्ञान तरुण झालेली असतात. त्यांना मतं आणि मिशा फुटतात. या तरुण मनात भूपृष्ठा खाली भूगर्भात जशा उलथा - पालथी चालतात. तसे काही तरी घडत असते. मनात जे काही घडते ते सर्व त्यांना कळते पण त्याचे आकलन करताना ते गोंधळून जातात. स्वप्नाळू बंडखोर मन तसे एका निसरड्या वाटेवरुन चालते. त्याची पावले कधी सरळ तर कधी जर वेगळी तिरपागडी पडतात. अशीच चाल चलनूक असलेले तरुण महाविद्यालयाच्या परिसरात पदवी पदव्युत्तर पदवीला प्रवेश घेतात. त्यावेळी काही सन्माननीय अपवाद वजा जाता बहुतेक पालक विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालय परिसरात येतच नाही. जेव्हा काही महत्त्वाच्या कागदपत्रावर पालकाची स्वाक्षरी अनिवार्य असते. तेव्हा फार पूर्वी अनेकजन आपला किंवा आपल्या मित्राच्या अंगठ्याचा ठसा घेत असत. नंतर थोडी तिरपी रेषा ओढून डाव्या हाताने पालकाची सही म्हणून पालकाचे नाव लिहित असत. हल्ली आता इंग्रजीत स्वाक्षरी असते. ती देखील स्वत:च केलेली असते.

वरील सर्व तपशील, माहितीचा आपण जेव्हा अर्थ आणि अन्वयार्थ लावतो तो एवढाच की, काही सन्माननीय पालकाचा अपवाद वजा जाता. पाल्य आपल्या महाविद्यालायत विद्यापीठात अमूक - तमूक अभ्यास करतो अशी जूजबी माहिती बाळगत समाधानी असतात. कधी या विद्यार्थ्यांच्या आयुष्यात खूप महत्त्वाचे काही घडले किंवा अप्रतिष्ठीत व काळजी करणारे असे काही बिघडले असेल. अशा प्रसंगी पालकांना महाविद्यालयात बोलावले तरच यांना समजते. अन्यया आपला पाल्य दरवर्षी पासच होतो. म्हणजे त्याची शैक्षणिक प्रगती तशी अखंड चांगली व समाधानकारकच आहे. अशी त्यांची धारणा असते.

आपल्या पाल्याचे उच्चशिक्षण, पदवी संपादन किंवा त्याच्या व्यावसायिक जबाबदारी कर्तृत्त्व - करियर संदर्भाने ते वेड पांघरुन पेडगावला जातात. ते का ? याचे कारण एकूणच मुलांच्या उच्च शिक्षणा बाबत एक सजग सज्ञान पालक या नात्याने आपली एक जबाबदारी, भूमिका असावीच असे त्यांना वाटतच नाही. ही परिस्थिती नक्कीच चांगली नाही. वास्तवात शिक्षणचा असा स्तर कोणताही असो. म्हणजे प्राथमिक, शालेय किंवा उच्च शिक्षणाचा कोणताही असो. या प्रत्येक स्तरावर विद्यार्थी हा लाभार्थी घटक जो महत्त्वाचा केंद्रबिंदूच आहे. मग शिक्षण संस्था - शिक्षक. विश्वस्थ, शासन, प्रशासनातील अधिकारी असे सगळेच विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणाला सुयोग्य आशय आकार परिणाम व फलश्रुती देतात. त्यात पालकाने स्वत:ला असे गांव जले हनुमान बाहेर या उक्तीप्रमाणे अलिप्त ठेवणे कसेही समर्थनीय असू शकत नाही. म्हणून तर अलीकडे नॅकद्वारा शिक्षणसंस्था महाविद्यालयाचे जे मूल्यांकन केले जाते. त्यावेळी माजी विद्यार्थी संघ व पालक संघाशी संस्था - महाविद्यालय संवादी आहे का ? या अनुषंगाने गंभीरपणे विचार चर्चा केली जाते. त्यामुळेच अलीकडे पालकांचा उच्चशिक्षण विषयक दृष्टी अन् दृष्टीकोनाची गंभीरपणे चर्चा चिकित्सा सुरु झाली. आमच्या महाविद्यालयात विद्यार्थी व पालकाशी सुसंवाद बैठकींचे आयोजन तर केले जाते. अशा बैठकांना विशेषत: बारावी विज्ञान या वर्गात शिकणारे विद्यार्थी पालक चांगल्या संख्येने उपस्थित असतात. पण अकरावी - बारावी वाणिज्य व कलाशाखेतील

विद्यार्थी–पालक तेवढे संख्येने जमत नाहीत. या पेक्षाही आधिक गंभीर चिंताजनक बाब म्हणजे पदवीच्या कोणत्याही विद्याशाखेतील विद्यार्थी. पालकांना अशा बैठकांना उपस्थित राहण्याची गरज वाटतच नाही. याचे परिणाम कितीतरी गंभीर होतात असे एक वास्तव आहे.

- वर्गातील मुलांची उपस्थिती.
- महाविद्यालय परिसरातील शिस्तीचे प्रश्न
- अभ्यास व अभ्यासपुरक अभ्यासेत्तर उपक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग तसा जवळपास नाहीच च्या आसपास वाटावा असे एक चित्र आहे.
- पालक आणि शासनाने उच्च शिक्षणावर भांडवली गुंतवणूक म्हणून जो खर्च केला त्याचा अपेक्षित परतावा मिळत नाही. या अनुषंगाने शिक्षणतज्ज्ञाचा पुढील अभिप्राय विचारात घेता येईल.

पावसाच्या प्रत्येक थेंबाची जपवणूक व्हावी. म्हणून आम्ही सिंचनासाठी पाणलोट विकासासाठी 'पाणी आडवा पाणी जिरवा' अशा घोषणा देत मोठे कार्यक्रम घेतो. तसे आता विद्यार्थ्यांच्या आधी पालकाना महाविद्यालय तथा विद्यापीठ परिसराकडे वळवा त्यांची आपल्या पाल्याच्या उच्चशिक्षणाच्या संदर्भाने असलेली भूमिका निटपणे त्यांना समजून सांगा. त्यांची अलिप्तता ही केवळ त्यांचा एकच पाल्याचे शैक्षणिक नुकसान करीत आहे असे नाही. तर राष्ट्राच्या तिजोरीतून त्याच्या शिक्षणावर जो अल्पस्वल्प खर्च होतोय तो वाया जात आहे. या बाबत त्यांना योग्य समज द्या. आपल्या एका पाल्याच्या भल्याचा किंवा नुकसानीचा ही विषय नाही तर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अर्जित संपतीचा वारसा हक्क हस्तांतराचा ही विषय आहे. कारण माणूस हा एक समाजशील प्राणी आहे. याचा अर्थ तुम्ही जन्माला घातलेलं मुल एका अर्थानं कच्चामाल आहे. त्याला माणूस म्हणून प्राप्त झालेले अस्तित्त्व अस्मिता तर एक सोशल बाय प्रॉडक्ट आहे. जे सामुहिक विचार चिंतन परिश्रमाच्या सहसर्जनातून निर्माण झाले. म्हणून जन्माला आलेलं तुमचं मूल तुमच्या वंशाचा दिवा असेल पण त्या दिव्यातील तेल वात ही समाज समूह तथा राष्ट्राने निर्माण केलेली आहे. ती राष्ट्राची संपत्ती व राष्ट्र अन समाज पुरुषाच्या वंशाचा दिवा आहे. तो स्वयंप्रकाशी नाही तर परप्रकाशी आहे. त्याच्या कर्तृत्त्वाच्या प्रकाशाने देश – धर्म संस्कृती उजळून निघावी असे वाटत असेल तर उच्च शिक्षणाबद्दल आपण सर्वांनीच जबाबदारीने व गांभिर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.'

# उच्चशिक्षण: एक दिवास्वप्न ?

**अभय शिनगारे**
कला प्रथम वर्ष

मी !!!? नेहमी मीच का? जेव्हा पासुन समजायला लागलं तेव्हा पासून हा निराशाजनक प्रश्न ऐकीवात आहे. काळानुसार परिस्थितीनुसार या प्रश्नाची वेगळी वेगळी रूपं देखील अनुभवली आहेत. कधी वडील, कधी पुरुष, कधी स्त्री, कधी शिक्षक, कधी मुलगा अशा सर्वांना हा प्रश्न कधी ना कधी पडतोच. परंतु या प्रश्नाचं खरं विदारक आणि अस्वस्थ करणारं स्वरूप जाणवतं ते एका तरूण विद्यार्थ्यांच्या तोंडी हा प्रश्न ऐकल्यावर.

हल्लीच एका मित्राकडून ऐकलं. 'विदयार्थ्यांची सर्व पापं धुतली जाऊ शकतात ती अभ्यासाच्या गंगेत डुबकी मारूनच!! परंतु जेव्हा विद्यार्थी होणंच पाप वाटायला लागतं तेव्हा समाजस्वास्थ आपोआपच ढासाळायला लागतं कारण शिक्षण हा निरोगी समाज जीवनाचा पाया समजला जातो.'

भारताला प्राचीन काळापासूनच संस्कृतीचा मोठा वारसा लाभलेला आहे. अगदी रामायण आणि महाभारतात सुध्दा शिक्षणाचे महत्त्व असलेले आढळून येते. प्राचीन काळी विदयार्थी एखादी विद्या शिकत त्यावेळी त्यामागे प्रेरणा होती ती त्या विद्येमध्ये प्राविण्य मिळवण्याची. काळ बदलत गेला तसं तस माणसात एक विचित्र जीवघेणी स्पर्धा सुरु झाली.

मला वाटतं, आपण डार्विनचा 'सर्वोत्तमाचे अस्तित्व' (Survival of the Fittest) हा सिध्दांत फारच मनावर घेऊन आपापसामध्येच शर्यत सुरू केलीयं आणि जिंकण किंवा हरण एवढीच आपण समजून घ्यायला लागलो. खेळ खुल्या मनाने खेळण्यात मजा असते हे आपल्या गावीच नाहिये.

साधारण ३००० वर्षापूर्वी आपल्याकडे तक्षशीला विद्यापीठ आणि ५ व्या शतकात नालंदा विद्यापीठ अस्तित्वात होते, मग एवढी प्राचीन आणि भव्य अशी उच्च शिक्षणाची संस्कृती लोप का पावली ?

या प्रश्नाचं उत्तर आपल्याला १८३५ मध्ये ब्रिटीश अधिकारी लॉर्ड मेकॉले याने ब्रिटीश पार्लमेंटला एक पत्र लिहलं होतं त्यात सापडू शकतं.

त्या पत्रात मेकॉले म्हणाला होता की, 'मी भारताच्या लांबी x रुंदी पर्यंतचा प्रवास केला. परंतु मला एकही 'भिकारी' किंवा 'चोर' दिसला नाही. त्यापेक्षा जास्त मोठी गोष्ट अशी की, नैतिकमूल्य जोपासणारी, इथली संस्कृती आहे. जर या भागावर शासन करण्याची आपली इच्छा असेल तर आपण आधी इथली शिक्षणव्यवस्था बदलली पाहिजे.' जेणेकरुन इथल्या लोकांना आपली शिकवण आणि आपली भाषा त्यांच्याकडे असणाऱ्या ज्ञानापेक्षा मोठी आहे अस वाटावं आणि इथले लोक मानसिकदृष्टया आपल्या अधिपत्याखाली यावे. या विचाराने इंग्रजांनी आपल्या शिक्षण व्यवस्थेत बरेच बदल करुन आपल्या देशात शिक्षणाच्या फॅक्ट्र्या उभ्या केल्या. ज्यातून आजही आज्ञा पाळणारे शिस्तप्रिय यंत्रमानव चांगल्या दराने निर्माण होत आहेत.

आपल्या देशात साधारण १२.५ कोटी मुलं-मुली दरवर्षी प्राथमिक शिक्षणाची सुरूवात करतात. परंतु त्यापैकी अर्धेच म्हणजे ६.५ कोटी विद्यार्थी, १० वी तर २.५ कोटी विद्यार्थी १२ वी पास

होऊन नंतर पदवीधर होतात आणि फक्त ६० लाख विद्यार्थी कौशल्यपूर्ण काम करु शकतात. तर मग उरलेले विद्यार्थी हरवतात कुठे? मुळात या विद्यार्थ्यांवर हरवून जाण्याची वेळ का येत असावी?

प्रत्येक लहान मुल जन्म घेतांना सोबत जिज्ञासा घेऊनच जन्मत असावं. आणि खरतर जसं जसं जास्त समजायला लागतं तसतशी जिज्ञासा वाढली पाहिजे. पण आपल्या आजुबाजुला असं होतांना दिसतच नाही. उलट वाढत्या वयासोबत मुलं जिज्ञासा मारून टाकायला शिकतात आणि आपण त्याला प्रगल्भता (Maturity) या संज्ञेखाली मान्य देखील करतो.

वर्षानुवर्षात पुस्तकं बदलली, अभ्यासक्रम बदलले परंतु अभ्यासाची तीच पध्दत वापरत दरवर्षी वीस पानांवर स्वत:ची स्मरणशक्ती तपासत आयुष्य सरळ मार्गाने चालवत आणले जाते. परंतु ते फक्त उच्च-माध्यमिक म्हणजेच १२ वी पर्यंत. पण१२ वी नंतर काय? हा प्रश्न विद्यार्थ्यांना भेडसावतोच. आणि ते सहाजिकच आहे. कारण सरळ मार्गावर चालता चालता अचानकच असंख्य रस्ते समोर दिसायला लागतात. परंतु आपल्या जागरूक (की निद्रानाश) झालेले पालक विद्यार्थ्यांना बुध्दीला विचारांचे कष्ट नको असाच जणू विचार करतात. आपल्या मिळकतीत आपण टु-व्हिलर घेऊ शकतो. तर आपला पाल्य फोर-व्हिलर घेऊ शकला पाहिजे असाच क्षूद्र विचार करतात. अभियांत्रिकी, वैदयकीय आणि आजकालची फॅशन ठरलेल्या स्पर्धा परीक्षा एवढेच मार्ग असणारं उच्च शिक्षा असतं अशीच सर्वांची समजूत झालेली. दुसरं कारण म्हणजे या मार्गांवर चालणारे आपण एकटेच नाहीत! आम्हा सर्वांच्या दृष्टीने उच्च शिक्षणाचा आशय - अर्थ एवढाच.

तो एक प्रकारे विचारांचा कम्फर्ट झोन आहे. पण आपल्या या सुरक्षेच्या भावनेने घेतलेल्या निर्णयांमुळे आपण ठरावीक मार्गांवरची गर्दी वाढवून मार्गावर कोंडी वाढवत आहोत ही वस्तूस्थिती समजून घेणे आपण सोयीस्करपणे टाळतो म्हणून.

यातुनच मग आपल्याकडे 'बेरोजगारांचा मळा' निर्माण झाला आहे.

भारतासमोरील समस्या कोणत्या? या प्रश्नाचे 'गरीबी आणि बेरोजगारी' हे उत्तर लिहून पणजोबांच्या काळापासून अनेकांनी पैकीच्या पैकी गुण मिळवले असतील. नव्वदोत्तर जागतिकीकरणाच्या फेऱ्यात गरीबीबाबत हलका दिलासा दिसला असलातरी गेल्या २० वर्षांत महाविद्यालयांच्या फोफावलेल्या जाळ्यातुन 'शिक्षण मुबलक, तरी नोकऱ्यांचा बाजार घसरलेला' अशी स्थिती उद्भवली आहे.

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (CMIE) या संस्थेच्या अहवालानुसार मार्च अखेरपर्यंत भारतातील बेरोजगारीचे प्रमाण ६.२३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. वर्षभरापूर्वी म्हणजे एप्रिल २०१७ मध्ये हे प्रमाण ३.८९ टक्के होते. यात ही शहरी भागातील बेरोजगारीचे प्रमाण तुलनेत अधिक दिसते. याच अहवालानुसार महाराष्ट्रातील ३.४ टक्के तरुण बेरोजगार आहेत. सध्याच्या घडीला देशातील साधारण ३.१ कोटी तरुणांना रोजगार नाही आणि देशातील रोजगारनिर्मितीची संख्याही दरवर्षी साधारण ६ लाख आहे.

तुलनेने कमी शैक्षणिक पात्रता आवश्यक असणाऱ्या चतुर्थ श्रेणी कामगार वर्गापेक्षा जास्त शिकून, सवरुन नोकरीच्या शोधात असणारे तरुण अधिक आहेत. त्यात आता या वर्षाअखेरीस पदव्या घेऊन बाहेर पडणाऱ्या फौजेची मोठी भर पडणार आहे.

'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या' (ILO) ताज्या अहवालातुनही भारतातील बेरोजगारी वाढत असल्याचे दिसते. आता या सगळ्या चुकलेल्या

गणितामागे आंतरराष्ट्रीय आर्थिक, राजकीय स्थितीचा देशावर होणारा परिणाम, यापासून वाढती लोकसंख्या, स्थलांतर अशी अनेक कारणे क्वचितच आहेत. त्याचबरोबर 'मनुष्यबळ निर्मितीचे चुकलेले व्यवस्थापन हा देखील प्रमुख मुद्दा आहे.'

मागणी आणि पुरवठा या अर्थशास्त्रातील मुलभूत संकल्पना त्याचा विसर नियोजनकर्त्यांना झालेला दिसतो. कारण शिक्षणातून नुसतीच पदव्यांची भेंडोळी घेतलेले केवळ शिक्षित मनुष्यबळ वाढत चालले आहे.

नवी महाविद्यालये, अभ्यासक्रम सुरु करतांना विद्यार्थ्यांना मागणीपेक्षा बाजारपेठेच्या मागणीचा अधिक विचार होणे समर्पक ठरले असते. प्रत्यक्षात बाजार प्रेरीत व्यवसाय संधी व माहिती तंत्रज्ञान शिक्षणातून मिळणाऱ्या मुबलक वेतन भाग्याचा योग अशा होऱ्याने अभ्यासक्रमाचे पीक अगदी गल्लोगल्ली काढले जाते. गेल्या दशकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा गवगवा झाला. या क्षेत्रातील तगड्या पगाराच्या नोकऱ्यांचा जनमानसावरील परिणामाने पुढे माहिती-तंत्रज्ञान शाखांतील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्या. अतिरिक्त शुल्क देऊन प्रवेश घेण्याची विद्यार्थ्यांची तयारी होती. यातून परत बेरोजगारीचीच शेती तयार झाली.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या गेल्या वर्षीच्या अहवालानुसार अभियांत्रिकीच्या साधारण ४२% औषधनिर्माणशास्त्रातील २% आणि व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी घेतलेल्या ३९% विदयार्थ्यांनाच रोजगार मिळू शकला आणि हा मिळालेला रोजगार टिकुन राहिलाच असे दिसत नाही. म्हणून महाविद्यालयांतील कॅम्पस मुलाखतीमधुन नोकऱ्या मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या कागदोपत्री ९०% देखील दिसेल, परंतु अशी नोकरी सहा महिन्यांच्या आत सोडण्याची पाळी अनेकांवर आली.

अशीच कथा पूर्वी डी.एड./बी.एड. तथा शिक्षणशास्त्राच्या बाबतीत झालेली दिसून येते. स्पर्धा परीक्षांच्या शिकवण्यांनी लाखो मुलांना शासकीय नौकरीची स्वप्ने विकली. हा साराच मनुष्यबळ निर्मिती आणि आनुषंगिक शिक्षणातील ताळमेळ नसल्याचा परिपाक.

यातील अत्यंत महत्वाचा मुद्दा म्हणजेच पीएच.डी. करुन म्हणजेच पदवी मिळवून, संशोधनात (?) काहीशी भर घालुन शेतमजुरी किंवा हमाली करण्याची वेळ येत असेल तर आपण स्वातंत्र्योत्तर काळात नक्की काय केले? याचा विद्यार्थ्यांनी आणि आपण काय दिले याचा व्यवस्थेने विचार करणे क्रमप्राप्तच आहे. तसं न केल्यास निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांची उत्तर शोधण्यातच देशाची उरली सुरली शक्ती खर्च होईल.

तांत्रिक शिक्षणात देखील इतक्या मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे. तर इतके विद्यार्थी स्वत:ची आवड आणि कुवत माहिती असुन देखील तांत्रिक शिक्षणात प्रवेश का घेतात?

या प्रश्नाबाबत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची काही मतं अवाक् करतात. जसे काही जणांनी तो अभ्यासक्रम स्वीकारला कारण त्यांना 'सेफ साइड' (Safe side) डीग्री असं काहीतरी मिळवायचं होत. तर काही जणांना निव्वळ त्याचं गाव सोडून शहरात जायचं म्हणून त्यांनी तांत्रिक शिक्षण निवडल्याचे चित्र समोर येते. अशा स्थितीत देशाच्या लोकसंख्येच्या ७० टक्के लोकसंख्या 'तरूण' एवढं वास्तव विकासासाठी पुरेसं आहे का?

'स्वप्नातल्या परीला स्वप्नात फक्त पंख' या करंदीकरांच्या ओळीप्रमाणे आपले उच्च-शिक्षण स्वप्न परी सारख्या भराऱ्या घेत राहील?'

# भविष्यातील तीव्र स्पर्धात्मक वास्तवाची जाणिव देणारे उच्चशिक्षण

**कृष्णकांत रकटे**
कला द्वितीय वर्ष

अकरावीला प्रवेश घेतानाच, विद्यार्थी – पालकांना स्पर्धात्मकतेची ओळख होते. कारण पूर्वी प्रमाणे आता कोणत्याही महाविद्यालयात सरळ प्रवेश मिळत नाहीत. प्रवेशासाठी प्रथम नाव नोंदणी करावी लागते. ही नोंदणी ऑफ लाईन असो की, ऑन लाईन. आलेल्या सर्व अर्जाची नोंद घेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची एक यादी प्रथम नोटीस बोर्डवर लावण्यात येते. ती असते नेमचेक लिस्ट. त्यात नाव आले म्हणजे अर्जावर विचार प्रक्रिया सुरु झाली. त्या यादीतील नाव, संबंधिताची माहिती उदा. आधीच्या परीक्षेतील गुण, जातीचा प्रवर्ग वगैरे संदर्भाने कुणाचे काही आक्षेप असतील. तर त्याची दुरुस्ती वगैरे करुन प्रथम गुणवत्ता यादी तयार होते. अशी यादी तयार करताना सामाजिक आरक्षणाचे सुत्र वापरले जाते. या सर्व नियमाच्या चौकटीत प्रवेशार्थीची पहिली यादी, शिल्लक जागांसाठी दुसरी – तिसरी यादी लावूनच प्रवेश दिले जातात. तेव्हाच प्रवेशासाठी किती तीव्र स्पर्धा आहे याची पहिली जाणिव विद्यार्थी पालकांना होत असते.

ही जशी अकरावीच्या प्रवेशासाठीची स्पर्धात्मक वातावरणाची नवी ओळख झाली. तशीच पुढील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रसंगी पुनरावृत्ती घडते. त्यातल्या त्यात व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेचा प्रचंड ताण – तणाव विद्यार्थी व पालकांच्या मनावर होतो. शिक्षणासाठी प्रवेश प्रसंगी जशी एक जीवघेणी स्पर्धा आहे. त्यापेक्षा जास्त तीव्र टोकाची स्पर्धा ही रोजगार संधी बाबत असल्याचे कळते.

सुशिक्षित व रोजगार संधीसाठी धडपडणारे जे बुद्धिमान तरुण असतात. त्यांची प्रज्ञा प्रतिभा व नवीन काही करुन दाखवण्याची जिद्द वगैरे जी त्याच्या व्यक्तित्त्वाचा – कर्तृत्त्वाचा आरसा असतो. अशा तरुण बुद्धिमान सुशिक्षित तरुणांचे टॅलेंटसर्च ऑपरेशन म्हणूनही या स्पर्धापरीक्षा व स्पर्धात्मक वातावरणाचा विचारच करण्यात येतो. या वास्तव परिस्थितीत स्वत:ला सिद्ध करण्यासाठी कठोर मेहनत – परिश्रम व अभ्यासाला कोणाही पर्याय नाही. याची जाणिव असलेले विद्यार्थीच स्पर्धात्मक वातावरणात स्वत:ला सिद्ध करु इच्छितात. त्यासाठी महाविद्यालय हेच एकमेव साधन व माध्यम आहे.

अशा वास्तव परिस्थितीत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती अशी की, अध्ययन – अध्यापन, आकलन व सर्जनशील विचार – ज्ञानाची जी अभिव्यक्ती घडणे अपेक्षित आहे. तिथे विद्यार्थी ज्ञानार्थी होण्या ऐवजी केवळ परीक्षार्थीच होत चालला आहे. एका बाजूला परीक्षा व निकालाचे मानसिक ताण – तणाव कमी करण्यासाठी आठवी पर्यंत परीक्षा न घेण्याचा शिक्षण मंडळाचा नियम होता. पण पुढे पदवी वर्गामध्ये घटक चाचण्या, स्वाध्याय – सेमिनार्स – मौखिक परीक्षा. सत्र पद्धतीमुळे प्रत्येक सत्रात व द्वितीय सत्रात घेण्यात येणाऱ्या ज्या परीक्षा असतात. त्यातील रिकाम्या जागा भरा चा जो प्रश्न विचारला जातो. तसे वेळ मिळेल तसे शिकवले जाते. म्हणून उच्चशिक्षण क्षेत्रातील परीक्षा घेणे व देणे हा व्यवहार हा स्थूल मानाने असून अडचण नसून खोळंबा म्हणतात. तसाच हा एक प्रकार झाला.

# उच्चशिक्षण व रोजगार संधीचे वास्तव

**दिपाली अंभोरे**
कला तृतीय वर्ष

काल – परवा मी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली ती अशी की, पोलिस भरतीसाठी मैदानावर तरुणांची शारीरिक क्षमता चाचणी सुरु होती. त्या रांगेतील मुलांना जेव्हा त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत विचारले – तेव्हा त्यात एम.ए., एम.एससी, एम. कॉम, एम. फिल, पीएच.डी. असे उच्चशिक्षित तरुण पोलिस भरतीसाठी आले होते. हा धक्का तसा कमी वाटावा अशी बाब पुढे आली ती म्हणजे त्यात बी.ए.एम.एस. व बी.एच.एम.एस या वैद्यकीय पदवीधारकांचा रांगेतील समावेश असल्याचे वाचून मोठा धक्का बसला. त्यात अजूनही एक धक्का म्हणजे बी.सी.ए. व इंजिनिअरिंगचे पदवीधर देखील असल्याचे वाचून बसला. असे का बरे घडत असेल ? या प्रश्नाचा विचार करताना एकदा सरांनी वर्गात सांगितलेली खलिल जिब्राणची एक कथा आठवली. ती आता माझ्या शब्दात सांगावी वाटते.

वाळवंटातील खुरट्या झुडपात राहणारा एक असतो कोल्हा. नेहमी प्रमाणे एके दिवशी तो सकाळी उठला. झोपत आळसावलेलं त्याच शरीर – काहीस जड झालेलं. ते मोकळं करण्यासाठी त्याने शरीराला आळोखे – पिळोखे दिले. असे करताना त्याचे लक्ष एका वेगळ्या आकारातील सावलीकडे गेले. खरेतर ती त्याचीच सावली होते. सकाळच्या कोवळ्या उन्हात सावल्या लांबच लांब दिसतात. अशी लांबलचक मोठ्या आकाराची सावली बघून तो प्रथम दचकलाच. असा एवढ्या मोठ्या शरीराचा कोणताही प्राणी त्याने पाहिला नव्हता. जवळपास एखादे मोठे झाड देखील तिथे नाही. मग ही सावली नेमकी कोणाची ?

अतिशय बुद्धिमान प्राणी असा लौकिक असलेल्या कोल्ह्यास ती सावली त्याचीच आहे हे कळायला फार नसला तरी बराच वेळ लागला. तो विचार करीत होता, झाडं व झाडाची सावली हलते हे खरेच – पण झाडे पळत नाहीत. ज्या अर्थी ही सावली आपल्याच बरोबर आपल्या सारखी व आपल्या गतीने पळते. ती सावली देखील आपलीच असली पाहिजे. ज्या अर्थी आपली सावलीच अशी लांब – रुंद व उंच दिसते. त्याअर्थी आपणही असे शरीराने मोठाच प्राणी असले पाहिजे. जसा वाघ –सिंह तसेच आपणही शिकारी प्राणी. तेव्हा आपण वाघ सिंहासारख्या मोठ्या शिकारी करणे सोडून इटूकल्या पिटूकल्या क्षूद्र प्राण्यांच्या शिकार करुन उपजिविका का करीत असतो ? असा विचार करताना त्यांनी

आता एक नवा संकल्प केला, आपण मोठ्या पशू – प्राण्याचीच शिकार करुन स्वत:ची उपजिविका करायची.

एक तर आपण लहान क्षूद्र प्राण्याच्या शिकारीवर उपजिविका करतो. म्हणून तर आपले पोट सदा रिकामेच. छोटीशी शिकार पोटात घाला मग दुसरीसाठी पळा. तिसरी मिळेपर्यंत पुन्हा पोटात भूक. हा भूकेचा प्रश्न कायम नसला तरी दीर्घ काळाचा सुटावा. त्यासाठी आपण आता मोठ्याच प्राण्याची शिकार करायची. भरपेट भोजन व दीर्घ काळाची विश्रांती असे वाघ – सिंहा सारखे जगायचे.

कोल्हाने मोठ्यातल्या मोठ्या प्राण्याची शिकार करायची असा जो संकल्प केला. त्या संकल्पपूर्ती साठी तो आता शिकारीसाठी फिरु लागला. पण वाळवंटात तसे मोठे प्राणी कुठे दिसतात ? तो खूप खूप फिरला. भटकला. मग थकला भागला. काही काळासाठी त्याला विश्रांती हवी वाटली. म्हणून तो सावलीचे ठिकाण शोधू लागला. सावली कुठेच दिसली नाही.

त्याच्याच पायाखाली त्याला दिसला सावलीचा चंद्र. त्याला गाणंही आडवलं, चांदोबा चांदोबा थकलास का ? पण इथे तर गर्दसावलीचं व चांदोबाला आडोसा देणारं लिंबोणीचं झाड ही नाही. दूर कुठे तर त्याला दिसते एक शेंदूळीचं झाड. त्याच्या आजूबाजूला असतात त्यात शिंदीच्या झाडाची झुडपं त्याचे अनुकूचीदार पन्हाळीचे काटे.

सावलीच्या ओढीने कोल्होबा पळत पळत तिथे गेले. त्यावेळी सरसर झाडावर झाडावरून खाली सुरपारंब्या खेळणारी खारुताई दिसली. त्याच्या पोटात भूक व डोक्यात बत्तीच पेटली. त्याने खारुताईला झडप घालून पकडले व मट्ट केले. तसेच आता पोलिसाच्या परेड ग्राऊंवर उच्च पदवीधर मिळेल ती नोकरी पदरात पाडून घेण्यासाठी आले होते.

# गुणवत्तेचा 'मार्क'स वाद

**अल्का मोगल**
कला तृतीय वर्ष

जीवन कलहात टिकण्याची क्षमता असलेले सजीवच टिकू शकतात. अशी क्षमता नसलेले कालौघात नष्ट होतात. या संदर्भाने साधार चर्चेला घेतलेल्या एका प्राण्याचे उदाहरण दिले जाते. ते म्हणजे डायनासोर नावाचा महाकाय प्राणी आपले अस्तित्व टिकवू शकला नाही. या सर्व गोष्टी आठवण्याचे कारण म्हणजे अलीकडे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रवाहात जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तीव्र स्पर्धेचा आपण अनुभव घेत आहोत. ही स्पर्धा तीव्र – स्फोटक व जीवघेणी झाली आहे. स्पर्धेचे हे वातावरण उच्चशिक्षण क्षेत्रात ही आहे. स्पर्धेचं हे गतीशास्त्र व व्यवहारातील खाचखळगे शिक्षण क्षेत्रातील तज्ञांना तेवढे कळतात. सर्वसामान्यांना यातील काहीच कळत नाही. मती गुंग करणारे जे उच्चशिक्षणाचे चित्र आणि चरित्र आहे. त्या संदर्भातील माझे आकलन प्रस्तूत लेखात मांडण्याचा माझा प्रयत्न आहे.

उच्च शिक्षणाचे प्रवेशद्वार म्हणून उच्च माध्यमिक प्रमाणपत्राचे अर्थात अकरावी – बारावीच्या अभ्यासक्रमाचा उल्लेख केला जातो. या पूर्वी दहावी, मॅट्रिक तथा शालांत प्रमाणपत्र परीक्षा ही उच्च शिक्षणाचे प्रवेशद्वार समजले जात असे. एकूणच शैक्षणिक जीवनात शालान्त व उच्च माध्यमिक तथा बारावीची परीक्षा आणि त्यांचे निकाल हे अंदमान – निकोबार बेटं किंवा केरळात दाखल होणाऱ्या मान्सून प्रमाणे भविष्यातील उच्चशिक्षणाचा लागवडीचा हंगाम वाटावा असेच वातावरण तयार होते.

विशेषत: या वर्षी दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागला. टी. व्ही. वर त्याबाबत विश्लेषण चर्चा सुरु झाली. परीक्षेला लाखो विद्यार्थी बसलेले. लाखो उत्तीर्ण झालेले. त्यात मुलींचे प्रमाण व टक्का वाढत असल्याचे चित्र. मुलांचा टक्का घटतो. शंभर पैकी शंभर मार्क्स घेणारे शे दीड शे मुलं उत्तीर्ण मुलांना पास श्रेणीत तसे कमीच. प्रथम व विशेष श्रेणीत तथा प्राविण्य प्राप्त मुलांची संख्या व त्यांनी संपादन केलेले गुण या संदर्भातील बातम्या वाचताना – ऐकताना मन आनंदाने भरुन येते. उच्च शिक्षणाच्या प्रवेशद्वारावरील ही गुणवंतांची मोठी गर्दी सुखद वाटते. पण ही गर्दी म्हणजे १८ ते २४ या वयोगटातील स्फोटक, संवेदनशील व महत्वाकांक्षी लोकशक्तीला काही पहाटेची स्वप्नं पडतात. त्या स्वप्नांचा अर्थ शोध घेतच ते प्रवेशासाठी महाविद्यालय परिसरात येतात.

महाविद्यालयातील प्रवेशासाठी प्राथमिक गुणवत्तायादी तयार होते. ही गुणवत्ता यादी वरून खाली व खालूनवर बारकाईनं वाचून होते. तेव्हा कळते की, यादीतील कितीजनास प्रवेश मिळू शकतो.

किती जनास प्रवेश मिळणार नाही. मागच्या वर्षीचा कटऑफ काय होता. या वर्षी तो किती असेल? मॅनेजमेंट कोटा किती. त्यातील प्रवेशासाठी किती रक्कम मोजावी लागेल. या सारख्या प्रश्नांचा गुंता विचारशक्ती गोठवणारा ठरतो. पुन्हा चर्चा या कॉलेज मध्ये नियमीत शिकवलेच जात नाही. त्या अमक्या तमक्या कोचिंग क्लासला पुन्हा प्रवेश घ्या. तिथेही तेवढ्या रांगा. महाविद्यालयापेक्षा कितीतरी जास्तीचे तगडे शुल्क भरा.

शासनमान्य महाविद्यालय असो की, खाजगी कोचिंग क्लास असो. आपल्या भरभक्कम गुणवत्तेचे साधार प्रमाणपत्र असलेला मार्क्स मेमो आमि संस्थेला देणगी शुल्क व कोचिंग सेंटरला बिनतोड शिकणावळ म्हणून मोजावी लागणारी मोठी रक्कम जसे काही अवघड घाटातून जाणाऱ्या रेल्वेला डब्बल इंजिन लावावे तसे परीक्षेतील मार्क्स व पालकाच्या खिश्यातील रग्गड पैका असो डब्बल बुस्ट इंजिन लावून विद्यार्थी उच्चशिक्षण क्षेत्रातील पटरीवर आपले उच्चशिक्षणाचे खर्चाचे इंजिन अपलोड करतो. पण आमच्या देशातील इंटरनेट सेवेतील खडित व कुंठीत स्थिती जसा चिंतेचा विषय आहे त्या प्रमाणे, सर्वांनाच प्रवेश हवे असतात ते बारावी विज्ञानसाठी. नंतर त्यांची पूर्व तयारी सुरु होते ते पीसीबी, पीसीएम साठी, त्यासाठी प्रवेशपूर्व सामाईक परीक्षांची पूर्वतयारी रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र आणि हाडाची काडं करुन मग स्कोअर चांगला मिळवा. इथे पुन्हा महत्त्वाकांक्षी प्रवेशोत्सुक असे लाखो तरुण – तर मेडिकल इंजिनिअरिंगच्या जागा मर्यादित आणि पुन्हा जीवघेणा संघर्ष या संघर्षात पिचून गेलेल्या सामान्य माणसाची चांगल्या शिक्षणाची, पदवीची व पदवीच्या अनुषंगाने रोजगाराची संधी व सुप्रतिष्ठीत जगण्याचे स्वप्नं असेच काळोखात विरलेले आहे.

# 'प्रेरणा' मुखपृष्ठे (१९६८ ते २०१७)





उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७–१८

## परिसंवाद

आमचे उच्चशिक्षण : आमच्या अपेक्षा आणि वास्तव.

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने प्रेरणाचा विशेषांक 'उच्चशिक्षण विशेषांक' म्हणून प्रसिद्ध होत आहे. महाविद्यालयात पदवीसाठी शिक्षण घेणारे विद्यार्थी साधारण १८ ते २१ या वयोगटातील असतात. खरे तर ते विद्यार्थीच आहेत. या परिस्थितीत उच्च शिक्षणा सारख्या विषयावरील त्यांचे विचार महत्त्वाचेच आहेत. पण विषय तर अतिशय गंभीर. या विषयावर आपले मत नोंदवताना सर्वांची अवस्था अशी की, विषयाची सुरवात कशी करावी. पहिले वाक्य कसे लिहावे. विषयाची मांडणी कशी करावी. त्याचा शेवट कसा करावा. याचा अर्थ असा की, संत ज्ञानेश्वराला पत्र लिहिण्यासाठी बसलेल्या चांगदेवा प्रमाणे पाटी व पत्र कोरंच राहिलं तर... ?

अनेक विद्यार्थी म्हणायचे सर, विषय तर चांगला भारीच आहे. पण त्यात आमच्या सारखे विद्यार्थी काय आणि कसे लिहितील ? ही परिस्थिती समजून घेतल्यावर विषयाचं सुलभीकरण करणे आवश्यकच झाले. त्यासाठी सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यासमोर 'आमचे उच्च शिक्षण : आमच्या अपेक्षा आणि वास्तव' असा एक परिसंवादाचा विषय नक्की केला. आणि मग सर्वाना आवाहन केले की, तुम्ही गंभीर विचार – चिंतन वगैरे काही करावयचे नाही. लेखही लिहायचा नाही. भाषणही करायचं नाही. तुम्ही फक्त तुमचा अनुभव तुमच्या भावना या आत्मकथनाच्या रुपाने सांगायच्या. उदा. तुम्हाला दहावीनंतर पदवीचे शिक्षण का घ्यावे वाटले ? तुमच्या घरात तुम्हाला कॉलेजला पाठवताना आई वडिलांना काय वाटले ? कॉलेजमध्ये आल्यावर तुम्हाला काय वाटले ? तुमचे अभ्यासक्रम कसे वाटतात ? सेमिस्टर पद्धती बद्दल तुम्हाला काय वाटते ? तुम्ही स्नेह संमेलना बद्दल काही धमाल आठवणी सांगू शकता. असे बरेच काही हलकं फुलकं करुन उच्चशिक्षणाचा केंद्र बिंदू असलेल्या विद्यार्थ्यांना जेव्हा बोलतं व लिहितं केलं तेव्हा त्यांनी व्यक्त केलेल्या विचार – भावनांचे हे संकलन.

**सरिता शेंडगे**
वाणिज्य द्वितीय वर्षे

उच्चशिक्षण म्हणजे दहावी, बारावी पास होऊन पुढील शिक्षण म्हणजे उच्चशिक्षण होय. ह्यामध्ये वेगवेगळ्या शाखा असतात. विज्ञान, वाणिज्य, कला इ. शाखा असतात पण जेव्हा दहावी पास झालेला विद्यार्थी प्रवेश घ्यायला येतो. तेव्हा तो महाविद्यालय पाहून गोंधळून जातो. ग्रामीण भागातला विद्यार्थी त्यात जास्त गोंधळून जातो व या तिन्ही पैकी एका शाखेला प्रवेश घेतो. बारावी नंतर बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. अशा वेगवेगळ्या शाखेमध्ये प्रवेश घेतात. वेगवेगळ्या विद्यापीठाचे अभ्यासक्रम हे भिन्न प्रकाराचे असतात. बी.ए. अभ्यासक्रम म्हणजे सामाजिक व मानव्य विद्याशाखांचे ज्ञान संपादन करणे होय.

बी.ए. चा अभ्यासक्रम हा खूप चांगला आहे. माझ्या मतानुसार हा जो अभ्यासक्रम आहे, तो खूप ज्ञान देणारा आहे. बी.ए. चे विषय पुढील युपीएससी, एमपीएससी या परीक्षेला अत्यंत उपयुक्त आहेत. तीन वर्षात चांगली स्पर्धा परीक्षेची तयारी होते.

परंतु हे जे विद्यार्थी असतात उच्चशिक्षण घेणारे ते परीक्षापुरताच अभ्यास करतात. उच्चशिक्षण म्हणजे केवळ परीक्षापुरता अभ्यास न करता जर सखोल अभ्यास केला तर त्याला पुढे खूप संधी असते. जेव्हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवीधर होऊन जेव्हा बाहेर पडतो तेव्हा त्या विद्यार्थ्याला काहीच कळत नाही काय करावे ? हा मोठा प्रश्न पडतो.

विद्यापीठात बी.ए., एम.ए. च्या अभ्यासक्रमात बदल करायला हवा. जो की उच्चशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याला उपयुक्त ठरेल. असे सत्रपद्धती पेक्षा वेगळ्यापद्धतीने शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्याला

नक्कीच उपयोगी पडेल. विद्यापीठात वेगळ्या पद्धतीने परीक्षा घ्याव्यात की विद्यार्थ्यांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. जेव्हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवीधर होऊन विद्यार्थी बाहेर पडतो तेव्हा पूर्णपणे त्याचा विकास झालेला आहे की नाही हे पाहायला पाहिजे. विद्यापीठात असा अभ्यास करुन त्यांना त्यांच्या जीवनामध्ये ज्ञान वापरता आलं पाहिजे.

संपादीत बी.कॉम. च्या अभ्यासक्रमामध्ये विद्यापीठाने काही विषय असे ठेवले आहेत, की ते भविष्यात किंवा सध्या काहीच कामी येणार नाहीत. नुसता त्या विषयाचा त्या सत्रापुरता अभ्यास करायचा, परीक्षा द्यायची पास व्हायचे. अशा विषयामध्ये विद्यापीठाने बदल करायला हवा. बी.कॉम. म्हटल्यावर अकाउंटिग, विषय महत्त्वाचा आहे. यामध्ये खुप संधी आहेत. पण त्याविषयी माहिती असणे जरुरी आहे. विद्यार्थ्यांना या सगळ्याची अर्धवट माहिती असल्यामुळे ते यशस्वी होत नाही. बी.कॉम. झाल्यानंतर जेव्हा एम.कॉमला विद्यार्थी जातो. तेव्हा त्याला प्रॅक्टीकली एखादे बँकेचे काम सांगितले जाते. तेव्हा तो गोंधळून जातो. त्या विद्यार्थ्याला स्लीप भरता येत नाही. याचा परिणाम तोच. परीक्षा देऊन पास झाला, परंतु परीक्षेपुरते अभ्यास करुन पास व्हायचे. त्याचा प्रत्यक्ष जीवनात लाभ झाला पाहिजे.

बी.एस्सी म्हटल्यानंतर त्यामध्ये जीवशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र असे विषय असतात जीवशास्त्रामध्ये मानवी शरीराची संपूर्ण माहिती असते. विद्यापीठात त्याना असा नवीन प्रकारचा अभ्यासक्रम करुन घ्यावा. रसायनशास्त्रामध्ये वेगवेगळे केमिकल्स असतात त्या केमिकल्सचा वापर कोणत्या वस्तू तयार करण्यासाठी होतो, प्रॅटिकल होतात ते परीक्षापुरतेच. काही विद्यापीठामध्ये प्रॅक्टीकल नसते. विद्यार्थी हा जास्तीत जास्त कसा सक्षम बनला पाहिजे अशा योजना काही विद्यापीठाने काढायला हव्यात.

उच्चशिक्षणाध्ये वेगवेगळ्या विद्यापीठात वेगळा प्रकारचा अभ्यासक्रम असतो वेगवेगळ्या परीक्षापद्धती असतात. विद्यापीठात असा अभ्यासक्रम आखला पाहिजे की, तो अभ्यासक्रम विद्यार्थाला भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल. उच्च शिक्षण म्हटल्यावर विद्यापीठ हे महत्त्वाचे मानले जाते. विद्यापीठात कोणत्याही शाखेचा विद्यार्थी असो त्याला तो अभ्यास केल्यानंतर भविष्यात उपयोगी पडला पाहिजे. केवळ पुस्तकी ज्ञान व पदवी प्रमाणपत्रामुळे जीवन जगणे सोपे नाही होत.

उच्चशिक्षण हे प्रॅक्टीकली असले पाहिजे. तरच त्या शिक्षणाचा जीवनामध्ये उपयोग होईल. उच्चशिक्षणामुळे विद्यार्थी हा सर्वबाबतीत सक्षम बनतो. बौद्धीक व मानसिकरित्या विकास होतो. निर्णय घेण्याची क्षमता त्याच्यामध्ये येते. उच्चशिक्षण घेतलेच पाहिजे. कारण उच्च शिक्षणामुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. उच्चशिक्षण चांगले मिळायला पाहिजे त्यासाठी विद्यापीठही चांगली असली पाहिजे. बोगस विद्यापीठ, विद्यापीठाला कुलगुरु नाही अशी विद्यापीठे कशाही प्रकारच्या विद्यार्थ्याला घेतात. त्या विद्यापीठामध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन नसताना परीक्षा घेतात.

काही विद्यापीठे हे चांगली शिस्तबद्ध असतात. अशा विद्यापीठामध्ये शिस्तीने व कडक परीक्षा घेतात. पण अशी काही विद्यापीठ आहे की तिथे विद्यार्थ्याला अभ्यास करण्याची गरजच नाही. त्यामुळे विद्यार्थ्या मधील मेहनत, चिकाटी हे गुण विकसीत होत नाहीत. व त्या विद्यार्थ्यांना अभ्यास न करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. यामध्ये विद्यार्थ्याचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अशा विद्यापीठाला शासनाने कायद्याने बंदी घालण्यात यावी. अशीही काही विद्यापीठं

आहेत जिथे विद्यार्थ्याला अनेक संधी उपलब्ध असतात. व्यवस्थितरित्या परीक्षा घेतल्या जातात. अशा विद्यापीठाला शासनाने मदत करायला हवी. बोगस महाविद्यालयांवर बंदी घालावी. विद्यार्थ्याला बोगस प्रमाणपत्र घेऊन त्यांना फसवले जाते. अशामुळे विद्यार्थ्यांमध्ये नकारात्मकता येते.

विद्यार्थ्यांना वाटले पाहिजे की, नाही आपल्याला या सत्रामध्ये संपूर्ण विषय काढायचे. यामुळे विद्यापीठाला व महाविद्यालयाला खूप कमी कामकाज राहील. त्यामुळे विद्यार्थ्यांचे पुन्हा रिपीट परीक्षा घेणे, पुन्हा पेपर तपासणे ह्या सगळ्याप्रकाराचे काम कमी होईल.

यामुळे पारदर्शकता राहील जे विद्यार्थी संपूर्ण विषय काढून पुढच्या सत्रामध्ये प्रवेश घेतो, तर चांगले वातावरण निर्माण होईल, रिॲडमिशन विद्यापीठाने दिल्यामुळे जो मागे पडलेला विद्यार्थी असतो तो चांगला अभ्यास करुन पुढे जाऊ शकतो. पण विद्यापीठावर परीक्षेचा ताण येतो.

उच्चशिक्षण म्हणजे पदवी प्राप्त करणे किंवा पदव्युत्तर होणे. उच्च शिक्षणामुळे विद्यार्थी हा मनाने अतिशय सक्षम बनतो. त्याच्या जवळ जग ओळखण्याची कला येते. उच्चशिक्षण घेतलेला विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात आपले प्रभावी व्यक्तिमत्त्व दाखवू शकतो. विद्यापीठ हे चांगलेच अभ्यासक्रम ठेवतात फक्त विद्यार्थ्याने अत्यंत सखोलपणाने, काटकोर पद्धतीने अभ्यास केला पाहिजे. खरच उच्चशिक्षण म्हणजे जीवनातला अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. उच्चशिक्षण घेतल्यानेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडू शकते. विद्यापीठात विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातसुद्धा अनेक संधी दिल्या आहेत. उच्चशिक्षण घेत असताना विद्यापीठात क्रीडा क्षेत्रात भाग घ्यायला हवा. त्यामुळे विद्यार्थी निरोगी राहतो व त्याच्यामध्ये खेळण्याची जिद्द निर्माण होते.

उच्चशिक्षण जर प्रत्येक विद्यार्थ्याने सखोल अभ्यास व चिकाटीने पदवी घेतली तर तो कोणत्याही क्षेत्रात प्राविण्य मिळवू शकतो. उच्चशिक्षणात मोकळे वातावरण असते तसे शाळेत असताना सगळेच नियमच असतात.

उच्चशिक्षणात एक महत्त्वाची बाब म्हणजे उच्चशिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना स्वत:ची सर्व कामे स्वत: करावी लागतात. त्यामुळे विद्यार्थी हा एक जबाबदार नागरिक म्हणून वावरतो .

उच्चशिक्षणात अशा काही संधी येतात की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने होते. विद्यापीठात उच्चशिक्षणाच्या ज्या पदवी परीक्षा घेतात, त्या काटेकोरपणे घेतल्या पाहिजेत. विद्यापीठात ज्या विद्यार्थ्यांचा सेमिस्टरमध्ये एखादा विषय बॅक राहिलात, तर त्यांना पुढच्या सेमिस्टरची परीक्षा देता येणार नाही अशी अट घातल्यामुळे विद्यार्थी जास्त सखोलपणे अभ्यास करुन संपूर्ण विषय काढण्याची चिकाटी दाखवतो.

विद्यापीठात परीक्षा घेतांना जर एखाद्या विद्यार्थ्याचा पहिल्या सत्रामध्ये राहिलेला विषय दुसऱ्या सत्रामध्ये काढण्याची संधी दिल्यामुळे विद्यार्थी काळजीने अभ्यास करत नाही. त्यांना माहित असते की पुढच्या सत्रामध्ये पेपर काढायचा आहे. अशामुळे विद्यार्थ्यामध्ये मेहनत, चिकाटी असे गुण राहत नाही, विद्यापीठात असा नियम माझ्या मतानुसार असला पाहिजे की पहिल्यासत्राचा विषय बॅक राहिलातर तो काढल्याशिवाय पुढचा सत्राची परीक्षा देता येणार नाही. अशामुळे विद्यार्थी चिकाटीने अभ्यासाला लागतील व विद्यार्थ्यांमधील चिकाटी हा गुण वाढला जाईल.

विद्यापीठात असा काही तरी नवीन अभ्यासक्रम

द्यायला पाहिजे की जेणेकरुन विद्यार्थी हा 'स्मार्ट' विद्यार्थी बनला पाहिजे व त्याला नोकरीची संधी मिळायला हवी. तेच अभ्यासक्रम त्याच परीक्षा पुन्हा – पुन्हा येतात. तात्पुरता अभ्यास करुन पास व्हायचे याच्यापलीकडे काहीच नाही. असा अभ्यासक्रम विद्यापीठात काढायला हवा, की विद्यार्थ्याने स्वत: तो प्रयोग किंवा ती गोष्ट करुन पाहायला हवी. विद्यापीठाचा जो अभ्यासक्रम आहे तो जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कशाप्रकारे करुन घेता येईल. हे विद्यापीठाने लक्षात घेऊन भविष्यात उपयोगी पडेल असाच अभ्यासक्रम विद्यापीठात ठेवला पाहिजे. उच्चशिक्षणामध्ये अनेक प्रकाराच्या शाखा आहेत. त्या वेगवेगळ्या शाखेमध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात. व परीक्षा देऊन पदवीधर बाहेर पडतो. असे अनेक विद्यापीठ आहेत. सगळ्या विद्यापीठात उत्तमरित्या अभ्यासक्रम ठेवला पाहिजे जेणेकरुन भविष्यात उपयोगी पडेल.

**शिक्षण हे खरेच वाघीणीचे दुध आहे का ?**

**राजश्री बोराडे**
विज्ञान द्वितीय वर्ष

मला तर विषयाची सुरवात कोठून करावी हे कळेनाच. कारण हा विषय तर माझ्या स्वप्ना सारखा. स्वप्नं तर कशी खंडित असतात. त्याची सुरवात व शेवट तेवढा लक्षात राहतो. पण मध्ये काय घडते तेवढे आठवत नाही. तसेच तर वास्तवातही घडताना दिसते.

हे विधान कुणाचं ते मला सांगता येत नाही. पण फार लोकांकडून मी ऐकलंय. म्हणे, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. हे वाघिणीचे दूध जो पिईल तो वाघासारखा गुरगुल्या शिवाय राहणार नाही.'

मी तर प्रत्यक्षात वाघच पाहिलेला नसतो. वाघिणीच्या दुधाची गोष्ट फार दूरची. असेल त्याचा रंग पांढरा. पण त्याची चव ती कशी असेल ! गायी – म्हशीच्या दुधापेक्षा ते नक्कीच वेगळे असेल की त्यातील घटक वगैरे कसे असतील. पचायला ते हलके की, जड असेल? असो. म्हणीचा – लोकोक्तीचा किंवा सुभाषितांच शब्दश: अर्थ नसतो घ्यायचा. पण यातील वास्तव असे की, जंगलात वाघ, वाघिण आहेत. म्हणजे त्यांचे दूधही असेल. पण ते मिळवणं आणि पिणं खरेच किती कठीण ? आमचं उच्च शिक्षण घेणं देखील असेच तर कठीण आहे ?

आता हेच तर बघाना, मी अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश घेतला. तेव्हा तर माझेच नाही तर सर्व विद्यार्थ्यांच्या पालकाच्या मनात एक स्वप्नं असतं, आपला पाल्य डॉक्टर किंवा इंजिनिअर झाला पाहिजे. ते आपलं स्वप्नं पाल्याच्या मनात एखादं बियाणं रोपवावं. तसं रुजवण्याचा प्रयत्न करतात. हे खरे आहे. पण त्यासाठी अकरावी – बारावीचा अभ्यास पुन्हा नीट व सीईटीची तयारी. त्यासाठी खाजगी कोचिंग क्लास लावा. मोठी तगडी फी भरा. रात्रीचा दिवस करा. परीक्षा द्या. मग निकालाची वाट बघा. आणि ती मार्काची तीव्र जीवघेणी स्पर्धा. एका एका मार्कांनी प्रवेश हुकणार किंवा संधी मिळणार. कुणाला वाटतो हे देवाचा खेळ. पण तो आहे उच्चशिक्षण नावाच्या भांडवली बाजाराचा सापळा. या सापळयात म्हणजे पिंजऱ्यात ती डॉक्टर – इंजिनिअरची पदवी असते वाघिणीच्या आचळातील दुधा सारखी. असे दूध मिळालेले रग्गड पैसा मिळवत सुखानं लदबदून जातात. ते कुठं गरीब – शोषित व अन्यायाने पिडित लोकांसाठी व्यवस्थेच्या विरुद्ध गुरगुरत असतात !




ज्ञानसंपदा आम्हां लाभली,
ती संस्था ही नूतन
प्रभा तयेची नित्य विलसिता
दिशा देई नूतन

ज्ञानासह विज्ञान फुलवी
संस्काराचे हे नंदनवन
दीपस्तंभ ते आज स्मरु
संस्थेसाठी झाले चंदन

कौतुक करण्या आतुरले मन
स्वीकारा हे शब्द सुमन
आम्हां हृदयी चिर स्थिरावी
संस्था ही नूतन

कर्तृत्वाची चढू शिखरे
घेऊन ज्ञान संपदा
आशीर्वचन आज लाभो
वंदू 'नूतन' शतदा

**गौतम सूर्यवंशी**



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

## सुवर्ण साक्षी

अनुक्रम


- **मागे वळून पाहतांना : पूर्वानुभवाची शिदोरी** – प्राचार्य द.रा. कुलकर्णी
- **संन्यस्त जीवन व समर्पित प्रेरणा : श्रीरामजी भांगडिया** – प्रा. प्रकाश कामतीकर
- **महाविद्यालयीन जीवनाचा मागोवा** – प्रा. डॉ. पी.व्ही. काटे
- **सुखद आठवणी** – विश्वास वसेकर
- **आठवणीचे क्षण** – प्रा.डॉ. गंगाधर गळगे
- **चारित्र्य निर्माणाचे संस्कार केंद्र** – गौतम सूर्यवंशी
- **माझं महाविद्यालय (माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया)** – हेमंत आडळकर / त्र्यंबक बोराडे / सतीश कुलकर्णी/ प्रा. विठ्ठल डख / डॉ. मारोती कसाब / स्वाती परतूरकर/ संतोष धुमाळ / गोविंद मंत्री / प्रतिभा बोरकर / संगिता काळे / प्रियंका मनियार / रोहिणी हेलवाडे / रीता मसुरे

# मागे वळून पाहतांना : पूर्वानुभवाची शिदोरी

**प्राचार्य द.रा. कुलकर्णी**

*लेखक या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य. सलग पंचवीस वर्ष ते प्राचार्य राहिले. या काळात त्यांनी महाविद्यालयास आशयपूर्ण आकार दिला. प्रस्तुत लेखात त्यांनी तत्कालीन अभिजात, व प्रगत पुरोगामी विचार जाणिवांचा पुरस्कार केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मूल्यानिष्ठ उच्च शिक्षणाचा विचार – प्रवाह गतीमान ठेवला. त्या संदर्भातील हे स्वगत आहे.*

---

पाहता पाहता नूतन महाविद्यालय, सेलू जि.परभणी ने १५ जुन २०१७ साली ५० व्या वर्षात पर्दापण केले. या पाच दशकात या महाविद्यालयाने जी वाटचाल केली आहे, ती शैक्षणिक मूल्यांची जपणूक आणि गुणवत्तेची कास धरणारी आहे. त्याची साक्ष ही दशके देतात नव्हे त्यांनी ती दिलीच आहे. नूतन विद्यालय या राष्ट्रीय शाळेच्या स्थापनेपासून (१९३९-४०) शिक्षणाच्या माध्यमातून देशभक्ती, राष्ट्रप्रेम, लोकशाही जीवनशैली इत्यादीसाठी धडपड केली. त्याकाळी हैद्राबाद संस्थानात निझामी राजवट होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीने जोर धरला होता. भारत स्वातंत्र्याच्या जवळपास पोचला होता. परंतु सुमारे ६०० लहान मोठी संस्थाने त्यांच्या एकसंघत्वातील अडथळे ठरत होती. त्यावेळच्या राष्ट्रीय नेत्यांनी ब्रिटीश गुलामगिरी झुगारून देण्याचा निर्धार केला होता. 'चले जाव' घोषणने भारत दुमदुमला होता. भारतीय स्वातंत्र्याची पहाट होत असतांना काही संस्थाने आगामी स्वतंत्र भारतात स्वेच्छेने विलीन होत होती. तर काहींनी आपला स्वतंत्र राहण्याचा मनोदय जाहीर केला होता.

राष्ट्रीय आंदोलकांनी जे मिळेल ते पदरात पाडून घेत उपस्थित संस्थांना पुढील काळांत भारतात सामील होण्यास भाग पाडले. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. त्याला पूर्णत्व आले ते २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक भारत निर्माण करुन. (१९३८-१९४८) या दशकात हैद्राबाद संस्थानातील प्रजेने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्याची ज्योत पेटविली. आणि अन्यायकारी संरजामशाही, निजामी राजवटीला १७ सप्टेंबर १९४८ रोजी तिलांजली दिली. या हैद्राबाद मुक्तीसंग्रामात त्याकाळच्या काही शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक संस्था, व्यायाम शाळा इत्यादी, संस्थांच्या माध्यमातून हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या चळवळीव्दारे लोकजागराची कामगिरी पार पाडली. या लक्ष्याचा एक भाग म्हणून हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने १९४२ साली ''चले जाव'' आंदोलनापासून सत्याग्रही तयार करण्याचे केंद्र सेलूला चालविले. आणि या छोट्या शहराने त्याकाळी या चळवळीला बळ दिले. त्यामुळे स्थापनेपासून नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचा स्वातंत्र्य चळवळीशी ऋणानुबंध जुळला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संस्थेने शिक्षण, विस्ताराकडे लक्ष दिले. पूर्व माध्यमिक स्तरावरील रूपांतर (५ वी ते ७ वी) व माध्यमिक (८ वी ते १०वी ) पर्यंत केले.

पोलीस कारवाईनंतर (१७ सप्टेंबर १९४८)

– (१९४९–५०) साली ७ वी पासून दोन वर्षात परिपूर्ण माध्यमिक शाळेत केले. या प्रयोगशील संस्थेचे बहुविध प्रशालेची योजना स्वीकारून तंत्रशिक्षण, कृषी, मानव्य विद्या अशा तीन व्यवसायभिमुख शाखा निवडून त्या परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला. तंत्र शिक्षणासाठी कार्यशाळा, यंत्रसामग्री कृषी विभागासाठी शेती खरेदी करुन शेती उत्पादन वाढविण्याचे विविध प्रयोग केले. पूर्वतयारी फारशी न करता आणि घरसोडीचा शासकीय धोरणामुळे अल्पकाळात ही योजना निरूपयोगी ठरली. म्हणून याकाळात संस्था महाविद्यालयाकडे वळली. १९६२ साली कलावाणिज्य महाविद्यालय सुरु करण्याचा विचार बाजूला ठेवण्यात आला. बहुविध योजना आपोआप बंद पडली. नंतर पुन्हा नव्याने महाविद्यालय सुरु करण्याचा विचार जोर धरू लागला. या पार्श्वभूमीवर नूतन महाविद्यालयाची स्थापना करण्यासाठी १९६७–६८ या शैक्षणिक वर्षात पूर्वतयारी करण्यात आली. विज्ञान विभाग सुरु करण्यासाठी पदार्थविज्ञान आणि रसायनशास्त्र या विषयाच्या तयार प्रयोगशाळांचा उपयोग होऊ शकेल हा विचार करुन तिन्ही विद्याशाखा एकदम काढण्याचा विचार पक्का झाला. शेतीत नवीन नवीन प्रयोग करुन उत्पादन वाढविण्याचे जोमाने प्रयत्न झाले. संकरितवाण विकसीत झाल्याने कापूस, ज्वारी इत्यादी पिकांचे उत्पादन वाढविण्यास या नवीन वाणाचा उपयोग झाला. त्यामुळे संस्थेस आर्थिक बळ लाभत गेले.

या शाळेचा जुना विद्यार्थी (१९४३–४६) (१९४९–५०) या वर्षात सेलू शहरातील या संस्थेच्या शाळेतील शिक्षक,– संचालकांशी जवळीक निर्माण झाली आणि मी अनौपचारिक पणे या शाळेशी जोडला गेलो. उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी या शहरातील शैक्षणिक राजकीय कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले. पदवीधर होऊन या शाळेत शिक्षकांच्या जागेसाठी आश्वासनाने पदव्युत्तर शिक्षण संपादन करुनच पुढचा विचार करावा असे मनाने ठरविले.

माझा उच्चशिक्षण क्षेत्रातला अनुभव (प्रशासकीय आणि अध्यापन) माझी जीवनमूल्ये, येथील ध्येयवादी शिक्षक कार्यकर्त्यांच्या जीवनशैलीचा प्रभाव इत्यादीमुळे या नवीन महाविद्यालयाच्या पूर्व तयारीत व्यवस्थेशी जोडण्यात आले. माझा या क्षेत्रातील पूर्वानुभव या नवीन महाविद्यालयाच्या परिपूर्ण तयारीसाठी उपयोगी पडत गेला. आणि नवीन महाविद्यालय १९६८–६९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास या संस्थेस रितसर परवानगी मिळाली, आता ५० वर्षे पूर्ण झाली. या पाच दशकातील वाटचालीचा आढावा घेण्यापूर्वी उच्च शिक्षणाची सद्यस्थिती यासंबंधी काही निरिक्षणे उपयुक्त ठरू शकतील.

**जागतिकीकरणाचे परिणाम**

१९९१ पासून या देशाचे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या आर्थिक धोरणाचा अवलंब केला. त्याचे परिणाम आता जाणवू लागले आहेत. शासन शैक्षणिक भार पेलण्यास कमी पडत असल्याचे लक्षात आले. किंवा राष्ट्रीयकरणाचे ओझे सरकार पेलू शकत नसल्यामुळे खाजगीकरणाकडे वळणे भाग पडले. समाजवादी समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, राष्ट्रीयकरण, कल्याणकारी राज्य इत्यादीकडे पाठ फिरवून वेगळा मार्ग चोखाळावा लागत असल्याचे जाणवते. सार्वजनिक खर्चाची तोंड मिळवणी करणे जड जाऊ लागले. त्यामुळे जगाच्या अर्थव्यवस्थांचा संदर्भ घेत उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण हळूहळू स्वीकारून नवे आर्थिक धोरण तयार होत गेले.

या व्यवस्थेत स्पर्धा आल्या, त्यामुळे हळूहळू

खाजगीकरणाचा अंगीकार करावा लागला, इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही हळू हळू परिणाम जाणवू लागला. मुक्त विद्यापीठ, मुक्त शाळा, स्वंय अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानीत शाळा व महाविद्यालये, असे धोरण शासनाने अंगीकारले. त्याचे दुष्परिणाम आता जाणवू लागले आहेत. इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षणाचे बाजारीकरण झाले असून श्रीमंतासाठी चांगले शिक्षण, गरीबासाठी कमी दर्जाचे शिक्षण, असा भेदभाव सुरु झाला. या नवीन व्यवस्थेतून शिक्षण सम्राट तयार झाले, परंपरागत विद्यापीठाच्या तुलनेत नवीन स्वायत्त तथा अभिमत विद्यापीठ आणि तत्सम संस्था ज्यात Coaching Classes चा समावेश होऊ शकतो. त्या प्रबळ ठरत आहेत. धनवान आणि उच्चभ्रू पालकांना अशा संस्थाचा झगमगाट आणि जाहिरातबाजीमुळे विद्यार्थी वर्ग अशा झगमगाट असणाऱ्या (Shining) व्यवस्थाकडे झुकू लागले आहेत. "India Today" सारख्या प्रस्थापित इंग्रजी साप्ताहिकाने मागील २१ वर्षापासून उत्कृष्ट महाविद्यालये, विद्यापीठे असा नवीन उपक्रम राबविणाऱ्या संस्था सर्व्हेक्षण करुन आपल्या अंकात गुणानुक्रमाने संस्थांचा दर्जा प्रसिद्ध करु लागल्या. यांच्या सर्वेक्षणानुसार खाजगी संस्था परंपरागत किंवा प्रस्थापित तांत्रिक शिक्षण संस्थांना मागे टाकीत आहेत. असे एक चित्र समोर आले आहे. सध्या त्यांच्या बरोबरीने वाटचाल करीत आहेत भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) ज्यांना देशात नव्हे जगात मान्यता मिळाली. त्यांच्याहीपुढे पाऊल टाकण्याचा अशा संस्थांचा प्रयत्न आहे. भारतात सध्या (२०१७ मध्य) ३९००० महाविद्यालये आणि तत्सम संस्था, ७६० विद्यापीठे असून त्यांच्या बरोबरीने खाजगी संस्थापुढे आल्या आहेत. अशा संस्थांमधून शिक्षण घेतलेल्या ८० टक्के पेक्षा अधिक अभियांत्रिकी पदवीधर नोकरीस पात्र ठरत नाहीत असा अनुभव नोंदविला आहे. हे लक्षण या क्षेत्रांतील गुणवत्तेच्या अभावामुळे घडत आहे. Quantity is not enough, Quality matters असेच शिक्षणाचे मुख्यध्येय हवे. त्यासाठी सर्वच संस्थांचे मूल्यांकन महत्त्वाचे ठरते. शैक्षणिक गुणवत्ता, दर्जा, वाढविण्यासाठी National Insitutional Ranking सूत्रचा आराखडा – २००५ तयार झाला असून मूल्यांकनाची सुरुवात झाली आहे. परंतु केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे शिक्षणावरील  खर्च मागील काही वर्षापासून घसरत चालला आहे. २०१३–१४ या वर्षी ४.५७ टक्के, २०१५–१६ साली ३.६५ टक्के तर चालू आर्थिक वर्षात ३.७ टक्के असा हा शैक्षणिक खर्च खाली खाली येत आहे. शिक्षण व्यवस्थेतील ४० टक्के जागा रिक्त असल्याचे अहवाल सांगतो. उच्च शिक्षणासाठी जगातील विकसित देशात ५० टक्के विद्यार्थी नोंदणी असून भारतात हे प्रमाण फक्त २४ टक्के आहे.  या सर्वेनुसार उच्च शिक्षणाचा दर्जा  कसा उंचावेल असा यक्ष प्रश्न भारतापुढे आहे. मागील ५० वर्षात अनेक आयोग, समित्या अभ्यासगट नियुक्त केले गेले. त्यांचे अहवाल धूळखात पडले असून सरकार बदलले की धोरणात बदल, धरसोड वृत्ती ठरलेली आहे. त्याचा परिणाम शैक्षणिक दर्जा खालावण्यात होत आहे. पण लक्षात कोण घेतो ?

शैक्षणिक विस्ताराच्या काळात सेलू सारख्या शहरात शैक्षणिक क्षेत्रात नाव लौकिक संपादन करुन राष्ट्र निर्माण करणाऱ्या राष्ट्रीय शाळेचे अशा ध्येयवादी शिक्षण संस्थेत रुपांतर झाले आणि उच्च शिक्षणाची सोय या ठिकाणी झाली. नूतन महाविद्यालयाची ५० वर्षाची वाटचाल ध्येयपूर्तीच्या दिशेने झाली आहे. पहिली २५ वर्षे प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली, मी आणि सर्व सहकाऱ्यांनी उच्च शिक्षणाचा पाया घातला. त्या रोपाचे आज वटवृक्षांत रुपांतर आता

बघत आहोत. यात माझा खारीचा वाटा असून माझे तत्कालीन सर्व सहकारी शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचे भागीदार आहोत हे मी नम्रपणे नमूद करू इच्छितो. मागील पाच दशकातील (१९६८ ते २०१८) या महाविद्यालयाची वाटचाल त्याची साक्ष असून या वाटचालीचा वृत्तांत इतरत्र वाचावयास मिळेलच.

या वाटचालीची म्हणजे पाच दशकाची विभागणी सोयीसाठी अशी करतो.

पहिले दशक (१९६८– ७८) महाविद्यालय स्थापना शैक्षणिक गरजा पूर्ण करणे.

दुसरे दशक (१९७८– ८८) मूलभूत सुविधा पुरविणे.

तिसरे दशक (१९८८– ९८) गुणवत्ता आणि विस्ताराचे दशक.

चौथे दशक (१९९८– २००८) गुणवत्तेकडे वाटचाल.

पाचवे दशक (२००८– २०१८) उत्कृष्टतेकडे झेप.

**उपक्रमशिलतेचा संक्षिप्त आढावा**

या पाच दशकाच्या वाटचालीचा आलेख इतरत्र दिला आहे. या पाच दशकापैकी अडीच दशके (१९६८–९३) मी प्राचार्यपदाची जबाबदारी सर्व संबंधितांच्या सहकार्याने समर्थपणे सांभाळली, परंतु मी दैनंदिनी लिहित नसे. त्यामुळे विस्ताराने लिहिण्यासाठी केवळ आठवणी वर विसंबुन राहिलो. पुढच्या अडीच दशकाची १९९३ – ९४ ते २०१८ च्या नोंदी महाविद्यालय वार्षिकांकात, वार्षिक अहवालात इत्यादी आढळतील. माझ्या कार्यकाळातील वाटचालीतून काही निवडक आणि उल्लेखनीय, आठवणीत राहिलेल्या उपक्रमांची नोंद येथे घेतली आहे.

माझ्या २५ वर्षाच्या कार्यकाळात महाविद्यालयाची स्थापना, विविध इमारती आवश्यकतेनुसार अस्तित्वात आल्या, महाविद्यालय अस्तिवात आल्यापासून महाविद्यालयाची नवीन भव्य (दिव्य नव्हे) इमारत संस्थेने तयार केलेल्या साहित्यापासून निर्माण करुन काटकसरीचा एक आदर्श संस्थापुढे निर्माण केला. जाहिरात बाजीचा तो काळ नव्हता आणि संस्थेच्या ध्येय धोरणात ते बसत नव्हते. संथ गतीने का होईना महाविद्यालयासाठी त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला. ४–५ वर्षाच्या वाटचालीनंतर विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) चे आर्थिक सहाय्य उपलब्ध होत गेले.

त्या अनुदानाचा सद्उपयोग करुन सर्व परिसर भव्य दिव्य आणि आकर्षक केला आहे. वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर पात्र प्राध्यापक नियुक्ती. ही आमची जमेची बाजू.

विज्ञान प्रयोगशाळेला लागणारी वैज्ञानिक उपकरणे आणि साहित्य, ग्रंथालय समृध्द करण्यासाठी जाणीवर्पूक प्रयत्न आणि वाचन संस्कृती संवर्धनासाठी विविध उपक्रम आणि वातावरण निर्मिती करीत एक उत्तम ग्रंथालय, स्वतंत्र इमारतीसह साकारले. प्राध्यापकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी त्यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विकसीत व्हावा आणि त्यांना संशोधन आणि प्रकाशनासाठी अधिक संधी मिळाव्यात म्हणून संस्थेने त्यांना प्रोत्साहित केले. त्याचे फळ म्हणजे आज या महाविद्यालयात पीएच.डी. प्राप्त प्राध्यापक मोठया संख्येने आढळतात आणि संशोधनाचे कार्य पुढे पुढे जात आहे.

महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासासाठी भरीव निधी स्वेच्छेने देण्याची चांगली परंपरा मुख्य इमारत बांधकामापासून सुरु केली ती आज तागायत चालू आहे.

पूर्वी लोकश्रयावर चालणाऱ्या शिक्षण संस्था आता कर्मचारी सहकार्यामुळे शासन विद्यापीठ अनुदान आयोग, माजी विद्यार्थी इत्यादी विकास निधी देतात. त्यांच्या सहकार्याने विकास कार्यास पुढे नेत आहोत. ही काळाजी गरज असून लोक निधी देण्यास फारसे उत्सुक नाहीत. देतात पण अटी लादून त्या दृष्टीने स्वयं अर्थसहाय्य याकडे वाटचाल मोलाची वाटते.

१९६९-७० हे महात्मा गांधीचे जन्मशताब्दी वर्ष सर्व देशभर विधायक कार्याच्या विविध उपक्रमांनी साजरे केले गेले. या संस्थेने या वर्षात विविध उपक्रमांत सहभागी होऊन आपला सक्रिय सहभाग नोंदविला. ग्राम स्वावलंबन, प्रौढ साक्षरता सार्वजनिक स्वच्छता मोहीम, समाजातील उपेक्षित घटकांना सक्षम करण्यासाठी उपाययोजना सुरु करण्यात आल्या. या महाविद्यालयाच्या बोधचिन्हासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचा उपयोग करुन वैज्ञानिक दृष्टि विधायक, प्रवृत्ती संस्थेच्या स्थापनेपासून 'तेल जळे बघ ज्योत पाजळे' या बोधवाक्याचा उपयोग करुन आपली गांधी विचार निष्ठा जोपासली. १९७२ चा दुष्काळ सर्वांच्या स्मरणांत आजही आहे. पर्जन्यमान कमी झाल्यामुळे दुष्काळी वातावरण नेहमीच असायचे. त्या दुष्काळाची झळ महाविद्यालयात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना बसू नये. म्हणून दुष्काळी भागात सहभागी होऊन सर्व प्रकारच्या सोयी सवलती विशेषत: शैक्षणिक वर्षाच्या ३-४ महिण्यात सर्व प्रकारचे सहाय्य करुन त्यांना पदवी परीक्षेत बसविण्यात आले. त्यामुळे त्या काळच्या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले नाही. तेंव्हाचे दुष्काळग्रस्त विद्यार्थी आजही ऋण व्यक्त करतात. सामाजिक जाणिवा आणि भान या महाविद्यालयाने तेव्हापासून जोपासले. त्यामुळे ही संस्था आणि महाविद्यालय अनेक पुरस्कारांनी सन्मानीत झाली. आदर्श शिक्षकांची मांदीआळी तयार झाली.

**विद्यार्थी संसदेच्या निवडणुका**

महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात या निवडणुका विद्यापीठ आणि महाविद्यालयांना डोकदुखी ठरल्या. म्हणून २० वर्षाच्या कटू अनुभवातून महाराष्ट्राचे १९९४ साली विद्यापीठाच्या कायद्यात थोडा बदल करुन या निवडणुका गुणवत्तेच्या आधारे घेण्याचे धोरण अंमलात आणले. त्यामुळे विद्यापीठ आणि महाविद्यालय परिसरात शांतता आणि शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. अलीकडे २०१६ या विद्यापीठाच्या नवीन कायद्यानुसार पुन्हा या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. म्हणून, आस्ते कदम प.बंगाल सारख्या डाव्या विचार सरणीचा प्रभाव असलेल्या राज्याने या निवडणुकीसाठी केवळ पाऊल टाकण्यात सुरुवात केली आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्याने या संदर्भात केलेला विचार विचारात घेण्यासारखा आहे.

आमच्या महाविद्यालयाने पहिल्या दशकानंतर (१९६८-७८) वेगळे पाऊल उचलून इतराकडे एक आदर्श निर्माण करुन ठेवला. मराठवाडा विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतुदीनुसार गुणवत्तेच्या आधारे निवडणुका घेण्यात येत आहेत. त्यामुळे वेगळेच वातावरण निर्माण झाले आहे. परंतु लोकशाही युगामध्ये निवडणुका या व्यवस्थेचा पाया असतो हे गृहित धरले, तरी त्याला विकृत वळण लागल्याचा अनुभव सर्व संबंधितांनी घेतला आहे. नाव लोकशाहीचे वर्तन ठोकशाहीचे अशी मानसिकता तयार झाली. त्यामुळे या लोकशाहीचे रूपांतर Mobacrary झुंडशाहीत होत असल्याचे जाणवत आहे. या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथकाने (N.S.S.) महाविद्यालयाच्या विधायक वृत्तीस चालना देऊन नावलौकिक मिळविला आहे .तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाच्या पहिल्याच यादीत केवळ नऊ

महाविद्यालयांचा समावेश होतो. त्यात आम्हालाही संधी मिळाली या संधीचा लाभ घेऊन आतापर्यंतच्या वाटचालीत यशोशिखराकडे नेले. हे पथक आणि त्यांचे कार्यक्रमाधिकारी उत्कृष्ट सेवेचे मानकरी ठरले. राज्य पातळीवर या महाविद्यालयाचे नाव झळकले. या वाटचालीत प्रेरणा या वार्षिकांकाचा उल्लेख केलाच पाहिजे. या वार्षिकांकाची दखल विद्यापीठ तसेच राज्यस्तरापर्यंत घेण्यात आली. 'प्रेरणा' या वार्षिकांकास अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. प्रभारी प्राध्यापक, प्राचार्य आणि संपादक मंडळ अभिनंदनास पात्र आहेत. मागील दशकात या अंकाची मांडणी छपाई विविध विषयांची निवड विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग इत्यादी मुळे महाविद्यालयीन क्षेत्रात या अंकाची गुणवत्ता व आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

सद्य:परिस्थितीमुळे काही अडचणी निर्माण झाल्या आहे ते ''नॅक तर्फे मूल्यांकन'' अहवालानुसार दर्जा सुधारण्यासाठी अधिक लक्ष देण्याची आहे. आतापर्यंत दोनवेळा मूल्यांकन झाले आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुरेशी विद्यार्थी संख्या नसणे, बी.एस्सी. साठी तोच प्रश्न सतावित आहे. सोयी सुविधा, मूलभूत रचना, उपक्रमशिलता इत्यादी साठी संस्था कमी पडत नाही सुधारण्यास वाव आहे अपेक्षा व्यक्त करीत आहे.

**प्रेरणास्थान**

या प्रसंगी श्रममहर्षि बाबा आमटे यांनी आपल्या आधी ४ ते ५ वर्षे वरोरा (विदर्भ) येथे आनंद निकेतन महाविद्यालयांची स्थापना करुन सर्वांच्यापुढे एक आदर्श निर्माण करुन ठेवला. त्या मूल्यांची आणि सेवेची छोटी आवृत्ती परिसरात यावी अशा दृष्टिकोनातून वाटचाल आरंभीली. परंतु ही वाट बिकट असून इथली परिस्थिती, मानसिकता, सेवा, त्याग, निरपेक्ष वृत्तीने नवभारताची निर्मिती व्हावी हा विशाल दृष्टीकोन असण्यासाठी आपण खूप मागे आहोत हे लक्षात आले. त्यामुळे परंपरागत पध्दतीच्या उच्च शिक्षणाची वाट धरावी लागली. या अशा वाटचालीस पन्नास वर्ष होत असुन त्यात आमूलाग्र परिवर्तन अशक्य आहे.

**काही निरीक्षणे**

या वाटचालीतून अलीकडे काही निरीक्षणे अप्रस्तुत ठरु नयेत. राजकीय हस्तक्षेपापासून चार हात दूर राहणे गरजेचे आहे. प्रचलीत राजकीय व्यवस्था अपरिहार्य असून त्यातूनच मार्ग काढावा लागेल. शासनाच्या केंद्र आणि राज्यसरकारच्या धरसोडीच्या धोरणाचा परिणाम जाणवतो. चांगल्या धोरणांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होत नाही त्याची खंत वाटते. सर्वच घटकांमध्ये स्वयंशिस्तीचा अभाव, जबाबदारीने कामे करण्याची मानसिकता लोप पावत असल्याचे ही लक्षात येते. पुढील काळाची आव्हाने स्वीकारण्यासाठी मानसिक तयारी, नव तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन उपयुक्त असे नवे नवे अभ्यासक्रम सुरु करून, भावी पिढ्यांना सक्षम बनविण्याचे सामर्थ्य या महाविद्यालयास लाभो अशी शुभेच्छा देऊन हे महाविद्यालय उत्कृष्टतेचे केंद्र बनावे अशी अपेक्षा बाळगतो.

# संन्यस्त जीवन व समर्पित प्रेरणा : श्रीरामजी भांगडिया

**प्रा. प्रकाश कामतीकर**

*लेखक प्रा. प्रकाश कामतीकर आमच्या महाविद्यालयातील माजी मराठी भाषा व वाङ्‌मय विभागाचे प्रमुख आहेत. कवी, कथाकार, ललित लेखक व नाटकार - चित्रकार असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेले प्रा. प्रकाश कामतीकर सेलू शहरातील वाङ्‌मयीन व सांस्कृतिक कला सर्जनाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध आहेत.*

---

**महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असतांना, अटळपणे ज्यांच्या कार्यकर्तृत्त्वाची तीव्रतेने आठवण यावी असे एक नाव म्हणजे कै. श्रीरामजी भांडगिया. स्थानिक स्तरावर 'आदरणीय भाईजी' तथा 'लोकल गांधी' हे त्यांचे साठी सार्थ संबोधन. महाविद्यालयाची स्थापना झाली तेव्हा ते आमच्या संस्थेचे सचिव होते. त्यांच्याच दृष्टेपणाने सेलू येथे महाविद्यालय तर सुरु झाले पण त्यांनी दिलेल्या विचार अन् कृतीचा परिसस्पर्शरुपी संस्कारशिदोरीवर आम्ही हा अर्धशतकाचा प्रवास केला. या प्रवासातील त्यांच्या कर्तृत्त्वपूर्ण योगदानाचा स्मृतिलेख मा. प्रा. प्रकाश कामतीकर यांनी संपादीत केलेल्या 'श्रेयांकित' या त्यांच्या गौरव ग्रंथातून पुनर्मुद्रित करीत आहेत.**

**- संपादक**

समर्पित जीवनाचं एक कोडं असतं आणि हे कोडं उकलण्याचा प्रयत्न कधी कधी सामाजिक जीवनाची एक अपरिहार्य अशी गरज ठरते. श्री. श्रीरामजी भांगडिया यांचे संन्यस्त जीवन आणि समर्पित प्रेरणा, या सेलू नगरवासीयांच्या जीवनाचे अविभाज्य असे अंग आहेत. त्यांच्या आयुष्याची पाऊण शतकाची वाटचाल ही या शहराच्या सर्वांगीण विकासाची साक्ष आहे. तसेच ती येथील इतिहासाची नोंद देखील आहे. ती पटवून देण्याची तशी गरज नसतेच. कारण जे जीवन स्वयंसिद्ध आहे, त्याच्या सिद्धतेची आपली सामान्यांची कल्पना ही खुळी ठरते.

प्रत्येक गावाला स्वत:चा एक चेहरामोहरा असतो. प्रत्येक गावाची स्वत:ची एक प्रवृत्ती असते आणि या प्रवृत्तीनुसार कार्यकर्तृत्वातील विविधता ही त्या गावच्या विकासाचा आलेख ठरत असते. अशा विविध प्रवृत्तींच्या या छोट्याशा गावातील श्री भांगडियाजी यांचा 'कार्यात्मक सचोटीची एकात्मता' हा आदरणीय गुण गृहीत धरून संदर्भासाठी त्यांच्या विधायक कर्तृत्वाची ओळख करून घेतली आणि मग लक्षात आले की, हा माणूस अजून आपल्याला तसा समजलेला नाही.

ज्या व्यक्तिमत्त्वाची जनसामान्य विकलांग जीवनावर निश्चित अशी छाप उमटलेली आहे, ते

प्रगल्भ व्यक्तिमत्त्व व त्यांचे जीवन हे ज्या वेळेस कोडं ठरतं त्या वेळेस एखादे निमित्त शोधून अशा जीवनाच्या प्रमेयाचं उत्तर केव्हा तरी शोधावं लागतं. या उत्तर शोधण्याच्या मागे जो 'शोध' हेतू असतो, त्यात एका आयुष्याची यथार्थता पटवून घेणे, काही मूल्यांची जपणूक करणे, हे निमित्तही साधावं लागतं. शिवाय येणाऱ्या व वळणावर थबकलेल्या इतर आयुष्याच्या वाटचालीला आदर्श प्रेरणेचे हेतू निर्माण करणे हाही आग्रह त्यामागे असतो.

श्री श्रीरामजी भांगडिया यांच्या अमृतमहोत्सवाचं निमित्त साधून एका समर्पित जीवनाचा उदात्त हेतू शोधण्याची आम्ही घेतलेली संधी काळाच्या गरजेचे निमित्त ठरावे एवढी महत्त्वपूर्ण निश्चित आहे. विधायक कर्तृत्वाच्या ऐन बहरातील काळातच त्यांच्या आयुष्याच्या प्रगल्भ वाटचालीचा एक टप्पा अचानक आम्हास गवसला व भाईजी यांच्या वयाला पचाहत्तर वर्षे पूर्ण झालीयत. हे निमित्त्व आम्ही आमचा संकल्प ठरविला.

साधनशुचितेचा आधार घेत कट्टर गांधीवादी विचारसरणीचे भाईजी एकीकडे सर्वोदयाच्या सर्वांगीण तत्त्वज्ञानाची आग्रही भूमिका बजावीत, तर दुसरीकडे काँग्रेस पक्षीय विचारसरणीची राजकीय तत्त्वप्रणाली अमलात आणीत. कुठल्याही राजकीय डावपेचा आधार नसलेल्या त्यांच्या शब्दांना सेलूवासीयांनी नेहमीच आदराचे स्थान दिले. अत्यंत सालस आणि सरळमार्गी असणारे भाईजी जेव्हा राजकारणात उतरतात तेव्हा पुन्हा एक प्रश्नचिन्ह उभं राहतं की, राजकारणाच्या या डावपेचात गांधीवादी आणि सर्वोदयावादी भूमिका आग्रहाने वठविणाऱ्या या माणसाचा निभाव कसा लागावा? पण कुठलाही प्रकार न होता यश हे त्यांच्याच मर्जीने आकार घेते, त्या वेळेस निश्चितपणे एक गोष्ट जाणवते की, मतप्रणालीचा आणि तत्त्वज्ञानाचा आधार ही फक्त निमित्तमात्र सोय असते आणि मन लावून जगण्याची जिद्द हा विधायक प्रवृत्तीचा पिंडच असतो.

भाईजींची हीच प्रवृत्ती त्यांच्या सगळ्या यशाची सांगता करणारी आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांतील त्यांची आत्यंतिक निष्ठा हे त्यांचे खरे शस्त्र आहे. सतत आणि सातत्याने नवीन विचाराचा, नावीन्याचा शोध घेणे हा त्यांचा मूळ स्वभावधर्म आहे. या सर्व शोधप्रवृत्ती, दलित आणि शोषित या वर्गाविषयींची त्यांची आत्यंतिक कणव ही त्यांच्या सामाजिक लढ्याची खरी सूत्रे आहेत. सामाजिक मूल्यांच्या आणि नीतिमूल्यांच्या शब्दजड प्रामाण्यापेक्षा कृतिप्रवण मूल्यांवरती त्यांची निष्ठा असल्यामुळे त्यांनी केलेल्या प्रत्येक कृतीची नोंद ही आवश्यक ठरते. कारण त्यांच्या या संदर्भाला निश्चित असा आकार आहे, ते घडलेले आहे आणि ते सत्य आहे म्हणूनच त्यांचा हा आदर्श कुठे तरी नोंदवून ठेवावा या आग्रहापोटी या गौरवग्रंथाचे निमित्त आम्ही स्वीकारले.

आज आपल्या सर्वच मूल्यांची जपणूक ही तात्त्विक किंवा आध्यात्मिक पातळीवर चाललेली असते. व्यावहारिक सत्याजवळ येताना मात्र या मूल्यांचे अवमूल्यन झालेले दिसते. आजच्या नवीन पिढीला अट्टहासाने आपल्या या विधायक परंपरेची ओळख करून घ्यावी लागते आणि ते कर्तव्य बजावण्याचे श्रेय नम्रपणे आम्ही घेऊ इच्छितो.

गौरवाची, उत्साहाची आणि उत्सवप्रियतेची आवड असणाऱ्या समाजाला बरेच काही ठरविता येत असते. प्रेमापोटी आणि श्रद्धांपायी सेलूवासीयांच्या मनानेही बरेच काही ठरवून टाकले. 'श्री श्रीरामजी भांगडिया अमृत महोत्सव समिती'चा आकार या ठरविण्यातूनच निर्माण झाला. एक लक्ष रुपयांचा गौरवनिधी गोळा करणे हा त्यांचा तात्पुरता शब्द

होता; परंतु त्यांचे आयुष्यच विधायक कार्यात गेलं, समर्पणात गेलं, त्यांना हा गौरव कसा आवडावा ? म्हणून या निधीतून विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृह बांधण्याचे वचन देऊन त्या व्यक्तित्वाचा आदर अबाधित राखावा लागला. मुळातच कुठल्याही सत्कार सोहळ्यास सामोरे न जाणारे संन्यस्त भाईजी, त्यांच्या या पाऊण शतकाच्या वाटचालीतील अनेक घटनानिग्रहाची स्थळे ज्ञात असलेल्या व्यक्तींना त्यांच्या कर्तृत्वकार्याचा मागोवा घेण्याची मनस्वी इच्छा होती. कारण त्यांच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक सर्वंच स्तरांवरील घटनांचा मागोवा म्हणजे सेलू शहराची ऐतिहासिक साक्षच होती आणि हे निमित्त आहाला हवे होते. या निमित्ताचा आग्रह धरुन सामाजिक उद्‌बोधनाचा हेतूही कुठे तरी सफल व्हावा हीइच्छा उराशी बाळगून ज्या ज्या क्षेत्रात भाईजींचा कर्तृत्वपसारा विस्तारला होता, त्या विविध भूमिकांबद्दल सर्वांगीण व व्यासंगी चिंतनाचा मार्ग सर्वांच्या समोर उपलब्ध व्हावा याकरिता महाराष्ट्रातील 'विचारधन' बाळगत असणाऱ्या विविध क्षेत्रांतील सुजाण व व्यासंगी विद्वानांशी संपर्क साधून आम्ही 'श्रेयांकित' हा भाईजींचा गौरवग्रंथ काढला आहे.

आज तो सुदिन सेलूवासीयांसाठी उगवला आहे, ज्याची ते आतुरतेने वाट पाहत होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते भाईजींचा सत्कार व अभीष्टचिंतन होत आहे. त्यांच्या हस्ते 'श्रेयांकित' या गौरवग्रंथाचे औपचारिक प्रकाशनदेखील होत आहे.

माननीय नामदार श्री. श्यामराव कदम यांची या समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थिती व पालकमंत्री नामदार श्री. शिवराज पाटील यांची लक्षणीय उपस्थिती या समारंभाचे ऐश्वर्य आहे. दूरवरच्या छोट्याशा गावात आजवर झालेल्या विधायक कार्याचे कौतुक या निमित्ताने उजळून निघणार आहे. नाही तरी इतिहासाची सिद्धता अशाच सिद्ध घटनांनी बांधून काढता येते.

('श्रेयांकित' या ग्रंथातून साभार)

# महाविद्यालयीन जीवनाचा मागोवा

**प्रा. डॉ. पी.व्ही. काटे**

*लेखक आमच्या महाविद्यालयातील माजी इतिहास विभाग प्रमुख असून अर्थशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक आहेत. अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रात सक्रीय असणारे डॉ. पी.व्ही. काटे सुबोध भाषेत अभ्यासक्रमाचे, पुस्तकांचे लोकप्रिय लेखक आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी गतकाळातील स्मृतिरंजन करीत स्वत:च्या कर्तृत्व-व्यक्तित्वाच्या जडण घडणीतील महाविद्यालयाचे स्थान अधोरेखित केले आहे.*

मराठवाड्यातील नामवंत शैक्षणिक संस्थामध्ये नूतन शिक्षण संस्थेचाही नावलौकिक आहे. प.पू. स्वामीजी, अनंत भालेराव, विनायकराव चारठाणकर यांच्या प्रेरणेतून नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचा १९३९ मध्ये श्री गणेश झाला. शिक्षणाचा वसा घेतलेले शिक्षक, स्वातंत्र्य लढ्यांचे प्रसिद्ध केंद्र, शिक्षणाद्वारे समाज परिवर्तनावनर दृढ विश्वास असणारे सेलूतील सूजाण नागरिक, सामाजिक बांधिलकीचे पाईक, भांगडियाजींच्या विधायक कार्याला जोपासणारे, गोविंदराव गुरुजी, सो.ना.कुलकर्णी, शं.दे. मंडलिक इत्यादी महनिय व्यक्तीच्या कर्तृत्वामुळे ''पुरुषार्थाचे शहर'' म्हणून सेलू प्रसिद्ध आहे.

१९६१ पासून मी मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात संशोधन साहाय्यक म्हणून सेवा करीत होतो. त्याच काळात मी मराठवाडा विद्यापीठातून (सध्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) इतिहास विषयात प्राविण्यासह एम.ए. ही पदवी (१९६६) संपादन केली. मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. व्ही.व्ही. बोरकर हे महाविद्यालय मान्यता समितीचे सदस्य म्हणून सेलूस आले होते. तेथील शैक्षणिक वातावरण राजकारण मुक्त असून नैतिक मूल्यांची जाण असणारे लोक व समर्पित वृत्तीचे भांगडियाजी यांचा संपर्क आला. त्याच कॉलेज मध्ये माझी इतिहासाचा प्राध्यापक म्हणून निवड झाली. विद्यापीठातील सेवा सोडून सेलूस जावे का नाही याबद्दल मनात संभ्रम निर्माण झाला. तेव्हा सेलूस जाणे योग्य आहे असे डॉ. बोरकरांनी सुचविले म्हणून लिन ठेवून महाविद्यालयात जून १९६८ मध्ये रुजू झालो.

त्यावेळी आदरणीय डी.आर. कुलकर्णी हे प्राचार्य होते. माझे सहकारी म्हणून प्रा. आर.ए. गात, प्रा. पी.वाय. तरफदार, प्रा.आर.एम. खरवडकर, प्रा.बी.टी. भोसकर, प्रा. एन.जी. करडखेडकर, प्रा. व्ही.के. कोठेकर, प्रा. बी.ए. वांगीकर, प्रा. एच.एस. दरगड, प्रा. एम. एफ. जिल्टे, प्रा. धनराज मानधने होते.

सुरवातीला महाविद्यालय सध्याच्या नूतन शाळेच्या वरील मजल्यावर होते. ग्रंथालय दोन कपाटात सामावलेले असून श्री भगवानराव शिंदे हे ग्रंथपाल होते. कला व वाणिज्य शाखेत मराठी माध्यम सुरु झालेले होते. माझे एम.ए. पर्यंतचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले असल्यामुळे इंग्रजीचा सराव अधिक होता म्हणून मराठी भाषेतून शिकविताना थोडी कसरत करावी लागली. पण विद्यार्थ्यांचा उत्साह व प्रतिसाद असल्यामुळे शिकविताना उत्साह व आनंद वाटे.

राष्ट्रीय कार्यक्रम उदा. १५ ऑगस्ट व २६ जाने. गॅदरिंगच्या कार्यक्रमातील स्वयंशासन उपक्रम पाहण्यासाठी गावातील प्रतिष्ठितांना निमंत्रित केले जाते असे. विशेष म्हणजे ते सर्वजण आस्थेने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक करीत.

पहिले वर्षी गॅदरींगसाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. एन. आर. तावडे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आले होते. त्यांनी उद्‌बोधनपर भाषण करुन सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली. तसेच सर्वांचे अभिनंदन केले. त्यांच्या भोजनाची व्यवस्था रेस्ट हाऊस मध्ये न करता श्री बिनायकेजी यांच्या घरी केली. या भोजनाचे वैशिष्टय म्हणजे रांगोळीसह पाटावर बसून भोजनाचा अस्वाद घेण्याचा प्रसंग त्यांना नाविण्यपूर्ण वाटला.

महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोहसिप (College Humanties Social Science Improvement Programme) अंतर्गत अनुदान मिळाले. शैक्षणिक सहलीचे आयोजन, विद्वानाची व्याख्याने, चर्चासत्रे, ग्रंथालय समृद्धी इत्यादी उपक्रम अभिप्रेत असतात. कोहसिपचे समन्वयक म्हणून मी व प्रा. आर.एल. पाटोदकर काम केले. कला व वाणिज्य शाखेतील भाषा, सामाजिक शास्त्रे यांच्यावर अनेक विद्वान प्राध्यापकाची व्याख्याने आयोजित केली. उदा. इतिहासामध्ये डॉ. गो.ब. देगलूरकर, डॉ. मोरवंचीकर, डॉ. पी.एन. देशपांडे तर अर्थशास्त्रात डॉ.जी.एस. कल्याणकर, डॉ. आर.पी. कुरुलकर, राजशास्त्राचे डॉ. शिंदे, डॉ. मोईन शाकीर यांचा उल्लेख करता येतो. भाषा व वाणिज्य शाखेतील तज्ञांची व्याख्याने ठेवली होती. विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ झाला.

कोहसिप अंतर्गत महाराष्ट्रातील किल्ले व इतर वास्तू पाहण्याची संधी, विद्यार्थ्यांना मिळाली. तसेच दिल्ली येथील संसदभवन, माननीय शंकररावजी चव्हाण आणि नामदार शिवराज पाटील चाकूरकर यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळे विद्यार्थी भारावून गेले. सहलीतील विद्यार्थ्यांचा सहवास चिरस्मरणीय होता. महाविद्यालयीन विद्यार्थी जिज्ञासू, जागरुक व कृतीशिल असून सुप्त सामर्थ्याचा खजिना आहे हे पटले. सामाजिक ऐक्यचा शोध घेण्याच्या निमित्ताने मी व प्रा. डॉ. नगराळे दोघांनी वालूर (ता. सेलू) येथील हिन्दू – मुस्लिम संबंधाचा अभ्यास केला त्यांच्यातील सामाजिक ऐक्य चिरंतन मूल्ये जोपासणारी आहेत हे सिद्ध झाले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व संयोजकांनी आयोजित केलेल्या शिबिराच्या उद्‌घाटन व समारोप प्रसंगी अनेक गावी उपस्थित राहण्याचा योग लाभला त्यामुळे भावी पिढीच्या निर्मितीत राष्ट्रीय सेवा योजनांचा हा उपयोग उल्लेखनीय आहे ते जाणवले. महाविद्यालयाच्या वतीने दुष्काळग्रस्त गावांची पाहणी करण्याची संधी मिळाली. या कार्यात प्रा. दरगड, प्रा. गात, प्रा. पी.बी. देशपांडे व प्रा. कोठेकर यांचा सहभाग होता. दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या विदारक परिस्थितीचे स्वरुप पाहून ह्दय द्रवले त्यांना साह्य करण्याची गरज लक्षात आली.

महाविद्यालयाचा ''प्रेरणा'' अंक विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारा, चिंतन व लेखनाला प्रोत्साहित करणारा असतो. ''सेलू शहराचा विशेषांक'' हा तर भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व साहित्यिक माहितीचा खजिनाच होय.

महाविद्यालयातील प्लॅनिंग फोरमला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून संशोधनासाठी अनुदान प्राप्त झाले. त्याचा उपयोग म्हणून प्रा. गात, प्रा.काटे व प्रा. नेवपूरकर यांनी देऊळगावगात, धामनगाव, कुंडी, वालूर व रवळगाव या पाच गावांची आर्थिक व

सामाजिक पाहणी केली. आर्थिक विषमता असून सामाजिक समतेची वाटचाल चालू आहे असे निष्पन्न झाले. महाविद्यालयाचे ग्रंथालय ज्ञान भांडाराची खाणच आहे. विविध विषयाचे संदर्भ ग्रंथ, प्राध्यापकांचे प्रकाशित ग्रंथ, विद्वानांची ग्रंथसंपदा, आध्यात्माची पुस्तके व मौलिक मासिके तेथे उपलब्ध आहेत. अभ्यासिकेची सोय उपलब्ध असून सांयकाळी सात ते दहा वाजेपर्यंत ही अभ्यासिका उघडी असते. सर्व क्रमिक पुस्तके तेथे मिळतात. दररोज दोन प्राध्यापक तेथे जातात व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

महाविद्यालय कडक शिस्तीसाठी प्रसिद्ध आहे. या शिस्तीस विद्यार्थ्यांप्रमाणे प्राध्यापक ही अपवाद नव्हते. प्राध्यापकांनी दहा ते चार वाजेपर्यंत थांबणे बंधनकारक होते. त्याचे पालन काटेकोरपणे केले जात होते. स्टाफरुममध्ये दररोज मध्यांतरामध्ये, प्राचार्य येत असत. तेथे चर्चा, विनोद, मेजवान्याचा आस्वाद सर्व खेळीमेळीचे घेत. प्राचार्य व प्राध्यापकांसोबत केलेले हितगुज सर्वांना उत्साहवर्धक, आनंदाची उधळण करणारे वाटत असे.

महाविद्यालयाचे एक उल्लेखनिय वैशिष्ट्य म्हणजे सेवानिवृत्त प्राध्यापकांची आठवण हे होय. त्यांचे अनुभवजन्य ज्ञान प्रशासनास उपयोगी पडू शकेल हा विश्वास असेल असे वाटते. त्यादृष्टीने अविरत प्रयत्न सुरु दिसतात. इतर महाविद्यालयात ही आस्था क्वचितच आढळते. मला सेवानिवृत्त होऊन वीस वर्षे झाली तरी माझ्या महाविद्यालयाचा स्नेहसंबंध सुटलेला नाही. तेथील सर्व कार्यक्रमाचे अगत्यपूर्वक निमंत्रण येते. मी बहुतेक कार्यक्रमांना जातो. महाविद्यालयातील व्याख्याने, चर्चासत्रे, मेळावे अतिशय ज्ञानसंपन्न, नाविण्यपूर्ण व मार्गदर्शक असतात. सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा हा उपक्रम अत्यंत कल्पक, स्नेहवर्धक व स्तूत्य होता. ''द ग्रेट स्नेह भेट'' या कार्यक्रमाने मन हेलावून गेले. उत्साह आणि नवचैतन्याचा डोस प्राप्त झाला. त्याबद्दल प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, त्यांचे सर्व सहकारी व संयोजन समितीचे मन:पूर्वक अभिनंदन व आभार.

# सुखद आठवणी

## विश्वास वसेकर

*लेखक आमच्या महाविद्यालयातील माजी प्राध्यापक आहेत. या पेक्षा महत्त्वाचे आहे ते म्हणजे कवी, विडंबनकार ललितगद्य लेखक, आस्वादक समीक्षक अन् शैलीदार निवेदक म्हणून ते सुप्रसिद्ध आहेत.*

---

नूतन महाविद्यालयात १९७६ ते २०१० अशी पस्तीस वर्षे मी सेवा केली. ही वर्षे माझी उमेदीची वर्षे होती. माझ्यातला शिक्षक इथेच घडला. इथले निरोगी वातावरण आणि प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांचा खोल संस्कार माझ्यावर झाला. डी.आर. सरांच्या शिस्तीचा मी चांगल्या अर्थाने उल्लेख करतोय, कारण आजूबाजूच्या महाविद्यालयात अध्यापक हा प्राणी क्रमश: आळशी, निष्क्रिय, स्वस्त होतो हे माझे निरीक्षण होते. आजही त्यावर मी ठाम आहे.

सकाळी साडे दहा ते अकरा या वेळेत येणे आणि किमान चार वाजेपर्यंत महाविद्यालयात थांबणे अपेक्षित असायचे. याच वेळेत प्रत्येकाची मस्टरवर सही झालीच पाहिजे. सव्वा अकरा वाजता मस्टर प्राचार्यांच्या टेबलवर जायचे. त्याही पेक्षा उशीर झाला तर, खाली मान घालून प्राचार्यांच्या केबीनमध्ये जावे लागायचे. (मी कधी गेलो नाही.) साधारणत: बाराच्या सुमाराला सही न झालेल्या प्राध्यापकाच्या नावासमोर सर मोठे लाल टिंब करायचे. कुणाला कळून देता माझ्यापुरता मी या समस्येतून मार्ग काढला होता. १२.४५ ते १.३० या वेळेत द.रा. सरांचा तास असायचा. तेव्हा मी हळूच त्यांच्या केबीनमध्ये जायचा. मी काळ्या शाईचा पेन वापरतो. त्या पेनने मी त्या लाल टिंबावर घोटून सही करत असे. प्राचार्य चाणाक्ष होते. त्यांच्या लक्षात येत असेल. नक्की येत असेल पण असे केल्याबद्दल मला ते एकदाही रागवले नाहीत. लेखक कवी म्हणून असेल, डी.आर. सर माझ्यावर फार प्रेम करायचे आणि मी त्यांचेवर तसेच प्रेम करीत असे.

एकदा नांदेडच्या नगर परिषदेने ३० मार्च १९८८ रोजी मोठे कविसंमेलन घेतले. विंदा करंदीकर, शंकर वैद्य, किशोर पाठक, निरंजन उजगरे, विठ्ठल वाघ असे माझ्यासह पाचसात कवी होते. सतत आठवडाभर दै. लोकमत मध्ये आमच्या नावांची जाहिरात चालली होती. मी आपला रजा टाकून गेलो. या कविसंमेलनासाठी जातोय असा उल्लेखही रजेच्या अर्जावर केला नव्हता. दुसऱ्या दिवशी स्टाफरुममध्ये मस्टरवर सही करायला गेलो तर आश्चर्याचा सुखद धक्काबसला ! द.रा. सरांनी माझ्या नावापुढे Onduty असे त्यांच्या अक्षरात केले होते. नांदेडला माझा परिचय करुन देताना हे सेलूच्या नूतन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक आहेत असे सांगितले असणार. हे त्यांना माहीत होते आणि त्याचा सार्थ अभिमान त्यांना होता.

असाच माझा एकदा अभिमान प्राचार्य कोठेकरांना वाटला होता. अहमदनगरला एकदा त्यांनी प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान ऐकले. नंतर भेटून स्वत:ची ओळख करुन दिली असता शिवाजीरावांनी त्यांना 'तुम्ही विश्वास वसेकरांच्या सेलूचे का ?' असे विचारले होते. ही घटना औरंगाबादला कुलगुरु म्हणून त्यांनी येण्याच्या किती तरी आधीची.

लेखक असल्यामुळे, कनिष्ठ महाविद्यालयात असून देखील प्राचार्यांनी माझे फार लाड केले. त्यांनी

पाठवल्यामुळेच मी या काळातील सर्व अ. भा. मराठी साहित्य संमेलनांला महाविद्यालयाच्या खर्चाने उपस्थित राहून शकलो. या शिवाय अनेक राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद आणि छोटे मोठी संमेलन यांनाही त्यांनी पाठवले. त्यासाठी मला एकदाही किरकोळ रजा खर्चावी लागली नव्हती. मी लेखक म्हणून आणि मराठीचा शिक्षक म्हणून समृद्ध होण्यामध्ये द.रा. कुलकर्णी यांनी नकळत दिलेल्या प्रोत्साहनाचा फार मोठा वाटा आहे. हे मी नोकरीच्या काळात कधीच कबूल केले नाही. माधवन ज्युलियनांच्या शब्दांत, 'कोणापुढे न नमले माझे गर्वोन्नत्त शीर'.

प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांनी महाविद्यालयात फार चांगल्या परंपरा घालून दिल्या. दररोज दुपारी दीड ते दोन मध्यंतर असे. या मध्यंतरात सर्वांनी चहा घेतला पाहिजे असा सरांचा आग्रह असे. ते या वेळेत आवर्जून येऊन प्राध्यापकांशी मनमोकळ्या गप्पा मारत. एक प्रसन्न अशी चेष्टामस्करी चाले. द.रा. सरांच्या विनोदात कधीही खवचटपणा, बोचकरे काढण्याची वृत्ती नसे. त्यांचा विनोद परिहासात्मक असायचा. या वेळेत एखाद्या महत्त्वाच्या आनंददायी घटनेबद्दल प्राचार्य आडपडद्याने संबंधितांना जेवण मागायचे. स्टाफ सेक्रेटरीकडे पाहत ते म्हणायचे, अहो स्टा. से., तुम्ही पेपर वगैरे वाचला की नाही ? अमुक अमुक सरांना पार्टी तरी मागा ! स्टाफ सेक्रेटरीने काही म्हणण्याची वाट न पाहता संबंधित प्राध्यापक जेवणाची तारीख जाहीर करायचे. स्वत: द.रा. सरांनी अशी अनेक जेवणं आम्हालाही दिलेली आहेत.

अशीच एका आठवण आहे. प्राध्यापकांच्या विद्यानगर कॉलनीत सामूहिक वास्तुशांतीचा भोजनप्रसंगी मी आणि कामतीकर प्रचंड छाटून कटिंग करुन आलेलो. त्यांनी चेष्टेच्या सुरात आम्हाला विचारले तेव्हा कामतीकर म्हणाले की आम्हा दोघांचा (मराठीचा) अभ्यासक्रम संपल्यामुळं कटिंग केली. यावर भरपूर केस वाढलेले इंग्रजीचे प्रा. एस. बी. देशपांडे यांच्याकडे हसून वळत प्राचार्य म्हणाले, इंग्रजीचा अजून बराच अभ्यासक्रम राहिलेला दिसतो.

द.रा. कुलकर्णी प्राध्यापकांच्या प्रतिष्ठेची अतोनात काळजी घ्यायचे. महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांची मस्ती आणि प्राध्यापकांविषयी अनादर व्यक्त करण्याची एक पर्वणी असते. प्राचार्यांची जाहीर भूमिका असायची की जोपर्यंत प्राध्यापकांचा मान राखला जाईल तोपर्यंतच स्नेहसंमेलन चालू राहील. एक दोन वेळा अप्रिय घटना घडली तेव्हा सरांनी स्नेहसंमेलनाचे पुढील कार्यक्रम मुख्य सोहळ्यासह रद्द केले.

स्नेहसंमेलनातील शेला पागोटे उर्फ फिश पाँडचा कार्यक्रम विद्यार्थ्यांची उत्तेजना शिगेला पोचलेली असायची. समोरचे मैदान पूर्ण भरलेले असायचे. महाविद्यालयाच्या एकूण संख्येच्या दुप्पट माणसे असायची. ज्यांनी उद्या फिशपाँड वाचायचे, ते आदल्या दिवशी सिलेक्शन करत. अश्लील आणि निंदाव्यंजक फिशपॉन्ड आम्ही फाडून टाकत असू. वैयक्तिक आलेले फिशपाँड एका पाकिटात घालून त्या त्या प्राध्यापकांना देत. त्यांनी जे फिशपाँड वाचायला अनुमती दिली तेवढेच त्यांच्यावरचे फिशपाँड वाचले जात. पस्तीस वर्षातल्या तीसपेक्षा अधिक वर्षे फिशपाँड वाचणारांत माझा समावेश होता. मी विद्यार्थ्यांना अपेक्षित त्या रंगात आणि ढंगात फिशपाँड वाचत असे. त्यामुळे माझ्या वाचनावर विद्यार्थी खूष असायचे. त्या त्या विषयाचे वैशिष्ट्य संबंधित फिशपाँडशी निगडीत करुन मी वाचायचा. उदा. केमिस्ट्रीचे खरवडकर, कवठेकर आणि टाकळकर हे तीन प्राध्यापक विहिरीत उतरले. तासाभराने फक्त खरवडकर बाहेर आले आणि त्यांनी जाहीर केले. बोथ वेअर सोल्यूबल इन वॉटर हे सांगताना मी खरवडकरांसारखा मुद्राभिनय करायचा. माझ्या वाचनाला मुलं डोक्यावर घ्यायची, वन्स मोअर व्हायचे अशी मजा !

द.रा. सरांनी खूप चांगले पायंडे पाडले. स्टाफ स्डडी सर्कल, गुणवत्ता विकास प्रकल्प, स्टाफ को

– ऑप क्रेडिट सोसायटी, इ. माझ्या महत्त्वाच्या आठवणी त्यांच्या कार्यकाळातल्याच आहेत, द.रा. कुलकर्णी यांनी दिलेला आणखी एक सुखद अनुभव 'द.रा. महात्म्य' संपवता संपवता आठवला. आंध्रप्रदेश मराठी साहित्य प्रदेशाने हैदराबाद येथे 'अनुवादित कादंबरी' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र घेतले. त्यातल्या एका सत्राचा त्यांनी मला अध्यक्ष केले. मला मिळालेल्या बहुमानाचा सरांना एवढा अभिमान वाटला की कार्यरजा देऊन त्यांनी मला तर पाठवलेच, पण माझे कौतुक पहायला डॉ. गंगाधर गळगे, प्रा. यादव गायकवाड, प्रा. वसंत शेप यांनाही कार्य रजा देऊन पाठवले. आम्ही चौघे पुन्हा मित्र ते चारपाच दिवस फार सुखासमाधानात गेले. नेमकी माझ्या भाषणाच्या दिवशी माझ्या पाठीत उसण भरली. मी वेदनांनी एवढा तडफडत होतो की मला श्वाससुद्धा घेता येत नव्हता. डॉ. गळगे यांनी तेव्हा माझी अशी काही सेवाशुश्रषा केली की अर्ध्यातासात मी एकदम 'ओक्के' झालो ! गळगेचीही आठवण मी कधीही विसरणार नाही.

प्रकाश कामतीकरांसारख्या मनस्वी कलावंताचा सहवास हे सेलूतील माझे सुखनिधान होते. सेलूला येण्यापूर्वीच साहित्यामुळे आम्ही मित्र होतो. आमच्यातील वाङ्मयीन नाते शेवटपर्यंत अतूट राहिले. माझ्या पुस्तकांची मुखपृष्ठं आणि मांडणी कामतीकरांनी केली. 'शब्दांकित' हा त्यांचा कवितासंग्रह मी प्रकाशित केला. आम्ही एकमेकांच्या पुस्तकांची सुंदर परीक्षणं केली. कामतीकर, एस.बी. देशपांडे, अनिल केतकर असा आमचा ग्रूपच होता. चेष्टामस्करी चालायची. पण कधी भांडणं झाली नाहीत. शेवटी शेवटी महेंद्र शिंदे आमच्या ग्रूपला जोडले गेले. आजही महेंद्र शिंदे माझे अभिन्न मित्र आहेत.

मैत्री हे जीवनमूल्य मानणारा मी. नूतन महाविद्यालयाने मला ए.डी. कुलकर्णी, ए.टी. देशमुख, प्रकाश घोडके, शरद कुलकर्णी, यादव गायकवाड, वसंत शेप, महेंद्र शिंदे, अशोक उबाळे, बंकट बोराडे, राजाराम झोडगे, कंठाळे, यांच्यासारखे जिवाभावाचे मित्र दिले. कॉलेज सोडून दहा वर्षे झाली. पण यांची आठवण झाली नाही असा माझा एकही दिवस गेला नाही. त्यांच्या मैत्रीनी माझं आयुष्य सुगंधित झालं. नंदिनी देशमुख, हिरा बायस, प्रज्ञा करडखेडकर, कीर्ति खापरखुंटीकर या प्राध्यापिकांशी बोलायला मला आवडायचे. त्याही मनाने (माझ्यासारख्याच) निर्मळ आणि मनमोकळ्या होत्या. असो मी कितीही गंभीर आणि वाईट मन:स्थितीत असलो तरी श्रीपाद काळेची आठवण झाली की माझ्या चेहऱ्यावर हास्य फुलते.

शेवटी एका शिक्षकांसाठी 'जिगरका टुकडा' असतात त्याचे विद्यार्थी. नूतन महाविद्यालयाने मला माझ्या पोटच्या पोरापेक्षा प्रिय असणारे महान विद्यार्थी दिले. प्रभाकर ढगे, भगवान, दिरंगे, आसाराम लोमटे, मोहन मु. कुलकर्णी, संजय मु. जोशी, केशव मुंगीकर, संजीवनी पळसोदकर, सुनीता जोशी, रामकिसन मखमले, आसाराम कारके, परमेश्वर आडे, किती म्हणून नावे सांगावीत ? परमेश्वर आडेने माझ्यावर गाणे लिहिले, लाल म्हारो वसेकर गुरुजी आयोरे' आजही गाणे त्याच्या तांड्यावर सर्व लमाणी बंधुभगिनी फेर धरुन नाचत गातात. मोहन कुलकर्णी, केशव मुंगीकर यांनी माझ्यावर श्रेष्ठ दर्जाच्या कविता लिहिल्या. माझ्या विद्यार्थ्यांनी माझ्या अध्यापणाच्या आठवणी वीस–वीस वर्षे मनात जतन करुन माझ्यावर दोन, ग्रंथ लिहिले, 'सर्जक अध्यापन' आणि 'मन में है विश्वास.' नूतन महाविद्यालयातून शिकून केव्हाच बाहेर पडले हे. पण आजही त्यांचा स्नेह मला मिळतो आहे. मी शाळेत शिकत असताना कृ. ब. निकुंभ यांनी विद्यार्थ्यांना निरोप देताना लिहिलेली कविता अभ्यासक्रमात होती. त्याच शब्दात मी माझ्या विद्यार्थ्यांना सांगेन, 'जा , जा, विहग हो, स्नेह मी जागवीन आपुला.'

❦

# आठवणीचे क्षण

## प्रा. डॉ. गंगाधर गळगे

आपल्या स्थापनेचा सुवर्णमहोत्सव साजरे करणारे सेलूचे नूतन महाविद्यालय उच्च शिक्षणाच्या संदर्भात सकारात्मक विचार – मंथन करीत आहे याबद्दल आनंद होतो आहे. दर्जेदार उच्चशिक्षणासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक स्तरावरील पायाभूत शिक्षणाचा दर्जा ही सुधारणे आवश्यक आहे. या दृष्टीने आशयसंपन्न अनुभव – विचार, सर्जनशील व्यापक चिंतनासाठी विविध स्तरावर भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींची मनोगते जाणून घेण्याचा प्रयत्न स्वागतार्ह आहे.

नूनत विद्यालय शिक्षण संस्थेच्या घटक संस्थामधील माझी शैक्षणिक कारकीर्द अनेकार्थाने वैशिष्टपूर्ण राहिली.... १९७१ साली बी.ए. झाल्यानंतर वयाच्या एकेविसाव्या वर्षी शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात केली ती एका खेड्यातील शाळेपासून तेव्हापासून अनेक ठिकाणी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, मुक्त विद्यापीठ, अध्यापक विद्यालय, शिक्षण प्रशिक्षण संस्थेतून अध्यापन अन् मार्गदर्शनाचं कार्य करीत मी शैक्षणिक वाटचाल केली आहे. आणि ३१ डिसेंबर २००८ रोजी नूतन महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातून कृतार्थ भावनेने सेवानिवृत्त झालो.

**'अध्ययन – अध्यापन' माझा धर्म**

शिकणं, शिकवणं हा केवळ माझा व्यवसाय नव्हे तर मी माझा धर्म मानला. वर्गावर जाण्यापूर्वी मन लावून तयारी करीत असे, केवळ पाठ्यपुस्तकच नाही तर आवश्यक संदर्भ ग्रंथ पाहत असे. अभ्यासपूरक उपक्रम राबवून त्यात विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग मिळवत असे. त्यासाठी नूतन शिक्षण संस्थेच्या आर्थिक सहकार्यातून मी स्वत:ची समृद्ध घरेलू लायब्ररी तयार केली. ज्यात सर्वच प्रकारचे शब्दकोश, लेखन कोश, इतर पूरक साहित्य, व्याकरण विषयक पुस्तके, मराठी विश्वकोश, पुरस्कार प्राप्त ललित वाङ्‌मयाची हिंदी – मराठी पुस्तके, माझ्या घरेलू लायब्ररीत होती, आज ही आहेत. निरंतर पठन, वाचन, विचार संकलन, ज्ञान ग्रहण तसेच परीक्षण, संशोधन, कृति संशोधन, लेखन याची मला आवड होती. मी शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्यानंतर बहिस्थ विद्यार्थी राहून एम.ए. केलं, पीएच.डी. साठी शोधकार्य ही केलं, शोध विद्यार्थ्यांना एम. फील, पीएच.डी. साठी मार्गदर्शन ही केलं.

**वैचारिक बैठक व निष्ठा**

शिक्षकी पेशाकडे वळण्यामागील कारणेच तशी होती. शालेय विद्यार्थी असताना मी सानेगुरुजी कथामाला व राष्ट्र सेवादलात जात असे, तेथे कार्यक्रमाची सुरवात 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' या प्रार्थनेने होत असे. विविध खेळ व बौद्धिक होत. साने गुरुजींच्या उद्‌बोधक गोष्टी सांगितल्या जात. शेवट संत तुकडोजी महाराजांच्या 'सब के लिए खुला है, मंदिर ये हमारा' या समतेचा संदेश देणाऱ्या समूहगीताने होत असे. त्यावेळी आंतरभारती व राष्ट्र सेवादलाच्या अनेक शिबीरात

सहभागी होण्याची संधी मला मिळाली. पुढे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना समाजवादी विचाराचें प्राचार्य डॉ. ना.य. डोळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांची संवाद साधण्याची सहज शैली मला प्रभावीत करुन गेली. अशा प्रकारे माझ्या शिक्षकी व्यवसायाचा पाया डॉ. ना.य. डोळे यांनी घातला, पण त्या सुप्त इच्छेला संजीवनी देण्याचं कार्य श्रमर्षी बाबा आमटे यांनी केलं. १९७२ साली एका आंतरभारती शिबीरासाठी मी आनंदवनात गेलो होतो. देशातल्या वेगवेगळ्या प्रांतातून शेकडो युवक तेथे आले होते. सकाळी चार तास श्रमदान, दुपारी बाबांचं उद्‌बोधन आणि सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम तेथे असे. बाबा धुवांधार बोलायचे. देश, धर्म, मित्र, प्रेम, कर्तव्य, सेवा अशा विषयावर तास न् तास प्रखरतेने बोलायचे. त्यातून माझ्यातल्या शिक्षकाची जडण – घडण होत गेली. 'तू देता जो, जो तेरे पास है, कुछ करते रह जो तेरे हाथ है' या बाबा आमटेंच्या दिव्य संदेशाला जीवनसूत्र मानून सेलूला 'नूतन' संस्थेत रुजू झाल्यावर प्राचार्य द.रा. कुलकर्णी, श्री सोनाजीपंत कुलकर्णी, गो.बा. देशमुख यांच्या सानिध्यात वैचारिक बैठक व त्यावरील निष्ठा प्रबळ होत गेली. शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यात ही मी सहभागी होऊ लागलो.

**शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्प**

सामाजिक कार्याची आवड असली तरी 'नूतन'मध्ये प्राधान्य विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांना होते. प्राचार्यांच्या सांगण्यावरून मी 'शैक्षणिक गुणवत्ता प्रकल्प' हे कृतिसंशोधनाचे काम हाती घेतले. मराठवाड्यात ज्या ज्या महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयस्तरावर गुणवत्ता विकास प्रकल्प चालू आहेत त्यांची माहिती मागवून, तेथील शिक्षक प्राध्यापकांना प्रश्नावली पाठवून त्याची मते जाणून घेतली. अहमदपूर येथील म. गांधी महाविद्यालयाला व लातूर येथील शाहू व दयानंद महाविद्यालयाला प्रत्यक्ष भेटी देऊन तेथे कशा प्रकारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी काम चालते, याचा अभ्यास करुन हे कृतिसंशोधन मी आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सादर केले. त्याचा फायदा आपल्या गुणवत्ता विकास प्रकल्पाला झाला.

**राष्ट्रीय एकात्मता समिती**

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये रुजवण्याच्या संस्थेच्या ध्येयधोरणानुसार मी अनेक जबाबदारीची कामे स्वीकारून ती व्यवस्थितपणे पार पाडली. नूतन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय एकात्मता समितीचा कार्यक्रमाधिकारी या नात्याने माझ्या काळात अंशकालीन भारतीय भाषा – वर्गाचा उपक्रम यशस्वी राहिला. ज्यात पंजाबी, गुजराती, उर्दू, सिंधी, तेलगू, कानडी,संस्कृत आदि आठ भाषांचे ४०–४० दिवसाचे वर्ग दोन वर्षे चालवले गेले. उर्दू भाषा वर्गाच्या समापन कार्यक्रमाला उर्दूभाषा अकादमीचे सदस्य प्रा. मीर तुराब अली प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. या काळातील राष्ट्रीय एकात्मता समितीतर्फे सेलू ते येलदरी अशी काढलेली सायकल सहल, व भीत्ती पत्रकाचे उपक्रम ही उल्लेखनीय आहेत. त्यातून अनेक विद्यार्थ्यांच्या कार्य – कर्तृत्वाला दिशा मिळाली.

**राष्ट्रीय सेवा योजना**

राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रमाधिकारी म्हणून मी आठ ते दहा वर्षे काम पाहिले. युवाशक्तीचा उपयोग ग्रामीण पुनर्रचना, स्वच्छता, पर्यावरण – संवर्धन, जल साक्षरता, समृद्ध भारतासाठी सुदृढ युवक, अशा अनेक सामाजिक व राष्ट्रीय समस्या सोडवण्यासाठी कार्य करीत असताना युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचा ही प्रयत्न केला.

कार्यमग्नता हाच माझा स्वभावगुण बनून गेला. घेतलेले काम व्यवस्थित झाले पाहिजे, त्यासाठी माझी धडपड असे.

कामों में उलझे हैं हाथ, और मंझील तय है।
फूर्सत नहीं कि, रूककर जरासी साँस ले लूँ ।।

**ग्रंथ लेखन, संपादन**

नूतन कनिष्ठ महाविद्यालयात हिंदी भाषा व साहित्याचे अध्यापक म्हणून कार्यरत असताना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र, परिषदांना हजर राहून त्यात पेपर सादर केले. महाविद्यालयाच्या 'प्रेरणा' या वार्षिकांकाच्या हिंदी - विभागासाठी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थी संपादकांना सहकार्य केले.

याच काळात माझ्या हातावर काही कृतिसंशोधनाची कामं होती. त्यातील 'राष्ट्रीय एकात्मता आणि पाठ्यपुस्तके' हे पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळासाठी केलेले कार्य मराठवाडा विद्यापीठाच्या अनुदानातून पुस्तकरुपाने सिद्ध झाले.

'गुरुवर्य' या माझ्या शिक्षक प्रबोधन पुस्तिकेचे अनावरण मुंबई येथे तत्कालीन शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते सर्व शिक्षक आमदारांच्या उपस्थितीत झाले. याशिवाय पाठ्य पुस्तकांच्या संपादन व लेखन कार्यात योगदान देण्याची संधी मला मिळाली. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीचे हिंदी पाठ्य पुस्तक, गुलबर्गा विद्यापीठाचे कला प्रथम वर्षाचे हिंदी - पाठ्यपुस्तक तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या तृतीय वर्षाची हिंदी विषयाची दोन पाठ्यपुस्तके मी परिश्रमपूर्वक तयार केली.

संपादन कौशल्यामुळे अनेक स्मरणिका तसेच गौरव ग्रंथांच्या संपादनाची जबाबादारी मला व्यवस्थितपणे पार पाडता आली. त्यात गणेशोत्सव व्याख्यानमालेची रौप्य महोत्सवी स्मरणिका, ग्रंथपालांच्या २४व्या अधिवेशनाची 'शब्दसंवाद' ही स्मरणिका व सेलू पेन्शनर्स असोसिएशनची 'सांज पर्व' या स्मरणिकांचे संपादन माझ्याकडेच होते.

'बकुळीची फुले' हा आदरणीय शंकरराव मंडलिकांचा गौरव ग्रंथ, 'वसंत बहार' हा ॲड. वसंतराव खारकरांच्या अमृत महोत्सवी गौरव ग्रंथाचे तसेच 'मैत्र विचारांचे' या श्री डी. आर. सरांच्या लेख संग्रहाचे संपादन माझ्या हस्ते सिद्ध झाले.

आकाशवाणी : विचारशलाका (मानवीय मूल्यांची ओळख)

गेल्या अनेक वर्षापासून मी आकाशवाणी परभणीवर विचारशलाका, विविधा, सर्जना, लोककथा इत्यादी कार्यक्रमातून लोकांशी संवाद साधित आहे. ' जे जे उत्तम, उदात्त, उन्नत' आहे त्याचा ध्यास घेऊन केलेले हे लेखन 'बीइंग ह्यूमन' या पुस्तकात प्रकाशित झाले.

नूतन महाविद्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून कार्यरत असताना आपल्या कर्तव्यात कुठे ही कमी न पडता शैक्षणिक जगता बरोबरच इतर क्षेत्रातही माझ्या क्षमतेनुसार मी योगदान देऊ शकलो. याचे श्रेय महाविद्यालयाच्या समृद्ध ग्रंथालयाला, आदरणीय प्राचार्यानी उपलब्ध करुन दिलेल्या संधी - सुविधांना, ज्येष्ठ सहकारी मित्रांना तर आहेच, शिवाय जागरुक व जिज्ञासु विद्यार्थी मित्रांना ही आहे, कारण अशा विद्यार्थ्यांमुळेच शिक्षक कर्तव्यदक्ष राहतो, ज्ञान साधक बनतो. कृतिशील, उत्साही राहून शिक्षण क्षेत्र पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता ते अधिक व्यापक व विस्तृत करु शकतो. ज्ञानविस्तार करु शकतो कारण ज्ञानाला कुठलीही परिसीमा नसते.

# चारित्र्य निर्माणाचे संस्कार केंद्र

**गौतम सूर्यवंशी**

**मा**झं आणि महाविद्यालयाचं माझ्या व्यक्तिमत्व जडण घडणीत दुहेरी नातं आहे. एक विद्यार्थी म्हणून व दुसरं एक कर्मचारी म्हणून. दोन्ही जीवनानुभवातून मागे वळून पाहतांना आठवणींचा दरवळ मनांत पसरुन आहे. तसं माझा ऋणानुबंध महाविद्यालयाची मातृसंस्था नूतन विद्यालयातील विद्यार्थी दशेपासून आहे. सन १९६९-७०, ७१-७२ शालेय व १९७२-७३ ते ७५-७६ महाविद्यालयीन शिक्षण. तर जाने १९७७ पासून एक कार्यालयीन कर्मचारी म्हणून ऑगस्ट २०१२ पर्यंत सेवेतून निवृत्त होईपर्यंत. एवढं प्रदीर्घ व निरंतर नातं एका लौकिकसंपन्न संस्थेशी असणं हे पूर्व पूण्याईचीच बाब म्हणावी लागेल.

या एकूण ४२ वर्षाच्या माझ्या जीवन प्रवासात शालेयस्तरावर प्रामुख्याने पितृतुल्य श्री.शं.दे. मंडलिक व श्री. डी.के. गुरुजी यांचा तर आचार्यतुल्य श्री. सोनाजी गुरुजी, श्री. गोविंदराव गुरुजी यांच्या संस्कार व व्यक्तिमत्वाचा जडण घडणीत मोठा वाटा आहे. महाविद्यालय जीवनात माझ्या विद्यार्थी जीवनाला विविध पैलूंनी विकसित करण्याचे एक नवे पर्व सुरु झाले. पदवीपूर्व वर्गात प्रवेश घेतांना कदाचित सुंदर हस्ताक्षरातील माझा प्रवेश अर्ज पाहून आदरणीय श्री.द.रा.कुलकर्णी सरांनी बाळाचे पाय पाळण्यातच ओळखले असावेत. म्हणून त्यांचा सर्वांवर दरारा असतांनाही मला आईच्या पंखाची सावली मिळावी असा साक्षात्कार झाला. त्यांनी कदाचित या शिळेला कसा आकार द्यावयाचा ही खूणगाठ मनाशी निश्चीत केली असावी. पेरले ते उगवते हे त्यांना नक्कीच माहित असल्याने शाळेतून श्री. मंडलिक गुरुजींनी ओबड धोबड दगडाची शिळा केली. ती सुविचार लेखन व संदेश पाक्षिकाचे संपादनाच्या छन्नी-हातोड्याने. हा वारसा श्री.द.रा. कुलकर्णी सरांनी सुविचार लेखन व संस्काराभिमुख विविध उपक्रमातून पुढे चालू ठेवला.

विद्या विनयेन शोभते ही उक्ती आपण नेहमीच ऐकतो. पण हा विनय निर्माण करणारे अनेक अध्यापक सहकारी श्री.द.रा.सरांनी नूतन महाविद्यालयात निर-क्षीर-विवेके या वृत्तीने एक रत्नपारखी या भूमिकेतून कार्यप्रवण केले होते. म्हणूनच महाविद्यालय हे केवळ वही-पेन-तासिका - अध्ययन - अध्यापन व परीक्षा असे यंत्रवत कारखाना न राहता विविध अभ्यासेत्तर संस्कारक्षम उपक्रमातून विद्यार्थ्याचा अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविणारे एक संस्कार केंद्र राहिले आहे. महाविद्यालयातील विज्ञान मंडळ, वाङ्मय मंडळ, क्रीडामंडळ, वक्तृत्व मंडळ, नाट्यमंडळ, विविध स्पर्धात्मक छटा घेऊन येणारे प्रतिवर्षाचे स्नेह संमेलन हे व प्रेरणा वार्षिकांक विद्यार्थीच्या सुप्त कला गुणांना विकसित करणारे अभिनव संस्कार केंद्र आहे. या सर्वाचा मुकुटमणी म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांत राष्ट्राभिमान सेवावृती व समर्पण भाव निर्माण करुन समाजाभिमुख व्यक्तिमत्व घडविण्याची शाळा आहे. हे स्वप्न महात्मागांधीचे. म्हणूनच महाविद्यालयाचे भान या परिवर्तनशील

संदेशाचा पुरस्कार करणारे आहे. या विचारांना विद्यार्थ्यात अभिसरित करणारा ज्ञाननिष्ठ, विद्यार्थीनिष्ठ प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून व्यक्तिमत्व विकासात परिश्रमपूर्वक आपले योगदान देत असे. म्हणून या महाविद्यालयाचे विद्यार्थी भारतातच नव्हे तर विदेशातही आपल्या कार्यकर्तृत्वाचे वेगळेपण आपला लौकिक स्थापित करण्यात यशस्वी झाले आहेत. ही निश्चितच महाविद्यालयासाठी अभिमानाची व भूषणावह बाब आहे.

मी विद्यार्थी दशेत असतांना माझ्या जडणघडणीत माझे अग्रस्थानी असलेल् पितृतुल्य आदरणीय कै. भगवानराव नेवपूरकर सरांचा मोलाचा वाटा आहे. बिकट परिस्थितीशी झगडण्याचे सामर्थ्य, परिश्रम, चिकाटी समरसता आदी बाबी आत्मसात करण्यासाठी त्यांचे संस्कार मला कदापी विसरणे शक्य नाही. मी तसा वाणिज्य शाखेचा विद्यार्थी परंतु कला व विज्ञान शाखेच्या सर्व गुरुजानांनी माझ्यातील वाङ्मय, वक्तृत्त्व, संगीत, पत्रकारिता, समाजसेवा आदि सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन व व्यासपीठ निर्माण करुन दिले. शाबासकीचा प्रेमळ हात पाठीवरुन फिरवला. साहित्य क्षेत्रात कै. पं. या तरफदार, प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांचेसह प्रा. प्रकाश कामतीकर, तर वक्तृत्वासाठी डॉ. बा.त्रि. भोसकर, प्रा. पाटोदकर, डॉ. विनायकराव कोठेकर, डॉ. पं.व्य. काटे, प्रा. संग्राम गवळे, प्रा. करडखेकर यांचे दिशादर्शन महत्वाचे ठरले. संगीत क्षेत्रात प्रा. केतकर, प्रा. पी.एन. कुलकर्णी तर सांस्कृतिक क्षेत्रात प्रा. संदीकर, प्रा. टाकळकर यांचे मार्गदर्शन असायचे. आजही मला या सर्व क्षेत्रात सहअध्यायी मित्र म्हणून उपक्रमात सातत्याने सोबत असायचे. कला प्रान्तातील निरागस वातावरणात व सहवासात सापेक्षपणे मी घडत गेलो. ते आजचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, सतीश देशमुख, रेणू पाचपोर, प्रकाश देवा, प्रकाश कुलकर्णी, संजिवनी शिवणकर ही नावे प्रातिनिधीक आहेत. सर्वांचे उल्लेख येथे आता शक्य नाही परंतु त्या सर्वांच्या परस्पर सुसंवादाचा माझ्या वाटचालीत सहभाग आहे. त्यांच्या आठवणी मी आजही जपून आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या सेवा शाळेत कै.पं. या. तरफदार सरांनी प्रवेश दिला व कै. श्रीरामजी भांगडियाजींच्या सेवाभावी सद्गुणांचा परिचय देत समाजभिमुख केले. पुढे या पथकातील कार्यक्रमाधिकारी माझे गुरुवर्ग कै. भगवानराव नेवपूरकर सरांच्या संस्काराने मी एवढा सिद्ध झालो की, मराठवाडा विद्यापीठाचे (१९७४-७५) तत्कालिन कुलगुरु डॉ.शंकरराव खरात यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमत: स्थापन झालेल्या रा.से.यो. च्या विद्यापीठ सल्लागार समितीचा बिनविरोध विद्यार्थी सदस्य म्हणून निवडीचा सन्मान प्राप्त झाला. सेवा करण्याची संधी मिळाली. याच परंपरेत पुढे कु. ज्योत्स्ना देवधर या विद्यार्थीनीचीही निवड झाल्याचे आठवते. हा सर्व रा.से.यो. चे महाविद्यालयाने घेतलेली नियमित, नैमित्तीक श्रमशिबीरे, श्रमदान, शिबीरांतर्गत सांस्कृतिक, सामाजिक, बौद्धिक, शारीरिक कार्यक्रमामुळे संस्कारीत झाल्याचे फलित होय. या शिबीरांमुळे राष्ट्रनिष्ठा, समाजसेवा, सभाधिटपणा, वक्तृत्व, श्रमप्रतिष्ठा आदी गुणांना चालना मिळाली, ज्याचा भावी जीवनात समर्थपणे उभे राहण्यासाठी माझ्यासह अनेक विद्यार्थ्यांना उपयोग झाल्याची उदाहरणे आहेत. या कार्यक्रमात कार्यक्रमाधिकारी म्हणून संस्कारित करण्यात आदरणीय प्रा. आर.ए. गात, डॉ. काटे सर, प्रा. डॉ. सु.न. संदीकर, प्रा. रावते यांचे नेतृत्वही मोलाचे आहे. रा.से.यो. पथक या महाविद्यालयाचे सुजाण व सुसंकृत विद्यार्थी

समाजाला देण्याचे केंद्र आहे. हे कसे विसरता येईल.

१९७५-७६ मध्ये महाविद्यालयाचे पदवी शिक्षण पूर्ण करुन मी मधील वर्षभराचा खंडित कालावधी सोडला तर जानेवारी १९७७ ला मी महाविद्यालयाच्या कार्यालयीन सेवेत लिपिक म्हणून रुजू झालो. माझ्या सर्व कलागुणांची व कौशल्याची या कामात उपयुक्तता सिद्ध करण्याची संधी मला आदरणीय प्राचार्य श्री द.रा.कुलकर्णी सरांनी दिली. ज्याचे निर्वहन करण्यासाठी कै. श्रीरामजी भांगडियांसह ऋषितुल्य कै. सोनाजी गुरुजी, कै. गोविंदराव गुरुजी, कै. बन्सीलालजी गिल्डा व श्री डी.आर. कुलकर्णी सरांच्या आशीर्वाद व मार्गदर्शनाचे बळ मिळाले. मी माझ्यात गुरुजनांनी संस्कारित केलेल्या शिस्तीचा व संस्काराचा दैनंदिन कामात माझ्यापरीने उपयोग केला. या प्रक्रियेत अनेक कटू अनुभव व प्रसंगाला न जुमानता पुढे चालत राहिलो. मोडेन पण वाकणार नाही या भूमिकेतून मी संस्था व महाविद्यालयावरची निष्ठा ढळू दिली नाही. गुरुजनांच्या संस्काराचा पराभव होऊ दिला नाही. प्रामाणिकपणाचा व सत्याचा नेहमी विजय होत असतो.

महाविद्यालयाने मला दिलेली सद्‌गुणांची शिदोरी आयुष्यभर जपत आलो. स्वत:चे चारित्र्य निष्कलंक ठेवत आलो. शेवटच्या श्वासापर्यंत ते टिकविण्याचा भविष्यात माझा निर्धार आहे. आपल्यावर आपण करुन घेतलेल्या शिस्त व संस्काराचे आजही मला संस्था, महाविद्यालय, माझे गुरुजन यांचा मनावर धाक आहे. तो मी स्वयंस्फूर्तपणे स्वीकारला आहे.

## माझं महाविद्यालय (प्रातिनिधीक स्वरुपात माजी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया)

**हेमंत आडळकर**

नूतन महाविद्यालय हे आमच्या जीवनाला आकार देणारे शक्तीस्थळ आहे. महाविद्यालयीन काळात शिक्षण घेत असतांना अनेक संस्कार कळत न कळत घडले. त्या काळात ज्या गोष्टी जाचक वाटत दीर्घ काळानंतर उमगले. महाविद्यालयीन जीवनात प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांची करडी शिस्त सुरवातीला खूप कष्टप्रद वाटत होती. परंतु नंतर ही गोष्ट किती महत्वाची होती हे समजले. विद्यार्थी संसदेच्या निवडणुका हा माझा आवडता प्रांत, या निवडणुका खूप चुरशीने लढविल्या जात, परंतु निवडणुका संपल्यानंतर चुरस ही मैत्रीमध्ये कशी परावर्तीत करावी याचे धडे याच महाविद्यालयात मिळाले. माझ्या यशस्वी राजकीय कारकिर्दीत हा धडा उपयुक्त सिद्ध झाला. निवडणुकीत चुरस आणि निवडणूक संपताच सर्वसमावेशक विधायक कार्यासाठी एकजूट हे धोरण निश्चित केल्यामुळे सामाजिक कार्यात अग्रेसर राहता आले. सेलू शहराचा नगराध्यक्ष तसेच साईबाबा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्षपद या पदावरील जबाबदारी पार पाडतांना मी नूतन महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे हे दडपण कायम योग्य मार्गावर वाटचाल करण्यासाठी प्रेरक ठरले. नूतन महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने महाविद्यालयाशी असलेला ऋणानुबंध कायम जपण्याचा प्रयत्न दीर्घकाळ प्रेरक ठरेल.

महाविद्यालयाच्या पुढील वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

## त्र्यंबक बापू बोराडे

'आमच्या नूतन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी' अशी आम्ही ज्या नामवंत, कीर्तीवंत व सुप्रतिष्ठीत व्यक्तींची ओळख सांगत असतो. अशी सगळी मंडळी अभिमानाने सांगतात, 'होय, आम्ही नूतन महाविद्यालयाचेच अमक्या – तमक्या बॅचचे विद्यार्थी आहोत.' आम्ही भले असू किंवा कुणाच्या नजरेत बुरेही असू. पण आमच्या नजरेत आमचे नूतन महाविद्यालय म्हणजे आमच्या परिसरातील लोकांसाठी 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा' असेच आहे. अशा भावनांसह महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव साजरा करताना माजी विद्यार्थी वसतिगृहाच्या निर्माणात अनेकजण मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. त्यापैकीच एक असलेले त्र्यंबक बापू बोराडे, जून्या वाडासंस्कृतीत जशी चिरेबंदी ठेवणीची माणसं होती. तसचं एक रागडं, उमदं व दिलदार व्यक्तीमत्व. महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव साजरा करायचा म्हटला की, पुन्हा ते असेच माजी विद्यार्थ्यांच्या बैठकीना येत असत. तेव्हा त्यांच्या काळातील महाविद्यालयीन जीवना बद्दल ते बोलायचे. त्यांच्या बोलण्यातून त्यांनी एक घटनेचा उल्लेख केला. ती घटना ऐकताना रविंद्रनाथ टागोर यांच्या 'राँग मॅन इन वर्कर्स पॅराडाईज' या कथेची चित्र मालिका जिवंत साकार झाली. ती सर्व घटना किंवा हा प्रसंग महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा सांगावा असा आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले, सर तुम्हाला सांगितली आता पुन्हा कशाला ? मग त्यांना रविंद्रनाथ टागोरांची 'राँग मॅन इन वर्कर्स पॅराडाईज' ची कथा ऐकवली. तेव्हा कुठे ते भूतकाळातील स्मृतिरंजनात गुंतले. मग एक संमोहित भावस्थितीत बोलू लागले.

मी त्र्यंबक बापू शेषेराव बोराडे, बोराडे पाटोद्याचा रहिवासी. तेव्हा पाटोद्याचे सर्व व्यवहार सेलूशीच चालत. आजही त्यात बदल झाला असे नाही. जिल्हा व तालुका बदलला तरी आम्ही मनाने तसे सेलूकरच. आम्ही सेलूतच रमलो, घडलोही. त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे सेलूची नूतन विद्यालय शिक्षण संस्था. याच संस्थेच्या शाळा महाविद्यालयात आम्ही शिकलो. आमची मुलंही शिकली. आता तर त्यांची मुलही शिकतात. गावखारीत मोठं वडाचं झाड असावं आणि त्यांच्या सावलीत सगळी पाखरं जमावीत. तसेच आम्ही खेड्यापाडयातून शिक्षणासाठी सेलूच्या नूतन विद्यालयात, महाविद्यालयात येत असू

तेव्हाची लोकधारणा अशी की, एकदा मुलगा नूतनमध्ये घातला म्हणजे काळजी मिटली. कारण इथं शिक्षणच असं होतं. इथल्या शिक्षकांचा धाक दराराच असा की, आम्ही वर्गात तर हाताची घडी तोंडावर बोट ठेवून बसत असू. यात काही नवलनाही. पण बाहेर वागताना देखील आमच्याकडून गैर वर्तन होणार नाही याची दक्षता देखील घेत असु. हे खरे असले तरी, आमचा मुळ स्वभाव जाईना म्हणतात अशी स्थिती असायची. तेव्हा वेळ प्रसंगी कठोर शब्दात शिक्षक मंडळी समज देत असत. म्हणूनच असेल, मला महाविद्यालयीन शिक्षणासाठी नूतन

महाविद्यालयात प्रवेश घेण्याबाबत माझ्या वडिलांचा आग्रह होता. नूतनमध्ये शिकतो याचा त्यांना जरा अभिमानच वाटायचा. हे सर्व खरे असले तरी, महाविद्यालयीन वातावरण आणि माझे तरूण संवेदनशील मन भविष्यातील काही वेगळे संकेत मिळू लागेल.

लोकशाही शासन व जीवनपध्दतीत सार्वत्रिक निवडणुकांना अतिशय महत्त्व असते. संसदीय लोकशाहीची एक प्रयोगशाळा म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थी संसद समजली जाते. विद्यार्थी संसदेच्या निवडणूका देखील नियमीत होत असत. आता काय किंवा तेव्हा काय, निवडणूका म्हटले की मतदान आले. मतदानाचा देखील एक खेळच असतो. या खेळात वर्ग प्रतिनिधी म्हणून वर्गातील मुलांनी एकाची निवड करायची. मग वर्ग प्रतिनिधी विद्यार्थी संसदेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करणार. या प्रक्रियेत बहुचर्चित व अधिकाधिक मित्र असलेली व्यक्ती मते मिळवून निवडून येणार. अशा परिस्थितीत मी जास्तीत जास्त मित्रांना माझ्या बाजूला वळवत असे. त्यामुळे मी नेहमी निवडूनच येत होतो. त्याच एक कारण म्हणजे मला सर्व जाती-धर्माचे मित्र होते. कारण वेळ प्रसंगी त्यांना मदतही करीत होतो. त्यामुळे असेल की, माझ्याकडे विद्यार्थ्यांचे नेतृत्व अपसूकच असे. आता नेतृत्व करायचे म्हटले की, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्य किंवा संस्थाचालक यांचे सोबत वाद - संवादही घडायचा.

असा वाद संवाद झाला की, मला वाटायचे सगळे आम्हा बहुजन समाजाच्या मुलांवर अन्यायच करतात. आम्ही जे कांही सांगू - बोलु त्यापेक्षा ते वेगळी विरोधी भूमिका घेतात. त्यावेळी सत्य-असत्याबाबत विचार करण्याची गरज वाटत नसे. असेही घडायचे की, आम्ही सांगतो तेच खरे आहे. त्यांच्या बोलण्याचा अर्थ किंवा आशय कळलेला नसायचा. असेही असेल की, तो समजून घेण्याची माझी मानसिकता नसावी. यापैकी काही तरी घडले असेल. पण एक घटना मात्र अशी घडली की, तशी घटना कोणत्याही महाविद्यालयाच्या गॅदरिंगमध्ये घडली नाही. तेंव्हा ती प्राचार्य किंवा संस्थाचालकांना नक्कीच आवडली नसावी. अशी ती अप्रिय पण कायम लक्षात असणारी घटना सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर सांगावी वाटते.

त्यावर्षी स्नेहसंमेलन तथा गॅदरिंगसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री शामरावजी कदम यांना विद्यार्थी संसदेच्या वतीने निमंत्रित केल होते. त्यांनी निमंत्रणाचा स्वीकार केला. पण ते कोणत्या कामात गुंतले ते समजले नाही. पण ऐनवेळी ते येऊ शकले नाहीत. म्हणून आम्ही प्राचार्य व विद्यार्थी संसदेचे प्रभारी प्राध्यापक यांना बैठक घेऊन स्नेह संमेलन पुढे घेण्याबाबत विनंती केली. पण प्राचार्य द.रा.कुलकर्णी सरांनी आता ऐनवेळी दुसरा पाहुणा बोलावणे शक्य नाही असे सांगितले. आमच्या तरूण मनात एक वादळ उठले. दुसरा पाहुणा बोलावणे का शक्य होणार नाही ?

विद्यार्थी संसदेच्या बैठकीत यावर जोरदार चर्चा झाली. वाद झाला मग प्राचार्यांनी संसदेच्या पदाधिकाऱ्यांना जरा आव्हानवजा सूचना केली की, 'तुम्हीच पाहुणा शोधा व त्यांना घेऊन या.'

अशी आव्हानात्मक परिस्थिती समोर आली की, माझ्या मेंदूला जरा तरतरी येते. मला वाटले राजकीय नेता. पुढारीच आम्हाला प्रमुख पाहुणा हवाच कशाला ? का एखादा सामान्य माणूस आमच्या महाविद्यालयात प्रमुख पाहुणा म्हणून येऊ नये !

मग मी विचार केला सामान्यातील सामान्य माणूस म्हणजे श्रमजीवी कष्टकरी आहे. त्याच्याच कष्टावर तर आम्ही जीवन जगतो. त्याचे कष्ट आणि त्याच्या घामाचा आम्ही सन्मान का न करावा ! माझ्या सारखा सधन शेतकरी कुटूंबातील मुलगा जसा इथे शिकतो - तसे तर शेतमजूर - कष्टकरी

हमालाची पोरंही तर इथे शिकतातच. त्यांच्या पैकीच आपण कुणाला प्रमुख पाहुणा म्हणून बोलवायला काय हरकत आहे !

जिथे नेते व अभिनेते गॅदरिंगचे प्रमुख पाहुणे असतात. त्या स्टेजवर एका हमालास प्रमुख पाहुणा म्हणून बोलावणे म्हणजे सभ्यतेच्या सर्व मर्यादा सोडणे आले. हे खरे असले तरी त्यात आम्ही एक प्रकारचा थ्रिल अनुभवत होतो. म्हणूनच माझ्या सर्व विद्यार्थी संसदेनं माझी कल्पना आनंदाने स्वीकारली. एवढेच नाही तर माझ्यासह सर्व प्रतिनिधीनी महाविद्यालय प्रशासनाला देखील कळविले. गॅदरिंगसाठी असा सामान्य कष्टकरी प्रमुख पाहुणा ठरवताना मला तर आमच्या महाविद्यालयाचे बोधचिन्ह देखील ठळकपणे आठवत होते. त्यातील महात्मा गांधीची मुद्रा तशी प्रेरक. त्यांना वाटायचे देशाचा पंतप्रधान देखील असाच सामान्य माणूस झाला पाहिजे. मग आमच्या महाविद्यालयातील गॅदरिंगचा पाहुणा जर असा कष्टकरी –हमाल म्हणून आम्ही स्वीकारला तर महात्मा गांधीनाही ही कल्पना नक्कीच आवडली असती. अलीकडील मुन्नाभाई एम.बी.बी.एस. सिनेमात गांधीजी मुन्नाभाईला जसे काही सांगतात–बोलतात. तसे तर तेव्हा ते मला संकेत देत नसावेत. असे मला आता वाटते. असो.

आमच्या निर्णयाप्रमाणे माझ्याच आडत दुकानावर हमाल म्हणून काम करणारे नागनाथ अप्पा मलवडे हेच आमच्या स्नेह संमेलनाचे पाहुणे ठरले. त्याबाबत त्यांना काहीच कल्पना नाही. पण मी त्यांना नवीन पोषाख दिला. ते जरा लाजतच पण काहीतरी वेगळं घडतंय म्हणून बेचैन झालेले, प्रमुख पाहुणे म्हणून स्टेजवर आले.

तोपर्यंत स्टेजवरील सन्माननीय मंडळींना काहीच समजले नाही. पण समजले तेव्हा मात्र ते काहीच करु शकत नव्हते. महाविद्यालयाचे प्राचार्य, संसदेचे प्रभारी प्राध्यापक व संस्थेच्या विश्वस्थांना आता नेमके काय करावे, हे सूचतच नव्हते. एका आडतीवरील हमाल आणि महाविद्यालयातील गॅदरिंगचा पाहुणा ! जगातील कितवं आश्चर्य असाव ते समजले नाही. म्हणून संस्थेच्या मंडळीनी विशेषत: अध्यक्षांनी काहीतरी निमित्त सांगून स्टेज सोडले.

ही घटना जशी सर्वांच्या दृष्टीने विलक्षण, आठवणीत कायम राहिली. तशी माझ्याही लक्षात राहिली. त्याचे कारण मला पुढील वर्षी कॉलेज मध्ये प्रवेश मिळू शकला नाही. 'जो भी होता है अच्छा होता है' या उक्तीप्रमाणे मी पुढे माजलगाव आणि औरंगाबाद येथून पदवीचे शिक्षण घेतले आहे. शिक्षण पूर्ण केले. तेव्हा नक्कीच वाईट वाटले होते. आता खोटं खोटं काही सांगावे वाटत नाही. पण मला चाकोरी बाहेर जाऊन विचार करण्याची प्रेरणा व जगण्याची रीतच या महाविद्यालयाने शिकवली. ही बाब मात्र सांगताना आनंदच वाटतो.

पदवीचे शिक्षण घेतल्यावर मी माझ्या आडतीवर व व्यापारावर लक्ष केंद्रीत केले. व्यापारात लौकिक मिळवला. आदर्श व्यापारी म्हणून प्रतिष्ठा मिळाली. फ्रेन्डस् क्लबचा अध्यक्ष झालो. हनुमान मंदिर विश्वस्थ समितीचाही अध्यक्ष झालो. पुढे नगरसेवक म्हणून निवडून आलो. या काळात नूतन विद्यालय शिक्षण संस्था व महाविद्यालयातील सर्व मंडळी सोबत उत्तम संवाद राहिला. म्हणूनच आता महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचा उपाध्यक्ष पदावर कार्य करतो. ही बाब माझ्यासाठी गौरवाची आहे. मी काही मोठा तत्त्वज्ञ नाही. पण असे वाटते की, माणूस कोणत्या जातीत जन्मला तो कोणत्या धर्माचा किंवा कोणत्यापदावर आहे म्हणून त्याला संधी व सन्मान द्यावा असे नाही. फक्त संधी आणि सन्मान दिला तर सामान्य माणूसही असामान्य प्रतिष्ठीत असे जीवन जगू शकतो. हेच सत्य आहे. असेच सत्याचे प्रयोग करण्याची शिकवण महात्मा गांधीनी आम्हाला दिली. ती कशी विसरावी ?

## सतीश कुलकर्णी

नूतन महाविद्यालयाच्या विद्यार्थी दशेतील काळ पुढील जीवनाची दिशा निश्चित करण्यासाठी पथदर्शक ठरला हे कृतज्ञतेने नमूद करावेसे वाटते. शालांत परीक्षेतील बऱ्यापैकी गुणाच्या आधारावर महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. विज्ञानशाखेतील कष्टसाध्य अभ्यासासोबतच अभ्यासेतर उपक्रमामध्ये विशेष रस निर्माण झाल्याने विज्ञान शाखा कधी दुर्लक्षित झाली हे उमगलेच नाही. अभियांत्रिकीला प्रवेश न मिळाल्याने विज्ञान शाखेची पदवी प्राप्त करण्याचा प्रवास सुरु झाला. हा प्रवासही जलद गाडीच्या सुसाट वेगा ऐवजी सवारी गाडीच्या धीम्या गतीनेच सुरू राहीला. या काळात अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग मात्र बुलेट ट्रेनला मागे टाकेल अशा गतीने विकसित झाला. त्या काळात विविध उपक्रमातील विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग आणि प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी असलेला सुसंवाद व्यक्तिमत्व विकासासाठी प्रेरक ठरला. वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध शिबिरांच्या माध्यमातून चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले. निष्पक्ष विचारसरणी आणि ती व्यक्त करण्यासाठी लागणारे धाडस यातूनच निर्माण झाले. प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांचे सुयोग्य मार्गदर्शन आणि पाठबळ प्रेरक ठरले. वक्तृत्व स्पर्धांसाठी प्रा. कोठेकर, प्रा. भोसकर, प्रा. करडखेडकर, प्रा. वांगीकर, प्रा. गवळे, प्रा. रावते यांनी वैचारिक भूमिका निश्चित करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यावेळेसचे माझे वर्गमित्र व आताचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या सोबत आंतरविद्यापीठ पातळीपर्यंत वादविवाद स्पर्धामध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली.

विज्ञान शाखेतील विद्यार्थी असुनही मराठी विभाग प्रमुख प्रकाश कामतीकर हे त्या काळातील आमचे 'आयडॉल' अमूर्त शैलीतील त्यांच्या कलाकृती, अक्षरलेखनातील फटके, लफ्फेदार स्वाक्षरी, लिखाणातील विविधांगी व्यासंगता, लांब - लांब कल्ले असलेला गुढ चेहरा आणि बेधडक व्यक्तिमत्व या त्यांच्या प्रतिमांनी भारला जाऊन त्यांच्याशी दीर्घ संपर्काच्या संधीचा शोध सुरु केला. विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी द्वितीय भाषा म्हणून हिंदीचा स्वीकार

केला असतांना सरांचे मार्गदर्शन लाभावे या हेतूने आवर्जून मराठी भाषा घेणारा वर्गातील मी एकमेव विद्यार्थी होतो.

सेलू शहरातील सहकारवाडी म्हणजे जणू देवभूमीच. आदरणीय श्रीरामजी भांगडियाजी (भाईसाहेब), सोनाजी गुरुजी, पिताश्री गोविंदराव गुरुजी, गिल्डा गुरुजी, तरफदार गुरुजी, विनायकराव चारठाणकर, किशनराव चारठाणकर ही सर्व उत्तुंग व्यक्तिमत्वे म्हणजे कुटुंबातील सदस्य. या सर्वांच्या सान्निध्यात दीर्घ काळ राहण्याची मिळालेली संधी हा एक जीवनातील अमोल ठेवा. प्रकाश कामतीकर यांच वास्तव्यही सहकारवाडीतच. श्रीरामजी भांगडियाजी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'श्रेयांकित' या गौरव ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी कामतीकर सरांकडे होती. माझे अक्षर बऱ्यापैकी असल्यामुळे श्रेयांकितसाठी मुद्रणप्रत तयार करणे, प्रुफे तपासणीसाठी औरंगाबाद येथील जयहिंद प्रेसमध्ये नेऊन देणे ई. कामे सरांच्या मार्गदर्शनाखाली करण्याची संधी मिळाली. त्या ग्रंथाचा लेआऊट, केशरी रंगाच्या कागदावर काळ्या रंगाने रेखाटलेले मुखपृष्ठ, धर्मराज भोइर यांची रेखाटन आणि पुठ्ठा बायंडीग या सर्व प्रक्रिया डोळसपणे अनुभवता आल्या. या गौरव ग्रंथाच्या ऋण निर्देशात माझा केलेला उल्लेख हा कुठल्याही सन्मानापेक्षा मला मोठा बहुमान वाटला. मुद्रण क्षेत्रातील ले आऊटसाठी 'दृष्टी' रुजण्याची सुरवात येथेच झाली.

कै. पं.या. तरफदार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ काढण्यात आलेल्या 'प्रेरणा' या कविता विशेषांकाच्या मराठी विभागाच्या संपादनाची संधी मला लाभली. प्रकाश कामतीकर सरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नवे प्रयोग करण्याची संधी मिळाली. सरांचे निवासस्थान ही खरे तर एक प्रयोगशाळाच होती. मुखपृष्ठासाठी तरफदार गुरुजींचे चित्र तयार करण्यासाठी एका नव्या तंत्राचा वापर सरांनी केला होता. महाराष्ट्र टाईम्स या दैनिकाने मुक्त हस्ते या अंकाचा गौरव केला. वार्षिकांकाचा ठरावीक तोंडवळ्याच्या मर्यादा ओलांडून केलेला हा अभिनव प्रयोग खरोखर धाडसीच होता.

माझ्या शैक्षणिक प्रवासाची गाडी पदवीपर्यंत पोंचली परंतु पदवीचे दर्शन काही होऊ शकले नाही. परंतु या प्रवासात पदवीपलीकडचे खूप काही मिळाले. वाद विवाद, वक्तृत्व स्पर्धेतून प्रामाणिक विचार धाडसीपणाने व्यक्त करण्याची शक्ती मिळाली. 'प्रेरणा'च्या माध्यमातून मुद्रणाची दृष्टी मिळाली. पुढील जीवनात मुद्रण हा व्यवसाय म्हणून स्वीकारण्यासाठी उभारी ही येथूनच मिळाली. मुद्रण क्षेत्रातील अनेक मान - सन्मान प्राप्त झाले. पांढऱ्या कागदावर काळी छपाई करण्यापासूनचा प्रवास बहुरंगी छपाईपर्यंत पोंचला. जीवनप्रवासाची गाडी साधी सवारी असली तरी प्रवास रंगतदार झाला. या महाविद्यालयाने अनेक गुणवंत तर घडविलेच परंतु गुणवंत नसणारे ही येथे घडले....

## प्रा. विट्ठल डख

भारतासाठी सुजान नागरिक घडविण्याचे ग्रामीण केंद्र नूतन महाविद्यालयाच्या स्थापनेला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मनोगत व्यक्त करण्यासाठी प्रा. यादव गायकवाड यांचा दूरध्वनी आला. याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कारण या निमित्ताने का होईना आमच्या जीवनातील जडण घडणीसाठी महाविद्यालयाच्या योगदानाबद्दल ऋण व्यक्त करण्याची संधी त्यांनी मला उपलब्ध करुन दिली.

सेलू हे गाव मनमाड काचीगुडा या रेल्वेलाईवर एक रेल्वे स्टेशन आहे. चऱ्यासाठी प्रसिद्ध सेलू या गावाला शैक्षणिक आणि सांस्कृतिक परपंरा लाभली आहे. येथून १२की. मी. अंतरावरील गुगळी धामणगाव हे माझे मुळगाव. त्यावेळेस म्हणजे १९६६-६७ मध्ये आमच्या गावाला जि.प.ची. दहावी पर्यंत शाळा होती. यावेळी आम्हाला पाचवीसाठी इंग्रजी शिकविण्यासाठी शरद व्यवहारे नावाचे शिक्षक होते. जे पुढे विद्यापीठात मराठी विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाले. त्यांनी आम्हाला सेलू येथे शिक्षणासाठी येण्याबद्दल आमच्या आजोबांना शिक्षणाची आवड असल्यामुळे इ.स. १९६८ -६९ साली आम्हाला सेलू येथे शिक्षणासाठी ठेवले. एकत्र कुटूंब असल्यामुळे आम्ही ८ ते १० जन एका छोटे खानी वाड्यात राहत होतो.

मी सहावीला आणि मोठे बंधुनी दहावीला सेलू येथील नूतन विद्यालयात प्रवेश घेतला. नूतन महाविद्यालयाची स्थापना सुद्धा १९६८-६९ सालची. दुसऱ्याच वर्षी माझ्या मोठ्या भावाने महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. त्यांच्या चर्चेतून मला महाविद्यालयाची माहिती मिळत होती. १९६९ ते १९७४ या वर्षात मी नूतन विद्यालयात शिक्षण घेतले. त्यावेळेस आम्हाला सोनाजी कुलकर्णी, गोविंदराव देशमुख, शं.दे. मंडलिक, दातार, देऊळगावकर, डि.के. देशपांडे इ. नामवंत गुरुजनाचे मार्गदर्शन लाभल्यामुळे मी दहावीच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो. आणि नंतर मी वाणिज्य शाखेत पदवीपूर्व वर्गात प्रवेश घेतला. नूतन संस्थेचे नूतन विद्यालय त्याकाळात एक चांगले शैक्षणिक केंद्र म्हणून मराठवाड्यात नावारुपाला आले होते. महाविद्यालयीन शिक्षणासाठी पूर्वी नांदेड, जालना, औरंगाबादला जावे लागत होते. सामान्य, गरीब विद्यार्थ्यांना ते शक्य होत नव्हते. १९६८-६९ साली नूतन महाविद्यालयाची सुरुवात झाल्यामुळे या भागातील व बाजूच्या जिल्ह्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांची पदवी शिक्षणाची फार मोठी सोय झाली. नूतन संस्थेची स्थापनाच राष्ट्रीय विचारातून झालेली होती. लोकशाही आणि सामाजिक मूल्याशी संस्थेने कधी तडजोड केली नाही.

त्याच दरम्यान १०+२+३ असा नवीन (अभ्यास क्रम पॅटर्नला) सुरुवात झाली. पदवीपूर्व वर्गाची माझी शेवटची बॅच होती तर १२ वी ची दुसरी बॅच होती. १९६७ ते १९७९ या कालावधीत

मी नूतन महाविद्यालयामध्ये पदवीचे शिक्षण घेतले. या पूर्वी राजेंद्र मणियार यांनी मराठवाड्यातून बोर्डात परीक्षेत प्रथम येण्याचा मान मिळविला होतो. त्यानंतर संजीव देशमुख, उदय कोडपल्ले यांनी नावलौकिकात भर टाकली वाणिज्य शाखेत मला आणि गोविंद मंत्री याना मराठवाडा पातळीवर यश मिळाले. या सर्वांमध्ये महाविद्यालयाचा आणि प्राध्यापकांचा मोलाचा वाटा होता असे मी मानतो.

वाणिज्य शाखेत आम्हाला प्रा. नेवपूरकर प्रा. दरगड, महाजन, गात सर, उबाळे, पाटोदकर केतकर, प्रा. संग्राम गवळी इ. चे मोलाचे मार्गदर्शन लाभले. केवळ पाठ्यपुस्तकातील भागच पूर्ण केला जात नव्हता तर त्याबरोबरच चालू घडामोडी आणि त्या विषयाची इतर उपयोगी माहितीसुद्धा शिकायला मिळत होती. शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, साहित्य, क्रिडा, सामाजिक कार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समृद्ध करण्याचे कार्य महाविद्यालयाकडून होत होते आणि आजही ते होताना दिसून येते. आज अनेक शैक्षणिक संस्थांना बाजारु स्वरुप प्राप्त झाले, परंतु नूतन संस्थेने मात्र आपल्या मूळ विचाराला आणि उद्देशाला जराही धक्का लागू दिला नाही.

महाविद्यालयीन जीवनातील एक दोन आठवणी मला सांगाव्याशा वाटतात. मी बी.कॉम प्रथम वर्षात असतांना पुस्तपालन व लेखाकर्म या विषयाचा कांही भाग मला समजला नव्हता. या विषयी मी प्रा. नेवपूरकर सरांना शंका विचारली. त्यांनी मला महाविद्यालय संपेपर्यंत थांबण्याची सूचना केली. मी त्यादिवशी ५ वाजेनंतर थांबलो. त्यांनी मला ग्रंथालयात घेऊन गेले. आणि या विषयाची माझी अडचण मुळातूनच मला समजाऊन सांगीतली. त्यासाठी त्यांनी मला दोन तासाचा वेळ दिला. एखादा विषय मुळातूनच कसा समजाऊन घ्यावा हे मला त्यांच्याकडून शिकायला मिळाले. नंतर तो विषय माझा सर्वात आवडता ठरला. नंतर शिक्षक म्हणून या विषयाचे अध्यापन करताना मला कधी अडचण आली नाही.

माझी दुसरी एक आठवण आहे, त्या काळात महाविद्यालयात संध्याकाळी ५ ते १० पर्यंत अभ्यासिका चालत असे. आम्ही बरेच विद्यार्थी अभ्यासिकेचा फायदा घेत असू. एक दिवस माझ्या बाजूला बसलेला विद्यार्थी मोठ्याने आपसात बोलत होता. त्याचा इतरांना त्रास होत होता. अभ्यासिकेतून बाहेर पडल्यावर मी त्या विद्यार्थ्याला एक चापट मारली. त्याने दुसऱ्या दिवशी प्राचार्याकडे तक्रार केली. प्राचार्यानी माझी चूक माझ्या लक्षात आणून दिली. मी त्या विद्यार्थ्याची माफी मागीतली.

यापुढे माझ्या हातून असे कृत्य होणार नाही असे मी सांगीतले. या घटनेवरुन कायदा कधी हातात घ्यायचा नसतो. हे मी शिकलो. कोणतेही काम कायदेशीर मार्गाने करणे ही बाब माझ्या पक्की लक्षात बसली व पुढील आयुष्यात मला ती फार उपयोगी ठरली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यावेळी बी.कॉम. द्वितीय वर्षाला असतांना एस.पी. या विषयाची अभ्यासिकेत केवळ दोनच प्रती होत्या. त्या कमी पडत होत्या. मी ही गोष्ट प्राचार्य द.रा. सरांना सांगीतली. द. रा. कुलकर्णी सरांनी दुसऱ्याच दिवशी एस.पी. या विषयाला जास्त प्रती उपलब्ध करुन दिल्या.

## डॉ. मारोती कसाब

स्वातंत्र्य सेनानी विनायकराव चारठाणकर , दलितमित्र श्रीरामजी भांगडिया , स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ , बाबासाहेब परांजपे अशा दिग्गजांच्या पावन स्पर्शाने पूनीत झालेल्या सेलू शहरातील नूतन महाविद्यालयात शिकायला मिळाले, हे सर्वहारा जातवर्गातील माझ्यासारख्या विद्यार्थ्यासाठी लाखमोलाची गोष्ट आहे.

डिग्रस जहागीर या माझ्या गावातील चौथीपर्यंतचे शिक्षण घेऊन मी पुढील शिक्षणासाठी मामाचे गाव गाठले. जालना जिल्ह्यातील पांगरी वायाळ या गावी पाचवीचे शिक्षण घेऊन मी सेलूच्या न्यू हायस्कूलमध्ये दाखल झालो. खेड्यातल्या मुलांची न्यू हायस्कूल आणि शहरातील मुलांची नूतन शाळा अशी तेव्हा सरळ सरळ वर्गवारी होती.

सहाजिकच आमची रवानगी न्यू हायस्कूलमध्ये झाली. डिग्रस ते सेलू असा अडीच कोस प्रवास रोज पायी करावा लागे. गावातल्या थोराड पोरांच्या शिव्या खात; पुढे गेले चिखलांचे गोळे खात दहावी पास झालो.

न्यू हायस्कूलमध्ये असतानाच भाषणाचा आणि काहीबाही लिहिण्याचा छंद जडला होता. अकरावी विज्ञान वर्गात प्रवेश केला. मात्र वर्गातील गोरी गोमटी पोरंपोरी पाहून , त्यांचे चांगलेचुंगले कपडे पाहून आणि प्रॅक्टिकल वह्यांचा खर्च ऐकून मी दोन महिन्यांतच सायन्स बदलून किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. सी. एम. देशपांडे, डी. बी. गायकवाड ,डॉ. पांचाळ सर असे चांगले गुरुवर्य लाभले. अकरावीत असतानाच 'प्रेरणा' वार्षिक अंकाच्या संपादक मंडळात निवड झाली.

त्यावेळी प्राचार्य द. रा. कुलकर्णी सरांचा दरारा काही औरच होता. अंकाच्या निमित्ताने सरांच्या जवळ जाता आले. बी.ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी वक्तृत्व, वादविवाद स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली. याच काळात नामांतराची चळवळ सुरू झाली. क्रांतीचौकात नामांतरासाठी महाविद्यालय बंदचा बोर्ड लावून आम्ही महाविद्यालय बंद यशस्वी केला. शिष्यवृत्तीसाठी , गोरगरिब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नासाठी अनेकदा प्रशासनाशी संघर्ष करावा लागला. मात्र प्राचार्य कुलकर्णी सरांनी नेहमीच आपुलकीची वागणूक दिली. प्रा. प्रभाकर रावते सरांच्या सोबत राष्ट्रीय एकात्मता समितीचे काम केले. सेलू ते येलदरी, सेलू ते परभणी अशा भारत जोडो सायकल फेऱ्या काढल्या. प्रा. रामदास जायभाये , डॉ. कोठेकर, प्रा. हीरा बयास यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजनेची श्रमदान शिबिरे केली.

मराठी , राज्यशास्त्र आणि इतिहास हे माझे बीएचे विषय. ज्येष्ठ लेखक प्रा. प्रकाश कामतीकर , प्रा. यादव गायकवाड, पी. व्ही. काटे , नगराळे सर , रावते सर , वसंत शेप सर या सर्व गुरुवर्यांनी जीवन शिक्षण दिले. शिकत असतानाच लाल बावटा शेतमजूर युनियन, किसान सभा, एस एफ आय , छात्रभारती आदी संघटनेत काम करत शिक्षण घेतले. पुढे आयुष्यभर मानवतेसाठी चळवळीत राहण्याची प्रेरणा आणि उर्जा मला माझ्या नूतन महाविद्यालयाने दिली. हे कृतज्ञतापूर्वक नोंदवताना मला खूप आनंद होत आहे.

## स्वाती परतूरकर

नूतन महाविद्यालय – खरं तर माझ्यासाठी हे माझं शैक्षणिक माहेर आहे. कदाचित माझं असं बोलणं अतिशयोक्ती वाटेल, पण मला नेहमी असचं वाटतं. एखादी मुलगी सासरी जाताना आपल्या माहेराहून जसे संस्कार घेऊन जाते ना, तसेच संस्कार घेऊन आम्हीही महाविद्यालयातून बाहेर पडलो. बाहेर जेव्हा, मी माझी ओळख नूतन महाविद्यालयाची विद्यार्थिनी अशी करुन देते, तेव्हा समोरच्या व्यक्तिच्या तोंडातून निघालेला 'वाऽ !' हा शब्द ऐकून खूप समाधान वाटते. ग्रामीण भागातील हे महाविद्यालय असूनही इथला विद्यार्थी कुठल्याही स्पर्धेत मागे पडत नाही. त्याचं कारण आहे इथले प्राध्यापक आणि महाविद्यालयाने पुरवलेल्या सुविधा.

मी तर महाविद्यालयातील महिला वसतिगृहाची विद्यार्थिनी. त्यामुळे माझं घर – अंगण सगळं काही महाविद्यालयच. माझ्यासारख्या ग्रामीण भागातून आलेल्या कित्येक मुलींसाठी महिला वसतीगृह म्हणजे एक वरदानचं होतं, त्याबद्दल मी महाविद्यालयाचे खूप खूप आभार मानते. वसतिगृहात अगदी माफक दरात आम्हाला सर्व सुविधा उपलब्ध होत्या. इथल्या नवनवीन उपक्रमांमुळे आमच्या कलागुणांना वाव मिळाला. माझ्या पहिल्या कवितेच्या ओळी जेव्हा कागदावर उमटल्या त्या क्षणाचा साक्षीदार हेच वसतिगृह. इथं जीवाभावाच्या सख्या भेटल्या त्या अगदी कायमच्या. संसदेत खासदार जसे आपले वेगवेगळे प्रस्ताव मांडून आपल्या मागण्या पूर्ण करतात ना, तसेच आम्हीही आमच्या मागण्या प्राचार्य आणि वसतिगृह कमिटीकडून पूर्ण करुन घ्यायचो. काही वेळा त्यात बालीशपणा असायचा, हे आत्ता कळतं.

मी B.Sc. ची Student त्यामुले आमच्या Science Dept. ला नेहमी वेगवेगळे उपक्रम असायचे. Tours, Seminars, Poster Presentations, Project यातून आम्हाला नव्या जगाची ओळख झाली, आम्ही स्पर्धेत उतरलो आणि टिकू लागलो, तिथं यश मिळवू लागलो. याचं श्रेय खरं तर आमच्या प्राध्यापकांनाच जातं, कारण त्यांनी आमच्याकडून हे सगळं करुन घेतलं. सरांनी करवून घेतलेल्या इथल्या मेहनतीमुळे आम्ही पुढेही यशस्वी झालो. आमच्या इथे नियमित Practicals व्हायचे, सगळी Instrument आमच्या Laboratory मध्ये असल्यामुळे पुढे P.G. साठी आम्ही कधीही कुठेही अडकलो नाही.

महाविद्यालयातील माझी सगळ्यात जास्त आवडती गोष्ट म्हणजे वाचनालय. माझी वाचनाची आवड याचं वाचनालयाने पुरवली. मी वेळ मिळेल तसं आणि जे मिळेल ते वाचलं. अवांतर वाचनासाठी एक वेगळं Library कार्ड उपलब्ध करुन देणारं वाचनालय मला दुसरीकडे कुठेही मिळालं नाही. जिथे मागितलेलं सगळं काही मिळतं ते म्हणजे हे वाचनालय हा माझा अनुभव आहे. ज्याचा फायदा मी अजूनही घेते, वेगवेगळी स्पर्धा परीक्षांची पुस्तके, मासिकं यांचा खूप फायदा झाला. जे पुस्तक मला

इतर कुठेही वाचायला मिळालं नाही, ते मला माझ्या कॉलेजच्या वाचनालयात नक्की मिळेल. हे मला माहित असतं.

कॉलेजच्या प्राध्यापकांविषयी मी आवर्जून सांगेल. विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन आणि त्यांना मदत करण्यासाठी त्यांची कधीच ना नसते, मग तो विद्यार्थी कुठल्याही शाखेचा असो. खरं सांगायचं झालं तर मी माझी B.Sc. पूर्ण करुन शकले ते माझ्या सर आणि मॅडममुळेच. माझ्या कागदावरच्या ओळी अर्थपूर्ण कवितेत बदलल्या त्या इथल्या सरांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच. वक्तृत्व, वादाविवाद, परिसंवाद, कविसंमेलन, साहित्य संमेलन यासारखे अनेक व्यासपीठ मला अनुभवता आले, ते त्यांच्यामुळेच. महाविद्यालयातील शिक्षण आमच्या करिअरचा पाया आहे. त्यामुळे आम्ही आमचा् करिअरमध्ये, आमच्या आयुष्यात यशस्वी होऊ तेव्हा त्या यशामध्ये या महाविद्यालयातील प्रत्येक घटकाचा महत्त्वाच्या वाटा असेल. आणि त्यासाठी मी या नूतन महाविद्यालयाची सदैव आभारी राहील.

---

## संतोष धुमाळ

**मी** महाविद्यालयात असतांना औरंगाबादचे जेष्ठ कलाकार श्री दिलीप खंडेराव यांचा लोककलेचा कार्यक्रम बघितला. अंगामध्ये लोककलेचे उपजतच गुण होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने आयोजित युवक महोत्सवाला जाण्याची संधी मिळाली. श्री. खंडेराय यांनी भारूड, वासुदेव, लावणी, लोकगीत इ. चे छान सादरीकरण केले होते. श्री मधुकरराव पाटील हे एक कलाकार, त्यांचेही मार्गदर्शन आम्हाला महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिले. मी, तुळजा पवार, संजय ठाकर आदीचा छान ग्रुप तयार झाला. युवक महोत्सवात सतत बक्षिसे मिळवीत गेलो. आज मी औरंगाबादला स्थायिक झालो. परंतु महाविद्यालयात मिळालेल्या शिक्षणाबरोबर लोककलेचे शिक्षण मला मिळाले. माझा छंद आता माझा व्यवसाय झाला आहे. विविध गावात माझे लोककलेचे प्रयोग होतात. प्रेक्षकांनी दिलेली साद मला माझ्या महाविद्यालयाची सतत आठवण देते..

---

## गोविंद मंत्री

**मी** वाणिज्य शाखेचा पदवीधर विद्यापीठ परीक्षेत गुणवत्तायादी मध्ये आलो. खूप आनंद झाला. प्रा. दरगड, प्रा. नेवपुरकर, प्रा. महाजन यांनी वाणिज्य शाखेत विद्यार्थ्यांना घडविले. त्यांचा संस्कार घेऊन व्यवसायात आलो. व्यवसाय करीत असताना त्यांनी वर्गात दिलेले धडे अनुभवतो आहे. आज व्यापारात मी स्थिर झालो आहे. परंतु महाविद्यालयाने दिलेल्या शिदोरीवर व घरी असलेल्या संस्कारामुळे व्यवसायात समाधानी आहे.

## प्रतिभा बोरकर

नूतन शिक्षण संस्थेतील वातावरणच भारलेलं आहे. जी व्यक्ती तिथे ज्ञानार्जनासाठी जाते अनुभव संपन्न होऊन बाहेर पडते. ही संपन्नता व्यक्तीसापेक्ष आहे खरी पण तरी ही सकारात्मकताच जास्त आहे. माझ्या व्यक्तीमत्वाची खरी जडण घडण इथेच झाली. खूप काही शिकायला, अनुभवायला मिळालं. मज्जा, मस्ती, धम्माल... सर्व काही. आजच्या विद्यार्थ्यांकडे पाहिलं तर स्वत:च्या श्रीमंतीची प्रकर्षाने जाणीव होते.

गुरुं ब्रम्हा, गुरुं विष्णू, गुरुं देवो महेश्वरा।

या ओळी माझ्या मनाने खोट्या मानल्या ते याच महाविद्यालयात. इथेच जाणीव झाली गुरु ब्रम्हा आहे. गुरु विष्णू आहे. पण महेश ? छे... छे... गुरु विद्यार्थ्यातील नवनिर्मिती आणि सृजनाचा निर्माता, पालनकर्ता नक्कीच आहे. पण विनाश करणारा होऊच शकत नाही. याचा वेळोवेळी प्रत्यय नूतन महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना आला. माझ्या प्रगतीच्या आलेखात आणि व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीत नूतन शिक्षण संस्थेतील प्राथमिक शिक्षकांपासून महाविद्यालयीन प्राध्यापकांचा मोलाचा वाटा आहे. कुण्या एकट्या दुकट्यांचा नामोल्लेख करणे दुसऱ्यांवर अन्याय होईल. शिक्षक शिक्षिकांचं आमच्या भल्यासाठी पोटच्या पोरांसारखं रागावणं आणि दुसऱ्या दिवशी काहीच न घडल्या सारखं मन मोकळे पणानं विचारपुस करणं आजही आठवतं. प्राचार्य जणू आमचे कुटुंब प्रमूख.

महाविद्यालयाच्या प्रवे्शद्वारा जवळ स्वत:च्या केबीन मध्ये स्थानापन्न असतील तर एक आदरयुक्त दराऱ्याचा दर्प बाहेर यायचा. प्राध्यापक वृदांचा स्टाफरुम ज्ञान सागर आणि समस्त प्राध्यापक या ज्ञान सागरातील आपापल्या विषयांच्या ज्ञानाने ओतप्रोत भरलेले व्हेल आणि शार्क भासायचे. अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे दात दिसायचे आणि आम्हाला ज्ञानाने बाळसेदार झालेलं त्यांचं अगडबंब शरीर.

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमास अनुपस्थितीची खंत आहेच पण महाविद्यालयाने यशस्वीपणे हा पल्ला गाठला आणि अनेक उत्तमोत्तम विद्यार्थी तयार केले याचा सार्थ अभिमान आहे.

## संगिता काळे

सेलू चे नूतन महाविद्यालय म्हटले की आजही आम्हा विद्यार्थ्यांच्या मनात आपोआप आदर व आपलेपणाची भावना निर्माण होते. येथे शिक्षण घेणारी प्रत्येक व्यक्ती नशिबवानच म्हंटल पाहिजे. महाविद्यालयात प्रवेश करताक्षणीच प्रवेशव्दाराजवळ प्राचार्य द.रा. सरांच्या कॅबिन तेथुन जाताना शक्यतो आम्ही अतिशय शांतपणे महाविद्यालयात प्रवेश करीत असु, कारण मनात त्यांच्या विषयी आदरयुक्त भीती असते.

येथील प्रत्येक प्राध्यापकवृंदानी विद्यार्थ्यांच्या मनावर एक छाप सोडली आहे. सर्वच प्राध्यापक आपापल्या क्षेत्रात होते आणि आहेत. प्रत्येकाचा नामोल्लेख करणे शक्य नसले तरी त्यांच्या विषयी मनात आजही आदराची भावना आहे.

आज मी या जीवनरूपी सागरात, जी काही खंबीरपणे उभी आहे ती केवळ या नूतन महाविद्यालयारूपी दिपस्तंभामुळेच. आजही या महाविद्यालयाच्या समोरून जाताना ऊर अभिमानाने भरून येतो.

माझ्या प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रवास मी यशस्वीपणे याच नूतन संस्थेत केला आहे. पुढे माझ्या मुली देखील याच संस्थेच्या विद्यार्थिनी आहेत. याचा मला सार्थ अभिमान आहे.

महाविद्यालयाने माजी विद्यार्थ्यांचा मेळावा घेऊन आम्हाला आमच्या गतस्मृतींना उजाळा देण्याची जी संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहील.

महाविद्यालयाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या पुढेही महाविद्यालयाने अशीच यशस्वीपणे यशाची व प्रगतीची शिखरे पार करावीत अशा शुभेच्छा!

## Priyanka R. Maniyar

Firstly I would like to take this opportunity to thank my college (NMS) and my teachers for playing a vital role in every student's educational and other life skill developments. They support us hurdle and making our foundation in over coming of education and life more strong.

I have completed my graduation in commerce from this college. In the journey of 5 years in college with studies I have enjoyed my college life too.

One thing I must mention that our college is really safe for girls. And the second, I appreciate the part that the entire board and university exams are held in our college with strict rules and regulation. Everything has positive and negative side. So there are some loopholes too. But our principal, teachers, and the committee members always try to overcome that and give their best efforts.

## रोहिणी हेलवाडे

आदरणीय, प्राचार्य शरद सरांचा मला फोन आला की मी नूतन कॉलेजच्या प्रेरणा अंकासाठी लेख लिहावा. मला खूप आनंद झाला. माझ्या कॉलेज जीवनातील आठवणी ताज्या झाल्या.

आम्ही मूळ गोळेगावचे परंतु शिक्षणासाठी सेलूला राहण्यासाठी आलो. सेलू गाव खूप छान आहे.

घरातील वातावरण खूप छान होते. एकत्र कुटुंब असल्यामुळे आम्ही बहिण भाऊ व काका एकत्र हसत खेळत एकाच घरात वाढलो. घरात आजोबांचा खूप धाक होता. चांगले संस्कार घरातूनच झाले.

माझ्या वडिलांचे शिक्षण सुद्धा नूतन शाळेतच झाले. त्यांनी हैदराबाद येथून B.A.L.L.B. चे शिक्षण घेतले आणि ॲडव्होकेट झाले.

माझे प्राथमिक शिक्षण हसत-खेळत झाले. अभ्यास बरा होता. नंतर मी सातवी मध्ये असताना मला गणित विषयात चांगले मार्क्स पडले (मिळाले) कारण शिकविण्यासाठी आदरणीय गो.बा. देशमुख सर होते. चांगले मार्क्स पाहुन अभ्यास करण्याची आवड निर्माण झाली. मोठी बहिण अभ्यासात हुशार असल्यामुळे मी तिच्यासोबत अभ्यास करायची. मी मॅट्रीकला प्रथम श्रेणीत पास झाले.

त्या काळात मुलींना जास्त शिकवत नसत. माझे आजोबा सुद्धा मुलींच्या शिक्षणाच्या विरुद्ध होते परंतु वडिलांनी कॉलेज शिकण्यास परवानगी दिली. माझी आई सुद्धा मॅट्रीक पर्यंत शिकलेली असल्यामुळे तिलाही शिक्षणाचे महत्त्व आहे. मी १९८० साली नूतन कॉलेजमध्ये अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला.

कॉलेजचे वातवारण छान होते. अकरावीला आम्ही दहा बारा विद्यार्थिनी होतो. सर छान शिकवायचे. जर काही समजले नाही तर पून्हा समजावून सांगत असत. कॉलेज दोन कि.मी. असून सुद्धा रोज पायीच जाणे येणे व्हायचे.

बारावी पास झाल्यानंतर B.Sc. (Biology) ला प्रवेश घेतला. अभ्यास चालू असायचा. प्रॅक्टीकल सुद्धा रेग्युलर व्हायचे.

पहाता पहाता तीन वर्षे निघून गेली व B.Sc. T. Y. चा निकाल पेपरमध्ये डीक्लेयर झाला. माझे नाव पेपरमध्ये पाहून खूप आनंद झाला. मी १९८५ साली B.Sc. T.Y. मध्ये मराठवाडा विद्यापिठात चौथी आली व B.Sc. (Biology) मध्ये मराठवाडा विद्यापीठात पहिली आली होती.

आदरणीय करडखेडकर सर माझे अभिनंदन करण्यासाठी घरी झाले होते.

M.Sc. शिक्षणासाठी मला स्कॉलरशीप मिळणार होती. परंतु मला शिक्षणासाठी औरंगाबादला राहणे अशक्य होते म्हणून शिकू शकले नाही.

मी शिवाजी कॉलेज परभणी येथून LL.B. चे शिक्षण पूर्ण करुन ॲडव्होकेट झाले.

ति. आई व वडिलांचे आशीर्वाद, गुरुजनांचे मार्गदर्शन असल्यामुळे मी हे यश संपादन करु शकले.

## रीता मसुरे

नूतन महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव आपण या वर्षी साजरी करत आहोत आणि याच सुवर्ण महोत्सवी वर्षात माझ्या आयुष्यात सुवर्ण योग आला, तो असा की माझी विद्यार्थी संसदेच्या 'सचिव' पदी निवड झाली. ही निवड गुणवतेच्या आधारे करण्यात आली आणि म्हणूनच कदाचित मला ही संधी मिळाली. नूतन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी म्हणजे माझ्या मते, एखाद्या सुवर्ण संधी पेक्षा कमी नाही.

या पूर्वीची माझे शिक्षण 'वालुर' सारख्या ग्रामीण भागात झाले. ग्रामीण भागातील एक विद्यार्थिनी म्हणून मी या महाविद्यालयात दाखल झाले. महाविद्यालातील वातावरण माझ्यासाठी पुर्णपणे नवीन होते, पण अंगी गुणवत्ता आणि डोळ्यात काही स्वप्न घेऊन या वातावरणात राहण्याची सवय करून घेतली.

बी.एससी. प्रथम वर्षात असताना वर्गप्रतिनिधीतत्व करण्याची संधी मला मिळाली होती, मात्र कधी ही आपण विद्यार्थी संसदेचे प्रतिनिधितत्व करू असा विचार केला नव्हता. माझ्या गुणवत्तेची, क्षमतेची सीमा पार करत, मी ही जबाबदारी पार पाडली. याही पुढे माझी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी संसदेच्या सदस्य पदी निवड झाली. या दोन्ही गोष्टी माझ्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या आहेत. महाविद्यालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच विद्यार्थिनीला प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.

ज्या पद्धतीने भारतीय संसद कार्य करते त्याच पद्धतीने महाविद्यालय आणि विद्यापीठाने घालून दिलेल्या नियमांच्या कक्षेत आमच्या विद्यालयाच्या विद्यार्थी संसदेने अत्यन्त काटेकोरपणे कार्य केले. यामध्ये विद्यार्थांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, एन.एस.एस. सर्व प्रकारचे प्रश्न सोडवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. नूतन महाविद्यालयासारख्या मोठ्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करणे हे माझ्यासाठी एक आव्हान होते. पण यात मला सर्व शिक्षकवृदांचे योग्य ते मार्गदर्शन मिळाले, आणि मी ही जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली असे मला वाटते.

उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

## सुवर्णमहोत्सव - अहवाल

- सुवर्ण महोत्सव संयोजन समितीचा अहवाल
- विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान व राबविलेले उपक्रम
- संशोधन प्रकल्प लेखन अहवाल
- विविध महोत्सवाच्या संयोजनाचे स्मृतिशिल्प
- विविध चर्चासत्र, परिषद व कार्यशाळांचे आयोजन
- 'प्रेरणा' ची सुवर्णकांती
- राष्ट्रीय सेवा योजना : श्रम संस्काराची बाराखडी
- ग्रंथालयाची वाटचाल
- गुणवंत विद्यार्थ्यांची यादी
- विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी
- राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती समिती द्वारा मूल्यांकन
- सांस्कृतिक उपक्रम
- महाविद्यालयास प्राप्त पुरस्कार
- सुवर्णवेध

## सुवर्ण महोत्सव संयोजन समितीचा अहवाल

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने वर्षभरात करावयाचे कार्यक्रम सूत्रबद्ध व नियोजनाप्रमाणे झाले पाहिजेत असा सुवर्ण महोत्सव समितीचा आग्रह राहिला. त्या नुसार नूतनीकरणाचे काम सुरु झाले. आणि मग सुवर्ण महोत्सवी वर्षाचा उद्‌घाटन सोहळा घेण्याचे वेध लागले. या कार्यक्रमासाठी राजकीय मंत्री, विशेषत: मुख्यमंत्री किंवा शिक्षणमंत्री यांना निमंत्रित करण्याचा एक विचार पुढे आला. तेव्हा सर्वांनीच एक विचार मांडला की, शिक्षण क्षेत्रातीलच एखादी व्यक्ती या समारंभासाठी निमंत्रित करणे औचित्यपूर्ण राहील. वाटल्यास समारोपाच्या प्रसंगी मंत्री वगैरे निमंत्रित करणे योग्य राहील. हा विचार देखील महत्त्वाचा व विचार चिंतनाला गती देणारा होता. म्हणून संयोजन समितीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पाहिजे कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांना निमंत्रित करण्याचा निर्णय घेतला. खासदार म्हणून ते राजकीय प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती या दृष्टीनेही निश्चितच महनीय आहेत. त्यांचेशी संपर्क केला आणि त्यांनी आम्हाला मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना निमंत्रित करण्याची सूचना केली. डॉ. मुणगेकर देखील राज्यसभा सदस्य व नियोजन आयोगाचे सदस्य राहिलेले. या दोन्ही शिक्षणतज्ज्ञासह आम्ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांना निमंत्रित केले. एकुणच उद्‌घाटनासाठी तीन कुलगुरुंची उपस्थिती हा केवळ योगायोग नाही. विचारपूर्वक केलेली ती एक योजना होती. आम्हाला कार्यक्रमाचा उपचार किंवा कर्मकांड पूर्ण करावयाचे नव्हते. विचार चिंतनाचे प्रभावक्षेत्र तयार करण्याचा मानस होता.



- लोकाश्रयाचा सशक्त आधार असलेले आजी – माजी कर्मचारी व विद्यार्थी संघाची मजबूत संघटनात्मक बांधणी.
- विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे.
- चर्चासत्र, परिषद तथा कार्यशाळाचे आयोजन
- राज्यस्तरावरील एखाद्या भव्यक्रीडा स्पर्धेचे आयोजन इ.

आर्थिक दृष्ट्या गरजेपूरती तरतुद, ही तशी मोठी उपलब्धी मान्य केली तरी, भविष्यातील वाढत्या

गरजा विचारात घेता राजाश्रय आणि लोकाश्रयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. याचा विचार करुन संस्थेचे शुभचिंतक आजी माजी कर्मचारी, विद्यार्थ्यांना स्वेच्छा निधी संदर्भाने आवाहन करणे.




- सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने संयोजन समितीने काही संकल्प केले आहेत ते असे
- कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र आय.सी. टी. कक्षांची निर्मिती.
- महाविद्यालय परिसरात आधुनिक सोयी – सुविधांसह एक मिनी सेमिनार हॉलचे निर्माण.
- विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेशपूर्व परीक्षा तसेच विविध व्यावसायिक स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे तथा अकादमीचे निर्माण.
- संशोधन केंद्राची स्थापना.

रविवार दिनांक २५ जून, २०१७ रोजी नूतन महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्षाचा प्रारंभ सोहळा प्रमुख अतिथी, संस्थेचे विश्वस्थ पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरिक, आजी – माजी विद्यार्थी यांचे उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या प्रारंभ पर्वाचे उद्‌घाटन करताना मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी उच्च शिक्षणाच्या अनुषंगाने केलेले प्रतिपादन गंभीर व विचार चिंतनाला गती देणारे होते. या प्रसंगी केलेल्या त्यांच्या भाषणाचे आशयसूत्र असे होते. ''आपण समाजाचे काही देणं लागतो, अशा उदात्त भावनेने काम करणाऱ्या शिक्षण संस्था हल्ली दुर्मिळ प्रजातीच्या प्राण्याप्रमाणे भेटतात. शासनाने स्वयंअर्थसहाय्यीत व कायम विनाअनुदानीत शिक्षणसंस्था सुरु करण्यास मान्यता दिली. त्यामुळे वाईट अर्थाने शिक्षणाचा बाजार किंवा धंदा झाला आहे.''




डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या प्रतिपादनातील आशय सूत्राचे अजून वेगळे अन् साधार विश्लेषण डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले. आपल्या विवेचनात त्यांनी, ''शिक्षणाचा केंद्र बिंदू हा विद्यार्थी आहे. आत्ताच्या धोरण नीती नुसार देखील लाभार्थी घटक म्हणजे तो विद्यार्थीच. त्याच्या शैक्षणिक गरजांचा विचार सर्वानीच करावा. केवळ पुस्तकी शिक्षणापेक्षा कौशल्यावर आधारीत व्यवसायिक रोजगाराभिमुख शिक्षणाची आम्ही सुविधा दिली नाही तर हे शिक्षण कालबाह्य व निरुपयोगी सिद्ध होईल. हे वास्तव मी नाकारीत नाही. परंतु शिक्षणाचा थेट संबंध रोजगारापेक्षाही व्यक्तीच्या चारित्र्याशी, व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीशी आहे. कारण शिक्षण हे मूलतः मूल्यसंस्कार करुन माणसाचे माणूसपण उजळून देणारी एक प्रणाली आहे.'' याचे भान





उपास्थितांना करुन दिले.

या समारंभाचा समारोप करताना डॉ. जनार्दन वाघमारे यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांचे व्यक्तीत्त्व, कर्तृत्त्व आणि शैक्षणिक योगदानाची स्मृती जागवली. या अनुषंगाने स्पष्टीकरण देताना त्यांनी म्हटले, ''स्वामीजींच्या प्रेरणेने मराठवाड्यात शिक्षणाचा विशेषत: उच्च शिक्षणाचा जो विकास झाला तो तसाच पुढे २१व्या शतकात सुरु ठेवायचा आहे. केवळ आणि केवळ आम्हाला लर्निंगवर म्हणजे लर्निंगवरच अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे आजार होत असत. त्या सर्व आजार अन् रोगाच्या संदर्भाने शिक्षणाचीच मात्रा द्यावी लागेल. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ''सर्व रोगाचे औषध शिक्षण असून, शिक्षणाला कोणताही पर्याय नाही.''

या समारंभातील सर्व महनिय व्यक्तींच्या प्रतिपादनाचा आशय आणि अर्थ एकच, 'आमच्या विचाराचं बीजसूत्र केवळ शिक्षणच' असू शकते. मध्यकाळात जीवनाचा भवसागर तरुन जाण्यासाठी भक्ती हाच एकमेव मार्ग होता. तसे काळ कोणताही असो जीवनाचा भवसागर तरुन जाण्यासाठी शिक्षणाचाच मूलाधार आहे. हे सारसूत्र समोर ठेवून आम्ही आमच्या वर्षाभरातील विचार चिंतनाचे सूत्र उच्चशिक्षण निश्चित केले.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## नूतन महाविद्यालय, सेलू.
## पश्चिम विभागीय अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो (मुले) स्पर्धा २०१७-१८

२०१७-१८ हे वर्ष नूतन महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले जाते आहे. याचे औचित्य साधून विविध उपक्रमांतर्गत नूतन विद्यालय शिक्षण संस्थेस केलेल्या मागणीप्रमाणे आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धापैकी कोणतीही स्पर्धा घेण्यास तत्वत: मान्यता देऊन पाठींबा दर्शविला. त्याप्रमाणे महाविद्यालयाने विद्यापीठाशी पत्र व्यवहार करून पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धा घेण्यास मान्यता घेतली. औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर आयोजना संदर्भात विद्यापीठाच्या समितीने स्पर्धेसाठी असणारी आवश्यक जागेची पाहणी, निवास व्यवस्था, विद्यापीठ प्रतिनिधी संघ व्यवस्थापक, प्रशिक्षक खेळाडू यांच्या निवासाची व भोजनाची सोय कशी करावी ह्याची माहिती व मार्गदर्शन केले. त्यामध्ये विद्यापीठाचे निरीक्षक म्हणून डॉ. पी.एन.देशमुख, डॉ. भास्कर माने, डॉ. महेश बेंबडे, व विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांनी सदरील परिस्थितीचा आढावा घेऊन मान्यता दिली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, सचिव श्री.डी.के.देशपांडे, सहसचिव श्री.डॉ.व्ही.के.कोठेकर, सहसचिव श्री.जयप्रकाशजी बिहाणी, कार्यकारणीतील सर्व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, सुवर्ण महोत्सव समितीचे संयोजक उपप्राचार्य यादव गायकवाड, सेलू नगरीचे नगराध्यक्ष श्री. विनोद बोराडे, उपनगराध्यक्ष श्री. प्रभाकर सुरवसे, श्री. हेमंतराव आडळकर, श्री. हरिभाऊकाका लहाने, नगरसेवक श्री. संदीप लहाने, प्रतिष्ठीत नागरीक व मान्यवरांच्या उपस्थितीत एक बैठक घेऊन स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. क्रीडा संचालक प्रा. के.के. कदम (क्रीडा विभाग प्रमुख) व प्रा. नागेश कान्हेकर यांनी स्पर्धा आयोजनाची जबाबदारी स्वीकारण्याचे मान्य केले.




विद्यापीठ क्रीडा मंडळ, नवी दिल्ली यांच्या मान्यतेने, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व नूतन महाविद्यालय, सेलू च्या संयुक्तविद्यमाने दि. ०२ जानेवारी ते ०५ जानेवारी २०१८ या कालावधीत अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धा (मुले) २०१७-१८ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, गोवा व महाराष्ट्रातील ५९ संघानी सहभागासाठी नोंदणी केली होती, पैकी प्रत्यक्ष ४५ संघानी सहभाग नोंदविला. ६०० खेळाडू तर ३०० प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक व विद्यापीठ प्रतिनिधी सहभागी झाले होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने डॉ.प्रदिप देशमुख यांची स्पर्धा तक्रार निवारण अध्यक्ष म्हणून नियुक्ति करण्यात आली होती. याशिवाय २५ सहाय्यक क्रीडा प्राध्यापकांची, विविध शिक्षक व शिक्षकेत्तर

कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

■ स्पर्धा कार्यालयाचे उद्घाटन –

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धा(मुले) २०१७–१८ स्पर्धा, दि. ०२ जाने ते ०६ जाने २०१८ या कालावधीत संपन्न करण्याची जबाबदारी महाविद्यालयावर टाकण्यात आली. स्पर्धा संयोजनासाठी स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यात आले. या कार्यालयाचे उद्घाटन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून दि. ०६/१२/२०१७ रोजी सायं. ०५ वा. करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलूचे अध्यक्ष डॉ. एस.एम.लोया हे होते. उद्घाटक म्हणून सेलू नगरीचे नगराध्यक्ष श्री. विनोदराव बोराडे हे होते. प्रमुख पाहूणे श्री. हेमंतराव आडळकर यांची उपस्थीती होती. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी व सुवर्ण महोत्सव समितीचे संयोजक प्रा.यादव गायकवाड, सेलू नगरीचे नगराध्यक्ष श्री. विनोद बोराडे, नूतन शिक्षण संस्थेचे साचिव श्री.डी.के.देशपांडे, सहसचिव डॉ.व्ही.के.कोठेकर व श्री.जयप्रकाशजी बिहाणी, श्री.दत्तरावजी पावडे. उपनगराध्यक्ष श्री. प्रभाकर सुरवसे, श्री. हरिभाऊकाका लहाने, नगरसेवक श्री. संदीप लहाने व प्रतिष्ठीत नागरिक यांची उपस्थिती होती.

■ विविध समित्यांचे गठण –

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धा(मुले) ०२ जाने ते ०६ जाने २०१८ या कालावधीत संपन्न करण्याची जबाबदारी महाविद्यालयावर टाकण्यात आली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. स्वागत व सल्लागार समितीमध्ये गावातील सर्व प्रतिष्ठीत नागरिक व संस्थाचालक होते. तसेच नियोजन समिती, मैदान समिती, कार्यालय चौकशी व तक्रार निवारण समिती, स्टेज समिती, भांगडिया वसतिगृह निवास व्यवस्था समिती, नूतन विद्यालय निवास व्यवस्था समिती, नूतन प्राथमिक शाळा निवास व्यवस्था समिती, महिला वसतिगृह निवास समिती, विश्रामगृह निवास समिती, भोजन समिती, चहापान व अल्पोपहार समिती, प्रसिध्दी समिती, वाहन व्यवस्था समिती, रेल्वे स्वागत समिती, आरोग्य समिती, सांस्कृतिक समिती, बैठक व्यवस्था समिती, क्रीडाज्योत व ध्वजारोहन समिती, सुशोभीकरण समिती, स्वच्छता समिती आदी समित्यांचे गठण करण्यात आले.

■ पूर्व तयारी व साफसफाई

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो–खो स्पर्धा(मुले) ०२ जाने ते ०६ जाने २०१८ या कालावधीत होणाऱ्या स्पर्धेसाठी मैदानाचे पूर्णपणे ट्रॅक्टरव्दारे सपाटीकरण करून टँकरव्दारे पाणी टाकूण रोलरने दबई करण्यात आली व त्यावर सिथेंटिक मॅट चे आच्छादन करून आंतरराष्ट्रीय पातळीचे आत्याधुनिक असे सुसज्ज खो–खो चे मैदान तयार करण्यात आले. स्पर्धेच्या उद्घाटन व समारोपासाठी भव्यदिव्य असे व्यासपीठ तयार करण्यात आले. तसेच प्रेक्षकांसाठी प्रेक्षक गॅलरीची ५००० बैठक व्यवस्था करण्यात आली. रात्र–दिवस सामन्यासाठी प्रकाशझोत व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारे अस्थाई स्वरुपातील पण सर्वात भव्य–प्रेक्षणीय असे क्रीडांगण तयार करण्याचे शिवधनुष्य संयोजन समितीने सहजपणे उचलले, म्हणूनच सेलूच्या इतिहासात जणू खो–खो चे ऑलाम्पीयाड खेळविण्याचा पहिलाच प्रयास सर्वांच्या कौतुकाचा विषय राहिला.



■ मैदानाचा उद्‌घाटन समारंभ –

स्पर्धेसाठी मैदान तयार करून परिसरास कै. श्रीरामजी भांगडिया क्रीडा नगरी असे यथोचित नाव देण्यात आले. या कै. श्रीरामजी भांगडिया क्रीडानगरी चे उद्‌घाटन नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव श्री. डी.के. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पोलीस अधिकारी श्रीमती. रेणुका वागळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. स्वरूप कंकाळ (तहसीलदार, सेलू) श्री. प्रभाकर सुरवसे (उपनगराध्यक्ष) श्री. मुकेश बोराडे, श्री. संदीप लहाने, श्री. पवन आडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा संयोजनातील संस्मरणीय तसेच सर्वांच्या नजरेत भरणाऱ्या ज्या प्रमुख बाबी होत्या, त्यात देखणी क्रीडानगरी होती. यापेक्षाही क्रीडा क्षेत्रातील सर्व नामवंत खेळाडू, क्रीडा प्राधिकरणाचे पदाधिकारी प्रशासकीय अधिकारी यांनी मनापासून दाद दिली ती आमच्या संपर्क यंत्रणेला. शिवाय अंतर्गत व्यवस्था व व्यवस्थापनाला. त्या संदर्भातील ही काही निरिक्षणे.

■ स्पर्धेत सहभागी संघाशी संपर्क –

सहभागी होणाऱ्या संघांना भ्रमणध्वनी व ई–मेल करून कार्यालय समिती मार्फत संपर्क करण्यात आला. व स्पर्धेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले ५९ संघांशी संपर्क केल्यानंतर ४५ संघांनी येण्यास अनुकूलता दर्शवली व ४५ संघ स्पर्धेसाठी हजर होते.

■ खेळाडू व पंचांची निवास व वाहतूक व्यवस्था–

खेळाडू संघव्यवस्थापक, पंच यांच्या निवास व वाहतूक व्यवस्थेसाठी शिस्तबध्द नियोजन करण्यात आले. नूतन महाविद्यालय महिला वसतिगृहात सर्व पंचाची व विद्यापीठातील विविध समित्याचे क्रीडाप्रतिनिधी यांची निवास व्यवस्था करण्यात आली. श्रीरामजी भांगडिया वसतिगृह व नूतन विद्यालय, नूतन प्राथमिक विद्यालय, येथे ६०० खेळाडूंसाठी निवास व्यवस्था करण्यात आली. सेलू नगरीतील विविध लॉजमध्ये संघ व्यवस्थापक संघ प्रशिक्षक यांची व्यवस्था करण्यात आली.

सार्वजनिक उत्सवाच्या यशस्वीतेची खात्री देणारी गोष्ट म्हणजे निवास व भोजन व्यवस्था असते. निवास भोजनाची सुविधा देताना सेलू शहरातील उमद्या व उत्साही अशा नगराध्यक्षाने, जे आमच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. ते मा.विनोद हरिभाऊ काका बोराडे यांनी नि:शुल्क भोजन देण्याची सिध्दता केली.

■ भोजन व्यवस्था

स्पर्धेसाठी येणाऱ्या ६०० खेळाडु, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक, पंच विद्यापीठ प्रतिनीधी सर्व समिती सदस्य व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भोजन व्यवस्था महाविद्यालयात करण्यात आली होती. त्यामध्ये सकाळचा अल्पोपहार व चहा, त्यानंतर दुपारी व रात्री सर्वांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यासाठी भोजन व्यवस्था समितीचे श्री. गिरीष लोडाया यांच्या नियोजनाखाली सर्व भोजन समिती सदस्याने योग्य ती भोजन व्यवस्था उत्तम रित्या पार पाडली.



■ खो-खो स्पर्धेचे उद्‌घाटन

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या विद्यमाने पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धेत गोवा, राजस्थान, गुजरात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यातील विद्यापीठातील ४५मुलांचे संघ सहभागी झाले होते. या निमित्ताने या स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर नावलौकिक मिळविलेल्या खेळाडूंचे कौशल्य पाहण्याची संधी प्रथमच सेलूवासीयांना मिळाली. व स्पर्धेतील खेळाडूंचे नैपुण्य बघण्याचा आनंद सोहळा अनुभवण्यास मिळाला. स्पर्धेची सुरवात ही दि.०२ जाने रोजी सकाळी ठिक. ७.०० वाजता करण्यात आली व स्पर्धेतील प्रथम सत्राचे सामने खेळविण्यात आले व त्यानंतर दुपारी ४.३० स्पर्धेचे उद्‌घाटन, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते दिप आणि क्रीडाज्योत प्रज्वलीत करून तसेच क्रीडाध्वजाचे ध्वजारोहन करून झाले. या प्रसंगी उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. आ. विजयराव भांबळे (जिंतूर-सेलू विधानसभा मतदारसंघ,) व कार्यक्रमाचे उद्‌घाटक मा.डॉ.पंडित विद्यासागर (कुलगुरू, स्वा.रा.ती.म.वि, नांदेड) आयोजन समिती सचिव डॉ. मनोज रेड्डी (क्रीडा संचालक, स्वा.रा.ती.म.वि, नांदेड) कार्यक्रमाचे अतिथी म्हणून श्री. विनोदराव बोराडे (नगराध्यक्ष न.प.सेलू), मा.श्री. प्रभाकर सुरवसे (उपनगराध्यक्ष न.प.सेलू) मा.ॲड. बाळासाहेब जामकर (उपाध्यक्ष, महाराष्ट्र खो-खो संघटना), मा.डॉ. चंद्रजित जाधव (सचिव, महाराष्ट्र खो-खो संघटना), मा.डॉ. प्रदिप देशमुख (उपाध्यक्ष, महाराष्ट्र खो-खो संघटना), मा. प्रा. यु.डी. इंगळे, (श्री. शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त), डॉ.आर.एम.मुलानी (कुलसचिव, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड), डॉ. इंद्रजित जाधव, डॉ.एस.एम.लोया. (अध्यक्ष नू.वि.शि.सं), श्री. डी.के. देशपांडे ( सचिव नू.वि.शि.सं), श्री.व्ही.के. कोठेकर(सहसचिव नू.वि.शि.सं), श्री. जयप्रकाशजी बिहाणी (सहसचिव नू.वि.शि.सं), प्राचार्य, डॉ. शरद कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा. यादव गायकवाड, प्रा. के.के. कदम (क्रीडा संचालक नू.महा.सेलू), प्रा.डॉ. माधव शेजुळ, प्रा. नागेश कान्हेकर, प्रा.डी.डी. सोन्नेकर, प्रा.एल.एच.काळे, प्रा. डी.एच.जामगे, विद्यार्थी संसद प्रतिनिधी कु. रिता मसुरे यांची उपस्थिती होती. स्वागतपर भाषण नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. प्रास्ताविक महाविद्यालयाकडून प्राचार्य शरद कुलकर्णी तर विद्यापीठाच्या वतीने डॉ. मनोज रेड्डी यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. मोहन पाटील, प्रा. अर्चना पत्की, प्रा. गुलाब शेख, यांनी केले तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा.यादव गायकवाड यांनी केले.



संपुर्ण महाराष्ट्रात भीमा कोरेगाव प्रकरणाने तणाव व जाळपोळीच्या घटना होत असताना त्या सर्व घटनांना सेलूत खो मिळाला. आणि सेलू शहरात नियोजनाप्रमाणे मंगळवारी दि.०२ जाने दू. ४.०० वाजता आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेचा शानदार उद्घाटन समारंभ संपन्न झाला.

■ स्पर्धेतील सामन्यांचे नियोजन

खो-खो स्पर्धेतील सामन्याचे नियोजन दोन सत्रात सकाळी ७.०० ते १०.०० व साय. ४.०० ते ८.०० या वेळेत श्रीरामजी भांगडिया क्रीडानगरी मध्ये खेळविण्यात आले. सर्व प्रथम संघामध्ये बाद फेरीतील सामने खेळविण्यात आले व या मधुन ८ संघ साखळी सामन्यासाठी पात्र झाले.या ८ संघामधून नांदेड, मुंबई,कोल्हापूर,पुणे विद्यापीठ, हे ४ संघाचे सामने खेळविण्यात आले व या मधून प्रथम, व्दितीय, तृतीय संघ निवडण्यात आले.

प्रथम क्रमांक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ने पटकावला, व्दितीय क्रमांक मुंबई विद्यापीठ, मुंबई या संघाने पटकावला, तसेच तृतीय व चतुर्थ स्थान अनुक्रमे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी प्राप्त केले.




■ स्पर्धेचा समारोप

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेचा समारोप समारंभ दि. ०५ जाने २०१८ ला सायं. ५.०० आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेलूचे नगराध्यक्ष मा.श्री. विनोदराव बोराडे हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहूणे म्हणून मा.श्री.आमदार बाबाजानी दुर्राणी, जि.प.उपाध्यक्ष सौ. भावनाताई नखाते, सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. राहूल कर्डिले, डॉ. जि.बी.कतलाकुटे, श्री.रवि सरोदे, उपकुलसचिव श्री. महेश त्रिभुवन, क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, माजी आमदार श्री. हरिभाऊ लहाने, श्री. हेमंतराव आडळकर, श्री.मुकेश बोराडे, डॉ. प्रदीप देशमुख, श्री. प्रभाकर सुरवसे, श्री. पवन आडळकर, श्री. मुश्ताक अहेमद, डॉ.चंद्रकांत सातपुते, नूतन विद्यालय शिक्षण संस्था सचिव श्री. डि.के.देशपांडे, सहसचिव डॉ. व्ही.के.कोठेकर, श्री.अजीजखॉन पठाण, राज्यक्रीडा मार्गदर्शन श्री. संजय मुंढे, डॉ. दिपक बच्चेवार, डॉ. यशवंत कल्लेपवार, श्री. नंदकिशोर बाहेती, श्री.यु.डी. इंगळे, श्री. मनीष कदम, श्री. रणजीत गजमल, यांची उपस्थिती होती. प्रमुखपाहूण्यांच्या हस्ते विजेत्या, उपविजेत्या संघास स्पर्धा चषक, पदक व स्मृती चिन्ह देण्यात आले.

## आजी-माजी कर्मचारी मेळावा

■ अशी पाखरे येती अनिक स्मृति ठेवून जाती अशी एक सुंदर कवितेची ओळ आहे. या स्मृति जतन करण्याचे कारण असे की, भूतकाळाच्या खांद्यावर वर्तमानाचे ओझे असते. त्या वर्तमानाच्या डोळ्यात भविष्याची स्वप्नं असतात. म्हणूनच सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आम्हाला आजी - माजी कर्मचारी मेळावा आयोजित करावा वाटला या मेळाव्याचा वृत्तांत असा आहे.

रविवार, २८ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयाच्या मंचावर आयोजित आजी–माजी कर्मचारी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात उद्‌घाटनपर वक्तव्य करतांना प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे माजी पोलीस महासंचालक मा. श्री सुधाकररावजी सुरडकर म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये अशा मोजक्या संस्था आहेत ज्या आजी–माजी कर्मचाऱ्यांना एकत्र आणुन सहविचारासाठी पाचारण करतात. या मेळाव्याच्या निमित्ताने आपण सर्व उच्चशिक्षणाबद्दल पुरेशा गांभीर्याने विचार करीत आहोत याचा मला मनस्वी आनंद वाटतो. या मेळावाचे दुसरे सत्र होते मुक्तचिंतन या स्नेह मेळाव्यास उपस्थित ७१ माजी कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य द.रा. कुलकर्णी, प्राचार्य तथा संस्थेचे सहसचिव, डॉ. व्हि.के. कोठेकर, प्राचार्य डॉ. बालाजी भोसकर, प्रा. विश्वास वसेकर, प्रा. रामदास जायभाये, गौतम सूर्यवंशी, प्राचार्य संग्राम गवळे यांनी आपल्या भावना व्यक्त करतांनाच जुन्या आठवणी जागवल्या. महाविद्यालयाची भौतिक प्रगती पाहून सर्व भारावून गेले. ग्रंथालय, सभागृह, प्रयोग शाळा, कार्यालयं, क्रिडा विभाग, प्रेरणा अंकास मिळालेले पुरस्कार, महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर ही सर्व आपल्या महाविद्यालयाची होत असलेली प्रगती सर्व माजी कर्मचाऱ्यांची मान अभिमानाने उंचावणारी असल्याची भावना प्रत्येकाच्या मुखी होती.

स्नेह मेळाव्याचा समारोप नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव डी.के. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या प्रसंगी सेवानिवृत्त पोलीस महासंचालक सुधारकर सुरडकर, प्राचार्य डॉ. जे. एम. मंत्री प्रमुख पाहुणे होते. प्राचार्य डॉ. जे.एम. मंत्री म्हणाले की, ''प्राध्यापकांनी




विद्यार्थीभिमुख व्हावे. चुकीच्या गोष्टीत न गुंतता महाविद्यालय आणि विद्यार्थी हिताचे उपक्रम राबविण्यात स्वत:ला गुंतवून घ्यावे. आपल्या आरोग्यासाठी योग्य ती दिनचर्या असावी. आपण गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कास धरली तरच विद्यार्थी जीवन विकास चांगल्या रितीने नक्कीच होईल. त्यातून राष्ट्र घडेल'' असेही प्राचार्य डॉ. मंत्री म्हणाले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव डी.के. देशपांडे यांनी केला. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी हे होते. सूत्रसंचालन प्रा. संतोष दंडवते, प्रा. सुभाष बिराजदार यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुवर्ण महोत्सव समितीचे संयोजक उपप्राचार्य यादवराव गायकवाड यांनी केले.

■ **राज्यस्तरीय चर्चासत्र**

**महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील उच्च शिक्षण : एक तौलनिक अभ्यास**

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित नूतन महाविद्यालयाच्या अर्धशतकपूर्ती निमित्त महाविद्यालय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजित करण्याचा आम्ही विचार केला. त्याप्रमाणे दि.१७ फेब्रुवारी २०१८ रोजी ''महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील उच्च शिक्षण : एक तौलनिक

अभ्यास'' या विषयावर हे चर्चासत्र संपन्न झाले. मराठवाड्यातील उच्च शिक्षणासंदर्भात संपूर्ण महाराष्ट्रात गुणात्मक दर्जाच्या दृष्टीने साशंकता व्यक्त केली जाते. गेल्या काही दशकात मराठवाड्यातील शिक्षण व्यवस्था सर्वार्थाने प्रगत झालेली दिसते. परंतु जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात अपुरी वाटते. या निमित्ताने मराठवाडा व महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षण पंडितांना एका विचारमंचावर मंथनासाठी एकत्रित बोलावण्याची इच्छा नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव आयोजन समितीने मांडली. यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद यांनी सहआयोजनासह सर्वतोपरी सहकार्य देऊ केले. त्याची फलश्रृती म्हणजे यशस्वी पार पडलेले हे चर्चासत्र होय. या चर्चासत्रात उद्घाटन, बीजभाषण, मुक्तसंवाद आणि समारोप अशी चार सत्र घेण्यात आली. त्याबाबतचा अहवाल असा –



■ **उद्घाटन सोहळा**

उद्घाटन सोहळयाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ.एस.एम.लोया (अध्यक्ष, नूतन विद्यालय शिक्षण संस्था सेलू) उपस्थित होते. चर्चासत्राचे उद्घाटन मा.डॉ.पंडित विद्यासागर (कुलगुरु, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड) यांच्या हस्ते झाले. प्रथम स्वामी रामानंद तीर्थ व कै.श्रीरामजी भांगडिया यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करुन चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी विचारमंचावर मा.प्राचार्य डॉ.पी.व्ही.जब्दे, औरंगाबाद, प्रा.चंद्रकांत जोशी सनपूरकर, प्राचार्य द.रा.कुलकर्णी डॉ.व्ही.के.कोठेकर, प्राचार्य डॉ.शरद एस.कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा.यादव गायकवाड, संयोजक डॉ.एस.एस.दंडवते, विद्यार्थी प्रतिनिधी कु.रिता मसुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

■ उद्घाटनपर भाषणात कुलगुरु डॉ.विद्यासागर यांनी उच्च शिक्षणासंदर्भात ऐतिहासिक दाखले देत वर्तमान परिस्थितीत उच्च शिक्षणातील गुण दोषांची चर्चा केली. आपल्या वैयक्तिक जीवनातील अनुभवाचा दाखला देत मराठवाड्यातील व पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षण यांमधील शैक्षणिकस्तर बदलाचा त्यांनी मागोवा घेतला.

■ मराठवाड्यातील शिक्षण १९९० पर्यंत सर्वांगीन गुणवत्तेवर आधारित होते. पूर्वी इयत्ता ४ थी व ७ वीला बोर्ड परीक्षा घेतल्या जात होत्या, पण कालौघात त्या कालबाह्य होत गेल्या. खऱ्या अर्थाने प्राथमिक, माध्यमिक शिक्षणावरच उच्च शिक्षण आधारभूत असते. परंतु दुर्देवाने शालेय शिक्षणाला आज गांभिर्याने पाहिले जात नाही. त्याचा सरळ परिणाम उच्च शिक्षणावर होत आहे. याची नोंद घेत पुढे ते म्हणतात. मराठवाड्यातील शिक्षण तिमिरात गडप असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रकाशाची वात पेटविली. एका अर्थाने मराठवाड्यातील शैक्षणिक भूख असणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांसाठी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करुन अंधारात तेजाची पाऊले उमटवली. स्वामी रामानंद तीर्थ यांनी हिप्परग्यासारख्या ग्रामीण क्षेत्रातून मराठवाड्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पाया

रचला. नांदेड येथे पीपल्स महाविद्यालयाची स्थापना करुन ग्रामीण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची कवाडं खुली केली. या महामानवांनी केलेल्या शैक्षणिक क्रांतीमुळे मराठवाडा सुशिक्षित, सुसंस्कृत होऊ लागला, तरुणांना प्रगत विचारांसोबत रोजगारही मिळू लागला.

■ मराठवाड्यात २० व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळू लागले परंतू पश्चिम महाराष्ट्राशी शैक्षणिक तूलना करतांना मराठवाडा अजूनही विकसनशील अवस्थेतच आहे ही खंत कुलगुरुंनी व्यक्त केली. राज्यांतर्गत शैक्षणिक तुलना करताना काही प्रमाणके निश्चित करणे गरजेचे आहे, असे ही आपल्या विस्तृत भाषणात त्यांनी सांगितले.

■ डॉ.विद्यासागर पुढे म्हणाले की, ''उच्च शिक्षणाचा विचार करतांना राज्यांतर्गत तूलना करण्यापेक्षा केवळ प्रादेशिक मर्यादा व असमतोलाचा विचार न करता आपला शैक्षणिकस्तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. तरच आपण जागतिक स्पर्धेत टिकाव धरु शकणार आहोत'', समकालीन शैक्षणिक परिस्थितीवर असे भाष्य, त्यांनी उद्घाटनपर भाषणात केले.

■ नूतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद एस.कुलकर्णी यांनी आपल्या स्वागतपर मनोगतात या चर्चासत्राच्या आयोजनासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. सहआयोजक सर्व पदाधिकारी सन्मित्रांचे सर्वतोपरी सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

■ कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.यादव गायकवाड यांनी केले. सुवर्ण महोत्सव समितीचे समन्वयक या नात्याने त्यांनी गतपन्नास वर्षांतील नूतन महाविद्यालयाचे मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या चळवळीतील योगदानासंदर्भात विचार मांडले.

■ अध्यक्षीय समारोपात डॉ.एस.एम.लोया यांनी चर्चासत्राच्या विषयाचे गांभिर्य व सद्यस्थितीतील महत्व विशद केले.

■ कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.राजाराम झोडगे यांनी तर आभार डॉ.संतोष दंडवते यांनी मानले.

■ **सत्र दूसरे - बीजभाषण**

■ प्रस्तूत चर्चासत्राचे बीजभाषक म्हणून प्राचार्य डॉ.पी.व्ही.जब्दे हे उपस्थित होते. बीजभाषणात त्यांनी भारतीय उच्च शिक्षणाचा आढावा घेत, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय उच्च शिक्षणाची दूरवस्था त्यांनी पटवून दिली.

■ प्राचीन भारतातील उच्च शिक्षण अग्रगण्य मानले जाई, नालंदा तक्षशिला इ. प्राचीन भारतीय विद्यापीठांचा संदर्भ देत तत्कालीन उच्च शिक्षणाचा चढता आलेख त्यांनी संशोधकांपूढे ठेवला.

■ परंतु कालांतराने युरोप व अमेरिका खंडातील देशांची प्रगती, त्यांची शिक्षणाप्रती असलेली सर्वतोपरी आस्था, विज्ञानवादाला दिलेले महत्व या आणि अनेक कारणांनी तेथील उच्च शिक्षणाचा दर्जा कसा उंचावत गेला या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

■ त्याच दरम्यान तत्कालीन भारतीय सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जीवन कसे गढुळ बनत गेले, त्याचे भारतीय शिक्षण प्रणालीवर झालेले दूरगामी परिणाम या विषयीचा परामर्श घेतला.

■ वर्तमान परिस्थितीत भारतीय उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी अनेक समस्यांना धाडसाने सामोरे जात शिक्षण घेत आहे. जर शिक्षक व प्रशासन यांनी विद्यार्थी केंद्रीत शिक्षणाची गांभीर्याने जबाबदारी स्वीकारली तर शैक्षणिक दर्जा निश्चितच वधारण्यास मदत होईल. असे त्यांनी यावेळी सांगितले.

■ मूल्य व कौशल्याधिष्ठित शिक्षणाची आज गरज

असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

■ एकूणच आपल्या बीजभाषणात डॉ.जब्दे यांनी भारतीय उच्च शिक्षणासंदर्भात सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

■ बीजभाषण सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ.व्ही.के.कोठेकर यांनी केला सूत्रसंचलन डॉ.एस.एस.शिंदे यांनी तर आभार डॉ.संतोष दंडवते यांनी मानले.

**संत्र तिसरे – मुक्तचिंतन**

प्राचार्य डॉ.व्ही.के.कोठेकर यांच्या अध्यक्षतेखाली मुक्त संवाद व चर्चा झाली. त्यात प्रा.महाजन व प्रा.बोरा यांनी आपले विचार पीपीटीच्या माध्यमातून सादर केले. त्याचे काही संदर्भ व उद्घाटन आणि बीजभाषण सत्रातील भाषणाच्या अनुषंगाने सभागृहात विस्तृत चर्चा झाली.



**सत्र चौथे – समारोप**

■ समारोप सत्राचे अध्यक्षपद डॉ.व्ही.के.कोठेकर यांनी भूषवले,

■ प्रमुख अतिथी डॉ.शिरीष खेडगीकर यांनी उच्च शिक्षणासंदर्भात संशोधकांना मार्गदर्शन केले. मराठवाड्यातील उच्च शिक्षण मूल्यवर्धक होण्यासाठी आपण गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे असे ते पुढे बोलताना म्हणाले.

■ डॉ.कोठेकर यांनी चर्चासत्राच्या विचारसूत्राची चर्चा केली. या चर्चासत्रात चिंतन केलली विचारसूत्रे अतिशय महत्वाची आहेत. वर्तमान परिस्थितीत भारतीय शिक्षणासमोर असंख्य आव्हाने आहेत. परंतु तरुण संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी जर व्यापक दृष्टिकोण ठेवत प्रामाणिकपणे संशोधन करत राहिले, तर जागतिक स्तरावर भारतीय शिक्षणाचे संदर्भ दिले जातील असा विश्वास त्यांनी संशोधकासमोर व्यक्त केला.

■ मराठवाडयातील उच्चशिक्षणाचा स्तर उंचीवर नेण्यासाठी या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. नू.वि.शि.संस्था,सेलू ही गेल्या पंचाहत्तर वर्षांपासून मराठवाड्यातील शैक्षणिक प्रगतीत हातभार लावत आहे. येणाऱ्या भविष्यातही पारंपारिक शिक्षणासोबत नाविण्यपूर्ण शिक्षणासाठीसुध्दा प्रयत्नशिल असणार आहे. जेणे करुन सेलू परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना नवशिक्षणाचे नवे आयाम अनूभवता यावे ही या मागची धारणा असेल, असे ते पुढे बोलताना म्हणाले.

■ पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा हा उच्च शिक्षणाच्या बाबतीत आजही खुजा वाटतो. याचे कारण येथील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सूविधांचा अभाव आहे, परंतु अंगभूत कला–गुण–कौशल्याचा विचार केला तर मराठवाडयातील विद्यार्थी देशपातळीवरील स्पर्धेतही मजबूतीने आव्हान देऊ शकतील. त्यांना गरज फक्त योग्य दिशादर्शनाची आहे. ती फक्त आपण शिक्षकच देऊ शकतो. या अर्थाने आपल्या सर्वांवर मराठवाड्याच्या त्याच बरोबर देशाच्या विकासाच्या उद्देशाने खूप मोठी जबाबदारी आहे. ती आपण निश्चितच स्वीकाराल असा विश्वास त्यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी व्यक्त केला.

■ या सत्रांचे सूत्रसंचालन प्रा.अर्चना पत्की यांनी तर आभार प्रा. यादव गायकवाड यांनी मानले.

एकूणच या एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रात मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील

उच्चशिक्षणा सदंर्भात विस्तृतचर्चा झाली. आयोजकांनी निश्चित केलेल्या विचारसूत्रांना न्याय देणारे विचार मांडले गेले. मराठवाड्यातील उच्च शिक्षणासंदर्भातील समस्यांचा उहापोह घेत भविष्यात सर्व उणिवांना बाजूला सारेल असे सकारात्मक निष्कर्ष या चर्चासत्राच्या माध्यमातून मांडले गेले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रातील बहुसंख्य महाविद्यालयातील प्रतिनिधी, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

■ **वाचन संस्कृतीवर व्याख्यान :**

वाचाल तर वाचाल या नव्या लौकोक्तीचा अन्वयार्थ असा की, डोळसपणे केलेल्या वाचनामुळे व्यक्तीच्या विचार चिंतन व सर्जनाला एक नवे परिमाण मिळत असते. दहा गुण सोन्याचे असतील पण सोनाराचा, कारागीराचा एक हस्तस्पर्श व त्यातून येणारी कलात्मक सर्जनता यामुळे तयार होणारा सोन्याचा दागिना एक आभूषण म्हणून मिरवला जातो. तसेच ग्रंथातील अक्षर धनाला वाचकाचा स्पर्श झाला की, वाचकाचे संवेदनशील मन विचार कृतीप्रवण होते. ही कृतीप्रवणता, प्रवाही गतीमान ठेवण्यासाठी वाचन संस्कृतीचा विकास महत्त्वाचा आहे. शरीराची भूक भागवणारी श्रम संस्कृती व मन बुद्धीची गरज भागवणारी वाचन संस्कृती खरे तर मानवी सभ्यता व संस्कृतीचा मूलाधार आहे. म्हणूनच आम्ही सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने दि. २७ मार्च २०१८ रोजी वाचन संस्कृतीवर मा. लक्ष्मीकांत देशमुख यांचे व्याख्यान आयोजित केले. या वेळी लक्ष्मीकांत देशमुख यांना दिलेल्या व्याख्यानाचा वृतांत.

देश मोठा होण्यासाठी वाचन संस्कृती विकसीत होणे आवश्यक असल्याचे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले. ते नूतन महाविद्यालय येथील सभागृहात आयोजित वाचक संवाद या कार्यक्रमात बोलत होते.

मंगळवार २७ फेब्रुवारी रोजी आयोजित या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस.एम. लोया, प्रमुख पाहुणे म्हणून डि.के. देशपांडे, प्राचार्य डॉ. व्ही. के. कोठेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले कि, 'समाज निर्मितीसाठी ग्रंथालय आणि ग्रंथ वाचने आवश्यक आहे.' योगेश ढवारे प्रास्ताविक, सुरेश हिवाळे सूत्रसंचालन तर डॉ. मोहन काटकर यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, चंद्रशेखर नावाडे, सर्जेराव लहाने, महादेव आगजाळ यांनी परिश्रम घेतले.

■ **व्याख्यानमाला :** कै.के. एम. देशमुख स्मृति व्याख्यान मालेचे आयोजन सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्याचा संकल्प संयोजन समितीने केला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या सहकार्याने कै. के. एम. देशमुख स्मृतिव्याख्यानमालेत सोमवार दि. २६ मार्च, २०१८ रोजी प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे, 'दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर व्याख्यान झाले. या व्याख्यानमालेत बोलताना ते म्हणाले.

''देशाच्या सर्व मूलभूत प्रश्नांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चिंतन करून शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले तरच देशातील प्रश्न सुटतील हे केवळ त्यांनी विचारच माडंले नाही तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांच्या हितासाठी आयुष्यभर लढले'', असे मत प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जात, धर्म, भाषा यांच्या पलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टीने देशातील सर्व कामगार,स्त्रिया, सर्वसामान्य माणूस

आणि शेतकरी यांच्या न्याय, हक्कासाठी संघर्ष केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतकऱ्यांचे खरे नेते होते. त्यांनी शेतकऱ्यांचा मुलगा पंतप्रधान झाला पाहिजे ही भूमिका ठामपणे मांडली. धरणांना पर्यटन स्थळांचा दर्जा प्राप्त व्हावा. भविष्याच्या दृष्टीने पाणी, विजेचे महत्त्व लक्षात घेऊन योग्य वापर झाला पाहिजे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारही डॉ. लुलेकरांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया होते. तसेच सहसचिव डॉ. व्ही.के. कोठेकर आणि तहसीलदार स्वरुप कंकाळ यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक उपप्राचार्य यादवराव गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. उत्तम राठोड यांनी केले तर आभार प्रा. महेंद्र शिंदे यांनी मानले.







**माजी विद्यार्थी मेळावा : द ग्रेट स्नेहभेट**

**माणसाच्या जीवन-मृत्यूचंच नव्हे तर चराचराच्या अस्तित्त्वाचा आधार म्हणजे माती...**
**भूतकाळाला इतिहास करणारी आणि इतिहासाला ऐतिहासिक रुप देणारी...माती**
**भारतीय संस्कृतीत ईश्वराप्रमाणे पूजली जाणारी....माती...**

मातीच अस्तित्त्वच मुळात व्यापक आहे. त्यातल्या त्यात सेलू नगरीची माती ही अनेकांगाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. पूर्वारुपीची शाळूवाडी आज सेलू झाली तरीही या मातीचा गंध नेहमी प्रेरक राहिला आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम चळवळ, सांस्कृतिक चळवळ व शैक्षणिक चळवळ हे या मातीच्या प्रेरकतेचे द्योतक आहे.

'ज्ञानाचेनि पाडें पवित्र न दिसे' या बोधवाक्यास सर्वोच्च ध्येय मानून पाड्या-पाड्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला समाजजीवनामध्ये उत्तुंग स्थान मिळवून देण्यासाठी आणि जीवनामध्ये निरंतर नाविन्य निर्माण होण्याच्या दृष्टीने शिक्षणाच्या माध्यमातून शैक्षणिक चळवळ निर्माण करणारे ज्ञान मंदिर म्हणजे नूतन महाविद्यालय.....

कै. भांगडियाजी यांच्या प्रेरणेतून सन १९६८ साली मूर्तरुपास आलेले हे महाविद्यालयाने सन २०१८ साली अर्धशतक पूर्ण केले. आज इतिहासात डोकावून पाहतांना अनेक ऋषितुल्य व्यक्तीमत्त्वांनी महाविद्यालयाला, सेलूसारख्या ग्रामीण परिसरात शैक्षणिक पंढरीचे स्थान मिळवून दिले आहे. पहिले प्राचार्य द.रा.कुलकर्णी, श्री. आर.एम. खरवडकर, श्री. डॉ. बी.टी.भोसकर, डॉ.व्ही.के.कोठेकर आणि डॉ.शरद कुलकर्णी यांच्या दिशादर्शनाने हे महाविद्यालय आजही यशस्वी वाटचाल करीत आहे. या महाविद्यालयाने ज्याप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपली त्याप्रमाणे या महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबतही एक वैशिष्ट्यपूर्ण नाते जपले आहे. याच ऋणानुबंधातून महाविद्यालयाने अर्धशतकपूर्तीच्या

निमित्ताने गत पन्नास वर्षातील विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा दि. ०१ जुलै २०१८ रोजी 'द ग्रेट भेट' या स्वरुपात आयोजित केला. या भेटीच्या आयोजनासाठी सुवर्ण महोत्सव समितीने सर्व माजी विद्यार्थ्यांशी संपर्क करुन निमंत्रित केले.

'फिरुनी पाखरे पुन्हा येती घरा' या उक्तीस सार्थ ठरवत नूतन महाविद्यालयाच्या आसमंतात जुन्या आठवणींना गाठीशी घेऊन सर्व विद्यार्थी रुपी पाखरे एकत्रित आली. आयोजन समितीने या मेळाव्यास तीन सत्रात विभाजित केले होते. पहिल्या सत्रात उद्घाटन व विद्यार्थ्यांची मनोगते तर दुसरे सत्र परिसंवादाचे होते. तिसऱ्या सत्रात १९६८ पासूनच्या सर्व गुणवंत तसेच विविध क्षेत्रात यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

या स्नेहमेळाव्याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या जडणघडणीत महाविद्यालयाचा वाटा किती अमुल्य आहे हे आपल्या अभिप्रायांच्या माध्यमातून सांगितले आहे. त्यांचा भावांश पुढीलप्रमाणे




■ **गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे नूतन महाविद्यालय**

२१ वे शतक हे खा.उ.जा. संस्कृतीचे शतक आहे. संपूर्ण विश्व हे या संस्कृतीने व्यापलेले दिसून येते. यातून भारतदेशही सुटलेला दिसून येत नाही. या संस्कृतीमुळे विश्वामध्ये अनेक बदल घडून आले. तसेच भारतमध्येही काही क्षेत्रात हे बदल घडून आले. परंतु शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात बाजारीकरण वाढल्यामुळे शिक्षणसंस्थांच्या इमारतीचे डोलारे उभे राहिले परंतु गुणवत्ता मात्र जमीनदोस्त झाली. परंतु नूतन महाविद्यालय हे ग्रामीण भागातील महाविद्यालय असूनही या महाविद्यालयाने आपली गुणवत्तेची परंपरा कायम राखत अनेक शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये ज्ञानाचा प्रकाश निर्माण केला. अशा गुणवत्तेला चालना देणाऱ्या महाविद्यालयाचे आम्ही विद्यार्थी आहोत याचा सार्थ अभिमान आम्हास आहे अशी भावना करवा शामसुंदर मदनलाल, लिंबेकर अशोक, रोडगे अशोक गोपीनाथ, मसुरे षडानन रामदास, लोंढे आबासाहेब गमाजी इत्यादी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

■ **सामाजिक शिष्टाचार रुजवणारे केंद्र म्हणजे नूतन महाविद्यालय, सेलू.-**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात वावरत असतांना काही शिष्ट असे आचार असतात. एका विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत त्याची शिकवण प्रथमत: कौटुंबिक पातळीवर होते. त्यानंतर प्रत्येक नागरिकाचे समाजजीवन समाजामध्ये व्यवस्थितरीत्या पार पडण्यासाठी नीतिमूल्यांची आवश्यकता असते. ही नीतिमूल्ये गुरुजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यास प्राप्त होत असतात. अशाप्रकारची नीतिमूल्ये विद्यार्थ्यांच्या मनपटलावर बिंवबणारे नूतन महाविद्यालय हे एक संस्कार केंद्र आहे. या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणासोबतच अनौपचारिक शिक्षणसुद्धा दिले आहे. अशी भावना लहाने सुनील भुजंगराव, शिंदे सुधाकर गंगाधरराव, राजूरकर वैशाली मधुकरराव, झंवर वर्षा प्रसाद, देशपांडे रोहिणी शशीकुमार, काटे अनुजा प्रमोदराव इत्यादी माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

■ **जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे**

**महाविद्यालय**

एखादा दगडाचा तुकडा कास्तकाराच्या हातामध्ये पडला तर तो बांधावर टाकतो. तोच कडा शिल्पकाराच्या हातात पडल्यानंतर मंदिराचे रुप धारण करतो. आणि तोच तुकडा मूर्तिकाराच्या हातात पडल्यानंतर ईश्वराचे रुप धारण करतो. दगडाचा एकच तुकडा एकच परंतु व्यक्ती स्पर्शाने त्याचे स्वरुप वेगळे बनत जाते. मनुष्याचेही तसेच असते. मानवाला समाजामध्ये जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण हे केवळ शिक्षणकेंद्रातून मिळते. अशा स्वरुपाचे शिक्षण प्रदान करुन देशाचा उत्कृष्ट नागरिक बनविण्याचे कार्य नूतन महाविद्यालय अविरतपणे करीत आहे असा अभिप्राय निकम अनुप रामराव, बुधवंत ज्ञानेश्वर आसाराम, दिवाकर उपेंद्र रामराव, पठाण आझम खाँ, आंधळे भाऊसाहेब अच्युतराव, काला विशाल सुभाषचंद्र, कीदवई नाजीम अतहर, डॉ.गिरी पुरुषोत्तम आबाबुवा, भागवत धनंजय उत्तमराव इत्यादी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

■ **राष्ट्रविकासाच्या मोहिमेत महाविद्यालयाचे योगदान**

भारत हा विकसनशील देश आहे. विकसनशीलतेकडून विकसित देशामध्ये पोंहचायचे असेल तर देशात तरुण असणे आवश्यक आहेत. आणि भारत हा जगातील सर्वात अधिक युवा असणारा देश आहे. प्रत्येक देशाचा विकास हा तेथील शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून असतो. शैक्षणिक प्रगती साध्य करावयाची असल्यास तरुणांना योग्य प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक असते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य मिळवून देण्याचे काम शिक्षण संस्थांचे असते. या राष्ट्रप्रगतीच्या चळवळीत नूतन महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असते. नूतन महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये योगदान देऊन राष्ट्रप्रगतीस हातभार लावला आहे अशी भावना व्यवहारे रामानंद बाबाराव, टाक सुनील कल्याणराव, लोंढे आबासाहेब गमाजी, रोडगे अशोक गोपीनाथ इत्यादी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

■ **सर्वांगिण विकासाचे केंद्र नूतन महाविद्यालय**

वर्तमान शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट पाहता ती केवळ परीक्षा केंद्रीत आहे की काय हा प्रश्न पडतो. या पद्धतीच्या परिणामी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत नसल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थ्यांची रचनात्मक शैली, लेखनशैली, विचारशैली, वक्तृत्वशैली इत्यादी लोप पावत असल्याचे चित्र निर्माण झालेले दिसते. परंतु नूतन महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी व्यासपीठ निर्माण केले. परिणामी येथील विद्यार्थी आपल्या प्रतिभेच्या बळावर समाजामध्ये आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. असे प्रतिपादन करभाजने मंजुषा श्रीकांत, राठोड अर्जुन रुपचंद्र, जाधव अनुसया आबासाहेब, कोकाटे शिल्पा बंकट इत्यादी विद्यार्थ्यांनी केले.

■ **समृद्ध ग्रंथालयाचे घर नूतन महाविद्यालय**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आजचे युग हे पेपरलेस युग म्हणून ओळखल्या जाते. महाजालाच्या माध्यमातून आज आपल्याला सर्व गोष्टी एका क्लिकवर घरबसल्या मिळत आहेत. शिक्षणक्षेत्रात ई–लर्निंगच्या माध्यमातून मोठी क्रांती झालेली आहे. तरी या तंत्रज्ञानामुळे आज वाचक आणि वाचन संस्कृती लोप पावताना दिसून येत आहे. परंतु नूतनच्या ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांमुळे त्याची समृद्धता टिकून आहे. दिवसेंदिवस त्यात वाढ होताना दिसत आहे. नूतन महाविद्यालयातील ग्रंथालयाने तंत्रज्ञानाची कास धरत उत्कृष्ट वाचक पुरस्कार इत्यादी विविध

उपक्रमांच्या माध्यमातून समाजमनाला आणि विद्यार्थ्यांना पुस्तकांशी जोडलेले आहे अशी भावना काळे संगिता ज्ञानोबा, कुंभार रामराव आप्पाराव, कलाल लक्ष्मण बापूराव, गौतम सखाराम सूर्यवंशी इत्यादी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

■ **उत्कृष्ट प्रशासनाची उज्ज्वल परंपरा**

आदर्श महाविद्यालय घडण्यासाठी उत्कृष्ट प्रशासनाची आवश्यकता असते. नूतन महाविद्यालय या बाबीसाठी भाग्यशाली आहे की, येथे उत्कृष्ट प्रशासनाची परंपरा चालत आली आहे. परिणामी येथे गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त यांच्या माध्यमातून सुसंस्कृत विद्यार्थी घडले व घडत आहेत अशी भावना डॉ. सुनंदा गोपीनाथराव रोडगे यांनी व्यक्त केली.

शिक्षणव्यवस्थेचा खरा समीक्षक म्हणजे विद्यार्थी. हा विद्यार्थी समीक्षेच्या चष्म्यातून महाविद्यालयाची योग्यता व अयोग्यता ठरवीत असतो. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने दिलेल्या अभिप्रायातून गत पन्नास वर्षाचे पारदर्शक मूल्यमापन नूतनच्या भावी वाटचालीसाठी अमूल्य व मार्गदर्शक ठरणार आहे.

# विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान व राबविलेले उपक्रम

■ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ९ वी पंचवार्षिक योजनेमध्ये खालीलप्रमाणे अनुदान मंजूर झाले व त्यावर महाविद्यालयाने केलेला खर्च

**१९९७-२००२**

| तपशिल | मंजूर | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| पुस्तके व नियतकालिक | २ लाख | २,००८८४.५५ |
| Equipments | ३.१०लाख | ३,३२९९८.०० |
| उपयोजन वर्ग | २०,००० | १९,४२७.०० |
| शिक्षकांचे चर्चासत्र/ परिसंवाद सहभाग | २०,००० | २०,६४५.०० |
| अनिवासी विद्यार्थी केंद्र | ४,५०,००० | ७,२५,२९६.०० |

**अनिवासी केंद्र**

■ नूतन महाविद्यालयात जवळ जवळ ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सकाळी १० ते ०५ या वेळेत विद्यार्थी महाविद्यालयात असतात. संस्थेचे विद्यार्थ्यांसाठी दोन वसतिगृह आहेत, जवळ जवळ ४०० पेक्षा जास्त विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत व वाहनाद्वारा महाविद्यालयात येतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयात वेळेत थांबण्यासाठी योग्य जागा असावी असे आम्हास वाटते. रिकाम्या तासात, सुट्टीच्या वेळेत विद्यार्थी अनिवासी केंद्रात बसू शकतात. खेड्यातून येणारे विद्यार्थी जेवणाचा डब्बा घेऊन येतात. ते खाण्याची सोय पण तिथे केली आहे. तसेच बॅडमिंटन, कॅरम व बुध्दीबळ इत्यादी सारखे खेळ सुध्दा विद्यार्थ्यांना केंद्रात खेळता येतात.

विद्यार्थ्यांना फर्निचर उपलब्ध करुन दिल्या जाईल. त्यामुळे विद्यार्थी त्याठिकाणी गृहपाठ, टिटोरीयलपण पूर्ण करु शकतील.

थोडक्यात गुणवत्तापुर्ण शिक्षण देणाऱ्या आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र अनिवासी विद्यार्थी केंद्र आहे.

या काळात मिळालेले विविध अनुदान

■ विद्यापीठ अनुदान आयोग १० वी पंचवार्षिक योजना **२००२-२००७**

| तपशिल | मंजूर | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| पुस्तके व नियतकालिक | १,३८,७२०.०० | १,३०,३३०.०० |
| Equipments | १.७३,४००.०० | १,६८,०५४.०० |

| | | |
|---|---|---|
| उपयोजन वर्ग | ६,९३९.०० | ४४५३.०० |
| शिक्षकांचे चर्चासत्र/परिसंवाद, | ६,९३९.०० | ४६७४.०० |
| परिषदेतील सहभाग विस्तार कार्य परीक्षा सुधार | ६९,३६०.०० | ३६,८६२.०० |
| शिक्षणातील नाविन्यपूर्ण उपक्रम | ३४,१८७.०० | |
| बांधकाम शिक्षक वसतिगृह | २,०८,०८०.०० | ४,४३,७०३.०० |
| परिसर विकास | २,४२,७६०.०० | ३,२५,०५७.०० |

**सामाजिक व आर्थिक पाहणी २००२-२००७ विस्तार कार्ये**

भारत हा खेड्यांचा देश असुन ७३% जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते. नऊ पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचे राहणीमान व जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न झाला. दहाव्या पंचवार्षिक योजनेतून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक सहकार्याने नूतन महाविद्यालयातील प्रा.पी.आर.रावते, प्रा.डॉ.यू.एस.पानपट्टे यांनी सेलू तालूक्यातील प्रातिनिधीक पाच गावांची सामाजिक व आर्थिक पाहणी केली. हा अहवाल दि.२८ फेब्रुवारी २००७ रोजी प्रकाशित केला.

संशोधक प्राध्यापकांच्या चमूने सेलू तालुक्यातील १) आहेर बोरगाव, २) खादगाव, ३) धनेगाव, ४) साळेगाव, ५) सोन्ना या गावांची निवड करुन ग्रामीण भागातील उपलब्ध अभ्यास साधनांचा अभ्यास करुन ग्रामीण भागातील विकास योजनांची परिणामकारकता तपासणे व ग्रामीण जनतेच्या जीवनमानाचा व आर्थिक आणि सामाजिक स्तरांचा अभ्यास करणे हे उद्देश समोर ठेऊन पुढील प्रमाणे निष्कर्ष काढली.

१. पीकरचनेत बदल झाल्यामुळे अन्नधान्याचा वाटा कमी होवून तेलबियांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले. नगदी पीकांत अल्प वाढ दर्शविली तर उत्पादकतेपेक्षा निश्चित किंमत धोरणाला शेतकऱ्यांचा अधिक प्रतिसाद दिसून आला.

२. जलसिंचनाचे अत्यल्प म्हणजे ५.३७ प्रमाण आहे.

३. शेतमजूरांचा प्रश्न मोठा असल्यामुळे शहराकडे मजूर स्थलांतरीत होताना दिसून येतात.

शेती जोडव्यवसायाचा अभाव दिसल्यामुळे खरेदीशक्तीचा अभाव दिसून येतो.

रासायनिक खतांचा वापर, कर्जपुरवठयांच्या सोईचा अभाव, बचतीचे अत्यल्प प्रमाण, विक्री व प्रक्रिया उद्योगाचा अभाव.

माहितीचा अभाव, विकास योजनांत लोकांच्या सहभागाचा अभाव इत्यादी निष्कर्ष मांडून खालील शिफारशी संशोधकांनी केल्या आहेत.

मराठवाडा कृषी विद्यापीठाने स्थानिक परिस्थितीतील अनुरुप बी, बीयाणांचा पुरवठा केलेला नाही. इत्यादी निष्कर्ष मांडून खालील शिफारशी संशोधकांनी केल्या आहेत.

मराठवाडा कृषी विद्यापीठाने स्थानिक परिस्थितीतील अनुरुप बी, बीयाणांचा पुरवठा करणे, पतपुरवठयात वाढ करणे, सिंचन क्षमतेत वाढ करणे, प्रक्रिया उद्योगांना चालना देणे, बचतीची सवय लावणे, पीक तारणावर कर्ज देणे, ग्रामीण भागात आधारभूत संरचनेत वाढ घडविणे, शासकीय योजनेत लोकसहभाग वाढवणे इत्यादी शिफारशी संशोधकाने या पाच गावांच्या सामाजिक व आर्थिक पाहणी अभ्यासात केल्या आहेत.

**२००२-०७ बांधकाम**

**शिक्षक वसतिगृह :-**

विद्यापीठाच्या परीक्षा, परीक्षा अथवा अन्य कामासाठी अन्य महाविद्यालयातून प्राध्यापक महाविद्यालयात येतात. त्यांना लॉज मध्ये थांबावे लागते. परिसरात त्यांना राहण्याची सुविधा निर्माण करण्याचे ठरले. व त्यातून शिक्षक वसतिगृह उभारण्यात आले.

**परिसर विकास :-**

महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील फरशी पूर्णपणे दबलेली होती. चालताना त्रास होत होता. त्यामुळे परिसरातील फरशी पुन्हा नव्याने बसवण्यात आली.

**शिक्षणातील नाविन्यपूर्ण उपक्रम :-**

शिक्षणातील नाविन्यपुर्ण उपक्रमामध्ये गांडूळ खत तयार करण्याचा कार्यक्रम वनस्पतीशास्त्र विभागाकडून घेण्यात आला. गांडूळ खत तयार करताना परिसरातील पाला पाचोळा व कचरा वगैरेचा वापर करुन त्यातून निर्मित झालेले खत झाडांना देण्यात आले.

**परीक्षा सुधार :-**

**परीक्षा सुधार कार्यक्रम**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ८व्या योजनेत परीक्षा सुधार कार्यक्रम घेण्यात आला. परीक्षा,काल, आज, उद्या याबाबत विचार करतांना शिक्षकाच्या भूमिकेचा विचार यामध्ये करण्यात आला. परीक्षेमध्ये विद्यापीठाची भूमिका, शैक्षणिक संस्थाची भूमिका, तज्ज्ञांची भूमिका, संबंधित विषय शिक्षकाची मते, व परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना काय वाटते या बाबतीत चिकित्सक विश्लेषण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमांतर्गत खालील मुद्दांना पुढे ठेऊन तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

१) वार्षिक परीक्षा व तिची उपयोगिता.
२) परीक्षेचे प्रशासन व त्यांची कार्यपध्दती.
३) परीक्षातील प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रक्रिया.
४) परीक्षेतील गैरप्रकार.
५) परीक्षेची मूल्यमापन पध्दती.
६) परीक्षेचे नियम.
७) या पार्श्वभुमीवर परीक्षा पध्दतीत सुधारणा.

या संदर्भात पहिले व्याख्यान शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्रा.डॉ.डी.पी.जोशी यांचे ०७/०३/१९८५ला आयोजित केले. त्यांनी प्रश्नपत्रिका तयार करण्यातल्या अनेक गंभीर बाबी निर्देशनास आणल्या व परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका फुटण्याच्या बाबतीतील गांभीर्य निदर्शनास आणून दिले. परिक्षेतील अनेक मुद्दयांवर त्यांनी प्रकाश टाकला. परीक्षेचे कामकाज करणाऱ्यांना योग्य मानधन दिले पाहिजे असे त्यांनी मत मांडले.

दुसरे व्याख्यान महिला महाविद्यालय, परभणीचे प्राचार्य डॉ.अविनाश सरनाईक यांचे दि.११/०३/२००५ ला आयोजित करण्यात आले. परीक्षेच्या संदर्भात सर्व घटकांचे उद्‌बोधन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अभ्यासक्रम तयार करणे, शिकविणे व परीक्षा पध्दतीत सुसंवाद असणे गरजेचे असल्याचे व याबाबत आपण गंभीर नसल्याचे ते म्हणाले.

तिसरे व्याख्यान दि.२१/०३/२००५ ला डॉ.गोविंद गोपछडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे, नांदेड विभागाचे संचालक यांचे आयोजित केले होते. मूल्यहिन शिक्षक परीक्षेचे गांभीर्य कमी करत आहेत असे ते म्हणाले. परिक्षेत होणारे गैरप्रकार शक्ती व पैसा या दोन घटकामुळे होत आहेत. राजकीय शक्तीपासून दुर राहिल्यास परीक्षा

सुरळीत होतील असे त्यांनी प्रतिपादन केले.

**कार्यशाळा**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या वतीने पुरस्कृत नूतन महाविद्यालयाच्या सभागृहात ही एक दिवसीय कार्यशाळा दि.८ मार्च २००६ आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचा प्रारंभ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वामी रामानंद तीर्थ व दलितमित्र कै.श्रीरामजी भांगडीया यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून मेजर चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन झाला. प्रा.साळेगावकर यांनी स्वागतगीत गायल्यानंतर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे संस्थाध्यक्ष डॉ.लोया व प्राचार्य डॉ.व्ही.के.कोठेकर यांनी स्वागत केले व संस्था आणि महाविद्यालयाच्या गुणवत्ता व लौकिकाचा विकासात्मक आलेख आला प्रास्ताविकात सांगून पाहुण्यांचा परिचय दिला.

**या कार्यक्रमाचा तिसरा भाग परीक्षेच्या संदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद करणे हा होता.** दि.१६ मार्च २००७ ला परभणी जिल्ह्या महाविद्यालयाच्या निवडक विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले. या विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन अहिल्याबाई होळकर महाविद्यालय, राणी सावरगावचे **प्राचार्य डॉ.शिवाजी दळणर** यांनी केले.

मुलांनी परीक्षेत कॉपी केली की आमचा सात्विक संताप अनावर होतो. पण आम्ही शांतपणे विचार करत नाही, असा शांतपणे विचार करताना मनात एक प्रश्न निर्माण होतो की, मुलांना परीक्षेत कॉपी का करावी वाटते ? असा प्रश्न उपस्थित करुन प्राचार्य डॉ.शिवाजी दळणर म्हणाले की, 'आमच्या समाजातील शैक्षणिक प्रयोजनाचा गोंधळ व परीक्षा पध्दतीतील दोषाचा हा परिणाम म्हणावा लागेल.' नूतन महाविद्यालयाच्या वतीने आयोजित व विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत परीक्षा सुधार संवाद चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केले तर चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिकेबाबत विस्तृत निवेदन प्रा.यादव गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.उत्तम राठोड यांनी केले आणि आभार प्रा.विनायक टेंगसे यांनी मानले.

**मूल्यांकनातून परीक्षेची विश्वासार्हता -प्रा.इंगळे**

परीक्षा म्हटली की, मूल्यांकन प्रक्रिया अतिशय महत्त्वाची असते. मूल्यांकन प्रक्रियेतून परीक्षेची विश्वासार्हता दिसून येते. याचा प्रथम विचार करुनच परीक्षा सुधारणाच्या संदर्भात चिंतन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.उत्तम इंगळे यांनी केले. परीक्षा सुधार संवाद चर्चासत्रातील दुसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.अरुण तंवर होते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी परीक्षेच्या काळातील मानसिक ताणतणाव हे सूत्र समोर ठेवून त्यांनी विवेचन केले. या सत्राचे संचालन प्रा.एच.के.बायस यांनी केले तर आभार प्रा.एस.ए.बागुल यांनी मानले.

**परीक्षांच्या वेळापत्रकाचा पुनर्विचार व्हावा - डॉ.पचलिंग**

हल्लीच्या विद्यापीठाच्या परीक्षेतील गैरप्रकार वगैरेबाबत आम्ही फार चर्चा व चिंता करतो. या चिंतेत वाढ करणारी बाब म्हणजे आमचे शैक्षणिक वेळापत्रक, नियोजन व एकूण वार्षिक व पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक आहे. आता खरी गरज आहे ती या परीक्षाच्या वेळपत्रकांचाच पुनर्विचार करण्याची,

असे प्रतिपादन प्रा.डॉ.एस.पी.पचलिंग यांनी केले. ते नूतन महाविद्यालयात आयोजित परीक्षा सुधार संवाद चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. परीक्षा पध्दतीतील व्यवस्थापन आणि मूल्यांकनाच्या संदर्भात त्यांनी विस्तृत व सूक्ष्म स्तरावरील स्वानुभावाचे कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य द.रा.कुलकर्णी होते. विशेष मार्गदर्शक म्हणून उपस्थित डॉ.वि.ख.कोठेकर यांनी प्रथम लॉर्ड मेकॉले यांची प्रशंसा केली. कारण आम्ही स्वातंत्र्योत्तर काळात आमचे म्हणून शैक्षणिक धोरण, पध्दती विकसित करु शकलो नाही म्हणून आजही आम्हाला मेकॉले यांचाच आधार घ्यावा लागतो. याबद्दलची खंत त्यांनी बोलून दाखविली.

या चर्चासत्रात सहभागी असलेल्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपैकी कविता सरकटे (परभणी), भवर किशन व संजय शिंदे (हिंगोली), चिंचाणे (मानवत), फारुकी, झमकडे, घनवट, आणि ज्योती फूलमाळी सेलू यांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदविली.

या कार्यक्रमाचे संचालन उपप्राचार्य प्रभाकर रावते यांनी केले तर आभार प्रा. यादव गायकवाड यांनी मानले.

■ HESPN

Higher Education For Person With Speical Needs या योजनेअंतर्गत ५ लाख रु. परिसरात स्वच्छतागृह व रॅम्प उभारण्यासाठी देण्यात आले. या योजनेवर ९ लाख खर्च झाला असून त्यातून १ स्वच्छतागृह प्राचार्यासाठी, एक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, दोन विद्यार्थीनी व चार विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह बांधण्यात आले. तर २ रॅम्प ही उभारण्यात आले.

■ पदवी मिळवत असतांना खालील प्रकारचे

■ **२००७ - २०१२ अकरावी योजना**

| अ.क्र. | योजनांचा तपशील | मंजूर खर्च | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १. | Equipments | ४ लाख | ४,३५,८७२.०० |
| २. | पुस्तके व नियतकालिक | ३ लाख | ३,००,६००.०० |
| ३. | महाविद्यालय परिसरात विविध सुविधा उपलब्ध करणे. | १,००,००० | १,११.४०.०० |
| ४. | दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम | ८ लाख | १२,६६,९९१.०० |
| ५. | वर्ग खोली १ | २ लाख | २,८२,२८१.०० |
| ६. | वर्ग खोली १ | ४ लाख | ६,२७,०९५.०० |
| ७. | पुस्तके व | ३ लाख | ३,००,६००.०० |
| 8. | College Located in Rural Area | 200000.00 | 200100.00 |
| 9. | COLLEGE WITH RELATIVELY HIGHER PROPORTION OF SC/ST/OBC | 120000.00 | 120000.00 |
| 10. | INTITIATIVE FOR CAPACITY BUILDING IN COLLEGES | 300000.00 | 311056.00 |
| 11. | (UGC) NETWORK RESOURCE CENTER (UGC-NRC) | 261000.00 | 261154.00 |
| 12. | REMEDIAL COACHING FOR THE STUDENTS BELONGING TO SC, ST, OBC, (NON CREMY LAYER) AND MINORITY COMMUNITIES | 700000.00 | 721146.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13. | Coaching for NET/SET (SC/ST/OBC) | 470000.00 | 474429.00 |
| 14. | COACHING FOR ENTRY IN SERVICES IN COLLEGES FOR THE STUDENTS BELONGING TO SC, ST, OBC (NON CREMY LAYER) AND MINORITY | 680000.00 | 681349.00 |
| 15. | HIGHER EDUCATION FOR PERSON WITH SPECIEAL NEEDS (HEPSN) | 311400.00 | 313843.00 |
| 16. | CAREER AND COUNSELING CELL | 140000.00 | 142925.00 |
| | | 3182400.00 | 3226002.00 |

व्यवसायभिमुख अभ्यासक्रम महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने सुरु करण्यात आले.

**२००८-२०१३**

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Fashion Desinging | ५ लाख | ६,४९,३७३.०० |

**२००९-२०१४**

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Computer Accounting | ७ लाख | ७,९४,०२५.०० |

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Computer Hardware & Networking | १० लाख | १०,६७,३०५.०० |

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Dramatics | ७ लाख | ७,४०,२५३.०० |

**(२०१०-१५)**

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Human Right Foundaion | २ लाख | २,५८,९८३.०० |

### मानवी अधिकार पायाभूत अभ्यासक्रम

नूतन महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्या वतीने अंतर्गत २०१०-११ या वर्षा पासून 'मानवी अधिकार - पायाभूत अभ्यासक्रम' सुरु करण्यात आला. समाजातील ढासाळत चाललेली नैतिकता, जागतिक पातळीवर झालेले परिवर्तन, मानवी जीवनाच्या सर्वांगिन विकासासाठी मानवी अधिकार काय आहेत यांच्याबद्दल सभोवतालच्या ग्रामीण जनतेच्या मनात जाणिव जागृती निर्माण व्हावी, म्हणून या अभ्यासक्रमाअंतर्गत २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षाच्या कालावधीत मान्यवरांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. त्यासंदर्भात वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. परिसंवाद, एक दिवसीय चर्चासत्र, एक दिवसीय परिषद व ४०० गुणांचा पदवी अभ्यासक्रम दरवर्षी घेण्यात आला. या माध्यमांतून सभोवतालच्या ग्रामीण जनतेला 'मानवी अधिकार' याबद्दल जाणिव जागृती निर्माण करण्यात आली.

या कार्यक्रमाअंतर्गत संगणकयंत्र व इतर साहित्य विकत घेण्यात आले.

**२०१२-२०१७** Sports Grant

| तपशिल | मंजूर | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Sport | ५ लाख | ५,०९,७८०.०० |

Gandhian Study Centre (२०१२-१७)

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| Gandhian Study Centre | ३.७५ लाख | ४,५४,६३०.०० |

### गांधी अध्यासन केंद्र

नूतन महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांच्या अंतर्गत २०१२-१३ या वर्षापासून 'गांधी अध्यासन केंद्राची' सुरुवात करण्यात आली. २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच

वर्षाच्या कालावधीत गांधीजींच्या विचारावर प्रकाश टाकण्यात आला.

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्याचा विकास झाला तरच संपूर्ण भारताचा विकास होईल. म्हणून म.गांधीजी खेड्याच्या विकासासाठी कुटिरोद्योग, 'ग्राम स्वराज्य' निर्माण करावे अशी त्यांची तळमळ होती. म्हणून त्यांनी खेड्याकडे चला असा मंत्र दिला.

या अध्यासन केंद्राअंतर्गत ग्रामीण भागातील जनतेमध्ये म. गांधीजीच्या विचाराची जाणिव, जागृती निर्माण सभोवतच्या चार खेडी दत्तक घेऊन त्या गावामध्ये ग्राम सभेबद्दल माहिती, हगनदारी मुक्तीसाठी स्वच्छातागृहे बांधावीत. अंधश्रध्दा व बुवाबाजी बाबत जागृती याबाबी करण्यासाठी संवाद, चर्चा, परिषदा, भजन, किर्तन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**बारावी योजना**

| तपशिल | मंजूरनिधी | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|
| उजळणी वर्ग | ३,७५,००० | ४,२२,१२२.०० |
| विशेष वर्ग | ३,७५,००० | ४,२२,१२२.०० |
| अंतर्गत गुणवत्ता सुधार कार्यक्रम | ३ लाख | ३,४६,६६९०० |

## विद्यापीठ अनुदान सहकार्यातून संशोधन प्रकल्प

**संशोधन प्रकल्प लेखन कार्याचा अहवाल.**

विद्यापीठ अनुदान आयोग अनेक क्षेत्रातील संशोधन करण्याकरिता विद्यापीठ व महाविद्यायातील प्राध्यापकांना Major and Minor Research Project करण्याकरिता आर्थिक सहकार्य करत असते. शासन जरी विविध क्षेत्रात संशोधन करीत असले तरी विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात संशोधन कार्य करुन वास्तव समाज व शासना समोर आणावेत अशी विद्यापीठाची अपेक्षा असते.

नूतन विद्यालय शिक्षण संस्थेने आपल्या घटक संस्थातील शिक्षक व प्राध्यापकांना संशोधन कार्य करावे यासाठी आर्थिक सहकार्य करत प्रोत्साहन दिले होते. प्रा.रामचंद्र पाटोदकर यांनी संस्थेच्या आर्थिक सहकार्यातून इंग्रजी विषयाच्या संबंधाने संशोधन केले होते. प्रा.डॉ.पी.व्ही.काटे व प्राचार्य डॉ.बी.टी.भोसकर यांनी Studies on the First perspectivke plan and action programme of S.R.T.M.University, Nanded-A Critical Assessment या विषयावर Minor Research Project विद्यापीठ अनुदान आयोगाला सन २००२ मध्ये सादर केला. या प्रकल्पा अंतर्गत डॉ. भोसकर यांनी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक विद्यापीठांना भेट देऊन विद्यापीठाने जी उद्दीष्टे पूर्ण केली त्याचा अभ्यास केला. त्यांच्या या प्रकल्पातून विद्यापीठाचा दुसरा बृहत आराखडा तयार करण्यास मदत झाली. तसेच या प्रकल्पामुळे उच्च शिक्षण विभाग, स्वायत्त महाविद्यालय आणि विद्यापीठाला मार्गदर्शन मिळाले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्यातून संशोधन प्रकल्प पूर्ण केले. डॉ. बी.टी. भोसकर यांनी महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्यातून झालेल्या कामाचा आढावा घेण्याचा हा प्रपंच.

- **डॉ.शरद कुलकर्णी :-**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने नूतन महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा.डॉ.शरद

कुलकर्णी यांनी “A STUDY FORMATION OF NEW DISTRICTS IN MAHARASHTRA AND EMERGING LEDERSHIP” या विषयावर Minor Research Project विद्यापीठ अनुदान आयोगाला सन २००६ मध्ये सादर केला.

प्रस्तुत प्रकल्प विषयातील संशोधन निष्कर्ष थोडक्यात पुढील प्रमाणे आहेत. नविन जिल्हयाची अथवा तालूक्याची निर्मिती ही केवळ प्रशासकीय बाब नसते. त्यापाठीमागे नविन प्रादेशिक सत्तेची निर्मिती व नेतृत्त्व उदयाला येत असते. नविन जिल्हयाच्या निर्मितीमुळे नवनेतृत्व उदय पावते. यातून राज्याच्या राजकारणावर दुरगामी परिणाम घडलेले दिसून येतात. जिल्हा हा राजकारणाचा एकक मानला गेल्यामुळे हिंगोली जिल्हयाचा अभ्यास करुन निष्कर्ष संशोधकाने काढली आहेत. हिंगोली जिल्हा निर्मितीमुळे नवीन नेतृत्व उदयाला आले आहे. त्याचा राजकारणावर परिणाम झालेले दिसून येतात.

सन २०१३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने Minor Research Project राज्यशास्त्र विषयात प्रा.शरद कुलकर्णी यांना “Socio-political Study of Floating population in Parbhani District” या शिर्षकाखाली मंजूर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प अहवालात संशोधकाने लोकसंख्या स्थलांतरामुळे सामाजिक, राजकीय बाबींचा अभ्यास केला आहे. शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान, ग्रामीण भागातील होणारे विवाह, ग्रामीण भागातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उत्सव, मतदान, हार्वेस्टर या सर्व बाबींचा ऑक्टोबर ते मे महिन्यातील असणारा संदर्भ व इतर बाबींचा आढावा संशोधकाने प्रस्तूत अहवालात घेतला आहे.

- **डॉ.यु.सी.राठोड** यांना २००७ मध्ये Temple, Arichitecture & sculpure of Marathwada - A case study of Parbhani District या विषयावर संशोधन करणारा लघु संशोधन प्रकल्प मान्य करण्यात आला.

मराठवाडा ही भूमी जुन्या हैद्राबाद राज्यातील मराठी बोलणाऱ्या लोकांची आहे. सध्या ही भूमी परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, आणि जालना या जिल्ह्यात विभागली आहे. गोदावरी ही महत्वाची व मुख्य नदी या परिसरातून वाहते. तसेच पुर्णा, दुधना आणि मांजरा हया नद्या ही याच परिसरातून वाहतात.

मराठवाडा ही भूमी संताची भूमी म्हणून ओळखली जाते. या परिसरांत व नदीच्या काठावर अनेक मंदिरे व शिल्पे आढळतात. या भूमीत प्राचीन काळापासून म्हणजे सातवाहन कालखंडापासूनची मंदीरे, शिल्पे व स्थापत्ये उपलब्ध झालेली आहेत. विशेषत: मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात अतिप्राचीन मंदिरे फार मोठया प्रमाणात आढळतात. महत्वाचे म्हणजे परभणी जिल्हयात हेमाडपंथी मंदीरे मोठया प्रमाणात आढळतात. हेमाडपंथी मंदिराची स्थापत्यकला, तसेच शिल्पकला आपणास पाहावयास मिळते. परभणी जिल्ह्यात त्रीधाराक्षेत्र, असोला महादेव मंदीर, ढेंगळी पिंपळगाव, श्री रामेश्वर–सोमेश्वर मंदिर, बोरी उत्तराचा मारोती, मानवत महादेव मंदीर, परभणी पिंगळेश्वर मंदिर, पिंगळी, सावळेश्वर मंदिर, जांब, ई. मंदिरे आहेत. परभणी जिल्ह्यातील मंदीर स्थापत्य व शिल्पकला अप्रतिम असुन प्राचीन कलावैभवाची जाणीव करुन देणारे आहेत.

**(२०१५-१६) गोर-बंजारा समाजाचा इतिहास : जीवन आणि संस्कृती – विशेष संदर्भ मराठवाडा विभाग**

समग्र जगाच्या संस्कृतीचा आपण विचार केला तर बंजारा समाजाची संस्कृती ही आगळी –वेगळी आहे. हा समाज जसा भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यामध्ये

पसरलेला आहे तसाच तो वेगवेगळ्या राज्यात परिसर संस्कृतीच्या प्रभावापासून आपल्या संस्कृतीचे विशेष स्थान निर्माण केलेला आहे व स्वत:ची संस्कृती जपतो – टिकवतो हे विशेष आहे.

गोर–बंजारा समाजाचे लोकसाहित्य ही अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. गोर–बंजारा समाजाचा इतिहासही अतिप्राचीन आहे, म्हणजे तो सिंधु संस्कृतीच्याही अगोदरचा आहे असे पुराव्यानिशी आपल्याला सिध्द करता येते. गोर–बंजारा समाजाचा जो प्राचीन इतिहास आहे तो भौतिक व वाङ्:मयीन साधनापेक्षाही गोर–बंजारा समाजाचे लोक आपल्या गीतांद्वारे जतन करुन ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गोर–बंजारा समाजातील स्त्रियांचा पोशाख, दागदागीने यांचा जर आपण बारकाईने अभ्यास केल्यास ते मोहेंजोदाडो व हडप्पा संस्कृतीशी अतिशय जवळीक साधतात.

या लघुशोध प्रकल्पात गोर–बंजारा समाजाचा इतिहास, संस्कृती, सण समारंभ, विवाह पध्दती ई. चा अभ्यास केलेला असुन तो इतर संस्कृतीपेक्षा वेगळी आहे व ती जतन करण्याचा समाजाचा प्रयास कसा राहिला याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- डॉ.आर.एम.खाडप यांनी "Bio-systematic studies of some cestode parasites with special reference to the edible bird Gallus domesticus from Parbhani District" या शिर्षकाखाली दि.१५/०२/२००८ ते १४/०२/२०१० या कालावधीत लघु संशोधन प्रकल्प सादर केला.

**'परभणी जिल्हातील गावरान कोंबड्या मधील सापडणाऱ्या पट्टकृमी परजिवीचा एक चिकित्सक अभ्यास'**

परभणी जिल्हयातही याच प्रकारच्या मांसाचे सेवन केले जाते. त्यामुळे गावरान कोंबडी मधील कोणकोणते पट्टकृमी परजीव सापडतात, याचाच एक चिकित्सक अभ्यास या संशोधनामधून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संपूर्ण संशोधनामधून पट्टकृमी परजीवीची बाह्यरचना, लांबी, रुंदी, अवयवांची रचना व तो कसा मानवाच्या अन्ननलिकेत वावरतो, आतडयांना छिद्रे कसा पाडतो व मानवाचे आरोग्य धोक्यात आणतो याची संपूर्ण मांडणी व त्यावरील उपाय योजना व घ्यावयाची काळजी ई. या संपूर्ण संशोधनामधून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

- डॉ.संतोष दंडवते यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने "Determinants Variables of customer satisfaction as Parameters of Performance in Retail Banking with special Reference to Parbhani District" हा संशोधन प्रकल्प २००९ मध्ये मंजूर केला.

डॉ.दंडवते यांनी परभणी जिल्हयातील विविध बँकांमधील ग्राहकांशी प्रश्नावलीच्या माध्यमातून संपर्क केला. परभणी जिल्हयातील ग्राहकांना सर्व बँका देत असलेल्या सेवा समाधानकारक वाटल्या. पंरतू बँकानी खालील सुविधा ग्राहकांना द्याव्यात अशा अपेक्षा व्यक्त केल्या.

१) बँकेमध्ये ग्राहकांना बसण्यासाठी पुरेशी जागा असावी.

२) बँकेसमोर वाहनतळ असावे.

३) लॉकर सुविधा अपुरी आहे.

अभ्यासाअंती डॉ.दंडवते यांनी खालील सूचना केल्या.

१) सर्व बँकांनी ग्राहकांना विविध सेवा पुरविल्या पाहिजेत.

२) बँका देत असलेल्या सुविधेचा दर्जा वाढविला पाहिजे.

३) विशेषत: बचतखाते असणाऱ्या ग्राहकांशी बँकांनी आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे.

४) बँकेची सेवा अत्यावश्यक असून सर्व गरीबांपर्यंत पोहचली पाहिजे.

■ **डॉ.व्ही.एच.पांचाळ** यांनी सन ०१/०२/२०१० ते ३१/०१/२०१२ या कालावधीत “EVALUATION OF SOME PLANT EXTRACTS IN THE MANGEMENT OF LEAF SPOT OF LYCOPERSICUM ESCUIENTUM” या शीर्षकाखाली लघु संशोधन प्रकल्प सादर केला.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात संशोधकाने टोमॅटो पिकावरील बुरशीजन्य रोगांचे नियंत्रण करण्यासाठी कडूनिंब, तुळस, कांदा,आद्रक, लाटणी, एरंडी, धोतरा, सुर्यफूल, रुचकी, सदाफूली, कोरफड इत्यादी वनस्पतीच्या अर्कापासून प्रभावी नियंत्रण करता येते असा एक निष्कर्ष संशोधकाने काढले आहेत.

■ डॉ.पी.एस.खरात यांनी जाने. २०१२ ते जाने. २०१४ या कालावधीत “Impact of TBTO on some physiological aspects in freashwater fish Rasbora daniconius” या शीर्षकाखाली लघु संशोधन प्रकल्प सादर केला.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात संशोधकाने आज प्रगत मानवी जीवनात वाढलेल्या गरजांची पुर्तता करण्यासाठी उद्योगाची झालेली भरभराट व यातून प्रदुषणात प्रंचड वाढ झाली. परिणामी नवनवीन रसायनांच्या वापरामुळे घातक परिणाम दिसू लागले आहेत.

समुद्रीपाण्यात, जमिनीत TBTO या रसायनाच्या वापरामुळे मासे व जलचर प्राण्याच्या अस्तित्त्वाला कशी बाधा येते हे प्रस्तुत संशोधनात सिध्द केले असून यावर उपाय ही संशोधकाने सूचविले आहेत.

सद्यस्थितीमध्ये माणसाच्या वाढत्या गरजा आणि मानवी जीवनमान उंचावण्यासाठी पूर्ण जगामध्ये वेगवेगळ्या यंत्र आणि औद्योगिक कारखान्यात औद्योगिक क्रांति नित्य नवे बदल होतात. रसायनांचा वापर होत असतो. पाण्यामध्ये व वापरात येणारे पाइप, बोट्स, जहाज, जाळे आदि उपकरणांवर Tributyltin ऑक्साइड हे रसायन वापरतात. त्यामुळे त्यांना पाण्यातले प्राणी चिटकुन खराब करण्याचा धोका टळतो. परंतु हे प्राणी त्या उपकरणांच्या सहवासात येतात. सहवासात आलेल्या प्राण्यावर Tributyltin ऑक्साइड या रसायनांचा विपरित परिणाम होतो आणि ते मरतात. गोड्या पाण्यातील मासा रासबोरा ड़ायेनिकोनिअस या मास्यावर हा लघु संशोधन प्रकल्प करण्यात आला आहे. यामध्ये Tributyltin ऑक्साइड या रसायनांचा कीती प्रमाणात आणि कसा धोका आहे हे यावर संशोधन करण्यात आले आहे. जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी प्रत्येक प्राणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. अन्नसाखळी टिकवून राहावी या करीता असे घातक रसायनांचा वापर बंद झाला पाहिजे असे त्यांनी प्रकल्पात मांडले.

■ प्रा.डॉ.रमेश बैनवाड यांनी २०१३-१५ या दरम्यान Minor Research Project “EMPOWERMENT OF SCHEDULED TRIBES WOMEN LEDERS IN PANCHAYAT RAJ IN NANDED AND HINGOLI DISTRICT, IN MAHATRASHTRA REGION” या शीर्षकाखाली आयोगाला सादर केला.

प्रस्तुत प्रकल्प संशोधन अहवालात पुढील प्रमाणे निष्कर्ष काढले आहेत.

१. ७३ व्या घटना दुरुस्तीने महिलांना दिलेल्या पंचायतराज तथा स्थानिक स्वराज्य संस्था मधील आरक्षणाचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

२. पंचायतराजमध्ये महिला राजकीय निर्णय घेवू लागल्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला आहे.

पुरुषांचा हस्तक्षेपही असल्याची नोंद /निरिक्षण प्रस्तूत प्रकल्पात संशोधकाने केली आहे.

■ श्रीमती एच.के.बायस यांनी 'मराठवाडा प्रदेश की महिलाओ का हिंदी साहित्य को योगदान' या विषयावर Minor-Research Project सादर केला.

■ प्रस्तुत प्रकल्प अहवालात संशोधकाने पुढील निष्कर्ष काढले आहेत.

महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेश अहिंदी भाग मानला जातो. महिला लेखकाचे योगदान यात महत्वपूर्ण राहीलेले आहे. हिंदीतील प्रकाशीत, अप्रकाशीत, वृत्तपत्रांमध्ये लिहिलेले साहित्य सर्जनशील आहे.

■ **डॉ.के.एस.निरालवाड** यांनी "Environment friendly approach for the synthesis of important heterocycles using newer techniques" या शीर्षकाखाली लघु संशोधन प्रकल्प सादर केला.

वरील प्रकल्पात नवीन पध्दतीत मायक्रावेव्हचा वापर करुन कमी वेळात काही Reactions करण्यात आल्या. तसेच घातक असलेली रसायने वगळून पर्यावरणपूरक रासायनिक बदल घडविणारी तसेच वेग वाढवणारी रसायने वापरण्यात आली. त्यात लिंबाच्या रसाचा आम्ल रसायने म्हणून वापर करण्यात आला.

संक्षिप्तमध्ये मायक्रोवेव्ह पध्दत, लिंबाच्या रसाचा वापर हे हेटेरोसायक्लीक कंपाऊंड करीता पर्यावरणपूरक असून त्याचा वापर पर्यावरणासाठी घातक नाही.

भौतिकशास्त्राचे प्रा.डॉ.के.आर.गंगाखेडकर यांना "Growth characterization of Calcium oxalate type sinfie" या विषयावर प्रकल्प मंजूर करण्यात आला.

---

# विविध महोत्सवाच्या संयोजनाचे स्मृती शिल्प

तालुका स्तरावरील प्रत्येक महाविद्यालयाच्या काही मर्यादा असतात. त्या मर्यादांचा चक्रव्यूह भेदून एखाद्या भव्य - दिव्य महोत्सवाचे आयोजन करणे तसे कठीणच असते. या पार्श्वभूमीवर एखाद्या महाविद्यालयाने तसे साहस केले, त्याच्या यशापयशाची सर्वत्र चर्चा होते. त्या चर्चेला काही वेळा कौतुकाची तशी काही वेळा उपहासाची देखील किनार असते. त्यासर्व बाबींचा फारसा विचार न करता जे स्वत:च्या सामर्थ्या बरोबरच मर्यादांचाही सक्षमपणे वापर करु शकतात, अशी माणसे सार्वजनिक जीवनात अनेक संस्मरणीय अशा घटना प्रसंगाचे शिल्पकार असतात. आमच्या महाविद्यालयाच्या स्थापने पासूनच आमच्या अभ्यासपूरक उपक्रमाच्या आयोजनात मर्यादाच क्षमता असल्याचे सिद्ध करण्याची प्रवृत्ती राहिली. अतिशय चिवटपणे समूहाला कार्यात्मक तेची दिक्षा दिली आहे. म्हणूनच वाङ्मयीन, सांस्कृतिक, अकादमीक किंवा क्रीडा विषयक यापैकी कोणताही विशेष उपक्रम असो त्याचे यश हे लौकिक अर्थाने एखाद्या व्यक्तीचे नेतृत्त्व - कर्तृत्त्वाशी सिमित नसून ते सर्व समूहाचे आहे. म्हणून तर अनंत भालेराव यांना सेलू संदर्भाने बोलताना सामुहिक पुरुषार्थाचे गाव सेलू असे सांगावे वाटले. केवळ आणि केवळ संस्था अन् महाविद्यालयाच्या लौकिकात भर घालण्यासाठी आयोजित कार्यक्रमाचे यश महत्त्वाचे आहे. म्हणून त्यात कोणतेही न्यून नसावे. आपल्यावर निश्चित केलेली जबाबदारी सर्व प्रकारच्या क्षमतेनं पूर्णकरणे हा स्वभावधर्म आहे. अशा जाणिवेनं काम करणारे सर्व शिक्षक आणि

सहयोगी शिक्षणकर्मी, विद्यार्थी प्रतिनिधीनी आपली आपली जबाबदारी पूर्ण करतात. म्हणून तर अर्ध शतकाच्या प्रवासात आम्ही काही मोठे उत्सवी उपक्रम आयोजित करुन शकलो. त्यातील काही विशेष संस्मरणीय उत्सवी उपक्रमाची ही काही स्मृती शिल्पे.

■ **स्वामी रामानंद तीर्थ जीवन, कार्य व तत्त्वज्ञान : शिबीर २९ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २००४**

नूतन विद्यालय शिक्षण संस्थेची स्थापना करणारे सर्व विश्वस्थ हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीतील क्रियाशील असे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनातील एक प्रेरक उर्जाकेंद्र स्वामी रामानंद तीर्थ होते. त्यांच्या नावाने निर्माण झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी आमचे महाविद्यालय संलग्न आहे. म्हणून विद्यापीठाने जेव्हा स्वामीजींच्या जीवन, कार्य आणि तत्त्वज्ञानाचा आजच्या तरुण पिढीला परिचय घडावा – विशेष म्हणजे केवळ परिचय – तोंड ओळख महत्त्वाची नाही. तर त्यांच्या विचार कार्यातून जी सामाजिक, राजकीय व शैक्षणिक धारणां संदर्भाने मूल्यचौकट तयार झाली. त्या मूल्यविचारातील अर्थपूर्ण आशय व त्याचा आमच्या समकालीन जीवनाशी असलेला अनुबंध समजून देण्याची व घेण्याची गरज आहे. या विचार भूमिकेतून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सूचविलेल्या शिबीराला सहजपणे आंतरराज्य असे स्वरुप आले. त्याचे एक कारण हैद्राबाद स्टेट म्हणजे तीनपेडी विण असलेल्या लोकजीवनाचा रुपबंध आहे. या स्टेटमध्ये पूर्वीच्या आंध्रप्रदेशातील तेलंगाणाचा भाग व मराठवाडा आणि कर्नाटकातील काही भाग असलेले हैद्राबाद स्टेट होते. म्हणून स्वामीजींच्या कार्यप्रतिमेला दृष्यमान आकार मिळावा यासाठी पुन्हा एकदा या त्रैभाषिकांना एकत्रित निमंत्रण करण्याची कल्पना सूचली. आणि एका वैशिष्ट्येपूर्ण शिबीराचे आयोजन करावे असा निर्णय झाला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे राज्य संपर्क अधिकारी, प्रादेशिक सहाय्यक कार्यक्रम सल्लागार महाराष्ट्र व गोवा प्रदेश यांनी शिबीरास मान्यता दिली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मान्यता देऊन मार्गदर्शन केले आणि औरंगाबाद येथील स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेने सहकार्य देवू केले. म्हणूनच महाविद्यालयास हे शिबीर आयोजित करणे शक्य झाले.

शिबीराच्या संयोजनाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा आम्हाला त्या मानाने आंध्र – तेलंगाणा व कर्नाटकातून फार प्रतिनिधी येतील असे वाटत नव्हते. किमान १२५ ते कमाल १५० शिबीरार्थी असतील असा आमचा प्राथमीक अंदाज होता – पण प्रत्यक्षात २०० पेक्षा जास्त तरुणाचा सहभाग राहिला. ही आमच्या संयोजनाची एक जमेचीच बाजू राहिली.

शिबीराचा मूळ उद्देश हा विद्यार्थी तरुणामध्ये वैचारिक प्रबोधन घडावे असाच होता. हे वैचारिक प्रबोधन तसे वाचन किंवा अभ्यासाच्या माध्यमातून घडते – पण शिबीराच्या निमित्ताने हे तरुण पाच दिवस एका अर्थाने वैचारिक सहजीवन जगणे अपेक्षित आहे. एकत्र निवास, भोजन, श्रमदान, बौद्धिक दृष्ट्या महत्त्वाचे अशा व्याख्यानाचे एकत्र श्रवण – चिंतन व त्यावरील संवाद भाष्य यामुळे चौकटीच्या आत – बाहेर करणे आणि इतरांना आपले विचार –मत समजून देणे व घेणे इतरांचे विचार मत समजून घेणे हीच तर शिबीराची जीवन व कार्यशैली अनौपचारिकपणे संस्कार करणारी होती.

या शिबीराचे उद्घाटन प्रादेशिक सहाय्यक कार्यक्रम सल्लागार राष्ट्रीय सेवा योजना मा. कॅ.

सुभाषचंद यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी दिवसेदिवस संवेदनाशून्य होत जाणाच्या समाज मनाची अवस्था साधार चर्चेला घेतली. केवळ समस्या मांडून किंवा त्यावर वाद – विवाद घडवून त्या सुटत नसतात. उपाययोजनाही सांगणे फारच गरजेचे असते. सामाजिक संवेदनाशून्य स्थिती बदलायची असेल तर समाजाचे वैचारिक प्रबोधन करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने स्वामी रामानंद तीर्थ यांचे व्यक्तित्त्व व कर्तृत्त्व, आचार – विचारातील नैतिकतेचा वस्तुपाठ आहे. तो समजून देणे व समजून घेणे हीच अनेकार्थाने वर्तमानाची आवश्यक गरज आहे. असे कॅ. सुभाषचंद यांनी आपल्या विस्तृत भाषणातून सांगितले.

उद्‌घाटन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले स्वामीजींच्या चळवळीतील सक्रिय सर्वोदयी सेनानी श्री गंगाप्रसादजी अग्रवाल यांनी आपले विचार मांडले. साम्राज्यसत्तेविरुद्धची आमची लढाई संपली – आम्ही आता स्वतंत्र असून देशात लोकशाही शासन व जीवन पद्धती रुजली आहे.तरी पण प्रतिगामी व मूलतत्त्ववादी विचार शक्तीने देशातील लोकशाही विचार – जाणिवांच्या पुढे काही पेच, संकट निर्माण केले आहेत. त्यांच्या विरोधातील आमचा संघर्ष हा देखील आमच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा नवा अध्याय आहे. समाजमनावर प्रभाव असलेल्या प्रगत दृक – श्राव्य माध्यमांचा किंवा लोकशाहीने दिलेल्या विचार – भावनाच्या अभिव्यक्ती स्वात्रंत्र्याचा गैरवापर करणारे उन्मादी वातावरण तयार करीत आहेत. सामाजिक विवेक शक्ती– सद्‌सद्विवेकाची प्रवृत्ती गतीशून्य झालेली. आमची तटस्थ व मौनीप्रवृत्ती या मुळे देशातील लोकशाही शासन व जीवन आता कडेलोटाच्या टोकावर आहे. आजही हिंसा अराजक व आतंकवादाचा प्रच्छन्न पुरस्कार करणारे आहेत. म्हणूनच आजच्या तरुणाला स्वामी रामानंद तीर्थ यांचे विचार – कार्य पुन्हा समजून सांगण्याची गरज वाटते. शिबीर काळात श्री गंगाप्रसाद अग्रवाल यांचे सह पी. पुलारेड्डी व प्रभाकर वाईकर यांनी वेगवेगळे विषय आणि वेगवेगळ्या माध्यमातून शिबीरार्थींना अवगत केले. त्याच बरोबर प्रा. डॉ. पी. व्ही. काटे, डॉ. प्रभाकर देव, प्रा. डॉ. शुभांगी धारुरकर, शामलाल अग्रवाल, न्या. नरेंद्र चपळगावकर, प्रा. डॉ. कुरुलकर आणि एस. बी.एच. कर्मचारी संघटनेचे नेते श्री भावठाणकर इ. मान्यवरांनी शिबीरार्थींचे उद्‌बोधन केले. त्यांच्या चिंतनपर विचाराने शिबीरार्थींना हैद्राबाद मुक्ती आंदोलनाचे विविध पैलू समजून घेता आले. तसेच साम्राज्यवाद तथा वसाहतवादी व्यापाराचा नवा आविष्कार असलेल्या 'खाऊजा' धोरणाचा परिचय देखील तज्ज्ञांनी करुन दिला.

पाच दिवसाच्या या शिबीराचा समारोप स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेचे अध्यक्ष तथा मराठवाड्यातील ज्येष्ठ सनदी अधिकारी भुजंगराव कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाला. त्यांनी प्रासंगिक समारोपाचे भाषण टाळून भारताचे राष्ट्रपती श्री ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकाचा परिचय करुन दिला. अर्थात ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि स्वामीजी हे दोन भिन्न व्यक्तिमत्त्व आहेत. शिबीर काळात रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी, प्रा. रामदास जायभाये, डॉ. शरद कुलकर्णी, प्रा. सीमा बागूल, डॉ. गंगाधर गळगे, के.डी. वाघमारे यांनी घेतलेले परिश्रम आणि प्राचार्य डॉ. वि.खं. कोठेकर यांचे मार्गदर्शन याचा एक चांगला परिणाम म्हणजे शिबीरार्थींनी मिळवलेल्या सहभागचे समाधान. या समाधानात वाढ करणारे श्री शंकर गंधम, नागेश कान्हेकर, प्रकाश कुरुंदकर, मखमले या सर्वांचे पुरक कार्य तेवढेच मोलाचे राहिले.

■ **प्रेरणा युवक महोत्सव २००९-२५ ते**

**२८ ऑक्टोबर २००९** आमच्या महाविद्यालयात युवक महोत्सवाचा सोहळा आयोजित करावा, हे तसे कल्पवृक्षाच्या सावलीत पाहिलेले दिवास्वप्न वाटावे असेच एक वास्तव आहे. त्याचे एक कारण संलग्न महाविद्यालयातील किमान हजार पंधराशे तरुणांचा तीन दिवसाचा हा सांस्कृतिक सृजनोत्सव. जिथे तीन दिवसाचे स्नेहसंमेलन आयोजित करणे व त्याची यशस्वी सांगता करण्याचे आव्हान वाटावे. तिथे दीड – दोनशे महाविद्यालयातील सांस्कृतिक अर्क अन् अर्काट तरुणाईला एका शिस्तीत कार्यक्रम करण्याचे इंद्रधनुष्य उचलायच कठीण आव्हान होते. युवक महोत्सवाची सांगता झाल्यावर परिसरातील चित्र तसे उमेद वाढवणारे नसते. या पार्श्वभूमीवर प्रेरणा युवक महोत्सव घेण्याचा आम्ही घेतलेला निर्णय आम्हालाच आचंबीत करणारा होता. पण युवकमहोत्सवाचे आयोजन करणे हा एक वेगळाच थ्रिलिंगचा अनुभव आहे. याची अनुभूती अनेक सहकारी मित्रांनी वेगवेगळ्या महाविद्यालयात संपन्न झालेल्या युवक महोत्सवात संघव्यवस्थापक म्हणून घेतली होती.

सांस्कृतिक स्पर्धातील सहभागी विद्यार्थी प्रतिनिधींचा विविध कला प्रकारातील सराव, त्या दरम्यान चालणारे हलके फुलके संवाद, त्यांचे निर्व्याज खळाळते हास्य, मनोविनोद, जसे काही एकमेकात मिसळून गेलेल्या इंद्रधनुष्यातील रंगाप्रमाणे दिसणारे, जाणवणारे विविध मानवी मनाचे रंग तरंग – या मुळेच फुललेल्या वसंताचा एक मंद दरवळ असतो. त्यान तन – मनाला गुंतवून घेणारे वर्तमान जगण्यातील व्याप–ताप विसरुन सर्वांग सुंदर अशी एक स्वप्नभूमी सजवतात – रमतात – गातात नाचतात. एकूणच सांस्कृतिक नंदनवन तीन दिवसासाठीच परिसरात अवतरलेले असते. अशा या नंदवनातील स्वागत समितीच्या भूमिकेत वावरणे व देहभाव विसरुन परिश्रम करणे यातील आनंदपर्यवसायी गंमत आम्ही अनुभवली.

या अनुभवाचे नेतृत्त्व प्राचार्य शरद कुलकर्णी यांनी केले.त्यांच्या बरोबच संयोजनातील सर्व रंगरेषांना जोडून सर्वांग सुंदर आशयपूर्ण आकार देणारी सुकाणू समिती होती. त्या मध्ये प्रा. यादव गायकवाड, डॉ. उत्तम राठोड, सौ.सीमा बागूल आणि संतोष दंडवते यांनी घेतलेले परिश्रम विलक्षणच म्हणावे लागतील. त्याना मार्गदर्शन व सर्वोतोपरी सहकार्य करणारे नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सर्व विश्वस्थ मंडळ, नगर परिषद, शहरातील अनेक गणमान्य प्रतिष्ठीत, बँक अधिकारी, विद्युत मंडळाचे अधिकारी, कर्मचारी, अन्य स्वयं सेवी संस्था, आमच्या सर्व घटक संस्थाचे प्रमुख आणि त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे मार्गदर्शन सहकार्य मोलाचे राहिले, म्हणून तर आमच्या महाविद्यालयातील सर्वच सहयोगी शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी जीवतोड मेहनत केली. युवक महोत्सवाच्या संदर्भात प्रतिक्रिया नोंदवताना सर्वानीच पाठीवर हळूवारपणे शाबासकीची थाप दिली. तेव्हा तर आमच्या सर्वांच्याच तन – मनावर हळूवापरणे मोर पिसाचा मखमली स्पर्श आम्ही अनुभवत होतो. याचा साक्षिभूत अनुभव आम्ही घेतला. या अनुभवातील काही ठसे जे कार्यक्रमाच्या संदर्भाने नोंदवीता येतील.

या युवक महोत्सवाचे वैशिष्ट्य राहिले ते मानचिन्ह. चैतन्याने सळसळणारी तरुण पिढी तिच्या सर्व स्वभाव वैशिष्ट्यांसह चित्रकार नयन बाराहाते यांनी साकारली. भव्य असा मंडप, विविध सभामंच व कलादालनासाठी आकार देणारी ठरली. या पार्श्वभूमीवर शोभायात्रेचा दिलेला विषय सर्वांनाच आगळावेगळा वाटला. त्याचे कारण ही, शोभा यात्रा

म्हणजे जणू दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने होणाऱ्या पथसंचलनाचा आविष्कारच. भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका या मूळ आशय विषय सूत्रावर आधारीत देखाव्यानी सर्वानाच मंत्रमुग्ध केले.

युवक महोत्सवाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध कवी प्रा. फ.मुं. शिंदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे होते. फ.मुं. हे मूलत: तरुणाईचा रोमॉटिंक उद्‌गार असलेले प्रसन्न व्यक्तीमत्त्वाचे कवी. – वात्रटिका व द्वैअर्थी शब्द प्रतिभांचा सुयोग्य वापर करणारे आणि हास – परिहासाच्य अंगाने जाणारे त्यांचे वक्तृत्व. ओघवत्या शैलीत त्यांनी एक उद्‌घोषणा केली की, या युवक महोत्सवातून भविष्यातील कलासृजनाचे प्रतिनिधीत्त्व करणारे अनेक लेखक कवी कलावंत आम्हाला मिळणार आहेत. कारण महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन व युवक महोत्सव नसता तर आजचे लेखक कवी – कलावंत दिसलेच नसते.

सर्जेराव निमसे सरांनी प्रासंगिक स्वरुपाचे अध्यक्षीय भाषण करुन वाङ्‌मयीन व सांस्कृतिक कलाविष्काराची तिसरी घंटा वाजवली आणि नूतन च्या परिसरात तीन दिवस नृत्य – नाट्य चित्र संगीत शिल्प – वक्तृत्त्व कथाकथन, काव्यवाचन, भारुड, गवळण, लावणी असा अनेकरंगी सृजनोत्सव असा काही रंगला की, परिसरातील सर्व जनसामान्यांना आनंदीची पर्वणीच –

प्रेरणा युवकाच्या सृजनोत्सवाचा समारोप हा अजून वेगळा राहिला. त्याचे कारण या समारोपाच्या आधी पाहुण्या समोर मुंबईच्या लोककला अकादमीचे प्रा. डॉ. गणेश चंदनशीव यांचा उत्स्फूर्त कलाविष्कार बघताना श्रोत्यांना, तर मोरपंखावरील चित्तचक्षूचा भास देणारी जशी नक्षी असते तसे सर्वांगालाच दृष्टीलाभ झाल्याचा भास होत राहिला. समारोपाचे प्रमुख अतिथी म्हणून अ. भा. नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांची विशेष उपस्थिती राहिली. त्यांच्या श्रोतृ संवादाचे सूत्र हे देशांतर्गत लोकशाही शासन व जीवन पद्धतीने जे संधीचे अवकाश निर्माण केले. त्यामुळे दलित शोषित बहुजन आदिवासी समाज समूहातील सृजनशील व्यक्तीना अभिव्यक्तीचा संधी व सन्मान प्रतिष्ठेचा योग आलेला आहे. त्याच्या कलासृजनाचे मुक्त वारे सांस्कृतिक पर्यावरणातील कुरुपता दूर करील असेच मला वाटते. या विचाराशी संबंधीत होते.

**आविष्कार संशोधन महोत्सव २०१५**
**३० व ३१ डिसेंबर २०१५**

■ एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे, संगणक क्रांतीचे युग समजले जाते. या शतकाचा अजून एक विशेष असा की, पारंपरिक अध्ययन – अध्यापन तथा पुस्तकी शिक्षणापेक्षा उपयोजित व कौशल्यपूर्ण शिक्षणाला असाधारण महत्त्व दिले जाते. म्हणून ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षणामध्ये नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधन तसेच कलासृजनाला चांगल्या अर्थाने अर्थोत्पादनाशी जोडण्याची सर्वांनाच गरज वाटते. म्हणून पदवी पदव्युत्तर पदवी पासूनच विद्यार्थ्यामध्ये संशोधनाची वृत्ती विकसीत व्हावी. त्यासाठी अनुकूल असे शैक्षणिक वातावरण निर्माण झाले पाहिजे. संशोधनाला– स्वप्नांचा प्रदेश सर्वांनाच दिसावा. यासाठी विद्यापीठानी एक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. तो उपक्रम म्हणजे संशोधन महोत्सवाची साखळी पद्धतीने केलेली योजना आहे. या योजनेत विद्यार्थ्यांना संशोधनाची बाराखडी समजून दिली जाते. जसे संशोधन महोत्सवाची साखळी पद्धतीने केलेली योजना आहे. या योजनेत विद्यार्थ्यांना संशोधनाची बाराखडी समजून दिली जाते. जसे

संशोधन म्हणजे काय ? संशोधनाची पद्धती कशी असते संशोधन क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान तथा संगणकक्रांतीशी सुसंगत अशी अविष्कार शैली या बाबतचे कुतूहल विकसीत केले जाते. शोध निबंधाचे लेखन कसे करावे, शोध निबंधाचे वाचन कसे करावे, भित्तीपत्र लेखन, संगणकाच्या आधारे विचार - भावनांचे सादरीकरण, माहितीचे संकलन, पृथक्करण विश्लेषण व त्या माहितीद्वारा सूचित किंवा ध्वनित अर्थाची अन्वयार्थाची सुयोग्य मांडणी इ.

महाविद्यालयाने आता पर्यंत विद्यापीठाच्या सहकार्याने विविध उपक्रमात सहभाग घेतला. दिलेली जबाबदारी तशी योग्य पद्धतीने पूर्ण केली. युवक महोत्सव घेतला, युवक -युवती नेतृत्त्व कार्यशाळा, स्वा.रा.ती. जीवन, कार्य आणि विचार दर्शनाशी संबंधित शिबीराचे आयोजन, मराठी विषयाची कार्यशाळा इ. उपक्रमाचे संयोजन संचालन बघून मा. कुलगुरुंनी आम्हाला आविष्कार संशोधन महोत्सव संयोजनाची जबाबदारी दिली. त्यास प्रतिसाद देत आम्ही ३०, ३१ डिसेंबर २०१५ असे दोन दिवस संशोधन महोत्सवाचे आयोजन केले.

संशोधन महोत्सवात साधारणपणे ४८ इव्हेंट मध्ये १ ३७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धक विद्यार्थी संशोधकाशी अनेक मान्यवरांनी त्यांच्या संशोधनाशी संबंधीत प्रश्न उपप्रश्न विचारले. त्या सर्वासोबतचा विद्यार्थी संवाद विलक्षण प्रभावी राहिला.

आविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्‌घाटन स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम लोया होते. महोत्सवात मा. डॉ. एस.व्ही. मोडक, के.एस. जेव्हे, एस.आर. सरकटे, प्र. कुलगुरु गणेशचंद्र शिंदे, चंद्रशेखर चापोरकर इ. मान्यवर अभ्यासक संशोधकांनी सहभाग नोंदवला.

आविष्कार संशोधन महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात प्राचार्यांसह समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. शिंदे आणि सर्व सहयोगी शिक्षकांनी मोलाची भूमिका बजावली.

---

## विविध चर्चासत्रांचे, परिषद व कार्यशाळांचे आयोजन

विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष मा. डॉ. सुखदेव थोरात यांना Funding for Higher education ; Challenges and Strategies या विषयावरील चर्चासत्रासाठी निमंत्रण देण्याच्या निमित्ताने आम्ही त्यांची भेट घेत होतो. या भेटीसाठी आम्हाला दिलेला निर्धारीत वेळ केवळ पाच - सात मिनिटाचा दिलेला. तेव्हा यजमान संस्था व चर्चासत्राचा विषय या अनुषंगाने निवेदन करायचे होते. कमितकमी शब्दात अचूक व समर्पकपणे निवेदन हवे होते. ''उच्च शिक्षण क्षेत्रातील शिखर संस्था म्हणून यू.जी.सी. ची मान्यता सर्वश्रुत आहे. या यू.जी.सी. च्या मार्गदर्शक निर्देशाप्रमाणे ग्रामीण भागात उच्चशिक्षण देणारी आमची एक संस्था वेगळी आहे. आमचे हे वेगळेपण अनुभवण्यासाठी आपण आमचे निमंत्रण स्वीकारावे. यू.जी.सी. ने दिलेल्या प्रत्येक पैश्याच्या विनियोगाचे साक्ष देणारे इन्फ्रास्ट्रक्चर व चर्चासत्र, परिषद किंवा कार्यशाळा आयोजनातील आमचे परिश्रम आपल्या समोर सादर करण्याची आमची इच्छा आहे. कृपया आपण आमचे निमंत्रण स्वीकारावे ही आग्रहाचे विनंती.''

निवेदन पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाच्या व संस्थेच्या संदर्भाने डॉ. थोरात यांचे कुतूहल जागे झाले. म्हणून पाच – सात मिनिटाची मर्यादित वेळ केव्हाच संपली आणि चर्चा पंचवीस तीस मिनिटे झाली. ही आठवण नमुद करण्याचे प्रयोजन असे की, कोणत्याही सार्वजनिक उपक्रमाचे आयोजन करताना आम्ही संस्थात्मक, प्रशासकीय आणि सामुहिक क्रियाशीलतेच्या सर्व क्षमतांचा वापर ध्येयपूर्तीसाठी करणे हा आमचा स्वभावधर्म आहे, म्हणून अर्धशतकाच्या वाटचालीत महाविद्यालयाने चर्चासत्र, परिषदा व कार्यशाळांचे आयोजन करणे आपली मूलभूत गरज असून ती पूर्ण करणे कर्तव्य मानले आहे. चर्चासत्र, परिषदा किंवा कार्यशाळांचे आयोजन करताना संस्था व महाविद्यालयाची एक सुनिश्चित भूमिका राहिली. विशेषत: त्यातील प्रदर्शनीय थाट – माट टाळता येईल तेवढा टाळायचा. कुणाचीही गैरसोय होणार नाही अशी निवास व भोजन व्यवस्था करणे – तसेच चर्चासत्र, परिषद किंवा कार्यशाळेचे कामकाज नियोजना प्रमाणे चालवणे. यामुळे सहविचार – सहचिंतन आणि विचार सर्जनाचा प्रवाहीपणा सहभागी प्रतिनिधी आणि उपस्थित अतिथींना चित्तवेधक वाटत असे. त्यांचे अभिप्राय – प्रतिसाद प्रतिक्रिया आमच्यासाठी मोलाच्या आहेत. महाविद्यालयाने आयोजित केलेली चर्चासत्रे, परिषदा आणि कार्यशाळांचा आलेख आसा आहे.

## विविध चर्चा सत्रांचे आयोजन

| | State/National/ International | Title | Duration | No. of Participants | Total Expenditure |
|---|---|---|---|---|---|
| Seminar | Two Days State Level Seminar (UGC) | "Plant Pathology" | 28$^{th}$ and 29$^{th}$ Oct. 1993 | 80 | |
| | One Day | Curriculum Development and Restructuring of the syllabus in the different Science Subject | 16th Feb. 1997 | | 25000/- |
| | Two Days State Level Seminar (UGC) | "Emerging Trends in Curriculum and Teaching Methods in Physics" | 6$^{th}$ and 7$^{th}$ February, 2007 | 49 | 60,022 |
| | Two Days State Level Seminar (UGC) | "Judicial Activism " | 15$^{th}$ & 16$^{th}$ March, 2008 | 70 | 1,13,670 |
| | One Day Seminar (Arthshastra Marathwada Parishad) | The Strong Points of Economical Growth of Parbhani District | 13$^{th}$ Dec.2008 | 42 | 25,700 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Seminar | National Seminar (ICHR) | Revolt of 1857 & Its Impact on Hydrabad Mukti Sangram | 07th March 2009 | 37 | 28,454 |
| | National Seminar(UGC) | Funding for Higher Education: Challenges & strategies. | 14th & 15th March 2009 | 35 | 65,525 |
| | One Day State Level Seminar (UGC) | "Soil Crises in Marathwada: Pollution and Conservation" | 18th Feb 2010 | 146 | 54,048 |
| | One Day Seminar (SRTMU) | "Changing Focus of Higher Education" on | 28th March 2010 | 34 | 22,380 |
| | One Day State Level Seminar (UGC) | "Animal Bio - Diversity and Environment" | 05th March 2011 | 147 | 65,000 |
| | National Seminar (NAAC) | Academic & Administrative Audit. | 10th March 2016 | 104 | 96,499 |
| | One Day Seminar (SRTMU) & Swami Ramanand Teerth Institute, Aurangabad | A Comperative Study of Higher Education In Maharashtra & Marathwada | 17th Feb 2018 | 54 | 46,224 |
| Conference | Two Days State Level Conference (UGC) | "Social & Cultural Movement in Parbhani District | 11th and 12th Jan. 1997 | 85 | |
| | Two Days State Level Conference (UGC) | "Globalization and Higher Education in Inida. | 9th and 10th Jan. 2006 | 90 | |
| | State Level Conference (UGC) | The Impact of Globalization on Rural Entrepreneurship in India | 16th & 17th Jan. 2009 | 63 | 56,378 |
| | Marathwada Economics Parishad's | 28th Annual Conference of Marathwada Arthshastra Parishad on the Subject of Welfare Economics , 11th five year Plan, Malnutrition in Maharashtra | 20th & 21st Feb 2011 | 136142814 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Conference | Two Days National Conference | Samkalin Hindi Natak tatha Rangmanch: B Hartiyata Ke Sandarbh Me' | 12-13 Feb 2013 | 148 | 1,44,376 |
| | State Level Conference (UGC) | Fish Bio-Diversity and Environment | 13th March, 2015. | 80 | 72,286 |
| | State Level Conference (UGC) | Relevance of Swami Vivekananda's Thoughts in 21th Century | 30th - 31st January, 2015. | 167 | 1,63,952 |
| | National Conference (UGC) | Contemporary Indian Politics and Relevance of Gandhian Thought | 30th January 2017 | 140 | 127485 |
| | One Day Conference (Marathwada University) | Dr. Babasaheb Ambedkar & Mahatma Fule yanchya vicharamule Marathwadayt zalele prbodhan | 1993 | | 3000.00 |
| | Two Days State Level Conference (UGC) | Curriculum Development and Restructing of the syllabus in the different Science Subject | 15-16 February 1997 | | 25000.00 |
| | Two Days State Level Conference (UGC) | Feasibility of a Common Format of Higher Education | 15th 16 February 2003 | | 50000.00 |
| | Two Days State Level Conference (UGC) | Globlisation and Indian Higher Education : Polices and Challanges | 9th 10 Jan 2006 | | 50000.00 |
| Workshops | Two Days Workshop (For Students) | Hind Swaraj | | 95 | 25,968 |
| | Workshop | Women Human Rights: One day workshop on 'Human Rights of Women: Current Scenario and Remedies for Women Empowerment' | 14th March 2013 | | 4,900 |
| | Workshop | Yuvak Yuvati Netrutva Vikas Shibir | 15th & 16th Feb 2014 | 150 | 64,890 |
| | One Day Workshop | Marathi (BATY) Optional Subject New Syllabi | 17th July 2015 | 69 | 59,000 |
| | One Day Workshop | Women's Sexual Harassment at work place | 27th Feb. 2017. | 125 | 7,000 |

# प्रेरणाची सुवर्णकांती

**'प्रेरणा' नियकालिकाच्या प्रवासाचा सुवर्ण महोत्सवी टप्पा**

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित, नूतन महाविद्यालयाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष विशिष्ट ध्येयाने स्थापन झालेल्या या संस्थेच्या ज्ञानवाटीकेतील महाविद्यालयरुपी महावृक्षाला बघता बघता ५० वर्षे होत आहेत. 'ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे' हे महाविद्यालयाचे ब्रिद विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी न बनविता त्यांच्यातील सुप्तगुणांना जागृत करुन 'ज्ञानार्थी' बनवून स्वाभिमानी राहायला शिकवते. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी हा उपक्रमशील, कृतीशील असण्याबरोबरच तो संवेदनायुक्त सृजनशील व्हावा यासाठी महाविद्यालय विविध अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रम राबवीत असते. या उपक्रमातील एक उपक्रम जो विद्यार्थ्यांना अभिव्यक्त करण्याची संधी देतो तो म्हणजे 'प्रेरणा' नियतकालिकाचा वार्षिकांक होय.

'प्रेरणा' वार्षिकांक नियतकालिकाचे उल्लेखनीय वैशिष्ट्ये म्हणजे, महाविद्यालयाच्या स्थापनेपासून (१९६८) ते आजपर्यंतचा (२०१८) अखंड, अविरत प्रवास. 'प्रेरणा' नियतकालिकाच्या प्रवासाचा हा दुसरा 'सुवर्ण महोत्सवी' टप्पा. पहिला टप्पा म्हणजे सन १९९२-९३ चे महाविद्यालयाचे 'रौप्य महोत्सवी' वर्ष. या रौप्य ते सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंतचे प्रकाशित 'प्रेरणा' वार्षिकांक नावाप्रमाणेच प्रेरक व प्रेरणादायी ठरावे असेच आहेत. रौप्य ते सुवर्ण वर्ष या दोन तपातील 'प्रेरणा' अंक विविध विषयांवर, समस्यांवर, तत्कालीन घटनांवर वैचारिक मंथनाद्वारे हृद्य पथप्रदर्शन करणारेच आहेत. प्रस्तुत 'प्रेरणा' नियतकालिक वार्षिकांकाचे आणखीन एक वैशिष्ट्ये म्हणजे यातील लेखक, संपादक विद्यार्थीच आहेत. मार्गदर्शक प्राध्यापक-संपादकाच्या साथीने मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ललित, ललितेत्तर साहित्याचे सर्जन आहे. सोबतच महाविद्यालयातील उपक्रमशील गुणवंत विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कौतुकाचा आढावा घेणारे प्रेरक असे अहवालही त्यामध्ये असतात.

सन १९९२ -९३ चा 'प्रेरणा' वार्षिकांक हा 'रौप्य महोत्सवी विशेषांक' या नावाने प्रकाशित झाला. यात महाविद्यालयाची २५ वर्षापर्यंतची वाटचाल कशी होती. या संदर्भातील सिंहावलोकन केले आहे. रौप्य महोत्सवी वाटचालीपर्यंत महाविद्यालयाच्या जडघडणीचा आलेख आहे. मान्यवरांच्या शुभेच्छा संदेशाबरोबरच नूतन महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवाची पायाभरणी करणारा इतिहासही प्रस्तुत अंकातून आलेला आहे.

**सन १९९३-९४ चा प्रेरणा वार्षिकांक**

३० सप्टेंबर १९९३ ची रात्र संपूर्ण महाराष्ट्राला विशेषत: मराठवाड्याला दु:खाचा धक्का देणारी होती. रात्री गणपती विसर्जनानंतर संपूर्ण महाराष्ट्राला भूकंपाचा जोरदार धक्का बसला. या भूकंपाची तिव्रता लातूर येथील किल्लारी परिसरात भयावह, अशी होती. महाविद्यालयातील संवेदनशील विद्यार्थ्यांच्या भावनिक मनाला मोकळी वाट करुन देण्याच्या हेतूने प्रस्तुत 'प्रेरणा' अंकात विद्यार्थ्यांनी 'भूकंप' या विषयावर लेख, कविता, विचार लिहून त्यांच्यातील संवेदनशील मनाचा भावाविष्कार केला. याशिवाय १९९३-९४च्या या अंकात 'डंकेल प्रस्तावावर साधक बाधक चर्चा करणारे लेख,' यूगप्रवर्तक स्वामी विवेकानंदाच्या प्रेरणादायी विचारावर ही प्रस्तुत अंकात विद्यार्थ्यांचे लेख आहेत. या प्रेरणा वार्षिकांकाचे मुखपृष्ठ मनाला चटका लावण्याबरोबरच नैसर्गिक संकटाचा एकजुटीने सामना करण्याचा संदेश देते.

'प्रेरणा'चा १९९४-९५ चा वार्षिकांक हा

महात्मा गांधीजींची १२५वी जयंती निमित्ताने, 'महात्मा गांधी शतकोत्तर रजत जयंती विशेषांक' म्हणून प्रकाशित झाला. महात्मा गांधीजींच्या प्रेरणादायी विचारावर आधारित विद्यार्थ्यांनी वाचन करुन लेखन केलेले दिसते. 'आजच्या बदलत्या, एकांगी व आग्रही वैचारिक गोंधळामध्ये महात्मा गांधीजीचा विचार तरुणांना एकत्र जोडणारा आहे.' हा संदेश प्रस्तुत अंकातील विविध लेखांच्या मांडणीवरुन जाणवतो. एकुणच 'समग्र गांधीजी विचार दर्शनच' या अंकाद्वारे होते.

सेलू हे शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय संपन्न ऐतिहासिक चळवळीचा वारसा असलेले शहर आहे. यापेक्षाही सेलूची ओळख महत्त्वाची बाजारपेठ अशी ही आहे. खरेतर सेलूमध्ये उपजिल्हाधिकारी, पोलिस उपअधिक्षक यांची कार्याल्य व उपकोषागार अधिकारी, दुय्यम निबंधकाचे कार्यालय, विविध राष्ट्रीयकृत बँकासह इतरही सर्व महत्त्वाचे शासकीय विभाग सेलूत आहेत. तरीही सेलूला अधिकृतपणे तालुक्याचा दर्जा नव्हता. या पार्श्वभूमीवर सेलू शहर व परिसरातील नागरिकांनी सेलू तालूका जाहीर करावा म्हणून प्रदीर्घकाळ जनांदोलनंही केली. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष १९९४ - १९९५ मध्ये सेलू तालुका जाहीर झाला. या ऐतिहासिके घटनेची स्मृति अधोरेखित करण्यासाठी महाविद्यालयाने १९९५-९६ चा प्रेरणा वार्षिकांक हा सेलू तालुका विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला. या अंकात नव्यानेच स्थापन केलेल्या सेलू तालुक्याचे भौगोलिक क्षेत्रफळ या परिसरातील कृषीजन संस्कृतीचे स्वरुप व विशेषांकाची चर्चा करण्यात आली आहे.

**अनुवाद विशेषांक ( १९९६-९७)**

प्रतिवर्षी एखादया वेगळ्या विषयाला वाहिलेला वार्षिकांक हे वैशिष्ट्ये सांभाळत १९९६-९७ या वर्षीचा अनुवाद विशेषांक आपले वेगळेपण दाखवून देतो. सुप्त गुणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या लेखन व भाषिक कौशल्याचा विकास व्हावा या हेतूने प्रस्तुत अंकात नवोदितांना लेखनांसाठी प्रोत्साहित केले. तसेच अंकाच्या स्वरुपाला उपयुक्त अशी अनुवाद कार्यशाळाही घेण्यात आली. मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेतील साहित्यवेचे निवडून अनुवादात्मक विचार व ललित लेखन खूपच प्रेरणादायी झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या मानसिक शारीरिक व बौद्धिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकासाकडेही महाविद्यालयातील अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रमाद्वारे लक्ष दिले जाते. याची प्रचिती देणारा १९९७-९८ चा 'राष्ट्रीय गीत विशेषांक' वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून भारतीय स्वातंत्र्य चळवळ, राष्ट्राची प्रतिके, स्वातंत्र्यवीर यांच्या कार्यकर्तृत्त्वाचे प्रेरणादायी गीत गाणारा हा विशेषांक स्फूर्तीदायी असा आहे.

' परभणी जिल्ह्याचे शैक्षणिक मागासलेपण' यावर भाष्य करणारे लेख १९८८-९९ च्या एकतिसाव्या प्रेरणा अंकाचे वैशिष्ट्य आहे. विचार मंथन या शैक्षणिक मागासलेपणाच्या जबाबदार घटकांच्या संदर्भात सामुहिक शैक्षणिक चळवळीद्वारे प्रयत्न करुन हे मागासलेपण दूर करावे असे आवाहन या अंकातील निवडक लेखाद्वारे केल्याचे दिसून येते. शिवाय हिंदी व इंग्रजी विभागातील प्रभावी व्यक्तिमत्त्व यावरील व्यक्तिविशेष लेखही वाचणीय आहेत.

१९९९-२००० च्या प्रेरणेतून 'प्रेमसंदेश' देण्याचा प्रयत्न गेला. यातील लेखांद्वारे विद्यार्थी मनाला प्रेमांकुर फुटलेला असून प्रेमकविता, प्रेमकथा, प्रेमपत्रे याद्वारे या अंकाने वाट करुन दिलेली दिसते. प्रेमावर आधारित विशेषांक नसला तरी जवळपास सर्वच लेख प्रेमावर असल्याने त्यास 'प्रेमांकुर' विशेषांकच म्हणावा लागेल. इंग्रजीतील 'Students, Parents and Teacher's' व हिंदीतील 'इक्कीसवी सदी और सांस्कृतिक चुनौतिया' हे लेख विशेष वाटले.

राजीव गांधीनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांनी भविष्यातील एकविसाव्या शतकाचा वेध घेताना

हे शतक संगणकयुग असेल . असा विचार करुनच भविष्याचे नियोजन करण्याची त्यांनी आवश्यकता अधोरेखित केली होती. त्या नंतरच्या काळात वेगवान घडामोडी घडत गेल्या. माहिती तंत्रज्ञान क्रांतीला जागतिकीकरणाचे परिशिष्ट जोडले गेले. जागतिकीकरणाचा अटळ परिणाम असलेले खाजगीकरण व उदारीकण यामुळे काही अटळ परिणाम कुणालाच टाळता न येणारे या पार्श्वभूमीवर २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाचा अर्थात एकविसाव्या शतकातील पहिलाच अंक 'एक विसाव्या शतकातील आव्हाना'चा आगाज करणाऱ्या प्रश्न समस्यांचा शोध घेणारा आहे.

या पुढील दोन वर्षात प्रेरणांचे विशेषांक प्रकाशित न करता नेहमीचे सृजनशील साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. नियतकालिकाचे वेगळेपण म्हणजे 'निसर्ग विशेषांक' हे होय. निसर्गापासून दूर चाललेल्या आजच्या तरुण पिढीस निसर्गातील विविध घटकांद्वारे आकर्षित करण्याचा प्रयत्न प्रस्तुत 'निसर्ग विशेषांकातून दिसून येतो.' मराठी भाषा विभागात पाच वृक्ष - तीन वेली, निसर्ग मित्रांच्या मुलाखती, निसर्ग संवर्धन आदी विभागावर लेखमालेतून निसर्गाकर्षण निर्माण करणारा हा छत्तीसावा अंक आपले वेगळेपण जपवून ठेवतो.

'भूमीचे मार्दव सांधे कोंभाची लवलव' याची प्रचिती करुन देणारा २००४-०५ चा 'जलभूमी संवेदना' विशेषांक विद्यार्थ्यांना संवेदनशील बनविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. या संवेदनशील हळव्या मनातूनच उद्याचे सृजनशील अंकुर उमलत असतात. सध्या महाराष्ट्र, भारत नव्हे तर संपूर्ण जगालाच भेडसावत असणाऱ्या अनेक समस्यांपैकी महत्त्वपूर्ण समस्या म्हणजे जल समस्या (पाण्याची) व भूमी (मृदेची) समस्या होय. या समस्येवर संवेदनशीलतेने भावी पिढीने आत्मचिंतन करावे हा उदात्त हेतू प्रस्तुत विशेषांकाचा वाटतो. २००३-०४ व २००४-०५ या दोन वर्षाच्या प्रेरणा अंकाच्या संदर्भाने एक निरिक्षण नोंदवावे वाटते. अंकाच्या गुणात्मक व दर्जा संदर्भाने संपादकांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. विशेष म्हणजे परभणी येथील विद्यमान कै. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील मृदाविज्ञान विभागाच्या सहकार्याने केलेले माती परीक्षण विषयक लेखन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. नाईकसर व डॉ. रंजन गर्गे यांच्या मुलाखतीवर आधारलेले निसर्गरुपाचे सौंदर्यलक्षी अर्थ विवरण वैशिष्टयेपूर्ण आहे. याची प्रचिती या अंकाच्या मुखपृष्ठावरुनच येते. 'मातीवरील उभारलेल्या कोळ्याच्या जाळ्यात अनमोल असे जलबिंदु संरक्षित व संवर्धित करण्याचा प्रयत्न केलेला आहे' असे बोलके मुखपृष्ठ या अंकाचा हेतू स्पष्ट करते.

आता विश्वात्मकें देवें । येणे वागयज्ञ तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।

पूर्ण विश्वात्मक देवतेला, सृष्टीतील जीवसमुहासाठी प्रार्थना करणारा प्रेरणेचा २००५-०६चा 'प्रार्थना विशेषांक' होय. मराठी, हिंदी, इंग्रजी वा अन्य भाषेतील थोर साहित्यिकांच्या 'प्रार्थना' विषयावरील कविता, कथा, लेख याचे आस्वादक संकलन, परीक्षण हीच या अंकाची वेगळी ओळख.

आपला विद्यार्थी हा ज्ञानसंपन्न होवून आपल्या आवडत्या क्षेत्रात सक्रिय होण्याबरोबरच तो ज्या समुह, समाज घटकांत राहतो तेथील एक सुसंस्कृत व जबाबदार घटक म्हणूनही त्याने कार्य करावे. असे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर रुजवण्याचे कार्य प्रेरणेतील विविध विषयस्पर्शी वार्षिकांकाने केले आहे. २००६-०७ चा 'धर्मसंवेदना विशेषांक' याचीच पावती देतो. प्रस्तुत अंकात 'धर्म आणि मानव', विविध धर्मवेत्यांचे धर्म विचार, तत्त्वज्ञान, धर्मनिरपेक्षता आणि सर्व मानव समुहांना जोडणारा 'मानवताधर्म' या विविध विषयांचा उहापोह प्रस्तुत 'धर्मसंवेदना' विशेषांकात आला आहे.

२००७-०८ चा प्रेरणेचा ४०वा अंक असेच

व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून वेगळेपण जपणारा विशेषांक आहे. या विशेषांकात 'पर्यावरण संवर्धन' या विषयी एकंदर 'ग्लोबल वॉर्मिंग' ला जबाबदार घटकांवर आधारित वाचन, मनन, चिंतन करुन आपले विचार व्यक्त केले आहेत. यात जीव – सजीव सृष्टी, उर्जा – उर्जेचे स्त्रोत, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवाची या बाबतीतील कर्तव्य व संवेदनशील जबाबदारी, विद्यार्थ्यांना लक्ष द्यायला लावणारी आहे. प्रस्तुत अंकात वैचारिक लेख, कविता व लक्षवेधक चित्राद्वारे 'वसुधैव कुटुंबकम्' चा संदेश दिला आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती व दिवंगत थोर वैज्ञानिक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत : २०२० महासत्ता बनणार यावर महाविद्यालयातील भावी नागरिक असलेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासपूर्ण वाचन, चिंतनयुक्त लेख असणारा २००८–०९चा 'प्रेरणा' विशेषांक 'भारत एक महासत्ता' या विषयांवर आहे. भारताला एक विश्वातील महासत्ता बनविण्यासाठी युवकांचे योगदान काय असणार ? जबाबदारी काय असणारी ? योगदान काय ? या विषयी वैचारिक लेख ही या अंकाची वैशिष्ट्ये आहेत.

मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी, कलावती शास्त्रज्ञ, विविधगुणी नटते मी... संस्कृति मी जणु समुर्त, स्त्री माझे नाव... अशी अंकाच्या मलपृष्ठावर कवयित्री संजिवनी मराठे यांची कविता स्त्री शाक्तिचा गौरव करणारी आहे. मुखपृष्ठावर असणारे स्त्री चे मुख अबोल नसून बोलके आहे. हा २००९–१० चा 'स्त्री शक्ती विशेषांक' स्त्री कर्तृत्त्व, पराक्रमाचे गीत, पोवाडे गाणारा असा आहे. यात स्त्रियांच्या कार्यकर्तृत्त्वाचा आलेख, विविध लेख, कविता, कथा, ललित लेखांद्वारे आकर्षक असा बनला आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्ष झाल्याचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी ज्यांचे समर्पण आहे. अशा थोर व्यक्तींच्या स्मृतिस अर्पण असलेला २०१०–२०११ चा 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र विशेषांक' विशेष दखल घ्यावा असा आहे. भारतातील एक अग्रेसर राज्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्याची गेल्या ५० वर्षा पासूनची वाटचाल, येणाऱ्या काळातील अपेक्षित कार्य याचा ऊहापोह प्रस्तुत अंकात करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आता पर्यंतच्या वाटचालीतील योगदान देणाऱ्याची गौरवगाथाच प्रस्तुत अंकातील विविध लेखांद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सेलू हे तालुक्याचे ठिकाण जरी असले तरी महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. तालुक्याच्या शैक्षणिक चळवळीचे केंद्र असणाऱ्या महाविद्यालयाने ग्रामीण संस्कृतीशी घट्ट असे नाते जोडले आहे. सन २०११–१२ च्या प्रेरणा वार्षिकांकाद्वारे याला पुष्ठी मिळते. कारण या वर्षीचा विशेषांक 'ग्रामीण संस्कृती विशेषांक' आहे. या अंकात ग्रामीण जीवन, संस्कृती, शेती, ग्रामीण जीवनाला प्रभावीत करणाऱ्या विविध बाबी विषयी प्रस्तुत विशेषांकात लेख, कथा, बोलीतील शब्द, कविता आदीद्वारे ग्रामीणता व तिचे सामर्थ्य जपण्याचा छोटासा प्रयत्न प्रस्तुत अंकाद्वारे केला गेलेला दिसतो. स्वामी विवेकानंद यांनी म्हटल्याप्रमाणे 'ज्ञानाला विज्ञानाची व विज्ञानाला ज्ञानाची जोड असल्याशिवाय कोणताही समाज उन्नत होऊ शकत नाही. महाविद्यालयाचा २०१२–१३ चा वार्षिककांक विज्ञानाकडे केवळ शास्त्रीय दृष्टीने न पाहता संवेदनशीलतेने पाहिल्यावर समाजजीवनाचे कल्याणच विज्ञानाद्वारे होते याची विद्यार्थ्यांना शिकवण देणारा, वैज्ञानिक दृष्टीकोणाचा, पुरस्कार करणार 'विज्ञान संवेदना' हा विशेषांक आहे. यात मान्यवरांच्या मुलाखतीबरोबरच 'मानव व विज्ञान' यांच्या सहसंबंधावर आधारित लेख लिहले आहेत.

भारतीय सिनेसृष्टीला १०० वर्षे झाल्याचे औचित्य म्हणून २०१३–२०१४ चा वार्षिक विशेषांक 'भारतीय सिनेसृष्टीची १०० वर्षे' या नावाने प्रकाशित झाला. यात सिनेसृष्टीशी संबंधीत गीतकार, कलाकार,

कथाकार आदींच्या महाविद्यालयानील विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखती, हे या अंकाचे वेगळेपण सांगता येईल. २०१४-१५ हे वर्ष राजकीय उलथापालथाचे, बदलाचे वर्ष याची दखल 'राजकीय संवेदना विशेषांक' या प्रेरणेच्या अंकाने घेवून राष्ट्रीय, राज्य पातळीपासून स्थानिक राजकीय स्थितीचा विचार वेध या अंकातील लेखकांनी घेतला आहे. मुखपृष्ठावरील राजकीय प्रेरणेचे प्रतिक असणाऱ्या 'गांधी टोपीला' स्वार्थी मुंगळ्यांनी कसे कुरतडून टाकले आहे याचा संवेदनशीलतेने भावी पिढीने विचार करावा हा संदेश प्रस्तुत विशेषांक देतो.

२०१५-१६ चा 'सामाजिक न्याय विशेष' असो की सुवर्णमहोत्सवी वर्षाचा. पूर्वीचा 'प्रसार माध्यमे' विशेषांकांने आपले वेगळेपण जपलेले दिसून येते.

महाविद्यालयाच्या या वार्षिकांकाच्या दर्जेदारपणाचे कौतुक विद्यापीठस्तराकडून दिलेले उत्कृष्ठ वार्षिकांक पुरस्कार असो की यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांकडून उत्कृष्ठ नियतकालिक म्हणून दिलेले पुरस्कार एक - दोन नव्हे तर बऱ्याच वेळेस सन्मान उत्साहवर्धक आहेत.

'प्रेरणा' वार्षिकांकात अहवाल हे मोजक्या व वाचनिय अशा शब्दरचनेत येतात. त्याच बरोबर प्रेरणेची दखल अनेकांनी घेतली आहे. त्यात वर्तमानपत्र असो की प्रतिष्ठीत साहित्यिक सतीश काळसेकर यांच्या 'वाचणाऱ्यांची रोजनीशी' या साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ग्रंथात 'प्रेरणा' अंकाचा वाचनीय नियतकालिक म्हणून उल्लेख आला आहे. खरोखरच १९६८ पासून अखंड चालू असलेल्या 'प्रेरणा' या नियतकालिकाच्या वार्षिकांकाच्या प्रवासाचा १९९२-९३ चे 'रौप्य महोत्सवी' वर्ष हा पहिला टप्पा व 'रौप्य महोत्सवी' वर्षापासून ते २०१८ चे सुवर्ण महोत्सवी वर्ष हा दुसरा टप्पा प्रेरणादायी आहे. या प्रवासाच्या संदर्भाने सांगायचे तर महाविद्यालयाचा वार्षिकांक म्हणजे सुवर्णकांती स्वरुपाचाच असणार म्हणून तर अनेक मान्यवरांना आमच्या अंकाचे प्रकाशन केंव्हा या बाबत निरंतर कुतूहल वाटत असते.

मार्गदर्शक प्रा. रोडगे संभाजी हरिभाऊ

सहलेखक - संपादक केदारे

## 'प्रेरणा' वार्षिकांस मिळालेले पुरस्कार

| ACADEMIC YEAR | THEME OF PRERANA | HONOUR OF PRERANA | |
|---|---|---|---|
| | | Swami Ramanad Teerth Marathwada University, Nanded. | YASHWANTRAO CHAVHAN PRATISHTHAN, MUMBAI |
| 2003-2004 | Nature | Third prize | ———————— |
| 2007-2008 | Environment Protection | First prize | State level first prize |
| 2009-2010 | Honour to Female Strength | Third prize | State level third prize |
| 2010-2011 | Golden Jubilee Year of Maharashtra(50years) | Third prize | State level third prize |
| 2011 - 2012 | Rural culture | First prize | State level second prize |
| 2013 - 2014 | Indian Cinema | First prize | State level Consolation prize |
| 2014 - 2015 | Political sensitivity | Second prize | |
| 2015 - 2016 | Social Justice | Third prize | State level second prize |
| 2016 - 2017 | Social Media | Third prize | ———————— |

# राष्ट्रीय सेवा योजना

**नियमित कार्यक्रम १९९२-२०१८**

महाविद्यालयीन युवकांची शक्ती विधायक कार्य करण्यासाठी व त्याच्या मध्ये सामाजिक जाणिवांची निर्मिती व्हावी या करीता आमच्या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापन करण्यात आली. रा.से.यो. चे दोन मुख्य भाग एक म्हणजे नियमित कार्यक्रम व दुसरा विशेष वार्षिक शिबीरांचे आयोजन नियमित कार्यक्रमामध्ये श्रमसंस्कार, स्वच्छता रॅली, थोर समाजसुधारकांच्या जयंती-पुण्यतिथी दिनविशेष, राष्ट्रीय सण उद्‌बोधन शिबीर कार्यक्रमा व्यतिरिक्त वेगवेगळेविशेष कार्यक्रम आमच्या महाविद्यालयात आयोजित केले जातात.

विशेष नियमित कार्यक्रम.

१९९३-९४ या वर्षी विशेष नियमित कार्यक्रम रा.से.योजनेला २५ वर्ष पूर्ण झाल्यामूळे हे वर्षे रा.से.योचे रौप्य महोत्सवी वर्षे म्हणून साजरे केले. परभणी जिल्ह्यातील निवडक स्वयंसेवका करिता उद्‌बोधन शिबीराचे आयोजन केले. ९ महाविद्यालयानी यात सहभाग नोंदवला. याच वर्षी लातूर येथील भूकंपग्रस्त भागाला दोन विद्यार्थ्यांनी भेटे देऊन मदत केली. दि. २४ ते ३१ ऑगस्ट दरम्यान दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय पातळीवरील 'राष्ट्रीय एकात्मतेकरिता युवती' या शिबीरात प्रा. बायस यांचा सहभाग होता.

१९९६-९७ महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार १९९६-९७ या वर्षा पासून कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर रा.से.योजनेची सुरूवात झाली. याच वर्षी 'एड्स प्रबोधन शिबीर' घेण्यात आले.

१९९७-९८ ५ सप्टेंबर रोजी सेलू राहरातील आदर्श शिक्षकांचा सत्कार रा.से. योजनेच्या वतीने करण्यात आला.

१९९८-९९ परभणी येथे राष्ट्रीय एकात्मता फेरी मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग 'पल्सपोलिओ मोहिम' सेलू शहरात राबविण्यात व प्रचार प्रसार करण्यात विद्यार्थ्यांचा सहभाग 'जागतिक एड्स विरोधीसप्ताहा' चे आयोजन. निसर्ग मित्र मंडळ स्थापन करण्यात आले.

१९९९-२००० कारगिल या मोहिमेतील लष्करी जवानाना मदत करण्यासाठी रा.सेयो. विद्यार्थ्यांनी मदत फेरी काढली. तसेच पल्स पोलिओ मोहिम यशस्वीपणे राबविली.

२०००-२००१ रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. गुजरात मध्ये झालेल्या भूकंप पिडितांसाठी मदत म्हणून सेलू शहरात मदत फेरीचे आयोजन.

२००१-२००२ - महाविद्यालय परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. ५ सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिन पूर्व परेड चाचणीसाठी कु. वैशाली भारस्वाडकर हिची गुजरात येथे राज्य पातळीवरील प्रशिक्षणासाठी निवड. तसेच डॉ. शरद कुलकर्णी यांची रा.से.यो. सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड. व स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेडच्या वतीने कार्यक्रमाधिकारी प्रा. रामदास जायभाये यांना जिल्हा पातळीवर उत्कृष्ठ कार्यक्रमाधिकारी पुरस्कार.

२००३-०४ रानडे आंतर महाविद्यालयीन वाद विवाद स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. विशेष शिबीर कार्यशाळा २७-२८ सप्टेंबर २००३ रोजी रा.से.यो. जिल्हा ग्रामस्वराज समिती, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. शरद कुलकर्णी यांची जिल्हा समन्वयक म्हणुन नियुक्ती.

२००४-०५ - २५ व २६ नोव्हेंबर रोजी अश्वमेध क्रीडा स्पर्धा निमित्त लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागरण अभियान सुरु करण्यात आले. २६ जानेवारी रोजी इंडोनेशिया भूकंपग्रस्ताच्या मदतीसाठी मदत रॅली काढण्यात आली. रा.से.यो. पथकाने गिताई यात्रेचे स्वागत केले.

२००५-०६ माजी स्वंयसेवकाचे मनोगत हा एक वेगळा उपक्रम घेण्यात आला. रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. युवा स्वच्छता दूत निवासी प्रशिक्षण शिबीर १८-१९ जानेवारी २००६ रोजी घेण्यात आले. राष्ट्रीय युवा सप्ताह पटना (बिहार) शिबीरासाठी फारूकी मोहमद सगीर यांची निवड. बीड येथील राज्यस्तरीय शिबीरात विद्यार्थ्यांचा सहभाग. जिंतूर येथे नेतृत्व विकास शिबीर (जिंतूर) येथे विद्यार्थ्यांचा सहभाग. युवती ता. औराद येथे आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा सहभाग.
२००६-०७ २४ सप्टेंबर रा.से.यो. स्थापना दिवस निमित्ताने हरितसेना व गर्ल गाईड यांच्या सहकार्याने शोभायात्रा काढण्यात आली.

२००७-०८ गांजर गवत निर्मूलन उपक्रम. सागवान वृक्ष संवर्धन, रक्तदान शिबीर, स्वातंत्र्य सैनिक आत्मकथनाचे आयोजन. शहिद भगतसिंग जनशताब्दी रॅली.

२००८-०९ रा.से.यो. उत्कृष्ट स्वंयसेविका पुरस्कार कु. मिरा गजमल हिला मिळाला व आकाशवाणी केंद्र, परभणी येथे युवावाणी कार्यक्रमात मुलाखत, हदगाव पावडे येथे युवा स्वच्छता दूत शिबीर.

२००९-१० १७ ते २४ सप्टेंबर २००९ विद्यापीठ जनजागरण सप्ताहा निमित्त, सेलू शहरातील बोअरवेल पुनर्भरण सर्वेक्षण करण्यात आले. के.के.एम. मानवत येथे संपन्न झाले. त्यामध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

२०१०-११ २८-८-२०१० रोजी प्रजासत्ताकदिन संचलन निवडपूर्व तयारी जिल्हा स्तरावर निवड शिबीर. विद्यार्थ्यांचा सहभाग. कु श्रद्धा शाममोहन त्रिपाठी प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड, जोगदंड ऋषीकेश यांची नॅशनल युथ फेस्टीव्हल उदयपूर निवड चाचणीसाठी सहभाग.
२०११-१२ बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी येथे युवक-युवतींचे सक्रिय सहभाग विद्यार्थ्यांचा सहभाग.

२०१२-१३ २४ जुलै २०१२ पॅरालिगल ट्रेनिंग व अँटी रॅगिंग कायदेविषयक शिबीर. वसमत येथे गांधी विचारदर्शन दोन दिवसीय युवा शिबीर विद्यार्थ्यांचा सहभाग.

२०१३-१४ रक्तदान विषयावर डॉ. जोग यांचे मार्गदर्शन एड्स जनजागरण रॅली चे आयोजन. युवा दिनानिमित्त युवकांची व्यसनाधिनता याविषयावर व्याख्यान आयोजित

२०१४-१५स्वच्छ भारत अभियानांतर्गत सेलू शहरात स्वयंसेवकांनी स्वच्छता रॅली काढली. मतदान जनजागरण रॅली चे आयोजन. पल्स पोलिओ शिबीर मोहिमेत विद्यार्थ्यांचा सहभाग.

२०१५-१६ - मा. पोलिस उपअधिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गणेश विसर्जनाची निमित्त शांतता बैठक घेण्यात आली. एड्स दिनानिमित्त व्याख्यान व रॅलीचे आयोजन.

२०१६-१७ संत गाडगेबाबा पूण्यतीथी निमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. व्यसनमुक्ती विषयावर व्याख्यान.

२०१७-१८ - आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यात स्वयंसेवकानी भाग घेतला. स्वच्छता अभियानातंर्गत, सेलू नगरपालिका यांच्या वतीने स्वच्छता ॲप विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष वार्षिक शिबीर – १९९२ ते २०१८

| शै. वर्ष | शिबीराचा विषय | गाव | दिनांक |
|---|---|---|---|
| १९९१–९२ | सारक्षतेकरीता युवक | अहेर बोरगाव | १३ नोव्हेबरते २२ नोव्हेंबर |
| १९९२–९३ | साक्षरतेकरीता युवक | धामनगाव (गुगळी) | २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर |
| १९९३–९४ | राष्ट्रीय एकात्मतेकरीता युवक | जवळा जिवाजी | २४ डिसेंबर ते ०२ जानेवारी |
| १९९६–९७ | पाणलोट क्षेत्र विकासासाठी युवक | गुगळी धामणगाव | २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर |
| ११९७–९८ | पाणलोट क्षेत्र विकासासाठी युवक | ढेंगळी पिंपळगाव | १६ जानेवारी ते २५ जानेवारी |
| ११९८–९९ | पाणलोट क्षेत्र विकास व पडीत जमिनीच्या विकासातून चिरंतन विकास | साळेगाव | २९ डिसेंबर ते ७ जानेवारी |
| १९९९– २००० | व्यक्तिमत्वाचा चौफेर विकास | साळेगाव | २० ते ३० नोव्हेंबर |
| २०००–०१ | निरोगी समाजासाठी युवक | शिराळा | ३० नोव्हेंबर ते ९ डिसेंबर |
| २००१–०२ | हरियालीसाठी युवक | सोन्नी | ३ जानेवारी ते १२ जानेवारी |
| २००२–०३ | जलसंवर्धनासाठी युवक | ढेंगळी पिंपळगाव | २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर |
| २००३–०४ | स्वच्छतेसाठी युवक | आहेर बोरगाव | २४ डिसेंबर ते २ जानेवारी |
| २००४–०५ | आपत्कालीन व्यवस्थापन व जलसाक्षरतेसाठी युवक | धनेगाव | २४ डिसेंबर ते २ जानेवारी |
| २००५–०६ | आपत्कालीन व्यवस्थापनासाठी युवक | सोनवटी | ८ डिसेंबर ते १७ डिसेंबर |
| २००६–०७ | समृद्ध भारतासाठी सुदृढ युवक | निपाणी टाकळी | १९ डिसेंबर ते २८डिसेंबर |

| | | | |
|---|---|---|---|
| २००७–०८ | समृद्ध भारतासाठी सुदृढ युवक | कवडधन | २३ नोव्हेंबर ते २ डिसेंबर |
| २००८–०९ | समृद्ध भारतासाठी सुदृढ युवक | चिकलठाणा (खुर्द) | १२ आक्टोबर ते २१ आक्टोंबर |
| २००९–१० | पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन | रवळगाव | १८ जानेवारी ते २४ जानेवारी |
| २०१०–११ | पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन व आरोग्य स्वच्छता | हातनूर | २७ डिसेंबर ते २ जानेवारी |
| २०११–१२ | पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन आरोग्य व स्वच्छता | जवळा जिवाजी | ७ जानेवारी ते १३ जानेवारी |
| २०१२–१३ | पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन आरोग्य व स्वच्छता | जवळा जिवाजी | २२डिसेंबर ते २८ डिसेंबर |
| २०१३–१४ | पर्यावरण व नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धन आरोग्य व स्वच्छता | जवळा जिवाजी | १६जानेवारी ते २२ जानेवारी |
| २०१४–१५ | – | | |
| २०१५–१६ | – | | |
| २०१६–१७ | पर्यावरण व नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धन आरोग्य आणि स्वच्छ भारत अभियाना करीता युवक | कुंडी | २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी |
| २०१७–१८ | पर्यावरण व नैसर्गीक साधन संपत्तीचे संवर्धनासाठी स्वच्छ भारत अभियान विशेष युवक | कुंडी | १४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी |

**विशेष**

उत्कष्ट स्वंयसेविका पुरस्कारासाठी उषा वानखेडे, मिरा गजमल व तुळजा पवार यांची निवड

२००४–०५ प्रा.रामदास जायभाये यांना महाराष्ट्र शासनाचा व विद्यापीठाचा उत्कृष्ठ कार्यक्रमाधिकारी पुरस्कार

२००४–०५ महाराष्ट्र शासनाचा महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ठ पथक पुरस्कार

# ग्रंथालयाची वाटचाल

ग्रंथालय हा कुठल्याही शिक्षण संस्थेचा आत्मा असतो असे म्हटले जाते. कुठलीही संस्था ही ग्रंथालयाशिवाय परिपूर्ण होऊ शकत नाही. या न्यायाने संस्थेच्या विकासात ग्रंथालयाचा मोलाचा वाटा असतो असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

रौप्य महोत्सवी वर्ष १९९२-९३ ते सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१७-१८ या मागील पंचवीस वर्षात विश्वातील सर्वच क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाने जो अमूलाग्र बदल घडवून आणला आहे त्याला शिक्षण क्षेत्र अपवाद राहिले नाही. तसेच ग्रंथालयावरही त्याचा मोठा प्रभाव पडल्याचे आपण पाहतो. वाचन साहित्य, वाचकांची अभिरूची, माहितीचे संप्रेषण यात माहिती तंत्रज्ञानामुळे मोठा बदल झालेला आहे. या सर्व बदलांना स्वीकारून ग्रंथालय संगणकीकृत करण्यात आले असून ग्रंथ नोंदणी, ग्रंथ देवघेव इ. अनेक कामं हे संगणकाच्या मदतीने आजरोजी पार पाडली जात आहेत. महाविद्यालयाचे ग्रंथालय तालुका स्तरावरचे महत्वपूर्ण ग्रंथालय असून ग्रंथालयाचे कामकाज पूर्ण करतांना ग्रंथव्यवहाराची पाचसूत्रे ग्रंथालयीन पंचसूत्राचे पालन करण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी कटिबध्द आहेत.

**ग्रंथालयाची इमारत:** महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या वेळी ग्रंथालयाची इमारत नेमकीच पूर्ण होवून ग्रंथालय नवीन इमारतीमध्ये सुरू झाले होते. मागील २५ वर्षात या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर अतिशय अद्ययावत फर्निचर असलेला वाचनकक्ष विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आला असून याची क्षमता १०० विद्यार्थी बसू शकतील एव्हढी आहे. वाचनकक्ष तथा अभ्यासिका ही महाविद्यालयाची एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख झाली आहे. या वाचनकक्षाचे श्रेय सौ. वर्षा डोंगरजकर व सौ. वरूणा अ. कुलकर्णी यांना जाते. त्यांनी त्यांचे वडील तथा सेलू येथील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै. कि. भ. चारठाणकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन लाख रूपयांची देणगी दिली. त्यात महाविद्यालयाने भर घालून विद्यार्थ्यांसाठी सुंदर व अद्ययावत असा वाचनकक्ष तयार केला. सदरील वाचनकक्षास कै. कि. भ. चारठाणकर वाचनकक्ष असे नाव देण्यात आले. तिथे विद्यार्थ्यांसाठी वर्तमानपत्रे, विविध नियतकालिके तसेच विद्यापीठ परीक्षांच्या जुन्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच सदरील वाचनकक्ष सायंकाळी ०६ ते ०९ या वेळेत सायंकालीन अभ्यासिकेसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**ग्रंथालयातील ग्रंथसंपदा**

ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहात मागील २५ वर्षात झालेली वाढ खालील तक्त्यात आपणास दिसून येते.

**ग्रंथसंग्रह: एक दृष्टिक्षेप**

| विभाग | १९९१-९२ | २०१७-१८ | वृद्धी |
|---|---|---|---|
| वरिष्ठ महाविद्यालय ग्रंथालय | २४२६० | ४२७३० | १८४७० |
| वरिष्ठ महाविद्यालय पुस्तकपेढी | ५५६३ | ८९६५ | ३४०२ |
| कनिष्ठ महाविद्यालय ग्रंथालय | १५४७ | ५३८३ | ३८३६ |
| कनिष्ठ महाविद्यालय पुस्तकपेढी | २८९८ | ७१२२ | ४२२४ |
| वर्तमानपत्रे | १३ | २५ | १२ |

**ग्रंथालय संगणकीकरण:**

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात ज्याप्रमाणे माहितीचे स्वरूप आज बदलले आहे, त्याचप्रमाणे माहिती मिळविण्याच्या पध्दतीसुध्दा बदलल्या आहेत.

या बदलाला ग्रंथालयाने समर्थपणे स्विकारले असून याचाच भाग म्हणून ग्रंथालयाचे संगणकीकरण केले आहे. संगणकीकरणासाठी INFLIBNET या राष्ट्रीयस्तरावरील स्वायत्त संस्थेने तयार केलेल्या SOUL 2.0 या आज्ञावलीचा वापर करण्यात आला आहे. सदरील आज्ञावली करीता माजी प्राध्यापक कै. डॉ डी. पी. कवठेकर व माजी प्राचार्य डॉ. व्ही. के. कोठेकर यांनी संपूर्ण आर्थिक मदत केली.

सोल या आज्ञावलीतील Online Public Aceess Catalogue (OPAC) च्या माध्यमातून हव्या असलेल्या वाचन साहित्याचा शोध घेतला जातो. तसेच सदरील वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध आहे अथवा नाही याचा शोध घेता येतो. या OPAC साठी लागणाऱ्या संगणकापैकी एक संगणक तत्कालीन शिक्षक आमदार श्री. विक्रम काळे यांनी त्यांच्या स्थानिक विकास निधीतून उपलब्ध करून दिला आहे.

विविध विषयावरील ऑनलाइन पुस्तक / नियतकालिक चालू काळात फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. मानव संसाधन विकास मंत्रालयाने INFLIBNET NLIST च्या माध्यमातून ५१००० पेक्षा जास्त ऑनलाइन पुस्तक तसेच २१००० पेक्षा जास्त ऑनलाइन नियतकालिक उपलब्ध करून दिले आहेत. ग्रंथालय या योजनेचे २०१० पासून नियमित सदस्य असून त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना सदरील ज्ञान भांडार खुले झाले आहे.

**ग्रंथालय सेवाः** सध्या ग्रंथालयामार्फत खालील सेवा दिल्या जातात.

१ ग्रंथ देवघेव

२ सुसज्ज वाचनकक्ष

३ प्रतिलिपी सेवा

४ बुक बँक सेवा

५ वर्तमानपत्र कात्रण सेवा

६ संदर्भ सेवा

७ प्रचलित जागरूकता सेवा

८ सायंकालीन अभ्यासिका वाचक सभासदत्व

**ग्रंथालयीन उपक्रमः** संदर्भ ग्रंथ आणि अभ्यासपुरक तथा क्रमिक पुस्तकाने ग्रंथालयाची कपाट भरलेली असणं ही ग्रंथालयाची भौतिक समृध्दी झाली. त्याचे मोल कुणी नाकारणार नाही. पण त्याचा लाभ घेणारे लाभार्थी ग्रंथालयात येणे, त्यांनी वाचन करणे व केलेल्या वाचन अभ्यासावर संवाद, चर्चा करणे महत्वाचे आहे. या दृष्टीने ग्रंथालयाने अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर उपक्रमाच्या अंमलबजावणीत केलेले कार्य देखील तसेच महत्वपूर्ण आहे. त्यातील काही ठळक उपक्रमाबाबत काही सांगता येईल. विविध प्रसंगाचे औचित्य साधून ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात येते. तसेच दरवर्षी ०९ ऑगस्ट रोजी् ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरी केली जाते. विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी व वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता यावा यासाठी ग्रंथालयाने २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धेचे आयोजन सुरू केले, असून सदरील स्पर्धेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. वाचक संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी ग्रंथालयामार्फत वाचक संवाद यांसारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी सूचना फलकावर दररोज नव्या सुविचारासहित शैक्षणिक अभ्यासक्रम, करिअरच्या संधी, नोकरी / भर्तीविषयक माहिती लावण्यात येते.

**बहि:स्थ वाचकः** :- महाविद्यालयात प्रवेश नसलेल्या तसेच स्पर्धा परीक्षा वा इतर परीक्षेची

तयारी करणाऱ्या बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी / वाचकांसाठी, शिक्षकांसाठी ग्रंथालयातर्फे बहि:स्थ वाचक योजनेअंतंतर्गत सदस्यत्व देण्यात येते. मागील पंचवीस वर्षात पदवी तसेच पदव्युत्तरस्तरावर २०७ विद्यार्थ्यांनी, सेट/नेट तथा संशोधनाकरीता ५७ जणांनी स्पर्धा परीक्षेकरीता ६३ विद्यार्थ्यांनी व अद्ययावत वाचनाकरिता ६० शिक्षक तथा वाचकांनी या योजनेचा लाभ घेतला.

**दूर्मिळ ग्रंथसंग्रह व बांधीव खंड:-**

**दूर्मिळ ग्रंथ**

- भारताची राज्यघटना Constitution of India calligraphed edition with signatures of constituent assembly members.
- Young India या गांधीजींनी चालविलेल्या साप्ताहिकोचे १९२१ व १९२७ सालचे बांधीव खंड
- **हरिजन** या महात्मा गांधीजींनी चालविलेल्या साप्ताहिकाची १९७३ साली अमेरिकेच्या गार्लेंड पब्लिशिंग कंपनीने सिध्द केलेली १९ खंडात्मक यथामूल पुर्नमुद्रित आवृत्ती
- **Constitument Assembly debates** (घटना समितीच्या कार्याचे इतिवृत्त)
- आपले वेद आपली पुराणे २५ खंड प्रसाद प्रकाशन, पुणे
- भारतीय संस्कृती कोश १० खंड संपा. महादेवशास्त्री जोशी
- भारतीय समाज विज्ञान कोश संपा. स.मा.गर्गे
- गो.स.सरदेसाई कृत मराठी रियासत ८ खंड संपा. गर्गे
- Forest Flora of the Bombay Presidency 2nd Vol.1911
- Flora of Marathwada by N.N.Naik
- Indias struggle for Independence Visuals & Document Published BY N.C.E.R.T.
- Dr. Babasaheb Ambedkar \ Writings & Speeches
- Sardar Patels Correspondence 10 Vols.
- समग्र लोकमान्य टिळक
- समग्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर
- समग्र सेतू माधवराव पगडी
- समग्र महात्मा गांधी
- आमच्या महाविद्यालयातील लेखकांची ग्रंथसंपदा.

**बांधीव खंड**

१. धर्मयुग : १९६८ ते १९९०
२. अस्मितादर्श : १९७२ ते २०१७
३. अंधश्रध्दा निर्मुलन वार्तापत्र : २००० ते २०१६
४. विकल्पवेध : २००६ ते २०१५
५. अनुष्टुभ : १९७९ ते २००९
६. आलोचना : १९६८ ते २०१७
७. अर्थसंवाद : १९८६ ते २०१३
८. अनुभव : २०१० ते २०१४
९. समाज प्रबोधन पत्रिका : १९६७ ते २०१७
१०. भारतीय इतिहास आणि संस्कृती : १९६९ ते २००८
११. महाराष्ट्र साहित्य पत्रिका : १९६९ ते २००६
१२. जलसंवाद : २००५ ते २०१७
१३. अंतर्नाद : २०११ ते २०१६
१४. अक्षरगाथा : २०११ ते २०१६
१५. शेतकरी : १९६९ ते २००५
१६. शेतीभाती : १९७७ ते २००९
१७. सत्यकथा : १९६८ ते १९८२
१८. आजकल :१९८४ ते १९९३

१९. पुर्वग्रह : १९८९ ते २००२
२०. ग्राहकहित : २००० ते २०१७
२१. साक्षात्कार : १९८९ ते २००४
२२. योजना : १९७३ ते २०११
२३. नवभारत : १९६८ ते २००५
२४. लोकराज्य : १९६९ ते २०१७
२५. उद्योजक : १९९२ ते २०१६
२६. विज्ञान युग : १९६८ ते २००१
२७. साधना : १९६८ ते २०१७
२८. स्त्री : १९६८ ते २०१२
२९. किर्लोस्कर : १९६८ ते २००९
३०. ललित : १९६५ ते २०१७
३१. शिक्षण आणि समाज : १९७९ ते २०१२
३२. मैत्रीच्या पलीकडे : १९७४ ते २०११
३३. संशोधक : १९९० ते २०१६
३४. ग्रंथ परिवार : १९९३ ते २०१२
३५. युगवाणी : १९७२ ते १९९४
३६. प्रतिष्ठाण : १९५७ ते २०१०
३७. शिक्षण संवर्धन : १९७७ ते २०१२
३८. पंचधारा : १९८३ ते २०१५
३९. मराठी संशोधन पत्रिका : १९६८ ते १९७१

40. Seminar ë 1968 to 2016
41. Eastern to Economist - 1968 to 2012
42. Indian Literatures - 1986 to 2001
43. Quest - 1968 to 2004
44. The Quest -1997 to 2012
45. Indian Journal of Chemistry - 1973 to 2002
46. The Indian Journal of Public Administration - 1979 to 1989
47. Indian Journal of Political Science - 1980 to 2002
48. Journal of Constitution of Parliamentary Studies - 1968 to 1983
49. Bulletin of Marathwada Math Society - 2007 to 2017
50. Physical Education - 1984 to 2010
51. Electronic for you - 1998 to 2017
52. Commerce - 1976 to 1989
53. Down to Earth - 2002 to 2012
54. Economics of Political Weekly - 1969 to 2009
55. University News - 1969 to 2017
56. ICSSR Journal of Abstracts and Revalues Pol -1997 to 2001
57. The Journal of Indian Writing In English - 1996 to 2017
58. Biology Education - 1980 to 2016
59. Indian Journal of English Studies - 1963 to 1989
60. Media and Technology for Human Resources Development - 1985 to 1993
61. Indian Journal of pure & Applied Physics - 1974 to 1989

**मान्यवरांच्या भेटी :**– मा. कुलगुरु डॉ. जनार्धन वाघमारे, डॉ सर्जेराव निमसे, डॉ. धनंजय येडेकर, डॉ. पंडीत विद्यासागर, .डॉ. विजय पांढरीपांडे, मा. डि. एन धनागरे, साहित्यिक सौ. इंदुमती जोधळे, विठ्ठलरावजी जाधव, श्री. बा.बा.कोटंबे, श्री. आसाराम लोमटे, श्री. अशोक नायगावकर, प्रा. दासू वैद्य, प्रा.गणेश आवटे, मा.राजन गवस, लेखक केशव देशमुख, श्री रुस्तुम अचलखांब. कै गंगाधर पानतावणे, कवी श्री. पी. विठ्ठल, नागनाथ कोत्तापल्ले, श्री यु.म. पठाण, श्री. उत्तम कांबळे, प्रा. प्रल्हाद लुलेकर, तसेच श्री. लक्ष्मीकांत देशमुख तथा मा. भालचंद्र मुणगेकर, आमदार विक्रमजी काळे, मा. आ. संजीवनी रायकर, मा. आ. मोहनराव सोळके, विविध क्षेत्रातील मान्यवर श्री नवीनचंद्र रेड्डी, श्री विजय अण्णा बोराडे, प्राचार्य अनिरूध्द जाधव, शिक्षण संचालक डॉ. के. एम. कुलकर्णी, मा. डॉ. अरुण निगवेकर, श्री. अण्णा हजारे, श्री. अजित अभ्यंकर. ॲड. प्रसन्न भवराळे, न्यायाधिश बी. आर गवई , श्री अखिल खान, श्री. रामलू पारे, श्री. दत्तप्रसाद दाभोळकर, डॉ. सुनंदा रोडगे, श्री विजय रणदिवे, मा. जिल्हाधिकारी श्री. मोहन ठोंबरे, मा. अग्रवाल गंगाप्रसादजी, ,डॉ. देवधर

आनंद, श्री. दिपक टिळक, न्यायमूर्ती भाकरे, डॉ. कांगणे सुरेश, ऍड. एकनाथरावजी आव्हाड, वृत्त निवेदिका कविता राणे, डॉ. उदय निरगुडकर, पत्रकार श्री. विश्वंभर चौधरी, मा. श्री. नरेंद्र चपळगावकर. प्रा. किशन चोपडे, डॉ. निवेदिता जोशी, प्रा. जयदेव डोळे, श्री. सुधाकर सुरडकर, यांच्या समवेत अनेक मान्यवरांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला सदिच्छा भेट देवून कौतूक व मार्गदर्शन केले.

**भावी योजना :-** भूतकाळात काय घडले ते सहजपणे सांगता येते . पण भविष्यात काय घडेल किंवा आपण काय करू शकू ते सांगता येत नाही. पण डोळस व दृष्ट्या व्यक्ती भविष्याबाबत काही स्वप्न बाळगतात. तसे आम्ही ग्रंथालयाच्या भावी वाटचाली संदर्भाने कोणती स्वप्ने बघत आहोत या संदर्भाने अगदी संक्षेपाने सांगावे वाटते ते असे.

- ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह वर्धिष्णू असल्यामुळे ग्रंथालयासाठी वाढीव इमारत बांधून पुढील काळासाठी उपलब्ध करून देणे.
- प्राध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष उभारणे.
- बदलत्या मल्टिमिडिया व डिजीटल स्वरूपातील वाचन साहित्यासाठी अद्ययावत असा स्वतंत्र कक्ष स्थापन करणे.
- ग्रंथालयाची स्वतंत्र वेबसाईट तयार करून त्या माध्यमातून डिजीटल स्वरूपातील वाचन साहित्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देणे
- वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन संदर्भ सेवा देणे.

## गुणवंत विद्यार्थ्यांची यादी

### औरंगाबाद विभागातील इयत्ता १२ वी बोर्डाच्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील महाविद्यालयाचे विद्यार्थी १९७६-२००६

| अ.क्र. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | शाखा | Rank |
|---|---|---|---|---|
| १ | १९७७ | देशमुख संजीव गोविंदराव | विज्ञान | १ |
| २ | १९७८ | कोंडपल्ले उदय माणिकराव | विज्ञान | ४ |
| ३ | १९७८ | गिरीशंत अरुणमित्र उमरखेडी | विज्ञान | २७ |
| ४ | १९८० | सुनंदा श्रीकृष्ण मणियार | विज्ञान | १३ |
| ५ | १९८१ | राजेश प्रभाकरराव पारवेकर | विज्ञान | १४ |
| ६ | १९८४ | सिद्दीकी घौरी | विज्ञान | १५ |
| ७ | १९८४ | राजेश जगदिशप्रसाद गुप्ता | वाणिज्य | १० |
| ८ | १९८५ | शहा संजय | विज्ञान | २९ |
| ९ | १९८५ | गोयल पापालाल जियालाल | विज्ञान | २२ |
| १० | १९८६ | हितेश प्रविणभाई मेहता | वाणिज्य | ९ |
| ११ | १९८७ | श्रीनिवास पद्माकर महाजन | विज्ञान | १५ |
| १२ | १९८७ | राहूल रमेश खरवडकर | विज्ञान | २३ |
| १३ | १९८८ | संजयकुमार श्रीकिशनजी सोमाणी | विज्ञान | १९ |
| १४ | १९९० | दिपक कांतीलाल मोमय्या | वाणिज्य | ९ |
| १५ | १९९१ | प्रिया प्रभाकर कलकर्णी | विज्ञान | २१ |
| १६ | १९९१ | रश्मी राजेंद्र गिल्डा | विज्ञान | २४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | १९९२ | शेटे पंकज रतन | विज्ञान | ८ |
| १८ | १९९२ | कवठेकर रोहित दिनकर | विज्ञान | १३ |
| १९ | १९९४ | अमिताभ नारायणराव कडतन | विज्ञान | ८ |
| २० | १९९४ | विजय आत्माराम बिडवे | विज्ञान | १५ |
| २१ | १९९५ | भंडारी प्रिती अमृतलाल | विज्ञान | २ |
| २२ | १९९५ | दंडे ज्येती रमेश | विज्ञान | ४ |
| २३ | १९९८ | नागरे पल्लवी विठ्ठलराव | विज्ञान | २३ |
| २४ | १९९९ | सुहास ललितादास जवळेकर | विज्ञान | ३ |
| २५ | १९९९ | रविंद्र रामचंद्र सुभेदार | विज्ञान | २० |
| २६ | १९९९ | मंदार मोहन आनंदगावकर | विज्ञान | २३ |
| २७ | २००० | घवले तुषार गंगाधर | विज्ञान | १३ |
| २८ | २००० | वाकडीकर मनोज मधुकर | विज्ञान | १८ |
| २९ | २००१ | कलकर्णी निखिल नंदकुमार | विज्ञान | २० |
| ३० | २००२ | खेडकर कांचनकुमार रंगनाथ | विज्ञान | ९ |
| ३१ | २००२ | डख अश्विनी विठ्ठलराव | विज्ञान | १९ |
| ३२ | २००३ | भाबट अंजली भाऊराव | विज्ञान | १५ |
| ३३ | २००४ | देशपांडे अपुर्व अशोकराव | विज्ञान | ५ |
| ३४ | २००४ | मगर अमोल आबासाहेब | विज्ञान | १४ |
| ३५ | २००५ | मेहता आशिष ओमप्रकाश | विज्ञान | ९ |
| ३६ | २००५ | खेडकर पवनकुमार रंगनाथ | विज्ञान | १७ |
| ३७ | २००५ | नागोरी वरुण विजेंद्र | विज्ञान | १९ |
| ३८ | २००६ | बाहेती मनोरमा शिवनारायणजी | विज्ञान | ६ |
| ३९ | २००६ | राजूरकर प्रियंका राजीव | विज्ञान | १३ |
| ४० | २००६ | देऊळगावकर आनंद बाबुराव | विज्ञान | १९ |

## विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | शाखा | गुणानुक्रमे |
|---|---|---|---|---|
| १ | १९६८-६९ | मणियार सुरेश श्रीकृष्ण | पी.यु.सी. विज्ञान | विद्यापीठात व्दितीय |
| २ | १९७२-७३ | मणियार श्याम श्रीकृष्ण | पी.यु.सी. विज्ञान | विद्यापीठात चतुर्थ |
| ३ | १९७५-७६ | डख विठ्ठल रामराव | पी.यु.सी. वाणिज्य | विद्यापीठात प्रथम |
| ४ | १९७५-७६ | मंत्री गोविंद राधाकिशन | पी.यु.सी. वाणिज्य | विद्यापीठात तृतीय |
| ५ | १९८४-८५ | कु.हेलवाडे रोहिणी मनोहरराव | विज्ञान तृतीय | विद्यापीठात चतुर्थ |
| ६ | १९-८९-९० | काला प्रसंन्न प्रकाशचंदजी | बि. कॉम अंत्य | मराठवाडा विभागत पाचवा |
| ७ | २०१४-१५ | कु मणियार प्रियंका राजेंद्र | बि. कॉम व्दितीय | इंग्रजीत विषयात विद्यापीठात प्रथम |
| ८ | २०१६-१७ | कु बुरखुंडे वंदना भगवानराव | विज्ञान तृतीय | वनस्पतीशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम |

# विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी

माजी विद्यार्थी संसद प्रतिनिधी

१९६८-६९ ते २०१६-१७

१९६८-६९ एस.के.आरकुले
एस.बी.गिल्डा
बी.एस.माने
कु.उषा कुमार

१९६९-७० विनोद व्ही कापसे
अशोक व्ही. मानवतकर

१९७०-७१ लक्ष्मण पदमावत
अरुण कुलकर्णी
एस.एस.राठोड
कु. मंगला सुमळे

१९७१-७२ डी.एम. सहस्त्रबुध्दे
जे.एस.राठी
कु.एस.एम. अभ्यंकर
एस.के.महाजन

१९७२-७३ श्रीनिवास झंवर
दिंगबर लहाने
शंकर खोला

१९७३-७४ एम.व्ही.देशपांडे
डी.एस.मगर
टी.एस.बोराडे
कु.हर्षबाला पटेल

१९७४-७५ कु.हेमलता मानवतकर
मधुकर कवळे

१९७५-७६ अच्युत वांगीकर
कु.मालिनी जोशी

१९७६-७७ ज्ञानेश्वर केवारे
कु.मिनाक्षी सोन्नेकर
राजेंद्र केवारे
संजय परळीकर

१९७७-७८ तुळशीराम चव्हाण
कु.वरुणा चारठाणकर
हेमंत आडळकर
बापु सोनटक्के
कु.सुनिता जोशी

१९७८-७९ रावसाहेब बुरेवार
अशोक धुमाळ
शिवाजी कवडे
कु.रजनी परळीकर

१९७९-८० लक्ष्मण तेलगड
बालकिशन झंवर
गोंविद शेळके
भगवान दिरंगे
कु.महानंदा जवळेकर

१९८०-८१ आर.एन.डख
रमेश बापुराव अस्वले
अंकुश शेषराव चव्हाण
ईश्वरलाल सुरजमल जैस्वाल
कु. उज्वला बापुसाहेब भरदम

१९८१-८२ गोंविद शेळके
बी.के. आळणे
एन.टी. हेलवाडे
पी.के.कुलकर्णी
कु.सुनिता दांडेकर

१९८२-८३ चंद्रशेखर नावाडे
कालीदास साळेगावकर
भगवान मुंढे
श्रीकृष्ण कातारे
संजय राजुरकर
कु. भावना कारेगावकर

**१९८३-८४ ते १९८८-८९ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विद्यार्थी संसद अस्तित्वात नव्हती.**

१९८९-९० दत्ता सोळुंके
संजय वाघ
अशोक वायाळ
कु. कल्पना कारेगावकर

१९९०-९१ तुकाराम भापकर
दिपक खराबे
मारोती राठोड
कल्याण पवार
कु.आशा नाईका

१९९१-९२ राजेश्वर नखाते
नितीन टकले
प्रकाश राठोड
राजेंद्र दिशागत
कु.स्वाती देऊळगावकर

१९९२-९३ कु.वैशाली राजुरकर
राजेश सोळंके
दिपक खराबे
राजू वाघ
कु.संगीता खराबे

२००९-१० कु.महाजन पुजा
कु. अनुसया जाधव

२०१३-१४ श्री. कृष्णा रोडगे
त्रिपाठी दामिनी
बिनायके राधिका

२०१४-१५ डासाळकर श्रीराम
कु.काळदाते पुनम

२०१५-१६ मगर अमोल

२०१६-१७

२०१७-१८ कु.मसुरे रिता
काळे अर्चना
कोकाटे शिल्पा शंकर

# राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती समिती द्वारा मूल्यांकन

महाविद्यालय आपल्या स्थापनेचा रौप्य महोत्सव साजरा करती होते. त्या काळात देशात नव्या अर्थनीती प्रमाणे 'खाऊजा' धोरणाचा अमल सुरु झालेला. याच धोरणाचा एक परिणाम शिक्षण तथा उच्च शिक्षणावर झाला. तो असा की, शिक्षण विषयक सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. पण गुणवत्तेच्या समस्या संदर्भाने आमच्या शैक्षणिक कार्य संस्कृतीच्या मूल्यमापनाची अपरिहार्यता जाणवत होती. ही बाब विचारात घेऊन केंद्र सरकारने National Assessment and Accredation council (NAAC) राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती समितीची स्थापना केली. ही घटना १९९४ सालची. या समितीने संस्थेच्या मूल्यांकनाचे सात निकष निश्चित केले होते. ते असे १) अभ्यासक्रमाचे स्वरुप २) अध्ययन, अध्यापन व मूल्यांकन ३) संशोधन, सल्ला व विस्तार कार्य ४) पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता व साधन सामुग्री ५) विद्यार्थी प्रगती, कल्याण, सहभाग संपर्क ६) संस्थेचे संघटन व व्यवस्थापन ७) आरोग्यदायी कार्यशैली. आमच्या संस्थेच्या विश्वस्थ व प्राचार्यांनी स्वत:च्या शैक्षणिक कार्यकर्तृत्त्वाचे निरंतर मूल्यांकन झाले पाहिजे ही भूमिका स्वीकारली म्हणूनच विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील तालुका स्तरावरील आमचे पहिले महाविद्यालय ठरले जे की, स्वयंस्फूर्तपणे मूल्यांकन करुन घेतले होते. ही घटना २००३ मधील आहे.

नॅकद्वारा पुनर्मूल्यांकन करुन घेणे ही बाब तशी आता अनिवार्य करण्यात आली होती. खरे तर या मुद्दयावर काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे वेतन अनुदान रोखले होते. पण इथे एक गोष्ट सांगण्या सारखी आहे की, संस्थेने व महाविद्यालयाने स्वयंस्फूर्तपणे २०१३ मध्ये ही पुनर्मूल्यांकनाची प्रक्रियापूर्ण केली. मूल्यांकनाच्या या दोन्ही टप्प्यावर महाविद्यालयास केवळ 'ब' श्रेणी मिळाली. ही बाब तशी कुणाला असमाधानकारक वाटू शकते. पण वास्तव असे की, तालुका स्तरावरील प्रत्येक महाविद्यालयाची स्थितीगती तशी सारखीच. काही महाविद्यालय मूल्यांकनास तयारच नव्हते. तेव्हा आम्ही मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतो ही बाब स्वत:ला शोधण्याची– तपासण्याची प्रवृत्ती हेच आमचे वेगळेपण आहे. आताही आम्ही मूल्यांकनाची तिसरी फेरी पूर्ण करीत आहोत.

# महाविद्यालयास प्राप्त पुरस्कार

**महाराष्ट्र शासन :**

- महाराष्ट्र शासनातर्फे प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार. (१९८६-८७)
- महाराष्ट्र शासनातर्फे नूतन विद्यालय शिक्षण संस्थेस आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार. (२००२.)
- महाराष्ट्र शासनातर्फे प्रा.रामदास जायभाये यांना राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार. २००५
- महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना पथकास उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना पथक पुरस्कार. २००५
- महाराष्ट्र शासनातर्फे प्रा. यादवराव गायकवाड यांच्या 'बौध्द् धम्माची नवी फसल' या ग्रंथास २००९ मध्ये व उत्कृष्ट मराठी वाङ्मय पुरस्कार 'सम्यक संवाद' या ग्रंथास २०११ मध्ये पुरस्कार प्राप्त.
- महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयाला 'जागर जाणिवांचा' या कार्यक्रमांतर्गत परभणी जिल्हा प्रथम पुरस्कार. २०१२-१३
- महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयाला 'जागर जाणिवांचा' या कार्यक्रमातंर्गत परभणी जिल्हा व्दितीय पुरस्कार. २०१३-१४

**विद्यापीठ :**

- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे महाविद्यालयाला उत्कृष्ट परीक्षा केंद्र पुरस्कार. २००५.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे प्रा. रामदास जायभाये यांना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार. २००४-२००५.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे महाविद्यालयाला उत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय पुरस्कार. २००८-०९.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांना 'जीवन साधना गौरव' पुरस्कार. २०१५-१६.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे उषा वानखेडे, मीरा गजमल, तुळजा पवार यांना राष्ट्रीय सेवा योजनेची 'उत्कृष्ट स्वयंसेविका' पुरस्कार प्राप्त.
- 'प्रेरणा' वार्षिक अंकास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर्फे नऊ पुरस्कार प्राप्त.

**इतर :**

- 'प्रेरणा' वार्षिक अंकास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे सहा पुरस्कार प्राप्त. (या पुरस्कारांची नोंद पृष्ठ क्र. १९९ वर आहे.)
- महाविद्यालयाच्या सुक्ष्मजीवशास्त्र विभागास 'सुक्ष्मजीवशास्त्र परिषद, भारत' यांच्या तर्फे राष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार प्राप्त.

**नॅक :**

- नॅक बंगलोरकडून मुल्यांकन २००३.
- नॅक बंगलोरकडून मुल्यांकन २०१३.

# Cultural Activities

**Introduction :** Nutan Mahavidyalaya emphasis on the overall development of the student and extracurricular activities plays vital role for the same. It has a huge heritage of cultural achievement since its establishment. Cultural activities lead the development of many important soft skills such as resource management, public speaking, morals, ethics and many more. 'Vaudeville' is without doubt the biggest and mostly awaited cultural programme being organized every year by the institute. The campus is well equipped with the necessary state of art infrastructure to facilitate all types of cultural activities. Present article is an over-view of Cultural activities by the institute since 1992 to 2018.

**Aims & Objectives:**

The principal objective is the conservation, preservation and dissemination of the mosaic culture of the State by implementation of multi-dimensional cultural activities and programmes:

a. Development and spread of language, literature and library services
b. Promotion of performing art of various genre as western, classical, traditional, Folk and Tribal in the field of music, dance & drama.
c. Providing social security to the artists in various fields living in indigent conditions.

CULTURALACTIVITIES:In various events, the students of Nutan Mahavidyalya tried their best to prove that they are well aware of their social & moral responsibilities. The issues like Exploitation in Education, Importance of Morals & Ethics, Patriotism, Communal Riots, Need for Global Citizenship, Environmental Issues etc. were smartly covered in different dramatic events. The dancing events were also based on various themes and were presented in a touchy way. The institute also inspires participation of the students in various state and national level cultural activities organized at different institutions and universities across the country.

Following are the Events which are organized by the college:

Music:- Solo Song , Duet Song , Group Song, Classical Vocal, Classical Instrumental

- Dance :- Solo Dance, Group Dance, Folk Dance
- Theatre :- Drama ,Skit, Mime, Mimicry
- Literacy Event :- Debate , Elocution
- Fine Arts :- On the spot painting, Rangoli

Reports in brief about cultural department of the institute are given in brief:

1991-1992: In Debate competition-Speech competition which was organised by Vyankat Swami Mahavidyalay ,Beed in collabration with Beed district Board Parbhani& K.K.M Mahavidyalay, Manvat

Mr.Dhondiram Mule and Mr.Martoti Kasab got second prize in Debate competition and Mr.Dhondiram Mule, Mr.MartotiKasab, Mr.PratibhaBorkar, Mr.Dyandev Lahane, Mr.Atul Dakh had participated in the same.

**1993-1994:** Debate competition was organised by Dr.BabasahebAmbedkar Art & Commerce college, Aurangabad Mr.Prashant Prakashrao Mule, Mr.Prakash Narayan Bhudarge, Mr.Gopal Sudharrao Pimpalgaonkar and Mr.Bhujang Mahadev Thore had participated in the competition.

1994- 1995: The achievement in the year 1994-95 is notable which is given below:

Debate competition-Speech competition organized in Parbhani: Mr.Prashant Mule ( 2nd prize), Mr.ArtiKulkarni (1st prize ), Mr. Vijay Sakalkar ( 2nd prize ) and Mr.Hanumant Khade (1st prize )

Whereas, Dr.Babasaheb Ambedkar intercollegiate Essay writing competition was organised by RajeshriShau Collage Latur and Miss. SangitaWayaland Mr.Keshav Sarkatehad participated. In the program organizedby the Environmental Association of Government of Maharashtra and Sarswati Bhavan College, Aurangabad Mr P.R.Bhutkar, Mr. A.B . Kulkarni, Mr. J. R. Akat, Mr. A. A. Ghule, Mr. J. K. Aghav, Mr. N. T. Sonawaneand Mr. Sunil Divte had

participated .

In Life insurance Policy of Maharashtra (Nanded) Mr.Arun Joshi and Mr. Sunil Divte participated. Chief forest office of Maharashtra , organised Biodiversity for human welfare in Nagpur in which Mr. J. O . Mr.Rajeshkumar Shehimal got 1st prize and Rasve received 3rd prize. Environmental Association of Selu( MS) organised walk-in bulletin competition and Mr AsaramSonavane got the second prize.

**2000-2001:** Bramhakumari Organization organised program for Vishwashantifrom 17th Aug 2000 to 19th Aug 2000, S.R.T.M.U. NANDED organised intercollegiate wrestling Competition at Palam in which Mr.Dipak Bangade, Mr. Sanjay More and Mr.Asaram Banaith had participated. SRTMU NANDED organised Women's Kabaddi competition from 25th to 27th Aug 2000 at Chaplitq, Chakur Dist. Latur, the selected students were Miss. SmitaShendge, Miss. MeeraSolankeand Miss. Vaishali Deshmukhfor camp). Miss. Vaishali Deshmukh selected for kabaddi coaching camp. In the same academic yearGirls volleyball team got the 1st prize to Miss. Smitashendge and Miss. Vaishali Deshmukin volleyball competition. K.K.M. collage Manwat organised intercollegiate table tennis competition, in that competition the team of Miss. Jayshri Vyas, Miss. Kalpana Ravte Miss. Muktai Chincholkarand Miss . Kavita Ghadge got the second prize and Mr.Yogesh Suryawanshi, Mr.Dipak Bagde, Miss. Smita Rodge, Miss. Meera Solanke and Miss. Vaishali Deshmukh participated in the same.

The college students received prize in Wrestling competition also in the same academic year as Mr.RamprasadPawde -1st prize), Mr. Ramesh Sonawane-1st prize and Mr.BhagwanMadgavne 2nd prize. At District level Wrestling competition Mr.Ramprasad Pawde won the 1st prize. Open Cycle Marathon Competition organised On the occasion of birthday of MLA Shri. HaribhauLahne in which Mr.UjwalKadam got 1st prize and Miss. PushpaChavan3rd prize.

**2001-2002:**From 17th to24th Sept. 20o2 Shaikshanik Janjagran Johalaorganized Essay writing competitionandMr. Mahesh Kulkarni received 1st prize**,** Mr.Pandharinath Raut 2nd prize **and** Mr.Nitin Kumbhkarn 3rd prize.

On 20 Sept., 2002 in Essay writing competition on the topic'Lokshahit Jatiya Salokhyache Mahatva' Mr.Pandharinath Raut Mr.Girish Joshi got 3rd prize. In singing competition Miss. Sangita Kulkarni got 3rd prize, and in Fancy Dress competition Mr.Gorakha Gore got 1st prize.

**2004-2005:**From 12th to 13gh Aug 2004 , ShahirAnnabhauSatheMahavidyalay, Mukhed organized intercollegiate Yoga Competition Girls team won the competition as Miss. DipaliGandham got 2nd prize, Miss. ArchanaYevle got 3rd prize, Miss. Manjusha Hinge, Miss. ArtiJhute, Miss. ShubhangiDhavle, Miss. ManjushaGheware, Miss Sangita Deshmukhand Miss. SunitaYadav had participated. In the same, Boys team including Mr.Sambhaji Rodge, Mr.Mahendra Joshi, Mr. Ganesh Amle, Mr.DadsahebBomble, Mr. Narayan Chaure, Mr.MukundSolanke, Mr. Mahesh BidkarMr.GajananUdawant won.

**25th Aug 2004:**D.S.M. College Parbhani organised intercollegiate table tennis competition, in that competition our team got third prize including Mr.NishnatDhapse, Mr.RohanRokhe, Mr.SandipLahane and Mr. Sachin Arvikar.

**6th to 9th Oct 2004:**BaliramPatil college Kinvat organised women's volleyball competition, in that competition our team got the 1st prize including Miss. ShilpaRodge, Miss. ShitalGondge**,** Mr.VinayaKulkarni, Mis. PriyankaGayakwad**,** Miss. VaishaliBharkhaukar**,** Miss. PritiKokar**,** Miss. KomalUdawant**,** Miss. ArchanaYevale, Miss . ArtiZuteandMiss. DipaliGandham

24th Oct 2004:C zone athletics game competitionStudents participated in that are Mr.ShyamLahane, Mr.Murli Kale , Mr. Rahim Shaikh, Mr. Hitesh Patel and Mr.Laxman Jadhav. Mr.Sandesh Rathod got 2nd prize, Mr.SujitMitkari got3rd prize. On Oct 2004Inter-collegiate sport competition at Javala Bazar in which Mr.Sandesh Rathod received 2nd prize.

**2005-2006:** From 14tb to 18th July 2005, Mount Abhu , Rajasthan discussion was organised on Body and mind- Fit and fine . Mr. Shankar Gandham attended the program.

SRTMU NANDED Organised intercollegiate Yoga competition on 11th to 12th Aug 2005 in which the team of our collage participated and won –their names areMiss.

DipaliGandham won 2nd prize, Miss. ArtiZute, Miss. ManjushaGheware, Miss. Sangita Deshmukh, Miss. Mohini Mahajan, Miss. Shubhangi Dhawleand Miss. JayashriNetam participatedin intercollegiate Yoga competition Boys team got the first prize (they got 4 times first prize in yoga competition-team members are-Mr. Mahesh Bidkar,Mr.Mahendra Joshi,Mr. Ganesh Amle, Mr.GajananUdawant, Mr. Narayan Chaure, Mr.MukundSolanke, Mr. Bharat Lavhaleand Mr.PandurangSolanke.In the intercollegiate table tennis competition on 15th to 16th Sept 2005Mr.Rohan Rakhe, Mr.YogeshAvinkar, Mr.Yogesh Deshpande, Mr.Govinda Bandewarand Mr.MilindKhadke had participated. Intercollegiate softball election test was organised on 27th to 28th 2005 Mr.Yogesh Deshpande, Mr.Amolzamkadeand Mr.Umesh Jadhav had participated. Intercollegiate 'C' zone Athletics games were organised at parbhani from 4th to 6th Oct. 2005In which Mr. Rahim Shaikh, Mr.LaxmanJadhav, Mr.Himesh Patel , Mr.Shyam Kharatand Mr.Shivshankar Kate had participated.

Yoga Competition( Akhilbhartiyapatali ) was held from 25th to 27th Oct 2005 at Udaypur , Rajasthan in which Miss. MohiniMahajan, Miss. SangitaDeshmukh, Miss. Manjusha Gheware, Mr.Mahendra Gheware, Mr. Ganesh Amleand Mr.Gajanan Udawant had participated. Dayanand College, Laturorganised intercollegiate women Volleyball competition from 13th to 15th Oct 2005 in which Miss. SupriyaRede, Miss. KalpanaChavan, Miss. ShakuntalaIngale, Miss.Anuja Deshpande, Miss. Sangita Kangane, Miss. SuvarnaRatnaparkhi and Miss. AnusayaFode had participated in it.

State level Tennis volleyball competition organised at Aurangabad from 28th to 29th Oct 2005 in which Miss. ShilpaRodge,Miss. Vinaya Kulkarni, Miss. Priyanka Gaikwad, Miss. SupriyaRede, Miss. ShakuntalaIngale, Miss.AnujaDeshpande, Miss. Suvarna Ratnaparkhi, Miss. Kalpana Chavan, Miss. Yogesh Deshpande, Miss. Sandip Lahane, Miss. Amol Zamkade, Miss. Maharudra Savane, Miss. VyankateshKakade and Miss. MukundGajmal had participated in it.District level intercollegiate softball competition were organised from 6th to 7th Sept 2005

In which Mr.VyankateshKakde,Mr. Imran Shaikh, Mr. Imran Pathan, Mr.MukundGajmal, Mr. Sanjay Shinde, Mr. Kadar Pathan, Mr.Prashant Ambhore, Mr.NitinMudada, Mr.Yogesh Dafure,Mr. Dinesh Musale,Mr. ShrikrishnaGhule, Mr.Dhiraj Jaiswal, Mr.Avinash Rathod,Mr. Vikas Fanse, Mr. Keshav Take had participated in it.

**2007 -2008:**SRTMU NANDED organised intercollegiate Table tennis from 13th to 14th Aug 2007Team got 2nd prize participated students are Miss. AmrutaDayma, Miss. KomalBaheti and Miss. RakhiDayma. Table tennis competition were organised at Parbhani on 3rd Oct 2007in whichMr.JiteshGhaytadak,Mr.RupeshMaslekar, Mr.RavikumarSurvase andMr.RohitKeware had participated. District level Fencing competition were organised at Tridhara , Dist, Parbhani on 1st Sept 2007 in which Mr.AzarudhinShaikh, Mr. Rajesh Kharat,Mr.DhiaKundanani, Mr.Imtiyaz Mohin, Mr. Rajesh Kharat, Mr. Salman Qureshi, Mr.Rajshekhar Khamnekar, Mr.Laxman Gaikwadand Mr. Harish Kundananihad participated in it. Pivisional intercollegiate kho-kho selection test organised at Parbhani on 24th Sept 2007 and Mr.Shete, Mr.Padmakar and Mr.Raju Mogare had participated.

Intercollegiate volleyball competition was organised at Selu, on 28th Sept 2007 and Girls team got 1st prize – names of girls areMiss. Nupur Magar, Miss. Swati KewareMiss. Anita Keware,Miss. SimaKharat, Miss. ShilpaKharat, Miss. KalpanaSarkale, Miss. Bhagysahree Jambure, Miss. Savita Jogdandand Miss. Punam Sangle. National defence academy Khadakwasla organised debate competition, speech competition on Movie Paramchakre on 7th Sept 2007 – the names of participants were Mr.Dilip Chavan, Mr.Tukaram Gaikwad, Mr.Yogesh Deshpande and Mr.Mukund Gajmal.

2008 -2009: S.R.T.M.U. NANDED organised intercollegiate Youth Festival at Sahyog Adhypak Mahavidyala Nanded on 6th Feb 2009 in which college team has participated. D.S.M. College Parbhani has organised intercollegiate Chess and Wrestling Competition Mr.Bhushan Khandvikar, Mr.Govind Vaidya, Mr. Yogesh Deshpande, Mr.Pankaj Borade, Mr. VishwajitParihar , Mr.Sudhakar Sarkate ,and Mr.Santosh Pardeshion 1st to 2nd Sept 2009 in which college team has participated.

College team got 2nd prize in table tennis and

Badminton competition on 23rd Aug 201 Mr.GajananTathe , Mr.Pavankumar Adhalkar, Mr. AnandIngole, Mr.Dipak Jorgewar , Mr.Imtiyaz Mo. ,Mr. Nikhil Murkute and Mr.Shrikant Deshmukh had participated.

**2011- 2012:** Marthwada Speech competition at Shivaji Mahavidyala, Parbhani . In that competition Miss. Divya Tripathi got the 1st prize(Rs.3001) in whole District in the month of Jan 2012**.**Statel Level Speech competition at Late. Raosaheb Jamkar college Parbhani , Miss. DivyaTripathi got 2nd prize (Rs. 2001) on 30th Jan 2012.

D.S.M college Parbhaniorganised 'C' Zone intercollegiate athletics sport games on 28th - 29th Sept 2011Mr. ImtiyazMoin , Mr.Arjun Rathkod, Mr.Vinod Rathod were the participant. Intercollegiate Softball competition at Shivaji Collage, Parbhani on 15th to 16th Jan 2012 in which Mr.Ravikumar Survase, Mr. AnandIngole, Mr.Amol Survase , Mr.Jitesh Ghaytadak, Mr. Rushikesh Ghaytadak, Mr. Dipak Jorgewar, Mr. Prakash Totre, Mr. Sanjay Singh Thakur , Mr.Abhishek Ghenke, Mr.Mukund Gajmal , Mr.Yogesh Vaidya, Mr.Shivaji Chavan , Mr.Imtiyaz Moin and Mr.Pankaj Chavanhad participated.

**2012 – 2013:**'C' zone Badminton tournament at B. Ragunath College Parbhani from 3rd to 4th Aug 2012, Mr.Imtiyaz Mo., Mr.DipakJorgewar, Mr.Amol Survase, Mr.Gopi Dehsmukh, Miss. Yogita Bhale, Miss. RuchaSaraf, Miss. Sapana Kulkarni, Miss. Radhika Loya, and Miss. Rashmi Kulkarniwere the participants. C' Zone Table tennis Competition at B. Ragunath Collage Parbhani , Mr.Ravikumar Survase , Mr.Gajanan Tathe, Mr. Krishna Rodge and Mr. Rahul Mehta participated on 3rd to 4th Aug 2012.

**2013-2014:** 'C ' zone Badminton tournament at B. RagunathCollege ,Parbhani on 8th Aug 2013Mr. AnandIngole ,Mr. Nikhil Magar ,Mr.AkashKande and Mr.DipakNiwalkar were the participants. Intercollegiate Girls Badminton tournament at ShivajiMahavidyalaRenapur , Dist, Latur on 23rd -24th Sept 2013 Miss. YogitaBhale ,Miss. SapanaKulkarni , Miss. DaminiTripathi ,Miss. PranjaliChavan and Miss. Gayatri Bhaleraohad participated.

Table tennis tournament was organizedon 12th Aug 2013 in which Mr. Krishna Rodge ,Mr.Rahula Mehta , Mr.AnandIngole , Mr.Nilesh Shinde and Mr. Rajesh Kharathad participated.

**2014 -2015:** C zone intercollegiate Volly-balll tournament at D.S.M. college Parbhani on 6th 7th Sept 2014Mr. RajvaibhavSahajrao , Mr.Dhananjay Kattekar , Mr.Swapnil Chavan , Mr.Satish Akat , Mr.Alim Shaikh , Mr. Mahesh Magar ,Mr.NileshRathod ,Mr.Niraj Bhandwale , Mr.Akshay Thalpati , Mr.Tushar Kakde Mr.Ubed Shaikh , Mr. Narayan Aghav and Mr.Vikas Dhapse had participated.

**2015 -2016:** C zone Kabaddi Tournament at D.S.M college Parbhani in which Mr.JivanSathe , Mr.SopaanMadne , Mr.Santosh Paul, Mr. Sunil Giri ,Mr. Anil Dhale, Mr. PrashantShinde , Mr.Shriram Bhind , Mr. Ganesh Late ,Mr.Shubham Pardeshi ,Mr.Nilesh Rathod and Mr.Gajanan Balatkarhad participated.

**2016 – 2017:** C zone Chess Tournament at SuryabhanjiMahavidyala, Purna DIST, Parbhani .Mr.NileshRathod ,Mr.ShubhamShahane , Mr.ShubhamDhage , Mr.PrakashMuasle and Mr.SohelGhourihad participated on 30th Aug 2016.Intercollegiate Fencing competition at M.C. Law College ,Nanded on 2nd Jan 2016 in which Mr.Nilesh Rathod , Mr. Ganesh Kawde, Mr. Amol Bodke and Mr.Vaibhav Malawadehad participated.

**2017-18: 2017-18** there were three events presented by the institution in university youth festival -2017-18 one sol table wadan by NirajVaishnav,skit-play consisting group of six students and one " One Act play competition" In one ACT play ku.Meghna Hemraj Joshi received third best Actress award. Nilu Phule Karnadak 2018 Spardha was organized by Rashta Seva Dal Pune, It was having four round as district, regional, final and 'Yuganuyuge' one act received grand finale second prize in this competition including one best acting one best light and one best stage arrangement. RupaliHarkalreceived first prize in speech competition at both level i.e. taluka and district.Four students participated in university level Essay competition on "Guru Govindsingji and His contribution for the Nation."

**Conclusion:**Thus, the cultural activities of the college are notable.The above description is brief is the brief account of last 25 years of NutanMahavidyalya, Selu.

आम्ही जाणतो आमच्या मर्यादा म्हणून सांगू इच्छितोत.

व्यक्ती अथवा संस्थाच्या लौकिक चारित्रातील एक सत्य किती दिवसाचे जगणे किंवा दशक, शतकांची वाटचाल यामध्ये महत्त्वाचे आहे ते, कसे जगले किंवा कशी केली वाटचाल याला.

जगणे किंवा वाटचाल कधीच असत नाही सरळ समतल जमिनीवर पाय आणि ध्येयावर नजर रोखून आम्ही केला चार दशकाचा प्रवास, तो संपूर्ण समाधानासाठी ते केवळ आत्मसमाधानासाठी नाही तर.

लौकिक अर्थाने समाजपुरुषांनी, राष्ट्र संस्कृतीने आम्हावर सोपवलेला जबाबदारीचा हा क्रूस वाहताना सर्वांच्या संपूर्ण समाधानासाठी म्हणून!
आम्ही केलेल्या सामूहिक परिश्रमाचा ताळेबंद आपल्याच अवलोकनार्थ सादर.



*महाविद्यालयाच्या वास्तूचे भूमिपूजन करतांना मा.ना. श्री शंकररावजी चव्हाण*

**दशक पहिले – १९६८ – १९७८**

अत्यंत अल्पावधीतच महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर स्वत:चे स्थान निर्माण करणाऱ्या नूतन महाविद्यालयाची सुरुवात १५ जून १९६८ रोजी सेलूच्या नूतन विद्यालयाच्या वास्तूमध्ये झाली. १५ जून १९७० रोजी त्याचे जिंतूर रोड वरील स्वत:च्या इमारतीत स्थलांतर झाले. हे बांधकाम चालू असतानाच स्वामी रामानंद तीर्थ यांचा पदस्पर्श नूतन वास्तूला झाला होता.

नूतन महाविद्यालय सुरु झाले आणि पहिल्याच वर्षी (१९६८–६९) सुरेश मणियार हा विद्यार्थी इळण परीक्षेला गुणवत्ता यादीत चमकला. ४ विद्यार्थी विद्यापीठ व ३ विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेत गुणवत्ता यादीत आले.

पहिल्या दशकात दोन प्राध्यापकांनी डॉक्टरेट प्राप्त केली.

पाहता पाहता महाविद्यालयाने आपले एकेक पैलू चमकदार करायला आरंभ केला. ग्रंथालय, पुस्तकपेढी, बहिस्थ वाचकांसाठी ग्रंथालय उपलब्ध करुन देणे. ग्रंथ प्रदर्शन अशा सर्वांगाने महाविद्यालयाचे ग्रंथालय बहरु लागले.

महाविद्यालयाचे भूषण असणारी राष्ट्रीय सेवा योजना १९७०–७१ या वर्षी कार्यान्वित झाली. राष्ट्रीय सेवा योजना पथकाने सुरुवातीपासूनच आपली पृथगात्मता राखून संबंध विद्यापीठात आपला एक ठसा उमटविला. १९७२ च्या भीषण दुष्काळात आमच्या पथकाने बजावलेली कामगिरी अजोड म्हटली पाहिजे. माना येथे बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांसाठी केलेले तिचे कार्यही उल्लेखनीय आहे.

महाविद्यालयाच्या पहिल्या दशकात क्रीडा क्षेत्राची उज्ज्वल वाटचाल सुरु झाली. विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्पोर्टस् टॅलेंट स्कॉलरशीप मंजूर झाली. मुलीच्या संघास आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत यश.

राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमात भाग घेणारे हे

महाविद्यालय, परिसरातील अनौपचारिक शिक्षणाचे एक महत्त्वाचे केंद्र बनले.

युवा कलावंताच्या प्रतिभेचे अंकुर याच महाविद्यालयात वाढले. युवक महोत्सवाच्या व्यासपीठाला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुवर्णसंधी बनवून स्वत:च्या कलेचा विकास तर केलाच पण या महाविद्यालयाला अनेक पुरस्कारही मिळून दिले.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, पुणे यांच्या सहकार्याने महाविद्यालय – शाळा समूह योजना कार्यान्वित झाली ती याच दशकात. सेलू परिसरातील शाळांचा विज्ञान स्तर उंचावण्याच्या कामात या उपक्रमाने लक्षणीय कामगिरी बजावली. या दशकातील भौतिक विकासही उपेक्षिण्याजोगा नाही. विद्यापीठ अनुदान मंडळ, नवी दिल्ली आणि नूतन विद्यालय शिक्षण संस्था यांच्या मदतीने चौथ्या पंचवार्षिक योजने अंतर्गत चार भव्य प्रयोगशाळांचे बांधकाम पूर्ण झाले.



*प्राचार्य द.रा. कुलकर्णी आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारीत असताना*

**दशक दुसरे - १९७८ - १९८८**

१०+२+३ हा शिक्षणाचा नवा आकृतिबंध अस्तित्वात आला आणि नूतन महाविद्यालयाला कनिष्ठ महाविद्यालय जोडले गेले. १२ वी ची पहिली तुकडी जून १९७७ मध्ये उत्तीर्ण झाली आणि आमच्या महाविद्यालयाचा विद्यार्थी संजीव गोविंदराव देशमुख हा विद्यार्थी गुणवत्ता यादीत बोर्डात सर्वप्रथम आला. या दशकात आठ प्राध्यापकांनी डॉक्टरेट तर चार प्राध्यापकांनी एम.फील. ही पदवी प्राप्त केली आणि विद्यापीठि स्तरावर ३, तर उच्च माध्यमिक विभागात १० विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

संस्थेचे तत्कालीन चिटणीस दलितमित्र श्रीरामजी भांगडिया यांच्या अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालयालगत वसतिगृह उभारण्यात आले. त्यात ८० गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली.

विज्ञान विकास योजना (कोसीप) द्वारा विद्यार्थ्यांना विज्ञानाभिमुख करण्यात आले. त्यात इंधनासाठी गोबर गॅसचा वापर, अंधश्रद्धा निर्मूलन, रेशीम उत्पादन, लघु उद्योग तंत्रज्ञानासाठी छोट्या छोट्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यात आले.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने सहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९८०-८५) कार्यशाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

कोहसीप योजनेअंतर्गत कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेच्या विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी ग्रंथसंपदेत वाढ, शैक्षणिक सहलीचे नियोजन, शैक्षणिक साधनांची उपलब्धता, चर्चासत्रे, व्याख्याने व शोध निबंध वाचनाचे आयोजन करण्यात आल्याने एक नवचैतन्य निर्माण झाले.

याच दशकात टेबल टेनिस, खो.खो., कबड्डी या राज्यस्तरीय स्पर्धेत महाविद्यालयाचे संघ यशस्वी झाले.

कृषी प्रधान संस्कृतीशी निष्ठा दाखविणारा रेशीम उद्योग प्रकल्प, वनशेती (सागवानाची) या प्रयोगांच्या यशस्वीतेचा आम्हांला अजूनही अभिमान वाटतो. गुणवत्ता विकास प्रकल्पाची (सेलू पॅटर्न) सुरुवात १९८५ पासून झाली. आजही वासंतिक वर्ग, इंसेंटिव्ह कोचिंग आदी स्वरुपात त्यातले सातत्य आणि संवर्धन

स्पृहणीय आहे.

तत्कालीन प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांना महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानीत केले. याची स्मृती जतन करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सन्मान पारितोषिक योजना सुरु करण्यात आली आणि आजतागायत चालू आहे.



*आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार मा.ना. श्री विलासराव देशमुख यांच्याकडून स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री बन्सीलालजी गिल्डा*

**दशक तिसरे १९८८-९८**

परिसरातील विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख शिक्षण मिळावे म्हणून १९८९-९० या शैक्षणिक वर्षापासून किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक पाच अभ्यासक्रमाची सुरुवात. विद्यापीठ गुणवत्ता यादीत ०३ तर उच्च माध्यमिक परिक्षेत १० विद्यार्थी समाविष्ट. चार प्राध्यापकांना डॉक्टरेट, तिघांना एम.फील. तर एकास सेट परीक्षेत यश मिळाले.

सातव्या पंचवार्षिक योजनेत (१९८५-९०) विद्यापीठ अनुदान आयोग व संस्थेच्या सहकार्याने ग्रंथालय इमारतीचे मजल्याचे बांधकाम पूर्ण.

क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने क्रीडांगण विकास व क्रीडा साहित्य खरेदी. राज्यस्तरीय बुद्धिबळ, कबड्डी, व्हॉलीबॉल या क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यशस्वी कामगिरी केली.

१९९२-९३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव साजरा करुन विविध उपक्रमांचे आयोजन.

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित. माजी विद्यार्थ्यांकडून व स्टाफच्या योगदानाने रौप्य महोत्सवी वसतिगृहाची उभारणी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सोय.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या केंद्राची स्थापना.



*राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट पथकाचा पुरस्कार स्वीकारीत असताना प्राचार्य डॉ. कोठेकर, प्राचार्य द.रा. कुलकर्णी, प्रा. आर.ए. गात आदी दिसत आहेत.*

**दशक चौथे - १९९८ - २००८**

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने आठव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत वाचनालयाच्या इमारतीचे बांधकाम साकार झाले. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत १७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत. परीक्षा पद्धती सुधार कार्यक्रम, ५ गावांची सजीव शेती, आर्थिक व सामाजिक पाहणी इ. नाविण्यपूर्ण व अभिनव उपक्रम घेण्यात आले.

तीन प्राध्यापकांना डॉक्टरेट एकास एम. फील. आणि तिघे नेट / सेट मध्ये उत्तीर्ण झाले.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने नवव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत अनिवासी विद्यार्थी केंद्र इमारतीचे बांधकाम पूर्ण.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत शिक्षक वसतिगृह आणि महाविद्यालयीन इमारतीच्या नूतनीकरणाचे बांधकाम पूर्ण.

सेवानिवृत्त प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त विद्यार्थी मेळावा संपन्न. त्यातूनच माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण केंद्राची ( घ्ऊ ऊॅग्हग्हु णद्यॄ) मुहूर्तमेढ रोवली गेली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी विविध पुरस्कारांनी महाविद्यालयास गौरविले. प्रेरणा वार्षिकांकास उत्कृष्ट अंकाचा पुरस्कार, उत्कृष्ट परीक्षा केंद्र पुरस्कार आणि रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार (कु. वानखेडे, कु. पवार व कु. गजमल यांना), उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार (प्रा. रामदास जायभाये यांना) व महाविद्यालयाचे रा.स.यो. पथकास महाराष्ट्रातील उत्कृष्ट पथकाचा पुरस्कार मिळाला.

नॅककडून महाविद्यालयाचे मूल्यांकन पूर्ण. महाविद्यालयाने गुणवत्तेची धरलेली कास, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय, क्रीडाविभाग, माजी विद्यार्थ्यांचे योगदान इत्यादीचा गौरवपूर्ण उल्लेख करीत पुढील काळात पदवी व पदव्युत्तर स्तरावर नवीन अभ्यासक्रम चालू करण्याची सूचना.

U.G.C. करिअर डेव्हलपमेंट कोर्स, फॅशन डिझायनिंग नॅकच्या सूचनेप्रमाणे कला शाखेत भूगोल, समाजशास्त्र तर विज्ञान शाखेत संगणकशास्त्र व सूक्ष्मजीवशास्त्र हे विषय सुरु. तर B.C.A. ही नवीन विद्याशाखा व पदव्युत्तर स्तरावर D.M.M. हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

- ग्रंथालयाचे व कार्यालयाचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले.
- योगासनामध्ये विद्यापीठ स्तरावर ७ वर्षे अजिंक्यपद प्राप्त. क्रीडाक्षेत्रात विविध स्पर्धेतील नैपुण्याने बहरलेल्या या काळात महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोंहचले.

**दशक पाचवे - २००८ ते आजपर्यंत**

- २००८-०९ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ने उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाला सन्मानित केले.
- महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृति उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्रा. यादव गायकवाड यांना २००७-०८ प्राप्त तर पददलितावरील आदर्श लेखनासाठीचा साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे पुरस्कार सम्यकसंवाद या ग्रंथासाठी २०१०-११ मध्ये प्राप्त. मुक्टा शाखा बीड द्वारा जोतीराव फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०१२ साठीचा.
- प्रा.श्रीमती एच.के. बायस यांना सामाजिक कार्याकरीता राणी पदमावती तर डॉ.यु.सी. राठोड यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याकरीता राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षक सन्मान पुरस्कार (२०१२) तसेच म. ज्योतीबा फुले राष्ट्रीय शिक्षक सन्मान पुरस्कार (२०१३)
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या युवक महोत्सवाचे २००९-१० मध्ये उत्कृष्टरित्या आयोजन.
- राष्ट्र व राज्य पातळीवर क्रीडा क्षेत्रात नैपुण्य तर युवक महोत्सव, वक्तृत्व स्पर्धा व सांस्कृतिक क्षेत्रात घवघवीत यश.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा प्रजासत्ताक दिन संचलनात सहभाग.
- कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्कींग,

कॉम्प्युटराईज्ड अकाऊटींग व नाट्यशास्त्र हे तीन व्यवसायभिमुख अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने सुरु.

- मराठी व इतिहास पदव्युत्तर शिक्षणाची २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून व्यवस्था.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ११व्या पंचवार्षिक योजनेत महिला वसतिगृह, तीन वर्ग व महिला प्राध्यापिका कक्षाचे बांधकाम पूर्ण. विद्यार्थी केंद्रीय अनेक योजनामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला नवीन आयाम. मानवी हक्क पायाभूत अभ्यासक्रमाद्वारे मूल्य शिक्षणाची व्यवस्था. लघु संशोधन प्रकल्पास मान्यता व विविध विषयाच्या परिषद व चर्चासत्राचे आयोजन.
- मा. आमदार श्री रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या सहकार्याने महाविद्यालय परिसरामध्ये अंतर्गत रस्त्यांचे काम पूर्ण.
- प्रेरणा अंकास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे ७ पुरस्कार तर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे ६ पुरस्कार.
- महाराष्ट्र शासनाच्या जागर जाणिवांचा या कार्यक्रमातंर्गत परभणी जिल्ह्यातून प्रथम व व्दितीय पुरस्कार.
- नॅक बंगलोर कडून ब दर्जा प्राप्त.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने नाटयशास्त्र व गांधी अध्यासन केंद्र.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या दुरशिक्षण केंद्रातर्फे पदव्यूत्तर शिक्षणाची व्यवस्था.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठस्तरावर अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन व जिल्हा, विद्यापीठ पातळीवर सातत्याने अनेक पुरस्कार.
- आय.एस.ओ.९००१-२००८ प्रमाणे गुणवत्ताधारक संस्था.
- मायक्रोबॉयलॉजी सोसायटी ऑफ इंडियाकडून मायक्रोबॉयलॉजी विभागास उत्कष्ट कार्याकरिता द्वितीय पुरस्कार.
- विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या अनेक शोध निबंधास पुरस्कार.
- सुवर्ण महोत्सव वर्षास प्रारंभ व विविध उपक्रमांचे आयोजन - नियोजन.

नूतन महाविद्यालय, सेलू
सुवर्ण महोत्सव

## नूतन विद्यालय शिक्षण संस्था विद्यमान कार्यकारिणी



**डॉ.एस.एम.लोया**
संस्थाध्यक्ष व अध्यक्ष ज्येष्ठ
महाविद्यालय विकास समिती



**ॲड. व्ही. एस. खारकर**
उपाध्यक्ष



**श्री. डी. के. देशपांडे**
चिटणीस व सदस्य ज्येष्ठ
महाविद्यालय विकास समिती



**डॉ. व्ही. के. कोठेकर**
सहचिटणीस व सदस्य क.म.
स्थानिक व्यवस्थापन समिती



**श्री.जयप्रकाशजी बिहाणी**
सहचिटणीस व सदस्य
ज्येष्ठ महाविद्यालय विकास समिती



**प्राचार्य द. रा. कुलकर्णी**
कार्यकारिणी सदस्य व सदस्य
ज्येष्ठ महाविद्यालय विकास समिती



**प्रा.आर.ए. गात**
कार्यकारिणी सदस्य व अध्यक्ष
क.म. स्थानिक व्यवस्थापन समिती



**श्री प्रकाशचंदजी बिनायके**
कार्यकारिणी सदस्य



**श्री सितारामजी मंत्री**
कार्यकारिणी सदस्य व सदस्य
ज्येष्ठ महाविद्यालय विकास समिती



**डॉ. विजयेंद्रजी नागोरी**
कार्यकारिणी सदस्य व सदस्य
ज्येष्ठ महाविद्यालय विकास समिती



**श्री दत्तरावजी पावडे**
कार्यकारिणी सदस्य



**श्री मकरंद दिग्रसकर**
कार्यकारिणी सदस्य व सदस्य
क.म. स्थानिक व्यवस्थापन समिती

## नूतन विद्यालय शिक्षण संस्था विद्यमान कार्यकारिणी



**श्री. नंदकिशोरजी बाहेती**
कार्यकारिणी सदस्य



**श्री किशोर मालाणी**
कार्यकारिणी सदस्य



**श्री अजिज खाँ पठाण**
कार्यकारिणी सदस्य



**डॉ. शरद एस. कुलकर्णी**
कार्यकारिणी सदस्य
प्राचार्य नू.म. व चिटणीस व्यवस्थापन समिती व विकास समिती



**डॉ. यु. सी. राठोड**
कार्यकारिणी सदस्य
(प्राध्यापक प्रतिनिधी)



**प्रा. एल. एच. काळे**
कार्यकारिणी सदस्य
(प्राध्यापक प्रतिनिधी)



**श्री के.व्ही. वाघमारे**
कार्यकारिणी सदस्य (मुख्याध्यापक नू.वि. व सदस्य क.म. स्थानिक व्यवस्थापन समिती)



**एस. के. राठोड**
कार्यकारिणी सदस्य
(शिक्षक प्रतिनिधी)



**एस. डी. बारस्कर**
कार्यकारिणी सदस्य
(शिक्षक प्रतिनिधी)

## नूतन विद्यालय शिक्षण संस्था विद्यमान कार्यकारिणी निमंत्रित सदस्य



**सौ. एस. एम. चाटे**
मुख्याध्यापिका नू. कन्या



**सौ. आर. आर. देशपांडे**
मुख्याध्यापिका नू. प्राथमिक



**एन.पी. पाटील**
प्राचार्य नू.इं. स्कूल



**अनिल रत्नपारखी**
समन्वयक नू. प्राथमिक

## नूतन विद्यालय शिक्षण संस्था माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व चिटणीस

(महाविद्यालय स्थापने नंतरचे पदाधिकारी)



**श्री सुरजमलजी बिनायके**
अध्यक्ष (१९६५-७९)



**श्री इंदरचंदजी बिनायके**
अध्यक्ष (१९७९-८७)



**श्री बद्रीनारायणजी बिहाणी**
अध्यक्ष (१९८७-९९)



**श्री बन्सीलालजी गिल्डा**
अध्यक्ष (१९९९-२००५)



**श्री देविदासराव दिग्रसकर**
उपाध्यक्ष (१९७३-९३)



**श्री श्रीरामजी भांगडिया**
चिटणीस (१९५२-७७)



**श्री सो.ना. कुलकर्णी**
चिटणीस (१९७७-९१)



**श्री बन्सीलालजी गिल्डा**
चिटणीस (१९९१-९९)



**प्राचार्य द.रा. कुलकर्णी**
चिटणीस (१९९९-२०१६)

## नूतन विद्यालय शिक्षण संस्था विद्यमान पदाधिकारी



**डॉ.एस.एम.लोया**
अध्यक्ष
(२००५-आजपर्यंत)



**ॲड.वसंतराव खारकर**
उपाध्यक्ष
(१९९३-आजपर्यंत)



**श्री डी.के.देशपांडे**
चिटणीस
(२०१६-आजपर्यंत)



**डॉ.व्ही.के.कोठेकर**
सहचिटणीस
(२००६-आजपर्यंत)



**श्री जयप्रकाशजी बिहाणी**
सहचिटणीस
(२०१६-आजपर्यंत)

## नूतन कनिष्ठ महाविद्यालय माजी पर्यवेक्षक



**प्रा.ए.डी.कुलकर्णी**
पर्यवेक्षक



**प्रा.डी.एन.गायकवाड**
पर्यवेक्षक



**प्रा.एस. व्ही. बसपुरे**
पर्यवेक्षक



**प्रा.ए.टी. देशमुख**
पर्यवेक्षक



**प्रा.एस.डी. काळे**
पर्यवेक्षक



**प्रा.एस.जी. शिरोडकर**
पर्यवेक्षक

## नूतन महाविद्यालय विद्यमान पर्यवेक्षक / समन्वयक



**प्रा.एल.एच. काळे**
क.म. पर्यवेक्षक



**प्रा. डी.एच. जामगे**
सन्वयक व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम

## नूतन महाविद्यालय एच.एस.व्ही.सी. विभाग माजी समन्वयक



**डॉ. व्ही.के. कोठेकर**
समन्वयक



**डॉ. सु.न. संदिकर**
समन्वयक



**प्रा.बी.एस.अंभोरे**
समन्वयक



**प्रा. एस.एन. बिरादार**
समन्वयक

## नूतन महाविद्यालय माजी कार्यालय अधिक्षक



**श्री पी.एस. पल्लेवार**
कार्यालय अधिक्षक



**श्री आर.जे. रत्नपारखी**
कार्यालय अधिक्षक



**श्री गौतम सूर्यवंशी**
कार्यालय अधिक्षक

## नूतन महाविद्यालय विद्यमान कार्यालय अधिक्षक



**उषा कदम**
कार्यालय अधिक्षक (२०१३ ते आजतागायत)

## नूतन महाविद्यालय (शै. वर्ष २०१७-१८) सेवानिवृत्त कर्मचारी



**डॉ. यु. एस. पानपट्टे**



**प्रा.के.डी. वाघमारे**

## पीएच.डी.पदवी प्राप्त प्राध्यापक (शै. वर्ष २०१७-१८)



**डॉ. एम.डी. सवंडकर**



**डॉ. आर. जे. नाथानी**



**डॉ. पी.बी. व्यवहारे**

## नूतन महाविद्यालय माजी प्राचार्य



प्राचार्य द.रा.कुलकर्णी
(१९६८ – १९९३)



डॉ. आर.एम. खरवडकर
(१९९३–२००२)



डॉ. बी.टी. भोसकर
(२००२–२००३)



डॉ. व्ही.के कोठेकर
(२००३–२००६)



डॉ. डी.पी. कवठेकर
(प्रभारी प्राचार्य १ जून ते ३० जून २००६)



प्रा.आर.बी. शेटे
(प्रभारी प्राचार्य १ जुलै ते ५ जुलै २००६)

## नूतन महाविद्यालय विद्यमान प्राचार्य व उपप्राचार्य



प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी
(२००६–आजपर्यंत)



उपप्राचार्य प्रा. यादवराव गायकवाड
(२०१३–आजपर्यंत)

## नूतन महाविद्यालय माजी उपप्राचार्य


प्रा.पं.या. तरफदार


प्रा.र.आ. गात


डॉ. बी. टी. भोसकर


डॉ. व्ही. के. कोठेकर


प्रा.आर.बी. शेटे


प्रा.पी.आर. रावते


प्रा. एच.के. बायस

नूतन महाविद्यालय, सेलू
सुवर्ण महोत्सव

## ज्येष्ठ महाविद्यालय विकास समिती शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थी प्रतिनिधी



**प्रा.यादवराव गायकवाड**
विभाग प्रमुख प्रतिनिधी



**डॉ. आर.आर. बैनवाड**
प्राध्यापक प्रतिनिधी



**डॉ. प्रविण खरात**
प्राध्यापक प्रतिनिधी



**प्रा. अर्चना पत्की**
प्राध्यापक प्रतिनिधी



**डॉ. एन.एस.पद्मावत**
समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता
विकास प्रकल्प



**प्रा. एस.एन. बिरादार**
प्राध्यापक प्रतिनिधी
कनिष्ठ महाविद्यालय



**श्री एस.एन. ढेंगळे**
सदस्य
(शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी)



**कु. रिता मसुरे**
विद्यार्थी संसद प्रतिनिधी

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ठ मराठी वाङ्मय निर्मिती पुरस्कार



**प्रा.यादवराव गायकवाड**
(२००८ व २०११)



**प्रा. प्रकाश कामतीकर**
(१९९४)



**प्रा. विश्वास वसेकर**
(२००१ व २००२)



**प्रा. के.डी. वाघमारे**
(२०१७)

महाविद्यालायाच्या माजी प्राचार्य द.रा. कुलकर्णी यांना मिळालेले विशेष पुरस्कार



महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांच्या तर्फे 'जीवन साधना गौरव' पुरस्कार २०१५-१६




डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ परिचय व्याख्यान मालेत 'रानडे, गांधी आणि जीना' या ग्रंथाचा परामर्श घेताना डॉ. गंगाधर पानतावणे



मा. कुलगुरु डॉ. दिपक टिळक महाविद्यालयस भेट दिली. या प्रसंगी उपप्राचार्य प्रा. यादव गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया व चिटणीस श्री डी.के. देशपांडे



आदरणीय श्रीरामजी भांगडीया व्याख्यान मालेचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. धनागरे यांचे स्टाफ समोर व्याख्यान



सुप्रसिद्ध कथाकार श्री प्र.रा. बोरकर
कथाकथन करताना



स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचा उत्कृष्ठ
वार्षिकांकाचा तृतीय पुरस्कार मा. कुलगुरु
व मान्यवरांच्या हस्ते स्वीकारतांना
प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी
व संपादक मंडळ



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड तर्फे वंदना बुरखुंडे
वनस्पती शास्त्र विषयात 'सर्व प्रथम'
पारितोषिक स्वीकारतांना




रब्बी पीकाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन
करतांना इफको अधिकारी




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या
शतकोत्तर रजत जयंती निमित्त
आयोजित व्याख्यानमालेत
प्राचार्य डॉ.एम.ए. वाहूळ व
डॉ. यशपाल भिंगे यांचे व्याख्यान



आविष्कार संशोधन महोत्सवातील पुरस्कार
प्राप्त विद्यार्थ्यांचे स्वागत करताना
प्राचार्य, प्राध्यापक, मार्गदर्शक व विद्यार्थी




'वाचक संवाद' कार्यक्रमात
वाचकांशी संवाद साधताना
अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे
अध्यक्ष मा.श्री लक्ष्मीकांत देशमुख




महाविद्यालय व जनकल्याण रक्तपेढी, जालना
यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
मोफत रोगनिदान व रक्तदान शिबीर
कोठा ता. जिंतूर येथे आयोजित केले.
या प्रसंगी रुग्णतपासणी करताना डॉ. मुळावेकर



वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्‌घाटन करताना सुप्रसिद्ध कवी श्री केशव खटिंग



महाराष्ट्र शासनातर्फे 'राष्ट्रीय सेवा योजना' उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार स्वीकारताना प्रा. रामदास जायभाये



पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो–खो स्पर्धा कार्यालय उद्‌घाटन प्रसंगी श्री विनोद बोराडे, श्री हेमंतराव आडळकर व डॉ. एस.एम. लोया



फुटबॉल डे साजरा करताना महाविद्यालयातील विद्यार्थी



योगा दिवस साजरा करतांना



मा. कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते 'प्रेरणा' वार्षिकांकाचे प्रकाशन



तृतीय वर्ष ऐच्छिक मराठी विषय नवीन अभ्यासक्रम कार्यशाळेत अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. मा.मा. जाधव मार्गदर्शन करताना




गुणवत्ता सन्मान समारंभात प्रमुख अतिथी तथा माजी विद्यार्थी व बँक अधिकारी श्रद्धा जाधव भाषण करताना

महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी परिसरातील शेतकरी बांधवाच्या विनंती वरुन व इफकोच्या सौजन्याने माती परीक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. शेतकरी बांधवानी माती परीक्षणासाठी आणलेले मातीचे नमुने व त्यांची रांग





रक्तदान शिबीर प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी रक्तदान करतांना

'पोरी जरा जपून चालं' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रा. विजया मारोतकर






डॉ. के.एम. देशमुख स्मृति व्याख्यान मालेत व्याख्यान पुष्प गुंफताना प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

अखिल भारतीय विद्यापीठीय खो-खो स्पर्धेत महाविद्यालयाचा विद्यार्थी अक्षय सोनटक्के यास सुवर्ण पदक प्राप्त प्रसंगी समवेत टीम मॅनेजर प्रा.के.के. कदम





नेट-सेट. मार्गदर्शन व्याख्यान मालेत डॉ. कीर्तीकुमार मोरे यांचे व्याख्यान प्रसंगी स्वागत करताना डॉ. राजाराम झोडगे

शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उर्मिला धुत प्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना






महाविद्यालयाच्या सुक्ष्मजीवशास्त्र विभागास 'सुक्ष्मजीवशास्त्र परिषद, भारत' यांच्या तर्फे राष्ट्रीय स्तरावर द्वितीय पुरस्कार स्वीकारतांना प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, डॉ. वसंत पांचाळ, प्रा. जामगे व प्रा. अमित कुलकर्णी



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अविष्कार संशोधन महोत्सवाचे' उद्घाटन करताना मा.कुलगुरु पंडित विद्यासागर, डॉ. एस.एम. लोया व इतर मान्यवर



आंतर महाविद्यालयीन प्रेरणा युवक महोत्सवाचे उद्घाटन करीत असतांना श्री. फ.मु.शिंदे, कुलगुरु डॉ. एस.बी. निमसे व इतर मान्यवर



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे 'प्रेरणा' वार्षिक अंकास अंकाचा पुरस्कार मा. शरदजी पवार, मा. सुनील तटकरे यांच्या हस्ते स्वीकारतांना प्रा. अर्चना पत्की, डॉ. निर्मला पद्मावत व प्रा. हेमचंद्र हडसनकर



माजी विद्यार्थी संघटना व नूतन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दोस्त महम्मद खाँ यांचे कव्वाली गायन कार्यक्रम प्रसंगी

गांधी अध्यासन केंद्र यांच्या वतीने
गांधी विचार परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण
करताना श्री. विशाल अग्रवाल





वाचन दिना निमीत्त ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन
करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य
प्रा.यादवराव गायकवाड

गुणवंत विद्यार्थी समारंभात
माजी गुणवंत विद्यार्थी
श्री. प्रणिल गिल्डा व श्रद्धा जाधव
पुरस्कार वितरण करतांना





खो–खो स्पर्धा क्रीडांगन भूमिपुजन प्रसंगी
उप विभागीय पोलीस अधिकारी
सौ. रेणुका वागळे



माजी विद्यार्थी व मुंबईचे डॉ. ए.डी. कुलकर्णी यांनी मणक्याच्या विकारावर सेलूच्या नागरिकांसाठी मोफत शिबीर घेतले. प्रसंगी मार्गदर्शन करताना.

महाविद्यालय परिसर भेट प्रसंगी आमदार बच्चुभाऊ कडु यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी





भित्ती पत्रकाचे अनावरण करताना प्राध्यापक व संपादक विद्यार्थिनी

प्राध्यापक व कर्मचारी स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने माजी कर्मचारी व प्राध्यापक यांच्या स्वलिखीत ग्रंथ प्रदर्शनांचे उद्‌घाटन करताना प्राचार्य द.रा.कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, प्रा.प्रकाश कामतीकर, प्रा. विश्वास वसेकर, ग्रंथपाल अ.स. जोशी, ग्रंथपाल डॉ. मोहन काटकर व इतर मान्यवर





वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यमान प्राध्यापक, कर्मचारी



कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यमान शिक्षक, कर्मचारी



कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यमान शिक्षक कर्मचारी



महाविद्यालयातील विद्यमान शिक्षकेतर कर्मचारी



महाराष्ट्र शासनातर्फे 'जागर जाणिवांचा' उपक्रमांतर्गत परभणी जिल्ह्यातून प्रथम पुरस्कार स्वीकारतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, उपप्राचार्य हिरा बायस, डॉ. रमेश बैनवाड व डॉ. किर्ती निरालवाड

निळू फुले राज्यस्तरीय एकांकिका करंडक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविल्याबद्दल मेघना जोशी चा सत्कार करताना प्राचार्य व एकांकिकातील काही प्रसंग






नॅक पुर्नमूल्यांकन पीअर टीम अध्यक्षाकडून प्रमाणपत्र घेतांना प्राचार्य, समन्वयक डॉ. दंडवते, अध्यक्ष डॉ. लोया व माजी प्राचार्य द.रा. कुलकर्णी

वाणिज्य द्वितीय वर्षात इंग्रजी विषयात विद्यापीठातून प्रथम आल्याबद्दल प्रियंका मणियार कुलगुरुकडून सत्कार स्वीकारताना



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

## *वार्षिक अहवाल*

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८**

- विद्यार्थी उपक्रम समिती (वरिष्ठ महाविद्यालय)
- राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ महाविद्यालय )
- राष्ट्रीय सेवा योजना (कनिष्ठ महाविद्यालय )
- ग्रंथालय विभाग
- क्रीडा विभाग (वरिष्ठ महाविद्यालय )
- क्रीडा विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)
- महिला वसतिगृह
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- मराठी विभाग
- दूर शिक्षण अभ्यासकेंद्र
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना
- हेल्थ क्लब

## २०१७-१८
## विद्यार्थी उपक्रम समिती
## (वरिष्ठ महाविद्यालय)

लोकशाही शासन व जीवन प्रणालीचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे लोकप्रतिनिधींचे सभागृह असते. महाविद्यालयीन स्तरावर देखील असे प्रतिनिधी गृह म्हणजे विद्यार्थी संसद. ही संसद विद्यार्थी उपक्रम समिती द्वारा संचालीत करण्यात येते. या उपक्रम समितीचे नेतृत्त्व व मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त या समितीचा वर्षभराचा कार्य वृत्तांत म्हणजे अभ्यासपुरक अभ्यासत उपक्रमाचा वार्षिक अहवाल असा आहे.

१) २५/०७/२०१७ व ०६/०७/२०१७ रोजी वेलकम डे चा कार्यक्रम महाविद्यालयात वर्ष २०१७-१८ ला नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची ओळख व्हावी म्हणून राष्ट्रीय सेवायोजना, विद्यार्थी उपक्रम समिती, क्रीडा विभाग व ग्रंथालयाची ओळख याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

२) दि.०१/०८/२०१७ रोजी कै.अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

३) दि.०५/०७/२०१७ रोजी कै. अण्णासाहेब काकडे यांच्या स्मृति प्रित्यर्थ ३०० रोपवाटिका वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम घेण्यात आला.

४) दि.०५/०९/२०१७ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

५) ०६/०९/ २०१७ रोजी मुलींसाठी विशेष मार्गदर्शन शिबीर कार्यक्रम घेण्यात आले.

६) 'दि.१७/०९/२०१७ ते २४/०९/२०१७ या' सप्ताहात विद्यार्थी जनजागरण सप्ताह म्हणून साजरी केला. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत १७/०९/ २०१७ ध्वजारोहण करण्यात आले. दि. १७/०९/ २०१७ रोजी वक्तृत्व कार्यशाळा घेण्यात आली त्याप्रसंगी सौ. रोठे मॅडम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्याच दिवशी प्राचार्य डॉ. रोठे सर यांना औषधी वनस्पती या विषयावर व्याख्यान दिले.

७) दि.०२/१०/२०१७ रोजी महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली त्या निमित्त मुंबई सर्वोदय मंडळ यांच्या वतीने 'दर्शन गांधी विचार भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती स्वर्गीय' या विषयावर परीक्षा घेण्यात आली. साधारणत: २०० विद्यार्थी परिक्षेत सहभागी झाले.

८) दि.११ नोंव्हेबर हा मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जयंती दिवस 'राष्ट्रीय शिक्षा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला.

९) दि.०२/१२/२०१७ कायदेविषयक माहिती शिबीरात श्री दिपककुमार माटा (न्यायाधीश,सेलू) यांचे व्याख्यान व एड्स बाबत माहिती श्री संजय हरबडे (अधीक्षक,जिल्हा उपरुग्णालय सेलू) यांनी दिली.

१०) दि. २६/१२/२०१७ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेची स्थापना व सचिवाची निवड करण्यात आली. कु. मसुरे रिता शिवशंकर (विज्ञान तृतीय वर्ष) या विद्यार्थीनीची एकमताने निवड करण्यात आली.

११) दि. २८/१२/२०१७ रोजी जागतिक ग्राहक दिना निमित्त मा.तहसीलदार श्री स्वरूप कंकाळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१२) २९/०१/२०१८ रोजी जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती निमित्त ज्येष्ठ साहित्यिक श्री केशव खटिंग यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले व त्यांच्या हस्ते 'स्नेह संमेलनाचे' उद्घाटन करण्यात आले.

१३) दि.२९/०१/२०१८ ते ३१/०१/२०१८ या कालावधीत वार्षिक स्नेह संमेलन घेण्यात आले असून त्या निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

१४) दि.१६/०२/२०१८ रोजी शिवजयंती निमित्त श्री प्रसाद तारे (पुणे) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१५) दि. १९/०२/२०१८ रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली.

## राष्ट्रीय सेवा योजना
## वरिष्ठ महाविद्यालय

■ युवक व युवतींना संस्काराकडून संस्कृतीकडे घेऊन जाणारी योजना म्हणजे रा.से.यो. ज्ञानमार्गाबरोबर स्वावलंबन, चारित्र्य संवर्धन व सामाजिक बांधिलकी यांचा युवामनावर संस्कार व त्यातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा या दृष्टीने सुरु झालेली ही एक विधायक चळवळ होय. या योजनेच्या माध्यमातून श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधीलकी, परस्पर सहकार्य, प्रामाणिकपणा, त्याग, सेवाभाव अशा अनेक गुणांचा सहज विकास होतो.

■ दि. ०५.०८.२०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्बोधन शिबीर आयोजित करण्यात आले. उद्बोधन शिबिरात रा.से.यो. ची उद्दिष्टे, कार्य इत्यादी मुद्यावर प्रमुख वक्त्यांनी प्रकाश टाकला. या करिता प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. झोडगे सर अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा. विनायक टेंगसे यांनी केले. तर आभार डॉ. बैनवाड यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होत्या.

■ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली.

■ १५ ऑगस्ट निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला व सद्भावना दिन साजरा करण्यात आला.

■ महाविद्यालयातील प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता वेलकम डे घेण्यात आला. त्यात रा.से.यो. सविस्तर माहिती देण्यात आली.

■ विद्यापीठ जनजागरण सप्ताह निमित्त शासकीय रुग्णालय परभणी व नूतन महाविद्यालयाच्या वतीने रक्तदान शिबीराचा कार्यक्रम घेण्यात आला. या शिबीरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा रक्तगट देखील तपासून दिला.

■ संविधान दिन साजरा करण्यात आला.

■ मौजे कुंडी येथे विशेष वार्षिक शिबीराचे आयोजन करण्यात आले. दि. १४.०२.२०१८ ते २१.०२.२०१८ या कालावधीत विशेष वार्षिक शिबीर संपन्न झाले.

■ जिल्हा उप रुग्णालयाच्या वतीने आयोजित पल्स पोलिओ निर्मुलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा.

■ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे दोन स्वयंसेवकांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला.

## राष्ट्रीय सेवा योजना
## कनिष्ठ महाविद्यालय

आजच्या आधुनिक युगामध्ये देशाच्या विकासात युवकांचा मोलाचा सहभाग आहे. महाविद्यालयीन युवक – युवतींना संस्काराकडून संस्कृतीकडे नेणारी आणि क्षमदान स्वावलंबनचे धडे देणारी योजना राष्ट्रीय सेवा योजना होय.

महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर विविध गुण संपन्न अशा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. स्वयंसेवकामध्ये स्वावलंबन, श्रमदान, चारित्र्य संवर्धन, सहकार्य, त्याग, देशभक्ती समाजहित व्यक्तिमत्व विकास हे गुण निर्माण करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्षे २०१७–१८ या वर्षात खालील उपक्रम राबविण्यात आले.

१) २० जून २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना या विषयावर उद्‌बोधन शिबीर संपन्न झाले. मार्गदर्शक म्हणुन प्रा.के.डी.वाघमारे होते.

२) २१जून २०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयात प्राचार्य, योग मार्गदर्शक प्रा.नागेश कान्हेकर यांनी योग प्रशिक्षणाचे धडे दिले.

३) ११ जुलै २०१७ रोजी महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे विमोचन उपप्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले.

४) १७ जुलै २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नूतन महाविद्यालय सेलू येथे आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली.

५) ३१ जुलै २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक नियोजनाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत कार्यक्रमाधिकारी, संस्थेचे पदाधिकारी तसेच सल्लागार समितीचे सदस्य उपस्थित होते.

६) १ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

७) १५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या दिवशी भित्तीपत्रकाचे विमोचन व स्वयंसेवकांना खाऊ वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

८) १७ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सद्‌भावना दिन साजरा करण्यात आला.

९) २० ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात स्वर्गीय राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आला.

१०) २५ ऑगस्ट २०१७ रोजी स्वच्छता अभियान उपक्रमातंर्गत सेलू नगरपालिका व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. तसेच सेलू नगरपालिकेच्या वतीने उपस्थितांना 'स्वच्छता ऍप' विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

११) २६ ऑगस्ट २०१७ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालय सेलू येथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले. ६० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले व १५५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

१२) ५ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयात

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

१३) १५ सप्टेंबर २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय शांतता दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

१४) १७ सप्टेंबर २०१७ मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत भित्तीपत्रकांचे विमोचन, निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

१५) मा.प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर तज्ञाचे मार्गदर्शन लाभले.

१७) २९ सप्टेंबर २०१७ संवाद कौशल्य या विषयावर डॉ. आर ए. झोडगे यांनी स्वयंसेवकांना मागदर्शन केले.

१८) २ ऑक्टोंबर २०१७ रोजी महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

१९ २८ नोंव्हेबर २०१७ रोजी महाविद्यालयात महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

२०) ३० सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

२१) ०१ डिसेंबर २०१७ 'जागतिक एड्स दिनानिमित्त' महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालय सेलू यांच्या वतीने जनजागृती रॅली करण्यात आली.

२२) ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२३) २३ जानेवारी २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

२४) १२ जानेवारी २०१८ 'युवक दिनानिमित्त' 'व्यसनमुक्ति' या विषयावर स्वयंसेवकांना प्राचार्यांनी मार्गदर्शन केले.

२५) २३ जानेवारी २०१८ 'नेताजी सुभाषचंद्र बोस' जयंती साजरी करण्यात आली.

२६) २६ जानेवारी २०१८ प्रजासत्ताक दिनानिमित्त फळवाटप, चित्रकला प्रदर्शन, भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

२७) ०५ फेब्रुवारी २०१८ तीन दिवसीय विभागीय नेतृत्वगुण विकास शिबीराच्या आयोजनात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

२८) १९ फेब्रुवारी २०१८ महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली.

२९) ०८ मार्च २०१८ महिला दिना निमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

३०) ११ एप्रिल २०१८ महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली.

**टिप :** दर रविवारी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या साहाय्याने स.८.०० ते १०.०० या वेळेत नियमित श्रमदान करतात.

## ग्रंथालय विभाग

ग्रंथालय हा कुठल्याही शिक्षण संस्थेचा आत्मा असतो असे म्हटले जाते. नूतन महाविद्यालयाचे ग्रंथालय तालुकास्तरावरचे महत्वपूर्ण ग्रंथालय असून ग्रंथालयाचे कामकाज पूर्ण करतांना ग्रंथालयीन पंचसूत्रीचे पालन करण्यासाठी ग्रंथालय कटिबध्द आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात ज्याप्रमाणे माहितीचे स्वरूप आज बदलले आहे. त्याचप्रमाणे माहिती मिळविण्याच्या पध्द्ती सुध्दा बदलल्या आहेत. या बदलाला ग्रंथालयाने समर्थपणे स्विकारले असून याचाच भाग म्हणून ग्रंथालयाचे संगणकीकरण केले आहे. संगणकीकरणासाठी INFLIBNET या राष्ट्रीय स्वायत्त संस्थेने तयार केलेल्या SOUL २.० या आज्ञावलीचा वापर करण्यात आला आहे. या आज्ञावलीतील Online Public Access Catalogue (OPAC) च्या माध्यमातून हव्या त्या वाचन साहित्याचा शोध घेतला जातो.

ग्रंथालयामार्फत खालील सेवा दिल्या जातात.

१. ग्रंथ देवघेव
२. सुसज्ज वाचनकक्ष
३. प्रतिलिपी सेवा
४. बुक बँक सेवा
५. वर्तमानपत्र कात्रण सेवा
६. संदर्भ सेवा
७. प्रचलित जागरुकता सेवा
८. सायंकालीन अभ्यासिका
९. बहि:स्थ वाचक सभासदत्व

विविध विषयावरील ऑनलाईन पुस्तकं / नियतकालिकं चालु काळात फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. मानव संसाधन विकास मंत्रालयाने INFLIBNET NLIST च्या माध्यमातून ५१००० पेक्षा जास्त ऑनलाईन पुस्तकं तसेच २१००० पेक्षा जास्त ऑनलाईन नियतकालिकं उपलब्ध करून दिले आहेत. ग्रंथालय या योजनेचे २०१० पासून नियमित सदस्य असून त्यामुळे महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना सदरील ज्ञान भांडार खुले झाले आहे.

**वाचन कक्ष :-** ग्रंथालयाचा वाचनकक्ष हा अतिशय सुसज्ज असून तिथे विद्यार्थ्यांसाठी वर्तमानपत्रे, विविध नियतकालिके तसेच विद्यापीठ परीक्षांच्या जुन्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच सदरील वाचनकक्ष सायंकाळी ०६ ते ०९ या वेळेत सायंकालीन अभ्यासिकेसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या शैक्षणिक वर्षात मार्च अखेर वाचनकक्षाचा लाभ **४०३५** विद्यार्थ्यांनी तसेच सायंकालीन अभ्यासिकेचा लाभ १४७९ विद्यार्थ्यांनी घेतला.

**ग्रंथालय : एक दृष्टिक्षेप (२०१७-१८)**

| | |
|---|---|
| ग्रंथ संग्रहात भर | **५७०** |
| भेट पुस्तकं | **४५** |
| वर्तमान पत्रे | **२४** |
| नियतकालिकं | **४६** |
| वाचक संख्या | **२९६६** |
| बहि:स्थ वाचक | **१८** |
| देवघेव (३१ मार्च अखेर) | **२०२६७** |

शै. वर्षे २०१७-२०१८ मध्ये ग्रंथालयातर्फे राबविण्यात आलेले महत्त्वपूर्ण उपक्रम खालील प्रमाणे आहेत.

**१. ग्रंथ प्रदर्शन :-** विविध प्रसंगाचे औचित्य साधून ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन भरविण्यात येते. यावर्षी दिवंगत राष्ट्रपती मा. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचनप्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दि.१३ व १४ ऑक्टोंबर रोजी ग्रंथालयातील निवडक कथा व कादंबऱ्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यास विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. तसेच

महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवनिमित्त आयोजित आजी माजी कर्मचारी मेळावा प्रसंगी आजी माजी कर्मचाऱ्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन दि.२७ जानेवारी २०१८ रोजी आयोजित करण्यात आले.

**२. डॉ. एस.आर. रंगनाथन जयंती :-** ०९ ऑगस्ट २०१७ रोजी ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य तसेच विविध विभागाचे प्राध्यापक उपस्थित होते.

**३. उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धा :-** विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी तसेच वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधता यावा यासाठी ग्रंथालयाने मागील शैक्षणिक वर्षापासून उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धेचे आयोजन सुरू केले असून सदरील स्पर्धेला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. स्पर्धेची सुरूवात ०९ ऑगस्ट २०१७ रोजी ग्रंथालयाचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या जयंतीपासून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर लेखी स्वरूपात अभिप्राय ग्रंथालयात जमा केले. या अभिप्रायाच्या आधारावर उत्कृष्ट वाचकांची निवड करण्यात आली. ही स्पर्धा कनिष्ठ व वरिष्ठ या दोन स्तरावर घेण्यात आली. स्पर्धेच्या समारोपाचा कार्यक्रम मराठी भाषा दिना निमित्त दि.२७ जानेवारी २०१८ रोजी प्रा.किर्तीकुमार मोरे यांच्या उपस्थित पार पडला. सदरील कार्यक्रमात विजेत्या स्पर्धकांना  बक्षीसाचे वितरण करण्यात आले. स्पर्धेचे विजेचे खालीलप्रमाणे.

**कनिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| सोळंके अर्पिता भाऊराव | प्रथम क्रमांक (मुली) |
| बागल निकिता सुरेशराव | द्वितीय क्रमांक (मुली) |
| सुलताने सचिन विजय | प्रथम क्रमांक (मुले) |
| रासवे संतोष मधुकर | द्वितीय क्रमांक (मुली) |

**वरिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| नायकल शुभांगी आबासाहेब | प्रथम क्रमांक विभागून |
| शेंडगे सरिता नामदेव | |
| पावडे आरती दत्तराव | द्वितीय क्रमांक |
| सुलताने मेधा विजय | तृतीय क्रमांक विभागून |
| आंबटवार पुजा गजानन | |
| पवार प्रतिक्षा विजय | उत्तेजनार्थ |

**वरिष्ठ महाविद्यालय (मुले)**

| | |
|---|---|
| गिनगिने गोविंद प्रल्हाद | प्रथम क्रमांक |
| जाधव प्रभाकर विठ्ठलराव | द्वितीय क्रमांक विभागून |
| नाईकनवरे नितिन रमेश | |
| गोरे गणेश वसंतराव | तृतीय क्रमांक |
| खरात सचिन अर्जुनराव | उत्तेजनार्थ |

४. **वाचक संवाद कार्यक्रम :-** वाचक संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी ग्रंथालयाने पुढाकार घेवून **'वाचक संवाद'** या कार्यक्रमाचे आयोजन दि. २७ मार्च २०१८ रोजी करण्यात आले. सेलू शहरातील ग्रंथालय चळवळ व सर्व शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री लक्ष्मीकांत देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदरील कार्यक्रमात श्री देशमुख यांनी वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगितले. तसेच वाचन संस्कृतीच्या संदर्भातील वाचकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे दिली.

५. **मान्यवरांच्या भेटी :-** मा.डॉ. भालचंद्र मुणगेकर, मा.कुलगुरु डॉ. पंडीत विद्यासागर, डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. जयदेव डोळे, श्री. सुधाकर सुरडकर, प्रा.प्रल्हाद लुलेकर तसेच श्री लक्ष्मीकांत देशमुख यांच्या समवेत अनेक मान्यवरांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला सदिच्छा भेट देवून कौतुक व मार्गदर्शन केले.

## क्रीडा विभाग
## वरिष्ठ महाविद्यालय

सुवर्ण महोत्सवी वर्ष २०१७-१८ चा क्रीडा अहवाल सादर करतांना आनंद होतो की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी क्रीडा विभागाने आपले क्रीडा कौशल्य दाखवित नूतन महाविद्यालयाच्या लौकिकाला साजेसे कार्य केले. महाविद्यालयाचे नाव क्रीडा जगतात उंचावण्याचा प्रयत्न करत यशाचे शिखर गाठले. मुलींच्या व मुलांच्या संघानी मैदानी स्पर्धेत यश संपादन केले.तसेच आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक मुली-मुलांसाठी अद्ययावत असा जीमखाना दररोज सकाळी व सांयकाळी दररोज व नियमितपणे चालू असतो. सकाळी ०६ ते ०८ वाजेपर्यंत विद्यार्थी त्यात व्यायाम करीत असतात. क्रीडा मैदानात सर्वांना क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, खो-खो, मैदानी क्रीडा प्रकार इत्यादी स्पर्धेच्या तयारीसाठी सकाळी व सांयकाळी सरावासाठी मैदान व खेळाचे साहित्य उपलब्ध असते. त्यामध्ये सर्व मुले व मुली सराव करीत असतात. सराव करूनच प्रत्येकजणांची पूढील स्पर्धेसाठी निवड केली जाते.

वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी :-

दि.०२ ते ०५ जानेवारी-२०१८ दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या संयुक्त विद्यामाने अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो (मुले) राष्ट्रीय स्तर स्पर्धेचे आयोजन नूतन महाविद्यालयाच्या क्रीडागंणावर करण्यात आले होते. या स्पर्धेचा सविस्तर अहवाल सुवर्ण महोत्सवी वर्षातील उपक्रमांतर्गत दिला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र, राज्यासह गोवा, मध्यप्रदेश, गुजरात व राजस्थान या राज्यातील ४५ संघ सहभागी झाले होते.

दि.०२ ते ०५ जानेवारी -२०१८ दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व नूतन महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत महाविद्यालयाचा विद्यार्थी सुशांत गुरव याने सहभाग नोंदविला. सुवर्णपदक प्राप्त करुन विद्यापीठास प्रथम क्रमांक मिळवून नूतन महाविद्यालचा नाव लौकिक वाढविला.

दि.२८ ऑगस्ट व २९ ऑगस्ट-२०१७ या कालावधीत आंतर महाविद्यालयीन योगासन व मल्लखांब क्रीडा स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात यशस्वीरित्या करण्यात आले होते. योगासन स्पर्धेत मुलीच्या संघाने विजेतेपद मिळविले तर मल्लखांब स्पर्धेत मुलाच्या संघाने विशेष कामगिरी केली. आंतर महाविद्यालयीन योगासन क्रीडा स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या मुलीचा संघ उपविजयी राहिला.

योग दिन :- दि.२१ जून २०१७ रोजी जागतिक योग दिनानिमित्त योग दिन साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.के.के.कदम, प्रा.नागेश कान्हेकर, प्रा.सुश्मिता भरदम व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी व क्रीडा विभागाचे खेळाडू या सर्वांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

१) टेबल टेनिस :- दि ०५ ऑगस्ट २०१७ रोजी गुरुबुध्दी स्वामी महाविद्यालय पुर्णा येथे (ड) झोन टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत जाजू आभिषेक, शिंदे सोमेश, वाघमारे शुभम, देशमुख कृष्णा, पाचलेगावकर वरद यांनी सहभाग नोदवून

नूतन महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

२) बॅडमिंटन (मुले):- दि६ व ०७ ऑगस्ट २०१७ रोजी शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे (ड) झोन बॅडमिंटन स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. भोकरे अंकित, थोरे आदित्य, जाजू अभिषेक, शिंदे सोमेश, आंधळे कृष्णा यांनी सहभाग नोंदवून नूतन महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. त्यात अंकित भोकरे याची निवड आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन या क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली व त्यात त्याने (ड) झोन चे प्रतिनिधीत्व करुन संघास विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून दिला.

३) बॅडमिंटन (मुली):- दि ०६ व ०७ रोजी संपन्न झालेल्या बंडमिंटन स्पर्धेत १) रावणकोळकर कणिका, मोगल मुक्ता, ढेंगळे शामल, झुटे मानसी यांनी सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्त्व केले.

४) बुध्दीबळ :- दि. ०८ व ०९ ऑगष्ट २०१७ रोजी नागनाथ कॉलेज, औंढा नागनाथ (ड) बुध्दिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात शहाणे शुभम, पाचलेगावकर कार्तिक, निलवर्ण विशाल, मोरे अदित्य, यांनी सहभाग नोंदवून नूतन महाविद्यालयाचे प्रतीनिधीत्त्व केले. त्यात सुभम शहाणे व पाचलेगावकर कार्तिक यांची (ड) झोन मधुन बुध्दीबळ स्पर्धे साठी निवड झाली व संघ उपविजयी राहीला.

५) योगासन व मल्लखांब स्पर्धेचे आयोजन :- दि.२८ व २९ ऑगस्ट रोजी नूतन महाविद्यालय सेलू येथे आंतर महाविद्यालयीन योगासन व मल्लखांब स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, उपप्राचार्य वाय.आर. गायकवाड व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक क्रीडा समितीचे सर्व सदस्य, क्रीडा शिक्षक, श्री डी.डी. सोन्नेकर, प्रा.नागेश कान्हेकर, कु. स्वाती देशपांडे, श्री. पठाडे धनंजय, श्री रवी शिंदे इत्यादीचे मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे ही स्पर्धा यशस्वी करण्यात आली.

नूतन महाविद्यालयात झालेल्या योगासन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील मुलीच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला त्यात कु. कोकाटे शिल्पा, कु. मोगल मुक्ता, कु. पारधी कविता, कु. गिरी मिरा, कु कदम स्वाती, कु. ताठे चचंल यांचा सहभाग होता त्यांची लातूर येथे झालेल्या कोचिंग कॅम्पसाठी सर्वांची निवड झाली. विद्यापीठ योगासन क्रीडा स्पर्धेसाठी कु. शिल्पा कोकाटे, कु. मुक्ता मोगल यांची निवड झाली व त्यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करुन आपल्या महाविद्यालयाच्या नाव लौकीकात भर टाकली. योगासन (मुले) शहाणे शुभम, पाचलेगावकर कार्तिक, थोरे आदित्य, बिडवे अमोल, मिश्रा संदिप, बोराडे पुंजाराम यांनी योगासन क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवून तृतीय क्रमांक मिळविला व योगासन क्रीडा प्रकाराचे कौशल्य दाखवले. मल्लखांब या क्रीडा स्पर्धेत मुलांमधे पाचलेगावकर कार्तिक, बिडवे अमोल,मिश्रा संदिप, बोराडे पुंजाराम, शहाणे शुभम यांनी सहभाग नोदवून महाविद्यालयाचे प्रतीनिधीत्व केले.

मैदानी स्पर्धा :-

दि. २४ व २५ सप्टेबर २०१७ रोजी के.के.एम महाविद्यालय मानवत येथे (ड) झोन मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनीनी १०० मि. २०० मि. ४०० मि.८००, मि. ५०००, मि १००००मि. धावणे व लांब उडी, उंच उडी, यामध्ये सहभाग घेतला. गोळा फेक या इत्यादी क्रीडा प्रकारात बागवान समीर रफिक, भुलंगे धनंजय, अंन्सारी असीफ, पांचाळ अर्जून, अन्सारी मोहमद

शाहा, शेख जुबेद, आवटे गोविंद, चाऊस इरफान, कु. भाले प्रिती, कु. वाघमारे संध्या, कु. वाघ दिक्षा, कु. मगर सिमा, कु. साळवे अश्विनी, कु.तनवर रिना, चेके शुभदा यांनी सहभाग घेतला. कु. भाले प्रिती हिने हया मैदानी क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला.

खो. खो. स्पर्धा :-

दि. १८ व १९ सप्टेबर रोजी नितीन महाविद्यालय पाथरी येथे संपन्न झालेल्या (ड) झोन खो. खो. स्पर्धेत सोनटक्के अक्षय, गुरव सुशांत यांनी निवड चाचणीत सहभाग नोदविला. यात सुशांत गुरव यांची विद्यापीठ संघात निवड झाली.

सॉफट बॉल व बेस बॉल मुले :-

दि.३१/०८/१७ ते ०२/०९/१७ या कालावधीत दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे आंतर महाविद्यालयीन बेसबॉल सॉफ्ट बॉल या स्पर्धेत वाघमारे प्रदिप, शिंदे सोमेश, अर्जुन इश्वर, माळवे सौरभ ,भुलंगे धनंजय, मलवडे निखील, चाऊस इरफान, मगर कृष्णा, ताठे चंद्रशेखर, आवटे गोविंद, काकडे शेषनारायन, पडघन ज्ञानेश्वर यांनी स्पर्धेत सहभाग नोदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

ठळक वैशिष्टये :-

भुवनेश्वर (ओरिसा) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय विद्यापीठ योगासन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील कु. कोकाटे शिल्पा, कु. मुक्ता मोगल यांनी विद्यापीठाचे प्रतीनिधीत्व केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व नुतन महाविद्यालय सेलू आयोजित सेलू येथे संपन्न झालेल्या आखिल भारतीय पश्चिम विभागीय खो. खो. स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा खेळाडू सुशांत गुरव याने सहभाग नोंदवून सुवर्णपदकासह प्रथम क्रमांक मिळवला. म्हैसूर येथे पार पडलेल्या अखिल भारतीय विद्यापीठ खो-खो स्पर्धेत सुशांत गुरव याने सहभाग नोंदवून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

## क्रीडा विभाग
## कनिष्ठ महाविद्यालय

- दि. ११ ते १३ ऑगस्ट २०१७ या कालावधीत नागपूर येथे महाराष्ट्र टेनिस व्हॉलीबॉल राज्यसंघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय ज्युनिअर टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत माळवे निलेश व ताठे चंद्रशेखर, यानी प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल प्राप्त केले. तर यशपाल गायकवाड, व जोशी रोशनी यांनी सहभाग घेतला.
- दि. १८,१९, व २२ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर तालूकास्तरीय शालेय क्रिकेट क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
- दि. २० ते २२ ऑगस्ट २०१७ या कालावधीत सरदार शहर (संगम चुरू राजस्थान) येथे झालेल्या राष्ट्रीय टेनिसव्हॉलीबॉल स्पर्धेत निलेश माळवे व ताठे चंद्रशेखर यांनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करीत प्रथम क्रमांक पटकाविला व त्यांनी या राष्ट्रीय स्पर्धेत गोल्ड मेडल प्राप्त केले.
- दि. २३ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात तालूकास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयाचा आकात राहुल, परितकर श्रीराम, चव्हाण संकेत, शेख अमेर, प्रधान अजय, परदेशी रोहीत, लाटे शिवम,

यांनी सहभाग घेतला. या पैकी आकात राहूल, शेख अमेर, प्रधान अजय, लाटे शिवम या खेळाडुंनी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. तर परितकर श्रीराम, चव्हाण संकेत, परदेशी रोहीत हे व्दितीय स्थानावर राहीले.

- दि. २९ ऑगस्ट २०१७ रोजी मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडुंचा सत्कार करण्यात आला.
- दि. ०६ व ०७ सप्टेंबर रोजी शांताबाई नखाते विद्यालय, देवगाव फाटा येथे तालूकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या आढे श्रीनिवास, राठोड महादेव, राठोड आकाश, पंडागळे धम्मपाल, ढाले स्वप्नील, गवारे गणेश, मुळे सुनिल, गवारे विकास, आढे रोहीदास, पवार भागवत, गटकळ प्रदिप, गोरे वैभव या खेळाडुंनी सहभाग घेतला. या संघाने तालूका स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला.
- दि. १२ सप्टेंबर २०१७ रोजी व्हिजन इंग्लिश स्कुल, सेलू येथे तालुकास्तरीय शालेय बुध्दिबळ व योगासन स्पर्धा संपन्न झाल्या. बुध्दीबळ स्पर्धेत नाईकनवरे वैभव, वसमतकर अथर्व, कावळे रोहण, बोराडे कृष्णा, थोरात प्रकाश यांनी सहभाग घेतला. तर योगासन स्पर्धेत जाधव जयश्री, कनकुटे निशा, क्षिरसागर आनंद, शेळके अरूण, वाघ कृष्णा, महाजन सोमनाथ, यांनी सहभाग घेतला व या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. या प्रसंगी शहाणे शुभम याने बुद्धीबळ तर चेके शुभदा हिने योगासन स्पर्धेत पंच म्हणून कार्य केले.
- दि. १४ सप्टेंबर २०१७ रोजी परभणी येथे सम्पन्न झालेल्या जिल्हास्तरीय आंतर शालेय कुस्ती स्पर्धेत आकात राहूल, शेख अमेर, लाटे शिवम, प्रधान अजय यांनी सहभाग घेतला. शेख अमेर व प्रधान अजय यांचा सदरील स्पर्धेत प्रथम क्रमांक आला.
- १५ सप्टेबर २०१७ रोजी नूतन महाविद्यालयाच्या मैदानावर तालुकास्तरीय शालेय खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
- दि. १७ सप्टेंबर २०१७ रोजी तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा नूतन विद्यालय सेलू येथे संम्पन्न झाल्या. या स्पर्धेत गायकवाड यशपाल, याने लांब उड्डी व २०० मि. धावणे, थिटे अशोक याने ८०० मि. धावने, शेळके अरूण गोळा फेक, घुले पंढरी याने लांब उडी, गटकळ प्रदीप याने ४०० मि. धावने कावळे रोहण भाला फेक या स्पर्धेत सहभाग घेतला व वरील स्पर्धेत खेळाडु प्रथम आले.
- दि. १९ सप्टेबर २०१७ रोजी परभणी येथे सम्पन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉक्सींग क्रीडा स्पर्धेत उमा इंद्रोके, व अंकिता काबरा यांनी सहभाग घेतला. सदरील स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळविला.
- दि. २० सप्टेबर २०१७ रोजी परभणी येथे जिल्हास्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाचे ताठे धनंजय, माळवे निलेश, शिंदे सौरभ, कुलकर्णी सौरभ, उपाध्याय मधुसुदन, ताठे आदित्य, पटाईत हर्ष, चिंचाणे रवि, मोरे लक्ष्मण, कांबळे लखन, काटे अनंत, परदेशी रोहीत, राठोड सचिन यांनी मुलांच्या संघाचे प्रतिनिधित्व केले व त्यांचा जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक आला.
- दि. २१ सप्टेंबर २०१७ रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड येथे विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या ताठे धनंजय, माळवे निलेश, शिंदे सौरभ, कुलकर्णी सौरभ, उपाध्याय मधुसुदन, ताठे आदित्य, पटाईत

हर्ष, चिंचाणे रवि, मोरे लक्ष्मण, कांबळे लखन, काटे अनंत, परदेशी रोहीत, राठोड सचिन यांनी परभणी जिल्हा मुलांच्या संघाचे प्रतिनिधित्व केले. ताठे धनंजय, व माळवे निलेश यांची बेसबॉल स्पर्धेत राज्यस्तरीय निवड चाचणी साठी निवड झाली.

- दि. २३ सप्टेबर २०१७ रोजी सेलू येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला व प्रथम क्रमांक पटकावला. या विजयी संघात ताठे धनंजय, माळवे निलेश, शिंदे सौरभ, कुलकर्णी सौरभ, उपाध्याय मधुसुदन, ताठे आदित्य, पटाईत हर्ष, मोरे लक्ष्मण, काटे अनंत, राठोड सचिन, चिखले वैभव, गिराम अमोल, लाटे ऋषिकेश, काकडे ऋषिकेश, चिंचाणे रवी, यांचा समावेश होता.
- दि. २४ ते २६ सप्टेबर २०१७ या कालावधित राज्यस्तरीय बेसबॉल निवड चाचणी स्पर्धा कन्नड येथे संपन्न झाली. या निवड चाचणीत माळवे निलेश , ताठे धनंजय यांनी सहभाग घेतला.
- दि. २५ सप्टेंबर या दिवशी परभणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत गायकवाड यशपाल याने २०० मि. धावणे व लांब उड्डी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्याचा लांब उड्डी स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला. थिटे अशोक याने ८०० मी. धावण्याच्या स्पर्धेत सहभाग घेतला, शेळके अरूण याने गोळा फेक, घुले पंढरी याने लांब उड्डी, गटकळ प्रदिप याने ४०० मि. धावणे, कावळे रोहण याने भालाफेक स्पर्धेत सहभाग नोंदवला.
- दि. २६ सप्टेबर रोजी परभणी येथे जिल्हास्तरीय शालेय योगासन स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत जाधव जयश्री, कनकुटे निशा, क्षिरसागर आनंद, महाजन सोमनाथ, शेळके अरूण यांनी सहभाग घेतला व यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या प्रसंगी शुभदा चेके हिने पंच म्हणून कार्य केले.
- २७ सप्टेंबर २०१७ रोजी जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा परभणी येथे संपन्न झाल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या आढे श्रीनिवास, राठोड महादेव, राठोड आकाश, पंडागळे धम्मपाल, ढाले स्वप्निल, गवारे विकास, गवारे गणेश, मुळे सुनिल, आढे रोहीदास, पवार भागवत, गटकळे प्रदिप, आकात सीताराम, गोरे वैभव, यांनी सहभाग घेतला. या संघास मार्गदर्शन श्री. प्रशांत नाईक यांनी केले.
- २७ सप्टेंबर २०१७ रोजी परभणी येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय बुध्दिबळ स्पर्धेत नाईकनवरे वैभव, कावळे रोहन, वसमतकर अथर्व यांनी सहभाग घेतला. व नाईकनवरे वैभव यांची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली. यांना मार्गदर्शन प्रा. अनिल डी. कुलकर्णी व शुभम शहाणे यांनी केले.
- दि. २८ सप्टेबर २०१७ रोजी परभणी येथे जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धा संम्पन्न झाल्या. या स्पर्धेत नाईकनवरे वैभव, वसमतकर अथर्व, जोशी अभिषेक, डिग्रसकर सौरभ, सुलताने सचिन यांनी सहभाग घेतला. यांना मार्गदर्शन मो.इम्तीयाज व अंकित भोकरे यांनी केले.
- दि. ३ ऑक्टोंबर २०१७ रोजी सेलू येथे झालेल्या आंतरशालेय जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत माळवे निलेश याने सहभाग घेतला याची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली. त्यास मार्गदर्शन प्रा. श्रीकांत देशमुख यांनी केले.
- दि. ९ ऑक्टोंबर २०१७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या आंतरशालेय विभागीय तलवारबाजी स्पर्धेत माळवे निलेश याने सहभाग घेतला.
- दि. १२ ऑक्टो २०१७ रोजी औरंगाबाद येथे

झालेल्या विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत गायकवाड यशपाल, याने लांब उड्डी स्पर्धेत परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले.

- दि. १३ ऑक्टो २०१७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या विभागीय शालेय बुद्धीबळ स्पर्धेत नाईकनवरे वैभव, याने परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले.
- दि. १७ ऑक्टो २०१७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या विभागीय शालेय योगासन स्पर्धेत क्षिरसागर आनंद, महाजन सोमनाथ, शेळके अरूण, जाधव जयश्री, यानी सहभाग घेतला. त्यांना मार्गदर्शन श्री. डी.डी. सोन्नेकर यांनी केले.
- दि. १७ ऑक्टो २०१७ रोजी बीड येथे झालेल्या विभागीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत महाविद्यालयाच्या माळवे निलेश, ताठे धनंजय, शिंदे सौरभ, कुलकर्णी सौरभ, उपाध्याय मधुसुदन, ताठे आदित्य, पटाईत हर्ष, मोरे लक्ष्मण, काटे अनंत, राठोड सचिन, चिखले वैभव, गिराम अमोल, लाटे ऋषिकेश, काकडे ऋषिकेश, चिंचाणे रवि, यानी सहभाग घेतला. या संघास मार्गदर्शन प्रा. महेश कुलकर्णी यांनी केले. या पैकी माळवे निलेश यांची निवड राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी झाली.
- दि. २२ ते २४ ऑक्टो २०१७ या कालावधीत जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस व्हॉलिबॉल स्पर्धा प्रसंगी तांत्रिक समिती सदस्य म्हणून प्रा. नागेश कान्हेकर यांनी कार्य केले.
- दि. २२ ते २४ ऑक्टो २०१७ या कालावधीत महाराष्ट्र टेनिस व्हॉलीबॉल राज्य संघटनेच्या वतिने घेण्यात आलेल्या युथ राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत माळवे निलेश, गायकवाड यशपाल, ताठे चंद्रशेखर, यानी प्रथम क्रमांक पटकावला व त्यांना गोल्ड मेडल प्राप्त झाले.
- दि. २५ ऑक्टो २०१७ या कालावधीत परभणी येथे संम्पन्न झालेल्या विभागीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत इंद्रोके उमा, व काबरा अंकिता यांनी सहभाग घेतला, उमा इंद्रोके हिने या स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळवला. मार्गदर्शन श्री. किशोर ढोके यांनी केले.
- दि. २७ व २८ ऑक्टो २०१७ या कालावधीत औरंगाबाद येथे झालेल्या विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्रधान अजय, शेख अमेर, यांनी सहभाग घेतला.
- दि. २ ते ०३ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय सॉफ्टबॉल निवड चाचणी मध्ये माळवे निलेश, याने सहभाग घेतला व त्यांची निवड राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी झाली.
- दि. ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत हैद्राबाद येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सेपकटकारा वर्ल्डकप स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून सेकपटकारा राज्यसंघटनेच्या वतीने प्रा. नागेश कान्हेकर यांची निरिक्षक म्हणून निवड झाली.
- दि. २४ ते २६ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत भुवनेश्वर (ओरीसा) येथे झालेल्या राष्ट्रीय टेनिस व्हॉलिबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्रसंघाचे मार्गदर्शक म्हणून प्रा. नागेश कान्हेकर यांनी कार्य केले.
- दि. २४ ते २६ नाव्हेंबर २०१७ या कालावधीत भुवनेश्वर येथे झालेल्या राष्ट्रीय टेनिस हालीबॉल स्पर्धेत ताठे चंद्रशेखर याने प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल पटकावले.
- दि. १८ डिसेंबर ते २२ डिसें २०१७ या कालावधीत जळगाव येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल सराव शिबीरात माळवे निलेश याने सहभाग घेतला. व त्याची निवड महाराष्ट्राच्या

सॉफ्टबॉल संघात झाली.

- दि. २५ ते ३० डिसें २०१७ या कालावधीत इंदोर (मध्यप्रदेश) येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत माळवे निलेश, याने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले सदरील संघाने राष्ट्रीय पातळीवरील तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले व माळवे निलेश यास ब्रॉन्झ मेडल प्राप्त झाले.
- दि. २१ जानेवारी २०१८ रोजी नूतन विद्यालय सेलू येथे पतंजली योग सोसायटी महाराष्ट्र यांच्या वतीने घेण्यात आलेल्या तालूका स्तरीय योगासन स्पर्धेत महाजन सोमनाथ याने सहभाग घेतला. व या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळविला.
- दि. २३ जानेवारी २०१८ रोजी परभणी येथे पतंजली योग सोसायटी महाराष्ट्र यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत महाजन सोमनाथ याने सहभाग घेतला. व या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळविला.
- दि. २८ ते ३० जानेवारी २०१८ या कालावधीत औरंगाबाद येथे झालेल्या सॉफ्टबॉल राज्य संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत माळवे निलेश व शिंदे सौरभ यांनी सहभाग घेतला.
- दि. ११ ते १३ फेब्रूवारी २०१८ या कालावधीत राज्य टेनिस व्हॉलिबॉल संघटनेच्या वतीने सोलापूर येथे घेण्यात आलेल्या पुरूष / महिला सिनियर टेनिस व्हॉलिबॉल राज्यस्तरीय स्पर्धेत माळवे निलेश, ताठे चंद्रशेखर, फाटे निखील यांनी सहभाग घेऊन व्दितीय क्रमांक प्राप्त केला. व राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांनी सिल्व्हर मेडल मिळाले.
- दि. १ मार्च २०१८ रोजी नांदेड येथे पतंजली योग सोसायटी महाराष्ट्र यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विभागीय योगासन स्पर्धेत महाजन सोमनाथ याने सहभाग घेतला. व या स्पर्धेत त्याने द्वितीय क्रमांक मिळविला.
- दि. ११ मार्च २०१८ रोजी पुणे येथे पतंजली योग सोसायटी महाराष्ट्र यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत महाजन सोमनाथ याने सहभाग घेतला.

## महिला वसतिगृह

सेलू आणि परिसर हा मूळातच ग्रामीण संस्कृतीशी निगडीत आहे. ग्रामीण व बहुजन समाजाची मानसिकता ही लिंगभेदभाव हा कौंटुबिक अस्मितेशी जोडलेला. त्यामुळे स्त्री शिक्षण त्यातही मुलींचे महाविद्यालयीन शिक्षण अनास्थेचा विषय-घर-परिसर सोडून शिक्षणासाठी दूरच्या गाव-शहरात मुलीना पाठवायचे म्हटले की, अनेक यक्ष प्रश्न पुढयात घेऊन ते दुर्मखचेहरा ठेवून चिंतीत होतात, किंवा ज्या गावाला जायचेच नाही त्या गावचा रस्ता कशाला विचारा, म्हणत विचार करणे सोडून देतात. म्हणून एकूणच परभणी जिल्ह्यातील स्त्रियांचे उच्च शिक्षण हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे हे वर्तमान विचारात घेत आता स्त्रियांचा शिक्षणाबाबत सामाजिक जाणिवांचा विकास घडावा यासाठी प्रबोधनात्मक जाणिव जागृती सुरु झालेली . त्याचा परिणाम व महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुलींसाठी स्वतंत्र्य वसतिगृहाची केलेली योजना उपयुक्त सिध्द होताना दिसते. विद्यापीठ अनुदान आयोगाने जिल्हा व तालुकास्तरीय महाविद्यालयासाठी मुलीच्या वसतिगृह निर्माणासाठी विशेष अनुदान देण्याची तयार केली. त्यास महाविद्यालयाने प्रतिसाद दिला. या योजनेत विद्यापीठ अनुदान आयोगाने चाळीस

लाखाचे अनुदान दिले. त्यात तशीच मोठया रकमेची भर घालून संस्थेच्या सहकार्याने अतिशय भव्य अशी मुलींच्या वसतिगृहाची वास्तू निर्माण झाली. मुलींचे हे वसतिगृह केवळ लॉजिंग-बोर्डिंग या स्वरुपाचे नाही. या वसतिगृहाचा विशेष असा की, प्राचीन भारतीय परंपरेतील गुरुकुल सदृश्य असे येथील वातावरण आहे. आठ खोल्या ज्या अंतर्गत सर्व सुख-सोयीनी युक्त आहेत. खोलीतील चार मुलीसाठी स्वतंत्र्य कॉट, टेबल-खुर्ची व कपाट आहेत. पंखा सामाईक भोजन कक्ष, अभ्यासकक्ष, परिसरातील छोटेसे क्रीडांगण इ. सर्व प्रकारच्या सुख सोयी आणि अभ्यासासाठी चेतना निर्माण करणारा परस्पर संवाद-जिव्हाळा महत्वाचा ठरतो.

मुलींच्या वसतिगृहातील स्वच्छता, विशेषत: परिसरातीलच सॅनेटरी नॅपकिनचे वेडींग मशिन हा नवलाचा विषय. महाविद्यालय परिसरात येणाऱ्या अतिथींना येथे आपण काय पाहणार असे विचारले तर आम्ही महाविद्यालयाचे मुलींचे वसतिगृह आधी बघू असेच उत्तर मिळेल अशी वसतिगृहाची कीर्ती वाढलेली आहे.

मुलींच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकासासाठी उपयुक्त अशा सर्व वाङ्मयीन व सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन देखील विलक्षण प्रभावीपणे होत असते.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली च्या सहयोगातून महाविद्यालयाच्या परिसरात सर्व सुविधांनी युक्त इमारतीत २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात एकुण ५२ विद्यार्थीनीना प्रवेश तसेच क्रीडा साहित्य उपलब्ध करुन दिले. वसतिगृहातील विद्यार्थिनीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

सध्याच्या काळातील कोणत्याही स्पर्धा परीक्षेतील यश एक अविभाज्य घटक आहे व त्याचकरिता दि. २० सप्टेंबर २०१७ वसतिगृहातील मुलींना IQ (बुध्यांक) चाचणी घेण्यात आली. सर्व मुलीचा IQ टेस्ट करवून त्यांचा कल लक्षात घेवून समुदेशक प्रा. कुरूंदकर प्रकाश यांनी विद्यार्थ्यांना कोणते क्षेत्र निवडता येईल. याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी देखील विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. एम. ए. बेग तर आभार प्रदर्शन डॉ. किर्ती निरालवाड यांनी केले.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

स्पर्धा परीक्षेमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यश मिळावे म्हणून महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राअंतर्गत गेल्या अनेक वर्षा पासून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्या जाते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये या केंद्राचे उद्‌घाटन गडचिरोली येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरिक्षक श्री. सचिन वायाळ यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. सचिन वायाळ यांनी स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला. याप्रसंगी व्यासपिठावर डॉ. व्ही.एच.पांचाळ, श्री. तांबे, प्रा. दयानंद जामगे यांची उपस्थिती होती. सूत्र संचालन प्रा. सुभाष बिरादार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. दयानंद जामगे यांनी केले या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना झाला.

**वनखाते : - नौकरीच्या संधी -**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण

सप्ताह निमित्त 'वनखाते : नौकरीच्या संधी' विषयावर सामाजिक वनीकरण कार्यालय, जालना येथील उपसंचालक श्री. जोशी व त्यांचे सहकारी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वनखात्यामधे असलेल्या विविध नौकरीच्या संधी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सेवा निवृत्त वनअधिकारी श्री. टी.के.कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य प्रा. वाय.आर.गायकवाड यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. सुभाष बिरादार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. व्ही.एच.पांचाळ यांनी केले.

**महात्मा गांधी यांच्या जीवन चरित्रावर परीक्षा :**
महात्मा गांधी जयंती निमित्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी महात्मा गांधी यांच्या जीवन चरित्रावर आधारीत स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ३०० विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये सहभाग घेतला. परीक्षेच्या सुरवातीला महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन श्री.बाबासाहेब चारठाणकर, प्राचार्य डॉ शरद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

**डॉ. विद्या गायकवाड यांचे मार्गदर्शन : –**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त, परभणी येथील उपआयुक्त व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी डॉ. विद्या गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेला कसे सामोरे जायचे याबद्दल सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला.

**श्री.निलेश पळसकर यांचे मार्गदर्शन : –**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त, तहसील कार्यालय पाथरी येथील नायब तहसिलदार श्री. निलेश पळसकर यांनी स्पर्धा परिक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला.

**प्रा. प्रकाश कुरूंदकर यांचे मार्गदर्शन : –**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त, सेवानिवृत्त प्राध्यापक प्रा. प्रकाश कुरूंदकर यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परिक्षेमधे यश प्राप्त करण्यासाठी व्यक्तिमत्वाचे महत्व याबाबत सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला.

**सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन : –**

वार्षिक स्नेह संमेलनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते, या परीक्षेत वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. वरिष्ठ विभागात प्रथम क्रमांक अभय शिनगारे व विजय वाघ यांनी पटकावला तर व्दितीय क्रमांक कु. मोरे कांचन गणेशराव व कु. बिडवे स्नेहल जगन्नाथ यांनी प्राप्त केले, तृतीय क्रमांक कु. हारकळ पुजा एकनाथराव हिने प्राप्त केला. कनिष्ठ विभागात प्रथम क्रमांक रासवे संतोष मधुकरराव याने पटकावला, व्दितीय क्रमांक गुंड सुदर्शन विनोदराव यास मिळाला तर तृतीय क्रमांक भुक्तर अनिल सोपानराव याने प्राप्त केला.

**श्री. शिरगावकर यांचे मार्गदर्शन : –**

गंगाखेड येथे कार्यरत असलेले पोलीस उपअधिक्षक श्री. शिरगावकर यांनी स्पर्धा परीक्षेबाबत स्वत:चे अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेतल्यास यश नक्कीच प्राप्त होते. असे मत त्यांनी

व्यक्त केले. याप्रसंगी श्री.डी.व्ही.मुळे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केला.

**वाणिज्य विभाग, डी.एस.एम कॉलेज परभणी, यांच्या वतीने परीक्षेचे आयोजन:-**

वाणिज्य विभाग, डी.एस.एम.कॉलेज,परभणी यांच्या वतीने कॉमर्स टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते या परिक्षेसाठी १७५ विद्यार्थी उपस्थित होते सदरील परीक्षा यशस्वी करण्यासाठी डी.एस.एम. कॉलेज परभणी येथील डॉ.प्रभाकर हारकळ, प्रा. श्रीकांत देशमुख, तसेच वाणीज्य विभाग प्रमुख प्रा. विनायक टेंगसे, डॉ. एस.एस.दंडवते, डॉ.एम.डी.सवंडकर, डॉ. एन.एस.पदमावत, डॉ.व्हि.एच.पांचाळ यांनी परिश्रम घेतले.

**वक्तृत्व कार्यशाळचे आयोजन : -**

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व विद्यार्थी उपक्रम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टें ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड जनजागरण सप्ताहा निमित्त वक्तृत्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, आकाशवाणी केंद्र अकोला येथील सौ. सिमा रोठे यांनी वक्तृत्व कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला सुत्रसंचालन डॉ. आर.एम.खाडप यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.व्हि.एच.पांचाळ यांनी केले.

**विज्ञान मंडळ : -**

दरवर्षी प्रमाणे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची विज्ञान विषयात गोडी वाढावी व यश संपादन करावे याकरीता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये विज्ञान मंडळाची स्थापना करण्यात आली. विज्ञान मंडळा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सहल, भित्तीपत्रके तयार करणे, चर्चासत्र आयोजन करणे, तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजीत करणे असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

**विज्ञान मंडळाचे उद्घाटन : -**

विज्ञान मंडळाचे उद्घाटन महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपुर जि.तालूर येथील सेवा निवृत वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. वाय.बी.गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यावरण प्रदुषण व त्याचे सजीवावर होणारे दुष्परिणाम या विषयावर त्यानी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सहचिटणीस डॉ. व्हि.के.कोठेकर यांनी केला.

**श्री. मोहन सोनपावले यांचे मार्गदर्शन : -**

महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. मोहन सोनपावले, मुंबई येथे कार्यरत असलेलेयांनी विज्ञान शाखेतील पदविधर विद्यांर्थ्यांसाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद इत्यादी ठीकाणी औद्यौगिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या नौकरीच्या संधी बाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केला. प्रास्ताविक डॉ.व्हि.एच.पांचाळ यांनी केले, सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु.राजर्षी बोराडे हिने केले.

**प्राचार्य डॉ. एस.पी. रोठे यांचे व्याख्यान : -**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त अकोला येथील प्राचार्य डॉ.एस.पी.रोठे यांनी 'औषधी वनस्पती' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केला.

**डॉ. एस.टी.बंडेवार यांचे मार्गदर्शन : -**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त, पाथरी जि.औरगाबाद येथील

डॉ.एस.टी.बंडेवार यांनी 'संकरीत पीके' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य प्रा.वाय.आर.गायकवाड यांनी केला.

**डॉ. नंदकुमार कुंचके यांचे मार्गदर्शन : –**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताह निमित्त, कलश सिडस्, जालना येथील शास्त्रज्ञ डॉ.कुंचके यांनी 'आधुनिक संकरीत पीके' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य प्रा.वाय.आर.गायकवाड यांनी केला.

**कु. वंदना बुरखुंडे हिचा महाविद्यालयातर्फे सत्कार : –**

कु. वंदना बुरखुंडे एप्रिल २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, या परीक्षेत या विद्यापीठात वनस्पतीशास्त्र या विषयात गुणाणुक्रमे सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयातर्फे तीचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सेवानिवृत्त वनअधिकरी श्री.टी.के.कुलकर्णी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. उपप्राचार्य प्रा.वाय.आर.गायकवाड, अध्यक्षस्थानी उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते कु.वंदना बुरखुंडे चा सत्कार करण्यात आला. कु. वंदना बुरखुंडे हिने महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

**डॉ. पुरूषोत्तम गिरी यांचे व्याख्यान : –**

विज्ञान मंडळ व पेंशनर्स असोशिएशन, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या मेडीकल कॉलेज,बदनापूर येथे कार्यरत डॉ. पुरूषोत्तम गिरी यांनी 'अवयव दान' या विषयाबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सहचिटणीस डॉ.व्हि.के.कोठेकर यांनी केला. याप्रसंगी व्यासपिठावर प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, डॉ.व्हि.एच.पांचाळ, यांची उपस्थिती होती, डॉ. गंगाधर गळगे यांनी सुत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन डॉ.व्हि.एच.पांचाळ यांनी केले. याप्रसंगी सेवानिवृत्त संघाचे प्रा.ए.टी.देशमुख, श्री.विठ्ठलराव डोंबे, श्री.नारायण इक्कण, श्री.धामणगावर, श्री.मधुकर वाकडीकर, श्री.टी.के.कुलकर्णी, यांची उपस्थिती होती, श्री. देशमुख यांनी अवयव दानाची घोषना केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

**भित्तीपत्रकाचे प्रदर्शन : –**

१५ ऑगस्ट २०१७ व २६ जानेवारी २०१८ या राष्ट्रीयसणा निमित्त विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विविध विषयात संबधीत प्राध्यापकांचे मार्गदर्शन घेऊन भित्तीपत्रके तयार केली. त्या सर्व भित्तीपत्रकाचे प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनास संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, सहचिटणीस श्री. जयप्रकाश बिहाणी, सदस्य श्री. दत्तरावजी पावडे, श्री.मकरंद डिग्रसकर, श्री. किशोरजी मालाणी, श्री. अजीजखॉ पठाण, गावातील प्रतिष्ठीत नागरिक, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी व सर्व सहकारी प्राध्यापकांनी भेट दिली. व विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

**वर्ग व प्रयोगशाळा सजावट उपक्रम : –**

१५ ऑगष्ट २०१७ स्वातंत्र्य दिनानिमीत्त विद्यार्थ्यांनी स्वइच्छेने वर्ग व प्रयोगशाळा सजावट हा उपक्रम राबवला सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबधीत वर्ग खोल्यांची व प्रयोग शाळेची सजावट केली सदरील वर्ग खोल्यांना व प्रयोग शाळेला संस्थेचे पदाधिकारी निमंत्रीत सर्वांनी भेट दिली. व संबधीत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**जागतिक एड्स दिनानिमीत्त कार्यक्रम : –**

१ डिसेंबर २०१७ जागतीक एड्स दिनानिमित्त

उपजिल्हा रूग्णालय सेलू, न्यायालय सेलू तसेच विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या बदनापूर येथे मेडिकल कॉलेज येथे कार्यरत डॉ. पुरूषोत्तम गिरी यांनी एड्स या रोगाबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. सेलू येथील न्यायाधीश श्री. माट्रा यांनी एड्स या रोगाबाबत न्यायालयीन बाजू मांडली. उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. हरबडे यांनी एड्स बाबत शास्त्रीय माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला.

**विज्ञान प्रथम वर्ष :-**

**स्वागत व उद्‌बोधन समारंभ :**

विज्ञान प्रथम वर्ष या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत व उद्‌बोधन समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना संबधीत प्राध्यापकांनी दिली अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केला. याप्रसंगी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देवून स्वागत केले. विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक डॉ.व्हि.एच.पांचाळ, डॉ.आर.एम.खाडप, डॉ.के.एस.निरालवाड, डॉ.बि.के.कुमठेकर, प्रा.व्हि.बी.पटारे, डॉ.एन.एस.पदमावत, प्रा.अमित कुलकर्णी, आदिंची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु.अमृता कदम व थोरे अजिंक्य यांनी केले.

**डॉ. शिल्पा कवचट यांचे मार्गदर्शन : -**

विज्ञान मंडळाअंतर्गत महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी व सद्य शासकीय रुग्णालय परभणी येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. शिल्पा कवचट यांनी 'महिलांचे आरोग्य' या विषयावर विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला.

**श्री. पी.एफ.कोटेचा यांचे मार्गदर्शन : -**

१७ सप्टेबर ते २४ सप्टेंबर २०१७ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, जनजागरण सप्ताहा निमित्त, ईफको संस्थेचे जिल्हाव्यवस्थापक श्री. पी.एफ.कोटेचा यांनी 'आधुनिक शेती' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच श्री. जाधव यांनीही रासायणिक खते व शेती उत्पादन या बाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला. सुत्रसंचालन प्रा. दयानंद जामगे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.व्हि.एच.पांचाळ यांनी मानले.

**रक्तदान शिबीराचे आयोजन : -**

सुक्ष्मजिवशास्त्र विभाग, मायक्रोबॉयलॉजी सोसायटी इंडीया, उस्मानाबाद व जनकल्यान रक्तपेढी जालना, यांचे वतीने केशवराज बाबासाहेब मंदिर,सेलू येथे यात्रेनिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात २५ भक्तांनी रक्तदान केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री. दत्तात्रय मंडलीक, श्री.सतीश दिग्रसकर, श्री. ह.भ.प. वसंतराव मंडलिक, श्री. मोहन खापरखुंटीकर तसेच डॉ. व्हि.एच.पांचाळ, प्रा.अमित कुलकर्णी, प्रा.दयानंद जामगे, यांनी परिश्रम घेतले.

**श्री. आवटे व श्री. पावडे यांचा सत्कार : -**

विज्ञान मंडळअंतर्गत महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. अनंत आवटे व श्री. गणेश पावडे, हे विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवरील नेट परीक्षा लाईफ सायन्स या विषयात उत्तीर्ण झाल्या बद्दल त्यांचा महाविद्यालयाचा वतीने सत्कार करण्यात आला.

**प्रिन्स इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयास भेट : -**

प्रिंन्स इंग्लिश स्कुल सेलू, येथील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेतील विविध विभागातील प्रयोगशाळेंना भेट दिली. व माहिती घेतली, तसेच त्यांनी बोटॅनिकल गार्डनलाही भेट दिली. व विविध वनस्पतींची माहिती घेतली याप्रसंगी विद्यार्थ्यां सोबत शिक्षक श्री. पामे, यांची उपस्थिती होती. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्हि.एच.पांचाळ, डॉ.पी.आर.वंंठाळे, डॉ.आर.एम.खाडप, डॉ.के.एस.निरालवाड, डॉ.बि.के.कुमठेकर, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**वृक्ष-रक्षाबंधन कार्यक्रम : -**

वनस्पतीशास्त्र विभाग, विद्यार्थी उपक्रम समिती व कै.अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्था, कवडधन, ता.सेलू, यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष-रंक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तहसीलदार श्री. स्वरूप कंकाळ, पोलीस निरीक्षक श्री. चौरे, जिल्हापरिषद परभणी उपसभापती श्री. अशोक काकडे, यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थीनिंना वृक्षांचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनिंना वृक्षरोप देण्यात आले.

**रक्तदान शिबीर गुंज ता.पाथरी जि.परभणी : -**

सुक्ष्मजिवशास्त्र विभाग, मायक्रोबॉयलॉजी सोसायटी इंडीया, उस्मानाबाद, श्री. योगानंद सरस्वती संस्थान गुंज,खुर्द ता.पाथरी जि.परभाणी व जनकल्यान रक्तपेढी जालना यांच्या संयुक्त विद्दमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात ४० भक्तांनी रक्तदान केले. शिबीराचे उद्घाटन नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सहचिटणीस डॉ.व्हि.के.कोठेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गुंज येथील संस्थानचे श्री. मकरंद दिग्रसकर, श्री.कल्याणराव चौधरी, श्री. हेमंत दिग्रसकर, श्री.श्रीकांत सोन्नेकर, प्रा. पी.एन. कुलकर्णी सेवानिवृत्त प्रा.ए.टी.देशमुख यांची उपस्थिती होती.

**हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी शिबीर : -**

सुक्ष्मजीवशास्त्र विभाग, मायक्रोबॉयलॉजी सोसायटी इंडिया, उस्मानाबाद, हेल्थ क्लब,नूतन महाविद्यालय सेलू, व जनकल्याण रक्तपेढी जालना, यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील ३५० विद्यार्थी व विद्यार्थीनींची हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबीरासाठी डॉ. व्हि.एच.पांचाळ, प्रा.के.के.कदम, प्रा.नागेश कान्हेकर, प्रा. एल.एच.काळे, प्रा.दयानंद जामगे, प्रा. यु.के.हेसे, प्रा.ऊंडेगावकर, प्रा.गोपाळ पींपळगावकर, जनकल्यान रक्तपेढीचे श्री. शिवराज जाधव व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले.

**अभ्यास सहल : विज्ञान प्रथम वर्ष :**

विज्ञान प्रथम वर्ष जीवशास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल बदनापूर येथील मेडिकल कॉलेज येथे आयोजित केली होती. मेडिकल कॉलेज मधील प्राणी संग्रहालय तसेच सुक्ष्मजीवशास्त्र विभागास विद्यार्थ्यांनी भेट दिली. तसेच औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग व वनस्पतीशास्त्र विभाग यांना भेट दिली. प्राणीशास्त्र विभागातील प्राणी संग्रहालय, डी.एन.ए. प्रयोगशाळेस भेट दिली. प्राणीशास्त्र विभाग प्रमुख तसेच डॉ. खेडकर यांनी विशेष सहकार्य केले. वनस्पतीशास्त्र विभागातील वनस्पती संग्रहालय व टिशू कल्चर प्रयागशाळेस भेट दिली. याप्रसंगी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अरविंद धाबे व त्यांचे सहकारी डॉ. पंडुरे यांनी सहकार्य केले. सदरील अभ्यास सहलीचे आयोजन डॉ. व्हि.एच.पांचाळ व डॉ.आर.एम.खाडप यांनी

प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनानूसार केले.

विज्ञान द्वितीय वर्ष वनस्पतीशास्त्र, या वर्गातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल माहूर येथील फॉरेस्ट येथे आयोजीत केली होती, विद्यार्थ्यांनी विविध वनस्पतींचा अभ्यास केला तसेच त्या वनस्पतींचे संकलन केले. सदरील अभ्यास सहलीचे आयोजन डॉ.व्हि.एच.पांचाळ, डॉ.आर.एम.खाडप, डॉ.पी.आर.कंठाळे यांनी प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनानूसार केले.

विज्ञान तृतीय वर्ष जीवशास्त्र, या वर्गातील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल कलश सिड्स जालना येथे आयोजित केली होती. विद्यार्थ्यांनी संकरीत भाजीपाला पिकांचे प्रदर्शन, सिड् प्रोसेसिंग युनिट, सिड् पॅकिंग युनिट, सिड् मार्केटिंग युनिट इत्यादी ठिकाणी भेट दिली. याप्रसंगी कलश सिड्स चे संचालक श्री. समीर अग्रवाल यांनी विद्यार्थ्याना शुभेच्छा दिल्या. बदनापूर जि.जालना येथील मेडिकल कॉलेज मधील प्राणीसंग्रहालयास व सूक्ष्मजीवशास्त्र विभागास भेट दिली याप्रसंगी डॉ.सिद्दीकी, डॉ.पुरूषोत्तम गिरी, डॉ.सचिन सोळंके, यांनी विषेश सहकार्य केले.

**सुक्ष्मजीवशास्त्र विभागास द्वितीय राष्ट्रीय पुरस्कार : –**

सुक्षजिवशास्त्र विभागाने २०१६–१७ या शैक्षणीक वर्षात विविध उपक्रम राबवल्याबद्दल मायक्रोबॉयलॉजी सोसायटी इंडिया, उस्मानाबाद, यांचे वतीने सुक्ष्मजीवशास्त्र विभागास राष्ट्रीय पातळीवरील द्वितीय पुरस्कार देण्यात आला. प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देण्यात आले. सदरील कार्यक्रम शिवाजी महाविद्यालय अमरावती, येथे सपन्न झाला. डॉ. ए.एम.देशमुख व डॉ.एस.डी.पाटील यांच्या हस्ते पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ.व्हि.एच.पांचाळ, प्रा.अमित कुलकर्णी, प्रा.दयानंद जामगे, यांनी पुरस्कार स्वीकारला.

## मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये मराठी विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर विद्यार्थ्यांमध्ये गटचर्चा घेण्यात आली.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्त दि. १ ते १५ जानेवारी २०१८ या कालावधीत विभागाच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ११ जानेवारी रोजी अंबाजोगाई, जि. बीड येथे अभ्यास सहल काढण्यात आली. यात मराठीतील आद्यकवी मुकुंदराज यांची समाधी, पासोडीकार दासोपंत मंदिर, बाराखांबी मंदिर येथील प्राचीन शिल्प, हत्तीखाना आदी स्थळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी या स्थळांचा इतिहास, साहित्य यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील मराठी विभाग, नाट्यशास्त्र विभाग, ग्रंथालय, संगणक प्रयोगशाला इ. विभागांना भेट देण्यात आली. यावेळी तेथील विद्यार्थी व नूतन च्या विद्यार्थ्यांमध्ये चर्चा तेथील प्राध्यापकांचे मार्गदर्शन दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी परस्परांशी संवाद, चर्चेच्या माध्यमातून

नवनवीन उपक्रम, महाविद्यालयातील सुविधा यासंबंधी माहिती घेतली.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मातृभाषेतून शिक्षणाचे महत्व या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

दि. २७ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिन तथा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विभागाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. किर्तीकुमार मोरे हे उपस्थित होते.

यावेळी मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी त्यार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, उपप्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख यादवराव गायकवाड, अतिथी डॉ. किर्तीकुमार मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या शैक्षणिक वर्षात जयदेव डोळे, कादंबरीकार डॉ. नागनाथ पाटील, प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर, अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख आदी साहित्यिक, विचारवंत मान्यवरांनी मराठी विभागास भेट दिली.

## दूर शिक्षण अभ्यासकेंद्र

ग्रामीण भागातील विदयार्थी, नोकरी / व्यवसाय करणारे, गृहिणी यांना पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे दूरशिक्षण अभ्यासकेंद्र कार्यरत आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र अशा सात विषयांत पदव्युत्तर शिक्षणाची (एम.ए.) सोय या अभ्यासकेंद्रात उपलब्ध आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात एम.ए. प्रथम वर्षासाठी ४० तर एम.ए. द्वितीय वर्षासाठी २२ अशा एकुण ६२ विदयार्थ्यांनी प्रवेश घेतला. अभ्यासकेंद्रात विद्यार्थ्यांसाठी संपर्कसत्र, प्रकल्प लेखन, मार्गदर्शन, अभ्याससाहित्य आदी सुविधा पुरवण्यात येतात. डॉ.आर.ए.झोडगे हे या अभ्यासकेंद्राचे केंद्र समन्वय म्हणून काम पाहतात.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

**अभ्यासकेंद्र :- नूतन महाविद्यालय,सेलू जि.परभणी (८७०४A)**

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे खंडित झालेले शिक्षण, तसेच इतर अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र आमच्या महाविद्यालयात कार्यान्वित असून दहावी/ बारावी नापास विद्यार्थ्यांना पूर्वतयारी शिक्षणक्रम परीक्षा ऊत्तीर्ण होऊन बी. ए./बी.कॉम प्रथम वर्षासाठी प्रवेश दिला जातो. पोलीस भरती, शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना बढतीसाठी या संधीचा फायदा होतो. आमच्या अभ्यासकेंद्रात पूर्वतयारी / बी.ए / बी. कॉम अभ्यासक्रम शिकविले जातात. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात एकूण ५११ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यात पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी १६, बी.ए. प्रथम वर्ष १५०, बी. ए. द्वितीय वर्ष १५२, बी. ए. तृतीय वर्ष १५०, बी. कॉम प्रथम

वर्ष १२, बी. कॉम द्वितीय वर्ष १२, बी. कॉम तृतीय वर्ष १६ असे एकुण ६२८ विद्यार्थी अभ्यासकेंद्रात शिक्षण घेत आहेत. आमच्या अभ्यासकेंद्रात दरवर्षी दि. १ जुलै रोजी विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त मा कै. वसंतराव नाईक यांची जयंती आणि दि.१२ मार्च रोजी मा. कै. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात येते. विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्धारीत केलेले उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना वेळेवर समंत्रण व मार्गदर्शन केले जाते तसेच उत्कृष्ठ निकालाची परंपरा कायम राखलेली आहे. या शैक्षणिक वर्षात केंद्र संयोजक म्हणून डॉ. पानपट्टे सेवा निवृत्त झाल्यामुळे केंद्र संयोजनाची जबाबदारी प्रा. के.के. कदम यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

### गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना

अध्ययन, अध्यापन प्रक्रियेची फलनिष्पत्ती म्हणजे यश असते. प्रेरणा, प्रोत्साहन आणि कौतुकामुळे यशाची एक वेगळीच रंगत असते. यशाचे असे रंगतदार इंद्रधनुष्य म्हणजे महाविद्यालयातील कल्पना एका साध्या पण लक्षवेधी प्रसंगातून साकारली, महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य द.रा.कुलकर्णी यांना राज्य शासनाचा आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार प्राप्त झाला, तेव्हा त्यांच्या सत्कार समारंभातून आपल्या गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचे देखील असेच कौतुक करावे, ज्या योगे नंतरच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा प्रोत्साहन मिळेल ही सद्भावना घेऊन स्वंयस्फूर्तपणे या योजनेसाठी आर्थिक योगदान प्राप्त झाले. अनेक शिक्षणप्रेमी मान्यवरांनी आर्थिक देणगी देऊन सकारात्मक प्रतिसाद दिला. प्रतिवर्षी हा गुणवत्ता सन्मान पारितोषिक वितरण सोहळा संपन्न होतो.

शैक्षणिक आस्था व जिव्हाळा असलेले संस्थेचे हितचिंतक आणि शिक्षकांच्या वतीने प्रतिवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान सोहळा आयोजित करण्यात येतो.

या वर्षी सत्कार सोहळयासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेद्वारे पोलीस उपअधिक्षक या पदावर निवड झालेले श्री प्रणिल गिल्डा तसेच दुसऱ्या माजी विद्यार्थीनी श्रीमती श्रद्धा जाधव (स्टेट बँक ऑफ इंडिया, परभणी) येथे अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते, या सत्कार सोहळ्यात एकूण १५० विद्यार्थ्यांना रोख रक्कम रु.२२,०००/- पारितोषिक तसेच प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे सहचिटणीस डॉ.व्ही.के.कोठेकर यांनी केला, याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.शरद एस.कुलकर्णी, उपप्राचार्य, प्रा.वाय.आर.गायकवाड, संयोजक डॉ.व्ही.एच.पांचाळ, डॉ.एस.एस.दंडवते, डॉ.आर.आर.बैनवाड, प्रा.डी.एच.जामगे, प्रा.व्ही.बी.पटारे, प्रा.ए.व्ही.सुत्रावे, श्री आर.एस.गंभीरे यांची उपस्थिती होती, प्रा.एच.आर.हडसनकर यांनी सुत्रसंचलन व आभार व्यक्त केले.

- **मोफत माती परीक्षण कार्यक्रम**

प्रतिवर्षी प्रमाणे वनस्पतीशास्त्र विभाग व इफको संस्था औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६/०४/२०१८ ते दि.२४/०४/२०१८ या कालावधीत सेलू तालूक्यातील ग्रामीण भागात मोफत माती परीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन दि.१७/०४/२०१८

मंगळवार रोजी पावडे हादगांव येथे करण्यात आले. पावडे हादगांव मोफत माती परीक्षण व शेतकरी मेळावा संपन्न झाला. नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सदस्य मा. श्री दत्तरावजी पावडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. इफकोचे श्री जगदीश देवतकर, समर्पित सर्वोदयी विचारवंत म्हणजे विशाल अग्रवाल यांनी झटपट खत निर्मितीबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ.व्ही.एच.पांचाळ, डॉ.पी.आर.कंठाळे यांची उपस्थिती होती. श्री शिवाजीराव पावडे, श्री परमेश्वर पावडे यांनी विशेष सहकार्य केले. प्रा.डी.एच.जामगे यांनी सूत्रसंचलन व आभार व्यक्त केले. मोफत माती परीक्षण कार्यक्रम सेलू तालुक्यातील वाघ पिंप्री, पावडे हादगांव, सोनवटी, गोगलगांव, खुपसा, मोरेगांव, हातनुर व वाकी या ठिकाणी घेण्यात आला. वाकी येथे समारोप प्रसंगी इफकोचे श्री पी.एफ.कोटेचा, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, डॉ.पी.आर.कंठाळे, श्री प्रभाकर सुरवसे यांची उपस्थिती होती. यासर्व ठिकाणी सदरील गावातील शेतकऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

**हेल्थ क्लब**

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शरीर व मन:स्वास्थ ही खरे तर व्यक्ती-समाज-राष्ट्राची निर्मितीक्षम, कर्तृत्त्व संपन्न मनुष्यबळ संवर्धनाचे एक मानक समजले जाते. म्हणूनच महाविद्यालयाचा क्रीडा विभाग अनौपचारिक शिक्षणाचे ऊर्जस्वल असे केंद्र असतो. सामुहिक जीवन-कर्तृत्त्वाला आशय संपन्न करणाऱ्या क्रीडा विभागाने 'मल्टी-जिम' च्या माध्यमातून तरुणांस बलोपासनेचा मूलमंत्र दिला. त्याच बरोबरीने संपर्क संवादाचे परिघ वाढवणारे शहरातील अनेक गणमान्य व्यक्ती प्रशासकीय अधिकारी यांना निरोगी जीवनासाठी उपयुक्त व्यायामाचा भाग असलेला टेबल-टेनीस, टेनीस बॉल, शटल कॉक, बुध्दीबळ, कॅरम वगैरे खेळाचे मुक्त मंच आणि आरोग्य विषयक संवादासाठीचे विचारपीठ या स्वरुपात 'हेल्थ-क्लब' चे निर्माण केले. या हेल्थ क्लबच्या कार्याचा हा अहवाल.

यावर्षी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव निमित्त विशेष आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले हे शिबीर दि.१२ मार्च २०१८ रोजी, यात डॉ.अरुण कुलकर्णी, मुंबई यांचे मणक्याच्या विकारावर मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनींची तपासणी देखील घेण्यात आली . याप्रसंगी सेलू डॉक्टर असोशिएशनच्या वतीने डॉ.सुनिल कुलकर्णी, डॉ.सुबोध माकोडे,डॉ. गोळेगावकर, डॉ. सौ. अंजली हडसनकर उपस्थित होत्या. तसेच दि.१२ एप्रिल २०१८ रोजी रक्तगट व हिमोग्लोबीन तपासणी शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाली. यासाठी जालना येथून रक्तपेढीचे डॉक्टर व त्यांचे तज्ञ सहकारी उपस्थित होते.त्यात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी, सेलू व आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिक यांची देखील तपासणी करण्यात आली व समुपदेशन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी तथा संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

सुवर्ण महोत्सव



उच्चशिक्षण विशेषांक

# प्रेरणा

२०१७-१८

## हिंदी विभाग

*जिस शिक्षा से हम अपना जीवन निर्माण कर सके,*
*मनुष्य बन सके चरित्र गठन कर सके और विचारों का*
*सामंजस्य कर सके , वही वास्तव में शिक्षा कहलाने के योग्य है ।*

**– स्वामी विवेकानंद**



अनुक्रम


- **कैसी हो अगली शताब्दी की शिक्षा** – वृषाली खेडेकर
- **२१ वी सदी में सुदूर शिक्षा का उद्देश्य** – मो. शाहेदुल्ला अन्सारी
- **२१वी सदी की उच्च – शिक्षा के संदर्भ में शिक्षण की पद्धतियाँ** – रेखा ढाले
- **२१वी सदी उच्च शिक्षा में समस्याएँ एवं संभावनाएँ** – मयुरी वायाळ
- **वर्तमान युग में उच्च शिक्षा संबंधी सुझाव** – संपदा कुलकर्णी
- **मुक्त विश्वविद्यालय : एक नई अवधारणा** – सचिन खरात

# कैसी हो अगली शताब्दी की शिक्षा

**वृषाली खेडेकर**
विज्ञान प्रथम वर्ष

इक्कीसवी सदी में शिक्षा के प्रति लोगो की अपेक्षाएँ खुब बढ़ गयी है। क्योंकि शिक्षा द्वारा आर्थिक विकास, जनतंत्र का सुदृढीकरण और समानता लायी जा सकती है। वर्तमान में शिक्षित व्यक्तियों की संख्या और ज्ञान की मात्रा अधिक होते हुए भी वैयक्तिक पतन एवं सामाजिक विघटन नही रूक पा रहा है, यह बिडंबना मानी जा सकती है। किंतु हम इसके पहले अर्थात सौ साल पहले सामाजिक परिवर्तन की बात करे तो तत्कालीन सामाजिक परिवर्तन की गति इतनी धीमी थी कि परिवर्तन का झटका कभी –कभार ही महसूस होता था। किंतु आज का ज्ञान, कौशल और आभिवृत्तियाँ पुरानी पड़ने लगेगी , अब हमारे सामने चुनौती होगी – ज्ञान को यथावत करने, कौशल को उँचा उठाने और अभिवृत्तियों को गतिशील बनाने की ।

ज्ञान को गतिशील करते हुए भुतकाल में छात्रों को अपेक्षावृत्त स्थिर समाज के लिए तैयार किया जाता था लेकिन अब हमें लगातार बदलते हुए समाज के लिए छात्रों को तैयार करना पडेगा। उसमें बदलाव के धक्कों और झटकों को झेलने की योग्यता पैदा करनी पड़ेगी। आज के छात्रों को आगे चलकर प्रतिक्षण चुनौतियाँ झेलने का सामर्थ्य डालने की कोशिश करनी होगी। छात्रो के लिए केवल बोलना, लिखना, पढ़ना और गणन करना पर्याप्त नही होगा। तंत्रज्ञान के क्षेत्र में अपूर्व क्रांति के फलस्वरूप शिक्षा और जीवन में दूरसंचार का प्रभुत्व बढ़ता जाएगा। वीड़ियो, इंटरनेट, कॅम्प्युटर के कारण कागज–पेंसिल की आवश्यकता धीरे – धीरे समाप्त होती दिखाई दे रही है। पाठ्यपुस्तकों पर निर्भरता भी घटती जाएगी। उनका स्वरूप बदलेगा। इलेक्ट्रानिक एवं डिजीटल पाठ्यपुस्तकों का प्रयोग बढ़ता जाएगा। कम्प्युटर एवं इंटरनेट के द्वारा स्वयं शिक्षा पर अधिक बल दिया जाएगा। शिक्षक की भूमिका पुन: परिभाषित होगी।

सामाजिक जटिलता बढ़ने के कारण समस्या समाधान की एकाधिक नई–नई तकनीकों की आवश्यकता पड़ेगी। अत: छात्रों में विचारशीलता और सृजनशीलता को उन्मुक्त और विकसीत करना पड़ेगा। इस हेतु अध्यापन और शोधकार्य के क्षेत्र में समस्या उठाने एवं समस्या का समाधान करने की दिशा में सोचना पड़ेगा। आजीवन बहुआयामी शिक्षा को अपनाकर ही हम अपने अस्तित्व को सार्थक बना सकेंगे। आनेवाला समय हमें यह मानने के लिए बाध्य करेगा कि भविष्य के बारे में हमारी

कल्पना ही शिक्षा का स्वरूप निर्धारित नहीं करती बल्कि शिक्षा स्वयं भी भविष्य की तस्वीर गढती है ।

आनेवाले समय में शैक्षिक प्रौद्योगिकी की लोकप्रियता तो बढ़ेगी लेकिन उसकी अवधारणा में परिवर्तन होगा। टेलीकॉम के साथ मनोविज्ञान, समाज-विज्ञान और शिक्षा-विज्ञान की संगत से शैक्षिक प्रौद्योगिकी का बहुआयामी विषय आनेवाले समय में और भी अधिक महत्त्वपूर्ण हो जाएगा।

शिक्षा के ढाँचे और स्वरूप में सामाजिक बदलाव के साथ कई अनुसंधान और परिवर्तन हो रहे है। आगे चलकर शिक्षा की संरचना अधिक खुली, लचीली ओर छात्र ज्ञान सापेक्ष हो जाएगी। नई तकनीकों एवं टेक्नालॉजी के शिक्षा में प्रवेश के कारण अध्यापन के लिए पूर्व तैयारी , नियोजन तथा अंतर-विषय सहयोग की आवश्यकता का महत्त्व बढ़ता जाएगा। जब भी समाज पर कोई संकट या समस्या उपस्थित होती है तब उसकी रोकथाम के लिए दरवाजे खटखटाए जाते है। और पाठ्यक्रम में उस समस्या को एक विषय के रुप में सम्मिलित करने की माँग की जाती है। अतः आनेवाले समय में शिक्षा द्वारा समाज में नैतिक चेतना जगाकर उसे मूल्याभिमुख बनाना बेहद जरूरी हो गया हैं। समाज को यह भी समझाना जरूरी हो गया है कि शिक्षा केवल ज्ञान और कौशल वृध्दि की अपेक्षा न करते हुए नैतिक विकास की माँग करेंगी। वर्तमान पीढ़ी को प्रश्न, विचार और बहस का प्रशिक्षण देकर मस्तिष्कों को खुला और दिला को विशाल बनाना, परिवार, शिक्षा संस्था और सामाजिक संगठनो का प्राथमिक कर्तव्य हो गया है। तभी राष्ट्रीय एवं अंतर्राष्ट्रीय सद्भाव के मार्ग मे बाधक बनी कट्टरताओ एवं संकीर्णताओं से मुक्ति पाई जा सकेगी। शिक्षा द्वारा अहिंसक मस्तिष्क तैयार कर विश्वव्यापी हिंसा और आंतकवाद को नियंत्रित करना चुनौती होगी । इन सभी की रोकथाम के उपाय भी मस्तिष्क से ही किये जाने चाहिए। यदी ऐसा संभव हो पाया तो अगली शताब्दी में राष्ट्र विकास निश्चित ही हो पाएगा।

# 21 वी सदी में सुदूर शिक्षा का उद्देश्य

**मो. शाहेदुल्ला अन्सारी**
कला तृतीय वर्ष

सुदूर शिक्षा को कोई एक नाम से नहीं अपितु सारे विश्व में इसे भिन्न – भिन्न नामों से जाना जाता है जैसे पत्राचार पाठ्यक्रम, घर – पहुँच शिक्षा, स्वतंत्र शिक्षा, बाह्य–शिक्षा, चार दिवारी के बाहर शिक्षा, ओपन ऐजूकेशन, सुदूर शिक्षा, दूरस्थशिक्षा व दूर शिक्षा। किंतु भारत में इसके लिए सुदूर शिक्षा व पत्राचार पाठ्यक्रम शब्दों का प्रयोग किया जाा है।

